सर जदुनाथ सरकार

मोगल साम्राज्याचा ऱ्हास

भाग तीन

अनुवादक

र. गं. विद्वांस

मोगल साम्राज्याचा ऱ्हास

(भाग ३)

सर जदुनाथ सरकार लिखित

'Fall of the Mughal Empire' (Part III)

या ग्रंथाचा अनुवाद

: अनुवादक :

र. गं. विद्वांस

महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ, मुंबई

प्रथमावृत्ती :
जुलै १९८१
(शके १९०३)

प्रकाशक :
सचिव,
महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ,
मंत्रालय, मुंबई–४०००३२.

किंमत १८ रुपये

मुद्रक :
श्री. ग. दिक्षीत, व्यवस्थापक,
दी प्राज्ञ प्रेस,
३१५, गंगापुरी,
वाई–४१२ ८०३ (जिल्हा–सातारा)

निवेदन

मराठी भाषेला आणि साहित्याला आधुनिक ज्ञानविज्ञानाच्या व आधुनिक सांस्कृतिक मूल्यांच्या आविष्काराने सामर्थ्य प्राप्त व्हावे, आधुनिक शास्त्रे, ज्ञानविज्ञाने, तंत्र आणि अभियांत्रिकी, त्याचप्रमाणे प्राचीन भारतीय संस्कृती, इतिहास, कला इत्यादी विषयांत मराठी भाषेला सर्वच स्तरांवर ज्ञानदान करण्याचे सामर्थ्य प्राप्त व्हावे, विविध विद्या व कलाविषयक उत्कृष्ट ग्रंथांची निर्मिती करून मराठी भाषेला जगात उच्च स्थान मिळवून द्यावे, या उद्देशाने महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळाने बहुविध वाङ्मयीन व सांस्कृतिक कार्यक्रम आखले आहेत. ते व्यवस्थितपणे कार्यवाहीत आणण्याकरिता वाङ्मय, ललितकला, समाजविज्ञान, विज्ञान, इतिहास इत्यादी विषयांवरील प्रकल्प साकार करण्यासाठी, तसेच मराठी वाङ्मयकोश, किंवा शब्दकोश इत्यादी योजनांचे नियंत्रण व मार्गदर्शन करण्यासाठी मंडळाने विविध समित्या स्थापन केल्या आहेत.

मंडळाच्या विविध प्रकल्पांचा मुख्य उद्देश नामवंत लेखकांकडून आणि साहित्यिकांकडून निरनिराळ्या विषयांवरील स्वतंत्र पुस्तके लिहून घेणे हा आहे. त्याचबरोबर संस्कृत व अन्य भारतीय भाषांतील, त्याचप्रमाणे इंग्रजी, फ्रेंच, जर्मन, इटालियन, रशियन, ग्रीक, लॅटिन इत्यादी पाश्चात्त्य भाषांतील अभिजात ग्रंथांची व उच्च साहित्यामधील विशेष निवडक पुस्तकांची भाषांतरे किंवा सारांश, अनुवाद अथवा विशिष्ट विस्तृत ग्रंथांचा आवश्यक तेवढा परिचय करून देणे हाही मंडळाचा उद्देश आहेच. मंडळाने इतिहासाच्या अभ्यासासाठी व प्रकाशनासाठीही एक योजना तयार केली आहे. या योजनेच्या अंतर्गत ' फॉल ऑफ दि मुगल एम्पायर ' या सुप्रसिद्ध इतिहास-संशोधक सर जदुनाथ सरकार यांच्या पुस्तकाचा अनुवाद प्रसिद्ध करीत आहोत. हे पुस्तक चार भागांत लिहिले असून त्यांतील तिसऱ्या भागाचा हा अनुवाद आहे. त्यात २६ ते ३७ अशी एकूण बारा प्रकरणे आहेत. श्री. विद्वांस हे मूळचे ललितलेखक. त्यांनी हा अनुवाद अर्थवाही भाषेत समर्थपणे केला आहे.

इतिहासाचा अभ्यास हा वर्तमान आणि भविष्यकालीन प्रगतीसाठी अवश्य असतो. वरील ग्रंथाचे उर्वरित तीन भागही मंडळ लवकरच सादर करील.

मुंबई – ३२
ता. १ ऑगस्ट, १९८१

सुरेंद्र बारलिंगे
अध्यक्ष
महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ.

अनुवादकाचे दोन शब्द

'फॉल ऑफ दि मुगल एम्पायर' हे पुस्तक थोर इतिहास-संशोधक सर जदुनाथ सरकार यांनी लिहिलेले. या पुस्तकाचे एकूण चार भाग आहेत. त्यांतील तिसऱ्या भागातील मजकुराचा हा मराठी अवतार. मुगल साम्राज्याच्या ऱ्हासाची कारणे व मीमांसा करताना या महान संशोधकाने शब्दशः हजारो हस्तलिखिते वाचली, अज्ञात कागदपत्रे चाळली व हा थोर ग्रंथ लिहिला. मराठीत अनुवाद केलेल्या या तिसऱ्या भागात २६ ते ३७ अशी एकूण बारा प्रकरणे आहेत.

अनुवादकाचे काम तसे म्हटले तर भारवाहकाचेच. तरीसुद्धा मूळ मजकुराचा मराठी अनुवाद करताना अनेक वेळा गोंधळल्यासारखे होई. काही संक्षेप समजत नसत, काही संदर्भ अडचणीत टाकीत. अशा वेळी भारत इतिहास संशोधक मंडळाचे कार्याध्यक्ष व इतिहासमहर्षी ग. ह. तथा तात्यासाहेब खरे, पुणे विद्यापीठाच्या इतिहास विभागाचे प्रमुख डॉ. अ. रा. कुलकर्णी व सव्यसाची पत्रकार आणि इतिहासज्ञ श्री. स. मा. गर्गे यांनी वेळोवेळी मार्गदर्शन केले. त्यांचा मी ऋणी आहे.

हा अनुवाद मराठीत करावयाला मला आपलेपणाने प्रोत्साहन दिले ते म. रा. सा. सं. मंडळाच्या भाषांतर विभागाचे माजी मानसेवी संपादक श्री. बा. रं. सुंठणकर यांनी. सांप्रतचे वाङ्मयप्रकल्पाचे मानसेवी संपादक डॉ. वा. ना. कुबेर व त्यांच्या कचेरीतील सेवकवर्ग यांनीही वेळोवेळी आवश्यक ते सहकार्य दिले. वाईच्या दि प्राज्ञ प्रेसमधील व्यवस्थापक व अन्य सेवकवर्ग यांनी पुस्तकाची छपाई सुबक व निर्दोष केली; याबद्दल त्या सर्वांचाच मी आभारी आहे.

शेवटी एकच विनंती. अनुवादात काही चुका अगर त्रुटी राहिल्या असतील, तर तो दोष माझा. तसे काही आढळलेच तर जाणकारांनी मला क्षमा करावी.

९६४ (नवा) सदाशिव पेठ,
पुणे ३०

र. गं. विद्वांस

अनुक्रमणिका

प्रकरण ३३ वे :

दिल्लीशासनाचा मुखत्यार महादजी शिंदे

प्रकरण २६ वे

उत्तर भारतात मराठ्यांची कामगिरी १७७०–१७७१

१. दिल्ली येथे शाही सत्तेचे पुनरुज्जीवन व तिच्यापुढील तातडीची कामगिरी

दुसरा शहा अलम याने दि. ६ जानेवारी १७७२ या दिवशी बादशहा म्हणून दिल्लीत प्रवेश केला. त्यावेळी आसपासच्या प्रांतांतून बंडखोरांचा धुमाकूळ चालू होता. बादशाहीसत्ता दृढमूल होण्याच्या दृष्टीने या बंडखोरांना जरब बसेल अशी पावले टाकणे हे या पुनरुज्जीवित शाही सत्तेला भागच होते. या कामी मिर्झा नजफ्खान या शूर तलवार-बहाद्दर सेनानीचे बादशहाला खूपच साहाय्य झाले. ज्यांच्यापासून शाहीसत्तेला जास्तीतजास्त धोका, असे बंडखोर म्हणजे झबिताखान रोहिला व नवलसिंग जाट. या दोघांजवळ अमाप संपत्ती होती. तरीही बादशहाला रीतसर खंडणी देण्याच्या कामी दोघेही हेतुपुरस्सर टाळाटाळी करीत होते. बादशहाच्या खासगी तैनातीसाठी जो मुलूख तोडून दिलेला होता त्यातला बराचसा प्रदेश या दोघांनी गिळंकृत केला होता. या दोघांचे पारिपत्य ही शाही सत्तेपुढील जटिल समस्या होती. ती सोडवायलाच हवी होती, पण ती समस्या चांगल्या प्रकारे सोडवायची म्हणजे दुबळ्या बादशाहीसत्तेला कोणाच्या तरी भक्कम आधाराची गरज होती. मराठासेनेने असा आधार देण्याची संधी साधली असती तर नवल नव्हते. बादशहाही त्याबाबत अगतिक होता. त्यामुळे बादशाहीसत्तेने झबिताखानविरुद्ध लढा पुकारला तेव्हा मराठ्यांनी बादशाहीसत्तेला उघडउघड पाठिंबा दिला. बादशहाने नवलसिंगविरुद्ध शस्त्र उपसले होते त्यावेळी मराठ्यांची बादशहाला मदत होतीच. पण ती अगदी उघडउघड दिसण्यासारखी नव्हती. त्या बाबतीत मराठ्यांनी बादशहाला अप्रत्यक्ष साहाय्य खूपच केले व शाहीसत्तेला ह्या साहाय्याचा फार उपयोग झाला हे नाकारता येणार नाही. या सगळ्या राजकीय घडामोडींचे सम्यक् आकलन होणे जरूर आहे. त्यासाठी मराठ्यांचे उत्तरेत पुनरागमन होण्यासारखी कोणती परिस्थिती उद्भवली व तिचा दिल्लीच्या मोगल सत्तेवर काय परिणाम झाला, याचा मागोवा घेणे अत्यावश्यक आहे. जवाहिरसिंग मरण पावल्यावर जाटांची परिस्थिती काय होती, १७७० आणि १७७१ या दोन वर्षांत मराठ्यांनी काय काय व कशा कशा हालचाली केल्या, या बाबतचा शहा अलम पुनः सत्तेवर येण्यापूर्वीचा प्राथमिक तपशील प्रकरण २२ व २५ यात दिलेला आहे.

२. जवाहिरसिंगाचा मृत्यू : जाटसत्तेस उतरती कळा : त्याची कारणे

जवाहिरसिंगाची कारकीर्द म्हणजे धुमश्चक्रीचीच कारकीर्द. याच धामधुमीत जवाहिर-सिंगाचा खून होऊन त्याच्या वादळी जीवनाची अखेर झाली. [जून, १७६८] जवाहिर-

सिंगाचा धाकटा भाऊ [व सूरजमलचा शेवटचा मुलगा] रतनसिंग हा त्यानंतर गादीवर आला. जाटसत्ता त्यावेळी हेवा वाटावा इतकी भक्कम होती. जवाहिरचे निधन झाले त्या आधीच काही महिने जयपूरचा पराक्रमी राजा मरण पावला होता. मराठ्यांच्या पुढे घरच्याच अडचणी इतक्या होत्या की, उत्तर हिंदमध्ये हालचाल करण्याइतकी सवड त्यांच्याजवळ नव्हती. बुंदेलखंड आणि उत्तरमाळवा या ठिकाणचे मराठ्यांचे प्रतिनिधी आपापल्या जागांवर कसेबसे तग धरून दिवस ढकलीत होते. बादशहा इंग्रजांचा आधार घेऊन अलाहाबादला काळ कंठीत असल्याने दिल्लीला तर कोणी स्वामीच नव्हता. नजीबउद्दौला हा जवळजवळ संपल्यात जमा होता. राजकीय जीवनातून निवृत्त होण्याचीच तो वाट पाहत होता. थोडक्यात जाटराजा रतनसिंग याच्या सत्तेला बाहेरून कोणताही धोका नव्हता. राज्यातील बंडखोर व शिरजोर वतनदारांचा, सॉम्ब्र व मादेक या त्याच्या शूर पाश्चात्य सेनानींनी केव्हाच बीमोड करून टाकला. आणखी एक चांगली बाजू म्हणजे राज्याची आर्थिक परिस्थिती अतिशय उत्तम होती. वास्तविक जवाहिरसिंगाची कारकीर्द म्हणजे लढायाच लढाया. वडिलांच्या मृत्यूचा सूड घेण्यासाठी त्याने मराठा व शीख सेनेचे साहाय्य घेतले होते व त्यापायी अमाप खर्चही केला होता. तरीसुद्धा सरकारी खजिन्यात पैशाला तोटा नव्हता. बदनसिंग व सूरजमल या दोघांनीही आपल्या दीर्घ व सुव्यवस्थित अमदानीत भरतपूर येथील खजिना काठोकाठ भरून ठेवला होता.

थोडक्यात, जाटांची परिस्थिती इतकी चांगली होती की राज्यात शांतता नांदून प्रगती होणे अवघड नव्हते. पण देशाचा सर्वात मोठा शत्रू हा देशातलाच असतो, बाहेरचा नसतो. आपले महत्त्व व वर्चस्व सिद्ध करणाच्या महत्त्वाकांक्षेपायी जवाहिरसिंगाने नेमके नको तेच केले. त्याने जुन्या जाट सरदारांचे पूर्ण शिरकाण केले. त्यातले काही अशा योग्यतेचे होते की बदनसिंगानेही त्यांच्यावर हात उचलण्याची धिटाई दाखविली नव्हती. सूरजमलने तर त्यांच्यातल्या काहींना हाताशी धरून योग्य संधी उपलब्ध करून देऊन त्यांच्यातून शूर सेनानी निर्माण केले होते. पण जवाहिरसिंगाने मात्र या सर्व श्रेष्ठ जुन्या जाट सरदारांचा निकाल लावला. अशा रीतीने सर्व जबाबदार माणसे गेल्याने राज्याचे भवितव्य एकाच व्यक्तीच्या सामर्थ्यावर व अकलेवर अवलंबून राहिले. तसे पाहिले तर जाट ही एक केवळ लढाऊ जमात. अशा जमातीचा अभ्युदय व्हावयाचा तर राज्याची धुरा संभाळणारे हे एकाचढ एक असे हवेत. जाटसेनेच्या विश्वासाला तडा जाऊ द्यावयाचा नाही व राज्यात कार्यक्षम सेनेची उभारणी करावयाची, पण या कामासाठी आपल्यामागे कोणी राहूच नये अशी व्यवस्था (?) जवाहिरने करून ठेवली होती.

जाट ही बव्हंशी शेतीत रमणारी अडाणी जमात. भारतातील युद्धतंत्रावर पाश्चात्य शिस्तीचा व डावपेचाचा जो प्रभाव पडत होता, तो त्यांना मानवण्यासारखा नव्हता. त्यांच्या राज्यातील लष्कराची ही उणीव त्यांनी जे दोन पाश्चात्य सेनानी आपल्याकडे नोकरीस ठेवलेले होते त्यातून भरून निघण्यासारखी होती. ही उणीव भरून काढणारे दोन पाश्चात्य सेनानी म्हणजे एक वॉल्तेर रेनहार्द [हा सॉम्ब्र किंवा समरू या नांवाने विशेष ओळखला

ात असे] व दुसरा रेने मादेक. पैकी समरू हा फक्त पैशावर नजर ठेवणारा. जास्त से देणारा कुणी भेटला की पहिली नोकरी सोडून खुशाल त्याच्याकडे जाई. त्यामानाने ादेक हा राष्ट्रीय जाणिवेने भारलेला. चंद्रनगर येथील फ्रेंचांचा प्रमुख मसिअ शवालिए याने ाला दिल्ली येथे मोगलांच्या दरबारात जाण्यास सांगितल्यावरून [ऑक्टोबर, १७७२] ोगलांच्या दरबारात फ्रेंचांचा वकील म्हणून राहून ब्रिटिशांच्या हिंदुस्थानातील वर्चस्वाला ह देण्याचे महत्त्वाचे राष्ट्रकार्य त्याला करावयाचे होते.

जवाहिरसिंगानंतर जे गादीवर आले त्यांच्याजवळ शहाणपणा आणि चारित्र्य ोन्हीही नव्हते. शिवाय राज्यावर जरब बसवील असा अधिकारी पुरुष अस्तित्वात सल्याने राजघराण्यातील अन्य व्यक्तींजवळ उरला होता तो केवळ पोकळ डौल व स्वार्थी ाणि फुटीर वृत्ती. अशा परिस्थितीत जाट सत्तेचा ऱ्हास अल्प काळात झाला नसता तरच वल.

. रतनसिंगाची कारकीर्द : त्याचा मृत्यू व वारसदारीसाठी झगडे

१७६८ च्या सुरुवातीला मराठे आणि जाट यांच्यात बुंदेलखंड व उत्तर माळवा या ठिकाणी लढाया झाल्या होत्या. रतनसिंग हा एक जाट पलटणीचा प्रमुख होता; लढाई हणजे काय, याचा त्याला पुरेपूर अनुभव होता. तरीही सत्ता हाती येताच त्याने जर काही ले असेल तर विलास आणि ऐषाराम. तो व्रजमंडलचा नवा प्रमुख बनला. त्यानंतर दावन या पुण्यक्षेत्राच्या दर्शनास तो गेला. त्यावेळी मजा म्हणून त्याने यमुनातीरावर क थाटामाटाचा समारंभ केला. त्यावेळी चार हजार नर्तिकांचा ताफा उपस्थित होता. रमणुकीचा हा प्रकार अतिशय भव्य व फार खर्चाचा होता. पुढे रतनसिंग एका ोसाव्याच्या नादी लागला. या ब्राह्मण गोसाव्याचे नाव गोसावी रूपानंद. 'किमया रण्यात आपला हात धरणारा कुणी नाही' असे रूपानंद सांगे. त्यावर विश्वास ठेवून रीस तयार करण्याचे काम रतनसिंगाने त्याच्याकडे दिले. रूपानंद धूर्त होता. ापल्याला काही येत नाही हे त्याला माहीत होते. तरी रतनसिंगला भूलथापा देऊन ाने त्याच्याकडून भरपूर पैसा उकळला. पुढे आपली लबाडी दडवायची कशी, हे त्याला ळेना. स्वतःची कातडी बचावण्यासाठी त्याने अत्यंत गुप्तपणे लोखंडाचा परीस बनविण्याचा योग सुरू केला व त्या वेळी धूर्त रूपानंदाने आपल्या शिष्योत्तमाचाच बळी घेतला. ाचा परिणाम व्हायचा तोच झाला. राजाच्या शिपायांनी रूपानंदाचे मस्तक धडावेगळे करून त्याची वैकुंठास रवानगी केली. दुर्दैवी रतनसिंग काही तासच जिवंत होता ८ एप्रिल, १७६९]. रतनसिंगनंतर नाव घेण्यासारखा जाटसेनानी हयात होता तो म्हणजे ानशहा. दानशहा हा नवलसिंगाचा मेहुणा. रतनसिंगाचा अल्पवयीन पुत्र केसरीसिंग[1] ाच्यावतीने राज्याची देखभाल करण्याची जबाबदारी दानशहावर सोपविण्यात आली.

दानशहा हा जाट राजघराण्यातील रक्ताचा नव्हता, तो बाहेरचाच. त्यामुळे वलसिंग व रणजितसिंग यांना दानशहाविरुद्ध वादळ उठविणे अवघड नव्हते. त्यांनी,

दानशहा हा स्वतःच सत्ता हातात घेण्याच्या खटपटीत आहे अशी हूल उठविली. राजघराण्यातील व्यक्ती व राज्यातील प्रमुख अधिकारी या सर्वांची त्यांनी एकजूट केली व दानशहाला हुसकावून लावण्याचे ठरविले. त्यासाठी अनुकूल संधी हवी होती तीही मिळाली. राज्यात कुठेतरी बंडखोरांनी उठाव केला होता. त्यांचा समाचार घेण्यासाठी मादेक तिकडे गेला. मादेक हा दानशहाचा पाठीराखा. तोच दूर आहे असे पाहून या दोघा बंधूंनी दानशहाला दिग येथील त्याच्या निवासस्थानी घेरले व राज्यातून निघून जाण्याच्या अटीवर त्याच्याशी समझोता केला. त्यानुसार दानशहा निघून गेला; मग मागे राहिलेल्यांत सत्तास्पर्धा सुरू झाली. मादेक व अन्य प्रमुख अधिकारी यांची समजूत घालून राज्याची देखभाल करणारा प्रतिनिधी म्हणून नवलसिंगाने सर्व सूत्रे आपल्या हातात घेतली. त्याचा धाकटा भाऊ रणजित याच्या वाट्याला कुंभेरचा किल्ला आला होता. रणजित त्याबाबत नाखूष होता, पण हात चोळीत बसण्यापलिकडे त्याला काहीही करता येत नव्हते. नवलसिंगाने कुंभेरच्या किल्यावर हल्ला चढविला. या चमत्कारिक परिस्थितीने रणजित गडबडून गेला. त्याने जवळ जवळ ७०,००० शीख शिपाई जमा केले. हे शीख शिपाई शूर असले तरी भाडोत्री होते. पण त्यासाठी कुंभेरचा वेढा उठवून या नव्या शीख सेनेस तोंड द्यावयास जाणे मादेकला भाग पडले. मादेक व रणजितची शीखसेना यांच्यात बराच काळ अटीतटीचा सामना सुरू होता, पण त्यात शेवटी शीख सैन्याचा पराभव झाला. [दि. १५ फेब्रुवारी, १७७० वा त्या आसपास]. लढाईच्या जागेपासून ते जवळजवळ ३० लीग [९० मैल] मागे पळाले व जाट राज्याच्या सरहद्दीबाहेर जाऊन थांबले. शेवटी नवलसिंगाच्या माणसांकडून फितुरीबाबत योग्य तो चंदीचारा हाती पडताच ते आपापल्या गावी निघून गेले. [फेब्रुवारी अखेर]

४. रणजितसिंग उत्तरेकडे परत आलेल्या मराठ्यांचे साहाय्य घेतो

भावाभावांच्या आपापसातील अघोरी स्पर्धेने जाट राज्यात एका नवीन पण जबरदस्त शत्रूचा शिरकाव झाला. नव्या दमाचा पेशवा माधवराव याने १७६९ अखेर आपले सर्व गृहकलह मिटवून विरोधकही संपुष्टात आणले होते व पुण्यातील राज्यकारभाराची घडी व्यवस्थित बसवून त्यावर आपल्या कर्तबगारीचा ठसा उमटविला होता. पानिपतच्या लढाईत मराठी सत्तेला लागलेला कलंक धुवून काढून मराठासत्तेचे वर्चस्व हिंदुस्थानात पुनः प्रस्थापित करावे हा हेतू मनात धरून आपल्याकडील उत्कृष्ट सेनानींना त्याने हिंदुस्थानात रवाना केले होते. या मोहिमेचे उद्दिष्टही स्पष्ट होते, ते म्हणजे २६ मे १७५४ रोजी मराठे व जाट यांच्यांत तह झाला होता. [पहा : प्रकरण १२, पोटप्रकरण ५] त्यानुसार जाटांकडून खंडणीच्या रकमेची वसुली करावयाची होती. तसेच मराठ्यांनी जी लष्करी कुमक पुरविली होती त्याचा मोबदला म्हणून खर्चापोटी त्यांना दिल्लीदरबारातून अंतर्वेदीतील काही मुलूख तोडून दिला होता. हा करार, इमाद–उल्मुल्क हा वझीर असताना झालेला होता. [पहा : प्रकरण १२, पोटप्रकरण ७] पण अहमदशहाने पानिपत येथे मिळविलेल्या विजयानंतर या तोडून दिलेल्या मुलुखातील बराचसा भाग जाट व रोहिले हे परस्पर बळकावून बसले होते. त्यांचा समाचार घेणे आवश्यक होते.

मराठा सेनेचे आधिपत्य करणाऱ्या सेनानींसमोर एक कठिण कामगिरी होती यात
का नाही. फार मोठे सुसज्ज सैन्य असेल तरच या अवघड कार्यात यश मिळणे शक्य
ते. पण अशी सेना उभारावयाची म्हणजे सगळी साधने व द्रव्याचे पाठबळ मुबलक
. पुण्याला मराठ्यांच्या तिजोरीत तर ठणठणाटच होता. तेव्हा एक युद्ध खेळण्याचा
र्व भागविण्यासाठीं दुसरे युद्ध खेळणे आवश्यक होते. त्यासाठी लागणारा पैसा वसूल
ता येईल असा उत्तर हिंदमधील सर्वात जवळचा ऋणको म्हणजे जाट राजा. १७६७ च्या
यापासून १७६९ च्या पहिल्या तिमाहीपर्यंत जाट फौजांचे बुंदेलखंड व उत्तर माळवा
ील मराठ्यांच्या ठाण्यावर जे अविरत हल्ले चालू होते, ते एकाच उद्देशाने; तो म्हणजे
ठ्यांना तेथून हाकलून देणे. या कामी त्यांनी रजपूत राजे व गोहदचा जाट राजा
चे साहाय्य घेतले होते. रतनसिंगाचा खून झाला व जाट राज्यात आपापसात लाथाळी
रू झाली, तेव्हा हे हल्ले आपोआप थंडावले. ही परिस्थिती म्हणजे मराठ्यांना आपले
र्घकालीन स्वप्न प्रत्यक्षात उतरविण्याची सुसंधीच.

पेशव्यांच्या प्रमुख सेनापतींनी आपल्याला हव्या असलेल्या रकमेपैकी खूप मोठ्या
मेची मागणी, प्रथम मेवाडच्या राजाकडे केली. [सप्टेंबर, १७६९] आणि ते राघोगडच्या
ल्ल्याला वेढा घालण्यासाठी निघून गेले. राघोगडचा किल्ला खेत्री प्रांतात आहे. त्याशिवाय
पूरच्या राजाकडून यावयाच्या खंडणीची रक्कमही बरीच थकली होती. त्याबाबत तगादा
वण्यासाठी मराठा सैन्य करोली भागात गेले. या ठिकाणी रणजितसिंगाचा कारभारी त्यांना
ऊन भेटला व रणजितसिंगाला मदत करण्याबाबत त्याने मराठ्यांच्या साहाय्याची याचना
ली. मराठ्यांना ही इष्टापत्तीच होती. त्यांनी ते ताबडतोब मान्य केले. मराठा सेना अंदाजे
,००० होती व त्यांच्याजवळ चांगली शस्त्रास्त्रेही होती. मराठे लगेच कुंभेरला गेले.
च्या प्रमुखाने दि. ५ मार्च, १७७० रोजी रणजितसिंगाशी बोलणी केली व त्याच्या
ल्ल्याबाहेर ते तळ ठोकून बसून राहिले. पण मान्य केलेली खंडणी देण्याच्या बाबतीत
जित हा हेतुत: टाळाटाळी करू लागला. परिणामत: मराठ्यांच्या सैन्यात असंतोष
रला व जाट बंधूंबाबत कसलाही भेदभाव न बाळगता त्यांनी दोघांच्याही मुलुखात
ळूट करायला सुरुवात केली. नवलसिंग, आपल्या सैन्यासह दिग येथे तळ ठोकून होता.
ठ्यांशी सामना द्यावा, का ते मागतील ती खंडणी देऊन त्यांच्याशी समझोता करावा
विचारात तो हेलकावत होता [**सीपीसी** : खंड ३, क्रमांक १२८, १६३] अशा
ारातच एक महिना गेला. जाटसेना तशीच उगी बसून शत्रूच्या हल्ल्याची दूर राहून
पाहत होती. [**एसपीडी** : खंड २९; पृष्ठ ३०२-३०५]

सोंख-अरिंगची लढाई, ६ एप्रिल, १७७०

दि. ६ एप्रिलला नवलसिंगाला लढाईला[२] तोंड द्यावे लागले. आपल्या मूर्खपणाने त्याने
प्रसंग आपल्यावर ओढवून घेतला होता. तळ ठोकून बसलेल्या मराठा सैन्याने दिग
णि कुंभेर नजिकची मिळविता येण्यासारखी सर्व रसद खाऊन फस्त केली होती. नवीन

काही मिळण्याची शक्यता नव्हती. मराठ्यांना येऊन मिळण्यासाठी नजीबउद्दौला, अंतर्वेदीत येऊन पोहोचला होता. मराठ्यांनी त्याच्याशी मित्रत्वाचे संबंध जोडले असल्याने त्यानुसार त्यांनी आपला लष्करी सरंजाम, व मोठाल्या तोफा तुकोजी होळकर याच्या नेतृत्वाखाली मथुरेस रवाना केल्या व त्यामागोमाग दणकट घोडदळ, बाण व सहज हलविता येण्यासारख्या हलक्या तोफा हे पाठविण्यात आले. हे सर्व सैन्य अंतर्वेदीतील जाट मुलुखाचा ताबा घेण्यासाठी चालले होते. नवलसिंगाने मराठ्यांना घनघोर लढाईचे आह्वान दिलेले, पण मराठे असे अचानक निघालेले पाहून त्याला कळून चुकले की आपण प्रतिकार केला नाही तर अंतर्वेदीतील आपला मुलुख मराठे युद्ध न करताच बळकावतील म्हणून तो दिग मधून बाहेर पडला व मराठे चालले होते, त्याच रस्त्याशी उत्तरेकडे काही मैलांवर समांतर असा जो दुसरा रस्ता होता, त्या वाटेने, मराठ्यांचा पाठलाग करण्यासाठी म्हणून तो निघाला. पण काय करावयाचे याची स्पष्ट आखणी त्याच्यासमोर नव्हती. तो स्वतः सैनिकीपेशाचा नसल्याने लढाईतले डावपेच त्याला समजत नसत. त्यामुळे एकदा या सेनानायकाचे ऐक, तर एकदा त्याचा सल्ला घे, असेच त्याचे चाले.

दि. ६ एप्रिल रोजी जाटांची सेना गोवर्धनकडे कूच करण्यासाठी दिगबाहेर पडली. गोवर्धन हे दिगच्या पूर्वेस नऊ मैलांवर आहे. जाट सैनिकांत शिस्त नव्हती. जणू एकमेकांचा एकमेकांशी संबंध नाही अशाप्रकारे मन मानेल तसे घोळके करून ते चालले होते. लढाई करण्याच्या दृष्टीने कुठल्याही तुकडीची तयारी नव्हती. सैनिकांपैकी बरेचसे काही आवश्यक अशा गरजेच्या वस्तू आणण्यासाठी दिगला गेले होते. तसेच लष्करी साहित्याच्या संरक्षणासाठी म्हणूनही सैनिकांच्या काही तुकड्या वेगळ्या पाठविण्यात आल्या होत्या. जाट सैन्याला मराठा सैन्य दिसले ते दुपार टळून गेल्यावर. त्यावेळी मराठी सेना जाटांकडे तोंड करून लढण्याच्या पवित्र्यात खडी होती. मराठा सैन्य ठाकले होते ती जागा सोंखच्या वायव्येस काही अंतरावर होती. [सोंख हे ठिकाण कुंभेर आणि मंथुरा यांच्या मध्यावर आहे.] काय करावे याबाबत नवलसिंगाने आपल्या युद्धविषयक सल्लागारांची बैठक घेतली. नवलसिंगाचे मागे राहिलेले बरेचसे सैनिक अद्यापि यायचे होते व दिवसही फार उरला नव्हता म्हणून ‘ आजतरी आपण हल्ला करू नये ’ असा योग्य सल्ला सॉम्ब्र आणि मादेक यांनी दिला. पण मराठ्यांवर सूड घ्यावयास उतावळ्या झालेल्या दानशहाला या दोन सेनाप्रमुखांचा सल्ला मानवला नाही. त्याने तो सरळ धुडकावून लावला. दानशहाची हद्दपारी संपली होती व त्याच्यासारखाच स्थानभ्रष्ट झालेल्या बंगालच्या नबाब कासीमअलीचे साहाय्य घेऊन तो परत आला होता. मराठ्यांचा सुसज्ज तोफखाना त्यांच्याजवळ नसल्याने त्यांना चिरडून टाकण्याची ही सुसंधी आपल्या डोळ्यादेखत फुकट जाऊ द्यायला तो तयार नव्हता. रानवट नागा गोसाव्यांचा प्रमुख, गोसावी बालानंद, यानेही दानशहाच्या म्हणण्यास दुजोरा दिला. नवलसिंग हा मुळातच स्वतः स्वतःचा निर्णय घेण्यास असमर्थ. शेवटी त्याने या दोघांच्या विनाशकारी सल्ल्याचा स्वीकार करावयाचे ठरविले व त्यानुसार आपल्या सैन्यास मराठा सैन्यावर तुटून पडण्यास फर्माविले.

जाटसेनेच्या आघाडीस २००० स्वार होते. घोडदळातील हे सर्व लढवय्ये बहादुरिया व अन्य रजपूत लढवय्या जमातीतील होते. त्यांचे नेतृत्व दानशहाकडे होते. हे आघाडीचे स्वार मराठा सैन्यावर तुटून पडले. मराठ्यांनी बाण व हलक्या तोफा यांचा फार मोठ्या प्रमाणावर वापर केला. त्यात बहुतेक जाट स्वार कामी आले, राहिले ते पळून गेले. हा प्रकार इतक्या अल्पावकाशात घडला की, साहाय्यार्थ जादा सैनिकांची तुकडी या स्वारांच्या मदतीस पाठविणे ही साधी गोष्टही करता आली नाही. दरम्यान मादेक याने मराठ्यांच्या डाव्या फळीला माघार घ्यायला लावली होती, पण या आघाडीवर उजव्या बाजूला जे सैनिक होते त्यांनी माघार घेतलेल्यांची जागा ताबडतोब भरून काढली. हा वेग आणि मराठा सैन्याने त्याच्यावर केलेल्या हल्ल्याचा जोर इतका विलक्षण होता व सैनिकांची संख्याही इतकी मोठी होती की मादेकने आपल्या सभोवती आपल्या शिपायांना चौकोनाकृतीत उभे रहावयास सांगितले व तीन बाजूंनी तो मराठ्यांना तोंड देत राहिला म्हणूनच बचावला.

याप्रमाणे धुमश्चक्री सुरू होती. मध्येच खंड पडे; पण पुनः धडाडधुम होई. अशा प्रकारे मध्यरात्र होण्यास एक तास अवधी असेतोवर ही लढाई चालली होती. जाट सैनिक लढत होते, तरी त्यांच्यासमोर निश्चित योजना नव्हती व परस्परांत सहकार्य नव्हते. शेवटी स्वतः नवलसिंग यानेच रणांगणातून पळ काढला तेव्हा जाट सैन्याने आपला पराभव मान्य केला.[३] जाट सैनिक बेशिस्तीत माघार घेऊ लागले व त्या पळापळीत मादेकने रचलेला चौरस व्यूह कोलमडून पडला. शेवटी हा फ्रेंच सेनाप्रमुख काही निवडक अशा ५-६ स्वारांसह रात्रीच्या गडद अंधाराचा फायदा घेऊन मराठा सैन्यातून त्यांची नजर चुकवून पळून गेला.

अकारण दीर्घकाळ रेंगाळलेली ही लढाई म्हणजे हटवादीपणाचा एक नमुनाच होता. जाट हे जसे शेतकरी तसेच रणांगणातही धिटाईने लढणारे म्हणून नावाजलेले. त्या ब्रीदाला जागून ते जिवाची बाजी लावून लढले. अपवाद फक्त त्यांच्या पळपुट्या धन्याचा. युद्धात कामी आले, वा जबर जखमी झाले अशांची मराठाफौजेतील संख्या हजार ते बाराशे होती. तसेच त्यांचे आठशे घोडेही मृत्युमुखी पडले. तरी मराठ्यांची फत्ते शंकातीत होती. दुपारनंतर झालेल्या या चकमकीचा परिणाम इतका भयानक होता की, जाट सैनिकांचा तळ ओकाबोका दिसत होता. एकही जाट दृष्टीस पडत नव्हता. "असा अंदाज केला गेला की, जाटांचे २००० शिपाई ठार झाले असावेत व ५०० (का ५०००?) तरी जायबंदी झाले असावेत. त्यांचा सर्व तोफखाना (४० तोफा) रणभूमीवरच पडून होता. फक्त दोन हलक्या तोफा समरू आपल्या बरोबर घेऊन आला होता".

जाट सैन्यातील दोन हजार घोडे व तेरा हत्ती, मराठ्यांनी काबीज केले. केवळ मादेकच्या पलटणीतील ठार किंवा जखमी झालेल्या सैनिकांची संख्या १४०० होती. शिवाय या तुकडीचे घोडे, उंट, हत्ती, शस्त्रे व तोफखानाही गमावण्यात आला. जे मागे

उरले त्यात जखमी झालेले व दिगच्या लष्करी तळावर राहिलेले एवढेच होते. "एवढ्या मोठ्या संख्येने कोणत्याच लढाईत जाट सरदार जखमी वा मृत झालेले नसावेत". या भीषण संग्रामाच्या अखेरी अखेरी जाट सैनिकांनी जिवावर उदार होऊन अक्षरशः हातघाईची लढाई केली. हिंदुस्थानातील लढायांमधून विशेष माहीत असलेला जोहार हा अखेरचा उपाय अमलात आणला. नवलसिंगाच्या सैन्यातील हिंदू व मुसलमान सेनाधिकाऱ्यांनी अक्षरशः हाराकिरी केली. ते आपल्या वाहनांवरून पायउतार झाले व हातात समशेर घेऊन लढाईच्या गर्दीत शत्रूवर तुटून पडले. त्यांच्यापैकी ठाकुरदास सोघोडिया ठार झाला तर कुमार कीलक हा जबर जखमी झाला. "जाट सैन्याची आणि सैनिकांची इतकी प्रचंड वाताहात झाली की, त्यातले जे काही परत आले ते भ्रमिष्टावस्थेत रणभूमीपासून सात कोसांची वेडीवाकडी परिक्रमा करूनच. जाट सैनिक फार मोठ्या प्रमाणावर पळाले व जिवानिशी कसेबसे कुंभेर येथे येऊन आपापल्या सरदारांना भेटले." (**सीपीसी** : खंड ३, क्रमांक : ८४)

६. मराठा सरदारांचे हिंदुस्थानातील आपआपसातील कलह

जाटांना आठवणीत राहील असा धडा मिळाला. बादशहाविरुद्ध बंड करून उठणाऱ्या सर्वांत बलाढ्य मांडलिकाचे पारिपत्य झाले. ब्रिटिश अयोध्येवर आपला ताबा ठेवून होते. अयोध्येच्या पश्चिमेस नाव घेण्यासारखा बलाढय गनीम नव्हता. म्हणजे मराठ्यांच्या उत्तरेकडील साहसाला अत्यंत पोषक अशी परिस्थिती होती. पण...मराठ्यांना त्याचा फायदा उठवता आला नाही. मराठा सरदारांचे आपापसात बरे नव्हते, नेहमी धुसफूस चालू असे. मुत्सद्दीपणाचा अभाव होता. स्वतःचा फायदा कशात, हेही आकलन करण्याची शक्ती नव्हती. या दोषांमुळे मराठ्यांनी आपल्या राजकीय ध्येयधोरणाची हानी करून घेतली आहे. पेशव्यांनी हिंदुस्थानची मोहीम निश्चित करून आपले सरदार तिकडे पाठवले, तेव्हा त्यांनी लष्करी हालचाली व राजकीय डावपेच रामचंद्र गणेश याजकडे सुपूर्द केले होते. पण या बाबतीत रामचंद्र गणेश याने आपला दिवाण म्हणून विसाजी कृष्ण व आपले सेनापती या नात्याने महादजी शिंदे व तुकोजी होळकर यांचा सल्ला घ्यावयाचा होता. अधिकाराची ही चमत्कारिक विभागणी, उत्तर हिंदकडील युद्धतंत्र व राजकीय गुंतागुंत याबाबतचे रामचंद्र गणेश याचे अज्ञान यामुळे पेशव्यांच्या यशाच्या संधी कमी कमी होत गेल्या. रामचंद्र आणि विसाजी, हे दोघे केवळ दक्षिणेकडील युद्धतंत्राचे माहितगार. शिवाय दोन मराठा सरदार परस्परांचा द्वेष करणारच, या सिद्धांतानुसार दोघांमधून विस्तव जात नव्हता. मोगल सत्तेखालील प्रांतात सुभेदार आणि दिवाण यांच्यात जसे मी तू चाले त्यापेक्षाही रामचंद्र आणि विसाजी यांच्यांतील हेवेदावे हीन दर्जाचे होते. महादजीसारख्या जुन्या आणि जाणत्या मातब्बर असामीवर छाप पाडील असे व्यक्तित्व वा प्रभाव रामचंद्राजवळ नव्हता. तरुण सरदार तुकोजी होळकर याच्या भोवताली जे गण होते ते सगळे पूर्वीचेच कारभारी. हे जुने कोंडाळे मल्हाररावांचीच री ओढणारे होते. त्यांनी काय केले असेल तर महादजी जे जे ठरवील, त्यात मत्सराने बिब्बा घालणे. कारण एकच, ते म्हणजे तो एक शिंदे होता.

म्हणजे मराठ्यांचा फौजफाटा उत्तरेकडे चालू लागला तो दोन भांडखोर गट घेऊनच. शिंद्यांचा होळकरांना विरोध असायचा. रामचंद्र जेव्हा शिंद्यांचा पक्ष घेत असे, तेव्हा विसाजी होळकरांना उचलून धरी. कारण एकच. त्याचे रामचंद्राशी वैर होते. हे मतभेद करण इतके विकोपाला गेले की, त्याची कुचेष्टा छावणीतील बाजारातूनही ऐकू येऊ लागली. ा सगळ्या कुरबुरी इंग्रज, दिल्लीदरबार व पेशवे यांना त्यांच्याकडे येणाऱ्या पत्रांवरून मजत होत्या. परस्परांच्या वैरापोटी एकमेकांविरुद्ध वागायला तयार होणाऱ्या या दोन टांतील तणावाची रस्सीखेच जवळजवळ दीड वर्ष चालू होती. याचा शेवट झाला तो शव्यांनी रामचंद्र गणेशाला दक्षिणेस परत बोलावून घेतले तेव्हाच [१७७१ च्या मध्यास]. मचंद्र-विसाजी संघर्ष संपला तरी त्याचा नवा अवतार शिंदे-होळकरांच्या रूपाने पुन्हा भा राहिला. बादशहा व झबिताखान या दोघांबाबत मराठ्यांनी काय धोरण आखावे हे ा दोघांच्या मतभेदाचे कारण. मराठ्यांची ही संकल्पित उत्तर मोहीम पानिपतचा कलंक वून काढण्यासाठी होती, पण त्यात अपयश येण्याचाच संभव होता. कारण ज्याचा हुकूम विनतक्रार मानला जाईल, असा धुरंधर सेनानी पेशव्यांनी पाठवायला हवा होता. रघुनाथ-दा अगर सदाशिवराव भाऊ यांच्या तोलामोलाचा सेनानी येणे आवश्यक होते. पण अशा त्रतेचा सेनानी पाठविणे पेशव्यांना शक्य झाले नाही.

. मराठा छावणीतील धोरणविषयक वाद : शिंदे विरुद्ध होळकर

आपले विचार आपल्या सहकाऱ्यांच्या गळी उतरविण्याच्या बाबतीत रामचंद्रला रुवातीपासूनच अपयश येत गेले. करोलीहून पुढे कूच करण्याच्या आधीच पाटिलबावा मचंद्रावर रागावले व रुसून मारवाडकडे निघून गेले. रागावण्याचे कारण त्यांना रामचंद्राचे हृणणे मान्य नव्हते. शेवटी रामचंद्राने गणोजी कदम यास मुद्दाम शिंद्यांकडे पाठवून ाची समजूत घालून त्याला परत आणण्यासाठी रवाना केले (जानेवारी, १७७०). राठ्यांनी जाटांवर विजय मिळविला (६ एप्रिल); पण त्यामुळे विरोधाचे एक जुनेच गळू व्याने ठणकू लागले. हा विरोध व्यक्तिगत न रहाता उघडउघड दोन गट पडले. विचारा-ीन प्रश्न होता तो 'मराठ्यांची यापुढील वाटचाल कशी असावी ?' अंतर्वेदीतील लेला मुलूख व दिल्ली दरबारातील सत्ता हस्तगत करण्याआधी प्रथम जाट मुलखात तळ ोकायचा, नवलसिंगाच्या किल्ल्याला वेढा घालून त्याला जेरीस आणून त्याच्याकडून ंडणीची रक्कम वसूल करायची (अर्थात याला बराच कालावधी लागला असता) का ाटांचा प्रश्न तसाच लोंबकळत ठेवून पावसाळा सुरू होण्याच्या आधी नजीबउद्दौलाची दत घ्यायची व अंतर्वेदीतील मुलूख परत घ्यायच्या कामाला लागायचे ? कारण एकदा ावसाळा सुरू झाला म्हणजे प्रचंड मराठा सेनेला चार महिने बसून खाण्याशिवाय काहीही रता येण्यासारखे नव्हते [**एसपीडी** : खंड : २९ क्रमांक : २५२].

महादजीचे नजीबशी हाडवैर होते. ते बाजूला ठेवले तरीही नजीब हा रोहिल्यांचा मुख असून तो युद्धनीती व युद्धसाहाय्य मिळविण्यात तरबेज आहे, तसेच राजकीय डाव-च कसे खेळावेत यातही तो निष्णात आहे, अतएव मराठ्यांचा उत्तरेकडील सर्वांत मोठा

शत्रू म्हणजे नजीब हे महादजीला ज्ञात होते. त्यामुळे महादजीने सल्ला दिला तो असा ‘ मराठ्यांनी नवलसिंगाशी सलोख्याची बोलणी करावीत, त्याच्याकडून वाजवी र खंडणी म्हणून घ्यावी, जाटांना न दुखविता त्यांच्याशी मैत्रीचे संबंध ठेवावेत व रोहि आणि महमद बंगष या बंडखोरांनी दुआबामधला जो प्रदेश गिळंकृत केला होता, तो हस्त गत करण्याच्या मागे लागावे. ’ यामुळे नजीबला योग्य अशी अद्दल घडली असती. का अफगाणांमध्ये मराठ्यांबद्दल विद्वेष पसरविण्याचे काम याच माणसाने केले होते. शिवाय वेळी त्याला त्याच्या दुराणी हितचिंतकाची म्हणजे अहमदशहा अबदालीचे साहा मिळण्याचीही शक्यता नव्हती.

रामचंद्र गणेश याने बरोबर याविरुद्ध मत मांडले. त्याचे म्हणणे असे : ‘ ज राजाचा पुरा बीमोड केल्यानंतर त्याच्याकडून खंडणीदाखल आडमाप पैसा वसूल करण्या काम आपल्याकडील खंडणी वसूल करण्याचे कामावरील माणसे करू शकतील. मग मराठ सेनेने नजीबशी सलोखा करून त्याच्या मदतीने जाटांनी बळकावलेला अंतर्वेदीतील मुलु परत मिळवायचा, नजीबला त्यातला जरूर तो वाटा द्यायचा. नजीबवर हल्ला करायच म्हणजे त्याच्या मते बराच काळ चालणारी खर्चिक मोहीम; शिवाय महंमद बंगष, गंगाप असणारे रोहिले व अयोध्येचा नबाब यांचे त्याला साहाय्य मिळण्याची शक्यता. पानिपतच्य वेळी मराठ्यांच्या विरुद्ध असेच सर्व मुसलमान एक झाले होते, त्या भीतीने त्याच्या पोटा गोळा येणे सहज शक्य होते. त्यानुसार त्याने आपल्या सहकाऱ्यांना सांगितले, “ आप दहा वर्षांच्या कालावधीनंतर उत्तरेस येत आहोत. अशा स्थितीत आपण प्रथम नजीबश संबंध जोडले नाहीत व लढा पुकारला तर आपल्याविरुद्ध मागल्यासारखे सर्वच त्याच्य मदतीला धावतील. आपल्याविरुद्ध असा प्रबल शत्रू उभा राहिला तर त्याला तोंड दे आपल्याला महागात पडेल व या लढाईची अखेर काय होईल याचा अंदाज करणे सो नाही. ” तुकोजी होळकर हा तर शिंद्यांचा परंपरागत वैरी. हिंदू जमातीतील नजीबचे काही साहाय्यक महाधूर्त व कावेबाज होते. शिंदे–होळकर वैराचा फायदा घेण्यासाठी त्यांनी होळकरांच्या निकटवर्ती सल्लागारांना निरनिराळी आमिषे दाखवून त्यांना आपल्या बाजूल वळविले. या कारभाऱ्यांनी आपल्या तरुण मालकाचे मत नजीबच्या विरुद्ध जाणार नाही अशी दक्षता घ्यावयाची होती. पेशव्यांनीही शेवटी रामचंद्र गणेश याचीच योजना उच लून धरली; त्यानुसार मराठा सैन्य अंतर्वेदीच्या रोखाने मार्ग चालू लागले [**एस्‌पीडी** खंड २९; क्रमांक : २५४–२६२, २४६, पृ. ३०७]

या धोरणाचा परिणाम तीन महिन्याच्या आतच दिसू लागला व शिंदे याचे धोरण बरोबर होते, हे सिद्ध झाले. मराठ्यांनी थोडीफार जाटठाणी हस्तगत केली खरी; पण ज्यावर मराठ्यांचा न्याय्य अधिकार होता असे, अहमद बंगष, हफीज रहमत वा खुद्द नजीब यांच्या ताब्यातील एकही ठाणे त्यांनी मराठ्यांना परत केले नाही, अगर भरपाई म्हणूनही हातावर काही ठेवले नाही. या अफगाणांनी मराठ्यांच्या प्रतिनिधीला सरळ सरळ ऐकवले “ आम्ही सिपाई मुलूक सोडीत नाही. नजीबखान वगैरे यांनी मुलूक दाबला आहे तो

डतील तेंव्हा आपणही सोडू, तो पर्यंत केवळ आम्ही मुलूक सोडू अथवा खंडणी देऊ तो गोष्ट घडणार नाही." [एस्पीडी : खंड : २७, क्र. २१४] म्हणजे नजीबशी ीचे संबंध ठेवून जहागिरीचे प्रदेश पुन्हा मिळविणे व खंडणीची रक्कम सहजपणे वसूल णे हे महादजी म्हणत होता त्याप्रमाणे स्वप्नच ठरले. नजीबाबादचा विश्वासघातकी ुख नजीब याने मराठ्यांना आपल्या मायावी भाषणाने झुलवत ठेवले, पोकळ आश्वासनां- महिने नि महिने दवडले व मराठ्यांचा पराभव करता यावा म्हणून त्यांच्या सर्व दुष्मनांनी क व्हावे म्हणून अंतर्गत पत्रव्यवहार सुरू ठेवला. आपल्या उर्वरित आयुष्यात दुटप्पी ाण्याची हीच तिरकस चाल त्याने कायम ठेवली व दक्षिणेकडील राज्यकर्त्यांना पूर्णपणे विले. मराठ्यांनी अफगाणांशी झुंज देऊन अंतर्वेदीतील आपला गमावलेला मुलूख परत ळविला खरा, पण तो नजीबखानाच्या मृत्यूनंतरच. त्या आधी केवळ स्वार्थीवृत्ती व क्तिक वैर यापोटी पुन्हा एकदा देशहिताची होळी करून मराठ्यांच्या इतिहासात ोजीरावांनी आपले होळकर हे नाव सार्थ केले. हिंदुस्थानातील या तिसऱ्या मोहिमेत ळ स्वार्थापायी मराठ्यांनी कशा कशा हालचाली केल्या व त्याचे परिणाम काय झाले ते ता पाहू या.

पुढाऱ्यांच्या भांडणात मराठ्यांच्या हितसंबंधाची अखेरी

नवलसिंग जाटावर मराठ्यांनी विजय मिळविला. [६ एप्रिल १७७०]. नंतर मराठे, ेनजिक यमुनेच्या पश्चिम तीरावर येऊन थडकले. नजीब त्या आधीच यमुनेच्या कडील तीरावर येऊन दाखल झाला होता. मराठ्यांनी पूर्वी त्याच्याशी जी सलोख्याची ळणी सुरू केली होती, त्यांनुसार तो आला होता. काही दिवस नदीच्या या तीरावरून तीराकडे अशी दोन्ही बाजूच्या वकिलांची ये जा चालू होती. मैत्री व स्नेहसंबंधाची श्वासने यांची खैरात होत होती व दोन्ही बाजूंचे श्रेष्ठी परस्परांना शाही शामियान्यात त होते.

दि. २५ एप्रिल रोजी तुकोजी होळकर हे प्रथम नदीपार होऊन पूर्वतीरावर गेले, च्या मागोमाग रामचंद्र गणेश गेला आणि त्यानंतर दोन दिवसांनी खुद्द महादजी हा ीपार झाला. दरम्यान अंतर्वेदीतील आपल्या ठाण्यांच्या रक्षणासाठी जाटांची एक पलटण ी ओलांडून आली पण त्याचा काहीही उपयोग झाला नाही. नजीब व मराठे या ांनी त्यांचा पार धुव्वा उडविला, त्यांचे सर्वस्व हरण केले. निर्नायक जाटांना आपले क्षण करता आले नाही. नजीबने शुकोबाद, सदाबाद या सारखी जाट परागण्यातील खेडी आपल्याकडे घेतली व त्यावर आपले महसूल जमा करणारे अधिकारी व सैनिक ी नेमणूक केली. [मे महिन्याच्या सुरवातीस] मराठ्यांनी आणखी काही ठाणी हस्तगत ी. शिवाय त्यांच्या सैन्यातील भटक्या पेंढाऱ्यांनी संपूर्ण प्रांतात धुमाकूळ घातला तो ळाच. दरम्यान मराठे व नजीब यांच्यात एकाएकी अंतराय निर्माण झाला. महादजी ला विश्वासघात करील असे वाटले म्हणून म्हणा, वा तुकोजी होळकराने सांगितलेल्या

खोट्या बातम्यांवर विश्वास बसला म्हणून म्हणा, ज्यांच्याबद्दल शंका यावी अशा य आपल्या मित्रांपासून नजीब दूर होऊन अलिगढला निघून गेला. [१० मे]

दरम्यान एकेकाळी दिल्लीची वझिरी केलेला गाझीउद्दिन इमाद–उल्मुल्क हा आपल फरुकाबाद येथील आसरा सोडून आग्रा येथे येऊन दाखल झाला [४ मे च्या सुमारास] वास्तविक त्याला कुणीही आमंत्रण दिले नव्हते. तरीही मराठ्यांकडील प्रमुख धुरंधरांनी त्याची भेट घेतली व त्याचा उचित असा मानसन्मान केला. त्यानंतर हा आगंतुक पाहुण शिंद्यांच्या गोटात गेला. तिथेही त्याचे स्वागत करण्यात आले. पण त्यामुळे मराठ्यांच्य उत्तरेकडील राजकारणात एक नवाच गोंधळ उद्भवला. कारण गाझीउद्दिन हा दुसऱ्या अलम-गीरच्या घराण्याचा कट्टा दुष्मन. मराठ्यांनी त्याचे स्वागत करावे याचा अर्थ मराठ्यांच्य साहाय्याने दुसऱ्या एखाद्या राजपुत्राला दिल्लीच्या तख्तावर बसवायचे व गाझीउद्दीनला वझीर करून त्याला हाताशी धरून मोगल साम्राज्यावर प्रभुत्व मिळवायचे अशी भीती शह अलमला वाटली तर त्यात गैर नव्हते. बादशहाच नव्हे तर इंग्रज व शुजाउद्दौल यांनाही ही घटना रुचली नाही. मराठ्यांसंबंधीच्या त्यांच्या द्वेषात त्यामुळे भरच पडली खरोखरी हा सगळा भ्रमाचा भोपळा होता. कारण मराठ्यांनी खरोखरी शहाअलमविरुद्ध कसलाही कट रचलेला नव्हता. १७६० ची परिस्थिती व मराठे पुन्हा परत आले होते त्य वेळची दिल्लीची स्थिती. यांत जे राजकीय बदल झाले होते, त्याबाबत कशी पावले उचलावी या बाबतचा ठाम निर्णय त्यांना घेता येईना [**डीसी. सीपीसी.** खंड ३, क्रमांक २१६; **एस्पीडी** : खंड २९ क्रमांक २६०; पृष्ठे ३०७–३१०]

मराठ्यांच्या प्रमुख सरदारांतील धुसफूस व त्या धुसफुशीचा त्यांच्या मोहिमेवर होत असलेला विपरीत परिणाम याचे यथातथ्य वर्णन त्या त्या ठिकाणांहून पेशव्यांकडे जे खलिते पाठविले जात, त्यांत केलेले आहे. दि. ४ मे रोजी नारो नरसी हा पेशव्यांना कळवितो की, जाट राजाविरुद्ध कोणती कारवाई करावयाची या बाबतीत शिंदे व होळकर हे अगदी परस्परविरोधी सल्ला देत आहेत. परिणामी आपले राजकीय धोरण सारखे चुकते आहे व या धोरणाने सर्व लहानमोठ्या स्थानिक सत्ताधीशांकडून अपयशच स्वीकारावे लागते आहे, त्यामुळे मुख्य साध्यच धोक्यात आहे. पावसाळा अगदी तोंडावर असल्याने सैन्याला अगदी स्वस्थ बसून दिवस काढावे लागणार आहेत. त्यानंतर दि. १७ ला पेशव्यांना एका खलि-त्यात लिहिले आहे, "होळकरांचे मते मामलत करू नये. सिंद्यांचे मते करावी. ××× हुजूर आहेत. सरदारांशी बोलत नाही, असे आहे. नित्य रुसवे नित्य समजावीस या प्रा दिनचर्या आहे. तिनी सरदार यांत. पैक्याची वोढ भारी. पैसा नाही. जाटाचे मुलकाची जप्ती कांही आली आहे. परंतु पैशाचे ठिकाण नाही."

होळकर आणि त्यांचे सल्लागार यांनी जाट राजाकडून वसूल करावयाच्या खंडणीचा आकडा ऐंशी लाखापर्यंत चढविला. मे अखेर जाट वकिलाने ६५ लाख द्यायचे मान्य केले. मराठा सरदार या तडजोडीला तयार होते, पण रकमेचा हप्ता व तो कोणत्या दिवशी द्यावयाचा यावरच वादंग माजले; जाटांनी एक नवीच मागणी पुढे सरकविली. ती म्हणजे

राठ्यांनी जाटांच्या मुलुखात नुकताच जो हैदोस घातला व नासधूस केली, त्याची रपाई म्हणून खंडणीच्या रकमेत २० लाखांची सूट मिळावी. अर्थातच मराठ्यांनी ही गणी झिडकारली व अंतर्वेदीतील जाटांचा जिंकून घेतलेला मुलूख आपल्याकडेच ठेवला. ग त्यामुळे खंडाची रक्कम लवकर मिळण्याची चिन्हे दिसेनात. काहीच मार्ग न निघता डणी देण्याबाबतच्या वाटाघाटीचे हे गुऱ्हाळ, महिनेन महिने चालू होते. नारो नरसी हितो, "गंगा येमुना यास पाणी न आले तोपर्यंत बोलत होते. दोनी गंगा भरल्यावर बस्वाल लांबणीवर पडिला" [**एसपीडी** : खंड, २७, क्र. : २१४, खंड २४ : .: २४६, २५५–२६०]

. मराठ्यांच्या बंगष आणि रोहिले यांच्याकडे मागण्या

मे अखेरीस मराठा सैन्याच्या एका तुकडीने बंगषच्या ताब्यातील मुलुखापैकी रुकाबादवर हल्ला चढविला. काही स्थानिक जमिनदारांनी बोलावल्यावरून बाळाजी आणि गाधर [गोविंदपंत बुंदेले यांचे पुत्र] हे जून अखेर काल्पीहून सैन्य घेऊन आले. त्यांनी मुना ओलांडिली व इटावा जिल्ह्याच्या दक्षिणेकडून हल्ला चढविला. तेथील स्थानिक महल जमा करणाऱ्या अधिकाऱ्यांकडून औरियासारखी अनेक खेडी आपल्या ताब्यात घेतली. **सीपीसी.** खंड ३, क्रमांक : २५५, ३०७]

दरम्यान पावसाळा आला. मोठ्या प्रमाणावर पाऊस पडू लागला. आपल्या सैन्याला ळ टाकता यावा म्हणून रामचंद्र गणेश याने आपला सर्व फौजफाटा अलिगढ जिल्ह्यात ाणून दाखल केला. या वेळेपर्यंत जाटांचा सर्व मुलूख उजाड करून झाला होता. खंडणी सूल झाली नव्हती. गंगानदीच्या पलिकडे असणारे हफीज रहमत व अन्य रोहिले यांच्याडे नजीबखानाने एक गुप्त खलिता रवाना केला होता. मराठ्यांच्या हाती तो अचानक ल्याने त्यांना एका कृष्ण कारस्थानाचा सुगावा लागला. 'मराठ्यांशी वाटाघाटीचे कपट ाटक चालू ठेवायचे, उतावळी केल्यासारखे भासवायचे व शेवटी कंटाळा आणून रामचंद्र णेशला नवलसिंगच्या म्हणण्यालाच मान तुकवायला भाग पाडायचे,' अशी ही योजना ोती. जाटांकडून घ्यावयाच्या खंडणीची रक्कम ६५ लाख निश्चित करण्यात आली. सदर कम तीन वर्षांत फेडावयाची होती, व तीन वर्षांत सदर रकमेची भरपाई पूर्ण झाल्यानंतच्या चवथ्या वर्षापासून अकरा लाखांची वार्षिक खंडणी द्यावयाची होती. तसेच प्रतिवर्षी ५ लाखांचे उत्पन्न मिळेल अशी जहागिरी देऊन रणजितसिंगाची तरतूद करायची होती. बाबत उभयपक्षांत करार झाला व त्यानुसार खंडणीचा पहिला हप्ता वसूल करायचा ्हणून दि. १० जुलै रोजी रामचंद्राचा दिवाण, जाटांच्या राजधानीकडे जायला निघाला. **एसपीडी** : खंड २९, क्रमांक : २६२, २४६, खंड २७, क्रमांक : २१४. **सीपीसी** : ड ३, क्रमांक : ३२३, ४४५.]

अबदालीने दहा वर्षांपूर्वी उत्तरेस हमला केला त्यावेळी त्याचा फायदा घेऊन गंगादीच्या पलिकडे रहाणाऱ्या रोहिल्यांनी मराठ्यांच्या जहागिरीतील मुलुखापैकी बराचसा लुख बळकाविला होता. तो मुलुख परत मिळावा अशी मागणी करण्यासाठी मराठ्यांकडील

तीन प्रमुख सरदारांचे वकील संबंधित रोहिला प्रमुखांकडे रवाना झाले. पण या रोहि प्रमुखांनी स्वच्छ सांगून टाकले की, अंतर्वेदीतील मीरत व सहराणपूर येथील जो प्रदे नजीबने गिळंकृत केला आहे, तो सगळा जोपर्यंत मराठे त्याच्याकडून जिंकून घेणार नाहीं तोपर्यंत आपण मराठ्यांना एक इंच भूमी द्यायलाही तयार नाही. गोंधळून गेलेले वकी परत आले; पण पावसाळासंपेपर्यंत काहीही करता येणे शक्य नव्हते. दि. १८ ऑगस्ट पेशवे यांना पाठविलेल्या पत्रात नारो नरसी लिहितो, " सद्या सरकारफौजेस पोटास नाह कर्जही मिळत नाही. आजपर्यंत पांच-सात लक्ष रुपये कर्ज करून चालविले. पोटाचा गवगवा आहे. खंडणीची रक्कम वसूल झाली नाही. जाट राजाकडून तिची वसुली करण्य आम्हाला कितपत यश मिळते याकडे सगळ्या राजपुतांचे डोळे लागून राहिले आहेत. [**एसपीडी** : खंड २९ क्रमांक : २४६; खंड २७, क्रमांक : २१४]

मराठा सरदार गडबडून गेले होते. त्याच मनःस्थितीत त्यांनी नजीबशी पुन्ह मनसुबे सुरू केले. नजीब हा महाधूर्त व कारस्थानी. अंतर्वेदीतील मुलुखाबाबत आखलेल धोरणे व उचललेली पावले यांत तो पूर्णतया यशस्वी झाला. याच नजीबने आणखी ए फसवा डाव टाकला. त्यामुळे मराठा सैन्य बंगष व रोहिले यांच्या मुलुखातून माघारी वळ व त्यांनी जाटांच्या ताब्यातील मुलुखावर चाल केली. नजीबने मराठ्यांना स्वच्छ शब्दां सुनावले, " ज्या पक्षी जाटाची मामलत होत नाही आणि आंतरवेदीत पैकाही मिळ नाही तेव्हा येथून दहा बारा हजार परयेत तुम्ही फौज पाठविणे व आपलीही पाच सा हजार फौज दिलीस आहे ती समागम देऊन जाटाचे मुलुख दिलीपासोन आसपास आहे तो जफतीकरून जाटास जकड बसल म्हणजे सहजच मामलेत करून तहरह करील आण चौहूकडे कुफराणही करणार नाही. " [**एसपीडी :** खंड २९; क्रमांक : २४६]

त्यानुसार दि. २९ ऑगस्टला पाच हजार मराठा स्वार गंगानदीच्या रोखाने कूच करू लागले, पण त्यांना आपला प्रवास वाटेतच आखडता घ्यावा लागला. पावसामुळे लांब पल्ल्याच्या मोहिमेवर जाणे कठिण होते. अशा प्रकारे इच्छेविरुद्ध वाटेतच मुक्काम ठोकाव लागला. त्या मुक्कामात नजीब आजारी झाला. इतका की, आपला अंतकाळ समीप आला असे वाटून जाटांनी खंडणीची रक्कम किती द्यावी, याबाबत जाटांच्या वकिलाशी गुप्तपणे वाटाघाटी केल्या. [दि. २८ सेप्टेंबरच्या आसपास]. मराठ्यांशी त्याबाबत उघड बोलणी केली ती दि. ८ ऑक्टोबर रोजी. त्यासाठी दरबारचे काम रात्रंदिवस चालले होते त्याने मराठ्यांना खंडणीची रक्कम देवविली व आपला मुलगा झबिताखान याला त्यांच्या-बरोबर देऊन त्यांची पाठवणी केली. नंतर तो आपल्या घरी जायला निघाला. पण त्याच महिन्याच्या म्हणजे ऑक्टोबरच्या शेवटच्या दिनांकास वाटेत हापूर येथे त्याला मृत्यूने गाठले. [**डीसी**]

१०. नजीबउद्दौलाच्या मृत्यूनंतर मराठ्यांनी केलेल्या चढाया

नजीब उद्दौलाच्या मृत्यूनंतर एक नवीन दृश्य दिसू लागले व मराठ्यांच्या धोरणात आपाततः बदल झाला. नजीबच्या महाधूर्त कारस्थानाचा अंदाज न येऊन सर्व मराठे

च्या साखरपेरी भाषेला भुलले. अपवाद फक्त दूरदृष्टी असलेल्या महादजीचा; हा काळ त महिन्यांचा होता. नजीबच्या मृत्यूनंतर मात्र मराठ्यांनी हिंदुस्थानात एकावर एक े देदीप्यमान विजय मिळविले. त्याचा परिणाम बराच दूरगामी होणारा होता.

नोव्हेम्बरच्या दुसऱ्या पंधरवड्यात मराठा सैन्य इटावा, शुकोबाद व कनोज या तांत घुसले. आणि तिथे त्यांनी हैदोस घातला. मराठे मागतील तेवढा पैसा देऊन च्याशी समझोता करायला अहमदखान बंगष तयार होता, पण हफीज रहमतने विरोध ा. तो म्हणाला, 'अशी रक्कम देण्यापेक्षा लढलेले काय वाईट ?' अफगाणांच्या ताब्यात लेला अंतर्वेदीतील मुलूख काबीज करण्याचे काम मराठे करीतच होते. त्यानंतरच्या हिन्याची सुरुवात होताच रामचंद्र गणेशने इटावाच्या किल्ल्याला वेढा घातला. इटावा हे ठ्यांचेच, पण पानिपत संग्रामाच्या थोडे आधी रोहिल्यांनी पेशव्यांच्या प्रतिनिधीकडून आपल्या ताब्यात घेतले होते. सांप्रत हफीज रहमतखानाच्या वतीने त्याच्यावर कबीरखान रेख करीत होता. त्याने मराठ्यांच्या सैन्याला पंधरा दिवस तोंड दिले; पण या अडचणीत पल्याला कोणाचीही मदत मिळणार नाही, हे ओळखून त्याने दि. १५ डिसेंबरला किल्ला ली केला. फक्त आपल्या जीवितास व मालमत्तेस धक्का लागू नये, एवढीच त्याची विन- ी होती. त्याच दिवशी दोनप्रहरच्या समयास पेशव्यांचा विजयी भगवा ध्वज किल्ल्याच्या बंदीवर डौलाने लहरू लागला व मराठा शिबंदीने किल्ल्याचा ताबा घेतला. [**सीपीसी :** ड ३; क्रमांक : ५०५, ५१७, ५३०; **एसपीडी :** खंड २९; पृष्ठ २११–२१२; ल्ल्यात असलेला दाणागोटा व अन्य साहित्य आणि शिबंदीतील सैनिकांच्या वेतनापोटी व कबीर याला ५०,००० रुपये देण्यात आले.]

याचा अर्थ मराठे कुरा परगण्याच्या सरहद्दीवर येऊन ठेपले; लखनौ नबाबाच्या टात जबरदस्त भीती उद्भवली. काळजी घेतलेली असावी, या हेतूने शुजाउद्दौला याने पल्या मुलाच्या देखरेखीखाली शूर सैनिकांची एक दणकट पलटण कानपूरच्या सरहद्दीवर ाना केली. बरोबर उमरावगीर गोसावी याची फौज होतीच. शिवाय शुजाने इंग्रज हर्नरला पत्र लिहिले. आपल्या साहाय्यासाठी पाटणा येथील अंग्रेज पलटणीची एक तुकडी रा प्रांतात पाठवावी अशी गळही शुजाने त्याला घातली. [जानेवारी, १७७१ च्या वातीस] काही काळानंतर तो स्वतःच कानपूरला येऊन दाखल झाला. मराठ्यांच्या गमनाने इंग्रजांच्या ताब्यातील पाटणा शहरातही भीतीचे वातावरण पसरले. [सीपीसी : ड ३; क्रमांक : ५६२, ५६४, ५७७]

पण मराठा सरदारांना याच वेळी आपले लक्ष उत्तरेकडे वळवावे लागले, बंगषाचा लूख व दिल्ली याकडे त्यांना पहावे लागले. उभय पक्षांत समझोता घडून यावा म्हणून केकाळचा दिल्लीतील वझीर गाझीउद्दीन इमाद उल्मुल्क याने सुरुवातीस प्रयत्न केलेही. तर्वेदीतील मराठ्यांकडे असलेल्या मुलखातून अहंमद बंगष, हफीज रहमत व दुंदीखान ांनी मागील दहा वर्षांच्या कालावधीत भरपूर खंडणी वसूल केली होती. त्याची पुरेपूर

भरपाई व्हावी म्हणून त्या तिघांनी मराठ्यांना तीन वर्षांच्या कालावधीत बावीस लाख रुप द्यावयाचे मान्य केले. पण ही तडजोड होळकर यांनी उधळून लावली व गाझीउद्दिनल हाकलून देऊन अफगाणांचा समाचार घ्यावा, असा धोशा लावला. त्यामुळे वैतागू गाझीउद्दिन अजमेरला निघून गेला. १७७१ च्या जानेवारी महिन्याच्या प्रारंभालाच हमल करायला निघालेली मराठा सैनिकांची तुकडी व रोहिले यांच्यांत फरूकाबाद येथे जोरद चकमक उडाली. रोहिले एकदम तुटून पडले. अनेक मराठा सैनिक धारातीर्थी पडले बाकीच्यांचा निकाल लागला. फरुकाबादच्या संरक्षणासाठी हफीजनेही सैन्याची भल मोठी कुमक रवाना केली. त्याच वेळी प्रमुख मराठा सरदारांत कमालीचा दुरावा निर्मा झाल्याने तडजोडीची भाषा करण्याशिवाय त्यांना गत्यंतरच नव्हते. [**सीपीसी** : खंड ३ क्रमांक : ५७१]

११. शिंदे आणि होळकर यांच्यातील पुढे चालू रहाणारा तंटा : रामचंद्र गणेशाचे अपयश व त्याची मानहानी

नजीबउद्दौलाचा मृत्यू झाल्यानंतर त्याचा मुलगा झबिताखान याच्याबाबतीत आपल धोरण काय असावे, या प्रश्नावर शिंदे व होळकर यांच्यात तंटे सुरू झाले. नजीबच्या पश्चा मीरबक्षीपदावर झबिताखानची नियुक्ती करण्यात यावी, यासाठी शिंदे याच्या प्रोत्साहना विसाजी कृष्णाने झबिताखानाकडे पंचवीस लक्ष रुपयांची मागणी केली. त्यात गैर काही नव्हते. अंतर्वेदीतील मोहीम फसल्याने मराठ्यांना प्रचंड कर्ज झाले होते, वेळेची भ्रांत होती तर नजीब हा जाट राजाइतकाच धनाढ्य म्हणून ज्ञात होता. त्याला पंचवीस लाख ह रक्कम मोठी नव्हती, पण परंपरेशी इमान राखून होळकराने नेमका उलटा पवित्रा घेतला त्याने झबिताला पाठिंबा दिला व उपदेश केला की, पेशव्यांना पंचवीस लाखांची दक्षिण देण्याऐवजी झबिताखानने बादशहाशी संधान बांधावे व त्याच्यामार्फत आपली मीरबक्ष पदावर नेमणूक करवून घ्यावी. रक्कम देण्याबाबत झबिताला आधीच उल्हास, त्यात होळ कराचा सल्ला; विसाजीची मागणी त्याने तुच्छतेने ठोकरली. शेवटी 'झबिताला आपल्य गोटातून हकलून काढा' असा निर्वाणीचा इशारा विसाजी व त्याच्या पक्षाने होळकराक पाठविला. [**सीपीसी** : खंड ३; क्रमांक : ५७१, ६०५, ६१४]

झबिताची मीरबक्षीपदावर नेमणूक होऊ शकली नाही तर त्या जागेवर आपल वर्णी लागावी व त्याबाबतीत मराठ्यांची मदत घ्यावी अशी अहमदखान बंगषची मनीष होती.[४] म्हणून मराठ्यांना द्यावयाच्या रकमेत भरघोस वाढ करायची आश्वासने तो वरचेव देऊ लागला. त्यासाठी त्याने वयोवृद्ध अशा गाझीउद्दिनमार्फत शिंदे याच्याशी बोलणी सुरु केली. गाझीउद्दिनचा प्रभाव शिंद्यावर पडण्यासारखा होता. अहमद आणि हफीज रहमान यांच्याशी होऊ घातलेल्या तडजोडीत तुकोजीने जानेवारी महिन्याच्या सुरुवातीसच अड थळा आणला, पण त्याच महिन्याच्या दि. २६ पर्यंत तुकोजीला बाजूला सारून बंगष हफीज यांनी प्रत्येकी अनुक्रमे दहा व बावीस लाखांची रक्कम द्यावी, या अटीवर तडजो करण्यात आली. [**एसपीडी** : खंड २९; पृष्ठ ३१३]

रामचंद्र गणेश हा हिंदुस्थानात आलेल्या मराठ्यांचा नामधारी म्होरक्या. आपल्याच गीतील या कुटाळ यंत्रणेच्या डावाप्रतिडावांचा त्याला उबग आला. आपल्या हातची सत्ता निसटली आहे व ती महादजीच्या मेहेरबानीतील विसाजीकडे गेली आहे, हे त्याला समजून चुकले. त्यामुळे वैतागून अत्यंत उद्विग्न मन:स्थितीत दक्षिणेत परत याचा एकतर्फी निर्णय त्याने घेतला [दि. २६ जानेवारी, १७७१ च्या सुमारास]. :बरोबर फक्त आपले खाजगी अश्वपथक [हुजुराती पथक] घेऊन जायचे त्याने ठरविले. समझोता करण्यात आला व त्याला रहाण्यास भाग पाडण्यात आले. लष्करी हालचाली-त निर्णय घेणाऱ्या मराठा सरदार मंडळींनी असे ठरविले की, फरूकाबादमधून बाहेर दिल्लीच्या रोखाने कूच करायचे, राजधानीवर ताबा मिळवायचा व गाजीउद्दिन, मदखान अगर जो कोणी आपल्या हातावर जास्तीतजास्त रकमेचे उदक सोडील, ा मीरबक्षी करायचे. १७७० मधील अंतर्वेदीतील मोहिमेत मराठ्यांचा फजितवाडा न त्यांची सर्व धोरणे चुकल्याने त्यांना अपयशाचे धनी व्हावे लागले. विश्वासघातकी बशी होळकराचे मित्रत्वाचे संबंध होते, पण होळकरांचा सल्लाच वेळोवेळी अपयशास ग झाला. बरोबर त्याउलट सल्ला देणाऱ्या महादजी शिंद्याला अचूक राजकीय दृष्टी ी, असे म्हणावे लागते. आपले धनी व परिवार यांच्यात, तुकोजी आणि रामचंद्र यांना ा मान राहिला नाही. त्यांची उघडउघड अवहेलना होऊ लागली. शिंद्याचे धोरण ची होऊ लागले. विसाजीला विश्वासात घेऊन मराठ्यांच्या सर्व हालचालींची सूत्रे त्याने त्याकडे घेतली. मराठ्यांना उत्तर हिंदमध्ये जे नेत्रदीपक यश मिळाले, त्या यशाच्या लाटांवर ूढ होऊन आणखी बहुमान मिळविण्याची संधी विसाजीला मिळत गेली. या दोन राजकारणी पुरुषांनी घेतलेल्या एकमुखी निर्णयामुळे मराठ्यांना दिल्लीवर विजय विता आला [१० फेब्रुवारी १७७१]. त्यामुळे रामचंद्र गणेशाची पदावनती करून ा पुण्याला परत पाठवून देण्याच्या मनसुब्यात पेशव्यांची अनुमती मिळविणे बिसाजीला गेले नाही. मराठ्यांच्या गोटातून झबिताखानाची हकालपट्टी, प्रत्येक गोष्टीत आडवे णाऱ्या तुकोजीला बसलेली जरब आणि रामचंद्र गणेशाची पदावनती [सेनेतील सर्व कारी रामचंद्र गणेश याला खुळोबाच समजत असत] या यशामुळे मराठ्यांच्या कारणाला वरील दिनांकापासून एक वेगळेच तेज आले [२७ जानेवारी] व मराठ्यांना नवे अभूतपूर्व विजय मिळत गेले. [**सीपीसी** : खंड ३; क्रमांक : ६०५]

. मराठे दिल्ली सर करतात आणि बादशहाला राजधानीत आणून बसवितात

दिल्लीचा बादशहा शहा आलम अलाहाबाद येथे हद्दपारीचे जिणे कंठीत असताना वा संबंध मराठ्यांशी आला. शहा अलमने दि. २० डिसेंबर, १७७० रोजी आपला ल सैफुद्दिन महमदखान याला मराठ्यांकडे पाठवून दिल्लीस जाण्याचे बाबतीत त्यांची त्र मदत मागितली. नजीबउद्दौला नुकताच मरण पावला होता. त्यामुळे मराठ्यांच्या तीने आपण दिल्लीच्या तख्तावर आरूढ होऊ शकू, अशी उमेद बादशहा बाळगून ा. त्याचा वारस जवानबख्त व मुलाची आई झीनत महाल ही दिल्लीतच होती.

दिल्लीच्या संरक्षणासाठी झबिताखानाचे ३,००० सैनिक सुसज्ज होते. स्वतः झबिताख
हा होळकरांच्या नेतृत्वाखालील मराठा सेनेच्या साहाय्याने आपल्या बापाप्रमाणेच बादशाह
नाव पुढे करून दिल्लीच्या आसपासचा प्रदेश आपल्या ताब्यात घेत होता. नजीबचा म
झाल्याने दिल्लीशासनावर नियंत्रण ठेवणारी किल्ली मराठ्यांच्याच हातात होती. आप
स्वतःच्या मुलुखातील खरकटी निस्तरण्यात गर्क झालेला अहमदशाहा मृत्युपंथाला लाग
होता. झबितखान हा अननुभवी तरुण तर दुंदीखान अर्धांग झाल्याने विकलावस
असलेला.

शहाअलम व त्याच्या गोटातील मुत्सद्दी चिंतामग्न होते. मीरबक्षीपद आणि बादशा
सुद्धा मराठे कोणाला देतील, याचा त्यांना काहीच अंदाज लागेना. दरम्यान महाद
शिंदे याने शहाअलमला एक गुप्त खलिता पाठविला व त्याच्यावरील आपली निष्ठा प्रक
करून जर बादशाहा सर्व खर्च देणार असेल, तर त्याला दिल्लीला सुखरूप नेऊन तक्ता
बसविण्यास आपण तयार आहोत असे कळविले. बादशहाने उत्तरादाखल अलाहाबाद
सैफुद्दिन महमदलाच मराठ्यांच्या गोटात पाठवून दिले. अखेर सौदा ठरला. तरी दरम्यानच
काळात बादशहाचा कट्टा दुष्मन गाझीउद्दिन याला शिंदे याने अजमेरहून आपल्याक
बोलावून घेतल्याने बादशहाच्या मनात संदेह निर्माण झालाच.

मग फरुकाबादचा तळ हलवून [दि. २७ जानेवारी १७७१] पुढाकार घेणारे मरा
सैन्य मणिपुरी, शुकोबाद आणि अलीगढमार्गे दिल्ली समोर असलेल्या पतपारगंजास येउ
थबकले. [५ फेब्रुवारी]. येताना वाटेत त्यांनी सिकंदराबाद येथे लुटालूट व जाळपो
केली. [२ फेब्रुवारीच्या सुमारास]. गुरुवार, दि. ७ फेब्रुवारी रोजी सैफुद्दिन मराठ्यांच
छावणीतून निघाला, यमुना नदी पार करून गेला, राजधानीचा दिल्ली दरवाजा उघडण्य
त्याने तेथील सैनिकांना भाग पाडले. मराठ्यांपासून कसलीही भीती बाळगण्याचे कार
नाही, अशी दिल्लीतील नागरिकांना त्याने हमी दिली. मग तो जामा मशिदीत गेला; त्यावे
झबिताखानच्या हुकुमाप्रमाणे बलुचचा भाऊ मुसावीखान हा दिल्लीचा प्रमुख होता. त्या
बादशहाच्या नावे द्वाही फिरविण्यास भाग पाडले व किल्ल्याचा ताबा मागितला. किल्ल्या
किल्लेदार म्हणून झबिताने कासीमअलीची नेमणूक केली होती. राजमातेच्या हुकुमावरू
त्याने किल्ल्याचा ताबा द्यायचे नाकारले व स्वसंरक्षणार्थ किल्ल्याच्या तटावरून तोफां
मारा करावयास सुरुवात केली. पण या निर्नायकी प्रतिकारामुळे बालेकिल्ल्याचे संरक्षण हो
शकले नाही. मराठ्यांच्या तोफांनी अल्पकाळच भडिमार केला पण त्यामुळे असद बुरुजा
खिंडार पडले. किल्लेदार नाक मुठीत धरून शरण आला.[५] दि. ९ रोजी दोनप्रहरी कसली
गडबड न करता त्याने शरणागतीसाठी वाटाघाटी सुरू केल्या; व संपूर्ण शरणागती पत्करल
दि. १० ला अगदी उषःकालीच शिंदे याचा एक अधिकारी बाळाराव गोविंद याने मोठ
प्रतिष्ठेने किल्ल्यात प्रवेश केला, किल्ल्याच्या तटबंदीचे संरक्षणासाठी आपल्या सैनिकांच
नेमणूक केली व झबिताखानच्या सैन्याला किल्ल्याबाहेर हाकलून दिले. पाचहजार मरा
स्वारांनी दिल्ली शहर व्यापून टाकले.

दिल्लीच्या युवराजांनी सुभेदार म्हणून विसाजीची नेमणूक केली. त्यानुसार दिल्ली ोवतालच्या, विशेषतः उत्तरबाजूकडील मुलुखातून वसुली करण्याचे अधिकार त्याला मिळाले. ा महसूल पूर्वी नजीबखान स्वतःच खात होता. युवराजाच्या सल्लागार मंडळातील सर्वेसर्वा ोण्याचा मान शिंदे व विसाजी यांना मिळाला.[६] या विजयानंतर मराठ्यांनी पुढील हालचाल शी करायची हे ठरवले. त्यांना खरी निकड होती पैशाची ! राज्याचा वारस व त्याची ाई यांच्या हातात कसलीच सत्ता नव्हती. त्यासाठी युवराजाला हाताशी धरून त्याच्या ार्फत शहाअलमला दिल्लीस आणण्याबाबत खुद्द त्याच्याशीच बोलणी सुरू केली [१२ मार्च] ानुसार बादशहा शहाअलम याला आपल्या सेनेच्या साहाय्याने दिल्लीत आणावयाचा व ाच्या अधिकाऱ्यांच्या हाती किल्ला सुपूर्द करावयाचा. त्या मोबदल्यात खर्चापोटी मराठ्यांना चवीस लाख रुपये मिळावयाचे, तसेच मीरत व अन्य काही परगणेही त्यांना तोडून ायचे. या व्यतिरिक्त वझीर वगळता त्या खालील जागेवरील अधिकारी नेमण्याचे अधि- ारही मराठ्यांकडेच रहावयाचे व नवीन नेमलेले अधिकारी बादशहाला ज्या नझरा कर- ील, त्यातील अर्धाभाग मराठ्यांनी घ्यावयाचा.

वरील सर्व अटी मान्य करून खंडणीची रक्कम देण्यास संमती दिल्यानंतरच दिल्लीला ाण्यासाठी म्हणून बादशहा अलाहाबादेतून बाहेर पडण्याची तयारी करू लागला. कबूल ल्लेल्या रकमेचा पहिला हप्ता हाती पडताच, मराठ्यांनी शहाअलमच्या प्रतिनिधीला केल्याचा ताबा दिला (२ ऑगस्ट). अलाहाबादहून दिल्लीस येत असताना बादशहा ाटेत फरुक्काबाद येथे आला असताना, तिथे नव्याने अधिकारावर आलेल्या सुभेदाराकडून याने अधिकारपदावर आल्याबद्दल वारसाहक्काबाबत जरूर त्या रकमेची मागणी केली. अहमदखान बंगष नुकताच मेला होता व त्याच्या जागी त्याचा मुलगा आला होता. पण ी मागणी मान्य न करता बंगषचा प्रमुख कारभारी फकरुद्दौला याने आसपासच्या ुलुखातून हजारोंच्या संख्येने अफगाण सैनिक जमा केले व युद्धाची तयारी केली. ादशहाने महादजी शिंदे याची मदत मागितली. बरोबर प्रचंड स्वार व तोफखाना घेऊन शिंदे त्या दिशेने वाट चालू लागले. मराठा फौज त्या दिशेने मढेरा नजीक आली मात्र, त्या भीतीनेच फखरुद्दौला शरण आला व त्याने शहाअलमशी समझोता केला. फरुकाबादच्या ढाईत खूप मोठा हात मारता येईल या आशेने आलेला महादजी काहीसा खट्टू होऊन ढेऱ्याहून परत फिरला, पण भविष्यकाळात त्याच्या वाढत्या महत्त्वाकांक्षा त्याला पुऱ्या ्करावयाच्या असल्याने त्याने कसलीही कुरकूर केली नाही. (इभ्रतनामा खंड १, २००) यानंतर महादजी आपले सैन्य घेऊन नबीगंज येथे दि. १८ नोव्हेंबर रोजी बादशहाची ाट पहात थांबला. बादशहा तिथे येताच आपल्या सैन्याच्या रक्षणाखाली महादजीने याला दिल्लीच्या रोखाने घेऊन जाण्यास सुरुवात केली व बादशहा म्हणून शहाअलमने दि. ६ जानेवारी, १७७२ या दिवशी दिल्ली राजधानीत मोठ्या थाटामाटाने प्रवेश केला.[७]

१३ : विसाजी कृष्णाचा विजय :
रामचंद्र गणेशाची बडतर्फी : त्याचा पुढील इतिहास

मराठ्यांच्या उत्तरमोहिमेतील आपापसातील झगड्याच्या दुर्दैवी कहाणीचा आपल्य आता शेवट करावयाचा आहे. १० फेब्रुवारी, १७७१ या शुभदिनी मराठ्यांनी दिल्ल ताबा मिळविला या अभूतपूर्व बातमीने पुण्यनगरीतील पेशव्यांच्या दरबारात आनंदी अ झाला. दि. २ ऑगस्ट, १७६० रोजी सदाशिवराव भाऊंनी दिल्ली काबीज करण्य प्रयत्न केला होता, त्यात त्यांना अपयश आले होते. या नव्या विजयाने पानिपतचा कलंक धुवून निघाला. या महत्तम विजयाचे श्रेय विसाजी व शिंदे यांनाच देण्यात अ पुण्याहून पाठविण्यात आलेला पेशव्यांचा हुकूम दिल्लीस २६ एप्रिल रोजी येऊन थडक त्यानुसार हिंदुस्थानातील मराठ्यांच्या सैन्याचे आधिपत्य विसाजी कृष्ण याजकडे सोपवि आले. व त्याने रामचंद्र गणेश याचा अधिकार मिळविला. अवमानित झालेला रामचंद्र ग दुःखद मनस्थितीत दिल्लीच्या वेशीबाहेर पडून दख्खनकडे येण्यास निघाला. पण वाटे त्याला फरिदाबाद येथे थोपवून धरावे, या उद्देशाने होळकर व शिंदे यांनी आपल्याक उच्चपदस्थ अधिकाऱ्यांना मुद्दाम पाठविले, व रामचंद्र गणेशाचे मन वळवून त्याला घेऊन येण्याबाबत प्रयत्न करण्यास सांगितले. रामचंद्र गणेश त्यांना म्हणाला, " शिंदे क होळकर काय, कुणाशीच माझे वैर नाही. मी दख्खनमध्ये परत जातो आहे याचे क विसाजीने मला पेशव्यांचा हुकूम दाखविला नाही म्हणून. माझी अवहेलना करूनच मला परत जायला सांगत आहे. जर हे दोघे सरदार व खुद्द विसाजी जातीने येथे आ त्यांनी मला परत फिरण्याबद्दल गळ घातली तरच मी परत फिरेन." असे म्हणून तो चालू लागला, पण तो पालवालला जायला निघाला व त्यानंतरच त्याच्या म्हणण्या करण्यात आले.

हा सगळा बनाव पार पडल्यानंतर विसाजी विलक्षण संतापला. त्याने दिल्ली से आणि खाजगी स्वारांसमवेत यमुना पार करून गाझियाबादला जाऊन पुढे चालू ल [२२ मे १७७१ च्या सुमारास]. अशाप्रकारे मराठ्यांच्या या कूटप्रमेयाला एक न तिढा बसला व त्यांच्या सरदारांत नवे नवे गट तयार झाले. विसाजी कृष्ण हा ए शिलेदार म्हणून पूर्णपणे बाजूला पडला. शिंदे व होळकर यांनी रामचंद्र गणेशाशी संग केले. विसाजीच्या छावणीतील पेशव्यांचा अखबरनवीस त्यांना लिहितो, " आप अ फूट प्रत्येक्ष लौकिकात आली. उभयेता मराठे सरदार यांसीही बिघटली आण दिलीचा सोडोन आले. हे उभयेता म्हराठे सरदार ज्या कारभारात नाहीत तेव्हा परिणाम विसाजीपंताच्या केल्यावर लागत नाही. यैसे मनसबेचे वतीने जन बोलतात. रामचंद्र ग करिता या उभयेतांसी विरुध विसाजीपंतानी धरलिया फळ नाही." [८] [**एसपीडी :** क्रमांक : २६५, २६६, २६८, २६९, २७२] महादजी व तुकोजी या दोघ हिंदुस्थानातील मराठासेनेचे सर्वोच्च अधिकार पुन्हा एकदा रामचंद्राला द्यावयाचे होते

ाजीने दिल्लीच्या किल्ल्यावरील आपली पकड घट्ट ठेवली व पेशव्यांचा हुकूम यावा णून आपले पत्र आपल्या प्रतिस्पर्ध्याबरोबरच त्यांच्याकडे रवाना केले.

पेशव्यांकडून त्याला उत्तर आले त्यात आपल्या आधीच्या हुकुमाची अवज्ञा करून चंद्र गणेश याला मोठा करण्याच्या बेअदबीबद्दल दोन्ही मराठा सरदारांची कडक कान ाडणी केली होती. त्यामुळे विसाजीची बढतीच्या जागेवरील नेमणूक पक्की झाली. नंतर फारशी कागदपत्रात विसाजीचा उल्लेख 'पेशवा' या जराशा चमत्कृतिपूर्ण उपाधी- व केलेला आढळून येतो. 'पेशवा' म्हणजे मराठ्यांचा उत्तरेकडील सर्वोच्च प्रमुख.

बिचारा रामचंद्र गणेश! दणके खाणाऱ्या चेंडूसारखा इकडून तिकडे टोलविला यावर अखेरीस दख्खनकडे येण्यासाठी त्याने दिल्ली सोडली [१० सप्टेंबर, १७७१]. ापल्यानंतर येणाऱ्या वरिष्ठाचे हुकूम मानू नयेत म्हणून शिलेदारांच्या एका तुकडीला डेफार फितविण्याचा प्रयत्नही त्याने केला. हे शिलेदार त्यानंतर काही महिने दिल्लीबाहेर ीताराम सराईत तळ टाकून होते. त्यांना त्यांच्या पगाराची थकबाकी देण्यात आल्यानंतर प्रिल १७७२ मध्ये त्यांनी आपला हट्ट सोडला. रामचंद्र गणेशाचा हाही वार फुसका ाघाला.

त्यानंतर विसाजी कृष्ण, मराठ्यांच्या हिंदुस्तानातील लष्कराचा सर्वोच्च अधिकारी ाला. त्याला कुणीही प्रतिस्पर्धी उरला नाही. पण शिंदे वा होळकर यांच्यासारख्या ताले- र धुरंधरांवर हुकमत चालवावी किंवा राष्ट्रकार्यासाठी त्यांच्यात एकजूट घडवून आणावी वढी ताकद त्याच्याजवळ नव्हती त्याचा परिणाम असा झाला की, मराठ्यांच्या उत्तर- कडील राजकारणात कधीही न संपणारा बेबनाव उत्पन्न झाला. शिंदे आणि होळकर यांनी ापापल्या इच्छेनुसार वेगवेगळी वाटचाल सुरू केली व राष्ट्रीय हिताच्या दृष्टीने दोघांनाही ान्य होईल असे धोरण आखणे शक्य झाले नाही. थोडक्यात सांगायचे तर आपली वाट- ाल स्वतंत्र ठेवून बादशहाचा आपल्यावर अधिकाधिक विश्वास कसा बसेल, हाच मार्ग हादजीने गुपचूप अनुसरला. याउलट झबिताखानाला पाठिंबा देऊन आपल्या लष्करी ामर्थ्याचे प्रदर्शन केल्यामुळे होळकराने शहाअलमचा राग ओढवून घेतला, तर विसाजी कृष्ण हा दिल्लीच्या उत्तरेकडील प्रदेश जास्तीत जास्त आपल्या हुकमतीखाली कसा येईल ाच काळजीत राहिला.[१]

रामचंद्र गणेश पुण्यात आला तरी त्याचा क्रोध शमला नव्हता. आपली पदावनती केल्याबद्दल आपल्या धन्यावर तो जळफळत होता. पेशव्यांच्या विरुद्ध जनतेची सहानुभूती आपल्याला मिळावी व पेशव्यांवर तिचा राग व्हावा म्हणून त्याने सर्वसंगपरित्याग करण्याची धमकी दिली. मुसलमान धर्मातील फकीर होण्याची क्लृप्ती अनुसरली. त्याने कमरेभोवती एक फडके गुंडाळले, अंगावर अन्य वस्त्र ठेवले नाही. हातात फकीराचा कटोरा घेतला व अशा अवस्थेत पुण्याच्या रस्त्यातून डाळ-तांदुळाची भीक मागत तो दोन दिवस भटकला. रामचंद्र गणेशाच्या कल्पनेप्रमाणे लोकांना पेशव्यांचा राग आला नाही उलट या मूकनाट्याने त्यांची भरपूर करमणूक झाली. [जुलै, १७७२. खरे, खंड ४, पत्र क्र. १९०४]

अशाप्रकारे जनतेत आपले हसे करून घेऊ नये म्हणून पेशव्यांनी त्याला कड ताकीद दिली. रामचंद्र मात्र " एक ना एक दिवस दुर्दैवाच्या फेऱ्यात सापडून विसाजी दिल्लीच्या अधिकाऱ्याच्या जागेवरून दूर व्हावे लागेल व मग ती जागा आपल्याला मिळेल असे एक गोड स्वप्न कित्येक दिवस उराशी बाळगून होता.

पण त्यानंतर थोड्याच दिवसात नोव्हेंबरमध्ये माधवरावाला मृत्यूने अगदी तर वयात गाठले. त्याच्यामागून त्याच्या जागेवर आलेल्या पेशवा नारायणरावाचा द महिन्याच्या कालावधीनंतर खून झाला. त्या बदलत्या परिस्थितीने रामचंद्र गणेशाचे ग स्वप्न धुळीला मिळाले. उत्तरेत राहून विसाजी कृष्णाने अमाप संपत्ती मिळविली. ती त्य पुढे १७७४ मध्ये पेशव्यांच्या गादीसाठी जो संघर्ष सुरू झाला त्यात आपला पोशि राघोबा दादा याचा पाठपुरावा करण्यात खर्च केली.

टीपा : प्रकरण २६

पृष्ठ **टीपेचा क्रमांक**

३ १ जाटांच्या बाबतीतली पाश्चिमात्यांकडील माहिती फादर एफ. एक्स. वेन्डे याने दिली आहे, पण ती जवाहरसिंगाचा मृत्यू होतो त्या आधीच्या लगेचच घटनांशीच संपते. ही उणीव रेने मादेकच्या मेमुआरने पूर्णतया भरून काढ आहे. रेने मादेक हा जुलै, १७६७ मध्ये जाटांच्या नोकरीत शिरला ऑक्टोबर, १७७२ मध्ये त्यांच्याकडून निघाला. ई. बार्बे याच्या ' ल नब रेने मादेक ' या पुस्तकातील गोळाबेरीज माहितीपेक्षा मी आय. ओ. ए मधील मादेकच्या मेमुआरच्या लिखित प्रतीतील माहितीचा जास्त उपयो केला आहे.

सी. पी. सी. खंड २, क्रमांक : १३८९ मध्ये केसरीसिंगाचे नावाचा उल्ले बरोबर केलेला आहे पण क्रमांक १४९९ मध्ये खेरीसिंग असा चुकी उल्लेख आहे (ही चूक सूचीत दुरुस्त केली आहे).

जवाहिरसिंगानंतरचा जाटांचा इतिहास– **डीसी. सीपीसी** : खंड २ व मादेक, **एस्पीडी** : खंड २९; बयान (थोडक्यात) **चाहर गुलझा इब्रतनामा, गुलामअली,** खंड २; ४.

५ २ **लढाईबाबतची माहिती : मादेक,** (उत्कृष्ट देतो) **सीपीसी** खंड क्रमांक: १८०, १८४; **डीसी, एस्पीडी** : खंड ३७, क्रमांक २१०; **खरे** खंड ४, पत्रक्रमांक ९७०, ९७१.

३ "दोन तासांच्या हातघाईच्या लढाईनंतर नवलसिंगाला समरूच्या हद्दीत माघार घेणे भाग पडले. समरूने आपल्या सैन्याची चौकोनी रचना केली होती व शत्रूचे वरचेवर येणारे हल्ले त्याने कितीतरी वेळ थोपवून धरले होते. आपण भलत्याच अडचणीत सापडलो आहोत याची कल्पना येताच शत्रू-कडील कुणी आपल्याला ओळखू नये म्हणून त्याने आपल्या अंगावरील सर्व आभूषणे फेकून दिली व आपल्या काही अनुयायांसमवेत तो (अरिंग) किल्ल्यावर सुखरूप पोहोचला." **सीपीसी :** खंड २, क्रमांक १८४, तसेच **डीसी.**

४ अंतर्वेदीतून धाडलेल्या एका पत्रात लिहिले आहे, "मराठ्यांच्या सैन्यातील सर्व अधिकारी विसाजीचे स्नेही आहेत. ते सगळेच रामचंद्र गणेशला महामूर्ख समजतात. हे सर्व महादजी शिंद्याच्या चिथावणीने घडत आहे. विसाजी आणि महादजी यांना अहमदखान बंगषला मीरबक्षी करावयाचा आहे कारण त्याने त्यांना पैसे द्यावयाचे आश्वासन दिले आहे." [**सीपीसी** : खंड ३, क्रमांक ६०५]

५ **सीपीसी** : खंड ३, क्रमांक : ६०५-६६५. **डीसी : एसपीडी** : खंड २९, क्रमांक ; २६५. बाळारावने किल्लेदार शेख कासम याला रु. ११,००० दिले होते. ही रक्कम बहुशः त्याच्या शिबंदीच्या पगारापोटी असावी. [कित्ता, पृ. ३१४]

६ होळकर आपण होऊनच लांब अंतरावर राहिला. पण त्याचा सोबती रामचंद्र गणेश हा मात्र आपल्या दावेदाराने आपल्याला पूर्णपणे फसविले म्हणून वैतागून एकटाच दूर निघून गेला. पेशव्यांच्या जाहीर हुकुमाप्रमाणे दि. २६ एप्रिल रोजी विसाजीला मराठा सैन्याचे प्रमुख करण्यात येऊन रामचंद्राला परत बोलावण्यात आले होते. [**डीसी**]

७ **डीसी. सीपीडी** : खंड ३, क्रमांक : ६९५, ७१७, ८१२, ८२८, ८८८, ८९५, ८९७; **एसपीडी** : खंड २९, क्रमांक ८९, पृ. ३१७-३२१; ऐतिहासिक चरित्रे; खंड ४, पृ. १११.

८ **एसपीडी** : खंड २९, क्रमांक : २६५, २६६, २६८, २६९, २७२, **डीसी. सीपीसी** : खंड ३, क्रमांक ८१०, ८१२.

९ पानिपत शहराबाहेर एक छोटेसे देऊळ आहे. त्या देवालयातील आवारात शिलेवर खोदलेल्या फार्शी भाषेतील मजकुरावरून, सदर देऊळ रामचंद्र गणपत याचा पुत्र राव रघुनाथ याच्या अमदानीत ११८५ ए-एच. (१७७१ इ. सन) मध्ये विसाजीचा मुलगा महिपत याने बांधले असावे असे दिसते. देवालयात मराठ्यांचे लाडके उपास्य दैवत श्री दत्तात्रेय याची सुबक प्रतिमा आहे.

प्रकरण २७ वे

दिल्लीतील घडामोडी व रोहिल्यांविरुद्ध मोहिमा

१. पुन्हा सत्तारूढ झालेल्या बादशहासमोरील कठिण कामगिरी

शहाअलमने बादशहा म्हणून दिल्ली राजधानीत पुन्हा प्रवेश केला, त्या नंतर दुसऱ्या दिवशी भगवान सहस्त्ररश्मीने नव्या दिवसास सुरवात केली ती, या नगरीतील स त्रिक आनंदोत्सव पहावयास मिळावा म्हणूनच यांत शंका नाही. सर्व दिल्लीकरांची अं करणे उत्साहाने ओसंडून गेलेली आणि त्यात हा दिवस म्हणजे पवित्र शव्वाल महिन्य पहिला दिवस. या आधीच्या महिन्यातील तीस दिवस चालू असलेले रोझे व नमाज सं होते. ईदचा सण सुरू झाला होता. मशिदी, हमरस्त्यातले सार्वजनिक चौक व घर नि ईदच्या मंगल वातावरणाने भारले गेलेले. शव्वाल मास, ईदचा सण व बादशहाचे राजधा तील पुनरागमन या तीन पवित्र घटनांच्या सुखद संगमाने सर्व थरातील जनतेच्या आ दाला उधाण आले नसते तरच नवल. खऱ्याखुऱ्या बादशहाच्या हातात सत्ता आल्य शासन कार्यक्षम होऊन गतवैभवाला पुन्हा उजाळा मिळेल, त्यात भर पडेल, राजवाड्य व दरबारात होणारे शाही समारंभ, त्यासाठी होणारा प्रचंड खर्च व दानशूर बादशह हातची खैरात, हे सर्व याच देही याच डोळा पुन्हा पहावयास मिळेल अशी आ जनतेच्या मनात नव्याने पालवली असली तर ते चूक नव्हते. राजधानी दिल्लीने प तप सत्यानाश, प्रदेशच्या प्रदेश उजाड होणे, भीषण दारिद्र्य, अवेहलना, यांचाच भयक अनुभव घेतला होता. बादशहा हद्दपारीचे जिणे जगत असताना या शहराला जे ह सोसावे लागले होते, ते संपले होते आणि हिंदुस्थानची राजधानी म्हणून दिल्ली श पुनश्च दिमाखाने तळपू लागेल अशी शक्यता निर्माण झाली होती.

बादशहा मात्र जनतेच्या या इच्छा-आकांक्षा पूर्ण करण्याच्या परिस्थितीत नव्हत या नव्या परिस्थितीशी कसे जमवून घ्यायचे, हे त्याचे त्यालाच कळत नव्हते. त्याच तिजोरीत नाण्यांचा खडखडाट होता. बराचसा मुलुख बळकावला गेलेला, सरकारी इमारत तील सर्व सामानसुमान पळविण्यात आलेले, तर भांडारातील चीजवस्तूची केव्हाच व लागलेली. सार्वजनिक इमारतींची डागडुजी झाली नव्हती. किल्ल्यातील तटबंदीला भगदा पडली होती. भरीत भर म्हणून बादशहाला प्रचंड कर्ज झालेले. दिल्लीस परतण्यासा फौजेचे साहाय्य हवे म्हणून गेले दहा महिने त्याने खूप मोठा फौज फाटा गोळा केल होता. या फौजेतील शिपायांचे पगार खूप दिवसात न दिल्याने ती थकबाकी बरीच वाढल होती. एवढ्याने तरी भागत होते का ? नाही ! शब्द दिल्याप्रमाणे मराठ्यांनी त्याला दिल्ली

आणून गादीवर बसविले. यासाठी त्यांनी बादशहाकडे खूप मोठी रक्कम मागितली होती. ती कोठून उभी करायची या काळजीने तो बेजार झाला होता. म्हणजे १७७२ च्या जानेवारी महिन्यात दुसरा शहा अलम सत्तेवर आला तेव्हा त्याच्या समोर कठिण असे जर कोणते पहिले काम असेल तर ते म्हणजे विस्कळित झालेल्या साम्राज्यावर नियंत्रण ठेवून त्याची घडी नीट बसविणे. पण खजिना रिता झालेला आणि मुलूख बंडखोरांनी बळकावलेला. हे बंडखोर आपल्या सैन्याच्या जोरावर आपापल्या मुलुखात दीर्घकाळ आपली सत्ता टिकवून होते. त्यांच्या जवळ भक्कम पैसा व आधीच्या कर्तृत्वाचा दबदबा होता.

२. दिल्ली दरबारातील कारभारी

आपली सत्ता बळकट करायची तर उच्चपदी ज्याची नियुक्ती करावयाची तो माणूस तसाच कर्तबगार हवा. त्या दृष्टीने या अवघड कामगिरीसाठी या तरुण बादशहाच्या भोवतालचे वातावरण कसे होते ? माजी वझीर गाझीउद्दिन इमाद उल्मुल्क याचे बादशहाशी पटत नसे. तो दख्खनमध्ये निघून गेल्याने त्याचा उपयोग नव्हता. शुजाउद्दौला हा नव्याने नेमलेला वझीर. हे महाशय बहुधा दिल्लीत नसत. आपल्या ताब्यातील मुलुखात आणखी भर पडून आपली जहागीर हे एक मोठे राज्य कसे करता येईल, याच विवंचनेत तो असे. तसे त्याचे प्रयत्नही चालू असत. वझिराच्या जागी सल्लागार म्हणून नेमावयाचा माणूस हा वय व अनुभव याने परिपक्व हवा. तशी कोणतीही व्यक्ती बादशहाच्या नजरेसमोर नव्हती. बादशहा स्वतः हद्दपारीचे जिणे एक तप जगला होता. त्या अवधीत नाव घेण्यासारखे जे राजकारण कुशल लोक त्याच्या भोवती होते त्यात मुनीरउद्दौला, सैफुद्दिन महमदखान व हिसमउद्दौला हे महत्त्वाचे. तरी हे सगळे 'गोष्टी सांगेन युक्तिच्या चार' याच पंथातले. यांच्यापैकी कोणातही राज्यकारभाराची वा मुलुखगिरीची कुवत नव्हती. गरज भासेल त्यानुसार इंग्रज वा मराठे यांच्याकडे जाऊन साहाय्य देण्याबाबत त्यांच्याशी बोलणी करावी, या कामातील निपुण राजदूत एवढीच त्यांची पात्रता. विकलांग राजसत्तेला पुन्हा पूर्वीच्या वैभवाप्रत नेण्यासाठी जी ताकद व योग्यता लागते त्याचीच त्यांच्याठिकाणी नेमकी उणीव होती. त्यामुळे स्वाभाविकच बादशहा दिल्लीस सत्ताधारी झाल्यावर ज्येष्ठ कारभारी म्हणून नेमणूक करताना ही नावे आपोआप वगळली गेली.

बादशहा पुन्हा सत्तारूढ झाला तेव्हा त्याच्या दरबारात दोन माणसे अशी होती, की जी पुढे फार मोठ्या जागेवर जायची होती. या दोन व्यक्तींत आपापसात दीर्घकाल वैमनस्य होते. एका अर्थी बादशहाचे हे फार मोठे दुर्दैव. शहाअलमची माणसांची पारख करण्याची पात्रताही इथे उघडी पडत होती. मिर्झा नजफ्खान व अबदुल अहद खान याच त्या दोन परस्परविरोधी शक्ती. या पैकी एकाने बादशहा दिल्लीस परत आल्यावर त्याच्या अकरा वर्षांच्या कारकीर्दीत धीमेपणा व अचूक निर्णय घेण्याची पात्रता या गुणांवर बादशहाचा सर्वश्रेष्ठ मार्गदर्शक म्हणून नाव मिळविले. राजकीय रंगमंचावरील एकमेव सूत्रधार हे स्वतःचे वैशिष्ट्य निर्विवाद कायम ठेवले. कालांतराने साम्राज्य नाममात्र राहिले,

बादशहा नियतीच्या हातातील बाहुले बनला; त्या आधीच्या काळात शूर सेनानी व
कारणपटू म्हणून वर उल्लेखिलेल्या व्यक्तीनेच दिल्लीची शान कायम राखली. ही व्य
म्हणजे नजफ्‌खान; मध्ययुगीन भारताला इराणकडून मिळालेला अखेरचा नजराणा. या गु
माणसाची कारकीर्द अवघी अकरा वर्षांची. त्यातील आठ वर्षे दरबारातील नालायक म
ग्रस्तांशी झगडण्यात गेली. नजफ्‌खानचे गुण व त्याची योग्यता बादशहाने आधीच जा
असती तर ते देश व खुद्द बादशहा या दोघांच्याही दृष्टीने अधिक कल्याणाचे झाले अ
माणसाला सर्वसाधारण आयुष्य असते तेवढे जरी नजफ्‌ला लाभते तरी पुष्कळ होते.
गुणी माणूस वयाच्या अवघ्या पंचेचाळिसाव्या वर्षी कालवश झाला.

३. मिर्झा नजफ्‌खान : त्याचा पूर्वेतिहास

मिर्झा नजफ्‌खान[१] हा उच्चकुलीन इराणी वंशातला. या घराण्याच्या प्रमुखाला
येथील गुरु इमाम अलि–अल्–रिझा याच्या कबरस्तानच्या किल्ल्या जवळ ठेवायचा
होता. तसेच या घराण्यातील एकाहून अधिक पुरुषांचे विवाह सफवी राजांच्या मुल
झाले होते. अशा या उच्च इराणी वंशात १७३७ मध्ये इस्पहान येथे नजफ्‌चा जन्म झ
त्याची बहीण ही सफदरजंगचा मोठा भाऊ मिर्झा मुहसान याची बायको. सुरुवा
नजफ्‌ने आपल्या बहिणीचा सावत्र मुलगा महमद कूलीखान (याला सगळे मिर्झा कु
या नावाने ओळखीत) याच्या हाताखाली नोकरी धरली. त्यावेळी महमद कूलीखान
बादशहाच्यावतीने अलाहाबाद येथील किल्ल्याचा मुख्य किल्लेदार म्हणून काम पहात ह
त्याचा पहिला चुलतभाऊ शुजाउद्दौला, त्याचा मनस्वी द्वेष करी. शत्रूनी अलाहाबा
किल्ला जिंकून घेतला व महमदकूलीला कैदेत टाकले. (एप्रिल १७५९) पुढे जाने
१७६१ मध्ये शुजाउद्दौलाने त्याला ठार मारले. आपला भाचा व पोशिंदा महमद कूली या
खुनाच्या लफड्यात आपण अकारण गुंतून पडू या भीतीने तरुण नजफ्‌ नेसत्या व
निशी पळाला व बंगालमध्ये गेला. नबाब कासीमअलीने त्याला आपल्या चाकरीत
आणि तीन लाख रुपये देऊन सैन्य उभारण्यास सांगितले. या नबाबाच्या नोकरीत असता
उंधानाला येथे आपल्या सैन्यासह ऑगस्ट १७६३ मध्ये नजफ्‌खान बंगाली सेनेस मिळ
तेथे त्याने आपल्या आवेशयुक्त वाणीने त्या सैनिकांच्या ठिकाणची निष्क्रियता व अ
झटकून काढला व मीरजाफरचे सैन्य ज्या खंदकावर खडे होते त्यावर हल्ला करून अ
कर्तृत्व सिद्ध केले. त्यानंतर कासीमअलीबरोबर तो बुंदेलखंडात गेला. बुंदेलखंडचा
हिंदूपत याच्याकडून खंडणीची रक्कम यायची होती. ती वसूल करण्यासाठी शुजा
सांगण्याप्रमाणे कासीमअलीने ही मोहीम हाती घेतली होती. या मोहिमेत पराभव झाल
कासीमला परत जावे लागले. नजफ्‌खान मात्र बुंदेलखंडातच राहिला. तेथील राजघराण्या
पुरुषांत नेहमी अंतर्गत हेवेदावे सुरू असत. जो जास्त पैसा देई त्याच्याकडून न
त्या राजघराण्यातील चकमकीतून भाग घेई. 'आपले सैन्य घेऊन ये व इंग्रजांविरुद्ध लढ
मला मदत कर' असे शुजाउद्दौला याने त्याला लिहिले. त्याच वेळीं इंग्रजसेनानी मन्रो

क हे त्याला निरनिराळी आमिषे दाखवीत होते. नजफने शुजाचा पक्ष सोडावा, व नव्हे तर, विश्वासघाताने त्याच्यावर हल्ला चढवावा व आपल्या पक्षास यावे म्हणून ४ च्या मध्यापासून इंग्रजांचे प्रयत्न चालू होते. ऑक्टोबर, १७६४ मधील बक्सारच्या -पर्यंत नजफ्ने काहीच हालचाल केली नाही. बक्सारच्या लढाईत पराभव झाल्याने पळत सुटला. इंग्रज या पुढे जिंकीत जाणार होते, याचे भारतीय जगतात दिसलेले यक्षिकच होते.

त्यानंतर मात्र नजफ्ने बांदाहून त्वरित कूच केले व जानेवारी, १७६५ मध्ये तो ना मिळाला. इंग्रजांची छावणी त्यावेळी अलाहाबाद नजिक होती. जाताना वाटेतील क महसूल अधिकारी व व्यापारी यांच्याजवळच्या संपत्तीची त्याने मनसोक्त लूट केली. बहादूरचा खजिना, घोडे, तंबू अचलगढमधील त्याची इतर सर्व साधनसामग्री यांचीही र करून ते सर्व त्याने स्वतःकडे ठेवले. महमद कुलीखानच्या हाताखाली असताना दिवस तो अलाहाबाद येथे होता. त्यावेळी त्याला तेथील स्थानिक ठिकाणे व परि-ची माहिती झालेली होती. त्याचा फायदा घेऊन किल्ल्यातील कमजोर जागा कोणत्या ने इंग्रजांना दाखवून दिले. त्यामुळे इंग्रज तो किल्ला लवकर घेऊ शकले (११ फेब्रु- १७६५). ह्यानंतर इंग्रजांनी मे महिन्यात मल्हारराव होळकरांशी दोन हात केले, ही नजफ् हा इंग्रजांच्या बाजूने लढला. त्यावेळी तो फ्लेचर समवेत होता. नजफ्बद्दल ना दिवसेदिवस जवळीक वाटू लागली. त्याचा त्यांना चांगलाच उपयोग झाला. इंग्रज- अजिंक्य खरी, तरी त्यांच्याजवळ घोडदळ नव्हते. शत्रूवर बेधडक चालून जाणे जमत नसे. नजफच्या घोडदळाने इंग्रजांच्या फौजेतील ही मोठी उणीव भरून ली; इंग्रज अधिक समर्थ बनले आणि म्हणूनच १६ ऑगस्ट, १७६५ रोजी अलाहाबाद जो तह झाला, त्यानुसार इंग्रजांना बंगालचे दिवाणी हक्क मिळाल्याने त्यांना बादशहाला र्षी अठ्ठावीस लाख रुपये खंडणी द्यावी लागणार होती. ‘ त्यातलेच दोन लाख रुपये ी तुम्हाला देऊ.’ असे लॉर्ड क्लाइव्हने त्याला आश्वासन दिले.

‘ सगळे बादशहाचेच, आम्ही नोकर ’ अशा नम्रतेने इंग्रजांनी हा सगळा व्यवहार . बादशहाच्या दरबारात एक अधिकारी म्हणून नजफ् काम पहात होता, ते इंग्रजांच्या ्यावरूनच. त्याची भूमिका शहाअलमच्या दरबारातील इंग्रजांचा हितकर्ता अशीच . इंग्रजांनी शिफारस केली व त्यानुसार बादशहाने नजफ्ला कुरा जिल्ह्याचा फौजदार न नेमले (१७६६). बादशहाच्या कारभारी मंडळात इंग्रजांच्या हितसंरक्षकाची का करणारा आणखीही एक जण होता. त्याचे नाव मुनीरउद्दौला. इंग्रजांशी बोलणे ाच्याबाबतीत मुनीरउद्दौलाच विशेष पात्र समजण्यात येत असे. नजफच्या नेमणुकीने ा पोटशूळ उठला. ‘ आवश्यक तेवढा महसूल नजफ् गोळा करीत नाही ’ असे त्याने शहाच्या मनात भरवून दिले. ते खरे वाटून बादशहाने कुरा जिल्ह्याच्या फौजदारपदा- न नजफची उचलबांगडी केली (२१ फेब्रुवारी, १७७०). इंग्रज गव्हर्नराने नजफ्ची घेऊन त्याच्याबद्दल बादशहाकडे बरीच रदबदली केली, त्याचा उपयोग झाला नाही.

एक वर्षाहून अधिक काळ नजफ्ला नोकरीविना व त्रस्त अवस्थेत घालवावा लागला. या मुदतीत तो अलाहाबादला होता. नशिबाचा हा फेरा पालटला. मे, १७७१ मध्ये बादशहा दिल्लीस जाण्यास निघाला, तेव्हा पुन्हा त्याला बरे दिवस आले. बादशहाच्या अवतीभोवती खूप गर्दी होती. त्यात कर्तबगारी व अनुभव या दृष्टीने नजफ्च्या पासंगाला पुरेल असा कुणीही नव्हता. साहजिकपणे बादशहाचे लक्ष गेले ते नजफ्कडे. नजफ्ला आपले सैन्य सुसज्ज करता यावे म्हणून बादशहाने त्याला पन्नासहजार रुपये दिले. नजफने बादशहाच्या कूच करण्याच्या वाटेत त्याची पाठ राखली. त्याने बादशहाची निवड किती अचूक होती हेच सिद्ध केले व बादशहाच्या सैन्यातील सेनानी होण्यास आपण सर्वथा पात्र आहो हे दाखवून दिले.

४. मिर्झानजफचे स्वभावविशेष

मिर्झा नजफखानाच्या कारकीर्दीचा विचार करू लागलो म्हणजे त्याच्या ठिकाणी असलेले लष्करी डावपेचातले प्रभुत्व, त्याची रणनीती, रणकुशलता, राजकारणातील दूरदृष्टी व त्याच्याजवळ असलेली माणुसकी यांपैकी कोणत्या गुणाची विशेष प्रशंसा करावी, याचा संदेह पडतो. या बाबतीत त्याच्या वेळची दिल्ली दरबारातील सरदार मंडळी व साम्राज्यातील मांडलिक राजपुत्र त्याच्या जवळपास येण्याइतक्याही पात्रतेचे नव्हते. लष्करी डावपेचाच्या बाबतीत नजीबउद्दौला हा थोडाफार वरचढ ठरू शकेल, नाही असे नाही. नजीबउद्दौलाने बलाढ्य शत्रूविरुद्ध फार मोठ्या लढाया मारल्या, पण त्यावेळची परिस्थिती वेगळी होती. त्याने फक्त परंपरागत अफगाण युद्धतंत्राचा अतिशय पद्धतशीरपणे वापर केला. नजफ्ला मात्र नव्या लष्करी युद्धतंत्र शिक्षणाचा जो लाभ झाला, ते शिक्षण नजीबउद्दौला यास मिळू शकले नव्हते. नजफ्ला इंग्रजांविरुद्ध लढावे लागले होते. त्या नंतर त्यांच्याच बरोबर त्यांच्या खांद्याला खांदा लावून तो त्यांच्या शत्रूबरोबर लढला. इंग्रजांनी भारतात जे युद्धशास्त्र व तंत्र आणले होते, ते भारतात नवीन होते. काळाची पावले ओळखणाऱ्या नजफला त्याची उपयुक्तता पटली. हे नवीन तंत्र समजावून घेऊन त्याने आत्मसात केले, एवढेच नव्हे तर हे नवे युद्धतंत्र व नवी शस्त्रे याचा त्याने आपल्या सैन्यात कुशलतेने वापर केला. त्याने बंदुकांवर विशेष भर दिला व दहा हजार तडफदार शिपायांची एक पलटण त्याने तयार केली. या बंदुकधाऱ्यांनी या बाबतचे खास शिक्षण पाश्चात्यांकडून घेतलेले होते. खूप मोठ्या प्रमाणावर त्याने तोफांची जमवाजमव केली होती. इंग्रजांच्या पक्षाकडे ओढा असलेले रेने मादेक वॉल्तेर रेनहार्द व कॉन्त द मॉदेव यासारख्या पाश्चात्य रणधुरंधर सेनानींची आपल्या लष्करात भरती केली. आणि या दोन शाखांना त्या काळी हिंदुस्थानात सर्वोत्कृष्ट समजल्या जात असलेल्या मोगल घोडदळाची जोड दिली. नजफने परकीयांची मदत घेतली, पण त्याबाबत दौलतराव शिंदे जसा परकीयांच्या हातात असहाय्य झाल्यासारखा झाला होता, तशी आपली अवस्था त्याने कधीही होऊ दिली नाही. जुन्या युद्धतंत्रावर कलम केलेल्या या नव्या युद्धतंत्राचा सुपरिणाम असा झाला की, जे मराठे, रोहिले व जाट त्यावेळेपर्यंत जिंकण्यास कठिण असे समजले जात, ते नजफच्या नवतंत्रशिक्षित सेनेपुढे एकदम

निष्प्रभ ठरले. नजफच्या हाताखाली काम करणाऱ्या त्याच्या सैन्यातील दुय्यम अधिकाऱ्यांनीही हीच प्रथा चालू ठेवली. मात्र ही परंपरा दबॉन्यच्या अधिक सुधारलेल्या सेनेशी गाठ पडेपर्यंत टिकली. तसे म्हटले तर दबॉन्यच्या अधिक सुधारित सैन्यालाही हार खावी लागली पण ती अन्य श्वेतवर्णीयांची त्याहून सुधारित सेना तिला भेटली तेव्हाच.

राजकारणकुशल पुरुष म्हणून नजफखान अधिकच मोठा वाटतो. अनेक वेळा निराशेपोटी येणारा वैताग व विरोधकांच्या कुटिल कारवाया यामुळे येऊ पहाणाऱ्या वैफल्याच्या क्षणीही आपल्या मनावरचा ताबा ढळू न देता आपली चित्तशांती तो कायम ठेवीत असे. त्याच्या या लोकविलक्षण गुणांचा सुसंस्कृत अशा कॉंट डी मादेव या फ्रेंच निरीक्षकाला फार आदर वाटे. आपल्या छावणीतून लिहिलेल्या एका पत्रात तो लिहितो, "नजफखानविरुद्ध दरबारात जी कुटिल कारस्थाने चालू असतात, ती विचारात घेतली म्हणजे आपली चित्तशांती ढळू न देणाऱ्या या थोर माणसाच्या मनोरचनेचे वर्णन कसे करावे, तेच मला समजत नाही. अशा कारस्थानातील बारीकसारीक तपशीलाचीही माहिती त्याला मिळे. आपल्या मित्रपरिवारात त्यावर चर्चा करून तो आपली करमणूक करून घेत असे. तो म्हणे, 'भेकडांची कृत्ये अशीच क्षुद्र असतात.'[२]" त्याच्या समकालीन सरदारांत भावी घडामोडींचा अचूक वेध घेणारा त्याच्या इतका निष्णात कुणीच नव्हता. स्वतःच्या कर्तृत्वावर त्याचा पूर्ण भरवसा असल्याने त्याचा धीर कधी खचत नसे. त्यातूनच त्याच्या ठायी विलक्षण असा संयम आला असावा. 'दिल्लीवर चाल करून जावे आणि बादशहाच्या कारभारी मंडळातील अत्यंत खट व कावेबाज अशा अबदुल अहदखानला हाकलून द्यायला बादशहाला भाग पाडावे, असा त्याच्या हाताखालचे सहाय्यक अधिकारी त्याला वारंवार सल्ला देत. तो सल्ला नजफखान नेहमी धुडकावून लावी. त्याचे हे वागणे अगर आपल्या पराभूत शत्रूंना तो जी वागणूक देई ती, हे त्याच्या वरील गुणांचेच द्योतक होत. विजय मिळणार याची खात्री झाल्यानंतरही त्याने आपल्या शत्रूचा संपूर्ण बीमोड करण्याचा प्रयत्न कधीच केला नाही. उलट सढळ सवलती देऊन शत्रूशी मिळतेजुळते घेण्याकडे त्याचा कल असे. त्यामुळे मोहीम तर यशस्वी होईच, पण मागे धोकाही रहात नसे. शत्रू त्याच्याशी कृतज्ञ राहून त्याचे हितैषी बनत. अकबरासारख्या श्रेष्ठ बादशहानेही अनेक प्रसंगी याच धोरणाचा अवलंब केला होता. लढाईत शत्रूचा मुलुख हाती आल्यावर तेथील निरुपद्रवी शेतकरी, व्यापारी व लढाईत भाग न घेणारे इतरेजन यांना तो माणुसकीने वागवी. त्यांची मालमत्ता व कुटुंबीय यांचा तो संभाळ करी. त्याकाळी आशियाखंडातील लढायांमधून अशी वागणूक देणे हे अपवादात्मकच असे. त्याच्या अंगचा हा गुणसमुच्चय लक्षात घेतला म्हणजे त्याचा मृत्यू झाला, तेव्हा प्रत्येकजण कां हळहळला व सर्व थरातील आणि जातिजमातीतील लोकांना आपला जवळचा आप्त जावा, असे दुःख का झाले, हे समजून येते.

५. नजफखान व नजीबउद्दौला : एक तुलनात्मक विवेचन

दिल्लीदरबारातील सर्वोच्च अधिकारी व शाही सेनेवरील सर्वप्रमुख अधिकारी म्हणजे मीरबक्षी म्हणून नजफखान काम पहात होता. दिल्लीतील सर्व सूत्रे हलविणारा तो सर्वेसर्वा

होता. त्याच्या आधी त्याच जागेवर तितकेच अधिकार असलेला नजीबउद्दौला होता. तेव्हा स्वाभाविकच या दोघांच्या कार्यकर्तृत्वाचे तौलनिक मूल्यमापन करावेसे वाटते. आपल्या कर्तृत्वाच्या ऐन बहरात मुसलमानी साम्राज्याचा मुखत्यार म्हणून नजीबउद्दौलाने दहा वर्षे कारभार पाहिला. त्याची कामगिरी इतकी प्रभावी व अजोड होती की या मुदतीत त्याच्या कामाबाबत कुणा दरबारी प्रतिस्पर्ध्याने व हिंदुस्थानातील अन्य मुसलमानी सत्तेने ब्र काढला नाही. त्याचा हा प्रभाव पडला त्याचे कारण असे. तो एका रोहिला वंशाचा प्रमुख होता व अफगाण जमातीतील मान्यवर नेता म्हणून सर्वसाधारणपणे अखिल हिंदुस्थानात ज्ञात होता. तसेच १७६७ पर्यंत (अबदाली) दुराणीशहा अधूनमधून स्वतः हजर राहून त्याला पाठिंबा द्यायचा पण बहुतेकवेळा त्याला त्याच्या अजिंक्य हितकर्त्याच्या नावाचा व दबदब्याचा आधार मिळत असे. हा आधाराचा भाग सोडला तरीही असफ्जाह निजाम उल्मुक याच्या निधनानंतर त्या काळातला हिंदुस्थानातील श्रेष्ठ सेनाधिकारी म्हणून नजीब उद्दौलाचेच नाव घ्यायला हवे. अंतर्वेदी व रोहिलखंडाच्या वरील भागात त्याच्या मालकीचा जहागिरीचा बराच मुलुख होता. त्या जमिनी पुरेश्या सुपीक व त्यांची नासधूसही खूपच कमी झालेली. या जमिनीतून भरपूर व सतत उत्पन्न मिळे. त्याच्या जहागिरीची देखभाल करणारी त्याची माणसे जमिनीची मशागत व काळजी उत्कृष्ट घेत. साहजिकच नजीबउद्दौला मरण पावला तेव्हा त्याच्याइतका मातब्बर धनाढ्य मुसलमान सत्ताधारी उत्तर हिंदमध्ये दुसरा कोणीही नव्हता.

मात्र उच्च कुळात जन्म घेतल्याचे काही फायदे नजफखानला मिळाले, ते नजीबउद्दौलाला मिळू शकले नाहीत. या रोहिल्याने उमेदीच्या आयुष्याची सुरवात केली तीच एक गरीब व निराधार माणूस म्हणून; पायदळातील एक साधा शिपाई म्हणून त्याने आपल्या जीवनाला प्रारंभ केला. पण पुढे केवळ गुणवत्ता व आलेल्या संधीचा पुरेपूर उपयोग करून घेण्याची जिद्द या गुणांमुळे सामान्य स्थितीतून तो दिल्लीच्या साम्राज्याच्या कारभारातील उच्चस्थानापर्यंत जाऊन पोहोचला. तथापि नजफखान हा इराणी राजघराण्यातील रक्ताचा अभिमान सांगणारा आणि अयोध्येच्या नबाब घराण्याशी विवाहसंबंध असलेला असा एक मिर्झा होता. बादशहाच्या दरबारात उच्चपदावर चढताना या महत्त्वाच्या संबंधाचा प्रत्यक्षात त्याला काहीही उपयोग झाला नाही. या कामी त्याच्या जातभाईंनीही त्याला म्हणावा तसा पाठिंबा दिला नाही. शुजाउद्दौला हा जातीने इराणी, त्याचा नातेवाइक व ज्याच्यावर त्याने भावासारखा विश्वास ठेवावा असा; पण तोच त्याचा अंतर्गत वैयक्तिक शत्रू होता. नजफखान हा स्वतः सुनी पंथाचा, शाही दरबारात त्याला स्नेहीसोबती नव्हते शहाजादा अहमद दिल्लीत अधिकारावर असताना सफदरजंग हा वझीर होता. त्यावेळी त्याने १७५३ मध्ये अबदालीविरुद्ध उठाव केला. त्यात सफदरजंगला अपयश आले होते. त्याचा परिणाम असा झाला की, अमीरखान व महमदखान यांनी दिल्ली दरबारात शिया पंथीयांचा जो एक तट उभा केला होता, तो पूर्णपणे निकालात निघाला.

नजफचा प्रमुख वैरी अबदुल अहदखान. त्याशिवाय त्याचा द्वेष करणारे आणखी
ीजण दरबारात होतेच. हे नृपांगणगत खल, खाजगी बैठकीत नजफखानविरुद्ध बाद-
चे कान फुंकीत. बादशहा शहा अलम हा हलक्या कानाचा, चंचल व कोत्या मनो-
चा. वास्तविक नजफखानने स्वतःला बादशहाच्या सेवेला संपूर्ण वाहून घेतलेले,
शहाशी तो संपूर्ण एकनिष्ठ. पण बाहेरील शत्रूंशी दोन हात करीत असताना त्याला या
या दावेदारांनाही तोंड द्यावे लागे. या डोकेदुखीशिवाय पैशाची ओढाताण तर त्याच्या
वीलाच पुजलेली. स्वतःच्या प्रचंड सैन्याला वेतन द्यावयाचे म्हणजे पीक व महसूल
अशा जहागिऱ्या हव्यात. त्याच त्याच्याजवळ नव्हत्या. त्याचा परिणाम असा होई की,
ायांचे पगार अनेकदा थकत व त्यांच्या बंडाळ्यांमुळे एकदा सुरू केलेल्या व यशस्वी
शकणाऱ्या मोहिमा मधेच सोडाव्या लागत.

झबिताखानाची बादशहाविरुद्ध युद्धाला चिथावणी

दिल्लीच्या तख्तावर शहा अलम पुन्हा आरूढ झाला. आता आपण त्याच्या कार-
ीतील नजफखानच्या कर्तृत्वाचा आढावा घेऊ.

नजीबउद्दौला हा दि. ३१ ऑक्टोबर १७७० रोजी मरण पावला. ही वार्ता
ाअलमला अलाहाबाद येथे समजली. झबिताखान हा मृत मीरबक्षीचा ज्येष्ठ पुत्र.
शहाने त्याच्याकडे दुखवट्याचा संदेश पाठविला. नुसता संदेशच नव्हे तर आवश्यक
मानाचा पोषाख व अमीर-उल्-उमराव हा किताबही[१]. कारण मृत वझिराच्या जागेवर
शहाला झबिताखानाचीच मीरबक्षी म्हणून नेमणूक करावयाची होती. झबिताखानाने
ल्या सैन्यासह बादशहाच्या रक्षणार्थ यावे व त्याला दिल्लीस घेऊन जाण्यास साहाय्य
वे असा निरोपही बादशहाने त्याला पाठविला होता. दिल्लीत गेल्यावर बादशहाच्या
ात सत्ता आली म्हणजे साम्राज्यावर सर्व सत्ता असणार ती झबिताखानाची. याचा
जो बहुमान त्याच्या वडिलांनी दहा वर्षे संभाळला होता, तोच त्यालाही मिळणार
. झबिताखान आपल्या वडिलांच्या जागेवर जाणार, त्या दर्जाचा अधिकारी होणार,
ा तसा अधिकार मिळाल्याबद्दल द्यावयाची वारसाशुल्काची रक्कम त्याने बादशहाकडे
ावी, असा निरोप बादशहाने त्याला पाठविला. दिल्लीच्या परिसरात असलेल्या
ारी व बादशहाच्या खासगी खर्चासाठी तोडून दिलेल्या जमिनी तसेच अंतर्वेदीतील
या भागातील मुलुख यांची देखभाल गेली कित्येक वर्षे नजीबउद्दौला करीत होता.
ताखानने त्याचे हिशेब पूर्ण करावेत असे बादशहाने त्याला फर्मावले, ते चूक नव्हते.
ण या मुलुखातील खंडापोटी खुद्द दुसऱ्या शहाअलमच्या कारकीर्दीत नजीबउद्दौलाने
ो रुपये जमा केले होते. त्यातला फक्त चौथा वा त्यापेक्षाही कमी हिस्सा सरकारी
ोरीत जमा झाला होता. तशा तक्रारीही होत्या.

सुरवातीला तरी झबिताबद्दल बादशहाचे मन कलुषित झालेले नव्हते. बादशहा
ारीचे जिणे कंठित होता तेव्हा नजीबउद्दौलाच्या सैन्यानेच दिल्लीचे रक्षण केले होते,

बादशहाची आई व साम्राज्याचा भावी वारस यांचा संभाळ केला होता. नजीबउद्दौला अ
झबिताखान यांच्याविरुद्ध बादशहाने वागावे असे त्या दोघांनीही काही केले नव्हते. शि
हद्दपारी जीवनात बादशहाजवळ स्वत:चे सैन्य नव्हते, त्याची तशी ताकदही नव्ह
बादशहा तसा दुबळा आहे हे झबिता समजून होता. यामुळेच बादशहाचा निरोप घे
येणाऱ्या सरकारी जासुदांना त्याने काही काळ तसेच तिष्ठत ठेवले व नंतर संतापून क
अपशब्द बोलत, नकार देत त्याने त्यांना घालवून दिले. मीरबक्षीपदाची वस्त्रे स्वीकारण्
(२९ डिसेंबर, १७७०) मात्र त्याने अनमान केले नाही. अफगाण हे आधीच डोक
राख घालणारे, त्यात झबिताचा भर ज्वानीतला उद्दामपणा, विनासायास हाती आले
अफाट संपत्ती, याचा परिणाम म्हणजे झबिताखानचे वरीलप्रमाणे मस्तवाल वागणे...' अ
गुलामअली म्हणतो ते खरे वाटते.

त्यानंतर शाही राजकारणातील पात्रप्रसंग, फिरत्या रंगमंचावरील दृश्यांप्रमाणे भर
बदलत गेले. 'आम्ही आपल्याला साहाय्य करावयास तयार आहोत' असे महादजी शिंद
शहाअलमला गुप्तपणे कळविले होते. शहाअलमने त्याचे साहाय्य घ्यावयाचे ठरवले
हिंदुस्थानातील मराठा सरदारांशी त्या दृष्टीने वाटाघाटी सुरू केल्या. दिल्लीतील किल्ल्य
ताबा झबिताखानने नेमलेल्या किल्लेदाराकडे होता. मराठ्यांनी सदर किल्ला बादशहा
वतीने आपल्या ताब्यात घेतला. शहाअलमला दिल्ली येथे त्याच्या राजधानीत ने
सोडण्यासाठी सैन्याचे साहाय्य द्यायचे याबाबत औपचारिक करारनामाही झाला. त्यानु
बादशहा दिल्लीच्या रोखाने निघाला व फरुकाबाद येथे येऊन दाखल झाला. या ठिका
शहाअलमने अहमदखान बंगषच्या वारसाकडून खंडणी वसूल केली. शहाअलमला मिळाले
हा पहिलाच विजय त्याच्या सोबत असलेल्या शिंद्याच्या सशस्त्र सैन्यामुळेच मिळू शक
या यशानंतर बादशहाने झबिताखानावरही हल्ला करावा, त्याच्याकडून खंडणी वसूल कर
व त्याला आपल्या पायापाशी नमवावे, अशी मसलत शाही कारभारी मंडळींनी त्य
सांगितली. बादशहाने तसे केले नाही. एक तर दोन हात करायला तो घाबरला अस
वा झबिताखानाला डिवचण्यास त्याची तयारी नसावी. कारण तसे केल्यास झबितासार
धनाढ्य रोहिला मराठ्यांशी हात मिळवणी करता व बादशहाला जवळचा असा एक
माणूस उरला नसता.

म्हणून दिल्लीला जेव्हा राज्यारोहण समारंभ होईल तेव्हा झबिताखानाने सिंहासन
समोर येऊन कुर्निसात करावा व त्या भव्य समारंभास साजेसे नजराणे आणावेत अ
झबिताला सभ्यपणे निमंत्रित करण्यात आले. सर्व सरदार व मांडलिक राजे यांनी बाद
हाच्या इच्छेनुसार योग्य असे वर्तन केले. झबिताखानने आपला दुराग्रह चालुच ठेवल
काहीही पैसे देण्याचे नाकारले तेव्हा मात्र बादशहाने झबितखानला अद्दल घडवाय
ठरविले. बादशहाच्या सैन्याच्या पगाराची रक्कम खूप थकली होती. आपली पैशाची अडच
दूर व्हावी म्हणून 'आम्हाला रोहिल्यांच्या मुलुखात लूटमार करायला परवानगी द्या' अ
सैनिकांची सतत मागणी होती. त्यांच्या अडचणीचा परिहार करणारा तेवढाच एक म

ा. एकही दिवस फुकट दवडता येत नव्हता. जानेवारी महिना सुरू झाल्याने थोड्याच त्यांनी नद्यांना महापूर येणार होता; व शाहीसैन्याला नदीपलीकडे जाणे कठिण होणार दिसत होते.

मराठ्यांचा रोहिल्यांवर हल्ला : रोहिलासैन्याची हरद्वारपलीकडे पीछेहाट

या मोहिमेला तत्काळ तोंड लागले. शाहीसैन्याचे नेतृत्व मिर्झा नजफखान याच्याकडे . सोबतीला तुकोजी होळकर, महादजी शिंदे व विसाजी कृष्ण यांच्या आधिपत्याखालील ठा सैन्य होते. या दोन्ही सैन्यांनी अंतर्वेदीत प्रवेश केला. शहाअलम दिल्लीत येऊन चे अकरा दिवस झाले होते, तरीसुद्धा दिल्ली सोडून त्याला वरील सेनेमागोमाग निघावे ले. बादशहाच्या मुक्कामाचे तंबू डेरे, मुख्य सैन्याच्या छावणीमागे दहा मैल अंतरावर त. लोणी, बागपत व गौसगड मार्गे तो चांदपूर येथे येऊन दाखल झाला. चांदपूर[४] हे नदीच्या पश्चिम तीरावर रुरकीगावाच्या बरोबर पूर्वेस पंधरा मैलांवर आहे.

बचावाचा पवित्रा घेणारा शत्रूही बेसावध नव्हता. स्वतःच्या योजना त्याने र्वाहीत आणल्या होत्या. आपला पैसाअडका, कुटुंबकबिला, अन्य रोहिला सरदारांची बीय मंडळी यांना झबिताखानाने सुरक्षिततेच्या दृष्टीने पथ्थरगड (नजीबाबादचा दगडी ला) येथील किल्ल्यात ठेवले होते. मदतीसाठी किल्ल्यावर थोडीफार शिबंदीही होती. ंतर आपल्या चार हजार सैनिकांसह त्याने शुक्रताल येथे तळ दिला. शुक्रतालच्या ड्यापासून आपली सेना, त्याने गंगानदीच्या पूर्व तीरावर उत्तरेकडे हरद्वारपर्यंत अडतीस अशी विखरून ठेवली. १७५९ मध्ये आपल्या वडिलांनी जो डाव टाकून दत्ताजी वर धवधवीत विजय मिळवला, तीच खेळी खेळून विजयश्री आपल्या बाजूला खेचून ायची, त्याचवेळी गंगानदीच्या वरील बाजूस असलेल्या उथळ पात्रातून नजिबाबाद ड्यात शत्रूचा शिरकाव न होईल अशी काळजी घ्यायची, असा त्याचा दुहेरी डाव होता. आधीच्या सालातील नोव्हेंबर महिन्यात गोविंदपंत बुंदेले याने अशीच चढाई केली ी, त्याची पुनरावृत्ती होणार नाही, अशीही झबिता आशा बाळगून होता. पण झबिता जे नजिबखान नव्हे. शुक्रतालला धक्का न लावता ते तसेच ठेवायचे व गंगानदीच्या ल भागातील उथळ मार्गातून सैन्यबल एकत्रित करायचे हे दत्ताजी त्यावेळी विसरला ा. तशी चूक यावेळी करून चालणार नव्हती. शिवाय निसर्गपरिस्थितीही मराठ्यांना कूल होती. पाण्याला थंडीच्या मोसमात असणारा उतार होता व गंगामाईचे पाणी तीतजास्त उतरले होते.

गंगातीरी पूर्व बाजूस अडतीस मैलांच्या टापूत जिथे जिथे पाण्याला उतार असल्याचे हीत होते, त्या त्या प्रत्येक उताराच्या आसपास खंदक खणून रोहिला सैनिक लढाईच्या त्र्यात उभे होते. पश्चिम तीरावर बरोबर त्यांच्याचसमोर मराठा सैनिकही खंदक खणून ारीत होते. या वेळी मराठ्यांनी गनिमी काव्याचा वापर केला व रोहिले अकलेचे खंदक हेत, हे पुन्हा एकदा दाखवून दिले. उत्तरेकडे अगदी टोकाला हरद्वारनजिक चंदीघाट-

जवळ नदीपार व्हायचे व शत्रूला हिसका दाखवायचा, हे त्यांनी ठरवून टाकले होते. प्र क्षात मात्र त्यांनी आवई पसरवून दिली ती अशी, की आपण यापेक्षाही खाली खूप अंतरावर नदी उतरून पलीकडे जाणार. शत्रूला तसे वाटावे म्हणून त्यांनी आपले व सैनिक व लष्करी साहित्य चंदीघाटपासून खूप दूर अंतरावर पाठवून दिले व या महत्त्वा जागेकडे आपले लक्षच नाही असे भासवीत आळस व ऐषारामात वेळ दवडीत असल नाटक केले. परिणामतः रोहिल्यांचा चंदीघाटाजवळचा बंदोबस्त एकदम ढिला झाला. अ प्रकारे खरोखरी ज्या ठिकाणी नदीपार होऊन पलिकडे जायचे होते त्या ठिकाणावरील श लक्ष उडविण्यात यश मिळविल्यावर मराठा सैनिकांनी आपले घोडे नदीच्या उतारात घुस व पलीकडे चंदीघाटावर जाण्यासाठी ते नदीपार होऊ लागले.

दि. २३ फेब्रुवारी रोजी सूर्योदयापूर्वी तीन तास मराठा सैनिकांनी चंदीघाट ये नदीच्या उतारात आपले घोडे प्रत्यक्षात उतरविले व शत्रूच्या नजरेस न पडता प्रवाह वाट काढीत ते मधल्याच रेताड वाळवंटावर जाऊन पोहोचले. त्यानंतर तिथून पुढे क पोहोचल्यावर हातांत समशेरी घेऊन त्यांनी खंदकात असणाऱ्या रोहिल्यांवर तुफानी चढवला. हा कावा परिपूर्ण होता. तथापि शत्रू सावध होऊन हातात शस्त्र घेऊन पुढे स वला. त्यांनी बंदुका चालवल्या, दारूचे बाण फेकले व पुढे होत हल्लेखोरांना नदीच्या प माघार घ्यायला लावली. दरम्यानच्या काळात गंगेच्या पात्रात मधेच बेटासारखी जी जागा होती, त्या ठिकाणी नजफखान आपल्या उष्ट्रखान्यासह जाऊन धडकला. असलेल्या अफघाण सैन्यावर त्याने तोफगोळ्यांचा भडिमार केला. त्या भयंकर गोळीब लढाईचे भवितव्य निश्चित झाले. रोहिला सैन्याच्या आघाडीला त्यांचा करमखान र दुसरे चार का पाच सरदार होते. या गोळीबाराला प्रथम ते बळी पडले. त्यानंतर र सैन्य मागे पडले. या वेळेपर्यंत शाही व मराठा सैन्याचे मिळून दहा हजार सैनिक न झाले होते. सादतखान आफ्रिदी हा आपल्या दोनपाचशे शिपायांसह त्यांना तोंड देत सादतच्या मांडीखालचा घोडा निसटला, त्याच्या दोन्ही मांड्यांत गोळ्या घुसल्या त्याने घोडा बदलला. बऱ्याचशा जखमा झाल्यावरही शक्य होते तोपर्यंत तो लढत त्याच्या बरोबरचे सैनिक पळून गेले. त्याचा भाऊ सादिकखान हा सुद्धा जबर जखमी होता; तरी नजफखानवर तो बेभानपणे तुटून पडला. या जखमी वाघाला घाबरून सव त्याला वाट मोकळी करून दिली. झालेल्या घावांनी तो हैराण झाला होता, रक्त सांडत आणि रुधिराने न्हाऊन निघालेला सादिक, ऑं ऑं अशी रणगर्जना करीत लढतच लढता लढता तो नजफखानच्या हत्तीजवळ पोहोचला. त्याच्या वीरगर्जनांनी व आव्ह दचकलेला नजफ, त्याच्याकडे विस्मयचकित होऊन बघू लागला, तेव्हा आपल्या भ ढोशीत सादिक त्याला म्हणाला, 'चल ! तयार आहे मी तुझ्याशी लढायला . दरम्यान नजफखानाच्या हौद्यात त्याच्या पाठीमागे जो माणूस बसला होता, त्याने झाडली आणि शूर सादिक खाली कोसळला. त्याच्याबरोबरच रोहिल्यांच्या बच अखेरचा आधार संपला, अफघाण सेना भंगली व जीव घेऊन पळत सुटली.

युद्धात बरेचसे रोहिला सेनाप्रमुख ठार झाले. त्यांची मुंडकी कापून ती बादशहाकडे देण्यात आली. अली मुहमदखान हा झबिताखानच्या सैन्यातील अधिकारी एकाक्ष जीव वाचविण्यासाठी नदीकाठी झाडाआड दडत असताना त्याला पकडण्यात आले. माणे बादशहा आपल्या प्रत्यक्ष लढणाऱ्या सैन्यापासून दहा मैल मागे तळ टाकून ल्याच्या कारकीर्दीतील पहिलीच विजयवार्ता त्याला दुपारी मिळाली. या विजयाचे य नजफ्खानला देण्यात आले. दिल्लीच्या शाही राजवटीत शहाअलमच्या कारकीर्दीत ान पुढे सर्वोच्च पदी विराजमान झाला, त्याची ही नांदी होय. "त्याच्यावर ाच्या कृपादृष्टीची सर्वार्थाने खैरात झाली. दोन्ही हातांनी आपली दाढी नजफखाना- ीत व ती कुरवाळीत शहेनशहा उद्गारले, " नजफ्, माझी इज्जत तू राखलीस."

बिताखानचे पलायन : शुक्रतालचा पाडाव

ा लढाईत मिळालेला विजय निर्णायक होता. अफघाणांचा विरोध एकाच दणक्यात ्न पडला. झबिताखानच्या सैन्यात गोंधळ, भीती व नैराश्य पसरले. नदीच्या र धरून ठेवलेली प्रत्येक जागा सोडून त्याचे सैनिक पळून गेले. पळून जाण्याची गण शुक्रतालपर्यंत पसरली. गंगेच्या पूर्व तीरावर मराठा सैन्याने संपूर्ण कबजा आहे व तेथून रोहिल्यांच्या रहाण्याच्या ठिकाणाकडे जाण्यास त्यांना कोणतीही ठी नाही, ही बातमी झबिताखानला त्याच दिवशी समजली. झबिताखान लगेच ानाकडे गेला. फैजुल्लाखान हा झबिताखानाचा मेहुणा. शुक्रतालच्या किल्ल्यासमोर चार हजार शिपायांसह तो तळ टाकून बसला होता. या खानाने लढाई कशी असते हे घितलेच नव्हते. तो घाबरला आणि शुक्रतालच्या बचावासाठी त्याने सैनिकीसाहाय्य नकार दिला. इतकेच नव्हे तर त्याच रात्री तो रामपूरला निघून गेला; तिथे रात्रभर केल्यावर आपला कुटुंबकबिला व धनदौलत यासह त्याने तराई जंगल गाठले. ळून जाण्यापूर्वी आपल्या राजधानीच्या गावाला काडी लावायला तो विसरला नाही.

सर्व सगेसोयरे दूर झाले. सैनिकही पळून गेले. झबिताखानाची अवस्था अत्यंत झाली. त्या रात्री त्याने शुक्रताल सोडले. एका हत्तीवर बसून निवडक चाळीस अनुयायांसह आपल्या आप्तमित्रांना भेटण्यासाठी तो उत्तर टेकड्यांकडे निघून गेला. येथे राहिलेल्या रोहिल्यांना कुणी नेताच नव्हता. त्यांच्यात खूप गोंधळ माजला. कर भीतीने पळत सुटले, बाजारपेठा ओस पडल्या, तंबूंना आगी लागल्या. नजीबा- जाणारा गंगेच्या पूर्वतीरावरील रस्ता आश्रयार्थी अफघाण सरदारांनी ओसंडून वाहू पळून जात असताना हे अफघाणसैनिक मोगल स्नेह्यांना शिव्याशाप देत होते. ामुळेच हा पराभव पत्करावा लागला होता.] झबिताचा चुलता अफझलखान हा ूच्या हातात सापडला.

मराठ्यांचे हजारो चपळ घोडेस्वार रोहिलखंडातील सुपीक प्रदेशात निर्भयपणे स्वैर- करू लागले. हफीज रहमत व दुंदीखानचे पुत्र आणि अन्य प्रमुख सरदार आपले

सैन्य व बायकामुले यांसह आश्रयासाठी म्हणून तराई जंगलात गेले. आपल्या वास्तू व अ
मालमत्ता केवळ दैवावर हवाला ठेवून त्यांनी वाऱ्यावर सोडून दिली. मराठ्यांनी १७५
मध्ये सफदरजंगविरुद्ध छोट्या गाझीउद्दीनला साहाय्य केले होते. त्या वेळचा मराठ्यां
पराक्रम चांगला आठवणीत होता; तसेच रोहिल्यांचे त्या वेळचे बहुतेक प्रमुख नेते म
पावले होते, हयात होते दोघेजण. पैकी सरदारखान हा मृत्युपंथाला लागलेला व हफीज
प्रकृतीने ढासळलेला, वयातीत व मुलांच्या आणि भावांच्या घरगुती कटकटीने वैतागलेला

या विजयानंतर खुद्द बादशहाच शुक्रतालकडे जायला निघाला. दक्षिणबाजूस गं
नदीच्या काठाकाठाने प्रवास करीत दि. १ मार्च रोजी तो शुक्रताल येथे दाखल झाला. शु
तालच्या किल्ल्यात लोभ धरावा असे काहीही उरले नव्हते. झबिता व त्याचे सैन्य तिथ
निघून गेल्यावर शुक्रतालच्या परिसरात रहाणारे गुजर व मेवाती यांनी त्या बिनध
किल्ल्यातील मालमत्तेची, मराठ्यांनी कधी केली नसेल अशी लूटमार केली. विजयी से
तेथे येऊन पोचल्यावर तिला पहायला मिळाली ती उध्वस्त झालेली व धुमसणारी घरे. ह
त्रिता येणेच कठिण अशा काही तोफा मात्र तिथे राहिल्या होत्या. तेवढ्याच काय
मराठ्यांच्या हाती पडल्या.[६]

९. पथ्थरगडचा वेढा

पराजय झाल्यानंतर गंगेच्या तीरावरून रोहिले पळत सुटले. त्या वेळी झपाट्य
त्यांचा पाठलाग करीत मराठा सेनेने पथ्थरगडला वेढा घातला. नजीबउद्दौला याने बांधले
हा किल्ला त्याची राजधानी नजीबाबाद या शहराच्या पूर्वेस एक मैल अंतरावर अ
नजफखानच्या सैन्यानेही या वेढ्यात भाग घेतला. नजिबाबादच्या पश्चिमेस साधारण
चार मैल अंतरावर सहनपूर आणि जलालाबाद या दरम्यान बादशहा तळ देऊन हो
तिथून तोही लवकरच वरील ठिकाणी आला. पथ्थरगडचा किल्ला चांगलाच दणकट. त
तोफा आणि दारुगोळा यांचा साठाही भरपूर; पण दाणागोटा पुरवठा मात्र पुरेसा नव्हता
अफघाण सरदार तराई जंगलात दडून बसले होते, त्यांची बायकामुले या किल्ल्यातच हो
मराठे व गडावरील अफघाण यांच्यांत पंधरा दिवस गोळागोळी झाली. अखेरीस वृद्ध किल्ले
सुलतानखान शरण येण्यास तयार झाला. किल्ल्यातील स्त्रिया व मुले यांच्या जीवित
धोका पोहोचू नये, अब्रूला धक्का लागू नये, एवढीच त्या वृद्ध किल्लेदाराची मागणी हो

मराठा सरदारांनी ही मागणी तत्काळ मान्य केली. दि. १६ मार्च रोजी रोहिल्य
किल्ला खाली केला. "मराठे किल्ल्याच्या प्रवेशद्वाराशी उभे राहिले. प्रथम किल्ल्याबाहेर प
ते अगदी कंगाल अवस्थेतले लोक; त्यांची संपूर्ण झडती घेण्यात येऊन जवळजवळ दि
अवस्थेत त्यांना हाकलून देण्यात आले. गडावरील रहिवाशांपैकी जे पैसेवाले होते त्य
आपल्याजवळील सोने, मोती व हिरेमाणकांनी भरलेले करंडक व संदूका शत्रूच्या हाती
नयेत म्हणून किल्ल्याच्या तटबंदीवरून किल्ल्याभोवतालच्या जलमय खंदकात फेकून दि
होत्या. अफघाण सरदारांच्या अनेक कुटुंबीय स्त्रियांना मराठ्यांनी हातही ला

नाही. किल्ल्यातून बाहेर पडल्यावर छावणीनजिक गोरगरिबांना निवारा घेण्यासाठी ज्या सोयी होत्या, त्या ठिकाणी त्यांनी आश्रय घेण्याचा प्रयत्न केला. पण ... दुर्दैव असे की मराठा सैनिकांनी त्यांच्याबाबतीत जे वंदनीय दाक्षिण्य दाखविले त्याला लष्करातील उचले, बाजारबुणगे व तुराणी मुसलमान यांनी डांबर फासले. त्यांनी या बायांच्या अंगावरील नेसती वस्त्रेही हिसकावून घेतली व त्यांना ओढीत ओढीत ते आपल्या तंबूत घेऊन गेले." या दुर्दैवी स्त्रियांना पुढे नजफखानानेच सोडविले व काही दिवसांनंतर आपल्या सैन्याच्या खास संरक्षणाखाली जलालाबाद लुहारी या गावी पाठवून दिले. जलालाबाद लुहारी मुझफरनगर जिल्ह्यात असून अजूनही ती एक सुरक्षित अशी अफघाण वस्ती होती.[९]

१०. पथ्थरगडलुटीतील मालमत्ता : मराठे व बादशहा यांच्यातील तंटा

पथ्थरगडावर पुरून ठेवलेली मालमत्ता खणून काढायची व तिथे असलेली अन्य मिळकत ताब्यात घ्यायची यासाठी मराठे किल्ल्यावर वीस दिवस वास्तव्य करून होते. गडावरील धनिकांनी आपल्याजवळचे सोनेनाणे खाली खंदकात फेकून दिले, ही बातमी मराठ्यांना त्यांच्या हेरांकडून समजली. खंदक खूप खोल असल्याने त्यातील पाणी वाहून जावे म्हणून मराठ्यांनी खंदकातून पाट काढला व तो शेजारी असलेल्या एका प्रवाहात सोडून दिला. नंतर खंदकात सापडलेली हिरे, मोती, माणके, सोनेनाणे यासारखी संपत्ती जमा केली. अशाप्रकारे पथ्थरगड विजयानंतर जी लूट मिळाली, तिची विभागणी कशी करायची, या मुद्यावर बादशहा व मराठे यांच्यात वाद निर्माण झाला. 'मोहिमेच्या सुरुवातीला केलेल्या कराराचा मराठ्यांनी भंग केला' असा बादशहाने त्यांच्यावर आरोप केला. बादशहाकडे मराठ्यांचे काही हितशत्रू होते. 'विश्वासपात्र नसलेल्या मराठ्यांनी झबिताखानाचा सर्व तोफखाना व संपत्ती गिळंकृत केली. तसेच त्याचे हत्ती, घोडे व अन्य मालमत्ताही स्वतःच घेतली. त्यातला नाममात्र वाटा बादशहाला दिला,' असे मराठ्यांच्या हितशत्रूंनी बादशहाचे कान फुंकले. आर्थिक ओढाताणीत असलेल्या बादशहाचा त्यावर विश्वास बसला. त्याची सहनशक्ती संपली. नंतर या बाबतीत दि. ३ मे रोजी तो व मराठे यांच्यात बोलणी चालू झाली. तेव्हा दोन्ही बाजूंच्या मध्यस्थांत एवढी हमरीतुमरी झाली की, मराठ्यांतर्फे बोलायला आलेला मध्यस्थ, संतापून निघून गेला. दुसऱ्या दिवशी पुन्हा बोलणी करण्यासाठी बादशहाने राजा रामनाथला मराठ्यांकडे पाठविले. अखेरीस दि. ११ रोजी उभयतात तडजोड झाली ती शिंदे याच्या मध्यस्थीने. 'पथ्थरगडची वस्ताभाव निघाली ती निमे पातशहास दिली. बाकी राहिली ती सरकारात निम व निमे सरदाराकडे दिली'. पण हत्ती, रोकड पैसा व जवाहीर यांची विभागणी करण्यात आली नाही. 'पातशा रुपये मागता (त) त्यासही दो लाख रुपये द्यावेसारीखे करार जाहला आहे'. पण जी लूट मिळाली होती त्यातला हा फारच थोडा भाग होता. मराठ्यांचा एक अखबरनवीस नगीना येथून पाठविलेल्या दि. ९ मे च्या पत्रात लिहितो, 'पेशवे अगर बादशहा यांच्याकडे जमा न केलेले असे, लुटीतील लाखो रुपये मराठा सरदारांनी परस्पर गिळंकृत केले.

पेशवे हिशेबाची नोंद व्यवस्थित ठेवीत. ही हिशेबपुस्तके अद्यापही नीट जतन केलेली आहेत. त्यावरून मराठ्यांना पथ्थरगड मोहिमेत किती मालमत्ता मिळाली याची तप शीलवार व बिनचूक माहिती आपल्याला मिळू शकते. या लुटीत मिळालेली नाणी आणि सोनेचांदी हीच दहालाख रुपये किमतीची होती. २२९८ घोडे मिळाले. त्यातले १०४३ पातशहास देण्यात आले. शस्त्रे व दारूगोळा यांत तीन थोर तोफा (प्रत्येकीवर नाव असलेली,) शिवाय २ जेजाला, ७ जंबुरे, १८४२ तोफगोळे, १०० दारूचे बाण व ५३० मण दारूची भुकटी होती. [**एसपीडी** : खंड २९ पृष्ठ ३३७–३४०, ३४३]

झबिताखानच्या ताब्यातील जहागिरीच्या मुलुखाचे काय करायचे ह्यावरही वाद होता. पानिपत, सहराणपूर व मीरत येथील सर्व सरकारी मालकीचा मुलुख झबिताखानच्या जहागिरीत होता. पानिपतच्या मोहिमेपूर्वी या मुलुखातील वसुलीचा हक्क पूर्वीच्या पातशहाकडून मराठ्यांना मिळालेला होता. [प्रकरण १३ पोटप्रकरण ८ पहा.] (परंतु बादशहाने सहराणपूर माजी वझीर कमरुद्दीन याचा मुलगा फकरुद्दीनखान याला दिलेले आणि अनूपशहर व कर्नाळ हे शिंदे यांच्या हवाली केलेले.) 'आपण शुजाउद्दौलाला दरबारात हजर करतो व त्याला आपल्याला साहाय्य करावयास भाग पाडतो', असे महादजीने बादशहाला आश्वासन दिले होते, त्याचा हा मोबदला होता. या ठिकाणी हेही सांगावेसे वाटते की, स्वतः येऊन वझीर म्हणून शुजाउद्दौल्याने काम पहावे याबाबतची बोलणी फिसकटली होती. तत्पूर्वी स्नेहाचा प्रकार म्हणून त्याने व महादजीने आपल्या पगड्या एकमेकांकडे पाठविल्या व पाटीलबावा व सुजादवळे पगडीभाई जाहले. पण ही अदलाबदल दोघांच्याही गैरहजेरीत झालेली. फैजाबादहून शिंद्यांच्या छावणीत येऊन दाखल झाले ते फक्त शुजाचे पागोटेच. स्वतः शुजा आलाच नव्हता. अयोध्येच्या नबाबाचा वकील अनुपगीर गोसावी एलिचखान यांच्या समवेत महादजीने फैजाबादला जावे, त्याच्या सुरक्षिततेची हमी द्यावी त्यानंतर त्याला बादशहाच्या शामियान्यात हजर करावे, असे प्रथम ठरले होते. त्यानुसार महादजी दि. ११ ला निघाला. चार मजला मारल्यावर वाटेत विसाजी कृष्ण व त्याच कडाक्याचा वाद झाला. शेवटी वैतागून महादजीने ते कामच सोडून दिले. अयोध्येचे दोन्ह वकील निराश होऊन परत गेले.[८]

११. शांततेसाठी रोहिल्यांची याचना : अटी

युद्धातून पळून गेलेला झबिताखान नानकमातेच्या जंगलात गेला. तिथे छपू राहिलेल्या हफीज रहमत व अन्य रोहिले सरदारांची त्याने भेट घेतली. आपली वडिलार्जि मालमत्ता परत मिळविण्याच्या कामी झबिताखानाने त्यांच्याकडे मदतीची याचना केली कुणीही त्याकडे लक्ष दिले नाही. बादशहाचा मराठ्यांवर वरदहस्त व या युद्धात त जातीने हजर, त्यामुळे मराठ्यांसमोर विरोधात उभे रहायला प्रत्येकजण घाबरत होता. अखे रीस वैतागून झबिता शुजाच्या आश्रयाला गेला. शुजा त्यावेळी कॅप्टन गॅब्रिएलसमवे शहाबादला चालला होता. शुजाला नजीबउद्दौलाबाबत फार आदर होता. त्यासाठीच त्यां

झबिताचे भावासारखे स्वागत केले (१२ मे). त्यानंतर थोड्याच अवधीत हफीज रहमतही गोपामाऊला आला व शुजाला भेटला ; मग समेटाबाबत बोलणी सुरू झाली. रोहिले आणि मराठे यांच्यांत मध्यस्थ म्हणून शुजा काम पहात होता. हफीज व ढुंदीखान युद्धखर्चापोटी चाळीस लाख रुपये देण्यास तयार असतील तर समेट करावयास विसाजी तयार होता. रोहिले सर्वस्वी निराधार होते. झबिताकडील सर्व प्रमुख सरदारमंडळी व त्यांचे कुटुंबीयही बादशहाच्या ताब्यात, मराठ्यांचा कुणी शत्रूच जाग्यावर नसल्याने ते सर्व रोहिलखंडात धुमाकूळ घालीत होते. तराई जंगलातल्या निर्वासित अफघाण लोकात एकाएकी साथीचे आजार सुरू झाले व त्यांची संख्या घटू लागली. ' रोहिले हानिमध्येच आहेत. रोज दररोज सेदीडसे मरतात. याजमुळे कोणी त्याजवळ चाकर नोकर होते तेहि पलोन फरकाबाद वगैरे जागाजागा आले. कोणी आहेत त्यास दुखणी लागली आहेत येसे वर्तमान आहे. " वरील चाळीसलाखांचे खंडणीबाबत अयोध्येचा नबाब जामीन राहिला. त्यानंतर मराठ्यांनी रोहिलखंडातून आपले सैन्य काढून घेतले. रोहिले सरदार, तराई जंगलातून बाहेर आले. गावाकडे जाऊन प्रत्येकाने आपापला जमीनजुमला ताब्यात घेतला. झबिताखानाशी स्वतंत्र समेट करण्यात आला. त्यानुसार नजीबाबाद व सहराणपूर येथील त्याची जायदाद त्याला परत करण्यात आली व त्याच्या बायकामुलांचीही बंदिवासातून सुटका करण्यात आली. [**सीपीसी** खंड ४ क्रमांक : ६०]

या समेटातील शर्तींना महादजीचा विरोध होता. या बाबत तो व विसाजी यांच्यातील तेढ एवढी विकोपाला गेली की, त्याने आपल्या वरिष्ठाची भेट घ्यायचेच सोडून दिले. मराठ्यांची ही उत्तर मोहीम गोंधळात संपली. त्यांना खंडणीची रक्कम वसूल करता आली नाही. पेशव्यांचा अखबरनवीस २९ मे रोजी मोरदाबादहून लिहितो, " जागजागा मनसबे होऊ लागले. याजकरिता मनसबा बिगडतो यैसा दिसतो. सरदार येक विचारे नाहीत. येथील आवस्ता घरोघरच्या मनस्वी आहेत. यास ईश्वर परिणाम लावील किंवा धण्याचे पुण्य समर्थ आहे; नाहीतरी सर्व बरेच आहे. सर्वास आहंता फार जाली आहे. पैशाचे ठिकाण नाही. (दुसऱ्या एका पत्रात तो लिहितो) लोक देशास जावयाकरिता घाबरे फार आहे."

बादशहाची इच्छा दिल्लीस परत जावे अशी आहे, हे कळताच विसाजी आणि तुकोजी यांनी त्याच्यावर असा दबाव आणला की, त्याने दिल्लीस न जाता अलाहाबादेस जावे. बंगाल आणि बिहार प्रांत इंग्रजांच्या ताब्यात आहेत. त्यांच्याकडून जुनी येणे असलेली खंडणी वसूल करावी व शुजालाही खंडणीची रक्कम बादशहालाच देण्यास भाग पाडावे. पण आपले लष्करी सामर्थ्य अपुरे आहे हे बादशहा जाणून होता. स्नेही म्हणविणाऱ्या मराठ्यांबद्दलही त्याला विश्वास वाटत नव्हता. या बाबतीत नजफखान हा त्याचा मुख्य सल्लागार. इंग्रजांकडून त्याला नियमित तनखा मिळे. शिवाय १७६३–६५ मध्ये ब्रिटिश सैन्याच्या कर्तृत्वाचा त्याला प्रत्यक्ष अनुभव होता. महादजी शिंदे यानेही नजफचेच म्हणणे उचलून धरले. तेव्हा शेवटी दिल्लीला परत फिरायचे हाच निर्णय बादशहाने नक्की केला. एक दिवस विसाजी व तुकोजी हे दोघेही बादशहाचा नायबवझीर हिसामुद्दिन

याच्याकडे गेले व पूर्वेकडील प्रांतावर चालून जावे म्हणून त्या दोघांनीही त्याच्यावर जवळ जवळ जबरदस्ती करायला सुरुवात केली. हा वाद इतका चिघळला की, दोन्ही बाजूची माणसे हातात शस्त्रे घेऊन लढण्यासाठी तयार झाली. शेवटी बादशहा स्वतः मधे पडला व हा झगडा मिटला. सावधगिरीचा उपाय म्हणून जरूर पडलीच तर स्वतःच्या रक्षणासाठी त्याने नजफखानाची फौज तयार ठेविली होती. त्यानंतर मराठ्यांचा राग थंड झाला व त्यांनी परत जाण्याचे मान्य केले.[१]

१२. शाही फौजांनी रोहिलखंडात केलेली लूटमार, दिल्लीस पुनरागमन

रोहिलखंडात असलेल्या शाही फौजांनी मे महिन्याच्या अखेरीस आपल्या परतीच्या प्रवासास सुरुवात केली. बादशहा नजीबाबादहून निघाला व शिरस्त्याप्रमाणे दोन मुक्काम मागे तळ देऊन राहिला. निहतौर, शेरकोट, सिहोरे, सलीमपूर या मार्गे तो गंगातीरी आला. पूथ येथे नदीपार झाल्यावर ठरल्याप्रमाणे बकसार, हापूर व लखन मार्गे मीरत जिल्ह्यामधून सरळ पश्चिमेकडून मजल दरमजल करीत दिल्लीस पोचला. दि. ९ जुलै रोजी त्याने दिल्लीत प्रवेश केला. औनला, बरेली व रामपूर ही रोहिलखंडातील रोहिल्यांची ठाणी; त्या त्या ठिकाणाहून पळून जाताना खुद्द रोहिल्यांनीच त्यांना आगी लावल्या; त्यातून जे उरले ते मराठ्यांनी लुटून फस्त केले. फक्त अमरोहा हे एकच ठिकाण बचावले, तेही तेथील सय्यदांच्या शहाणपणाने. त्यांनी ६०,००० रुपये खंडणी मान्य केली व ती नजफखान-मार्फत देण्याचे आश्वासन दिले. मिर्झा नजफखानचा तेथील अधिकारी नजफ कूलीखान म्हणजे कसाबच. त्याने अनन्वित छळ करून खंडणीची रक्कम वसूल केली व ती पेशव्यां-कडे पाठवून दिली. मराठे पुन्हा अंतर्वेदीत परत फिरले तेव्हा वाटेत त्यांनी जाटांच्या खुर्जा ह्या ठाण्याला वेढा घातला. खंदक खणून लढाई सुरू केली. शेवटी दोन महिन्यांनी दि. ३० जुलै रोजी मराठ्यांनी ते ठाणे सर केले. पुन्हा गादीवर आलेल्या शहा अलमच्या राज्या-रोहण समारोहास दि. २९ जुलैला सुरवात झाली. सदर समारंभ महिनाभर गाजत होता. त्यानंतरचे तीन महिने काही न करता बसून काढणेच भाग होते. पावसाळा सुरू झाला होता.

१३. विसाजी कृष्ण आणि तुकोजी होळकर यांचा बादशहाशी तंटा : दिल्ली-सैन्याचा जाटांवर हल्ला : रेने मादेक बादशहाला मिळतो

हिवाळा सुरू झाला. ह्या हिवाळ्यासोबतच बादशहा व दिल्ली शहर यांच्यावर एक वादळी आपत्ती आली. पथ्थरगड मोहीम संपली होती; पण त्यानंतर बादशहा व मराठे यांच्यांत बेबनाव निर्माण झाला होता. रोहिल्यांकडील बडीबडी धेंडे पराभूत झाली असली तरी या विजयाच्या फलिताने बादशहा व मराठे, दोघांचाही अपेक्षाभंग झाला. लढाईतील लूट हाती पडूनसुद्धा कुणाचाच आर्थिक पेच सुटला नव्हता. दुसऱ्याच्या ताब्यात असलेला आपला मुलुख परत मिळवायचा तर जरूर ते लष्करी साहाय्य मराठे देणार नाहीत व नजीबउद्दौलाकडून मिळत होती त्यापेक्षा खंडणीची अधिक रक्कम मराठे आपल्या हातावर

वणार नाहीत, हे बादशहा पुरतेपणी समजून होता. उलट मराठेच बादशहाकडे अशी ोरदार मागणी करीत होते की, दि. २२ मार्च, १७७१ या दिवशी त्याने मराठ्यांशी जो रार केला होता, त्यातील शर्तीनुसार योग्य ती भरपाई त्यानेच करावी. बादशहाला दिल्लीस ऊन त्यांनी त्या कराराची पूर्ती केली होती. त्या समझोत्याचे प्रसंगी मराठ्यांना आश्वासन ल्याप्रमाणे द्यावयाचे तीस लाख रुपये अद्यापही दिलेले नव्हते आणि पुण्यातील पेशव्यांना शाची चणचण असल्याने ही रक्कम वसूल करावी असा उत्तर मोहिमेवर असलेल्या त्यांच्या रदारांकडे त्यांचा नेहमीच लकडा लागलेला असे. या रकमेची तरतूद कोठून करायची ? ासाठी अयोध्येवर चालून जावे, तेथील सरसुभेदाराकडून येणे असलेली रक्कम वसूल करावी किंवा बिहारवर हल्ला चढवावा. बिहारमधूनही खंडणीची बरीच रक्कम येणे होती. मराठ्यांनी ुचविलेल्या या दोन्ही योजना बादशहाने फेटाळून लावल्या. अशा परिस्थितीत मराठ्यांनी ुचविले की, गरजेला उभा राहून बादशहाची नड भागवील असा माणूस म्हणजे झबिता-ान. त्याच्याजवळ त्याच्या वडिलांचा अगणित पैसा होता. हा पैसा मिळवायचा तर झबिताची मजूत पटवायला हवी. ती कशी पटवायची ? तर त्याकरिता त्याच्या मागील अपराधांची त्याला ाफी द्यायची; वडिलांच्या मीरबक्षीपदावर त्याची नेमणूक करायची व त्याच्या जहागिरीचे र्व मुलुख त्याला परत द्यावयाचे. आपल्याला हवे असलेले अधिकार व फायदे मराठ्यांच्या ध्यस्थीने शस्त्र न उचलावे लागता मिळत आहेत, हे विचारात घेऊन झबिताखान पेशव्यांना ाडेदहा लाख रुपये द्यायला तयार झाला. तुकोजी होळकर हा झबिताचा पुराणा दोस्त. यानेच विसाजी कृष्णाला ही मसलत मान्य करायला लावली. पण झबिताखानचा फायदा हणजे नजीबउद्दौलाच्या घराण्याचा लाभ. महादजीला हे अजिबात मंजूर नव्हते. त्यासाठी ादशहाविरुद्ध जी कारवाई करावयाची त्यात सहभागी होण्याचे त्याने साफसाफ नाकारले.

बादशहाने रोहिल्यांविरुद्ध फार मोठा विजय मिळविला; नजफखानाचे दरबारातील थान खूपच उंचावले. त्याला 'कुठे ठेवू, कुठे न ठेवू' असे बादशहाला होऊन गेले. ादशहाला तो फारच मोठा वाटू लागला. नजफखानने बादशहाच्या इतमामाला साजेल असे एक स्वतंत्र सैन्य उभारावे, अशी बादशहाने त्याला आज्ञा केली. या कामाकरिता पैसा हवा म्हणून दिल्लीच्या उत्तरेकडील व पश्चिमेकडील अनेक प्रांतांचे महसूल त्याच्याकडे लावून दिले. नजफखानाने ठिकठिकाणी महसूल गोळा करणाऱ्या अधिकाऱ्यांच्या जागी आपले अधिकारी पाठवून दिले, ते असे : नजफकुलीखान हेसीहिस्सारकडे; नियाझबेग या ुराणी मुसलमानाला सहराणपूरकडे, मुहमद बेग हमदानीला जलालाबाद लुहारी (म्हणजे उत्तर मुजफरनगरमधील गौसगड) कडे व अफ्रासियाब खानाला सोनीपत व पानिपतकडे. बादशहाच्या झेंड्याखाली नव्या शाही फौजांची उभारणी चालू आहे, ही वार्ता वाऱ्या-सारखी पसरली. शाही सेनेतून यापूर्वी मुक्त झालेले तसेच शिपाईगिरीसाठी उत्सुक असलेले नव्या उमेदीचे असंख्य तरुण, सैन्यात भरती होण्यासाठी दिल्लीत जमू लागले. शूर अशा सात हजार जवानांची नावे पहातापहाता नोंदली गेली. त्याशिवाय नजफखानचे खास असे एक विलायती मुसलमानांचे घोडदळही उभारण्यात आले. या घोडदळात इराणी व तुर्की

शिलेदारांची भरती असून त्यांना मुगल म्हणत व या घोडदळाला मुगलिया असे संब
ण्यात येई. मिस्किन या बारगिरांचे वर्णन 'दणकट व देखणे, घोड्यावर घट्ट मांड अस
हिंदुस्थानी अवलादीचे व नजरेत भरणारे तरूण' असे करतो. प्रत्यक्षात अनुभव आला
मात्र असा की, नंतर पुढल्याच डिसेंबर महिन्यात जी लढाई झाली, तीमध्ये कर्तृत्वा
दृष्टीने हे सर्व कच्चे व बेभरवशाचे ठरले.

नजफखानाचा हा गौरव, हिसामउद्दिनच्या पोटात कळ उठवून गेला. बादशहा
मर्जीतील या नालायक माणसाने तुकोजी व विसाजी यांना विश्वासात घेऊन एक
रचला. तो असा—बादशहाकडून झबिताखानाला त्याच्या अपराधांची माफी मिळवून द्याय
मीरबक्षीपदावर त्याची नेमणूक करायची. त्यासाठी जरूर तो आग्रह धरून पाठपुरावा
ण्याचे काम मराठे करणार होते. अशा प्रकारे शाही सेनेत नजफखानाला जे सर्वोच्च स
होते त्यात पाचर मारून ठेवायची. शहा अलमने वरील मागणी नाकारून हा डाव पूर्ण
उधळून लावला. परिणामतः वर्ष अखेरीस दिल्लीवर चाल करून जाण्याचा निर्णय घेणे
त्यांना अटळ होते.

पावसाळा सुरू होताच नेहमीप्रमाणे सर्व आघाडीवर थंडा मामला सुरू झाला. प
साळा संपला आणि शाही सैन्याने दिल्लीच्या दक्षिणेस पसरलेल्या जाटांच्या मुलुखांत धु
कूळ घालायला सुरुवात केली. त्यांनी जाटांच्या अनेक गढ्या बळकावल्या. जाट रा
पैसे द्यायचे मान्य करून मराठ्यांशी सख्य जोडले व अशातऱ्हेने एक शत्रू कमी क
त्याने आपले सैन्य शाही फौजांच्या प्रतिकारासाठी रवाना केले. जाटांच्या सैन्याचे ने
रेने मादेक कडे होते. शिवाय नव्यानेच पुरेसा शस्त्रपुरवठा केलेले तीन हजार शिपा
आठ मैदानी तोफा, जाट घोडदळ अशी सुसज्ज तयारी होती. मादेकचे आगमन हो
शाही फौजा मागे हटल्या व एकही वार न करावा लागता सर्व जाट ठाणी परत घेण्
आली. मादेकला आपल्याकडे आणावा याबाबत बादशहाचे प्रयत्न बरेच दिवस चा
होते. त्याबाबतच्या बोलण्यासंबंधीचा घोळ संपवून त्याने मादेकला आपल्याकडे या
लावले. मादेक हा फ्रेंचांचा माणूस. बादशहाने त्याला दरमहा चाळीस हजार रुपये द्यावय
कबूल केले. जरूर भासेल तेव्हा आपल्या तीन हजाराच्या पलटणीत त्याने जरूर भा
तितक्या शिपायांची भरती करावी, अशी परवानगी दिली. तसेच 'नबाब शमसुद्दौ
बहादूर कायूमजंग' हा किताब व हयातीपर्यंतची जात आणि सवारची सहा हजार
मनसब त्याच्याकडे पाठवून दिली. अशाप्रकारे जाटांची नोकरी सोडून बादशहाकडे
यात आपला उद्देश केवळ देशभक्ती एवढाच होता, असे मादेक सांगतो. कारण जाटांक
नोकरी एकदम सोडायची म्हणजे नुकसान सोसायचे. भरतपूर येथील त्याच्या घरातील पै
अडका व नवलसिंगाकडून पगारापोटी येणे असलेली दोन लाखांची रक्कम, हे त्याला
बावे लागणार होते. एवढे प्रचंड नुकसान सोसून तो बादशहाकडे आला. बंगालमधल्या वि
याने इंग्रजांनी तिथे आपला छान जम बसविला होता. आपला प्रभाव दिल्लीत असल्याशिव
ब्रिटिशांना शह देणे, फ्रेंचांना जमले नसते. त्यासाठी त्यांना आपला माणूस दिल्ली दरबा

हवा होता. चंद्रनगर येथील फ्रेंच वखारीचा प्रमुख मसिअ शवालिए यानेच मादेकला हा आदेश दिला. त्यामुळेच तो बादशहाकडे आला.

कोणतीही पूर्वसूचना न देता जाटांची नोकरी सोडून मादेक बादशहाकडे आला खरा, पण दिल्लीत पाऊल ठेवीपर्यंत त्याला प्रखर विरोधाला तोंड द्यावे लागले. त्याचा हा प्रवास म्हणजे उल्लेखनीय चातुर्य, धैर्य व चिकाटी यांचे प्रतीक होते. हा प्रवास संपवून त्याने १५ नोव्हेंबर, १७७२ रोजी दिल्लीत प्रवेश केला. या प्रसंगी बादशहाने खूप भव्य समारंभ करून व किताब देऊन त्याचे स्वागत केले. या अपूर्व स्वागतामुळे एकेकाळी खलाशी म्हणून राबणाऱ्या या साहसी माणसाच्या मस्तकात त्याचा कैफ न चढला तरच नवल[१०]. शहाअलमच्या कारकीर्दीतील अडचणीच्या काळातच त्याचे आगमन होत होते. त्यानंतर त्याने आपल्या आठवणीत नमूद करून ठेवल्याप्रमाणे 'साम्राज्याचे भवितव्य चार भिंतीतच ठरविण्याची वेळ आली.'

१४ : मराठ्यांची दिल्लीवर स्वारी

झबिताखान व जाट राजा यांच्या हिताच्या अशा काही गोष्टी करण्याबाबत विसाजी-कृष्ण व तुकोजी यांनी बादशहाकडे ज्या शिफारशी केल्या होत्या, त्यांना वाटाण्याच्या अक्षता लावण्यात आल्या.[११] त्यानंतर मराठ्यांनी आपल्या फौजांची अंतर्वेदीत जमवाजमव केली व पावसाळा संपता संपता दिल्लीच्या रोखाने कूच करायला सुरुवात केली. दि. २१ नोव्हेंबर रोजी राजधानीपासून ते आठ मैलाच्या आत होते. बादशहाने खलबतखान्यात जाऊन आपल्या सर्व सरदारांचा विचार घेतला. फाजलअलिखान याच्या हाताखाली इंग्रजांनी पाठविलेल्या पायदळाच्या दोन तुकड्या देण्यात आल्या. या सैन्याने यमुनातीरावर पूर्वेकडील बाजूस शहरानजीक खंदक खणून तयारीत रहावयाचे होते. पण मराठे आले ते दक्षिणेकडून. दिल्लीच्या तुरकमान दरवाजाच्या आग्नेय दिशेस अदमासे दहामैलावर यमुनेच्या पश्चिम तीरावर खिजिराबाद हे छोटेसे खेडे आहे. मराठा सैन्य त्या ठिकाणी येऊन थांबले.

शत्रूशी निर्धाराने व छातीठोक सामना द्यावा असे नजफखान सुरवातीपासून सांगत होता. बादशहा हा मूलतःच दुबळा व भित्रा. त्यामुळे आपल्या कारभाऱ्यांच्या हातातले बाहुले बनलेला. हे सर्व कारभारी एकमेकांना पाण्यात पहाणारे व आपमतलबी. १७७१ मध्ये मराठयांच्या मदतीने झबिताच्या माणसांकडून दिल्लीचा किल्ला परत घ्यायचा व बादशहाला त्याच्या राजधानीकडे घेऊन जायचे याबाबत बादशहाच्या वतीने सैफुद्दिनने खूपच कष्ट घेतले होते. त्याचे अल्पसे पारितोषिक म्हणून त्याला बादशहाचा प्रमुख व विश्वासू सल्लागार नेमले होते. त्याला त्या जागेवरून हुसकावून लावण्यात हिसामउद्दिनने नुकतेच यश मिळवले होते. असा हा पाताळयंत्री हिसाम नजफचा कट्टा दुष्मन होता. नजफवर तो बिलक्षण जळत असे. नजफ हा धुरंधर समशेरबहाद्दर व सैन्याचा आवडता. बादशहाच्या कारभाऱ्यांनी परस्परविरुद्ध व उलटसुलट सल्ला दिला. बादशहाला कोणताच ठाम निर्णय घेता येईना. फ्रेंचसेनानी मादेक सखेद आश्चर्याने नमूद करतो, "शक्य होते तेवढ्या सैन्याची जमवाजमव बादशहाने केली; पण त्या प्रसंगी जे करायला पाहिजे

होते ते मात्र त्याने केले नाही. सेनाधिपती म्हणून सर्वांचे पुढे त्याने उभे रहावयास ह होते." नजफचा सल्ला त्या वेळेपुरता मानण्यात आला व युद्ध करावयाचे ठरले. दिल्लीच्य वेशीवर गोळा झालेल्या मराठ्यांनी तिथूनच 'झबिताखानाचे वतीने केलेल्या मागण्या मंजू कराव्यात' असा धोशा सुरू केला. शाहीशासनाने त्या पुन्हा एकदा धुडकावून लावल्या.

मराठा सत्तेशी लढण्यासाठी म्हणून दि. ७ डिसेंबर रोजी मिर्झानजफ आपल्या सैन्या सह मोठ्या तडफेने बारापुलाच्या रोखाने चालून गेला. लढाईच्या पावित्र्यात तो दुपारपर्यं उभा होता. पण प्रत्यक्ष सुरवात करायला कुणीच तयार होईना म्हणून दुपारनंतर नज शहरात परत आला. शाही फौजा प्रत्यही शहरच्या तटबंदीपासून निघत, दक्षिणेकडे जाऊ पुराणा किल्ल्यापर्यंत दोन मैलांची मजल मारीत, युद्धाच्या पवित्र्यात खड्या होत. कधीकध छोटीशी चकमक उडे, शेवटी दोन्ही बाजूकडील सैन्य आपापल्या छावणीत परत ये यमुनेच्या तीरावरील रेताड मैदानात, शाही फौजा खंदक खणून लढाईच्या पावित्र्यात उभ होत्या. पण या जागी मराठ्यांच्या चपळ स्वारांविरुद्ध त्यांचा टिकाव लागण्यासारखा नव्हत दि. १०,१२ व १६ रोजी थोड्या अधिक प्रमाणावर चकमकी उडाल्या. त्यानंतर दि. १ डिसेंबरला लढाईला तोंड लागले. ती निर्णायक ठरणार होती.[१२]

१५ : पुराणा किल्ल्याची लढाई

या घनघोर लढाईसाठी दोन्ही बाजूंनी १७ डिसेंबर हाच दिवस निश्चित करण्य आला. पाश्चात्य लष्करी तज्ज्ञांच्या हाताखाली प्रशिक्षण घेतलेले व त्यांच्याच नेतृत्वाखा लढणारे सैनिक व पाश्चात्य तोफखाना हे सर्व बादशहाचे बाजूने हिंदुस्थानातील लढा सामील होण्याचा हा पहिलाच संग्राम ; पण संख्याबळापेक्षा गुणवत्ता श्रेष्ठ असलेले सेना विजय मिळवू शकले. अर्थात खरोखरी यात पाश्चात्यांचा काहीच दोष नव्हता. वरील दिव अगदी सकाळी शाही फौजा दिल्ली शहराबाहेर पडल्या ; पुराणा किल्ल्यापलीकडे, तोफे गोळा पडावा इतक्या अंतरावर दक्षिणेकडे मोहरा करून लढाईच्या पवित्र्यात उभ राहिल्या. त्यांची डावी फळी यमुनेचा आधार घेऊन होती तर उजव्या बाजूस फिरोजा दचे काही भग्न अवशेष होते. "उंचच उंच कुंपण असलेली धान्याची शेते होती. त्यांच उपयोग अनेक खंदकांसारखा झाला. आपले संरक्षण चांगल्या प्रकारे करता यावे अशीच परिस्थिती होती" असे मादेक म्हणतो. पण अननुभवी शाही फौजा व त्यांना करण्य येत असलेल्या हुकमात नसणारी एकवाक्यता, यामुळे फायद्याच्या या सर्व बाजू न ठरल्या. शाही सेनेच्या आघाडीला कुलीच बेग खान याच्या हाताखाली मुगलिया घोड होते. हे घोडदळ उजव्या बाजूस तेथील भूरचनेनुसार तुकड्यातुकड्यांनी खडे होते. त्याल पूर्वबाजूस मादेक आपल्या तीन तुकड्या व आठ तोफांसह उभा होता. अगदी डावी इंग्रजांच्या दोन तुकड्या होत्या. त्यांचे नेतृत्व गंगाराम व भवानीशंकर यांच्याकडे ह शिवाय चार तोफा होत्या. दुसऱ्या ओळीत शाही तोफांच्या रांगेमागे आपल्या खास सेने स्वतः मिर्झानजफ उभा होता. ते सर्व पायदळच होते. त्याच्याही पाठीमागे अगदी

अंतरावर नव्या शहराच्या आग्नेय दिशेकडे कोपऱ्यात गाझीद्दिन खानाची हवेली होती; त्या ठिकाणी हिसामच्या देखरेखीखाली राखीव सेना ठेवली होती. निळ्या बुरुजाखाली खूप खोल खंदक खणून तीस प्रचंड तोफा सज्ज ठेवल्या होत्या.

नेहमीच्या पद्धतीनुसार उभयपक्षी बंदुकांच्या फैरी झडल्या व लढाईला तोंड लागले. शाही सैन्याकडे गंधक, सोरा यासारख्या दारूगोळ्यासाठी लागणाऱ्या भुकटीचे दोन हडपे होते. सुरुवातीला एकाएकी त्याचाच स्फोट होऊन त्या भडक्यात अंदाजे चारशे सैनिक ठार झाले. त्यानंतर मराठे लढायला पुढे सरसावले. तसे करताना त्यांनी आपला पुढे झेपावयाचा तुफानी वेग कायम ठेवला तो असा की, त्यामुळे संरक्षक आघाडीच्या अगदी उजव्या बाजूला असलेल्या मुगलिया घोडदळाला धडकीच भरली. प्रत्यक्ष हल्ला होण्या-आधीच त्यांचा धीर खचला. शत्रू प्रतिहल्ला करील या अपेक्षेने मराठे काही काळ थबकले. मुगलिया घोडदळात गोंधळ उडालेला दिसला. त्याचा फायदा घेऊन पुढे होत त्यांनी अशी काही मुसंडी मारली की, संख्येने खूप मोठ्या असलेल्या मुगलिया घोडदळाची अपरिमित हानी झाली (एका मराठ्यास पाच मुगल). अगतिक होऊन त्यांच्यात फाटाफूट झाली व ते सैरभैर पळत सुटले. मराठा स्वारांची एक एकसंध तुकडी तुफानी वेगात पाठलाग करीत त्यांच्यामागे धावली व शाही सैन्याच्यामागून दिल्ली शहराच्या रोखाने दौडू लागली.

त्याचवेळी मराठा सैन्याची उजवी फळी शाही सैन्याच्या डाव्या फळीवर झेपावली. 'मराठा स्वार बऱ्याच अंतरावर होते, ते गोळीबाराच्या टप्प्यात येण्यापूर्वीच शाही सैनिकांनी आपल्या बंदुकांतील गोळ्यांचा मारा करून त्या, आधीच संपवून टाकल्या. केवळ आड-मुठेपणा व अव्यवस्था यांचाच हा दुष्परिणाम होता. पुन्हा नव्याने बंदुका ठासावयाच्या आधीच मराठा सैनिक त्यांच्यावर तुटून पडले व त्यांना पायाखाली चेपीत त्यांना कापून काढीत त्यांनी त्यांचा निकाल लावला. उर्वरित शिपायांनी 'दैने रुख' करून आश्रया-साठी मादेकच्या सैन्याकडे धाव घेतली. म्हणजे शाही फौजेच्या डाव्या फळीप्रमाणे उजवी फळीही पहिल्याच दणक्यात कोलमडली.

लढाईची धुमश्चक्री आता मध्यस्थानी आली. या ठिकाणी मादेकवर समोरून व पाठीमागून तुफानी हल्ले होत होते. तो सगळीकडून घेरला गेला होता. अगदी ऐन समयी त्याने आपल्या सैन्याची चौकोनाकृती रचना केली. यावेळी त्याच्या हाताखाली दुय्यम प्रमुख अधिकारी मसिअ द केरास्को याच्या ताकदीचा व चपळपणाचा त्याला फार उपयोग झाला. त्यानुसार सैन्यरचनेत बदल करीत असताना त्याला थोडीफार जागा सोडावी लागली व त्या गडबडीत तीन तोफगोळे व दारुगोळ्यांनी भरलेल्या दोन गाड्या तिथे जागेवरच सोडाव्या लागल्या. जरूर लागेल तसा चौफेर गोळीबार करीत त्याने शत्रूला सतत दूर ठेवले. मिर्झानजफ स्वतःच एका चमत्कारिक परिस्थितीत कोंडला गेला व त्याचे अवसान खचले. गंजलेल्या शाही तोफखान्याला भीक न घालता मराठ्यांच्या मध्य-भागातील सैन्य तोफांच्या रांगांतून पुढे घुसले व त्यांनी नजफच्या अनुयायांची दाणादाण

उडविली, नाइलाज होऊन आपल्या मूठभर संरक्षकांसह नजफला मादेकच्या चौकटीत जीव बचावण्यासाठी जाणे भाग पडले. त्याच दिवशी सकाळी नजफचा पुतण्या मिर्झा अशन हा तोफगोळ्याने चिंताजनक अवस्थेत जखमी झाला होता.

मराठ्यांचे स्वार लाटांप्रमाणे उसळत होते. या लाटांत मादेकने तयार केलेली सैनिकी चौकट एखाद्या एकाकी बेटासारखी वाटत होती. हे बेट दणकट खडकावर असल्यासारखे स्थिर होते. दुपारपासून सूर्यास्तानंतरचे तीन तास एवढा दीर्घकाल मादेक आपल्या जागी ठामपणे उभा होता. शत्रूला वाजवी अंतरावर ठेवण्यात व त्यांना आपल्या तीन तोफा न पळवू देण्यात, त्याने यश मिळविले होते. दरम्यानच्या काळात मराठ्यांच्या डाव्या फळीत जे सैन्य होत त्यांनी पळपुट्या मुगलिया घोडदळातील स्वारांचा पाठलाग करून त्यांचा निकाल लावला होता. त्यानंतर ते दिल्लीचे वेशीपर्यंत पोहचले होते. तिथे मादेकची छावणी होती, त्यातील सर्व चीजवस्तू या सैनिकांनी लुटून नेली. मादेक लिहितो, "माझे पांच हत्ती, सर्व घोडे, उंट, तंबू, गाड्या व इतर अन्य वस्तूंचा प्रचंड साठा हे सर्व मी गमावून बसलो. बादशहाचे खास मर्जीतले हिसमखान नजिकच असून आपल्या प्रचंड तोफखान्यासह तो तटबंदीची राखण करीत होता. पण रणांगणावर असलेल्या नजफला सैनिकी साहाय्य पोचवून त्याला धीर वा त्याच्या समोरच नजिक असलेल्या माझ्या छावणीच्या रक्षणासाठी तो एक पाऊलही पुढे आला नाही." आपला शत्रू नजफखान याचा पूर्ण पाडाव व्हावा म्हणून दारु न भरलेल्या रिकाम्या तोफांचा आवाजच शत्रूला ऐकविण्यात आला, असा आरोप हिसामवर अगदी उघडपणे करण्यात आला. तसेच त्याच्या शिपायांनी मराठ्यांशी हातमिळवणी केली व दोघांनीही एकाकी असलेल्या मादेकच्या छावणीत यथेच्छ लूटमार केली, असेही बोलले गेले. यानंतर थोड्याच अवधीत हिसाम खंदकाबाहेर पडला व आपल्या शिपायांसह दिल्ली शहरात चालता झाला.

मराठा स्वारांनी त्यानंतर गाझीउद्दिनच्या हवेलीत प्रवेश केला. तिथे मनसोक्त लुटालूट केली. या ठिकाणी करीमखान नामक कुणा धनाढ्य व्यापाऱ्याने आपली लाखो रुपयांची मालमत्ता, काही हत्ती व ३०–४० घोडे सुरक्षिततेसाठी ठेवले होते. हे सर्व लुटण्यात आले. राजधानीच्या दिल्ली दरवाज्यापाशी खुद्द बादशहाचे दोन हत्ती मराठ्यांच्या हाती पडले. शहराच्या पूर्व भागातील संरक्षणव्यवस्था पूर्णपणे कोलमडली होती. नदीतीरानजिक तट ओलांडून मराठे आत आले व सादुला बाजारच्या चौकातून लूट करण्यासाठी इतस्ततः निघून गेले. या ठिकाणी सय्यद बलुचखान होता. हा मुसावीखानाचा भाऊ. त्याने मराठ्यांवर हल्ला करून त्यांना दूर घालवून दिले. मराठ्यांची लूटमार करण्याची प्रवृत्ती व त्यांच्या प्रमुखांमध्ये असलेला सेनानायकाच्या गुणांचा अभाव, यामुळे त्यांना शेवटी सर्वच गमवावे लागले. फक्त राजधानी जिंकली एवढे कोरडे समाधान काय ते मिळाले.

मादेकने काळजीपूर्वक रचलेल्या चौकटीच्या संरक्षणाखाली असलेल्या शाही फौजा सूर्यास्तानंतर तीन तासांनी शहराकडे परत फिरल्या. हिसामवर दगलबाजी केल्याचे दण-दणीत आरोप करण्यात आले. पण हिसामसारख्या विश्वासघातक्याला शासन करण्याइतके धैर्य

ळ नव्हते. त्याने फक्त शौर्य गाजविणाऱ्या योद्धयांना बक्षिसी दिली. मादेक व
ग मिठी मारली. आपल्या अंगावरची किमती वस्त्रे बहाल करून त्यांचा सन्मान

सांगतात की या लढाईत मराठ्यांचे सतरा सरदार धारातीर्थी पडले, बारा
व दोन्हीकडील मिळून तीन हजार सैनिक ठार झाले. पण लढाई निर्णायक
त्यांचा विजय वादातीत होता. त्यानंतरचे काही दिवस शाही फौजा खंदकाचा
न मराठा सैनिकांवर दुरून गोळीबार करीत होत्या, तरी समोर उभे रहाण्याची
त्यांना होत नव्हती. पतपरगंज व जयसिंगपुरा येथे पेंढाऱ्यांनी आगी लावल्या.
त खूपच पडझड झाली. तेथील भग्नावशेषांत असलेल्या एका खंदकाच्या कडेवर
ा असताना त्याच्या मांडीत गोळी घुसून तो जखमी झाला. त्याची सर्व चीज-
मत्ता पळवून नेण्यात आली. दि. १७ च्या लढाईत त्याचे सैनिक फार मोठ्या
ले गेले.[१३]

शहाची मराठ्यांना संपूर्ण शरणागती

शहाचे लढाईचे अवसानच संपले होते. त्याचे सैन्य फारच कमी पडत होते.
न्य, त्यांच्या समवेत आलेले झबिताखानाचे रोहिले सैनिक, जाट शिपाई व
शिपायांच्या तुकड्या व त्यांच्या तोफा यांनी त्याचे शहर पार व्यापून गेले होते.
ना तोंड द्यायला कोण ? तर नजफचे मूठभर अनुयायी व दि. १७ च्या रणधुमा-
यांच्या कचाट्यातून नशीब म्हणूनच वाचलेले आणि वैफल्य व पराजयाने ग्रासलेले
. परिस्थितीच अशी होती की, अगदी अद्ययावत् अशी १७५७ ची शस्त्रे व
घेऊन नजीबुद्दौलासारखा धुरंधर सेनानी समोर येता तरी त्यालाही ती सावरता
ती.

वाजूंनी नाइलाज झाल्याने बादशहाने संपूर्ण शरणागती पत्करली. शत्रूच्या सर्व
न्य करण्याचे आश्वासन दिले. दि. १९ ला विसाजी व तुकोजी यांच्या शामि-
टाच्या बोलण्यास सुरुवात झाली. हिसामखान मध्यस्थ होता. दि. २० रोजी
दिवाण दादो मल्हार व आणखी पाच प्रमुख मराठा सरदार किल्ल्यात आले.
काही गुप्त कानगोष्टी झाल्या. किल्ल्याच्या आसपास पायथ्याशी खंदकातून अस-
त्या त्या बाजूने मागे घेण्यात आले. पण मराठ्यांच्या काही मागण्या बादशहाला
टत असल्याने समेटाची बोलणी त्यानंतरही काही काळ चालली होती. दि. २६
हाच्या शरणागतीचा मोठा क्षमाशीलतेचा आव आणून आदर करण्यात आला.
व दगाफटका होऊ नये म्हणून किल्ल्याची तपासणी कसून करण्यात आली.
ी, तुकोजी व झबिताखान यांची मनगटे पराभूत होऊन तावडीत सापडलेल्या
ारखी एकमेकांशी जखडून टाकण्यात आली; मग त्या तिघांना शाही दालनात
त आला. तिघांनाही प्रथेप्रमाणे खाविंदांना सुवर्ण मोहरा नजर केल्या. या सगळ्या
र बादशहाच्यावतीने तिघांना मानाची उंची वस्त्रे, हत्ती व अन्य भेटी देण्यात

आल्या. झबिताखानाला मीरबक्षीपदावर नेमण्यात येऊन रोहिलखंड, सहराणपूर व मीरत येथील त्याच्या वडिलोपार्जित जहागिरी त्याला परत देण्यात आल्या. दि. २ जानेवारी, १७७३ ला निघालेल्या एका शाही फर्मानाने मादेकच्या फौजा, मुगलिया घोडदळ व नजफने उभारलेल्या अन्य पलटणी बरखास्त करण्यात आल्या.[१] अशा तऱ्हेने मराठ्यांची मोहीम पूर्णतया यशस्वी झाली.

या कलमांची अंमलबजावणी मात्र लागलीच झाली नाही. हा घोळ आणखी काही दिवस तसाच चालू राहिला. त्यात राजकारण होते. मराठे आपले पाठीराखे, ते दिल्लीहून परत गेले म्हणजे 'नजफ आपल्याला जिवंत ठेवणार नाही' हे हिसाम समजून होता. बादशहाच्या समोर किंवा त्याच्या नोकरीतही नजफ राहू नये म्हणून त्याला तिथून हुसकून लावण्यासाठी हिसामने मराठ्यांना भरपूर पैसाही दिला. "१७७१ मध्ये मराठ्यांना पंचवीसलाख रुपये देण्याचे आश्वासन बादशहाने दिले होते. या रकमेवर पाणी सोडावे लागणार असे दिसताच मराठे नऊलाख रुपये घेण्यास तयार झाले. काही रोकड व मालमता अशा स्वरूपात हिसामने सदर देणे देऊन टाकले. नजफची हकालपट्टी केली तर आणखी एक लाख देऊ असे तुकोजीला अभिवचन दिले. मिर्झा नजफखान हा आपलाही शत्रू आहे हे मराठे ओळखून होते. शाहीकृपेचा वरदहस्त त्याच्या मस्तकावर असेपर्यंत त्याच्या कर्तृत्वाची व ताकदीची त्यांनाही भीतीच होती. म्हणून त्यांनी बादशहाकडे मागणी केली की 'त्याने नजफखानला आपल्या चाकरीतून बडतर्फ करून मराठ्यांच्या हवाली करावे अगर मुगलिया घोडदळासह त्याला दिल्लीबाहेर हाकलून द्यावे." मराठ्यांची ही दरडावणी समजताच आपल्या धन्याच्या जीवितास अपाय होऊ नये म्हणून शहरातील सर्व मुगल शिपायांनी त्याच्या घराभोवती संरक्षक पहारा उभा केला. नजफ रहात होता मोरी दरवाज्याजवळ इस्माइलखानाच्या हवेलीत. त्याने बचावासाठी वेगळाच पवित्रा घेतला, 'आपण दरबारचे नोकर म्हणून नाही, तर एक सर्वसामान्य व्यक्ती म्हणून इथे रहात आहो' असे उघडपणे सांगत बादशहाचा तसा हुकूम नसताही तो तिथेच राहिला.

हिसामने मराठ्यांना शहरात यायला सांगितले व नजफला साहाय्य करण्याच्या मुगलियांना हाकलून देण्यासाठी लोहार वेशीजवळ बादशहाचा तोफखाना उभा केला (१७ जानेवारी). दि. १९ ला शहरात विलक्षण गोंधळ माजला. घरादारांची नासधूस व लूटमार मोठ्याप्रमाणावर झाली. शहराच्या तटबंदीबाहेर नदीतीरावरील रस्त्याने येऊन नजफच्या वास्तूसमोर मराठे तयारीत उभे होते. कोणतीच बाजू हातघाईसाठी पुढे न आल्याने सूर्यास्तानंतर मराठे परत गेले. खडाखडी होणार या धास्तीने शहरातील वातावरण दुसऱ्या दिवशीही हवालदिल होते. या वेळीही नजफचा शहाणपणा उपयोगी पडला. आपल्याला खरा मित्र उरला नाही. मुगलिया घोडदळ बोलूनचालून भाडोत्री, कुणी पाठीराखे नाहीत, अबदुल्लासारखा दुराणी हितकर्ता नाही, जमातवाले नाहीत, पैसा नाही हे नजफ समजून होता. त्यामुळे त्याने दिल्ली सोडून जावे ही मराठ्यांची मागणी त्यानेच मान्य केली. मराठा सैन्याचा बेत रोहिलखंड व शुजाचा मुलूख यावर स्वारी

करण्याचा होता. प्रतिदिनी रु. ३,००० पगारावर वरील मोहिमेत आपल्या सैन्यासह भाग घेण्यासाठी दिल्लीतून बाहेर पडायचे या मराठ्यांच्या म्हणण्याला त्याने रुकार दिला.[१५]

१७. मराठ्यांची रामघाट मोहीम व नजफखान

वरील करार झाला. मराठा सरदारांनी २ फेब्रुवारी, १७७३ रोजी अंतर्वेदीत प्रवेश केला व त्याच्या दुसऱ्याच दिवशी नजफखानही त्यांच्या मागोमाग आला. नजफबरोबर त्याचे मुगलिया स्वार होते. पोटासाठी कुठेतरी शिपाईगिरी करणे भाग असल्याने तेही त्यालाच धरून होते. झबितासुद्धा आपल्या दख्खनी हितकर्त्यांना येऊन मिळाला व स्थानिक परिस्थितीचे ज्ञान आणि आपला दबदबा यांचा उपयोग करून या मोहिमेत मराठ्यांना साहाय्य करण्याचे त्याने मान्य केले. या संमिश्र फौजांनी झपाट्यासरशी अंतर्वेदी पार केली व दि. १५ रोजी त्या रामघाटला आल्या. रामघाट हे ठिकाण गंगेच्या पश्चिम तीरावर बुलंदशहराच्या आग्नेयेस चाळीस मैलांवर आहे. बादशहाने दिलेल्या अधिकारपत्राच्या आधारावर कुरा व अलाहाबाद परगण्याचा ताबा शांततापूर्ण मार्गाने मिळवावा असा मराठ्यांचा मानस होता. त्यासाठी त्यांनी आपले वकील अयोध्येच्या नबाबाकडे पाठविले व १७६५ पासून त्याने बादशहाचा जो मुलुख गिळंकृत केला होता तो बादशहाच्या वतीने आपल्या हवाली करावा अशी त्यांनी त्याच्याकडे मागणी केली. तसेच गंगानदीपलीकडे असलेल्या रोहिल्यांना, विशेषतः हफीज रहमतखानला त्यांनी बोलावून घेतले व जानेवारी १७७१ मध्ये खंडणी देण्याचे आश्वासन त्याने दिले होते त्यानुसार खंडणीच्या रकमेची मागणी केली.

दोन हात करण्याचे टाळता आले तर टाळावे ही मराठ्यांची मनापासून इच्छा होती. शत्रूसमोर सरळसरळ दंड थोपटण्याइतके आपले सामर्थ्य नाही हे त्यांना माहीत होते. मराठे नुकतेच दिल्लीवर चालून गेले होते त्याआधीच आपल्या दहाहजार सैनिकांसह महादजी त्यांना सोडून गेला होता. झाशी येथे पेशव्यांचे जे प्रतिनिधी होते त्यांच्याविरुद्ध तेथील गोसावी व अन्य स्थानिक जमीनदार यांनी बखेडा माजविला होता. त्यांचा बंदोबस्त करण्यासाठी विठ्ठल शिवदेवच्या अधिपत्याखाली पाच हजार सैनिकांची एक तुकडी झाशी येथे ठेवण्यात आली होती; म्हणजे हे पाचहजार सैनिक आणखी कमी झाले; शिल्लक राहिलेले जवळ होते ते अवघे तीस हजार सैनिक. प्रत्येकाकडे पंधराहजार याप्रमाणे तुकोजी व विसाजी यांच्यात त्यांची विभागणी झाली होती. गनिमी कावा हे होळकरांचे परंपरागत वैशिष्ट्य. त्यानुसार त्यांनी ठरविले की, शुजाउद्दौल्याचे प्रमुख ठाणे फैजाबाद यावर एकदम हल्ला करावा व तटबंदी नसलेले हे ठाणे, तीन दिवसांत कबज्यात घ्यावे. विसाजी अधिक व्यवहारनिपुण. आपले मित्र म्हणविणारे झबिताखान व नजफखान हे शुजाला गुप्तपणे खलिते पाठवून त्याच्याशीं संगनमत करीत आहेत 'व आपला खरा दावा मराठ्यांशी, त्यांनी तुमच्यावर हल्ला केलाच तर आम्ही तुमच्याच बाजूला येऊ' असे आश्वासनही अयोध्येच्या नबाबाला ते देत आहेत, हे त्याला माहीत होते. १७६४ मध्ये रेने मादेक इंग्रजांच्या सैन्यातून निघून गेला होता. या त्याच्या अपराधाची इंग्रज गय करणार असतील तर

तोही अयोध्येच्या नबाबाकडे यायला तयार होता. [सीपीसी: खंड ४, क्रमांक १७२, १८३] या सर्व परिस्थितीचा विचार करता काय वाटेल ते करून शक्य तो दोन हात टाळायचे हे विसाजीचे धोरण होते.

मराठे १७७२ मध्ये रोहिलखंडातून निघून गेले होते त्याचवेळी आपली खंडणी वसूल करायला ते पुढील हिवाळ्यात पुन्हा रोहिलखंडात येणार याची अखिल हिंदुस्थानला खात्री होती. कुरा व अलाहाबाद हे परगणे औपचारिकपणे मराठ्यांकडे सुपूर्द केले आहेत, हे शुजाला माहीत नव्हते, असे नाही तरी ते त्यांना द्यायची इच्छा नव्हती. या परागण्यांचा ताबा मागण्यासाठी मराठे पुन्हा येतील त्यावेळी तसे करावे लागू नये म्हणून तशी वेळ आलीच तर ब्रिटिश सैन्याचे साहाय्य आपल्याला मिळावे म्हणून शुजा कलकत्ता येथील इंग्रज अधिकाऱ्याकडे तशी मागणी सतत करीत होता. अशी मदत द्यायचे इंग्रज गव्हर्नराने आश्वासनही दिले होते. शुजा त्यानंतर फैजाबादहून निघाला तो लखनौमार्गे येऊन, त्याने गंगेच्या काठावर कानपूरसमोर ३१ जानेवारी १७७३ रोजी मुक्काम टाकला. त्याच्या समवेत इंग्रजांची फौज होती. कर्नल चॅम्पियन (यानेच पुढे रोहिलखंड जिंकून घेतले) याच्या हाताखालील या फौजेत शिपाई व गोरे पायदळ होते. मराठासैन्य रामघाट येथे आल्यावर नबाबाचे सैन्यही त्यांच्या रोखाने, नदीच्या रोखाने पुढे सरकले व त्याने ३ मार्च रोजी फरुकाबादसमोर तळ टाकला. या ठिकाणी शुजाच्या मदतीला इंग्रज फौजा व त्यांचा सरसेनानी सर रॉबर्ट बार्कर हाही आला. याच वेळी मदतीसाठी रोहिल्यांची आर्त हाक आली. म्हणून इंग्रज व अयोध्येचा नबाब यांचे हे संयुक्त प्रतिनिधी सैन्य प्रतिदिनी लांबपल्ल्याच्या मजला मारीत आणखी उत्तरेकडे चालू लागले व दि. १९ रोजी साहसवन येथे येऊन थांबले. साहसवन हे ठिकाण रामघाटचे अलीकडे वीस मैलांवर आहे. नाइलाज झाल्याने मराठ्यांनी त्याच दिवशी शस्त्र उचलले.[१६]

गंगेच्या पश्चिम तीरावर मराठ्यांचा तळ होता. तिथे खूपच शाब्दिक चकमकी उडाल्या. मराठ्यांच्या हिंदुस्थानातील राजकीय सूत्रसंचालनाचा सर्वाधिकारी ही उच्च पदवी असलेला शांतवृत्तीचा विसाजी कृष्ण परिस्थितीने हतबल झाला होता. नेहमीच्या तडफदारवृत्तीने तुकोजीने तो दिवस निभावून नेला व आपले १५,००० चपळ स्वार आणि नजफखान यांच्यासह नदी उतरून गंगापार झाला. विसाजी मात्र उर्वरित अर्ध्यासैनिकांसह पाठीमागे भेलोन या खेड्यातच थांबला. भेलोन हे छोटेसे खेडे गंगाघाटाच्या पश्चिमेस दोन मैलांवर आहे. सर्व छावणी, अवजड सामानसुमान व उत्तरेतील तीन वर्षांच्या मोहिमेत जमविलेले लुटीतले साहित्य या सगळ्याची जोखीम त्याच्यावर होती. आसपासच्या मुलुखात पेंढाऱ्यांची लुटालूट चालू होती. नदीच्या चढाचे बाजूला पन्नास मैलांवर पूथ हे ठिकाण आहे. एक सावधगिरीचा उपाय म्हणून मराठ्यांनी या ठिकाणी नदीवरून परत येण्यासाठी होडग्याला होडगे जोडून एक पूल तयार केला होता. सैन्य माघारी फिरले तर त्याला परत येण्याचे एक साधन एवढाच त्याचा उद्देश.

१८. तुकोजी होळकराचा रोहिलखंडावर हल्ला : ब्रिटिश फौजांशी सामना

तुकोजी गंगेच्या पूर्व तीरावर आला. एकदम हल्ला करून त्याने अहमदखानाला पकडले (हा अहमदखान, सरदारखान याचा पुत्र व अलि मुहमद रोहिला याचा भूतपूर्व बक्षी). रामघाटासमोर नदीतीरावर रेताड मैदानात खंदक खणून अहमदखान तयारीत होता. असदपूरचा किल्ला त्याच्या पाठीमागे होता. हा हल्ला अगदी मोजक्या वेळात व तडफेने केलेला होता. या चकमकीत रोहिल्यांच्या दोनहजारांपैकी फक्त तीनशेच ठार झाले. मराठ्यांना मात्र नऊशे जीव गमवावे लागले. अहमदखानाचा एक मुलगा असदपूरच्या किल्ल्यात होता. तुकोजीने या किल्ल्याला वेढा घातला. त्यावेळी रात्रीला तोफगोळ्यांचा जो वर्षाव झाला त्याचा धूमधडाका साहसवन येथे असलेल्या इंग्रज सैन्याच्या कानापर्यंत जाऊन आदळला. इंग्रज फौज तिथून दुसऱ्या दिवशीं तडकाफडकी निघाली व दि. २० मार्चला रामघाट येथे आली. या इंग्रजफौजेच्या आगमनाची वार्ता समजताच तुकोजीने असदपूर किल्ल्याचा वेढा सोडला व त्याने संबळ आणि मोरादाबाद या दोन ठिकाणी एकदम हल्ला चढविला. (संबळ हे रामघाटच्या ईशान्येस ३५ मैलावर आहे) ती दोन्ही मोठी शहरे त्याने मनमुराद लुटली. नंतर तितक्याच तडफेने तो परत फिरला व पूथ येथे गंगापार होऊन अलिगढला जाऊन विसाजीला मिळाला.

रामघाट येथे मराठा सैन्याची एक तुकडी होती. तिची हालहवाल आता पाहू. दि. २० मार्चचा दिवस, सकाळची दहा वाजण्याची वेळ, रामघाटच्या रोखाने पुढे पुढे येणाऱ्या इंग्रजांच्या फौजेने मराठ्यांच्या फौजेला बघितले. त्याबरोबर लढाई करण्याच्या तयारीनेच त्यांनी सैन्याची रचना केली. इंग्रजांच्या सर्व तुकड्यांजवळ भरपूर दारूगोळा होता व सैनिकही ताजेतवाने व उत्साहित होते. इंग्रजांनी एकही गोळी झाडली नव्हती तरी गंगेच्या पूर्व तीरावर घिरट्या घालणारी मराठा स्वारांची पलटण इंग्रजांच्या फौजा दृष्टीस पडताच मागे परतली व नदी पार करून रामघाटाकडे परतू लागली. त्यानंतर त्यांचे तीन-हजार स्वार पश्चिम तीरावर आले व त्यांनी प्रथम इंग्रज फौजांच्या हालचालीची टेहळणी केली. जनरल बार्करने आपला तंबू ठोकल्यानंतर विसाजीने नदीपलीकडे जाऊन पडतील असे दोन बारापौंडी तोफगोळे टाकले व त्याच्या तंबूसरशी तीस गोळे टाकले त्यामुळे इंग्रजांचे काय नुकसान झाले ? तर एक म्हातारी मेली व एक हत्ती जखमी झाला. या गोळीबाराला उत्तर म्हणून इंग्रजांच्या बाजूने फक्त दोनच तोफा धडधडू लागल्या. दुसराच गोळा मराठा सैन्यात अगदी गर्दीत येऊन पडला. त्यामुळे प्रचंड गोंधळ उडून मराठे माघार घेऊ लागले. इंग्रजांनी आणखी काही फैरी झाडल्या व सर्व मराठा सैन्य नदीतीर सोडून निघून गेले.

दि. २२ ला अगदी सकाळी सकाळीच रामघाट येथे असलेल्या नदीच्या उतारातून इंग्रजसेनाप्रमुख नदीपार झाला व मराठे होते त्या बाजूला आला. पश्चिमतीरावर मोक्याच्या जागी छावणी टाकता यावी म्हणून शुजाने आदल्याच रात्री वीस तोफगोळे व नजीबचे

पाचहजार पायदळ तिकडे रवाना केले होते. या संभाव्य हल्ल्याच्या हालचालीची माहिती विसाजीला आधीच मिळाल्याने त्याने घाईगर्दीने आधीच चौदामैल माघार घेतली होती. फक्त काही पेंढारी मागे राहिले होते. छावणी हालवाहलवीत मागे राहिलेले काही मिळाले तर पहावे हाच त्यांचा हेतू. मराठ्यांनी रिकाम्या केलेल्या जागेवरच इंग्रज सैन्याने तळ ठोकला. त्यांचा सेनाप्रमुख पश्चिमेकडे आठ मैल चालून गेला. वाटेत त्याला कुठेही शत्रूचा अडथळा झाला नाही. दूर अंतरावर पेंढाऱ्यांच्या छोट्या छोट्या टोळ्या लुटालुटीत गर्क होत्या. त्यांच्यापासून बऱ्याच अंतरावर उभे असलेले मराठास्वार ब्रिटिश सेनेकडे मख्खपणे पहात होते. शुजाकडे जावे की नाही या संभ्रमात इतका वेळ घोटाळणारा हफीज रहमतखान सरळ सरळ त्याच्या बाजूला जाऊन मिळाला. नजफखानाच्या सैन्यातील बऱ्याचशा अधिकाऱ्यांनी हफीजच्याच पावलावर पाऊल टाकले. नबाबाकडे गेल्यावर त्यांनी सांगितले की जशी जशी व जेव्हा जेव्हा संधी मिळेल तसे तसे व तेव्हा तेव्हा मराठ्यांना भूलथापा देत ते वीसवीस व तीसतीसच्या गटाने शुजाच्या बाजूला येतील.

इंग्रजसैन्य दि. २२ रोजी नदीच्या पश्चिम तीरावर तळ ठोकून होते. त्याच्या दुसऱ्या दिवशी पुन्हा नदीपार होऊन ते पूर्वीच्या जागी आले. हे ठिकाण रामघाटपासून एक मैलावर आहे. मात्र परत फिरण्यापूर्वी नदीला उतार होता त्या ठिकाणी संरक्षणासाठी पुरेसे सैन्य ठेवण्यास ते विसरले नाहीत. दुसऱ्या दिवशी, होळकर मुरादाबादेवर हल्ला करणार अशी बातमी समजताच रोहिल्यांना मदत करण्यासाठी ते ईशान्येकडे घाईगर्दीने निघाले. दुसऱ्या दिवशी अखेर (२६ मार्च) सायंकाळी अशी बातमी आली की मराठा सैन्य गंगापार होऊन मागच्यामागे निघून गेले. त्यामुळे दि. २८ ला जनरल बार्कर पुन्हा रामघाटला माघारी आला.

१९. जनरल बार्करने करून दिलेली मराठे व रोहिले यांच्यातील तडजोड

इंग्रजांचा सेनानी जाग्यावर नव्हता. त्याचा फायदा घेऊन दि. २७ ला दुपारी दोन वाजता रामघाट येथे असलेल्या नदीच्या उतारातून पलीकडे जाण्याचा प्रयत्न मराठ्यांनी केला. पण तिथे अयोध्येच्या नबाबाचा खोजा महबूब अलिखान याच्या हाताखाली असलेल्या नबाबाच्या फौजेच्या तुकडीने तिथे असलेल्या प्रचंड तोफांचा मारा करून मराठ्यांना परतवून लावले. मराठ्यांची रोहिलखंडातील ही अखेरचीच मोहीम. त्यानंतर एक वर्षाने हा मुलुख अयोध्येला जोडण्यात आला व कायमचा ब्रिटिश वर्चस्वाखाली गेला; आणि मराठ्यांच्या स्वाऱ्यानांही तो कायमचा बंद झाला.

त्यानंतर इंग्रज फौज रामघाट येथे आणखी सोळा दिवस मुक्काम करून होती. मग उत्तरेकडे जात जात दि. ३० एप्रिल रोजी अनूपशहर समोर एका ठिकाणी आली. यापूर्वी म्हणजे २८ मार्चला मराठ्यांनी रामघाट सोडले होते व रामघाटच्या पश्चिमेस अंतर्वेदीत २५ मैल माघार घेतली होती. फेब्रुवारी १७७० ते मे १७७३ या तीन वर्षांत भगीरथ प्रयत्न व अनंत खटपटी करून मराठ्यांनी हिंदुस्थानात आपला जम बसवून दरारा निर्माण

केला होता. या अपयशाने जो तडाखा बसला त्याने कधीही न भरून येणारी हानी झाली. माघार घ्यावी लागण्याचा हा घाव जिव्हारी लागणारा. त्याबद्दल विसाजी व तुकोजी परस्परांवर उघडपणे दोषारोप करू लागले. त्यानंतरचे काही आठवडे ते इटावा–खुर्जा भागात रेंगाळत राहिले व दख्खनमध्ये घरी जाण्यासाठी तयारी करू लागले. पथ्थरगड येथील लुटीत मिळालेल्या सर्व प्रचंड तोफा त्यांनी इटावाच्या जवळपास पुरून टाकल्या; लुटीतला बराचसा भाग पुढे पाठवून दिला. काल्पी येथे होडीला होडी जोडून तयार केलेल्या पुलावरून ते यमुनापार झाले.[१७]

दि. २१ एप्रिलला वाटाघाटीसाठी मराठ्यांनी आपले दोन वकील पाठविले. शुजाने जनरल बार्करशी त्यांचा परिचय करून दिला. एक वर्षामागे युद्धखर्चाच्या भरपाईसाठी मराठ्यांना खंडणी देण्याचे अफघाणांनी आश्वासन दिले होते. त्यापैकी पंधरा लाख रुपये देण्याबाबत हफीज रहमतकडून व पाचलाख अहमदखान बंगषच्या मुलाकडून वसूल करण्याबाबत मी स्वतः लेखी करार करून घेतो, अशी शुजाने मराठ्यांची समजूत केली. त्यांना त्यावरच समाधान मानावे लागले (**डीसी**). रामघाट मोहिमेत अयोध्येचा नबाब शुजाउद्दौला याने रोहिल्यांना जे लष्करी साहाय्य दिले त्याबद्दल रोहिल्यांनी काही रक्कम द्यावी असा करार रोहिले व शुजा यांच्यात झालेलाच नव्हता. १७७२ मध्ये रोहिल्यांनी शुजाला चाळीस लाख द्यायचे आश्वासन दिले होते तेवढेच.[१८]

वाईटातून जास्तीतजास्त चांगले अशी ही व्यवस्था करण्यात आल्यावर मराठ्यांनी नजफखानाची अलीगढहून दिल्लीस परत पाठवणी केली. त्याचा मोठा सन्मान करून त्याला मानाचा पोषाख, जवाहीर व अन्य नजराणे दिले. रोख सव्वीस हजार रुपये व त्या भागात त्यांची जहागिरी होती त्यातील १९ परगण्यांची जहागिरी त्याला बहाल केली. त्यानंतर चार दिवसांनी विसाजी कृष्ण याने झबिताला निरोप दिला, त्याप्रसंगी त्याला नजराणे दिले; व मग इटावा व काल्पी या मार्गे दख्खनमध्ये आपल्या मुलुखात जाण्यासाठी मराठे मार्गे चालू लागले. इंग्रजांचा तळ अनूपशहरसमोर होता. तिथे दि. ९ मे रोजी नजफखानाने जनरल बार्करची भेट घेतली व दि. २० मे रोजी तो दिल्लीत येऊन दाखल झाला.

टीपा : प्रकरण २७

पृष्ठ	टिपेचा क्रमांक	
२६	१	**इमाद–उस–सादत** : १०८, १०९, २९; **सियार** : खंड २; ३१७–३२७; खंड ३; ८९; **इब्रत** : भाग १; ११९, १४९–१७८; **मुन्नालाल** : ८७, १०६, १२७; **ब्रूम** : ३८१, ५०२–५३१ आणि **सीपीसी** : खंड १; २३४२–२६८८; खंड २; क्रमांक : ८४०; खंड ३; क्रमांक : ११२, १६४, ८३०; खंड ४; क्रमांक : ४७३.

२९ २ **मॉदेव :** जुर्नी द व्होयाज : हस्तलिखित, पृ. २८९ ('बेंगाल पास्ट ॲन्ड प्रेझेन्ट १९३६' यात मी भाषांतर केलेले).

३१ ३ **गुलाम अली :** खंड २; २६६, २८३; मुन्नालाल : १२१–१२३; **मिस्किन :** २७२–२७३; **डीसी.**

३३ ४ हे चांदपूर (हरद्वार मार्गावर पाथरी रेल्वे स्थानकाच्या पूर्वेस तीन मैलांवर) व चंदीघाट यांचा गोंधळ होऊ नये. चंदीघाट हे ठिकाण गंगा नदीच्या समोरील काठावर उत्तरेस सात मैलांवर म्हणजे हरद्वारच्या दक्षिणेस एक मैलावर आहे.

३५ ५ **डीसी : गुलाम अली** खंड २; २८४–२९६; **मुन्नालाल :** १२५–१२७; **मिस्किन :** २७६–२७७; **इब्रत :** भाग १; २०३–२०७; **बिहारीलाल :** (आय. एच्. क्यू. १९३५ यात मी भाषांतर केले आहे. पहा : पृष्ठ ६४१ व त्यानंतरची पृष्ठे).

३६ ६ **डीसी : मिस्किन** (प्रत्यक्ष हजर होता) २७८–२७९; **इब्रत :** भाग १; २०७.

३७ ७ **पथरगड : मिस्किन** २८१–२८२; **गुलाम अली :** खंड २; २९६ (तुटपुंजी माहिती) **मुन्नालाल :** १२८; **इब्रत :** भाग १; २०८–२१०; **डीसी : बिहारीलाल :** (आय. एच्. क्यू.).

पानिपत संग्रामात भाऊच्या छावणीतून ज्या मराठा स्त्रियांना रोहिल्यांनी दासी बटकी म्हणून पळवून नेले होते, त्या स्त्रियांची, पथ्थरगड मोहिमेतील मराठ्यांच्या विजयानंतर सुटका करण्यात आली होती या श्री. खरे यांच्या विधानाला तत्कालीन फारसी वा मराठी कागदपत्रांत दुजोरा मिळत नाही. शिवाय श्री. खरे हे आपल्या विधानाच्या पुष्ट्यर्थ सबळ आधारही देत नाहीत. (४, पृष्ठ : १८८८).

"नजीबाबाद येथील नजीब उद्दौलाच्या थडग्यावरील वैशिष्ट्यपूर्ण बांधकामाची मराठ्यांनी नासधूस केली; पण श्री. खरे लिहितात तसा त्याचा समूळ उच्छेद केला नाही" [ॲट्किन्सन : एन्. डब्ल्यू. पी. गॅझेटिअर, ५; ३५२]

३८ ८ **इब्रत :** भाग १; २१०; **एसपीडी :** खंड २९; क्रमांक २७७ (२७० वर पूर्ण) २७६, २८५; **मुन्नालाल :** १२९–१३१; **गुलाम अली :** खंड २; २९७–२९८.

४० ९ **डीसी : एसपीडी :** खंड २९; क्रमांक : २७१, २७६; **मुन्नालाल :** १२९-१३१; बिहारीलालचे 'लाइफ ऑफ नजीबउद्दौला' (मी, आय. एच. क्यू, १९३५ यात भाषांतर केलेले) पहा : **इब्रत** भाग १, २१०–२११; **मिस्किन** २८२; **डीसी : एसपीडी :** खंड २९; पृ. ३२६–३२८.

४३ १० मादेक आपल्या मेमुआर मध्ये लिहितो : तिसऱ्या दिवशी (१७ नोव्हेंबर, १७७२) मी बादशहाच्या दरबारात दाखल झालो तो, मी दिल्ली शहरात प्रवेश केला होता त्याच पद्धतीने. (या पूर्वी त्यानेच केलेले वर्णन असे : " उगाच वर वर सांगायचे म्हणून नव्हे, तर माझा दिल्लीतील प्रवेश खरोखरीच एखाद्या विजयोत्सवासारखा होता व कुणीं मामुली असामी यापेक्षा जणू कुणी महाराजाच अशा थाटात मी दिल्लीत आलो होतो ") बादशहाने मला मूल्यवान भरजरी पोशाख, अलंकार म्हणजे मेखला, शिरस्त्राण व मूल्यवान खडा असलेला शिरपेच असे नजर केले. माझा होत असलेला सत्कार पाहून, मी स्वप्नात तर नाही ना, असे माझे मलाच वाटत होते. "

४३ ११ मराठ्यांच्या प्रमुख सरदारांनी बादशहाने आश्वासन दिले होते त्यानुसार १७७१ मध्ये कबूल केलेल्या खंडणीची मागणी केली, तेव्हा बादशहा म्हणाला, " नुकत्याच झालेल्या (रोहिला) मोहिमेत मिळालेली सर्व लूट तुम्हीच बळकावून बसला असून सर्व देशच धुवून काढला आहेत. कष्ट, त्रास आणि काही लाखांचे कर्ज याशिवाय माझ्या पदरात काय पडले ? तुमच्याशी मैत्री करून मला कोणता फायदा झाला ? मिर्झा नजफनेसुद्धा अमरोहा येथे मिळालेले ऐंशी हजार रुपये आपल्या सैन्यासाठी खर्च केले." [**इब्रत** : भाग १; २७५]

मराठे झबिताखान व जाटराजा यांच्यावतीने रदबदली करीत होते त्या संबंधात बादशहा म्हणाला, " मला माझे अधिकार चांगले कळतात. मी सार्वभौम बादशहा आहे, तर झबिताखान आणि जाट राजे निवळ बंडखोर; ते तर माझ्या मालकीचाच मुलूख बळकावून बसले आहेत. " [मादेक]

४४ १२ **डीसी** : मादेकच्या मेमुआर; **इब्रत** : भाग १; २१४–२१७; **मुन्नालाल** : १३५–१३८; **गुलामअली**; खंड ३; ४–६; **मिस्किन** : २८३; **लढाई** : **सीपीसी** : खंड ४; क्रमांक : १२२, १३८; **डीसी** : **मिस्किन** : २८३, **गुलाम अली** : खंड ३; ७–१२; **मुन्नालाल** : १३८–१४०; **इब्रत** : खंड १; २१७–२१८, **मादेक** (उत्कृष्ट माहिती)

४७ १३ एका खलित्यानुसार [**सीपीसी** : खंड ४; क्रमांक : १२२] झबिताखानाच्या तुकडीतील शिपाई धरून मराठ्यांकडे पस्तीस हजार शिपाई होते. दोन्हीकडील मिळून तीन ते चार हजार जवान मरण पावले. मराठ्यांनी ११ तोफा, ५ हत्ती, व मादेक आणि नजफचे सर्व तंबू, राहुट्या लुटून आणल्या.

४८ १४ शरणागतीच्या ज्या मसुद्यावर बादशहाने दस्तखत केले होते त्यातील अटी अशा होत्या : (१) आपल्या संरक्षणासाठी बादशहाने जरुरीपेक्षा

अधिक पलटणी ठेवू नयेत. (२) जाटांकडे जो व जेवढा मुलूख होता तो त्यांस परत करावा. (३) झबिताखानला मीरबक्षी करण्यात यावे व त्या आधी त्याच वर्षात बादशहाच्या फौजांनी त्याचा जो मुलूख घेतला असेल तो त्यास परत देऊन टाकावा. (४) बादशहाने युद्धखर्च म्हणून मराठ्यांना रु. [जागा कोरी आहे] द्यावेत व कुरा जहानाबाद हा परगणा तोडून द्यावा. [मादेक].

४९ १५ **डीसी : मादेक; इब्रत** : भाग १; २१९–२२२; **मिस्किन** : २८५–२८६; **गुलाम अली** : खंड ३; १४–१८; **मुन्नालाल** : १४१–१४४.

५० १६ **रामघाट मोहीम :** मॅक्फर्सनचे 'सोल्जरिंग इन इण्डिया' व **सीपीसी** खंड ४ (दोन्हीतही संपूर्ण व उत्कृष्ट माहिती आहे) **डीसी : ऐतिहासिक टिपणे,** खंड ६; १७; **एसपीडी** : खंड २९; क्रमांक : २७८ आणि ३३१–३३३, ३४१, ३४८ ही पृष्ठे (मराठ्यांनी दररोज तीन हजार रुपये देण्याच्या बोलीवर नजफला आपल्या नोकरीत घेतले) **इब्रत** : भाग १; २२२–२२८ (बारीक सारीक तपशीलासह) **मिस्किन :** २८७–२८८ (स्वतः हजर होता) **गुलामअली** : खंड ३; १८–१९ आणि **मुन्नालाल** १४४–१४५ (त्रोटक माहिती) **बिहारीलाल. गुलशन–ई–रहमत.**

५२ १७ कॅप्टन मॅक्फर्सन लिहितो, " १५ एप्रिल : मराठ्यांच्या गोटातून आलेली खबर अशी की गेल्या दोन रात्री, ते घोड्यावर खोगीर घालून जय्यत तयारीत आहेत. 'तुमचा आमच्याशी लढाई करण्याचा विचार आहे का ?' असे नजफखानाने तुकोजीस विचारले तेव्हा त्याने उत्तर केले की, 'आमचा ओढा जास्त करून लुटालूट करण्याकडेच आहे.' दि. १८. मराठे सांप्रतच्या परिस्थितीत फार अस्वस्थ आहेत. विसाजीने आपला मुख्य दिवाण दादो मल्हार यास तुकोजीकडे पाठविला व 'वझीर आणि इंग्रज यांच्या विरुद्ध शस्त्र उपसण्यास तू कारण आहेस' असा ठपकाही त्याच्यावर ठेवला. तुकोजीने हा आरोप साफसाफ फेटाळून लावला " (दोघांतील आणखी कलह) (१२३–१२४)

५३ १८ वझीर प्रकरणाबाबत पहा : **सीपीसी** : खंड ४; क्रमांक : ४७५ आणि हफीज रहमतचे उत्तर, ४८१; आश्वासन दिल्याप्रमाणे रोहिल्यांना शुजाला रक्कम देणे का जमले नाही याचा खुलासा बिहारीलालने आपल्या लेखात दिलेला आहे. (आय. एच. क्यू. : १९३६)

प्रकरण २८ वे

जाटसत्तेचा ऱ्हास (१७७३–१७७६)

१. दिल्लीतील अधिकारी मंडळीतील फेरफार : अबदुल अहदचा उदय : त्याचे स्वभाव-विशेष

मराठ्यांना रोहिलखंड मोहिमेत शेवटी अपयश घ्यावे लागले. पाठोपाठ २० मे, १७७३ रोजी मिर्झा नजफखान पुन्हा दिल्लीत आला. त्याच्या पुनरागमनानंतर दिल्ली दरबारातील अधिकारी मंडळीत जे फेरबदल झाले ती एक प्रकारची क्रांतीच म्हणायला हवी. दुसऱ्या शहाअलमजवळ दुसऱ्यावर छाप बसवील असे श्रेष्ठ धारिष्ट नव्हते, हिम्मत नव्हती, व्यक्तिगत धीटपणाही नव्हता. स्वतःची छाप पाडणाऱ्या हिकमती व बुद्धिमान माणसाच्या अंकित होऊन राहणे एवढेच त्याच्या नशिबात होते. त्याची मर्जी फिरेल, त्याप्रमाणे त्याच्या खास कृपेतील एकामागून एक जे अधिकारावर येत तेच त्याच्यावर हुकमत चालवीत. बादशहा हद्दपारीचे जिणे जगत होता तेव्हा अलाहाबाद येथे मुनीरउद्दौला त्याचा कारभार पाहत असे. त्यावेळी बादशहावर त्याचा विशेष प्रभाव होता. कारण काय, तर बंगालमधील इंग्रजांचा मुनीरवर पूर्ण विश्वास. बादशहाने पूर्वेकडील (बंगाल) प्रांतांचे दिवाणी हक्क इंग्रजांना दिले होते. त्या बदल्यात बादशहाला प्रतिवर्षी खंडणीदाखल सव्वीस लाख रुपये देण्याचे आश्वासन इंग्रजांनी दिले होते. या एकमेव उत्पन्नातून बादशहाचा खासगी व अधिकारी वर्गाचा खर्च चाले. खंडणीची रक्कम वेळच्यावेळी न येता थकबाकी वाढू लागली. त्याचा दुष्परिणाम असा झाला की, मुनिरुद्दौलाच्या धोरणाची इंग्रजांनी कितीही तारीफ केली तरी बादशहावर त्याचे वजन पडत नसे. अशी प्रत्येक बाब बादशहाच्या लेखी गुन्हाच ठरे. बादशहाला दिल्लीला जाऊन तिथे स्थानापन्न व्हायचे होते. मुनीरने बादशहाच्या या नाजुक महत्त्वाकांक्षेलाच छेद द्यायचा प्रयत्न केला. त्यामुळे बादशहाच्या मर्जीतून तो पूर्णपणे उतरला. नंतर खाशी मर्जी झाली ती सैफुद्दिन मुहमदखान कश्मिरी (यालाच सैफ-उल्-मुल्क असा किताब होता.) या माणसावर. मराठ्यांनी बादशहाला पुन्हा दिल्लीच्या तख्तावर आरूढ होण्यासाठी जरूर ते साहाय्य द्यावे, याबाबत मराठ्यांशी प्रत्यक्ष वाटाघाटी करून त्यानुसार घडवून आणण्यात याचा पुढाकार होता. दिल्लीचा किल्ला मराठ्यांनी सर केला तेव्हा बादशहाच्यावतीने यानेच त्याचा ताबा घेतला. बादशहा अलाहाबादहून दिल्लीला जायला निघाला त्यावेळी प्रमुख सल्लागार म्हणून हाच काम पाहत होता. नशीब असे, बादशहा दिल्लीला येऊन जेमतेम पंधरवडा लोटला असेल नसेल, हिसामउद्दौला ह्या बादशहाच्या मर्जीतल्या नव्या माणसाने त्याला वरील महत्त्वाच्या स्थानावरून दूर करायला

लावले. कारणेही सबळ मिळाली. सैफुद्दीनजवळ राज्यकारभार कार्यक्षम ठेवण्यास लागणारा वकूब नव्हता. जेवढा वसूल हाती येई त्यातून मागणीनुसार बादशहाला त्याच्या शाही गरजा पुरविण्यासाठी लागणारा पैसा पुरविणे त्याला जमेना. जो थोडाफार पैसा जमला तो बादशहा दिल्लीस येताना त्याच्या दिमतीला ज्या फौजा होत्या त्यांच्यासाठी खर्ची पडला.

बादशहाच्या अलाहाबाद येथील अल्पकालीन मुक्कामात मुनिरुद्दौला हा त्याच्या विशेष मर्जीतला होता. त्यावेळी हिसाम हा त्याचा मनस्वी द्वेष करीत असे. त्याला हुसकावून लावून हिसाम प्रमुख झाला तरी त्यालाही शाही तिजोरीत विशेष भर टाकता आली नाही. डिसेंबर १७७२ मध्ये मराठे दिल्लीवर चालून आले, त्यावेळी तो त्यांच्याबाजूने होता त्याचेही दुष्परिणाम त्याला भोगावे लागले. रोहिलखंड मोहिमेत मिळालेल्या प्रचंड लुटीची बादशहाबरोबर वाटणी करताना मराठे बादशहाला खूष करू शकले नाहीत. शिवाय त्यांचे हिंदुस्थानात जे लष्करी वर्चस्व होते तेही ते संभाळू शकले नाहीत. त्यांचा धाक कमी झाल्याने शाही दरबारातील त्यांच्या पाठीराख्यांनाही त्याचे परिणाम जाणवले. त्यांचा वरचष्मा कमी झाला. नजफने अगदी विरुद्ध असे म्हणजे मराठ्यांशी सरळ सरळ लढा देण्याचे धोरण, हिसामचे वर्चस्व होते तेव्हाही बोलून दाखविले होते. पण बादशहाला ते पसंत नव्हते. आता त्याचाच उदोउदो चालला होता. शिवाय नजफखान हा इंग्रजांचा जुना आश्रित व त्यांचा सततचा स्नेही. नजफने प्रयत्न केला तर बंगालमधून येणारी सव्वीस लाखांची खंडणी पुन्हा येऊ लागेल ही बादशहाला आशा. १७७० सालात दुष्काळ पडला, त्याचा फायदा घेऊन बंगालच्या गव्हर्नरने बादशहाकडे खंडणी पाठविणे बंद केले होते. कुरा आणि अलाहाबाद या प्रांतांचे दिवाणी हक्क मराठ्यांना मिळवून देण्यात हिसामने विशेष लक्ष घातले, त्यामुळे इंग्रजांचाही त्याच्यावर राग होता. राजकारणातील या चुकीच्या पावलामुळे त्याला बरीच मानहानी सोसावी लागली. अपयश व कमीपणा घेऊन मराठे हिंदुस्थानातून आपल्या प्रांतात निघून गेल्यावर बादशहा व इंग्रज यांच्यातील दुरावा दूर करून पुन्हा ममत्वाचे संबंध जोडायचे तर त्याकामी मिर्झा नजफखान हाच योग्य माणूस होता. जाट व अन्य उपटसुंभ बंडखोर यांनी थकविलेली खंडणी व बळकावलेला मुलूख परत घेण्याची ताकद लढाया खेळलेल्या नजफखानमध्येच होती. हिसाम मुळी लढवय्याच नव्हता.

दि. २० मे, १७७३ रोजी नजफखान दिल्लीत परत आला. दरबारात त्याचे अभूतपूर्व स्वागत व सन्मान करण्यात आला. त्यानंतर दोन दिवसांनी अबदुल अहद खान याची नायबवझीर म्हणून नेमणूक करण्यात आली. नजफनेच त्याच्या नावाची शिफारस केली होती. हिसामउद्दौलाला त्याच्या जागेवरून कमी करण्यात आले. त्याला बहुमानाचे जे किताब व अधिकार होते ते काढून घेण्यात आले. तो साध्यासीध्या हिसाम या नावाचा धनी झाला. अबदुल अहदला 'मजूउद्दौला बहराम जंग' ही पदवी बहाल करण्यात आली. प्रथम तो नजीबउद्दौलाकडे नोकरीला होता व नजीबने दिल्लीत जे अधिकारी नेमले होते त्यांच्या हाताखाली तो काम करीत असे. शहा अलम दिल्लीबाहेर होता तेव्हा राणीमाता व भावी वारस राजपुत्र दिल्लीत होते. त्यावेळी बादशहा व या दोघांमधील निरोप परस्परांना

पोहोचविणे हे याचे काम होते. सप्टेंबर, १७६९ मध्ये राजघराण्यातील या दोन महनीय व्यक्तींचा निरोप बादशहाकडे पोहोचविण्याचे महत्त्वाचे काम त्याने केले होते. तसेच एप्रिल १७७० मध्ये नजीबउद्दौलाचा वकील म्हणून अंतर्वेदीत जाऊन तो मराठ्यांना भेटला होता. नजीबच्या मृत्यूनंतर तो झबिताखानाच्या पदरी राहिला. बादशहा अलाहाबादकडून दिल्लीकडे जात असताना त्याला वाटेत भेटून झबिताच्या योजना सांगणे व त्याचे नजराणे पोहोचविणे हे काम त्यानेच केले होते. (१९ नोव्हेंबर, १७७१) पत्थरगडचा किल्ला पडल्यावर झबिता पळून गेला. त्यानंतर अहद किल्ल्यातून बाहेर आला. आपण ज्याच्याकडे येतो तो बादशहाविरुद्ध बंड करणारा, तेव्हा त्याबद्दल त्याने बादशहाकडे क्षमायाचना केली, व बादशहानेही तशी दया दाखवून त्याचा गुन्हा माफ केला. (३० मार्च, १७७२) बादशहा त्याच्या आदबशीर वागण्यावर व मिठ्ठास बोलण्यावर खूष होता, तरीही त्यानंतर जवळ जवळ वर्षभर त्याला राजदरबारात घोटाळत रहावे लागले. 'माझी आपणावर पूर्ण श्रद्धा असून मी नेहमी आपल्याच मागे आहे, इतकेच नव्हे तर वेळ येईल तेव्हा दरबारात मी आपल्याच पाठीशी राहीन.' अशी साखरपेरी आश्वासने देत देत त्याने नजफखानाला आपलासा केले, त्याचा पूर्ण विश्वास संपादन केला व अशा प्रकारे नायबवझीरपद पटकावले[१] (२२ मे, १७७३).

विलक्षण आदब, अजब मार्दव, सावध पण मिठ्ठास वाणी हे काश्मिरी मुसलमानांचे सर्व स्वभावविशेष अहदजवळ होते. त्यामुळे तो बादशहास प्यार वाटावा असाच एक दरबारी होता. अल्पावधीतच तो बादशहाच्या व्यक्तिगत मर्जीतला एक, एवढेच नव्हे तर त्याचा खास दोस्तच बनून राहिला. पण त्याला आपली हुकमत गाजविता येत नसे. एरवी सर्वसाधारण परिस्थितीत कावेबाजपणा, पाताळयंत्री व दुटप्पी धोरण या शस्त्रांच्या जोरावर तो कुणालाही हार गेला नसता; पण धकाधकीच्या मामल्यात व बदलत्या परिस्थितीत ती शस्त्रे बोथट होती.

बादशहाच्या सैन्याचा रोजमुरा वाटणारा बादशहाचा दुय्यम अधिकारी (सेकंड पेमास्टर जनरल) या पदावर दि. ५ जून १७७३ रोजी नजफखानाची नेमणूक झाली. नामधारी मीरबक्षी झबिताखान हा नामधारी वझीर शुजाउद्दौला याच्याप्रमाणे राजधानीत नेहमीच अनुपस्थित असे. शुजाउद्दौलाची सर्व कामे त्याचा दुय्यम म्हणून प्रत्यक्षात अबदुल अहदच करीत असे. वरील दिवशीच हिसामची त्या जागेवरून पदच्युती करण्यात येऊन त्याला गजाआड टाकण्यात आले. पण नजफखानाने आपल्या नेहमीच्या धीम्या दूरदृष्टीने, त्यानंतर पाचच दिवसांनी त्याच्याबद्दल बादशहाकडे रदबदली करून त्याची सुटका करविली व त्याला तो आपल्या घरी घेऊन आला. हिसामच्या अखत्यारीत जेवढा काळ सरकारी मुलुख व पैसाअडका यांची त्याच्यावर जोखीम होती त्या काळातले हिशेब पुरे करायला नजफने त्याला सांगितले. हिसामकडे जे येणे निघत होते. त्यापोटी त्याने बादशहाला सहा लाख व नजफखानला तीन लाख रुपये दिले आणि हिशेब मिटवून टाकला.

इमाद–उल्–मुल्क वझीर असताना महदी कुलीखान या माणसाचे चांगलेच फावले होते. या माणसाने दिल्लीतील प्रजेला अतोनात छळले, त्यांच्यावर जुलूम जबरदस्ती केली. हिसामच्या कारकीर्दीत तर याने आपले उखळ चांगलेच पांढरे करून घेतले. पाठिराख्या हिसामचा संरक्षक हात गेल्यावर या मस्तवाल महदीलाही बिनभाड्याची खोली पहावी लागली. (१४ जून) एक महिना मारहाण करण्यात आल्यावर त्याला साखळदंडाने हत्तीच्या पायाशी जखडण्यात आले व दिल्लीतील रस्त्यातून फरफटत व ठेचकाळत जाताना होणाऱ्या दुःखाने यमयातना भोगाव्या लागल्या. (१२ जुलै), [मुन्नालाल १४८–१४९ इब्रत, भाग १ : २२९, २४३–२४४; डीसी]

२. मिर्झा नजफची नवी सेना : त्याचे लष्करी श्रेष्ठत्व

हेवेखोर प्रतिस्पर्ध्यांची कपट-कारस्थाने व चहाड्याचुगल्या यातून सहीसलामत सुटून मिर्झा नजफ, त्यावेळेपुरता तरी निश्चिंत झाला. आपल्या नेहमीच्या जिद्दीने व जयिष्णु-वृत्तीने बादशहाचे असे एक खास सैन्य उभारणीच्या कामास त्याने सुरवात केली. त्याच्या नावाला एक विशिष्ट दर्जा व महत्त्व असल्याने, तो या कामात आहे हे समजताच तूर्त काम नसलेले जुने व सर्व ठिकाणचे सर्व थरांतील महत्त्वाकांक्षी नवे जवान त्याच्या भोवती गोळा झाले. त्याशिवाय आपल्या हाताखाली त्याने काही कार्यक्षम व विश्वासू साहाय्यक जमा केले होते, त्यांचाही या कामी त्याला चांगला उपयोग झाला. यापैकी काहींचा नाम-निर्देश करावयाचा तर नजफकूली खान व अफ्रासियाब खान (या दोघांना नजफचे दत्तकपुत्र म्हणूनच ओळखीत) आणि मुहमद बेग हमदानी. त्याशिवाय त्याच्या खास मुगलिया घोडदळात पुढील अधिकारी होते. ते म्हणजे कुलीच बेग, नियाझ बेग, मिर्झा बेग, बादल बेग व इतिहासातील महत्त्वाच्या आठवणी लिहून ठेवणारा ताहमस्प खान (मिस्किन या टोपण नावाने तो लिहीत असे) हे होत. एक दिवस नजफच्या नव्या सेनेत भरती होण्यासाठी म्हणून मुल्ला रहिमदाद हा माणूस दाखल झाला. त्याच्या समवेत तीन हजार रोहिले होते. हे रोहिले अत्यंत निराश, उद्विग्न, अंगभर कपडा नसलेले, तसेच हातात शस्त्र वा अंगावर चिलखतही नसलेले अशा अवस्थेत होते. सैन्यभरती होण्यात उपासमार टाळावी हाच माफक हेतू. दिल्लीसभोवतालचे प्रदेशात, विशेषतः मेवातमधील बलुच वस्त्या या ठिकाणी सैन्यभरतीसाठी जोरदार प्रयत्न करण्यात आले. त्याला ताबडतोब पुरेसा प्रतिसाद मिळाला. अल्पावधीत वीस हजारांहून अधिक जवान सैन्यात भरती झाले.

आता प्रश्न आला या जवानांसाठी कपडालत्ता व जेवणखाण कोठून पुरवायचे ? शाही खजिन्यात ठणठणाटच होता. झबिताखानकडून पैसा उकळण्याचा प्रयत्न फसला होता. त्यानंतर पैसा मिळवायचा एकच मार्ग म्हणजे सर्वांत संपन्न अशा जाट राजावर चालून जाणे. नव्याने उभारलेल्या या प्रचंड सैन्याला पगार न देणे म्हणजे दिल्लीतील शांतता सतत धोक्यात ठेवणेच होते. म्हणून या नव्या सैन्याला जाटांविरुद्ध चाल करून जाण्यास सांगण्याच्या अटीवर अबदुल अहदने नजफला दोन लाख रुपये दिले. नजफच्या

दोघा साहाय्यकांनी वैयक्तिक जामिनावर आणखी एक लाख रुपये उभे केले. अशा प्रकारे या नव्या सेनेची सर्व सिद्धता झाल्यावर तिला नवलसिंगावर पाठविण्यात आले. या मोहिमेत जो प्रदेश व लूट हाती पडेल त्याची बादशहा व त्याचा सेनाप्रमुख नजफखान यांच्यामध्ये निमेनिम विभागणी व्हावी असे ठरले. शाहीसैन्याचे पगारवाटप करणारा बादशहाचा उपअधिकारी या पदाव्यतिरिक्त नजफला आग्राप्रांताची सुभेदारीही बहाल करण्यात आली. विशेष म्हणजे आग्रा प्रांत अद्याप जिंकून घ्यायचा होता.

नजफचे लष्करी श्रेष्ठत्व कशात होते ? तोफखाना, बाण, व छोटया बंदुका यांचा सैनिकांना तो पुरेसा व अविरत पुरवठा करी. बंदुकधारी शिपायांच्या त्याने सहा पलटणी उभ्या केल्या. त्यातील दोन पलटणींना इंग्रज अधिकाऱ्यांकडून शिक्षण मिळाले होते. उरलेल्या चार, ज्यांनी पूर्वी इंग्रजांकडे नोकरी केली होती अशा सेनाधिकाऱ्यांच्या हाताखाली होत्या. उर्वरित बदक्षींना (हे सर्व जुने मुरलेले व इराणी युद्धतंत्राशी परिचित होते) व नजीबउद्दौलाचा मृत्यू व त्याच्या मुलाचा पराभव झाल्यानंतर त्या सैन्यातून हताश निराधार अवस्थेत बाहेर पडलेल्या बऱ्याच मोठ्या शिपायांना नोकरीवर घेण्यात त्याने चांगली दूरदृष्टी दाखविली. त्याशिवाय तज्ज्ञ व कार्यकुशल अशा पाश्चिमात्य सेनाधिकाऱ्यांचा सल्ला, तो घेत असे. त्यातील मेजर पोलिअर हा एक. जानेवारी, १७७४ च्या मोहिमेत या मेजरने जी चमक दाखविली त्याबद्दल लष्करातील अत्यंत कुशल तंत्रज्ञ म्हणून वॉरन हेस्टिंग्जने त्याचा गौरव केला होता. १७७५–१७७६ च्या लढाईतही असेच कौशल्य दाखविल्याबद्दल रेने मादेक आणि कॉन्त द मॉदेव या दोघांनी त्याचे असेच कौतुक केले होते. या व्यतिरिक्त त्याचे युद्धातील नैपुण्य व सैनिकांशी वागण्याची व त्यांच्यावर जरब ठेवण्याची हातोटी हीही उठून दिसणारी होती.[२]

३. जाट लष्करी सामर्थ्याला उतरती कळा : त्याची कारणे

अशा या बलाढ्य सामनेवाल्यांसमोर जाटांचा बिलकुल निभाव लागला नाही. बंदुकांचा शिस्तबद्ध वापर व अन्य डावपेच यांचा समन्वय साधण्याचे जे नवे तंत्र इंग्रजांनी येथे आणले, ते जाटांनी आत्मसात केले नव्हते. एतद्देशीय युद्धतंत्र व डावपेच यांत जाट सैनिकांना सूरजमलने तयार केले होते. त्यातील श्रेष्ठ दर्जापैकी त्यांच्याजवळ आता काहीही उरले नव्हते. त्यांच्यातील जाणकार सेनानी कालवश झाले होते. त्यांच्यातील प्रमुखांपैकी बरेचसे जवाहिरसिंगच्या स्वार्थीवृत्तीला बळी पडले होते व उरलेल्यांना काळाने बाजूला केले होते. या नरपुंगवांची जागा घ्यायला नव्याने कुणी तरुण माणसे पुढे येतच नव्हती. जाट राजा हा स्वतः दुबळा व भोगविलासात अडकून पडणारा. पूर्वजांजवळ जे एक रासवट धाडस होते त्याचाही याच्याठिकाणी अभाव होता. दरबार, कौटुंबिक तंटेबखेड्यांनी पोखरलेला होता. भांडकुदळ भाऊ व चुलते विरोधात उभे राहिलेले व बालू जाटाच्या मुलांनी तर उघड उघड फितुरी केलेली. बादशहाच्या प्रलोभनांना बळी पडून मादेक आक्टो. १७७२ मध्ये त्याच्याकडे गेलेला व मे १७७४ मध्ये समरूनेही त्याच्याच पावलावर पाऊल टाकलेले.

सूरजमल राजा होता तेव्हा केवळ संरक्षक पवित्रा घेऊन जाटसत्तेने दुराणी शहा-सारख्या बलाढ्य शत्रूशी यशस्वी मुकाबला केलेला होता. पण... मिर्झा नजफकडे काही विशेष होते. गरुडझेप घेऊन घणाघाती हल्ले करणे ; योग्य पद्धतीने अचूक वेळ साधणे व डावपेचाच्या दृष्टीने झटकन पवित्रा बदलणे, या सर्वांवर जाटांना मात करणे जमले नाही. सूरजमलने जाटांना हिंदुस्थानात गौरवास्पद उच्चं स्थान निर्माण करून ठेवले होते. १७७३–७४ व १७७५–७६ सालांत बादशहाने जाटांवर ज्या मोहिमा काढल्या त्यांत जाटांची अपरिमित हानी झाली. दि. ३० ऑगस्ट, १७७३ या दिवशी पुण्यात नारायणराव पेशव्याचा खून झाला. त्यानंतर अंतस्थ व परस्थ कटकटीतच मराठ्यांचा वेळ गेला. नंतरची अकरा वर्षे मराठे चंबळेपुढे येऊ शकले नाहीत. दिल्लीचा बादशहा व त्याचा बंडखोर मांडलिक जाट राजा यांच्यातला संघर्ष हा केवळ त्या दोघांपुरताच राहिला.

४. दानशहा जाट व चंदू गुजर यांचा अंतर्वेदीत पराभव : सप्टेंम्बर, १७७३

शाहीसेना बरोबर घेऊन मिर्झा नजफने जाट मुलखावर हल्ला केला त्या आधी बादशहा व जाट यांच्यात छोटीशी चकमक उडाली होती. परस्परांना आपापल्या ताकदीची जाणीव देणारी ही चकमक अंतर्वेदीत बुलंदशहर जिल्ह्यात दिल्लीच्या आग्नेयेस उडाली.[३] पावसाळ्यातही दिल्लीत शस्त्रांची जमवाजमव सुरू आहे, हे जाट राजाच्या नजरेतून सुटले नव्हते. त्या वेळी अंतर्वेदीत जे जाट सैन्य होते, त्याचे आधिपत्य दानशहाकडे होते. दानशहा हा जाटांकडचा उत्कृष्ट सेनाप्रमुख. जाट राजाच्या हुकुमानुसार त्याचे सैन्य व अलिगढचा सुभेदार चंदू गुजर हे डंकौरपासून पुढे आले व सिकंदराबादपासून गाझियाबाद-पर्यंतच्या शाही मुलुखात त्यांनी धुंडावा मांडला. (१–२ सप्टेंबर, १७७३) ही बातमी येताच नजफने जे सैन्य तिकडे रवाना केले, त्यात ताज मुहमद बलुच व नियाझबेग यांच्या नेतृत्वाखाली सहा हजारांचे मुगलिया घोडदळ होते; व कमान्डन्ट रामरू याच्या हाताखाली, इंग्रज अधिकाऱ्यांकडून युद्धतंत्राचे शिक्षण घेतलेल्या दोन पलटणी होत्या. नजफने या सैन्याबरोबर पुरेशा बंदुका व बाणही दिले होते. (७ सप्टेंबर) हे शाही सैन्य शहदरालाला पोहोचले, त्याच क्षणी जाट बंडखोरांनी घाई करून त्यांच्या तळापर्यंत माघार घेतली. शाही फौजा त्यांचा पाठलाग करीत त्यांच्यामागे धावत होत्या; व प्रत्यही अधिकाधिक जाट शिपायांचा निकाल लावीत व त्यांच्या लष्करी छावणीतील सामानाची लूटमार करीत होत्या.

डंकौरच्या बाहेर एका ठिकाणी प्रतिकारासाठी खंदक आणि टेकड्यांमुळे सुरक्षित अशी उत्कृष्ट जागा मिळाली. तिथे शत्रूंशी निकराचा सामना द्यायचा असे ठरवून जाटसैनिक शाही सैन्यावर तुटून पडले. [१६ सप्टेंबर] " चंदू गुजरने शाही तोफखान्यावर हल्ला चढविला. शाही तोफांतून कुलपी गोळे सुटू लागले. बंदुकधारी पलटणींनी गोळ्यांचा भडिमार केला व तोही अगदी अचूक नेम धरून. जाटांच्या चपळ स्वारांना याची कधी कल्पनाही नसल्याने ते धडाधड मरून पडू लागले. चंदू गुजर जबर जखमी झाला तरी तसाच शिपायांच्या रांगेत घुसला व शेवटी बागनेटाने मारला गेला. " विस्कळित झालेले

जाटसैन्य पळून गेले. दरम्यानच्या वेळात दानशहा प्रवाह पार करून आपल्या काही हजार स्वारांसह शाही फौजांच्या पिछाडीकडील अंगावर तुटून पडला. बराच काळ हातघाईची लढाई चालली होती. शेवटी ताज मुहमदखानाने जो निकराचा प्रतिहल्ला केला त्याने जाट-सेनेचा धुव्वा उडाला. दानशहा स्वतः जबर जखमी झाला व रणांगणातून पळून गेला. या मोहिमेत तीनहजारांहून अधिक जाट मरण पावले. त्यांची अगणित मालमत्ता शत्रूने लुटून नेली. या प्रांतातून जाट सत्ता संपूर्ण नष्ट झाली. शाहीफौजांच्या या तुकडीने नदीपार येऊन पश्चिम तीर गाठले व ती नजफच्या सैन्याला मिळाली.

५. मिर्झा नजफची जाट मुलुखावर स्वारी : यशस्वी चढाई

मुगलांचा हा सर्वोच्च सेनाधिकारी स्वतःच दि. २४ सप्टेंबरला दिल्लीहून निघाला व बडापुला येथे येऊन त्याने आपला तंबू ठोकला. या मोहिमेत त्याला झालेला पहिलाच शुभशकुन म्हणजे मैदानगढी त्याने अगदी हसतहसत हस्तगत केली. शाहीसत्तेला आव्हान देण्यासाठी सूरजमलने त्या सत्तेच्या नाकावर टिच्चून बांधलेली ही गढी दिल्लीच्या दक्षिणेस अवघ्या तेरा मैलावर आहे. (कुतुब मिनारच्या दक्षिणेस पावणेदोन मैल) नजफच्या प्रचंड गोळीबाराने गढीच्या तटावर पहारा करणारी गांवढळ जाट शिबंदी तेव्हाच पळून गेली व हातात समशेरी घेतलेल्या नजफच्या पायदळाने गढीच्या भिंताडावर चढून अवघ्या एकाच हल्ल्यात ती मैदानगढी सर केली. दुसऱ्या एका भागात फरुकनगर येथील जाट सैन्याची तुकडी हरसारू गढीवर हल्ला चढवीत होती. मिर्झाचा साहाय्यक सेनाधिकारी नजफकूली-खान याने दि. ५ आक्टोबरला या तुकडीवर चाल केली व जाटांचा पराभव करून त्यांची दाणादाण उडवून दिली.[४]

दिल्लीहून निघाल्यावर बडापुला आणि बहादरपूर या मार्गे नजफखान हा बल्लभगड येथे आला. हे ठिकाण दिल्लीच्या पश्चिमेस पंचवीस मैलांवर आहे. या ठिकाणी नजफला अशी काही भाग्यकारक घटना घडली की, त्यामुळे त्याची ताकद आणखी वाढली. वल्लभ-गड किल्ल्याची तटबंदी भलतीच मजबूत. जाट राजाच्या अगदी उत्तरेकडील विस्ताराची भक्कम तटबंदीच. हा प्रचंड किल्ला ज्याने बांधला त्याचे अजित व हिरासिंग हे दोन वारस. या दोघांचे तेथील परिसरात चांगले वजन असून दोघांनाही स्थानिक परिस्थितीची पूर्ण माहिती. त्या दोघांना वारसाहक्कापासून वंचित करण्यात आल्याने दोघेही चिडून नजफकडे आले होते. नजफला पूर्ण मदत करण्याचे त्यांनी कबूल केले, अट एवढीच होती की, जाट राजाच्या किल्लेदाराकडून किल्ला काबीज करून घेतल्यानंतर त्याचा वडिलार्जित वारसा त्यांना परत द्यावयाचा. मोहिमेची सुरवात होत आहे नाही तो नमनालाच अजित व हिरासिंग यांच्यासारख्यांनी फितुरी करावी या घटनेने नवलसिंगाच्या निर्धाराची कंबरच मोडली. प्रथम तो बावनी खेडा (पलवालच्या दक्षिणेस सहा मैल) येथे तळ देऊन होता. तेथून तो आणखी दक्षिणेकडे सरकला व नऊ मैलांवर असलेल्या वनचरी येथे आला. त्या ठिकाणी त्याचे सैन्याने खंदक खणून तळ ठोकला. मिर्झानजफ हा शिक्रीफत्तेपूर बिलोच येथे होता.

हे ठिकाण वल्लभगडच्या दक्षिणेस पाच मैलांवर व पलवालच्या उत्तरेस नऊ मैलांवर आहे. त्यावेळी त्याच्या सैन्यातील एक अधिकारी नजफकूली हा मेवातमधील मोहीम यशस्वी करून नुकताच परत आला होता. वाटेतला शत्रूचा अडथळा दूर करण्याच्या कामी नजफने पुन्हा त्यालाच जायला सांगितले. प्रतिदिनी चकमकींना तोंड देत, जाटांचे पहारे दूर करीत नजफ कूली पुढे पुढे घुसत होता. त्याला संरक्षणात्मक पवित्रा घेणारा शत्रू आढळलाच नाही. त्या दृष्टीने जाटांचा त्रास नव्हताच. जाटराज्याच्या उत्तर भागातील खेडी शाही फौजांपुढे पटापट नांगी टाकीत होती. "शरदातील भरघोस पिके ऐटीत डोलत होती. रस्त्यातून आढळणाऱ्या ज्वारी बाजरीच्या त्या तयार कणसांवर नबाबाचे सैनिक लांडग्यासारखे तुटून पडले, त्यांची व त्यांच्या घोड्यांची चंगळ झाली. वाटेत लागलेले प्रत्येक गांव त्यांनी लुटले, घरादारांना आगी लावल्या, हाती लागलेली गुरेढोरे, शेळ्यामेंढ्या बरोबर नेल्या, पुढे कवडी किमतीने फुकून टाकल्या अगर स्वतःच खाऊन फस्त केल्या. मुल्ला रहिमदादचे पोट पाठीस लागलेले. भुकेबंगाल व बुभुक्षित शिपाई, लुटीत मिळाले ते फस्त करून गलेलठ्ठ बोक्यासारखे माजले. लुटीतील धड कपडे अंगावर चढविल्यानंतर त्यांच्या चेहऱ्यावरील हिंस्र श्वापदाची रानटी अवकळा जाऊन ते माणसासारखे दिसू लागले. (इब्रत, भाग १ : २३१, मिस्किन, २९०)

आपल्या प्रमुखाने भीतीने पळ काढला हे पाहून जाट सैन्य इतके हताश व गर्भगळित झाले होते की, या व्यर्थ भीतीपोटी त्यांनी आत्मनाश ओढवून घेतला. दि. १० आक्टोबर, वनचरी येथे पडलेला जाट सैन्याचा तळ, वेळ मध्यान्हीची, सगळे पोटपूजेच्या तयारीत होते. एकाएकी पश्चिमेकडून खूप अजस्र असा धुळीचा लोट आला. जाट सैनिकांची समजूत, नजफचे प्रचंड सैन्य विद्युत्वेगाने दौडत येत आहे. छावणीतलेच नव्हे तर हातातील सामानही तिथेच टाकून सर्व जाट सैनिक प्राणभयाने पळू लागले. वादळ नागमोडी वळणे घेत होते. जाट सैनिकांची ही अवस्था पहाताच वनचरी येथील खेडुतांनी त्यांच्या छावणीतील चीजवस्तू लुटून नेली. नजफखान वनचरीच्या अलीकडेच तळ ठोकून होता. त्याच्या सैनिकांना ही वार्ता समजली मात्र, त्यांतील प्रत्येकजण जाटांची छावणी होती त्या ठिकाणावर धावला व शिल्लक राहिले होते त्याची लूटमार करून प्रत्येकजण रात्रीला पुन्हा आपल्या छावणीत परतला. [इब्रत : २३३ : २३४]"

नवलसिंगने कोतबन येथे तेथील घनदाट अरण्य व उंच सखल भागांत आश्रय घेतला. कोतबन हे होदळच्या दक्षिणेस चार मैलांवर व वनचरीच्या आग्नेयेस आठ मैलांवर आहे.

अजित व हिरासिंग या आपल्या नव्या दोस्तांच्या सल्ल्यानुसार नवलसिंगावर हल्ला करावयाचा नाही व सुरक्षित ठिकाणातून बाहेर काढून त्याला अडचणीच्या ठिकाणी आणून लढायला भाग पाडायचे असे नजफने ठरविले होते. त्यानुसार कोतबन मागे टाकून छट्टा आणि साहर परगण्यांतील खेड्यांची लूटमार करीत तो दक्षिण व पूर्व दिशेने पुढे पुढे जात राहिला. वाटेतील या लूटमारीत त्याला प्रचंड पैसा व मालमत्ता मिळाली. त्यानंतर नवलसिंगाने कोतबन सोडले व तो बरसानाच्या पूर्वेस दक्षिणेकडे चौदा मैलांवर असलेल्या

एका मोकळ्या मैदानावर आला. बरसानाच्या पूर्वेस सात मैलांवर सहरनजीक नजफचा तळ होता.

६. बरसानासमोरची लढाई : जाटांची वाताहात : कोतबनचा पाडाव

पहिले दहा दिवस उभयतांत लहान-मोठ्या चकमकी उडाल्या. त्यानंतर ३० ऑक्टोबरला झालेली लढाई मात्र निर्णायक ठरली. ही लढाई सहार आणि बरसाना यांच्या मध्यावर लढली गेली.[५] या लढाईत दोन्ही बाजूला इंग्रजांकडून, व इंग्रजांकडून शिक्षण घेतलेल्या तोपचींकडून कवाईत शिकलेले सैनिक होते. उत्तर हिंदमध्ये बंगाल इलाख्याबाहेर लढली गेलेली अशा वैशिष्ट्याची ही पहिलीच लढाई. त्यामुळे ही लढाई बराच काळ लांबली व लढाईतील मृतांची संख्याही अपवादात्मक अशी मोठी ठरली. विजयी झालेल्या शाही सैन्यातला मृतांचा व जखमींचा मिळून आकडा २३०० तर जाटांकडील २००० झाला. सॉम्ब्रच्या पलटणीतीलही बरेच शिपाई ठार झाले. जाट सैन्याची रचना अशी होती : डाव्या अंगाला बलाढ्य अशा (बहुश: ५०००) नागा गोसाव्यांची शस्त्रसज्ज पलटण. बालानंद गोसावी हा त्यांचा प्रमुख. हे सर्व बंदुकधारी होते. मध्यभागी आपल्या जाट भाईसमवेत स्वत: नवलसिंग व उजवीकडे सॉम्ब्रच्या हाताखाली आपल्या तोफखान्यासमवेत नऊ पलटणी. जाट राजाच्या स्वत:च्या तोफा बरोबर मध्यभागाच्या समोर ओळीत असून, घोडदळाचा हल्ला विस्कळित करता यावा म्हणून एकमेकींना साखळदंडाने बांधण्यात आल्या होत्या. शाही फौजांची रचना अशी होती : उजवीकडे रहिमदाद खान व त्याचे ५००० रोहिले; मध्यभागी मुलगिया घोडदळासह नजफ कूली आणि डाव्याबाजूस रझबेग खान व रहिम बेग या सेनाधिपतींच्या हुकमतीखालील शिस्तबद्ध सैनिकांच्या चार तुकड्या. आघाडीला तोफखाना होता. जुन्या परंपरेप्रमाणे गजारूढ न होता, आधुनिक सेनापतीप्रमाणे मिर्झा नजफ चपळ अशा वारूवर स्वार झाला. उद्देश हा की प्रसंगानुसार चटकन जाता यावे. आपल्या हत्तीवर त्याने मासूम अलीखानला बसविल्याने हाच बक्षी असावा असा शत्रुपक्षाचा गैरसमज झाला व त्याचाच त्यांनी बळी घेतला. या दोन्ही सैन्यांचे दरम्यान उंचच उंच वाढलेली ज्वारी-बाजरीची पिके होती.

दुपारनंतर थोड्याच वेळात तोफांच्या फैरी झडून लढाईला तोंड लागले. तोफांचा धुमधडाका चारतास चालला होता. शेवटी दिवस मावळायला एक घंटा अवधी राहिला असेल अशा समयी दोन्हीकडील फौजा परस्परांच्या अगदी निकट आल्या. शाही फौजेतील उजवीकडील रोहिला पायदळाने नागा गोसाव्यांवर बंदुकीच्या फैरी झाडल्या, नागांनी लागोपाठ गोळ्यांचा पाऊस पाडून त्यांना उत्तर दिले. रोहिले हुषार, जमिनीवर पालथे पडून त्यांनी गोळ्यांचा नेम चुकविला व नागांनी पुन्हा गोळ्या भरायच्या आत चटकन उठून ते त्यांच्याजवळ जाऊन पोहोचले. हातघाईच्या धुमश्चक्रीनंतर भयंकर रक्तपात होऊन नागांचे जवळजवळ हजार सैनिक ठार झाले व ते विस्कळित झाले. रोहिला सैनिकांच्या ओळीतील दुसऱ्या टोकास शाही शिपायांची जी पलटण होती ती सॉम्ब्रवर चालून गेली. "सॉम्ब्रच्या

तुकडीतील सैनिकांजवळ जाऊन पोहोचेपर्यंत गोळ्या झाडायच्या नाहीत, असे या पलटणीतील शिपायांनी ठरविले होते. पण दैवाने त्यांना तेवढा अवधी दिला नाही. सॉम्ब्रच्या बंदुकीतून सुटलेल्या सलामीच्या गोळीलाच शाही पलटणीतील दोन सेनाधिकारी बळी पडले. त्याबरोबर अन्य शिपायांनी आपापल्या हातातल्या बंदुका खाली टाकल्या व ते उंचच उंच वाढलेल्या पिकात जाऊन लपून बसले." लढाईच्या दृष्टीने वेळ अत्यंत आणीबाणीची होती. नजफच्या रणनीतिकौशल्याने या वेळी मंद, सुस्त व भित्र्या जाट सरदारांवर मात केली व त्याला जय मिळाला. आपल्या सैन्याची डावी फळी विस्कळित झालेली आहे हे पाहताच मिर्झा नजफ सैन्याच्या मध्यभागी गेला व तेथील स्वारांच्या तुकडीला त्याने जाटसेनेच्या मध्यभागी हल्ला करायचा हुकूम केला. जाट सेनेच्या आघाडीच्या तोफखान्यात तोफांची केलेली साखळी फोडून त्यातून वाट काढीत मुगलिया स्वारांनी धडकीसरशी नवलसिंगवर हल्ला चढविला. या ठिकाणी रजपूत व जाटांनी शत्रूशी निकराचा सामना दिला. शेवटी नेहमीप्रमाणे नवलसिंगाचा धीर खचला 'वेपथुश्च शरीरे मे' अशा अवस्थेत तो पळून गेला. व मध्यभागी असलेल्या त्याच्या तुकडीने शस्त्र खाली ठेवून लढायचे थांबविले.

शाही फौजा विजयोन्मादाने गर्जत उठल्या. जाटसैन्याच्या मागील अंगासच त्यांच्या धनाढ्य राजाचा डौलदार शामियाना होता. शाहीसेनेतील शिपाईप्याद्यापासून उच्चपदस्थ अधिकाऱ्यापर्यंत सगळेच तिकडे लुटालूट करायला धावले. परंतु लढाई अजून जिंकलेली नव्हती. सॉम्ब्र आपल्या जागी ठामपणे उभा होता. त्याच्या पद्धतीप्रमाणे त्याने आघाडीला आपल्या तोफा ठेवून आपल्या सैन्याची चौकोनी रचना केली होती. या शिस्तबद्ध तुकडीच्या आधारावर जाटांचा दिवाण जोधराज हा आपल्या ५०० स्वारांसह हमला करण्याच्या तयारीत होता. अशा वेळी आपल्या शिपायांनी बाजारबुणग्यांसारखे वागावे हे नजफला पसंत पडले नाही. त्याच्या खास सेवेत असणारे काही सैनिक त्याच्याबरोबर होते. तेवढ्यांच्याच मदतीने त्याने जोधराजच्या घोडदळावर हल्ला चढविला. हे करताना सॉम्ब्रच्या पलटणीतील जवानांना इजा करण्याचे त्याने हेतुतः टाळले. स्वतः नजफच्या अंगावर शत्रूचा भाला आदळला, त्याचे चिलखत भंगले व भाला मांडीत घुसल्याने आतील हाडाला इजा पोहोचली, पण अखेरीस जोधराज निकालात निघाला. यानंतर मात्र सॉम्ब्रने रणांगणातून पाय काढला. त्यावेळीही त्याचे सैनिक परतत होते ते धीमेपणे व हुकुमानुसार. या शिपायांच्या पिछाडीस सॉम्ब्रचा क्रमांक दोनचा सेनाधिकारी आपल्या तुकडीतील शिपायांसह उभा होता. आपल्या जागीच धीमेपणे उभे राहून शिस्तबद्ध पद्धतीने गोळीबार करून लागोपाठ येणारे मुगल स्वारांचे तुफानी हल्ले तो परतवीत होता. यामुळेच सॉम्ब्रच्या आघाडीतील शिपाई जिवंत राहू शकले. शेवटी नजफला हात दिला त्याच्या नशीबाने. या क्रमांक दोनच्या सेनाधिकाऱ्याच्या पलटणीत तोफा चालविण्याचे काम जे करीत होते त्यांपैकीच बऱ्याच जणांना नेमके टिपून नजफने आपल्या बंदुकीचा मोर्चा त्या अधिकाऱ्याकडे वळविला. दुसऱ्याच गोळीला, क्रमांक दोनचा हा शूर फ्रेंच सेनाधिकारी ठार झाला. त्यानंतर मात्र

सर्वच प्रतिकार थंडावला. पाठलाग करायलाही कुणी आले नाही. अशा या संपूर्ण पराभवाचे वेळीही शिस्त व पाश्चात्त्य अधिकाऱ्यांचे नेतृत्व यामुळे समरूचे शिपाई बचावले.

नवलसिंगची छावणी आपल्या कल्पनातीत दौलतीसह युद्धभूमीनजीकच होती. मुगलसेना त्याच्या छावणीवरच तुटून पडली. या लुटीत जाटांचा सर्व तोफखाना, हत्ती, घोडे, उंट, त्याशिवाय अमाप संपत्ती व किमती वस्त्रप्रावरणे मिळाली. नव्यानेच उभारलेल्या बरसाना शहराची नासधूस करून त्यांनी ते अक्षरशः धुवून काढले. या शहराची या वेळी एवढी प्रचंड वाताहात झाली की, त्यानंतर जवळ जवळ एक शतक ते त्याच अवस्थेत राहिले. " दुष्काळात सापडलेल्या व पोट खपाटीस गेलेल्या मुगल शिपायांना पोट भरण्यासाठी कच्ची ज्वारी-बाजरी खायची वेळ निघून गेली. शिजविलेले चमचमीत पदार्थ त्यांच्या पानात पडू लागले." शाही फौजांनी काही दिवस बरसाना येथे मुक्काम केला. त्यांच्यातील अनेकांना जखमा झाल्या होत्या. त्यांच्यावर औषधोपचार करायचे होते. शिवाय अगणित लुटीची व्यवस्था कशी लावायची हाही प्रश्न होता.

ही लढाई होण्यापूर्वीच्या हालचालीतील डावपेचानुसार शाही फौजा होडाळहून निघून छट्टा आणि सहारमार्गे दक्षिणेकडे गेल्या. कोतबनला त्यांनी हातही लावला नव्हता. पण बरसाना येथे जाटांच्या लढवय्या सैन्याची अत्यंत दुर्दशा झाल्यावर मिर्झा नजफचे लक्ष कोतबनकडे गेले. त्यावेळी कोतबन येथे नवलसिंगचा सासरा सीताराम हा प्रमुख होता. रहिमदादच्या हाताखाली एक तुकडी देऊन नजफने त्याला कोतबनवर पाठवले. त्यानंतर त्याला आणखी मदत म्हणून बलाढ्य सैनिकांची आणखी एक तुकडी नजफकूलीबरोबर पाठविण्यात आली. या दोन्ही तुकड्यांनी कोतबनला संपूर्ण वेढा घातला व कोतबनची रसद तोडली. नंतर एकोणतीस दिवसांनंतर नोव्हेंबरच्या अखेरीस एका रात्री कुणाच्याही नकळत सीताराम तिथून निघून गेला. दुसऱ्या दिवशी ते ठिकाण शाही फौजांच्या हातात आले. " तेथील सर्व तोफा, दारुगोळा, तंबू इत्यादी साहित्याचा प्रचंड साठा त्यांना सहजी मिळाला." [इब्रत, भाग १, २४०–४२; चाहर गुलझार ४९३ बी]

७ : नजफखान आग्र्याचा किल्ला घेतो

त्यानंतर नवलसिंगचा पाठलाग करण्यात व त्याचे दुर्गम किल्ले जिंकण्यात वेळ दवडावयाचा नाही असे शाहीसेनाप्रमुख नजफने ठरविले. त्यातही त्याची धोरणी दृष्टी होती. त्याने आपला मोर्चा झटकन् पूर्वेकडे वळविला व वेळ न घालविता तो आग्र्यास आला. आग्र्यातील प्रजेला त्रास होईल, त्यांची बेइज्जत होईल असे काहीही करावयाचे नाही हे त्याने ठरविले असल्याने या शहराचा ताबा त्याला विनासायास मिळविता आला. सैन्यातील शिपायांचा कित्येक महिन्यांचा पगार द्यायचा राहिला होता. पगाराची रक्कम देण्याऐवजी त्यांना आग्राशहर लुटायची मुभा द्यावी व कर्जमुक्त व्हावे, असे हाताखालच्या अनेक सेनाधिकाऱ्यांनी त्याला सांगितले; पण त्याने ते मोठ्या मनाने नाकारले. आग्रा येथील किल्ल्याचा प्रमुख अधिकारी हा दानशहाचा भाऊ होता.[६] अकबराचा हा महान किल्ला जाटांना फार वेळ लढविता आला नाही. दैवाचे फासे नजफला अनुकूल कसे पडले ते आता पाहू या.

शुजाउद्दौलाने दि. ७ सप्टेंबर, १७७३ रोजी बनारस येथे ब्रिटिशांशी तह केला होता. त्या तहानुसार आपल्या मुलुखांचे संरक्षण व रोहिलेखंडात आणखी प्रदेशाचा समावेश या कामी आपणास ब्रिटिश फौजेचे सशस्त्र साहाय्य मिळावे असे वॉरन हेस्टिंग्जकडून त्याने आश्वासन घेतले होते. पुण्यात नारायणराव पेशव्यांचा खून झाला तेव्हा मराठे हिंदुस्थानात येणे अशक्य हे जाणून आपल्या मुलुखात त्याला भर टाकायचे सुचले नसते तरच आश्चर्य. अंतर्वेदीतील मराठ्यांच्या मुलुखाला कोणी राखण नसल्याने तो आपल्या राज्यास जोडावा ही शुजाची मनीषा. (**सीपीसी** खंड ४, क्रमांक ५८४ व ६२६) दक्षिणेकडील आपल्या घरच्याच झगड्यात मराठे इतके व्यग्र होते की, त्यातून काही वर्षे तरी डोके वर काढणे त्यांना शक्य नव्हते. उत्तरेत त्यांचा उपद्रव होईल ही भीतीच नव्हती. १७७० मधील मराठ्यांच्या मोहिमांनी जाट राजा अर्धमेला झाला होता. त्याला मिर्झा नजफकडून आणखी एक रट्टा मिळताच त्याचा निकाल लागणार होता. शाही फौजांचे हल्ले वाढू लागले तसा नवलसिंग मदत मिळविण्यासाठी धडपडू लागला. शुजाने मदत करून आपला बचाव करावा म्हणून त्याने दाताच्या कण्या केल्या. तशीच मदत त्याने झबिताकडे व नजफच्या अन्य शत्रूंकडेही मागितली. एकेकाळी सफदरजंगला सूरजमलने ऐन अडचणीत मदत केली होती; पण तीही विसरली गेली होती. शुजाच्या मनीचा हेतू एकच. या गढूळ पाण्यात गळ टाकीत राहणे व आपल्या हाती आणखी काही मुलुख लागतो का, ते पाहणे. हाती असलेल्या मुलुखाबाबत तो निश्चित होता. आपले उरलेले राज्य तरी नजफच्या मगरमिठीतून वाचावे यासाठी शुजाने मदत केल्यास मोबदला म्हणून आग्र्याचा किल्ला त्याला बहाल करण्यास जाट राजाची तयारी होती. त्यानुसार प्रचंड सैन्यानिशी शुजा अंतर्वेदीत आला व आग्र्याच्या रोखाने पुढे घुसू लागला. वाटेत इटावा किल्ल्याला त्याने वेढा घातला; व अवघ्या चार दिवसांत तो किल्ला त्याच्या ताब्यात आला. [१५ डिसेंबरच्या सुमारास] मराठ्यांची अगदी छोटीशी शिबंदी किल्ल्यावर होती.

नजफखानला भराभरा व निर्णायक विजय मिळत गेले, त्यामुळे अयोध्येच्या नबाबाचे मनसुबे डळमळू लागले. नजफने प्रथम आग्र्याच्या किल्ल्याला वेढा दिला; पण तटबंदीला खिंडार पाडण्याच्या कामी उपयोगी पडतील अशा लांब पल्ल्याच्या तोफा नजफखानजवळ नसल्याने सुरुवातीला त्याची प्रगती होईना. म्हणून त्याने शुजाची मदत मागितली. आपला धर्म व आपला खाविंद एकच असल्याने तरी शुजाने आपल्याला मदत करावी, अशी त्याची अपेक्षा. शुजाने ते ऐकले. अंतर्वेदीत शिपायांच्या बऱ्याच तुकड्या असलेली मोठी फौज व प्रचंड तोफखाना मेजर पोलिअर या हुषार स्विस एंजिनिअरच्या हाताखाली होता. शुजाने त्याला नजफच्या मदतीला पाठवून दिले. त्याच्यासमवेत खोजा वसंत अलिखान हाही होता. वेढ्यातील सैन्याचे खंदक पोलिअरने शहाबुरुजासमोर खणले व तिथून किल्ल्यावर तोफगोळ्यांचा प्रचंड मारा केला. ८ फेब्रुवारी, १७७४ पर्यंत किल्ल्याच्या तटबंदीवर पाच हजार गोळ्या झाडण्यात आल्या “ बांगला बुरुजाच्या भिंतींना लवकरच तडा गेला. वादळीवाऱ्यात फुलांच्या पाकळ्या चौफेर विखरून पडाव्यात तसे बुरुजाचे दगड भराभर कोसळू लागले.”

किल्ल्यावरील शिबंदी कणखर होती. त्यांनी शाही फौजेतील तीनशेजण ठार केले, तरी रील प्रकाराने त्यांचाही धीर सुटला. दि. १३ ला जाटांचा किल्लेदार बाहेर आला व जफखानला भेटला. वाटाघाटीची तयारी लगेच झाली. जीवित व मालमत्ता यांच्या सुरक्षिततेची हमी मिळत असेल तर किल्ला खाली करून द्यायला त्याची तयारी होती. रझंगच्या तुकडीतील एक संरक्षक बरोबर घेऊन तो किल्ल्यावर परतला. या संरक्षकाने किल्ल्याच्या वेशीवर बादशहाचे निशाण फडकवून आपले सैनिक बसविले. किल्ल्यातील कोणालाही दगाफटका होणार नाही असे जाहीर झाले. जाटांनी पाच दिवसांत किल्ला पूर्णपणे सोडला व दि. १८ फेब्रुवारीस मिर्झा नजफने किल्ल्यात प्रवेश केला. शुजा भलत्याच अडचणीत आला असता तो वाचला.

पार रोहिल्यांच्यावर हल्ला करावयाचे कामी बादशहाने आपणास साहाय्य करावे अशी शुजाउद्दौलाने बादशहाकडे मागणी केली. त्यानुसार बादशहाने साहाय्य दिल्यास रोहिल्यांकडून घेतलेला मुलुख दोघांनी सारखा वाटून घ्यायचा होता. याबाबत अटी ठरवण्यात म्हणून बादशहाने नजफखानालाच नबाबाकडे पाठविले. काही उपद्व्यापी मंडळींनी खोट्यानाट्या कागाळ्या करून नबाब व नजफ या दोघांत दुरावा निर्माण करायचा प्रयत्न केला होता. त्याबाबतचे गैरसमज प्रत्यक्ष भेटीत दूर करता यावेत हाही त्यात बादशहाचा हेतू होता. त्याप्रमाणे मिर्झा शुजाला २७ फेब्रुवारीला एटावा येथे भेटला. शुजाने त्याचे शाही स्वागत केले, लाख रुपये किमतीचे नजराणे दिले. स्वतःच्या अखत्यारीत त्याला नायब वझीर नेमले. रोहिलखंड मोहिमेत बादशहाने सामील व्हावे यासाठी स्वतः नजफने त्याच्याशी बोलावे असा थोडाफार आग्रहही शुजाने केला. शुजाचा वकील एलिचखान याला घेऊन नजफ थोड्याशा तातडीनेच दि. २८ मार्च रोजी दिल्लीस आला. आपल्या राजप्रासादातून बादशहा दि. ५ एप्रिलला बाहेर पडला व गाझियाबादपर्यंत गेला. त्याचवेळी त्याची प्रकृती बिघडली. त्याचा आवडता मुलगा अकबरशहा हाही आजारी पडला. साहजिकपणे प्रवास मध्येच सोडून दि. १६ एप्रिलला बादशहा दिल्लीस परत आला. अयोध्येच्या नबाबाच्या छावणीवर जाऊन त्याला भेटावे म्हणून नजफखानची पाठवणी करण्यात आली, त्याप्रमाणे दि. २२ ला नजफखान शहादऱ्याहून निघाला. त्या निघण्याचा शुजाला उपयोग नव्हता. नजफला खूपच उशीर झाला होता. त्याच महिन्यात दि. २३ ला मिराकात्रा याठिकाणी शुजाने रोहिल्यांची पार दाणादाण करून टाकली. तेव्हा शुजाला भेटून नजफ दिल्लीत परतला तो हात हालवीतच (१२ जून). बादशहाचा वझीर शुजाउद्दौला याने बादशहाचे शत्रू रोहिले यांचा पराभव केला या आनंदाप्रीत्यर्थ दिल्लीच्या प्रासादात शाही घोषवृन्द विजयोत्सवी गीते वाजवीत होता. रोहिलखंड मोहिमेत बादशहाने शुजाला कसलीही मदत केली नसल्याने त्या लुटीतला काही भाग आपल्या हाती पडावा अशी अपेक्षाही बादशहाला करता येत नव्हती.

या सर्व मोहिमांत यावेळी जाटांचे किती नुकसान झाले, त्यांना काय काय गमवावे लागले याचा आढावा येथे घ्यायला हवा. दि. २० एप्रिल, १७७४ रोजी जाट राजाच्या

शिबंदीकडून वल्लभनगरचा किल्ला घेण्यात आला व दि. ६ मे ला फरुकनगर घेतले गेले. सर्वांत वाईट व खेदकारक घटना म्हणजे सॉम्ब्रने जाटांकडील नोकरी सोडली व आपले युद्ध-तंत्रज्ञ, शिपाई व सुसज्ज तोफखाना यासह दि. २० मे रोजी तो बादशहाला येऊन मिळाला. पानिपतभागात शांतता व सुव्यवस्था राखण्यासाठी त्याला तिकडे पाठविण्यात आले. त्याच्या पुढच्याच महिन्यात रेने मादेक हाही नजफखानला येऊन मिळाला. (**सीपीसी** : खंड ४ : क्रमांक ११८४)

८. मिर्झानजफविरुद्ध अबदुल अहद बादशहाचे कान फुंकतो

आपल्या मिष्ठास वाणी व आदबशीर नाटकी वागण्याने अबदुल अहदखान बादशहावर भुरळ टाकून दुहेरी डाव खेळत होता. बोलता बोलता त्याने बादशहाला असे दाखवून दिले, की अनेक मोठमोठे विजय मिळविल्याबद्दल मिर्झा नजफच्या नावाच्या ज्या नौबती झडताहेत त्यात खरोखरी काही अर्थ नाही. मिर्झाला अकारण नसता मोठेपणा चिकटविला जात आहे. या मोहिमांतील विजयांनी बादशहांच्या मुलुखात किती वाढ झाली, खजिन्यात किती भर पडली ? वास्तविक शाही फौजांनी या मोहिमेत नजफच्या बरोबरीने या मोहिमांमधून भाग घेतलेला असल्याने या यशात त्यांचाही वाटा होता. नजफमहाशयांच्या या उपद्व्यापी महत्त्वाकांक्षेने खाविंदांची व राज्याची आर्थिक घडी आणखीच विस्कळित झाली आहे." दिल्लीच्या परिसरातील, उत्तर व पश्चिमेकडील प्रांतांचे उत्पन्न पूर्वी बादशहांचे खासगी खर्चासाठी उपयोगात आणले जाई. पण या ठिकाणचेच नव्हे तर जाटांकडून नुकत्याच जिंकून घेतलेल्या दिल्लीच्या दक्षिण व नैऋत्येकडील व मध्य अंतर्वेदीतील मुलुख या सर्व ठिकाणचे महसुली उत्पन्न आपल्या शिपायांचे पगार द्यावयाचे या सबबीखाली मिर्झाच्या सैन्यातील अधिकाऱ्यांनी परस्पर दाबले. त्याचबरोबर मिर्झाजीचे सैन्य झपाट्याने वाढत आहे, त्याच्या लष्करी सामर्थ्यात भर पडते आहे. झबिता व नवलसिंग यांच्यावर त्याने अभूतपूर्व विजय मिळविला हे खरे असले, तरी खुद्द नजफ हाच खाविंदांच्या अस्तित्वाला धोका ठरणार नाही कशावरून ? या शूर व धाडशी इराण्याने नजीबउद्दौलाच्या पावलावर पाऊल टाकले, बादशहाचे आजमितीस असलेले सर्व सैन्य व महसूल यावर त्याने आपला हक्क प्रस्थापित केला व आपल्या सुभेदारांच्या मेहेरनजरेवर अवलंबून असणारा एक दुबळा याचक, अशी खाविंदांची दयनीय अवस्था त्याने केली तर ? नजीबउद्दौलाचे वेळी होती त्यापेक्षाही शहेनशहांची अवस्था शोचनीय होईल. कारण बादशहाचे इंग्रजांशी सख्य नाही; त्यांचे संरक्षण मागण्याचा मार्गही खुंटलेला; त्यांनी आश्वासन दिलेली सव्वीस लाखांची खंडणी येत नाही. मिर्झा नजफ हा शिया व अयोध्येच्या नबाबाचा नातेवाईक. ब्रिटिशांच्या संगिनी रक्षण करायला समर्थ असल्याने अयोध्येच्या नबाबाला धोका नाही. रोहिलखंड नुकताच त्याच्या जहागिरीला जोडल्याने त्याच्या राज्याचा विस्तार उत्तरेकडे हिमालयापर्यंत व पश्चिम बाजूस गंगेपलीकडे अंतर्वेदीतील एटावापर्यंत झालेला; तिथून आग्रा कितीसा दूर ? एकदा कधी काळी शुजाने मिर्झाला जीवे मारण्याची धमकी दिली असली, तरी आता ते मित्र आहेत. मिर्झाजी शुजाच्या खास विश्वासातले झालेले. हे दोन शिया

आपली ताकद व आपले सैन्य यासह एकत्र आले, त्यांनी दिल्लीवर स्वारी केली व सय्यद-बंधूप्रमाणे बादशहाला गुलामासारखे अंकित करून ठेवले तर नवल वाटायला नको. सय्यद बंधू शियापंथी होते. आणि साठ वर्षांपूर्वी त्यांनी तरी दुसरे काय केले होते ?

बादशहा मूळचाच भेकड. त्याला विश्वासात घेऊन गोडबोल्या अहदने त्याच्या मनात संशय निर्माण करण्यात यश मिळविले. संशयाच्या या विषावर अहदजवळ उताराही होता. बक्षीपदावर झबिताखानची नेमणूक करावी व दिल्ली येथील शाही फौजांवरही त्याचेच प्रत्यक्ष नियंत्रण असावे. झबिताची ताकद मराठ्यांनी १७७२ मध्येच संपविली होती व झबिता म्हणजे आता एक पोकळ बांबू होता हे अहद विसरला. दि. ९ ऑक्टो. १७७३ रोजी अहदने झबिता व बादशहा यांची भेट घडवून आणली व नजफ जाट मोहिमेत गुंतला असल्याने त्याच्या अनुपस्थितीत झबिताने दरबारात रहावे अशी कारवाईही केली. नजफच्या अनुपस्थितीचा फायदा घेण्याची इच्छा झबिताला होणे साहजिक होते. मिर्झाने जाटांवर मिळविलेले विजय व खुद्द मिर्झा यांविरुद्ध आपण काहीही करू शकणार नाही याची जाणीव झबिताला लवकर झाली ; तो आपल्या जहागिरीच्या गावी २२ नोव्हें-बरला परत गेला, मात्र आपला प्रतिनिधी म्हणून त्याने आपला मुलगा दिल्लीतच ठेवला. पुढे लवकरच रोहिल्यांच्या या नेत्याला शीखांना सामोरे जावे लागले (जानेवारी १७७४). अंतर्वेदीत वरील भागाकडील मुलुखात शीखांनी धाडी घालायला सुरवात केली होती, त्यांचा बंदोबस्त करून झबिता दि. १२ जूनला दिल्लीला परत आला. योगायोग असा की शुजाची भेट घेऊन नजफ दिल्लीत आला, तोही त्याच दिवशी.

९. नजफचे दिल्लीतील वास्तव्य, दरबारातील कारस्थानांना शह

दि. १२ जून १७७४ ते दि. २१ एप्रिल १७७५ या काळात मिर्झा नजफ दिल्लीतच होता. दरबारातील कारस्थानांनी तो जर्जर होऊन गेला. जास्तीतजास्त धडपड करून तो आपले डोके पाण्याच्या वर ठेवू शकत होता एवढेच. बादशहाने त्याला पुढील गोष्टी करायला सांगितल्या : (१) नजफने नव्याने जे जिंकले होते त्याची बादशहासमवेत विभागणी करणे, (२) आग्रा किल्ल्याचा ताबा बादशहाने नेमलेल्या माणसाकडे देणे, (३) त्याने उभारलेल्या सेनेतील सैनिकांच्या संख्येत कपात करून ती बादशहाच्या एका नोकराच्या दर्जास शोभेल एवढीच ठेवणे. त्याव्यतिरिक्त बादशहाची त्याच्यावर इतराजी झाली होती त्याची कारणे म्हणजे– (१) वझिराच्या मोहोरेचा (शुजाने त्याला नायबवझीर नेमून सदर मोहोर त्याला विश्वासाने दिली होती) हेतुतः दुरुपयोग करून बादशहाच्या संमतीविना दुसऱ्याला जहागिऱ्या व अधिकाराच्या सनदा देणे आणि (२) सॉम्ब्रला बादशहाच्या चाकरीतून काढून स्वतःकडे येण्याबाबत फितविणे.

ऑगस्ट १७७४ हा संपूर्ण महिना बादशहा व नजफ या दोघांत याच विषयांवर वादावादी चालली होती. फलनिष्पत्ती मात्र काही नाही. सप्टेंबरच्या सुरवातीस मुगलिया घोडदळातील काही सेनाधिकाऱ्यांनी मैत्रीदाखल मध्यस्थी केली. त्यानुसार आपण जिंकून

घेतलेल्या मुलुखातील वाटा व आग्रा किल्ल्याचा ताबा बादशहाला देण्याचे नजफने मान्य केले. त्या मोबदल्यात बादशहानेही त्याला नायबवझीरपदावर कायम करण्याचे आश्वासन दिले. नजफ या अटी पूर्ण करील या बाबतीत सदर अधिकाऱ्यांनी हमी घेतली. या सर्व वाटाघाटी शेवटी 'बोलाचाच भात' ठरल्या. विश्वासघात करणे, शाही फौजांना मथलावणे व फौजफाटा भरमसाठ वाढवणे हे गुन्हे केल्याचे अहदने नजफवर आरोप केले. परिणामी जुनाच तंटा पुन्हा नव्याने सुरू झाला.[८] एक दिवस (१५ ऑक्टोबरच्या सुमारास) बादशहाच्या संरक्षकांनी मिर्झा नजफचा उघड उघड अपमान केला. दरबारात जायला म्हणून नजफ दिल्लीच्या किल्ल्याशी आला असताना या संरक्षकांनी अहदने काढलेल्या हुकुमाचा वरवर अर्थ घेत त्याला आत जायला मनाई केली. या कामी अहदची उघड उघड फूस होती [**सीपीसी.** खंड ४, पत्र १३५९]. त्यानंतर २ महिने मिर्झा दरबारकडे फिरकला नाही. अस्वस्थ व प्रक्षुब्ध मनःस्थितीत तो घरीच बसून होता. अखेरीस दि. २२ डिसेंबर रोजी खुद्द बादशहानेच या दोन वझिरांना एकत्र आणून आपल्या समक्ष त्यांच्यात समझोता करून दिला. दोघेही परस्परांना भेटले. हा सगळा वरवरचा बनाव, कारण नंतरही त्यांच्यातून विस्तव जात नव्हता. शेवटी पुन्हा वादावादी सुरू झालीच. दि. १८ नोव्हेंबर रोजी अबदुल अहद पुन्हा झबिताला दरबारात घेऊन आला व शीख आणि मराठे यांनी बादशहाला समक्ष भेटावे, त्याच्या सैन्यात भरती व्हावे व बंडखोरांनी बळकाविलेला मुलुख परत मिळविण्याच्या कामी बादशहाला मदत करावी, अशा अर्थाची शाही फर्माने त्याने शीख व मराठे यांच्याकडे पाठविली. इतके करूनही त्यासाठी आवश्यक असे धाष्ट्र्य व राजकीय दूरदृष्टी नसल्याने हा कावेबाज कश्मिरी कर्तृत्वात उणाच पडला. मिर्झाला पूर्णपणे नेस्तनाबूत करायचा तर प्रतिस्पर्धी तितक्याच ताकदीचा व तोलामोलाचा सेनाधिकारी हवा. अबदुल अहदला युद्धशास्त्रातले काहीच गम्य नव्हते. त्याला दिल्ली व वझीरन दोघांनाही दूर करता येत नव्हते. वझीरन या धंदेवाइक नर्तकीशी त्याने लग्न केले होते. त्याच्या थकल्याभागल्या शरीराला तेवढाच काय तो विरंगुळा. तेव्हा आपल्यामते त्याने अतिशय कठीण डाव टाकला होता. झबिता व शीख ही राजकीय पटावरील मोहरी त्याला अशा पद्धतीने हलवायची होती की, मोक्याच्या ठिकाणी असलेल्या त्याच्या धुरंधर शत्रूला अचूक शह बसावा. नजफच्या खबऱ्यांनी त्याला या कटाची माहिती दिली तेव्हा तो फक्त हसला. १६ जानेवारी, १७७५ ला झबिता दरबार सोडून निघून गेला. त्या सालच्या हिवाळ्यात शिखांनी बादशहाच्या मुलुखातील त्याच्या एकनिष्ठ प्रजेवर व बंडखोर मांडलिकांवर सारख्याच तडफेने हल्ले केले.

१७७५ च्या सुरवातीस मिर्झा नजफ आजारी पडला. कित्येक महिने तो आंथरुणाला खिळून होता. त्याच्या समाचारासाठी दि. ४ एप्रिल रोजी बादशहा स्वतः त्याच्याकडे गेला. त्याच महिन्याच्या दि. २१ ला नजफला थोडेफार बरे वाटू लागल्याने, जाटांवरील दुसऱ्या मोहिमेसाठी तो दिल्लीबाहेर पडला. आपल्या खड्या सैन्य-तुकड्यांसह व सुधारित तोफखान्यासह सॉम्ब्र व मादेक यांना त्याने पूर्वीच आपल्याकडे घेतले होते. नंतर कॉन्त द मॉदवे हाही त्याला येऊन मिळाला. मात्र त्याच्याजवळ त्याचे स्वतःचे सैन्य नव्हते.[९]

१०. नजफची जाट मुलुखांवर पुन्हा स्वारी, १७७५, मोहिमेचा पहिला टप्पा, कामाचा कबजा : जय व माघार

मिर्झा नजफने १७७५–१७७६ मध्ये जाटांवर पुन्हा हल्ले चढविले. या मोहिमेचे तपशीलवार वर्णन देण्याचे कारण नाही. कॉन्त द मॉदेव व तहमस्पखान मिस्किन या दोघांनीही स्वतः हजर राहून या मोहिमा पाहिलेल्या. तहमस्प हा अचूक, शैलीदार लिहिणारा तर मॉदेव हा सुसंस्कृत, सूक्ष्म अवलोकन करणारा व जाणकार टीकाकार. या दोघांच्या लेखनावरून या युद्धाइतकी तपशीलवार माहिती अन्य कोणत्याही युद्धाची मिळत नाही.

मिर्झा नजफ दिल्लीत आजारी होता, तरी अफ्रासियाब खान व नजफकूलीखान या आपल्या विश्वासातील दोघा सेनाधिकाऱ्यांना त्याने अनुक्रमे मध्य अंतर्वेदी व मेवाट येथील जाट ठाण्यांवर स्वारी करायला पाठविले. अफ्रासियाबने सदाबाद, जवार इ. परगणे जिंकले. नंतर रामगढला तो तीन महिने वेढा घालून होता. शेवटी थोडा फार द्रव्यप्रयोग करून अंतर्वेदीतील जाटांचा तो अत्यंत बळकट किल्ला त्याने जिंकून घेतला (एप्रिल १७७५) व शियांच्या रक्षणकर्त्या साधूवरून त्याला अलिगढ हे नवे नाव दिले. बरोबर त्याच वेळी नजफकूलीखान नैर्ऋत्य आघाडीवर होता. त्याने जयपूरच्या मालकीचा कामा किल्ला सर केला. किल्ल्यावर केलेल्या धडकहल्ल्यात त्याच्या हाताखालील मुल्ला रहीमदाद व अन्य रोहिले शिपाई यांचा त्याला फार उपयोग झाला. कामाच्या किल्ल्यात काही धनाढ्य व्यापारी आश्रयाला आले होते. त्यांच्याकडून पंचवीस लाख रुपये वसूल करण्यात आले.

कामा किल्ला हातचा गेल्याने जयपूर राजा विलक्षण संतापला. त्याने जाट राजाशी सख्य केले. खंडणी वसूल करण्यासाठी काही मराठे स्वार हिंदुस्थानात राहिले होते, त्यांना त्याने पगार देऊन आपल्याकडे बोलाविले व वाटेल ते करून कामा किल्ला परत घेण्याच्या मोहिमेवर त्यांना त्याने रवाना केले. ही धोक्याची वार्ता मिळताच मिर्झा नजफ स्वतः दिल्लीहून तिथे गेला. अंतर्वेदीत असलेल्या आपल्या सैन्याच्या तुकड्या त्याने परत बोलाविल्या व बडसानानजीक तळ टाकला. जाटसेना दिग सोडून पुढे आली व शाही फौजांच्या दक्षिणेस काही मैलांवर खंदक खणून त्यांनी आपला तळ टाकला. उभयतांत काही दिवस थोड्याफार छोट्या चकमकी उडाल्यानंतर दि. १८ मे रोजी लढाईला मोठ्या प्रमाणावर तोंड लागले. मुगलांचे अंदाजे ३००० स्वार आपल्या अधिकाऱ्याला बरोबर न घेता जाट सैन्याच्या अगदी जवळ आले व बिकट जागी अडकले. जाटांनी जोरदार हल्ला करून त्यांचे बरेचसे सैनिक ठार केले. काही वेळ बंदुकांच्या माऱ्याने प्रत्युत्तर दिल्यावर त्यांनी माघार घेतली. मराठे व रजपूत पाठलाग करीत असताही उरलेल्यातले बरेचसे सुखरूप परत आले. दोन्ही बाजूंचे एकूण हजार सैनिक व शेकडो घोडे ठार झाले. शेवटी अशी वेळ आली की, नाइलाजाने माघार घ्यावी लागून जाट सैन्याला दिगच्या किल्याचा आसरा घ्यावा लागला. तिथून बाहेर येण्याची त्यांना इच्छा झाली नाही.[१०]

नवलसिंग बरेच दिवस आजारी असून अखेरचे क्षण मोजत होता. जाटांच्या संरक्षणाची जबाबदारी त्याचा धाकटा भाऊ रणजितसिंग याच्यावर पडली. दरम्यानच्या

कालावधीत सॉम्ब्रने टाकलेले पाऊल यशदायी ठरले. जयपूरच्या प्रमुख सरदारांसमवेत त्याने बोलणी सुरू केली. झटकन समझोता झाला. त्यानुसार राजपुतांनी जाटांना साहाय्य करावयाचे थांबवायचे व तिथून एकदम निघून जायचे. कामा किल्ला त्यांना परत द्यावयाचा. त्या बदल्यात राजपुतांनी बादशहाला सात लाख रुपये द्यावयाचे व प्रतिवर्षी अकरा लाख खंडणी द्यायची. राजपुतांनी या अटी तत्काळ मान्य केल्या. [मॉदेव : २५६]

सदर किल्ला जिंकायचा तर लढणारांना काही आमिष हवे म्हणून किल्ला जिंकला तर सभोवतालच्या मुलुखासह हा किल्ला तुला देऊ असे आश्वासन रहिमदादला देण्यात आले होते. पण किल्ला हातात आल्यावर हे आश्वासन पाळण्यात आले नाही. किल्ला परत राजपुतांच्या हवाली करण्यात आला व वैतागलेला रहिमदाद आपल्या अनुभवी रोहिला सैन्यासह जाटांकडे गेला.

दि. १० जूनला शाही फौजांसमोर एक उत्तम संधी चालून आली. त्या संधीचा फायदा त्यांनी लगेच घेतला. त्या दिवशी ज्येष्ठ महिन्यातील शुद्ध दशमी होती. हा दशहरा हिंदू पवित्र मानीत असल्याने पुण्यकाळी यमुनास्नान घडावे म्हणून जाटराजा दिगहून गोवर्धन येथे गेला. शत्रूने हल्ला करू नये म्हणून त्याचे सैनिक त्याच्या मार्गावर उत्तरबाजूला उभे होते. हे सैनिक कसे उभे आहेत याची नीट माहिती नजफला असल्याने, तो बडसाना येथून दक्षिणेकडे चाल करून गेला. त्यासाठी त्याने सैन्याचे दोन भाग केले. अगदी उजवीकडे (म्हणजे पश्चिमेस) दोन पलटणींसह मादेक सरळ दिगवर चालून गेला. स्वतः नजफ अगदी डावीकडे (पूर्वेस) गोवर्धनला जाण्याच्या मार्गावर साधारण सात मैल मागे राहिला. दिगच्या ईशान्येस उत्तरेकडे पाच मैलांवर गुहाना हे ठिकाण आहे. तिथे चकमक उडाली. जाट व रोहिला स्वारांच्या जथ्याने मादेकवर हल्ला चढविला. अफ्रसियाब मुगल स्वारांच्या डावीकडून निघून सैन्यासह मादेकच्या सैन्यात गेला. तिथून शत्रूच्या फौजांवर त्याने जोरदार प्रतिहल्ला केला. शत्रू गोंधळला व सैरभैर पळत सुटला. शाही फौजा एकत्रित होऊन तळावर परत आल्या. नजफखानने गोवर्धननजीक हल्ला करून तिथेही शत्रूवर मात केली. त्याचे घोडे, उंट, गाड्या ताब्यात घेतल्या. यानंतर नवलसिंगच्या साहाय्यार्थ जे रजपूत व मराठा सैन्य आले होते, ते त्याला सोडून निघून गेले.

मे महिन्याच्या सुरवातीला मिर्झा नजफ कामाच्या किल्ल्यासमोर आला. या ठिकाणी त्याच्या साहाय्यार्थ अयोध्येहून युद्धतंत्र शिकलेल्या तीन पलटणी आल्या. लवकरच या पलटणींना त्यांच्या अधिकाऱ्यांनी परत बोलावून घेतले. यामुळे मिर्झा नजफचे सामर्थ्य थोडेफार कमी होऊन तो होदाळपर्यंत सोळा मैल मागे आला. त्याच्या शिपायांना खूप दिवसांत पगार मिळाला नसल्याने, त्यांची उपासमार होत होती. त्यांनी होदाळच्या आसपासच्या खेड्यांतून पुंडावा मांडला. लुटीत पैसा, चीजवस्त मिळून खाण्यापिण्याची ददात मिटल्यावर ते पुन्हा ताजेतवाने झाले. नंतर पुन्हा पुढे सरकत मिर्झाने बडसाना येथे कायमचा तळ टाकला. त्याच्या खिशात एक कपर्दिकही नव्हती. आपल्या शिपायांना लूटमार करण्यासाठी

तो रोज दिगकडे जायला सांगे. बडसाना येथील तळ हलवून तो ऑगस्टमध्ये गोवर्धन येथे आला.

पावसाळ्यास सुरवात झालेली असल्याने प्रत्यक्ष हालचालीस आपोआप पायबंद बसला. दरम्यानच्या काळात रीन मादेकला आठवणीत राहील असा फटका बसला. बीडा येथील आपल्या जहागिरीवर जाटांकडून लढणाऱ्या रहिमदादने हल्ला केला म्हणून तिकडे जाण्यासाठी तो निघाला; पण वाटेत फत्तेपूरसिक्रीपासून साधारण दहा मैलांवर त्याचे सैन्य पावसात सापडले व पार गारठून गेले. या ठिकाणी रोहिल्यांनी त्यांच्यावर अनपेक्षित हल्ला केला (२९ जुलै). मादेकचा तोफखाना, तंबू, डेरे व सर्व अन्य साहित्य आणि सामानसुमान यांची पार नासधूस केली. त्याच्या सैन्यातील निम्मे पाश्चात्त्य व एक हजार शिपाई ठार केले. त्यानंतरचे दोन महिने तो आग्रा येथे होता. या मुदतीत नवीन सैन्यउभारणीसाठी जवानांची भरती करणे व त्यांना लष्करी शिक्षण देणे, हेच काम त्याला करावे लागले. [बार्बे, २३१ मॉदेव; इब्रत.]

११. रहिमदादच्या रोहिला शिपायांकडून रणजितसिंग जाट दिगचा किल्ला परत घेतो.

नवलसिंग, दि. १० ऑगस्ट, १७७५ ला दिगच्या किल्ल्यात मरण पावला. त्यावेळी त्याचा भाऊ कुंभेर येथे होता. किल्ल्याच्या संरक्षणासाठी असलेल्या शिबंदीतील सैनिक राजाच्या मृत्यूने शोकविव्हल झाल्याने त्यांच्या बंदोबस्ताच्या कामात थोडीफार शिथिलता आली होती. त्याचा फायदा रहिमदादने घेतला. रहिमदाद हा त्यांच्या बाजूने लढणारा, पण शेवटी त्याने विश्वासघात केलाच. त्याच्या छावणीजवळ किल्ल्याचे जे प्रवेशद्वार होते त्यावर पकड बसवून किल्ला व परिसर त्याला सहजपणे आपल्या हुकमतीत आणता आले. केसरीसिंग या अर्भकाला त्याने अंतःपुरातून बाहेर आणले, त्याला राज्यावर बसविले व त्याच्या नावाची द्वाही फिरवून सर्व कारभार स्वतःकडे घेतला. राजधानीतील सर्व मालमत्ता व धनदौलत हस्तगत केली. नवलसिंगने नेमलेल्या अधिकाऱ्यांना त्याने हाकलून दिले.

दिग येथील बंडखोरीची बातमी कुंभेरच्या किल्ल्यात असलेल्या रणजितसिंगला मिळाली. आपल्याबरोबर असलेले सैनिक व एकनिष्ठ जाट सेनाप्रमुखांना त्याने आपल्याबरोबर घेतले. यशवंतराव वाबळे याच्या हाताखालील दोन हजार स्वार व काही नागा गोसावी यांच्यासह रात्रीच्या वेळी कुणालाही थांगपत्ता लागू न देता, तो दिगला आला व आपल्या काही मित्रांसह चोरवाटेने किल्ल्यात प्रवेश घेऊन तो तिथेच दडून बसला. गडाच्या तटाखालीच रोहिल्यांचा तळ होता. मराठा स्वारांनी व त्यांच्याबरोबर आलेल्या अन्य सैनिकांनी अगदी पहाटे पहाटे या रोहिल्यांवर आकस्मिक हल्ला चढविला. या ठिकाणी सर्व रोहिल्यांचे कुटुंबीय व मालमत्ता होती. हल्ल्याची बातमी कळताच रहिमदाद किल्ला सोडून धावत पळत तिथे आला. नंतर सगळाच देखावा बदलला. " गडाच्या तटावरून रणजितसिंग आणि उगवता सूर्य या दोघांचेही तेथील नागरिकांना एकाच वेळी दर्शन झाले. किल्ल्यातील सर्व सरकारी

नोकरांना त्याने आपल्या बाजूला येऊन मिळण्याचे आवाहन केले. बराचवेळ दडून बसलेले जाट शिपाई बाहेर आले. त्यांना धीर आला व त्यांनी अफगाण शिपायांवर हल्ला केला, गटागटाने त्यांना बाहेर खेचले आणि काठीने झोडपीत त्यांनी त्यांना गुरे व शेळ्यामेंढ्यांप्रमाणे गावाबाहेर हाकलून दिले." दिगचा ताबा रोहिला शिपायांकडे तसा थोडाच वेळ होता. तरी तेवढया अवधीत रोहिल्यांनी आपल्या दुष्ट परंपरेशी इमान राखून तेथील नागरिकांना विलक्षण छळले. लुटालूट तर केलीच, पण बायकांची अब्रू घेण्यासही कमी केले नाही. रोहिले सुरवातीला जोरात होते तरी सूर्यबिंब उदयाचलावर येण्याआधीच त्यांची वाताहात झाली. किमान चार हजार असामी या धामधुमीत ठार झाले. उरले ते नजीकच्या प्रवेशद्वारातून बाहेर पडले. रोहिल्यांनी आपल्या सेनाधिकाऱ्याच्या मुलाला जाटांकडे ओलीस ठेवले व आपली सर्व मालमत्ता त्यांना देऊन टाकली. रहिमदादलाही आपल्या छावणीतील सर्व सामानसुमान गमवावे लागले. तो दिल्लीस गेला. आपल्या कारवाईत याचा खूप उपयोग होईल या हेतने अबदुल अहदने त्याला सैन्यात घेतले. हंसीहिसार जिल्ह्यातील बादशहाचा मुलुख मिर्झा नजफच्या माणसांकडे होता. बादशहाला तो परत घ्यायचा असल्याने अहदने रहिमदादला त्या कामगिरीवर पाठवून दिले. रहिमदाद तिकडे गेला तो स्वतःच्या दगलबाजीचे प्रायश्चित्त घेण्यासाठी. त्याने रोहटकच्या उत्तरेस अठरा मैलांवर असलेल्या गोहानला वेढा घातला. त्यावेळी पतियाळाच्या अमरसिंगचे सैन्यातील शिपाई विरुद्ध बाजूला होते. त्यांनी झाडलेल्या गोळीने रहिमदाद ठार झाला. नजफनेच अमरसिंगला तशा सूचना दिल्या होत्या (३० डिसेंबर, १७७५ च्या आसपास).

आग्रा आणि मथुरा या दरम्यान फरा येथे मिर्झा नजफने तळ टाकला त्या सुमारास पावसाळा संपत आला. अंतर्वेदीत असलेल्या आपल्या हाताखालील अफ्रासियाबखानला त्याने परत बोलाविले. पावसाळ्याच्या अखेरीस दोघांच्याही प्रचंड सेनेसह तो दिगवर चालून गेला; व डिसेंबरच्या सुरवातीस त्याने दिगच्या किल्ल्याला वेढा घातला.

१२. दिगच्या किल्ल्याचे वर्णन

सर्व बाजूंनी सुरक्षित असलेला दिगचा किल्ला हे[११] जाट राजाचे आवडते वसतिस्थान होते. हे ठिकाण गोवर्धनच्या पश्चिमेस आठ मैलांवर आहे किल्ल्याच्या नैर्ऋत्येस, एकदम नजरेत भरणारा वृक्षाच्या फांदीसारखा शहाबुरुजाचा कोपरा आहे. तो वगळला तर हा भाग पंचपाळ्यासारखा असून साधारण दीड मैल लांबीचा आहे. याच्या भोवताली पक्क्या मातीचा तट आहे. या तटाला पुरेशी जाडी असून उंची जवळजवळ तीस फूट आहे. उत्तरेकडील व पूर्वेकडील सर्व भाग आणि पश्चिमेकडील अर्धा दर्शनी भाग यांच्या संरक्षणासाठी खोल खंदक खणलेले आहेत. दक्षिणेकडील दर्शनी भागाला मात्र अशा कृत्रिम संरक्षणाची गरज नाही. कारण या बाजूला नैसर्गिकरीत्या संरक्षण होईल असा दलदलीचा खूप विस्तीर्ण भाग असून आग्नेय दिशेस तो मैलच्या मैल पसरलेला आहे. या दक्षिणभागाच्या पश्चिमेस दोनचारशे फुटांवर एक खोल व खूप विस्तीर्ण असा पाटाच्या पाण्यासारखा जलौघ आहे.

हा जलौघ दक्षिणेकडील बाजूस मध्यावर सुरू होऊन नैर्ऋत्येकडे काही मैल पसरलेला आहे. त्याच्या डाव्या अंगाला काठाच्या बाजूला बैठ्या टेकड्यांची रांग असून अगदी उत्तर टोकाला गोपालगड हा निराळा किल्ला आहे.

हा शहाबुरुज या टेकड्यांच्या रांगेतील उत्तर टोकावर खूप उंचीवर आहे. किल्ल्याच्या दक्षिण व पश्चिमेकडील तटबंदी वाढवीत वाढवीत आणल्या असून वरील शहाबुरूज नैर्ऋत्य कोपऱ्यात त्यांच्याशी जोडण्यात आला आहे. या ठिकाणी लांबचलांब व चिंचोळे असे कोपरे तयार झाले आहेत. शहाबुरूज हाच मुळी एक गढेकोट आहे. आतल्या बाजूस पन्नास चौरस वार क्षेत्रफळ असलेली जागा आहे. चार उत्तुंग बुरूज चार उंच सुळक्यांकडे नजर फेकीत खडे आहेत. या शहाबुरुजाचे अंदाजे एकतृतीयांश मैलावर याच बैठ्या टेकड्यांच्या ओळीतील दुसऱ्या टोकाला गोपालगड आहे. चारी बाजूला गोल बुरूज असलेली अशी ही आणखी एक गढी. या दोहोंच्याही दरम्यान विस्तीर्ण असे राजेशाही बागबगीचे आहेत. तिथे थकलेल्यांना सावली देणारे प्रचंड वृक्ष मोठ्या प्रमाणावर असून संत्री, पेरू, जांभळे व आंब्याची झाडेही आहेत. किल्ल्याच्या आतील अंगास राजाचा भव्य प्रासाद आहे; एक प्रचंड व देखणी वास्तू, दरबार भरविण्यासाठी प्रचंड दिवाणखाना व राजकीय कामकाजासाठी तितकीच शोभिवंत व अलिशान दालने; मुद्दाम राखलेल्या माशांनी भरलेला सुंदर तलाव, प्रणयीजनांना मोहरवून टाकतील अशी उद्याने, नेहमीच्या पद्धतीच्या गुप्त वाटा, त्याशिवाय शाही धनदौलत लपवून ठेवण्यासाठी खास सोयी; एक चौकोनी बालेकिल्ला (दोन फर्लांग विस्ताराचा), त्याच्या प्रत्येक बाजूला उंच व मजबूत तटबंदी; प्रत्येक बाजूला तीन तीन बुरूज, सभोवताली संरक्षणासाठी खोल खंदक, त्यांच्या समोरच दगडविटांनी बांधलेली प्रवेशद्वारे व पुरेशा उंचीचे घुमट. त्याशिवाय सरदार, दरकदार व धनिकांसाठी बांधलेले अलिशान महाल; आणि नेहमीच गजबज असलेली जवाहरगंज नावाची बाजारपेठ होती. इतक्या मोठ्या वस्तीला गरजेच्या वस्तूंचा पुरवठा करणारी बाजारपेठ हवीच.

१३. नजफखानचा दिगला वेढा

दिगच्या किल्ल्याची जागा अशी आहे की, त्यावर फक्त त्याच्या नैर्ऋत्यभागाला असलेल्या मोकळ्या सपाटीवरूनच हल्ला चढविणे शक्य आहे. इंग्रजांनी हे १८०४ साली अचूक हेरले. नजफखानने दिगला वेढा घातला. त्यानंतर बरोबर २९ वर्षांनी लॉर्ड लेक या इंग्रजाने याच किल्ल्याला वेढा घातला. लॉर्ड लेकने ज्या महिन्यात व ज्या आठवड्यात गोपालगड व शहाबुरुजासमोर पहिला खंदक खणला, अगदी ते वर्ष नसले, तरी त्याच महिन्यात व त्याच आठवड्यात (डिसेंबरचा मध्य) नजफनेही तसाच खंदक खणला.

शत्रूला येता येऊ नये म्हणून खंदक खणणे, प्रचंड भगदाडे पाडणे यासारख्या युक्त्यांचा वापर करून वेढा चालू ठेवणे, या कामाला मुगल सैनिक अगदीच नापाक होते. त्यांची हालचाल त्यांच्या लहरीनुरूप होत असे. शिवाय ते अकलेनेही बेताचे. त्या हिशेबात पाश्चात्य सेनाधिकारी हे लष्करी हालचालीत अतिशय तज्ज्ञ.

या संदर्भात त्याचे मत विचारण्यात आले असताना खरमरीत व खवचट टीका करण्याची संधी, त्याने का सोडावी? अगदी निःसंकोचपणे तो म्हणाला, "माकडांनी जर एकमेकांवर हल्ला चढवायचं ठरवलं तर खात्रीने तुम्ही करता आहात तसेच खंदक तयार होतील." अर्धे मुगल सैन्य शहाबुरुजासमोर होते व अर्धे, खुद्द सर्वोच्च सेनाधिकाऱ्याच्या हाताखाली गोपालगडच्या बाह्य कोटात होते.

किल्ल्याचा परीघ खूपच विस्तीर्ण; त्या मानाने मिर्झाचे सैन्य छोटे असल्याने पूर्ण वेढा घालणे शक्य नव्हते. तेव्हा धडक मारायची ती जाटांची गाळण उडवील अशीच हवी. तसा प्रयत्न नजफने सुरवातीस करून पाहिला. जाटांच्या सेनेत साधूचा वेष धारण करणारे काही लढवय्ये हिंदू बैरागी होते. शहाबुरूज व गोपालगड या दरम्यान असणाऱ्या उद्यानातून ते ठाण मांडून होते. ही जागाच अशी मोक्याची होती की, येथून शत्रूवर एकदम छापा घालणे, शत्रूच्या खंदकावर मारा करणे व त्याचा दाणागोटा आणि अन्य रसद तोडणे, जाटसेनेला सहजी शक्य होत असे. त्यामुळे मुगलांच्या छावणीत मुबलक दाणागोटा येईना. एक दिवस मिर्झा नजफ स्वतः पुढे झाला व रसदीची मधेच लूटमार करणाऱ्या या बैराग्यांवर तुटून पडला. दीर्घकाळ तुंबळ रणकंदन झाले. मिर्झाकडील खूप शिपाई मेले. त्याच्या मर्जीतला गुलाम खुस्रू बेग हाही ठार झाला. शेवटी नागा पलटण हरली. त्यांनी किल्ल्यात माघार घेतली व त्या ठिकाणी मुगल सैन्य घुसले. त्यामुळे मुख्य किल्ल्याचा व गोपाळगडचा संबंध तुटला. "मुगलांच्या या विजयाने जाट सैनिकांना अशी काही दहशत बसली, की किल्ल्याच्या रक्षणासाठी असलेल्या शिबंदीतील शिपाई आंघोळ वा तत्सम शरीरधर्मासाठीही बाहेर येईनासे झाले."

१७७६ च्या जानेवारी महिन्याच्या मध्याच्या सुमारास किल्ल्यावर रात्री हल्ला चढविण्याचा एक प्रयत्न झाला. शिपायांच्या सात तुकड्या व तीन फ्रेंच अधिकारी यांसह मध्यरात्री हल्ला चढविण्यासाठी रेने मादेकला पाठविण्यात आले होते. शहाबुरुजाच्या उत्तरेस किल्ल्याच्या पश्चिम भागाकडे कामा दरवाजाचे संरक्षणासाठी जो बुरूज होता, त्यावर अचानक हल्ला चढवायचा होता. या दारावर जाटांचा पुरेसा बंदोबस्त नाही अशी बातमी मुगलांच्या हेरांनी त्यांच्या सेनाप्रमुखाला दिली होती. पूर्वी कधीही न पाहिलेल्या या बुरुजावर मुगलांच्या एका तुकडीने हल्ला केला. अखेरीस फ्रेंचांचा घायकुतेपणा व इराण्यांचा सुस्तपणा यांचा परस्परांस छेद बसून अपेक्षित यश हाती आले नाही. आपल्या तुकडीतील सैनिक वर चढून येईपर्यंत वाट न पाहता मादेकने एकदम गोळ्यांचा वर्षाव करण्यास सुरवात केली. अशी सुरवात ही एक सांकेतिक खूण होती. गोळ्यांचा आवाज कानी पडताच खंदकात असणाऱ्या नजफच्या शिपायांनीं त्यांच्या साहाय्यार्थ धावायचे होते. आपल्या शिपायांनी योग्य त्या तुकड्या करून बुरुजाच्या दिशेने चढून जावे, तटाच्या डाव्या व उजव्या बाजूने जात, तटावर ताबा ठेवावा, साहाय्यक सैनिक तिथे येईपर्यंत आपली जागा सोडू नये, असे ठरले असल्याने शिपायांना गड चढून जाता यावा म्हणून अशा चढावर मुगलांनी हल्ला केला नाही. तोफगोळे व बंदुकांच्या भडिमाराने जागी

झालेली शिबंदी स्वसंरक्षणास सिद्ध झाली. बुरुजाचा ताबा घेतलेल्या शाही सैनिकांना त्यांनी घेराओ घातला; त्यापैकी बऱ्याच जणांना त्यांनी ठार मारले किंवा जायबंदी केले. उरलेल्यांनी तटावरून खाली उड्या मारल्या. नजफखान तळावरील मैदानात येऊन दाखल झाला तेव्हा सूर्य उगवला होता. किल्ल्यावरील शिबंदीनी कामा दरवाजा उघडून टाकला, त्यांच्यातले हजारो सैनिक बाहेर आले व संधी येताच मुसलमानांवर तुटून पडले. गडाखालील विस्तीर्ण जागेत शाही सैन्य दाटीवाटीने उभे होते. गडावरून जाटांनी त्यांच्यावर प्रचंड तोफगोळे टाकले. मुसलमान शिपाई व त्यांचे घोडे तडकाफडकी मरू लागले. जान कुर्बान करण्याऐवजी ती कशी वाचविता येईल या भीतीने मुसलमान शिपाई इतक्या घाईगर्दीने पळू लागले, की पाठलाग करणारा एक जाट सैनिक दहा मुगल स्वारांना वरचढ ठरला. (इब्रत : भाग १, २८१). अशा आणीबाणीच्या वेळी सॉम्ब्र विद्युत्‌गतीने तिथे आला. सैनिकांची एक तुकडी व दोन तोफा एवढेच त्याच्याजवळ होते. आपल्या अचूक नेमबाजीने विजयोन्मादाने धुंद झालेल्या जाट सैनिकांना त्याने पांगवले व नजफखानचा जीव वाचविला. नजफखानचे सर्व शिपाई त्याला सोडून गेल्याने तो एकटाच तिथे होता.

कशाच्यातरी आधाराने वर चढून किल्ल्यात घुसायचे प्रयत्न मुसलमानांनी दोनदा केले. किल्ल्याचे रक्षण करणाऱ्या शिबंदीला त्याचा सुगावा आधीच लागला असल्याने ज्या ठिकाणी शत्रू येतील असे वाटले तेथील बंदोबस्त जाटांनी चांगलाच वाढविला. शत्रूचे दोन्ही प्रयत्न फसले. वेढा घातल्याला बरेच दिवस लोटले. यश दृष्टिपथात येत नव्हते. नजफखानला ही कुचंबणा असह्य होत होती. त्याला शिपायांचा नऊ महिन्यांचा पगार द्यायचा होता. छावणीत दाणागोटा बराच अपुरा असल्याने शिपायांना अर्धपोटी रहावे लागे. हे शिपाई आपला वरिष्ठ अधिकारी किंवा खुद्द नजफखान याच्याविरुद्धही बंड करून उठत; हुकुमाप्रमाणे वागायला नकार देत. हेतू हा की, त्यामुळे तरी नजफखानने पगार द्यावा. याच वेळी त्याच्या अडचणी आणखी वाढल्या. पण प्रतिष्ठेचा प्रश्न केल्याने दिगच्या बाबतीत तो इरेस पडल्यासारखा झाला. त्याच्या या कठिण परिस्थितीने दिल्ली दरबारातील त्याच्या शत्रूंना हर्षाच्या उकळ्या फुटत होत्या. त्याला बदनाम करण्यासाठी झबिताखानला अंजारून गोंजारून त्याच्या जागी नेमण्याचे डाव शिजत होते. पण युद्धशास्त्र व राजकारणपटू अशा नजफखानावर कसलाही परिणाम झाला नाही. नैराश्य व उतावळी न दाखवता त्याने आपले काम चालू ठेवले होते. या त्याच्या धीरोदात्त वृत्तीबद्दल मॉदेवने मनापासून गौरवोद्गार काढले आहेत. या उलट जाटांची स्थिती. त्यांच्याकडे ना एकजूट ना नेता, ना स्वार्थ साधण्याची हुषारी. "त्यांच्या किल्ल्यातील जाट मंडळीतच अनेक गट. राजाचे चुलतेच त्याचा अधिकार मानीत नसत, कधीकधी त्याच्याशी दोन हात करीत. जाटांनी जर आपापसात एकजूट केली असती तर नबाब त्यांच्या राजधानीपर्यंत येऊ शकला असता असे मला वाटत नाही, वेढा घालण्याचे दूरच." [मॉदेव, २९५]. आपल्या संरक्षणाच्या कामी आपल्या सैन्यात निदान पोटार्थी सैनिकांचा भरणा करावा व त्यासाठी जवळची अवाढव्य संपत्ती वापरावी एवढी साधी समजही त्या वेळच्या जाट सत्ताधाऱ्यांना नव्हती.

१४. दिगची संपूर्ण नाकेबंदी

हिंमतबहाद्दूर आणि उमरावगीर गोसावी हे दोन गोसावी सेनानी अयोध्येच्या नबाबाकडे होते. इंग्रजांनी त्यांना त्यांच्या सैन्यासह तिथून हाकलून दिले. या दोघांजवळ ६००० भाडोत्री पण शूर शिपाई व ३०–४० तोफा होत्या. अयोध्येच्या नबाबाकडून सुटल्यावर आपल्या सैन्यासह ते नजफखानकडे आले; नजफखानने त्यांचे साहाय्य घेतले. मात्र त्यांना नियमित वेतन म्हणून काहीही मिळणार नव्हते. फक्त लूटमार करून जे मिळेल, त्यावर नोकरी करायची त्यांची तयारी होती. दिगचा पाडाव त्वरित व्हावा म्हणून मुगल सेनापती नजफखान याने आपले डावपेच बदलायचे ठरविले. त्याने वेढ्याला नाके-बंदीचे स्वरूप दिले. मुगल स्वारांच्या दोन तुकड्यांपैकी एक नजफकूली किंवा मिस्किन याच्या नेतृत्वाखाली व दुसरी गोसावी याच्या हाताखाली अशा देण्यात आल्या. एक तुकडी कुंभेरकडून येणाऱ्या दक्षिणेकडील वाटेवर गस्त घालायची तर दुसरी कामाहून येणाऱ्या उत्तर मार्गाचा बंदोबस्त ठेवायची. या दोन रस्त्याने दिगच्या किल्ल्यावर दाणागोटा व अन्य जीवनावश्यक वस्तूंचा पुरवठा इतक्या मुक्तपणे व मुबलक प्रमाणात व्हायचा की, मुगलांच्या छावणीत मिळे त्यापेक्षाही गडावर मिळणारे धान्य स्वस्त असायचे. ही रसद वाटेतच अडवून धरायचे काम मुगल स्वारांच्या या दोन तुकड्यांनी इतके चोख बजाविले की, किल्ल्यातील शिबंदीला पाठविली जाणारी रसद पूर्ण थंडावली. गडावर असलेला धान्य-साठा काही आठवड्यांतच संपून गेला. गडावरील शिबंदीत साठ हजार जाट होते. शिवाय जिवाच्या भीतीने आसपासच्या मुलुखातील अनेकांनी तिथे आश्रय घेतला होता. सगळी-कडून चोंदी झालेल्या किल्ल्यावर भीषण दुष्काळ पडला. त्यावर कोणताच इलाज दृष्टिपथात नव्हता. दररोज शेकड्यांनी माणसे मरू लागली. जनावरेही मरत होती. या सगळ्यांच्या सडलेल्या प्रेतांनी हवेत विष पसरले. जे वाचले ते कसलाही विधिनिषेध न मानता जठरानल शमविण्यासाठी मिळेल ते स्वाहा करीत होते. [इब्रत भाग १; २८२, मॉदेव २९८]

ही दुष्काळी परिस्थिती असह्य होऊन रात्री काळोख पडल्यावर जाट सैनिक गटा-गटाने किल्ल्यातून निघून जाऊ लागले. परिणामी गडावर साठ हजारांपैकी जेमतेम दहा हजार शिबंदी राहिली. जे दरिद्री होते त्यांनी शत्रूच्या छावणीत जाऊन पोटास मिळ-विण्यास हरकत नाही अशी रणजितसिंगाने त्यांना परवानगी दिली. वास्तविक या माणसांना खाली येऊ दिले नसते तर किल्ल्यातील दुष्काळ आणखी उग्र होऊन किल्ला लवकर हाती पडता. नजफखानने तसे केले नाही. अशा दीनदुबळ्यांच्या जीवितसुरक्षिततेसाठी त्याने काही मर्यादा घातल्या व त्यांना आपल्या छावणीत आधार दिला. स्वतः नजफचे सैनिक त्यांचे रक्षण करीत. नजफच्या या उदार धोरणाने दीनदुबळेच नव्हेत तर अनेक धनिक खाली आले व त्यांनी नजफखानाच्या छावणीचा आश्रय घेतला. सावकार, पेढीवाले व जाट राजघराण्यातील व्यक्तींनीही या मार्गानेच आपली सुटका करून घेतली.

१५. **दिगचा पाडाव**

नजफखाननिर्मित दुष्काळाने सहा आठवड्यांत गजबजलेला गड खाली झाला. दि. २९ एप्रिल १७७६ रोजी गडावर असलेल्या उर्वरित शिपायांसह रात्रीच्या वेळी स्वतः रणजितसिंग गडावरून खाली आला व कुंभेरच्या रस्त्याने चालू लागला. वाटेत हिंमत-बहादूरच्या स्वारांनी त्याला अडविले, थोडीफार चकमक उडाली, पण रणजितसिंग सुखरूप निसटला. " रणजितसिंग गडावरून निसटल्याची वार्ता मुगल छावणीत आली मात्र, लूट करायला मिळेल ही हाव सुटून सगळे शिपाई गडावर धावले. सुरवातीस खूपच गोंधळ माजला. रक्तपात झाला, कितीतरी बायका-मुले प्राणाला मुकली. लूटमार करणारांनी किल्ल्यावर ठिकठिकाणी आगी लावल्या. जाटांकडे दारूसामान प्रचंड प्रमाणावर होते व ते वेगवेगळ्या इमारतीत साठवून ठेवले होते. लागोपाठ तीन दिवस या साठ्यांच्या जागी क्षणाक्षणाला स्फोट होत होते. त्यात विजयी व पराभूत, दोघांचाही सारखाच निकाल लागला. मूर्तिपूजक हिंदूंच्या धर्माबद्दल व धार्मिक स्थानांबद्दल द्वेष हा मूर्तिभंजक मुसलमानांचा परमोच्च आनंद; त्यांनी गायी-बैलांची आतडी व मुंडकी टाकून तेथील देवालये भ्रष्ट केली. "

आपल्यावर अत्याचार होऊन आपली अब्रू जाऊ नये म्हणून विधवा झालेल्या तीन राण्यांनी आत्मबलिदान केले. (मादेव : २९८–२९९ ; २३१ ; गुलाम अली : ३,९१)

दिवस उजाडल्यावर मिर्झा नजफ स्वतः किल्ल्यावर आला. आपल्या शिपायांनी लुटालूट व अत्याचार करू नयेत यासाठी झैन-उल-अबीदीन याला त्याने त्यांच्यावर देखरेख करायला ठेवले. सर्व स्थिरस्थावर व्हायला तीन दिवस लागले. विजय मिळवायला जी किंमत मोजावी लागली त्या मानाने लूटमारीत नजफखानच्या हाताला फारच थोडे लागले. बाले-किल्ला व बदनसिंगचा महाल येथील संरक्षण-व्यवस्था भक्कम होती. सॉम्ब्रच्या तोफा सतत वर्षाव करीत असताही आतील जाटांनी ती ठिकाणे दोन दिवस लढविली. रात्र पडल्यावर त्या शूर जाटांनी राजपूत परंपरेप्रमाणे आपल्या हातांनी आपल्या स्त्रियांना कंठस्नान घातले व त्यांच्यातला शेवटचा सैनिक जिवंत असेपर्यंत त्यांनी शत्रूला तोंड देण्याची शिकस्त केली. स्वतः मरता मरता शत्रूकडील अनेकांना त्यांनी ठार केले.[१२]

शस्त्रे, तोफा व सामानाचा प्रचंड साठा मिर्झा नजफच्या हातात पडला. पुरून ठेवलेली काही संपत्तीही (ही सहा लाखांच्या आसपास होती असे म्हणतात) मिळाली. शिपायांच्या पगाराची म्हणून त्याला जी रक्कम द्यायची होती त्या मानाने ही प्रचंड रक्कमही ' किस झाड की पत्ती ' होती. पगारासाठी शिपायांनी जो आरडाओरडा केला त्याने तो काहून गेला. " अशा प्रकारच्या त्याच्या विजयानंतरही त्याची मानसिक अवस्था विलक्षण होती. त्यातून बाहेर पडण्यासाठी नजफकूली व अफ्रासियाब खान यांनी त्याला असे सुचवले की, त्याने आपल्या सैनिकांना आग्रा शहरात मनसोक्त लूटमार करू द्यावी; शर्त अशी घालावी की, या लुटीत जे मिळेल त्यात नजफखानाकडून येणे असलेली सर्व रक्कम मिळाली हे त्यांनी मान्य करावयाचे. पण हा दुष्ट सल्ला त्याने तात्काळ धुडकावून लावला. [मॉदेव, २९९, **सीपीसी** : खंड ५; क्रमांक ३०६, ३७०]

१६. नजफखानची मध्यअंतर्वेदीतील मोहीम

आपल्या प्रचंड सैन्याला पोसायचे कसे हा नजफपुढे एक तितकाच प्रचंड प्रश्न होता. दिगचा लढा संपला. त्यानंतर त्याने हाताखालील अधिकाऱ्यांना आपापल्या जहागिरींत महसूल गोळा करायला पाठवून दिले. दिगच्या पाडावानंतरच्या पावसाळ्यात पुढील मोहिमा कशा करावयाच्या याचा विचार करीत तो आग्रा येथेच राहिला. पावसाळा संपता संपता म्हणजे ऑक्टोबरच्या सुरवातीस अफ्रासियाब खानाने मथुरेनजीक यमुना ओलांडली व तो अलिगढ किल्ल्याच्या नैर्ऋत्येकडील कोपऱ्यात गेला. या भागातील बहुसंख्य जाट व गुजर जमीनदार सूरजमलच्या वर्चस्वाखाली होते. त्यानंतर ते स्वतःच तिथे शिरजोर झाले होते. या जमीनदारांना आपली सत्ता मान्य करायला लावण्याचे काम अफ्रासियाबने सुरू केले. फुफसिंग हा या बंडखोर जमीनदारांचा नेता होता. [फूफसिंग हा तेव्हा जाट असून त्याचा भरतपूरच्या राजघराण्याशी रक्ताचा संबंध नव्हता.] तो स्वतःला मुरसान व संसीचा मालक म्हणवी. त्याने स्वतःला राजा असा किताब घेतला होता. [अधिकारप्राप्ती १७४९ ; मृत्यू १७९८] फूफसिंगने वठणीवर यावे म्हणून नजफखानने त्याला काही पत्रे पाठविली होती. त्यांचा काहीच उपयोग न झाल्याने डिसेंबर, १७७६ मध्ये स्वतः नजफखान मुरसानला आला. त्याने अफ्रासियाब व इतर सेनाधिकाऱ्यांना बोलावून घेतले व आपल्या प्रचंड सैन्यानिशी मुरसानला वेढा घातला. त्याच्या तोफांच्या प्रचंड माऱ्याने मुरसानची तटबंदी अल्पावकाशात ढासळली. किल्ल्यातील संरक्षक शिबंदीने शर्थीने तोंड दिले व हिंमतबहाद्दूर गोसाव्याला जायबंदी केले. सतरा दिवसांनंतर किल्ला लढविणे अशक्य झाले व एका रात्री (३ जानेवारी, १७७७) राजा फूफसिंग तिथून बाहेर पडला व संसीला पळून गेला. मिर्झा नजफने संसीपर्यंत त्याची पाठ सोडली नाही. नाइलाज होऊन फूफसिंग बिनशर्त शरण आला. हिंमतबहाद्दूरने रदबदली केली म्हणून पूर्वी असलेले किल्ले व जहागिऱ्या फूफसिंगकडेच ठेवण्यात आल्या. मुरसान अफ्रासियाबखानच्या जहागिरीला जोडण्यात आले. त्यानंतर मिर्झा नजफ झपाट्याने तसाच पुढे गेला व त्याने अलिगढच्या पूर्वेस २५ मैलांवर असलेले छराभसौरी हे ठिकाण काबीज केले. इतके होईपर्यंत जानेवारी संपला. नजफखानला दुसऱ्या कामगिरीवर हजर होण्यासाठी दिल्लीहून तातडीचे बोलावणे आले.[१३]

टीपा : प्रकरण २८

५९ १ **डीसी : इब्रत :** भाग, १, २२८; **गुलामअली :** खंड ३; २१–२८; **मिस्किन :** २८८; **मुन्नालाल :** १४६. हे दिनांक तत्कालीन, फार्शी उपलब्ध साधनांवरून घेतलेले आहेत. त्यावरून रेने मादेकला १७७४ मध्ये सरदारकी बहाल करण्यात आली असावी (**बार्बे :** पृ. २८९–९१; दिनांक चुकीचे आहेत.).

सीपीसी : खंड २; क्रमांक : १७८, ६२६, ९८७ (बादशहाच्या दिल्लीपर्यंतच्या प्रवासासाठी सैफुद्दिनला बारा लाख रुपये कर्ज काढावे लागले होते) सियार : खंड ३; ८५

६१ २ मिस्किन : २८३; इब्रत : भाग १; २२९

६२ ३ अंतर्वेदीतील मोहीम : डीसी : इब्रत : भाग १, २१३–२१४ (१७७२ मध्ये असे चुकीने दिलेले आहे) गुलामअली : खंड ३; २९–३३; चाहर गुलझार ४९२ बी–४९३ ए (संपूर्ण माहिती) सीपीसी : खंड ४; क्रमांक ५५८

६३ ४ मैदानगढी–इब्रत : भाग १, २१२ (सालाचा उल्लेख चुकीचा आहे) गुलामअली : खंड ३; ३४; चाहर गुलझार : ४९२ बी–४९३ बी; मुन्नालाल : १५१; सीपीसी : खंड ४; क्रमांक : ६२८

६५ ५ लढाई : चाहर गुलझार : ४९३ बी; इब्रत : भाग १; २३६–२४०; गुलामअली : खंड ३; ४०–४४; डीसी; सीपीसी; खंड ४ क्रमांक ६३८; छट्टाची लूटमार; गुलामअली, खंड ३; ३८, (चाहर गुलझार, ४९३ ए) नजफकूलीने केलेली मथुरेची लूटमार (चाहर गुलझार, ४९४ ए) इब्रत : लढाई झाली त्या ठिकाणचे नाव शहापूर असे देतो. मी आसपास चौकशी करूनही मला त्या नावाचे गाव आढळले नाही. (तातरपूर तर नसावे ?)

६७ ६ नजफने आग्र्याला घातलेला वेढा : डीसी; मुन्नालाल, १५२, गुलाम अली, खंड ३; ४५–५१ इब्रत : भाग १, २४५–२४९; चाहर गुलजार, ४९३ बी, सीपीसी : खंड ४, क्रमांक ९०४,९०७ (२) एटावा–सीपीसी खंड ४, क्रमांक : ७३१, ७३६; एसपीडी : खंड, २९; क्रमांक : २६३

७० ७ १७७४च्या जून महिन्यात बादशहाने कर्नल चॅम्पिअनला लिहिले होते, 'गेल्या तीन वर्षांत माझ्या मुलुखातील उत्पन्न १२ ते १४ लाखांनी घटले आहे. नुकत्याच झालेल्या शिखांच्या आक्रमणांनी व अवर्षणाने महसूलही आणखी कमी झाला आहे.' (सीपीसी : खंड ४, क्रमांक : ११५२) बादशहाच्या कुटुंबकबिल्याचा मासिक खर्च दीड लाख रुपये तर त्याच्या संरक्षक पलटणीचा मासिक खर्च अडीच लाख होता. (कित्ता : ९१३)

७२ ८ नजफविरुद्ध असलेल्या तक्रारींची लांबलचक यादी : सीपीसी खंड ४, क्रमांक, १३६०; तसेच, ९७३,९१२ व ११८४ (त्याने खूप मोठे सैन्य उभारले आहे.). शुजा नजफची कड घेतो, १३६२

७२ ९ **डीसी: इब्रत :** भाग १, २५०–२५१, **गुलामअली :** खंड ३; ५०–५८; **मुन्नालाल** १५८–१६२; **सीपीसी** खंड ४, क्रमांक १२४१, १२६७, १२७७, १२९१ (त्याशिवाय याआधी दिलेले)

७३ १० **नजफची जाटांवरील दुसरी मोहीम : मॉदेव** (बेंगॉल पास्ट ॲण्ड प्रेझेन्ट, १९३६ यात मी भाषांतर केलेली) **मादेकच्या मेमुआर; डीसी, गुलाम अली,** खंड ३; ५९–६०, ८७–९२; **मिस्किन** : ३०३-३१४; ३१७–३२०; **मुन्नालाल** : १६२–१६५, १७२; **इब्रत** : भाग १; २६१–२७४; २७६–२८५; **सीपीसी** खंड ४, क्रमांक १८८६, खंड ५, क्रमांक ३०६, ३७०

७६ ११ **थॉर्न :** मेमॉयर ऑफ दि वॉर इन इण्डिया, ४१३–४१४; **पेस्टर :** वॉर ॲण्ड स्पोर्ट इन इण्डिया, ३६९; मार्टिनच्या 'वेलस्ले डिस्पॅचेस' मध्ये उत्कृष्ट योजना असा उल्लेख.

८१ १२ "सगळ्या जाट मुलुखावर परक्यांची सत्ता होती. सूरजमलची विधवा राणी किशोरी इने मध्यस्थी केल्यावरच रणजितसिंगाला भरतपूरचा किल्ला त्याचेकडे ठेवण्यास नजफखानने मान्यता दिली. या किल्ल्याच्या आसमंतातील मुलुखही रणजितसिंगाकडेच ठेवण्यात आला होता. या मुलुखात वर्षाला नऊ लाखांचे उत्पन्न येत असे." **एन. डब्ल्यू. पी.** गॅझेट; ८, **मथुरा,** १६३

८२ १३ **अंतर्वेदीतील मोहीम :** ऑक्टोबर, १७७६–जानेवारी, १७७७–**डीसी; इब्रत :** भाग १; २९०–२९१; **मिस्किन :** ३२१; **मुन्नालाल,** १७६; **ॲट्किन्सन; एन. डब्ल्यू. पी.** गॅझेटिअर, २; ४३५–४४१ (मुंडसान), ४४४ (भामौरी)

प्रकरण २९ वे

झबिताखानाची अखेरची धडपड, १७७६-१७७८ सतलजअलीकडील भागावर शिखांचा ताबा

१. मिर्झानजफच्या जागी झबिताखानला आणण्याचे दरबारातील कारस्थान

मे, १७७५ ते जानेवारी, १७७७ या काळात मिर्झा नजफखान हा जाटांवरील मोहिमेत गुंतला असताना त्याच्या दरबारातील हितशत्रू त्याच्या पाडावासाठी त्याच्या विरुद्ध अनेक कपटकारस्थाने रचीत होते. त्याचे हितशत्रू इतक्या हीनवृत्तीचे की त्यांची कारस्थानेही तशीच होती. त्यामुळे ती सर्व फुकट जात व बादशहा, मिर्झावर आणखी आणखी विसंबून रहायला लागे. नजफ दरबारात आला तेव्हा अगदीच तरुण होता, त्यातून परदेशी. बादशहाने त्याचा सल्ला ऐकावा हे सहन न होऊन हिसमउद्दौला त्याला सुरवातीपासून पाण्यात पाहत असे. झबिताला मीर बक्षी करावा असा सल्ला त्याने बादशहाला दिला होता (जानेवारी १७७३). त्यात त्याचे झबिताचा हितकर्ता तुकोजी होळकर याला खूष करायचे व दरबारातील मानाच्या अशा क्रमांक दोनच्या जागेवरून नजफखानला हुसकावून लावायचे असे दोन उद्देश होते.

पण झबिताखान म्हणजे एका मोठ्या नावाची फक्त छाया. शुक्रताल व पथ्थरगड १७७२ मध्येच त्याच्या हातातून गेल्यापासून तो जवळजवळ खंकच होता. त्याच्या नावाचा दबदबाही पूर्वीसारखा नव्हता; वडिलांच्या वेळची शूर शिपायांची पलटण त्याने केव्हाच निकालात काढली होती. होळकरांनी मार्च १७७३ मध्ये रोहिलखंडावर स्वारी केली त्यावेळी नजीबउद्दौलाच्या या चिरंजिवांची मराठ्यांचा झीलकरी एवढीच भूमिका होती. उत्तरभारतात कुठेही असणाऱ्या अफघाणाला नजीबउद्दौला हा स्वयंभू नेता व संरक्षक वाटे. स्वतःबद्दलची तशी प्रतिमा निर्माण करण्याऐवजी, जरा कुठे खुट्ट झाले किंवा संकटाची नुसती चाहूल लागली, तरी तो गंगापार रहाणाऱ्या रोहिल्यांची मदत मागत असे. त्याच्या विनंतीला कुणीही मान देत नसे. आपली लष्करी तयारी असावी तितकी नाही हे तो समजून होता. त्यामुळेच रोहिल्यांनी १७७४ मध्ये शुजाउद्दौलाबरोबर लढा दिला त्यावेळी तो त्यांच्या बाजूने उभा राहिला नव्हता. चंचल स्वभाव व धरसोड वृत्ती या दोषांमुळे, सर्व अफघाणांनी एकत्र येऊन शुजाविरुद्ध दंड थोपटावेत यासारख्या योजनाही तो गुप्तपणे ऐकत असे. अखेरीस या गुप्त योजना फुटल्या, शुजाउद्दौलाच्या कानावर गेल्या. त्याने एप्रिल १७७४ मध्ये मिरा कत्रा या ठिकाणी रोहिल्यांचा धुव्वा उडविला; या दुटप्पी माणसाला अलगदपणे दूर केले व नजीबाबादसह रोहिल्यांचा गंगेपलीकडील सर्व मुलूख आपल्या राज्याला

सहजी जोडून टाकला. त्यानंतर झबिताखानच्या ताब्यात सहराणपूर व मीरत जिल्ह्यातील काही मुलूख राहिला. वास्तविक हा मुलूख बादशहाने त्याला जहागिरीदाखल दिलेला; त्याबदली सर्वसाधारण मनसबदाराप्रमाणे त्याला बादशहाला खंडणी द्यावी लागे. बादशहाचा बक्षी ही त्याची उपाधी कायम असली तरी त्या जागेची सर्व कामे व त्याबाबतचा निर्णय मिर्झा नजफच घेत असे. दरबारच्या प्रत्यक्ष कारभारात त्याचा कोणताही वाटा नव्हता.

मे, १७७३ मध्ये हिसामची सद्दी संपली. त्याच्या जागी बादशहाचा मुखत्यार म्हणून अबदुल अहदखान आला. आपण नजफखानचे मित्र असा आभास सुरवातीस त्याने निर्माण केला असला तरी त्यानेही लवकरच हिसामच्या पावलावर पाऊल ठेवले, व नजफखानचे महत्त्व कमी करून त्याला खाली खेचण्याच्या गुप्त कारवाया सुरू केल्या. जाट मोहिमेत गुंतल्याने नजफखान दिल्लीत नसे. त्याचा फायदा घेऊन अहदने झबिताला दरबारात आणले. आपल्या घरी त्याचे नबाबी थाटात स्वागत केले व शहा अलमची व त्याची भेट घडवून आणली. त्याचे रोहिला जमातीवर केवढे वजन आहे हे आपल्या खास शैलीने बादशहाला पटवून दिले. झबिताला, "तू सर्व अफघाणांना आपल्या हुकमतीखाली एकत्र आण व दरबारात सर्वश्रेष्ठ झालेल्या या इराणी उपटसुंभाचा व त्याच्या मुगल अनुयायांचा नक्षा उतरव" असा सल्ला देण्याचे काम अहद करीतच होता. त्यासाठी अहदचा वैरी दूर व्हावा म्हणून भेकड व कावेबाज कश्मिरी अहदचा तलवार बहाद्दर म्हणून झबिताला काम करायचे होते. आपल्या छोट्याशा उमरीत झबिताने दुर्दैवाचे खूपच तडाखे सोसले होते. स्वतःच्या उणीवा त्याला माहीत होत्या. 'अली मुहमद रोहिला' वस्तीतील व त्याच्या वडिलांच्या वेळची नावाजलेली अफघाण सेना आपापसात फाटाफूट होऊन मोडीत निघाली होती. रोहिलखंडातील घरंदाज कुटुंबे शुजाउद्दौलाच्या मदतीने यमुनानदीपलीकडील दक्षिण भागात नव्यानेच गेली होती. अफगाण जमातीतील शिलकी लढवय्ये पुरुष पोटासाठी नजफखानच्या सैन्यात गेले होते. धडकी भरवणारा धुरंधर दुराणी मरून गेलेला; नजीबउद्दौला या नावातील जादू आता अफगाण जमातीला एकत्र आणण्यास पुरी पडणारी नव्हती. झबिताचा एकमेव आधार म्हणजे भाडोत्री शीख. त्यांची मदत मिळावी म्हणून त्याने खूप अपमान सहन केले. अबदुल अहद हा 'पाहुण्याच्या जोड्याने विंचू मारणार' असे दिसताच झबिताखानने त्याला मदत करायचे नाकारले. बादशहाच्या खाशा मर्जीतल्या व दरबारातल्या हम करे सो कायदा ' या वृत्तीच्या अहदला झबिताखानचा नकार विलक्षण झोंबला. रोहिल्यांचा हा नेता एकदम त्याचा प्रथम क्रमांकाचा शत्रू झाला आणि अहदने त्याचा निकालच लावायचे ठरवले.

२. झबिता, अबुल कासीमच्या हाताखालील शाही फौजांचा पराभव करतो; त्याची शिरजोरी

झबिताच्या जहागिरीपैकी बराचसा भाग बादशहाचाच. तेथील महसूल सरकारी तिजोरीत भरण्याची, झबिता हेतुपुरस्सर टाळाटाळ करीत होता. यासाठी त्याच्यावर सैन्य

पाठवावे म्हणून बादशहाला अनुकूल करून घेण्यास अबदुल अहदला मुळीच प्रयास पडले नाहीत. झबिताखानवर जे सैन्य पाठवायचे त्यावर अबुल कासीमखान[1] (कुलनाम अझम उद्दौला) याला प्रमुख नेमण्यात आले. अबुल कासीम हा अहदचा धाकटा भाऊ. शासकीय कार्यक्षमता, व्यक्तिगत धैर्य व राजकीय चातुर्य ही अबुल कासीमला मिळालेली दैवी देणगी होती. अबुल कासीम हा या मोहिमेवर जायला उत्सुक नव्हता. त्याने आपली नाखुषी वरचेवर बोलून दाखविली, तरीसुद्धा सहरणपूर जिल्ह्याचा फौजदार म्हणून त्याची नेमणूक करण्यात आली. सांप्रत झबिताच्या ताब्यात असलेला पण मूळ बादशहाच्या मालकीचा असलेला तेथील प्रदेश व महाल यांच्या कारभाराची घडी त्याला नीट बसवायची होती. त्या ठिकाणी त्याला दिल्लीहून ऑक्टोबर, १७७५ मध्ये तिकडे पाठविण्यात आले. मुगलिया घोडदळाची एक तुकडी व गंगाराम आणि भवानीसिंग या सेनाधिकाऱ्यांच्या हाताखालील शिस्तबद्ध शिपायांच्या दोन तुकड्या एवढे सैन्य त्याच्याबरोबर होते. 'माझा भाऊ मला माझ्या कबरस्थानात पाठवीत आहे' अशी अभद्र वाणी उच्चारीतच अबुल कासीमने दिल्ली सोडली; व तो अंतर्वेदीत वरच्या भागास आला. तिथे येताच कसलाही अडथळा न येता त्याला मीरत व अन्य काही किल्ले घेता आले, कारण तेथील रोहिले किल्लेदार किल्ला सोडून केव्हाच निघून गेले होते. पहिले चार महिने फार सावधानतेने त्याने शुजाशी दोन हात करायचे हेतुपुरस्सर टाळले. झबिताने खंडणी द्यावी व हा प्रश्न शांततेच्या मार्गाने सोडवावा म्हणून त्याने वाटाघाटीचा मार्ग अनुसरला. आपल्या सैन्यातील मुगलिआ स्वार हे भाडोत्री असून विश्वासार्ह नाहीत हे तो समजून होता.

अबदुल अहद काहीही ऐकून घ्यायला तयार नव्हता. झबिताशी लढायची त्याने आपल्या भावावर जवळ जवळ सक्तीच केली. म्हणून आपल्या हल्ल्याचा काही उपयोग होणार नाही याची खात्री असूनही अबुल कासीम हा ४ मार्च १७७६ रोजी झबितावर चालून गेला. दरम्यान झबिताखानने पैसे देऊन शीख सैन्याला आपल्या चाकरीत बोलावून घेतले. मुझफ्फरनगरच्या वायव्येस आठ मैलांवर अमीरनगर आहे, तिथे त्याच महिन्यात म्हणजे दि. ११ मार्चला या संहारक संग्रामास सुरवात झाली. झबिताखानने आपल्या सैन्याच्या आघाडीला शीख स्वार उभे केले, दुसऱ्या ओळीत रोहिला सैन्य होते व तो स्वतः मात्र शत्रूच्या नजरेस पडणार नाही अशा प्रकारे पाठीमागे बसला. या लढाईत शिखांनी पार्थियन डावपेचांचा वापर केला. प्रथम ते शत्रूवर धावून गेल्यासारखे करीत, शत्रूकडून तोफगोळे व बंदुकांचा मारा सुरू होण्यापूर्वीच माघार घेऊन पळत असल्याचा आभास निर्माण करीत. याही वेळी शिखांनी याच डावपेचांचा उपयोग केल्याने कासीमच्या सैन्यातील दोन तुकड्या माघार घेणाऱ्या शीख स्वारांचा पाठलाग करीत पुढे चालल्या व आपल्या गोटातून खूप दूरवर अशा शत्रूच्या गोटात घुसल्या. पण हुशार शिखांनी चटकन घोडे वळविले, वर्तुळाकार रचना केली व ते शाही फौजांच्या पिछाडीवर तुटून पडले. मुगलिया स्वार लगोलग पळून गेले. त्यांना फक्त संरक्षणाचा देखावाच करावयाचा होता. शाही सैन्यात प्रचंड गोंधळ माजला. रणांगणात अबुल कासीम एकाकी होता. जेमतेम पन्नास सैनिक

त्याच्या आसपास असावेत. रोहिला सैनिकांनी त्याला पूर्णपणे वेढून टाकले. पळून जाणे त्याला मंजूर नव्हते. त्याने जमिनीवर गुडघे टेकले; (दोन्ही पायाने अधू असल्यामुळे त्याला गुडघे टेकणेच भाग होते) व तो बाण सोडीत राहिला. अखेरी शत्रूकडील एका गोळीला तो बळी पडला. त्याचे शीर धडावेगळे करण्यात येऊन ते झबिताकडे पाठवण्यात आले.

शाही शिपायांचा तो दिवस फुकट गेला. त्यांना मदत नव्हती. शत्रूचे घोडेस्वार विजयोन्मादाने हुंदडत होते. शाही सैनिकांनी गढी दुभार[२] (ही गढी अमीरनगरच्या पश्चिमेस सोळा मैलांवर आहे) या मातीच्या किल्ल्याचा आश्रय घेतला. तेथे शिखांनी त्यांची सर्वबाजूंनी नाकेबंदी केली असताही त्यांनी दोन दिवस झुंज दिली. शेवटी शस्त्रे परत केल्यावर झबिताने त्यांची मुक्तता केली. विजयी रोहिल्यांनी अबुल कासीमचा जडदेह एका मूल्यवान शवपेटिकेत ठेवला व ती पेटी दिल्लीला पाठवून दिली. अबदुल अहदकडे एक खलिता रवाना केला. त्यात त्याच्या भावाच्या मृत्यूबद्दल खेद व्यक्त करून हा मृत्यु हेतुतः केलेली गोष्ट नव्हे तर हातघाईत झालेले अपघाती निधन असा खुलासा केला व झाल्या प्रकाराबद्दल मनःपूर्वक क्षमायाचना केली.

अबुल कासीमची शवपेटिका दिल्लीला पोहोचल्यानंतर आपल्या वडिलांचा प्रतिनिधी म्हणून दिल्लीस असणारा झबिताचा मुलगा गुलाम कादर खान हा दिल्लीहून ६ एप्रिलला निघाला व वडिलांकडे परत आला. भावाच्या निधनाचा दुखवटा संपल्यानंतर अबदुल अहदने आपल्या मिठास वाणीने झबिताखानाचे मन वळवले व त्याला दिल्लीस यावयास लावले. त्यासाठी अहदने त्याला इमानाची आश्वासने दिली व समय पाहून त्याची व बादशहाची भेट घडवून आणली (६ जून) व झबिताच्या बंडखोरपणाबद्दल बादशहाकडून कसुरी माफ करविली. तरी झबिताबद्दलचा अहदचा राग शांत झाला नव्हता. झबिता त्याच्याकडे मेहमान म्हणून असतानाच त्याला अटक करायचा अहदचा बेत होता; पण असे न करण्याबद्दल त्याचे मन वळविण्यात आले; नंतर दोन दिवसांनी झबिताखान स्वतःच्या किल्ल्यावर परतला.

त्यानंतर त्याच्याशी सामोपचाराची बोलणी करण्यासाठी बादशहाचे प्रतिनिधी त्याच्याकडे जाऊ लागले व महसूल रक्कम देण्याबाबत त्याचे मत वळविण्याचा प्रयत्न करू लागले. पण तो सरकारात महसूल भरायचे सातत्याने नाकारीत राहिला. या त्याच्या अरेरावीला त्याचा चुलता सुलतान खान हा भरपूर खतपाणी घाली. या चुलत्याला रोहिल्यांच्या युद्धनैपुण्याचा व सामर्थ्याचा आत्यंतिक अभिमान होता; बादशहाच्या सैन्याला तो मुळी मोजीतच नसे. शेवटी दिल्ली दरबारात झबिताखानाबद्दल जी आपुलकी होती तिची अखेर झाली. दरबारची सहनशीलता संपली व झबितावर शस्त्र उपसण्याचा निर्णय घेण्यात आला. मिर्झा नजफखान दिल्लीस येऊन दरबारात हजर झाला (१२ फेब्रुवारी, १७७७) व त्यानंतर या मोहिमेची तयारी झाली. तरी अंतिम प्रयत्न म्हणून झबिताकडे एक कडक खलिता पाठविण्यात आला. त्यात त्याने दिल्लीस येऊन खंडणीचा हिशेब पुरा करावा अगर परिणामास तयार व्हावे, अशी समज देण्यात आली होती. त्यानुसार झबिताखान लोणी

येथील सरकारी कचेरीत हजर झाला (१३ ते २७ एप्रिल). अयोध्येचा सेनाधिकारी लताफत अली खान हा मध्यस्थी करून त्याला वाचविण्याचा प्रयत्न करीत होता. पण खंडणीची रक्कमही देणार नाही व घेतलेला मुलूखही परत करणार नाही, हा त्याचा हट्ट कायम होता. वाटाघाटी फिसकटल्या तरी कसलेही बंधन न घालता बादशहाने त्याला परत जाण्याची मुभा दिली. दि. २८ रोजी शाही फौजा गौसगडवर चालून जाण्यासाठी मार्ग आक्रमू लागल्या. झबिताखानाच्या ताब्यातील बळकट असे हे एवढेच ठाणे होते. केवळ ' नाम–के–वास्ते ' असलेली झबिताची मीरबक्षी ही उपाधीही काढून घेण्यात आली; ती मिर्झा नजफला बहाल करण्यात आली. त्याशिवाय त्याचवेळी त्याला ' अमीर-उल-उमराव ' हा नवा किताबही देण्यात आला (१७ मे). दि. २३ मे ला गौसगडच्या दक्षिणेस चार मैलांवर रायपूर येथे बादशहाने तळ टाकला.[३]

३. गौसगडची तटबंदी व आसमंत यांचे वर्णन

गौसगडचा किल्ला नजीबउद्दौलाने बांधला. अंतर्वेदीत वरील अंगाला एका भागात बरीच अफघाणवस्ती आहे, या वस्तीतच हा किल्ला आहे. मुझफरनगर जिल्ह्यातील शामली गावाच्या ईशान्येस तेरा मैलांवर व सदर जिल्हा आणि सहरणपूर या दरम्यान सरहद्दीनजीक हा गौसगड किल्ला येतो. तीन गावांच्या परस्पर सानिध्यामुळे जो त्रिकोण होतो त्या त्रिकोणात हा किल्ला येतो. ठाणाभवन (पश्चिमेस), लुहारी (पूर्वेस) व जलालाबाद (उत्तरेकडील टोक) ही ती तीन गावे होत. त्रिकोणाची प्रत्येक बाजू अंदाजे तीन मैल आहे. या प्रदेशातून कृष्णी नावाची एक छोटीशी नदी वाहते. तिच्या पाण्याने हा भाग धुवून गेल्यासारखा झाला आहे. ही नदी या त्रिकोणातून या त्रिकोणाच्या पश्चिमभागाशी समांतर अशी वाहते. तिच्यामुळे गौसगड व लुहारी ही जलालाबाद व ठाणाभवन यापासून वेगळी झाली आहेत. या प्रदेशात उंचसखल भाग फार, त्यामुळे पाऊस जास्त झाला की जागोजागी पाण्याची खोल डबकी तयार होतात. ही भरून वाहू लागतात आणि आसपासच्या प्रत्येक गल्लीला ओढ्याचे स्वरूप येते व प्रत्येक ओढा वेगवान प्रवाह होतो. जलालाबादच्या पश्चिमेस व लुहारीच्या दक्षिणेस खूप मोठे दलदलीचे भाग तयार होतात. आजमितीस या भागाकडे पाहून मन विषण्ण होते. या भागाला उतरती कळा लागली ती नजीबउद्दौलाच्या घराण्याला अठराव्या शतकात उतरती कळा लागली त्याच-वेळी. विरळवस्ती, दारिद्र्य, साथीचे आजार, हिवताप यामुळे हा भाग आज दुर्लक्षित असल्यासारखा आहे. १७७७ साली मात्र या ठिकाणी धनाढ्य अफघाणांची दाट वस्ती होती. जलालाबादमध्ये उरकझाई पंथाचे पठाण राहत, लुहारीत आफ्रिडी होते तर गौसगड व उमरखेळमध्ये रोहिले राहत असत. या शहराबाहेर बऱ्याच लांबपर्यंत अन्न-धान्याची लागवड होत असे. त्याशिवाय जिल्ह्यासभोवताली बरीच खेडीही होती. १७७७ साली नजीबाबाद शत्रूंनी घेतल्यानंतर स्वाभिमानी रोहिल्यांना गौसगड हाच एकमेव आधार होता. या रोहिल्यांचा उदय झाला तो नजीबउद्दौलाच्या कृपेनेच, अफघाण जमाती-

तील नामवंत लढवय्ये व नजीबउद्दौलाचा भाऊ सुलतानखान यांच्या हाताखाली बरीच अफघाण सेना होती. या सेनेतले सर्व शिपाई या ठिकाणी आले होते. जमातीतील श्रेष्ठींच्या बायकामुलांनी याच किल्ल्यात आश्रय घेतला. याच ठिकाणी १७७७ मध्ये शूर रोहिल्यांनी भिंतीला पाठ देऊन गनिमाशी दोन हात केले. त्या वेळी रोहिल्यांनी जो पराक्रम केला, त्याचे पवाडे दिल्ली दरबारातील शाहीर मुक्त कंठाने गात असत. आजही त्या आठवणी सांगितल्या जातात.

या अफघाण प्रदेशाला संरक्षण मिळे ते शत्रूची परिस्थिती चमत्कारिक असल्याने. अफघाणांचा सर्व प्रदेश दऱ्याखोरी व टेकड्यांनी व्यापलेला, शिवाय दलदलीचा; त्यामुळे रात्रीच्या वेळी हल्ले करणे व शत्रू येताच दडून बसणे हे त्यांना सहजी शक्य होई. त्यामुळे अफघाणकिल्ल्याच्या अगदी नजीक जाऊन त्यावर एकदम हल्ला चढविणे हे शाही फौजांना टाळावे लागे. त्यात बादशहाच्या जीविताला धोका पोहोचू नये, हाच उद्देश असे. तसे पाहिले तर शाही सैन्य संख्येने प्रचंड होते, तोफखाना मजबूत होता. पण प्रत्येकाने आपापल्या मर्जीनुसार हुकूम सोडायचे. शिवाय विजयाचे श्रेय नजफखानला मिळू नये म्हणून त्याचा प्रत्येक डाव उधळून टाकायचा हा अबदुल अहदचा मुळी निर्धारच; त्यामुळे शाही फौजा निष्प्रभ झाल्या. वस्तुतः नजफखान हाच मीरबक्षी म्हणजे सर्वोच्च सेनाप्रमुख; पण नायबबक्षी म्हणून अहदने स्वतःकडे सर्व अधिकार घेतले होते. खरोखरी अबदुल अहदची शारीरिक स्थिती काय होती? पिकलेली दाढी, तोळामासा प्रकृती, त्यातच नर्तिका बिबी वझीरन् अल्लाघरी गेल्याने काळीज फाटलेले; तरीही बादशहावर पूर्ण छाप असल्याने हा कश्मिरी कोल्हा नायबबक्षी झाला होता. नजफखानपेक्षाही प्रत्यक्षात तोच सत्ताधारी. या दोघांत उघड उघड शब्दाशब्दी होई, आरोपप्रत्यारोपांची धूळफेक करण्यात येई; माघार घेण्याचा प्रसंग प्रत्यक्षात आला म्हणजे या विरोधाला उग्र स्वरूप येई. रोहिल्यांची प्रतिकार शक्ती वाढे, शाही प्रतिष्ठा डागळे व गुंड, लुटारू शेफारून जात, कसलीही तमा न बाळगता राजरस्त्यावर अगदी उजळमाथ्याने लुटालूट करीत असत. त्यामुळे जी केव्हाच निकाली काढता आली असती अशी बाब अकारण रेंगाळत राहिली. पावसाळा सुरू झाला. नेहमीपेक्षा त्या वर्षी अतोनात पाऊस पडला. तेथील दलदलीच्या खोलगट भागामुळे शाही फौजांना अतोनात हाल सोसावे लागले. अफ्रासियाब हा नजफखानचा आवडता व कर्तबगार सेनानी. तो मध्य अंतर्वेदीत होता. त्याच्या शूर सैनिकांसह नजफखानने त्याला आपल्या मदतीला बोलावून घेतले आणि लढाईची सर्व सूत्रे आपल्या हातात घेतली. मग लढाई संपायला मुळीच वेळ लागला नाही.

४. गौसगडचा वेढा : चिघळत राहिलेली लढाई

बादशहाने प्रथम रायपूर या खेड्यात आपला तळ ठोकला. रायपूर गौसगडच्या दक्षिणेस साडेचार मैलांवर आहे. बादशहाची डावी आघाडी कृष्णी नदीमुळे सुरक्षित होती. उजव्या हाताला खूप मोठी दलदल होती. समोर कृष्णीचाच एक उपप्रवाह वाहत होता.

आपल्या स्वतःच्या सैन्याच्या आधारे नजफखान आघाडी संभाळत होता. ज्या त्रिकोणात केल्ला आहे त्याच्या उजव्या कोपऱ्यात लुहारी आहे. दि. ८ जून रोजी नजफखान आपल्या सैन्यासह पुढे चालून गेला व त्याने लुहारीवर हल्ला केला. त्या खेड्याच्या दक्षि-ास एक बाग होती. नजफने तिचा सहजी ताबा घेतला. त्या ठिकाणी गस्त घालणाऱ्या ोहिला सैनिकांनी थोड्याफार प्रतिकारानंतर माघार घेतली. शत्रू माघार घेताना दिसताच ाजफच्या सैनिकांनी त्यांच्या मागे धावत त्यांचा पाठलाग केला व त्या खेडुतांना त्यांनी ढरांसारखे हाकलून दिले. अफघाणांचा हा नेहमीचा डाव नजफच्या सैनिकांना समजला ाही. पाठलाग करणारी त्याची सेना खूप आत येताच; त्या खेड्याबाहेरच्या उंचसखल ाशा अवघड जागी दबा धरून बसलेल्या अफघाण सैन्याच्या ती अगदी सहजी हाती ाडली. नजफचे दोनशे सैनिक ठार झाले. उर्वरित भीतीने पळून गेले. दरम्यान नजफखान ापला तोफखाना घेऊन आला व त्याने शत्रूचा प्रतिहल्ला शिथिल केला. भयभीत शिपा-ांची सुटका केली व आपल्या खंदकात तो ठामपणे उभा राहिला. झबिताखानाच्या सैन्यात ाघाडीला असलेल्या शीख फौजांना पहिला तडाखा सोसावा लागला तर शाही सैन्यात ा तडाख्याचे वाटेकरी व्हावे लागले वाघरावाच्या हाताखालील दोन हजार मराठा भालाइत-ारांना. दि. ११ ला पुन्हा हल्ला चढविण्यात आला. यावेळी शीख स्वारांनी एकदम मोर्चा ाफिरविला व ते शाही सेनेकडील उजव्या बाजूच्या खंदकात घुसले. लताफतअलीची नजीब ाटण व तोफखाना यामुळे त्यांना परत फिरविण्यात आले. रोहिल्यांकडील एकहजार शिपाई ार झाल्यानंतर दोन्ही पक्षांनी लढाई थांबविली.

नजफखान काहीसा हतबल झाला. अफघाणांच्या मानाने शाही फौजा जवळजवळ ाीपट अगर पाचपट. शिवाय खुद्द बादशहाच्या नजरेखाली नजफसारख्या सेनाधिकाऱ्याचे ातृत्व. असे असतानाही छोट्याशा खेडवळ अफघाण सैन्याने शाही फौजांना परतवून लाव-ात यश मिळविले. अली मुहमद रोहिल्यावर मुहमद शहा बाणगडावर चालून गेला होता ापेक्षाही वरील अवस्था वाईट होणार असा रंग दिसू लागला. पावसाळा तोंडावर होता ापूर्वीच या मोहिमेचा सोक्षमोक्ष करणे शाही फौजांना भाग होते. म्हणून दि. १३ जून ाजी तिसरा हल्ला चढविण्यात आला. या वेळी ठाणाभवन वा त्रिकोणाचा पश्चिम कोपरा ाथील संरक्षणाची तयारी विशेष काळजीपूर्वक केली होती. परंतु प्रत्यक्षात तिचा फारसा ाभाव पडला नाही. "शाही फौजांतील जवळजवळ दोनशे शिपाई मरण पावले, अफघाण ार्थीने लढले; तथापि शेवटी त्याना आपल्या खंदकाकडे माघार घ्यावी लागली व हा सामना ापारी दोन वाजता संपला."

नंतर रोहिला शिपायांनी खंदकाचा आश्रय घेतला. बादशहाच्या सैन्यातील स्वार ारोज बाहेर पडत व रोहिल्यांकडे जाऊन गोळीबार करीत. रोहिले खंदक सोडून उघड्या-ा येत नसल्याने त्यांचा सर्व दारूगोळा फुकट जाई. अशा पद्धतीने नऊ दिवस फुकट गेले ा दोन्ही बाजूंनी युद्धाला प्रत्यक्षात सुरवात झाली ती दि. २३ जून रोजी. उभयतात ामरीतुमरीची जिद्द होती. अंदाजापेक्षा जास्त माणसे ठार झाली. सूर्यास्तानंतर काही काल

धुमश्चक्री चालूनही रोहिल्यांवर ताबा मिळविता आला नाही. विजय न मिळताच नजफखानला माघार घ्यावी लागली. अशा प्रकारे अवघ्या सोळा दिवसांत एक दोन वेळा नव्हे, तर चार वेळा नजफखानचा फजितवाडा झाला. या प्रकरणावर बादशहासमोर उघडउघड जहरी टीका होऊ लागली. 'बिनधोक व सुरक्षित ठिकाणी लांब अंतरावर गच्चीवरून लढाई पहायची, पोटातील पाणी हलू द्यायचे नाही, मदतीसाठी राखीव ठेवलेल्या फौजांना थोपवून धरायचे, त्यांचे साहाय्य घेतले असते तर लढाई अर्धवट न सोडता बादशहाच्या फौजा विजयी होऊन आल्या असत्या; पण तशी इच्छाच नाही तर काय?" असे नजफखान अहदला टोचून बोलून दाखवायचा. त्यावर तो वस्ताद कश्मिरी ठणकवायचा, 'या युद्धात आपण आमच्या शिपायांना धाडता ते केवळ कबरस्तान दाखविण्यासाठी. हे फक्त खाटकालाच शोभते.' या झगड्यात बादशहाने लाडक्या अहदलाच गोंजारले. वैतागून नजफखान आपल्या तंबूत गेला व त्याच अवस्थेत काही काळ बसून राहिला.

५. पावसाळा : शाही छावणीतील हालअपेष्टा

नेहमीपेक्षा अधिक जोराने पाऊस दणकू लागला. कृष्णीच्या पूर्व बाजूकडील तीरावर शाही फौजा तळ टाकून होत्या. पाऊस ओतू लागताच त्या जागेला प्रचंड दलदलीचे स्वरूप आले. अनेक वर्षे ऐषारामात घालविलेल्या मुसलमान अधिकाऱ्यांचे विलक्षण हाल झाले. त्यांचे आपापसातील हेवेदावे, पाण्यात अडकल्याने निर्माण झालेली त्यांची अडचणीची परिस्थिती या दोहोंचाही फायदा शत्रूंनी घेतला. एका रात्री पाऊस कोसळत असताना शीख स्वारांनी ठाणाभवननजीक कृष्णी ओलांडली व बादशहाच्या तंबूशेजारी असलेल्या मुगली छावणीत ते घुसले, व बादशहाच्या संरक्षणासाठी असलेल्या खास लाल पलटणीने गोळ्या झाडल्या तेव्हा ते मागे हटले.

खरे तर तळ टाकण्याचे दृष्टीने ती जागाच अयोग्य होती. म्हणून दि. ४ ते १३ जुलै या दरम्यान बादशहाने आपला तळ हलविला व तो कृष्णीच्या पश्चिमेस तीरावर उंच जागी असलेल्या मैदानात नेला. ही नवी जागा जलालाबादच्या नैर्ऋत्येस त्रिकोणाच्या दक्षिणेऐवजी पश्चिमेस तोंड करून होती. शिवाय पिछाडीस व उजव्याबाजूला असलेल्या दलदलीमुळे अनायासेच सुरक्षितता मिळाली. आपण वरचढ या उन्मादात अफघाण दरदिवशी कोणत्याही क्षणी शाही फौजांवर धावून जात, व त्यांना मुळीच स्वस्थता मिळू देत नसत. या चढायांचा तादृश फायदा नसला तरी शाही सैनिकांना सळो की पळो होऊन जाई. मुगलांचा तोफखाना सुसज्ज असे. अफघाण फौजा अनेकदा तेथपर्यंत जाण्याचे धाडस करीत व त्यात बरेचसे मारले जात. एका रात्री नजफनेही असाच एका अफघाण खेड्यावर अचानक हल्ला चढविला व तिथे भरपूर लूटमार करून कसलीही झळ न पोहोचता तो परत आला.

आता लढाईचा पट असा काही चमत्कारिक झाला होता की धडपणे एकही प्यादे पुढे सरकविता येत नव्हते. शांततेची बोलणी सुरू करावीत या बाबतीत शाहीपक्षानेच

पुढाकार घेतला. समझोता करायला झबिताखानाचीही ना नव्हती. पण झबिताखानाचे चुलते व त्याचे पुराणे दोस्त यांना विजय इतका चढला होता की, एक तसू माघार घ्यायलाही ते तयार नव्हते. शाहीपक्षातर्फे तडजोडीची बोलणी करायला आलेल्या मध्यस्थांना गैर-शब्दांचा वापर करीत लढाईचे आव्हान देतच त्यांनी त्यांची बोळवण केली.

अफघाणांवर हल्ला करायला आलेल्या शाही फौजा स्वतःच अडचणीत सापडल्या होत्या. पावसामुळे त्यांचे अतोनात हाल झाले. अफघाणांच्या भटक्या टोळ्या व राजरस्त्यावरील धंदेवाईक लुटारू यांनी शाहीफौजांचा दाणागोटा मध्येच फस्त करायचा सपाटा लावला. अनेक जुने अधिकारी व पिढीजाद नोकर गाजावाजा न करता दिल्लीच्या मार्गाला लागले. बादशहाचे लष्करी सामर्थ्य कोसळल्याने त्याच्या अधिकाऱ्यांनाही कोणी जुमानीना. सर्वत्र दंगेधोपे सुरू होऊन सर्वसाधारण जनतेत असुरक्षिततेची भावना आली. दिल्लीहून दाणागोटा घेऊन येणारा एक खूप मोठा तांडा शाही तळाकडे चालला होता. तांड्यात खूप बैल असून प्रत्येकाच्या पाठीवर भरपूर पोती होती. झबिताखानाच्या सैन्यातील शीख शिपायांनी हा तांडा बघितला. त्यांनी तांड्याला घेरा घातला. नशीब असे की ही बातमी शाही छावणीत लगेच पोहोचली. बाघरावाच्या हाताखाली असलेल्या मराठा तुकडीला बादशहाने तांड्याची सुटका करायला पाठवून दिले. तांड्याला वेढा घालणारे शीख स्वार हे ठाणाभवन नजीकच्या शीख छावणीतले असल्याने ते तांड्याला वेढा घालायला गेल्यावर त्यांच्या छावणीचे रक्षणासाठी कोणी नसणार, असा अचूक अंदाज करून ती छावणी उद्ध्वस्त करण्यासाठी नजफकुली व लताफतअली यांच्या नेतृत्वाखाली मोठे सैन्य धाडण्यात आले. अगदी योग्य वेळ साधून या दोन्ही ठिकाणी दोन स्वतंत्र तुकड्या पाठविण्यात आल्याने शाही फौजांना जय मिळाला. बाघरावाच्या हाताखालील सैन्याने दाणागोटा आणणाऱ्या तांड्याला सुखरूपपणे शाही तळावर आणले; दुसऱ्या तुकडीने शीख ठाण्यावर मनसोक्त लूटमार करून त्यांचे तंबू-डेरे भस्मसात् केले. त्यांना कसलाही विरोध झाला नाही. शीख छावणीतील सगळी चीजवस्तू लुटली गेल्याने ती नैर्ऋत्येकडील टोकाची जागा सोडून ते आणखी उत्तरेकडे सरकले व जलालाबाद येथे आले. झबिताखानाने तहाची बोलणी सुरू करायचा विचार केला (१२ ऑगस्ट), याही वेळी त्याच्या चुलत्याने त्याचा बेत हाणून पाडला.

पावसाने थोडीफार उसंत दिली. झबिताबरोबर हातमिळवणी करणारांना काहीना काही आमिष दाखवून त्यांच्यापासून फोडण्याचा नजफखानचा उद्योग चालू होताच. शीख हे झबिताखानच्या बाजूचे असले तरी भाडोत्रीच. तरीही पैशाच्या लालचीने झबिताखानशी निमकहराम व्हायला त्यांनी साफ साफ नकार दिला. मात्र दिलावरअली आणि कादरअली हे दोन जमीनदार उरकुझाई पठाणांपैकी असूनही आपले ठिकाण झबिता हिसकावून घेईल या भीतीपायी व नजफच्या द्रव्यप्रयोगाने लालचावले. जलालाबाद हे अगदी उत्तरेकडील टोक. या ठिकाणाच्या खंदकांच्या रक्षणाची जबाबदारी या दोन जमीनदारांकडे होती; पण मिर्झानजफने त्याठिकाणी हल्ला केला तर मिर्झाच्या बाजूने यायला ते तयार होते.

६. रोहिला खंदकावर अखेरचा हल्ला. १४ सप्टें. १७७७ : गौसगडचा पाडाव

पावसाळा संपत आला. ऑगस्टअखेर अलिगढहून अफ्रासियाबखान व आग्र्याहून दाउदबेग खान खुर्जी हे दोघे आले. दोघांच्याही जवळ ताज्या दमाचे सैनिक व सुसज्ज दारूगोळा होता. मिर्झा नजफच्या बाजूला कसलीच उणीव नव्हती. पूर्ण आत्मविश्वास व पक्का निर्धार हे त्याचे विशेष गुण. त्यामुळे १४ सप्टेंबरला त्याने निर्णय घेतला की, लढा द्यायचाच. त्याच्या आघाडीत शिपायांच्या पलटणी असून त्यांचे नेतृत्व अफ्रासियाबखानाकडे होते. दहाहजाराहून कमी नाहीत असे संगीनधारी होते. या तुकड्या चारी बाजूंनी चालत रहात. मध्यभागी मोकळी जागा असून तिथे घोडदळ असे. हे घोडदळ आपला तोफखाना आपल्या बरोबर बाळगीत असे. असे हे मुसलमान सैन्य दोन मैलांहून अधिक लांबीचे होते. त्रिकोणाच्या पश्चिमेकडील बाजूने त्या सैन्याची धीमी चाल सुरू होती. दक्षिण टोकाला ठाणाभवननजीक व त्याच्या समोरील मध्यावर शत्रूला थोपवून धरण्याचे काम शाही सैन्याच्या अन्य तुकड्या करीत होत्या. जलालाबाद येथे अगदी उत्तर टोकाला खंदक खणून शत्रू बसला होता. अफ्रासियाबने घणाघाती हल्ला चढविला तो याच ठिकाणी असलेल्या खंदकांवर. स्वसंरक्षणाच्या दृष्टीने कठिण अशी ही जागा होती म्हणून या ठिकाणच्या सैन्याला साहाय्य करण्यासाठी झबिताखान आपल्या कार्यक्षम शिबंदीसह गौसगडाहून निघाला व नदी पार करून वरील ठिकाणी आला. पण दुर्दैवाने तोच या धुमश्चक्रीत गुरफटला. जलालाबादच्या विश्वासघातकी जमीनदारांनी आपला शब्द पाळला. ते आपण होऊन मुगलांकडे गेले. त्यांनी खंदकातील वाटा व गावही दाखवून दिले आणि आपल्या तोफखान्याचा मोर्चा झबिताखानच्या सैन्यातील उजव्या व डाव्या बाजूकडे वळविला. प्रचंड नुकसान सोसूनही रोहिले जिवाच्या शर्थीने लढले. प्रतिहल्ला चढवून त्यांनी आघाडीतील शाही पायदळाची व घोडदळाची वाताहात केली, त्यांच्या तोफा घेतल्या. अफ्रासियाबचा घोडा ठार झाला. त्याने झटकन खाली उडी मारली व दुसऱ्या घोड्यावर स्वार होत तो आपल्या सैनिकांना धीर द्यायला निघाला. राय नमतसिंग (मिर्झा नजफच्या हाताखालील सेनाधिकारी भक्तावसिंग कयाथ याचा मुलगा) याने तोफांच्या रांगांमधून काही गोळ्या झाडल्या, शेवटी रोहिल्यांच्या गोळीने तोच ठार झाला. मिस्किन (या वेळी सरदाराचा दर्जा व दौला ही पदवी असलेला) जखमी झाला व शुद्ध हरपून खाली कोसळला. शेवटी संख्याबळ व शिस्तीचीच जीत झाली. छोटयाशा रोहिला तुकडीचा प्रतिकार रक्तपात होऊनच थंडावला

आपली पिछाडी कोलमडली आहे हे झबिताखान व त्याच्या बरोबर असलेल्यांच्या ध्यानात आले. गौसगडवर परत फिरणे शक्यच नव्हते. तिथून हाकलण्यात आल्यावर जिथे शीख फौजा दबा धरून होत्या, त्या ठाणाभवन भागात येऊन ते विसावले. या ठिकाणी शत्रूने हल्ल्याची फक्त हूल उठविली. अफघाण सेनेला अनेक ठिकाणी भगदाडे पडली; यशाची सर्व आशा संपली. झबिताखान आपली बायकामुले व बालेकिल्ला खुशाल सोडून देऊन घोड्यावर स्वार झाला व आपल्या शीखसंरक्षकांबरोबर तिथून पळून गेला.

झबिताखानचा मुलगा गुलाम कादर व सुलतान खानचा मुलगा या दोघांना रणांगणावरच पकडण्यात आले. गौसगडच्या संरक्षणाला उभा राहील असा कोणीही मागे राहिला नव्हता. मिर्झा नजफ झपाट्यासरशी नदीपार झाला व त्याने गौसगडला वेढा दिला. दि. २३ ला किल्ला त्याच्या हाती पडला. तेथील शिबंदीला जीविताची व मुक्त संचाराची हमी मिळाली. किल्ल्यातील सर्व चीजवस्त व मालमत्ता मात्र जप्त करण्यात आली. १० हत्ती, ७३ उंट, अंदाजे २५० घोडे, चाळीस गाड्या भरतील एवढे तंबू व तांब्याची भांडी इ. सर्व बादशहाच्या नावावर सरकारात जमा करण्यात आले. उर्वरित मालमत्ता मिर्झा नजफला देण्यात आली. सर्वांत खेदाची गोष्ट म्हणजे झबिताखानाच्या, त्याच्या अन्य सरदार दरकदारांच्या आणि सेनाधिकाऱ्यांच्या कुटुंबीयांना गौसगडावर पकडण्यात आले.

"बढाईखोर अफझलखान प्राणभयाने बायकांत दडून बसला होता. रोहिला जनानखान्याची बारिक तपासणी करण्यासाठी कलमक दासी आणण्यात आल्या. त्यांनी अफझलखानला हुडकून काढले व सर्वांसमक्ष त्याची मानहानी केली." पकडलेल्या बायकामुलांना कैदेत ठेवण्यासाठी आग्रा किल्ल्यावर पाठवून दिले. ताब्यात आलेल्या किल्ल्यावरील गुप्त धनाचा शोध घेण्याचे काम पूर्ण झाल्यावर बादशहा दि. ११ ऑक्टोबरला दिल्लीस जाण्यास निघाला; व दि. २० नोव्हेंबर रोजी दिल्लीत येऊन दाखल झाला.

नजीबउद्दौलाने रोहिल्यांची जी एक तुकडी उभी केली होती तिचा पुरा निकाल लागला. १७७४ च्या शुजाउद्दौलाच्या मोहिमेमुळे अलीमुहमदची एक तुकडी अशीच निकालात निघाली होती.

७. दिल्लीशासनाचे अन्य सत्ताधाऱ्यांशी संबंध : १७७२–१७७८ : आढावा

दिल्ली सभोवतालचा बराचसा खालसा मुलुख अनेक मांडलिकांनी बळकाविला होता. त्यावरील बादशहाची सत्ता मान्य न करता आपणच मालक असल्यासारखे ते वागत होते. या सर्व बंडखोरांचा पाडाव होऊन त्यांच्या पुंडाव्यातून बाहेर पडण्यास बादशहाला सहा वर्षे घालवावी लागली. अंतर्वेदीतील वरचा भाग रोहिले बळकावून बसलेले, १७७२ मध्ये त्यांना थोडीफार जरब बसली व १७७७ मध्ये त्यांचा निकाल लागला. गंगेपलीकडे वस्ती करून रहाणारे त्यांचे जातभाई एप्रिल, १७७४ मध्येच थंडावले होते. दिल्लीचे सिंहासन विरुद्ध आम अफघाण अशी बंडाची भाषा काढण्याचीसुद्धा त्यांच्यात ताकद नव्हती. जाटराजाने बराचसा प्रदेश नुकतानुकता बळकावला होता; त्यातला बहुतेक सगळा त्याच्याकडून परत घेण्यात आला होता व त्याला वर्षाला नऊ लाख उत्पन्न घेणारा एक छोटासा जमीनदार करून टाकण्यात आले (एप्रिल १७७६). १७७५ ते १७८२ या काळात मराठ्यांची अवस्था फार बिकट होती. घरी पेशवाईच्या वारसाच्या वादात आणि बाहेर इंग्रजांविरुद्ध अशी त्यांची शक्ती खर्ची पडत होती. एखादा शिपाईसुद्धा ते हिंदुस्थानात पाठवू शकत नव्हते. १७८२ मध्ये पेशव्यांनी इंग्रजांशी सख्य जोडल्यानंतरही रघुनाथदादा, सदाशिवराव भाऊ यांनी हिंदुस्थानात जे यश मिळविले किंवा रामचंद्र गणेश वा विसाजी कृष्ण यांनी

जे प्रयत्न केले, तशातऱ्हेचे कर्तृत्व करण्याची ताकद पेशवे दरबारात उरली नव्हती. १७८२ नंतर उत्तरेत मराठ्यांचे कर्तृत्व पुन्हा दिसले खरे, पण ते पुण्यातील पेशव्यांचे नव्हते, तर त्यांच्या हाताखालील पण जवळजवळ स्वतंत्र झालेल्या अशा सरदारांपैकी महादजी शिंदे याचे. महादजीने या आधीही तसे प्रयत्न केले असले तरी त्याला दिल्लीतील बादशाही शासनाने वा त्यांच्या सरदारांनी वेगवेगळ्या कलाटण्या दिल्या. पुढे द बॉन्य शिंद्यांकडे आला. त्याने शिंद्यांच्या लष्करातील शिपायांना नव्या युद्धतंत्राचे शिक्षण दिले. इंग्रजांच्या फौजा सोडल्या तर महादजीकडे होत्या त्या तोडीच्या पलटणी अन्य कोणाकडेही नव्हत्या. त्यामुळे कोणाच्याही विरोधाला न डगमगता महादजी दिल्लीची सर्व सूत्रे हाती घेऊ शकला.

सतलज ते गंगा, हिमालय ते चंबळ तसेच अयोध्या ते राजपुताना येथील बंडखोरांचे पारिपत्य होऊन ते बादशहाच्या हुकमतीत वागू लागल्याने बादशहाला बाहेरचा धोका उरला नव्हता. १७७७ ते १७८२ ही सहा वर्षे त्याला शांततेची गेली. याचा उपयोग त्याने चांगल्या प्रकारे करावा ही अपेक्षा चूक नव्हती. पण तसे व्हायचे नव्हते. बादशहा स्वतः मनाने दुर्बल होता; तसेच विश्वासार्ह अशी यंत्रणा त्याच्यापाशी नव्हती. त्यातच आणखी एक निराळी परिस्थिती निर्माण झाली होती. १७६३ नंतर सिंधूपासून गंगेपर्यंत पसरलेल्या दिल्लीच्या उत्तर व पश्चिम भागात, सगळ्या उत्तर हिंदमध्ये एक प्रचंड बेबंदशाही माजली होती. त्यावर नियंत्रण ठेवील अशी एखादी नवी शक्ती हवी होती. ही अनागोंदी संपली, ती ब्रिटिशांनी एकोणिसाव्या शतकाच्या प्रारंभी जो विजय मिळवला त्याचवेळी.

८. शीखजमात : त्यांच्या लष्करी संघटना व कार्यक्षमता

शीख कसे होते ? या पंथात आलेल्यांत जाट शेतकरी मोठ्या संख्येने होते. त्याशिवाय इतर जातीजमातींतीलही अनेकजण शीखपंथात आलेले होते. भिन्न जमातींतील मूर्तिपूजकांबाबत सूरजमल जाटाने एक विशिष्ट धोरण ठेवले होते, त्याच्या सर्वसाधारण अनुयायांना ते जमले नाही पण तेच धोरण शीखपंथीयांनी पूर्णत्वास नेले. पंथातील परिपूर्ण बंधुत्व व समाजातील जातिभेदातीत संघटनेचे लोकशाही स्वरूप यामुळे आपला पंथ भरभराटीला आला असे शीख समजतात. भरतपूरचे जाट हे जातिभेद मानणारे हिंदू. कुटुंबात जो कर्ता असेल त्याच्या आज्ञेत सर्वांनी रहावयाचे. रणजितसिंगाने शीख सैन्याला इंग्रजांच्या युद्धतंत्राचे शिक्षण दिले, त्यांची शिस्त शिकविली. तत्पूर्वी प्रभावी घोडदळ व शत्रूवर हल्ला करण्याचे विशिष्ट डावपेच हेच शीखसेनेचे वैशिष्ट्य होते. जाटसेना म्हणजे बव्हंशी पायदळच असे. तटबंदीच्या किल्ल्यांचे संरक्षण करण्यात त्यांचा हातखंडा असे.[४]

हिंदुस्थानातील जातिवंत घोड्यांच्या पैदासीचे ठिकाण म्हणून पंजाब हा फार मोठा व नावाजलेला भाग. पंजाबी घोडे सर्व हिंदुस्थानात ख्यातनाम. सिथीयन पूर्वजांचा वारसा घेऊन आलेले शीख स्वार छोट्या छोट्या चकमकी उडविण्यात व गनिमी कावा खेळण्यात तुर्कांइतकेच निष्णात होते. लढवय्या शिखांचे रणकौशल्य पहाणाऱ्या एका स्विस अधिकाऱ्याने मे, १७७६ मध्ये 'नजफखानाचे ५,०० स्वार ५० शीख स्वारांसमोर लढू शकत नसत'

असे नमूद करून ठेवले आहे. अशा तडफेने लढायची जी लोकविलक्षण जिद्द शीख जमातीत होती, त्याला कारण त्यांचे स्वभावविशेष, त्यांना मिळालेले शिक्षण व त्यांच्या संघटना. भारतात अन्य लढवय्या जमाती होत्या त्यांच्यात ही जिद्द नव्हती. शीखांबाबत उपरोक्त युरोपीय निरीक्षक लिहितो, "शीख हे सर्वसाधारणत: दणकट व बांधेसूद. हाल अपेष्टा सोशीत कष्ट करणे व वणवण भटकणे हे तर त्यांच्या पाचवीला पुजलेले. मजल दरमजल करीत वाट तुडविणे व कष्ट करणे यांत त्यांचा हात धरणारा कुणी नाही. आपल्या भ्रमंतीत ते तंबू वा अन्य साहित्य बरोबर घेत नाहीत. एखादा छोटासा तंबू असतो तो त्यांच्या प्रमुखाकरिता. बाकी सर्वांना निवारा म्हणजे त्यांची कांबळी. कडक थंडीत ती अंगाभोवती पूर्णपणे लपेटली की झाले. वाटचाल करताना याच कांबळ्याचा उपयोग त्यांना खोगीर म्हणून होई."

"बहुतेकांजवळ दोन, काहींच्या जवळ तीन घोडे असत. घोडा सर्वसाधारण मध्यम आकाराचा, दणकट, चपळ व सौम्य प्रकृतीचा असे. लाहोर आणि मुलतान ही जातिवंत घोड्याच्या पैदासीसाठी हिंदुस्थानातील नावाजलेली ठिकाणे. या ठिकाणांहून त्यांना पुरेसे घोडे मिळत. आपल्या कुटुंबीयातील कोणी दगावला तर त्याच्या दिवसवाराला ते गोडधोड खात पण घोडा मेला तर त्यांना विलक्षण दु:ख होई.

"शिखांचे अन्नही असेच जाडे भरडे, हिंदुस्थानातील कंगाल जीव गरजेपोटी खातात असे. फुफाट्यात भाजलेली भाकरी व मिळतील त्या डाळी मिसळून केलेले वरण म्हणजे मोठीच मेजवानी; ती सुद्धा पुरेसा वेळ व स्वस्थता असेल तर... एरवी अर्धीकच्ची भाजलेली डाळ, चणे, हुरडा अशावरच भागवायचे, त्यांचा पोषाखसुद्धा अगदी गरजेपुरता व सुटसुटीत; दोन निळे कुडते, जाड कांबळी व साधासीधा फेटा.

"त्यांचे यश व त्यांनी मिळविलेले विजय यांचे मूळ त्यांचे अविश्रांत परिश्रम व अन्यायाची चीड यांत आहे. या बाबतीत भारतातील अन्य कोणतीही जमात त्यांची बरोबरी करू शकणार नाही. शीख माणसाचा साधा आहार, भोगलालसेतून अलिप्त राहण्याची प्रवृत्ती यांमुळे त्यांच्याजवळ असणारी तडफ, तऱ्हेतऱ्हेच्या विलासी जीवनात रमणाऱ्या मुसलमानाजवळ असणार नाही. त्यांच्या घोडदळातील स्वार दिवसाकाठी ४० ते ५० मैलांची रपेट सहजी मारत; व असे दिवसचे दिवस अविरत चालू असे.

"त्यांचे सैन्य म्हणजे बव्हंशी घोडदळ, त्यांचे पायदळ छोटे, त्याचा उपयोग किल्ल्यात शिबंदी म्हणून. शीख स्वाराजवळ रुंद तोंडाची बंदूक, उत्कृष्ट धातूपासून बनविलेले तेग [एक भाला] असते. त्याचा घोडा दणकट व उमदा असतो.

"त्यांची हल्ला करण्याची पद्धती अशी : तीस ते चाळीस स्वारांची एक तुकडी शत्रूवर चालून जाते; व शत्रूकडील स्वाराने झाडलेली गोळी जितक्या अंतरावर पडेल, तेथपर्यंतचे अंतर झपाट्याने तोडते. मग नेमधरून शत्रूवर गोळी झाडता येईल अशी खात्री झाली म्हणजे घोड्यांना मागे वळवून ते झटकन गोळ्या झाडतात. मागे परतताना अंदाजे शंभर पावले झाली म्हणजे शत्रूला हैराण करण्याची तीच पद्धत वापरतात. त्यांचे घोडे याबाबत

इतके तयार असत की, पाठीवरील स्वाराची थाप पडली म्हणजे भर वेगात असले तरी कानात सांगितल्याप्रमाणे जागच्याजागी उभे रहात."

९. शिखांची राज्यव्यवस्था व समाजरचना

मेजर पोलिअर म्हणतो, 'शीख राज्यपद्धती म्हणजे अमीरउमरावांचे प्रजासत्ताक. ही राज्यपद्धती म्हणजे अनेक फणा असलेला शेष. ज्याने दाढी राखलेली आहे, जो 'वा ह गुरू' असे वरचेवर उद्‌गार काढतो, डुकराचे मांस खातो, मनगटात लोखंडी कडे घालतो, शांभवी घेतो, धूम्रपान वर्ज्य मानतो असा अटक ते हंसीहिस्सार व दिल्लीवेशीपर्यंतचा कोणताही घरंदाज शीख शेतकरी जमीनदार, स्वतःला सरदार म्हणवितो. दहापासून कितीही जास्त घोडेस्वार त्याच्याजवळ असू शकतात– असा जमीनदार आपल्या आसपासच्या गरीब जनतेच्या जिवावर शिरजोर होतो. आसपासच्या या गरीबांत, हिंदू, मुसलमान वा सरदारजींचे खुद्द भाऊबंदही असू शकतात.

"शीख शासनाच्या व्यवहारी बाजू विविध असल्या तरी त्याच्या पाठीशी सर्वमान्य अशी एक शक्ती असते. राज्यातील कोणाही व्यक्तीला सन्माननीय वा नामधारी उपाधी दिली जात नाही. पन्नासपेक्षा कमी स्वार हाताखाली बाळगणाऱ्या सरदारजींची संख्या खूप मोठी असल्याने शीख सेनेचा तळ हलविताना बराच अव्यवस्थितपणा व गोंधळ होई. त्यांच्या नागरी जीवनात सर्वांना एकच समान दर्जा असे व कोणी कितीही सामर्थ्यवान वा धनवान असला तरी या एकतेत फेरफार करण्याचे सामर्थ्य त्याच्याजवळ नसे."

पण ही समानता एका रानटी अवस्थेतील समानता होती. "स्वातंत्र्याचे बाळकडू त्यांच्या रक्तातच भिनलेले; तरी आपापसातील हेवेदावे, चटकन एकेरीवर येण्याची वृत्ती, यामुळे प्रचलित राष्ट्रीय एकात्मतेत शिखांचा भाग क्वचित असतो." त्यांची वीरवृत्ती उचल खाते, ती वैयक्तिक महत्त्वाकांक्षेपोटी.

गुरु गोविंदाने आपल्या लष्करी शिस्तीत ठाकून ठोकून तयार केलेले असे हे शीख. मुसलमान सत्ता झपाट्याने कोसळत होती तरीही या सत्तेने शिखांवर अनन्वित अत्याचार केले, जुलूम केले, त्यांची मानहानी केली. त्यामुळे मुसलमानी सत्तेवर ते भडकून होते.

दिल्लीचा बादशहा दुसरा आलमगीर याचा त्याच्या वझिराने १७६० साली खून केला. दिल्लीच्या राजसत्तेला ग्रहण लागले, दुराण्यांनी केलेली स्वारी अपेक्षेपेक्षा अधिक काळ चालली. उत्तर हिंदमधील सत्ताधाऱ्यांनी १७६१ च्या जानेवारी महिन्यात पानिपत येथे दक्षिणेतील मराठी सत्तेला जबरदस्त तडाखा दिला, त्यावेळी शिखांनी बरोबर संधी साधली. मूळ पंजाब हा दुराणी सुभेदार व शीख सरदार यांच्यातल्या अनेक पिढ्यांना पुरून उरणारा वादविषय झाला असला तरी पानिपत संग्रामानंतर सतलजच्या अलीकडील सर्व मुलुख छोट्यामोठ्या शीख सरदारांनी आपल्या ताब्यात ठेवला होता. सतलजच्या पश्चिमेपासून यमुनेच्या पूर्वेपर्यंत, हिमालयाच्या पायथ्यापासून सांप्रतच्या कर्नाळ जिल्ह्याच्या दक्षिण हद्दीपर्यंतच्या (२९° उत्तर रेखांश) मुलुखातील बादशहाने नेमलेले सर्व अधिकारी

जवळजवळ नामशेष झाले होते. या प्रदेशापलीकडे अंतर्वेदीतील वरील भाग, रोहटक जिल्ह्याचा उत्तर दिल्लीकडील भाग तसेच शेखवती सरहद्दीवर हरयाना ते नरनौल या ठिकाणीही आपापल्या ताकदीनुसार शीखसत्तेने आपले हातपाय पसरलेले होते.

अहमदशहा दुराणी हा विजेता म्हणून गाजलेला. त्यालाही १७६३ च्या अखेरीस, 'शिखांनी आपला पराभव केला' हे मान्य करावे लागले (पहा प्रकरण २४ पोटप्रकरण ४–५). शिखांनी सरहिंद (डिसेंबर १७६३) व लाहोर (एप्रिल १७६४) जिंकून घेतले तेव्हा त्यांचा राष्ट्रीय अभ्युदय अत्युच्चपदी पोहोचला होता. सतलजअलीकडील मुसलमानांच्या मुलुखांत भौगोलिकदृष्ट्या सरहिंद हे राजधानीसारखे. या सरहिंदचा पाडाव हे फार महत्त्वाचे काम, यामुळे संबंधित भूभागातील राजकीय चित्रात एकदम परिपूर्ण बदल घडून आला. मुसलमानी अंमल नाहीसा होऊन शीखसत्ता सुरू झाली. अर्थात तेथील छोट्या छोट्या जहागिऱ्या निकालात काढून आपली सत्ता स्थिर करण्यास 'खालसा' ला थोडासा वेळ लागला. सरहिंदचा शेवटचा सुभेदार झैनखान हा लढाईत पडला. त्याच्या किल्ल्याची लूटमार झाली. विजयी शिखांनी एकजूट करून आसपासचा मुलुख जिंकून घेतला. कनिंगहॅमने १८४९ मध्ये लिहिले आहे त्यानुसार परंपरेने आजही सांगण्यात येते, "युद्धात जय मिळताच शीख सर्वत्र पांगले. प्रत्येक शीखस्वाराने आपला मुलुख हदरवून सोडला. प्रत्येक ठिकाण आपले आहे हे प्रस्थापित करण्यासाठी ठिकठिकाणी ते आपले म्यान, पट्टा व अंगावरला एकेक कपडा टाकीत गेले व पुढे प्रत्येक खेड्यातून जवळजवळ विवस्त्रावस्थेत नाचले".

१०. सतलजअलीकडील प्रदेशावरील शिखांचा विस्तार : त्यांच्यातील प्रमुख व्यक्ती व त्यांची अधिकारस्थाने

सरहिंदचा पाडाव झाला व सतलजच्या अलीकडील जुन्या पंजाबात दहा वर्षांच्या आत एक नवी राज्ययंत्रणा आली. अमरसिंग जाट (हा फुलकिया शीख) याला अबदालीने १७६७ मध्ये 'राज राजेश्वर' अशी किताबत दिली. पतियाळाचा राजा व सरहिंदचा फौजदार म्हणून त्याचे अधिकार मान्य केले. त्यानंतर चौदा वर्षांनी अमरसिंग मरण पावला. तत्पूर्वी त्याने आपल्या राज्याचा विस्तार खूपच वाढविला होता. सिरसा व फत्तेबाद (हिस्सार जिल्ह्याची पश्चिम बाजू) जिंकून घेतले व तो आपल्या टापूतला सर्वांत सामर्थ्यसंपन्न शीख राजा झाला. गजपतसिंग हाही फुलकिया शीखच. पण अमरसिंगापेक्षा थोड्या कमी दर्जाचा. याने १७६४ मध्ये झिंद या राज्याची स्थापना केली (राजधानी, पानिपतच्या पश्चिमेस ४२ मैलांवर). कर्नाळवर काही दिवस याचा ताबा होता. १७८६ त गजपतसिंग मरण पावल्यावर त्याचा मुलगा राजा भागसिंग हा सत्तेवर आला. त्याने १८१९ पर्यंत राज्य केले. झिंदच्या उत्तरेस पंचवीस मैल व पतियाळाच्या दक्षिणेस तेवढयाच अंतरावर कैथाळ हे ठिकाण आहे. या ठिकाणी भाई देसूसिंग या आणखी एका फुलकियाने १७६७ मध्ये आणखी एक शीख संस्थान स्थापन केले. देसूसिंग १७८० त मरण पावला. त्यानंतर त्याचा मुलगा लालसिंग हा गादीवर आला. त्याने १८१८ पर्यंत म्हणजे मरेपर्यंत सत्ता उपभोगिली.

कैथाळच्या ईशान्येस २८ मैल सहरणपूरच्या अक्षांशावरच ठाणेश्वर शहर आहे. मीठासिंगने हे ठिकाण १७६४ मध्ये हस्तगत केले. मीठासिंग हा दलेवालपैकी मंझा जाट. १७७७ मध्ये मीठासिंग वारला. त्यानंतर त्याचे राज्य, त्याचे दोन पुतणे भंगासिंग व भागसिंग यांच्यात वाटून देण्यात आले.

'ठाणेश्वरचा क्रूर, निर्दय, रानटी राजा' व 'छोट्या संस्थानिकांतील सर्वांत मोठा दरोडेखोर' असे भंगासिंगाचे वर्णन करीत असत (मृत्यू १८१५). भागसिंग (झिंदच्या भागसिंगहून हा वेगळा) हाही त्यातलाच. या दोघांनी जुलूमजबरदस्ती करून आपल्या खाजगी संपत्तीत भर टाकली. लडवा हे ठाणेश्वरच्या पूर्वेस बारा मैलांवर आहे. व लडवाच्या वायव्येस सात मैलांवर बबीन आहे. लडवाचा प्रमुख गुरुदत्तसिंग व बबीनचा प्रमुख साहेबासिंग दोघेही दलेवाले पंथातले. त्यांनी शामगड, कर्नाळ व पानिपत जिल्ह्यातील काही खेडी जिंकून घेतली. साहेबसिंग हा खोंडा या नावाने परिचित होता. १७८१ मध्ये सहरणपूरनजिकच्या लढाईत तो मारला गेला. त्यावेळचा तो एक नामवंत लढवय्या होता.

१८ व्या शतकातील शेवटची ३५ वर्षे क्रूरासिंघी पंथाचे पुढारीपण भगेलसिंगाकडे होते. त्या पंथाचा तो एक अतिशय हुशार व कार्यक्षम पुढारी होता. चलउंढी हे त्याच्या राज्याचे मुख्य ठाणे. हे लडवाच्या पूर्वेस तीन मैलांवर आहे. भगेलसिंगच्या पराक्रमात व कर्तृत्वात त्याला नेहमी, त्याचा स्नेही रायसिंग भानगी याची साथसंगत असे. बुढिया व जगाध्री या ठिकाणचे आधिपत्य त्याच्याकडे होते (दोन्ही ठिकाणे लडवाच्या ईशान्येस अनुक्रमे २१ व २३ मैलांवर असून यमुनेच्या पश्चिमतीरापासून जवळ आहेत). सतलजच्या अलीकडील भागात रायसिंग भानगी हा एक नाव घेण्यासारखा शीख सरदार. क्रुरासिंघी पंथाचा नामधारी प्रमुख छछ्रौली (लडवाच्या ईशान्येस २६ मैलांवर) येथे होता. खरी सत्ता होती गुरुबक्षसिंगची. त्याच्यानंतर त्याचा मुलगा जोधसिंग अधिकारावर आला. गुरुबक्षसिंग हा कलसी राज्याचा संस्थापक. फुलकिया शिखांचे चौथे राज्य म्हणजे नाभा (राजधानी, पतियाळाच्या पश्चिमेस १५ मैलांवर). हमीरसिंगने १७५४ मध्ये हे राज्य स्थापन केले. हमीरसिंगानंतर १७७२ च्या सुमारास त्याचा मुलगा जसवंतसिंग गादीवर आला.

या कालखंडात अंबाला जिल्ह्यात शिखांची जी प्रमुख ठाणी होती त्यांच्याशी दिल्लीतील इतिहास लिहिण्याचे काम करणाराचा म्हणावा तसा संबंध आलेला नव्हता. अंबाला जिल्ह्यातील त्यावेळची शिखांकडील प्रमुख ठाणी म्हणजे अंबाला गाव; हे गाव शहीद पंथाचा गुरुबक्षसिंग याने अस्तित्वात आणले (तो १७८३ त निपुत्रिक मरण पावला). मलेरकोटला उत्तरेस ८ मैलांवर असलेले मलोध हे गांव अलासिंगच्या पुतण्याने १७५० च्या आसपास वसविले. या पुतण्यानंतर त्याचे दोन मुलगे दलेल व भागसिंग हे गादीवर आले. लडवाच्या ईशान्येस सात मैलांवर असलेले रादौर, हे दलजासिंग क्रुरासिंघि याच्या ताब्यात होते. ठाणेश्वरच्या उत्तरेस तेरा मैलांवर शहाबाद असून त्याची स्थापना करमसिंग निर्मलने केलेली आहे. त्याशिवाय मणिमजरा, रुपार व रहून ही ठाणी होतीच. (शेवटची दोन सतलजचे काठावर आहेत.[६]) कपुरथला राज्य हे सतलजपलीकडे अंतर्वेदीत

क जसासिंग अहलुवालिया, हा एकेकाळी मद्याचा व्यवसाय करणारा; त्याच्या जमान्यात क सर्वश्रेष्ठ शीख धुरंदर म्हणून त्याची ख्याती होती.

३. शिखांमधील बेबनाव : शक्तीचा ऱ्हास : त्यांच्या सत्तेचे परिणाम

वरीलसारखे राज्याचे संस्थापक सोडले तरी स्वतःच्या सरदारकीचा बडेजाव जविणारे अन्य जमीनदारही असंख्य होते. यांच्यापैकी एकाच्याही हाताखाली २० किंवा ० हून अधिक स्वार नव्हते. पण ते स्वतःला सरदार म्हणवीत. ते एकत्र येत ते फक्त मारप्रसंगी. त्यांच्या पंथातही वारसा पद्धतीने अधिकार मिळत नसे. पंथाचा बडेजाव क फायदा उठवण्यासाठीच असायचा. हे शीख सरदार जेव्हा युद्धात किंवा लूटमारीत लेले नसत तेव्हा परस्परांवर कुरघोडी करण्यात त्यांची शक्ती व पैसा खर्च होई. ७९३ मधील कॅप्टन फ्रँकलिनचा अभिप्राय असा, "शिखांत आपापसात जूट नसल्याने च्या शेजाऱ्यांना त्यांची भीती वाटत नसे. प्रत्येक शीख सत्ताधाऱ्याकडे असलेला मुलुख श्चित स्वरूपाचा असल्याने आपापल्या मुलुखांत त्यांची अनिर्बंध सत्ता असे. सत्तेला कटून राहणे व सग्यासोयऱ्यांचा द्वेष करणे यामुळे सर्व शीख एकत्र येऊन कधी एकजूट तील हे असंभवनीय. प्रत्येक शीख सत्ताधाऱ्याचा दुसऱ्याशी वाद व वैर – त्यामुळे कजूट होणे अशक्यच." पण अशी ही जमात एकत्र आणण्याचे महनीय कार्य रणजित-गाच्या हातून घडून येईल हे भाकीत, वॉरन् हेस्टिंग्जने १७८४ त केले होते.

(फॉरेस्ट खंड ३; ११२४)

शिखांत अंतर्गत झगडे असले तरी त्यांच्या शासन व्यवस्थेचे फायदे जनतेला मिळत तत असे नाही. त्याबाबत पॉलिअर लिहितो "त्यांच्या अंतर्गत व्यवस्थेचे एक वैशिष्ट्य से की शेतकरी व मजूर दोघेही पूर्णपणे सुरक्षित असत. त्यांची मानखंडना केली जात नसे. सभोवतालची परिस्थिती कशीही असो. शिखांशिवाय अन्य राज्यांमधून अशी परिस्थिती हती." त्या काळात अनिश्चित व अस्थिर अशी परिस्थिती एकदम उद्भवे. अशा वेळी अशा कटातून आश्रयासाठी आलेल्या पेढीदार सावकारांना व व्यापाऱ्यांनाही ते पूर्ण संरक्षण देत.

आपला प्रांत वा जहागिऱ्या प्रत्येकाच्या मालकीच्या असतच. त्याशिवाय मराठे जसे थाईसाठी मुलुखगिरी करीत, तसे शीखही आपल्या राज्याबाहेर जाऊन लूटमार करीत. पीकपाणी होऊन सुगीच्या दिवसांत कापणीनंतर धान्याच्या उडव्या रचल्या म्हणजे हद्दीवर राहणारे शीख सरदार अंतर्वेदीतील वरील भागांतील शाही मुलुखावर धाड घालीत अत्यंत पद्धतशीरपणे प्रत्येक खेड्यावर आपला वसुलीचा आकडा बसवीत. त्यांच्या या लीला राखी म्हणत (राखी म्हणजे संरक्षणाचा मोबदला). प्रत्येक सरदाराकडे एक शिष्ट असा सर्वांनाच माहीत असलेला भाग असे. 'राखी' म्हणून घेण्यात यावयाच्या रकमेत निक जनतेच्या ताकदीनुसार कमीजास्त होई. साधारणतः दर डोई २ ते ५ रु. पडत. रक्कम गोळा करण्यास दोन किंवा तीन स्वार पुरेसे होत. प्रसंग आलाच तर २ ते ३ जार जमवणे हेही कठिण नसे. राखीला विरोध किंवा नकार म्हणजे मृत्यूला आवाहन.

१२. झबिताखान शीख होतो व अंतर्वेदीत हल्ला करतो (१७७८), अफ्रासियाब व नजफकूली त्याचा पराभव करतात : त्याची संपूर्ण शरणागती

गौसगडच्या मोहिमेत अफ्रासियाबखानाच्या सैन्यातील तुकडया झबिताखानावर चालून आल्या. त्या हातघाईत त्याचा किल्ल्याशी संपर्क सुटला. तेथून माघार घेत घेत तो शीख छावणीत आला. त्या वेळी अंगावरील कपड्यांशिवाय त्याच्याजवळ काहीही नव्हते. त्याची सर्व मालमत्ता, पैसा-अडका, बायका-मुले गौसगडावर होती. त्यांचा ताबा बादशहाच्या अधिकाऱ्यांनी एका आठवड्यात स्वतःकडे घेतला. रोहिल्यांचा हा आसरा नसलेला प्रमुख व त्याचे पराभूत शीख सहकारी अंतर्वेदीतून पळाले ते यमुनेच्या पश्चिमेस कर्नाळ जिल्ह्यातील शीख मुलुखात येऊन विसावले. या ठिकाणी झबिताखान आपल्या जुन्या मित्रांचा पाहुणचार झोडीत बराच काळ राहिला. वास्तविक त्या परिस्थितीत त्याला नव्हते द्रव्याचे पाठबळ, नव्हता स्वतःचा मुलुख वा सहकारी. झबिताखानचे वडील शिखांकडे खंडणीची रक्कम न चुकता देत असत. त्याची आठवण शिखांचा दिवाण मनसुखराय याने त्यांना करून दिली. धनहीन, मित्रहीन अशा झबिताखानाला शिखांनी उदार हाताने साहाय्य केले, त्याच्या कामात त्याला मनापासून मदत केली. शिखांचे व आपले स्नेहसंबंध वज्रलेप व्हावेत म्हणून आपण शीख पंथात सामील होणार असल्याची त्याने जाहीर घोषणा केली व त्यानुसार शीख पंथात प्रवेश केल्यावर धरमासिंग हे नाव घेतले. ज्याने उत्तरहिंदमध्ये इस्लामचा झेंडा दिमाखाने तेरा वर्षे फडफडत ठेवला त्याच्या वारसदारांची ही दशा ![८]

१७७७–१७७८ चा हिवाळा आला आणि गेला. या मुदतीत अंतर्वेदीतील आपला गमावलेला मुलुख पुन्हा घेण्याबाबत झबिताखानाने कसलीही हालचाल केली नाही. गौसगड हाती आल्यावर त्या ठिकाणी प्रमुख किल्लेदार म्हणून नजफ कूलीखानाची नेमणूक झाली; रोहिल्यांच्या या दणकट किल्ल्यावर देखरेख ठेवण्याच्या कामाप्रमाणेच सहरणपूर जिल्ह्यातील शासकीय कामकाजाची सूत्रेही त्याच्याकडेच देण्यात आली. अंतर्वेदीतील दक्षिणेस अलिगढ येथे सुभेदार म्हणून अफ्रासियाबखानाची नेमणूक झाली. अलिगढच्या आसपासच्या मुलुखावरही त्याचाच अधिकार राहणार होता. नजफ कूली व अफ्रासियाब या दोघांनीही आपापल्या अखत्यारीतील मुलुखांत जे बंडखोर जमीनदार होते त्यांना काबूत ठेवून आपली सत्ता बळकट करण्याचा काही दिवस प्रयत्न केला.

फेब्रुवारी, १७७८ मध्ये मिर्झा नजफखानला आणखी एका झगड्यात अडकून पडावे लागले. त्याचे कारण अलवारचा रावराजा. या रावराजाचे भरतपूर व जयपूरच्या राजांशी संगनमत होते. या तंट्यात पडल्यावर नजफखानची परिस्थिती आणखीच वाईट झाली. त्याला त्रास झाला तो त्याचा हितशत्रू अबदुल अहद याचा. अहद हा, लहरी बादशहाचे मन सोयी-नुसार वळवू शकत असे. त्याशिवाय मिर्झा नजफच्या माणसांना फूस लावणे, त्यांच्यांत बेदिली निर्माण करणे हे चालूच असे. अशाप्रकारे रजपुतांच्या प्रतिकाराची बाजू अधिकाधिक घट्ट होत होती. मुराद बेग खान व अन्य काही सेनाधिकारी यांच्या हाताखाली मुगलिया

खारांची एक मोठी तुकडी दिल्लीकडे जाण्यासाठी म्हणून मिर्झा नजफच्या छावणीतून निघाली व २९ मार्चला दिल्लीत येऊन दाखल झाली. मीरबक्षी नजफच्या अडचणी म्हणजे झबिताखानला पर्वणीचा योग. नेहमीप्रमाणे अंतर्वेदीत मुसंडी न मारता आल्याने शिखांना चुकल्याचुकल्यासारखे होत होते. त्यांची तयारी होतीच. आपल्या शीख मित्रांसमवेत झबिताखान अंतर्वेदीत घुसला. तेथेही दिल्लीच्या कारभाराबाबत नाखूष असलेले काहीजण होतेच. झबिताखानाचे व्यक्तिमत्त्व व आगमन त्यांना प्रेषितासारखे वाटले. शिवाय तो प्रदेश झबिताच्या परिचयातला व त्याचा तेथील जनमानसावरही दांडगा प्रभाव. त्याचा फायदा शिखांना मिळाला.

शिखांनी अंतर्वेदीत वरील अंगास धडक मारली. त्यात त्यांना जवळजवळ विरोध झालाच नाही. त्याच्या अगोदर गेलेल्या तुकड्यांनी तर सिकंदराबाद व दक्षिणेकडे त्याच्याही पुढे मजल मारली. खुर्जा येथे मात्र अफ्रासियाबखानाशी गाठ पडताच त्यांना माघार घ्यावी लागली. अफ्रासियाबच्या प्रचंड तोफखान्यापुढे त्यांचे काही चालेना. त्यानंतर त्यांनी गौसगडला वेढा घातला. नजफ कूली किल्ल्यात होता. इच्छा असूनही अफ्रासियाबला त्याच्या मदतीला तातडीने जाता आले नाही. नजफखानविरुद्ध अबदुल अहद ज्या दुष्ट कारवाया करीत होता त्या संबंधात बादशहाला भेटून त्याला काही सांगायचे होते (८-२० एप्रिल). शेवटी नजफकूलीला मदत करायला म्हणून तो गेला तेव्हा शत्रू पळून गेले होते. त्यानंतर या दोन शाही सेनाधिकाऱ्यांनी आपल्या सेनेसह यमुना ओलांडिली व माघार घेणाऱ्या शिखांचा कर्नाळ व बुधखेडापर्यंत पाठलाग केला. शेवटी कर्नाळचा राजा गजपतसिंग हा झबिताखानच्या मदतीला आला. त्यानेच समझोत्याची बोलणी सुरू केली. स्वतः गजपतसिंग व मालोधचा दलेलसिंग हे बादशहाशी मिटते घ्यायला तयार होते. ठाणेश्वरचा अधिपती भागसिंग हा मात्र ताठ होता. त्यामुळे शाही फौजा बुधखेडच्या उत्तरेस चार मैल चालून गेल्या व भक्कम संरक्षणव्यवस्था असतानाही त्यांनी बडागाव[१] हे खेडे जिंकले. शिखांची बरीच मालमत्ता या ठिकाणी होती. त्यामुळे हे सर्व सरदारजी बोलणी करण्यासाठी तोंड उघडायला तयार झाले. बादशहाच्या शत्रूंना आपल्या मुलुखांत आसरा न देण्याचे व मिर्झा नजफखानच्या जहागिरीतील मुलुखांवर हल्ला न करण्याचे त्यांनी मान्य केले. त्यानंतर झबिताखान मुसलमान सेनाधिकाऱ्यांना मिळाला व त्यांच्यासमवेत नदीपार होऊन अंतर्वेदीत झनझना येथे आला. या ठिकाणी त्याला मिर्झाचे एक पत्र मिळाले. झबिताखानाशी करण्यात आलेल्या समझोत्याला त्याची मान्यता होती. झबिताखान जितक्या लवकर बादशहासमोर उभे राहून आपल्या कसुरीची माफी करवून घेईल तितक्या लवकर त्याची वरच्या जागेवर नेमणूक करून त्याच्या जहागिरी त्याला परत करण्यात येतील व त्याच्या बायका-मुलांचीही सुटका होईल असे आश्वासन त्याला देण्यात आले. आग्रा येथे स्वतः जावे व मिर्झा नजफखानाला भेटावे असे या तीन खानमंडळींनी ठरविले.

अंतर्वेदीतून खालच्या अंगास जात असताना वाटेतील अनेक बंडखोर जाट व गुजर जमीनदारांना त्यांनी वठणीवर आणले, त्यांना जबर दंड ठोठावला. अशा बंडखोरांची काही

ठिकाणे म्हणजे दोघाट (सहरणपूरच्या वायव्येस १५ मैलांवर), परिछतगड (मीरतच्या पूर्वेस १४ मैलांवरील गुलाबसिंग जाटाचे ठिकाण), रोहाता व साइतपूर (मुझफरनगरच्या उत्तरेस ८ मैलांवरील मकणीराम जाटाचा मजबूत किल्ला) व कुतेसरा (रोहाताच्या पश्चिमेस सहा मैलांवरील सरपा गुजराचे ठिकाण).

जाटांविरुद्धची मोहीम जवळजवळ यशस्वी करून या तीन सेनानींनी मथुरेनजीक यमुना ओलांडिली व झपाट्याने ते आग्रा येथे आले. मिर्झा नजफने त्यांचे मनापासून स्वागत केले. गौसगड येथील झबिताची सर्व चीजवस्त शाही सैन्याने आपल्या ताब्यात घेऊन आग्रा किल्ल्यात जपून ठेविली होती. ती जशीच्या तशी त्याच्या हवाली करण्यात आली. त्याची व त्याच्या सैन्यातील अधिकाऱ्यांची बायकामुले शाही सैनिकांनी कैदेत ठेविली होती, त्या सर्वांची सुटका करण्यात आली. सहरणपूर येथील सात महाल व गौसगडची मालकी त्याच्याकडे पुन्हा सुपूर्द करण्यात आली. या उपकाराची परतफेड म्हणून झबिताखानने आपल्या उपकारकर्त्याशी आपल्या मुलीचा विवाह करून दिला (२० सप्टेंबर, १७७८).

नजफखानने झबिताखानाशी केलेला हा समझोता त्याच्या मुत्सद्देगिरीचे व दूरदृष्टीचे उत्कृष्ट उदाहरण होय. अंतर्वेदीतील वरील बाजूचे भागात शीख व बादशहा यांच्या दरम्यान कीलकासारखा कोणी असावा म्हणून नजफखानने झबिताखानाला गोंजारून घेतले. शिवाय तो उपकाराच्या ओझ्याखाली असल्याने अबदुल अहदच्या दरबारातील कारस्थानांनाही त्याच्यामार्फत चांगला शह देता आला असता. शिवाय नजफ स्वतः यमुनेच्या पश्चिमेस जाट व रजपुतांशी लढत होता; तेव्हा यमुनेकडील आपल्या ताब्यातील मुलुखाबाबत आपल्याला काळजी करावी लागू नये असाही त्याचा उद्देश होता. झबिताखान दरबारात हजर झाला. बादशहाला भेटून त्याने झाल्या चुकांबाबत क्षमायाचना केली, तेव्हा हा समझोता पक्का झाला. बादशहाने त्याला त्याचा गुन्हा माफ केला; मानाची वस्त्रे दिली व सहरणपूर जिल्ह्याच्या सनदेचे फर्मानही दिले (३० जानेवारी, १७७९).

टीपा : प्रकरण २९

पृष्ठ	**टीपेचा क्रमांक**	
८७	१	**डीसी. गुलामअली,** खंड ३, ६२–७१; **मुन्नालाल,** १६९–१७१; **इब्रत :** भाग १, २८८–२८९, **सीपीसी :** खंड ५, क्रमांक ८७,२८०, **बिहारीलाल,** (आय्. एच्. क्यू. १९३५ यात मी भाषांतरित केलेले)
८८	२	' गढी मियाँ भाईखान ' या नावानेही परिचित.
८९	३	गौसगड मोहीम (आणि त्या आधी झबिताशी संबंध) : **इब्रत :** भाग १; २९५–२९७, ३००–३१२, **मुन्नालाल :** १७३, १७७–२०२;

गुलामअली : खंड ३, ९६–११७; **मिस्किन :** ३२३–३३५ (स्वतः हजर होता) **बिहारीलाल :** (आय. एच्. क्यू. १९३५ यात) **सीपीसी :** खंड ५; क्रमांक ७०८, **अॅटकिन्सन :** एन्. डब्ल्यू. पी. गॅझेट, भाग ३, ६७४–६ (गौसगड आणि जलालाबाद) ७३५–४० (ठाणा भवन) ७०२ (लुहारी)

९६ ४ **शीख :** १८०० सालचे **एशिअॅटिक अॅन्युअल रजिस्टर; मिसलेनिअस ट्रॅक्टस :** पृ. ३४; **जी. फॉर्स्टर**; जर्नी, भाग १, २८५-२९१ (पॉलिअरच्या म्हणण्याचा समावेश असलेली) **कनिंगहॅम्स हिस्टरी,** २ री आवृत्ती, १०४; विल्यम्सचा 'कलकत्ता रिव्ह्यू', अंक ६० (१८७५) पृ. २८–२९ मधील लेख; **फॉरेस्टचे** सिलेक्शन्स-फॉरिन डिपार्टमेण्ट, खंड ३, ११२३–११२४ (वॉरन हेस्टिंग्जचा दृष्टिकोन) **फ्रॅन्कलिन :** शहा अलम, प्रकरण ५.

९९ ५ अंबाला डिस्ट्रिक्ट गॅझेटिअर, (१८८३) १६–१८, ४०, तसेच भाग ६ वा; कर्नाल जिल्हा गॅझेट (१८८३) ३३–४६; ब्राउनने आपल्या **इण्डिया ट्रॅक्ट्स** (डॉ. सिंह यांच्या **राइझ,** १०४ मध्ये दिलेले) मधे दिले आहे त्यापेक्षा काही बाबतीत माझी यादी वेगळी आहे.

०० ६ १८८२ साली अंबाला जिल्ह्यातील ३८ जहागिरींपैकी ३५ जहागिरी शिखांकडे होत्या.

०१ ७ फॉर्स्टरने दिलेल्या वृत्तांतानुसार, राखी, एकूण उत्पन्नाच्या ४ ते ५ टक्क्यां- पेक्षा क्वचितच जास्त असे (पूना रेसिडेन्सी कॉरस्पॉन्डन्स, खंड १, क्रमांक, ९५). दिल्ली प्रदेशाच्या उत्तरेकडे अशी पद्धत होती की महसुलाची जी रक्कम ठरवून दिलेली असेल तीवर रुपयास दोन आणे याप्रमाणे राखी कर असे (**डी वाय :** भाग १, लेखांक १०८)

०२ ८ **बिहारीलाल** आय. एच. क्यू. (१९३५) पृ. ६५१. **मिस्किन :** ३३६–३३८; **इब्रत :** भाग १; ३२४–३४२, (अंतर्वेदीतील मोहिमेचा संपूर्ण तपशील) **डीसी; गुलामअली,** खंड ३, १३०–१३१.

०३ ९ **बुधाखेडा** कर्नाळ शहाराच्या ईशान्येस ४ मैलांवर;
बडागांव बुधाखेडाच्या उत्तरेस ४ मैलांवर.

प्रकरण ३० वे

अबदुल अहदखानला उतरती कळा :
१७७८–१७७९ मधील घडामोडी

१. नजफखानची जाटांवरील मोहीम

१७७७ च्या मध्यावधीतील चार महिने मिर्झा नजफ हा गौसगड मोहिमेत गुंतला होता. त्यावेळी सगळीकडे अशी एक अतिशयोक्तिपूर्ण आवई उठली होती की बादशहाच्या सैन्यात भरपूर कपात करण्यात आली असून जवळजवळ ते गुंडाळण्यात आले आहे. त्याचा परिणाम असा झाला की बंडखोर पुन्हा डोकी वर काढू लागले. यातला मुख्य म्हणजे भरतपूरचा जाट राजा रणजितसिंग. त्याच्या वडिलांच्या अमदानीत त्याच्या ताब्यात जो प्रचंड मुलूख होता त्यातला बराचसा नजफने आधीच्या सालात बळकाविला होता. तो परत मिळविण्याचे रणजितसिंगाचे प्रयत्न चालू होते. या बाबतीत त्याला मदतीचा हात होता तो माचेडीचा महत्त्वाकांक्षी प्रतापसिंग याचा. आपल्या स्वतंत्र कारभाराला प्रतापसिंगाने नुकतीच सुरवात केली होती. मेवात व शेखवती येथे नेहमीसारखाच गोंधळ होता. तेथील गढूळ पाण्यात तो गळ टाकून बसला होता.

राव प्रतापसिंग हा कछवा जमातीतील नरोखा शाखेचा, जयपूर राजाचा एक मांडलिक. जयपूरचा अधिपती माधोसिंग याने प्रथम त्याला हद्दपार केले होते. पुढे १७६८ च्या फेब्रुवारीत जयपूरच्या राजाची जवाहिरसिंग जाटाशी लढाई झाली त्यावेळी राव प्रतापसिंगाने देशभक्तीने प्रेरित होऊन माधोसिंगला साहाय्य केले. त्यामुळे माधोसिंगाने प्रतापसिंगाला क्षमा करून त्याच्या जहागिऱ्या त्याला परत दिल्या. त्यानंतरच्या दहा वर्षांत (म्हणजे प्रीतिसिंगाची १७६८–७८ ही दहा वर्षांची कारकीर्द) तो जयपूरशी एकनिष्ठ होता. १५ एप्रिल १७७८ रोजी सवाई प्रतापसिंग जयपूरच्या गादीवर आला. तो पोरवयाचा, नेभळट व अशक्त होता. त्याची प्रकृती व कारभार नीट नसल्याने त्याच्या राज्यात बेदिली होती. त्याचा फायदा घेऊन त्याचा नरोका येथील मांडलिक, त्याच्या मुलुखावर आक्रमण करून आपण स्वतंत्र व्हावे असे स्वप्न पहात होता; त्या दृष्टीने त्याने पावले टाकायला सुरवात केली होती. आग्रा-मथुरा जिल्हे व मेवात या ठिकाणच्या धुमश्चक्रीत तो हटकून आपली हजेरी लावी. आपला फायदा असेल त्यानुसार तो कधी बादशहाच्या फौजांना साहाय्य करी तर कधी जयपूरराजाची बाजू घेई आणि जे मिळेल व जमेल ते हाताखाली घालीत असे.

जाटराजाने माचेडीच्या या मांडलिकाची व ग्वाल्हेर जिल्ह्यातील मराठ्यांच्या सैन्याचा प्रमुख अंबाजी इंगळे यांची मदत घेऊन नजफखानच्या किल्लेदाराच्या ताब्यात असलेला

ंगचा किल्ला घेण्याचा प्रयत्न केला. पण त्यात यश आले नाही. जाटराजाने आग्राशहर टण्याची धमकी दिली, पण मिर्झा नजफचा दुय्यम सेनाधिकारी मुहमद बेग हमदानी ाने मोठ्या कौशल्याने त्या शहराचा बचाव केला. जाट राजाची ही धमकी पोकळ ठरली री त्याने एका रात्री फरा (आग्र्याच्या वायव्येस ६५ मैलावर आहे) या ठिकाणावर चानक हल्ला करून आपला कार्यभाग साधला. या जाटराजाने तेथील मुगली महसूल धिकाऱ्याला ठार मारले, शहराची लूट केली व आग्रावेशीपर्यंतचा मुलूख उध्वस्त केला. ावात दिवा लावायला कुणी राहिले नव्हते. (जुलै – ऑगस्ट १७७७) या भागातील ादशहाच्या अधिकाऱ्यांवर कठिण प्रसंग आला; पण शाही अधिकाऱ्यांना त्यांच्याकडे दत पाठवणेही शक्य झाले नाही.

नव्यानेच जिंकून घेतलेल्या आग्रा – मथुरा भागांत ही जाटबंडाळी पुन्हा उद्भवली ोती. गौसगड वेढ्यातून मोकळा होताच मिर्झा नजफ तडफ तिकडे जायला निघाला. हिलामोहीम संपवून दिल्लीत आल्याला त्याला फक्त पाचच दिवस झाले होते, तरी ाटांचा समाचार घेण्यासाठी तो दि. २५ नोव्हेंबर, १७७७ ला दिल्लीहून निघाला व डक मोर्चा नेत आग्रा येथे आला. बंडखोरांना नेस्तनाबूद करून त्याला आपली सत्ता थे प्रस्थापित करायची होती. सोंख (मथुरा व कुंभेर यांच्या मध्यावर) येथील गढी ोफांचा मारा करून त्याने जमीनदोस्त केली. गढीच्या संरक्षणासाठी जी शिबंदी होती ातील तीन हजार कुंतेल जाटांची त्याने कत्तल केली व त्यांच्या बायकामुलांना भर ाजारात गुलाम म्हणून विकले. त्याच्या या अमानुष कृत्याची चांगलीच जरब बसली. ानंतर त्याने ज्या चढाया केल्या त्यांना तितकासा विरोध झाला नाही. कुंभेर हा जाटांचा र्वात भक्कम किल्ला. तोहि मिर्झाने थोड्याच दिवसांत जिंकून घेतला. रणजितसिंग व ाची सावत्र आई राणी किशोरी पळून गेली व त्यांनी भरतपूरच्या किल्ल्याचा आश्रय तला. पुढे नजफने त्या किल्ल्यालाही वेढा घातला. दोन महिन्यांच्या अवधीत त्या ोघांना शरण येण्यास भाग पाडण्यात आले. राणी स्वतः मिर्झाला भेटली व आपल्या तीच्या थोर घराण्यावर दया दाखवावी अशी तिने आर्जवे केली. शत्रूला मित्र करायची ुत्सद्देगिरी नजफला अवगत असल्याने त्याने भरतपूरचा प्रदेश रणजितसिंगाकडेच राहू ंदेला. मात्र रणजितसिंगाने सात लाख खंडणी द्यायची होती. आपली व्यक्तिगत भेट म्हणून ाणी किशोरीला त्याने कुंभेरचा किल्ला परत दिला[१] (अंदाजे फेब्रुवारी, १७७८).

२. माचेडी (अलवार) चा रावराजा, नजफखानाशी त्याचे युद्ध व समझोता

जाटराजा भरतपूरच्या किल्ल्यातील वेढ्यात अडकून पडला असताना नजफखानची ाचेडीच्या राजाशी तडजोडीची बोलणी चालली होती. जाट सत्तेला नुकतेच जे ग्रहण ागले होते, त्याचा फायदा वेगळ्याच प्रकारे उठवायचा नजफचा विचार होता. अलवार लछमनगड येथील जाट अधिकाऱ्यांना या ना त्या प्रकारे वश करून तेथील ठिकाणांचा ाबा घ्यायचा त्याचा विचार होता. अलवारच्या आग्नेयेस २० मैलांवर असलेल्या लछमन-[१]

गडापर्यंत नजफखान चालून आला व त्याने गडाला सरळसरळ वेढा दिला. अंबाजी इंगळे हा मराठा सरदार जाटांना उघडउघड पैशासाठी साहाय्य करीत होता. नजफच्या सैन्यातील त्याच्या हाताखालचा एक सेनाधिकारी हिंमतबहादर गोसावी याने त्याला आणखी पैसा देण्याची लालूच दाखवून आपल्या बाजूला घेतले. माचेडीचा रावराजा हतबल झाला व त्याने वाटाघाटीसाठी माणूस पाठविला. मिर्झा नजफने तडजोड नाकारिली. हे सर्व चालू असताना दरम्यानचे काळात दि. १५ एप्रिल रोजी जयपूरचा राजा प्रीतिसिंग मरण पावला. इकडे शाही दरबारात एक नवाच प्रवेश सुरू झाला. नजफला मोठेपणा मिळू नये, त्याचे कौतुक होऊ नये म्हणून त्याच्या डोक्यावर मिरे वाटण्यासाठी, बादशहाचे कानाशी लागून अबदुल अहदने माचेडी व जयपूरच्या राजाशी वाटाघाटी करायला मान्यता मिळविली. बादशहा स्वत: जर या जाट मुलुखात जातील तर तेथील खंडणीचा सर्व पैसा त्यांच्या हातात येईल, त्यातला वाटा मीरबक्षीसाहेबांना द्यावा लागणार नाही असे गोडगोड बोलत त्याने बादशहाचे मन वळविले व बादशहांची स्वारी तिकडे येत आहे असे जाहीरही करून टाकले. जयपूर व माचेडी येथील राजांनी आपले वकील दिल्ली दरबारी पाठवून नजफखानकडून मिळत होते त्यापेक्षा आणखी काही पदरात पडते का, ते पहाण्याचा प्रयत्न केला. या वकिलांचे दिल्लीत हार्दिक स्वागत झाले. त्यांच्या राजांचे रक्षण करण्यात येऊन नजफखानच्या हुकुमात जरूर ते फेरबदल केले जातील असे आश्वासन त्यांना मिळाले. शहाअलम मुलखाचा आळशी. त्याने दिल्लीबाहेर पडावे म्हणून त्याचा आवडता वझीर अबदुल अहद याने त्याच्या मागे घोशा लावला. त्यानुसार दिल्लीबाहेर तालकटोरा येथे शाही तंबूडेरे पडले (२४ मे). बादशहाच्या आगमनाची नुसती वार्ता कळताच माचेडी अधिपती, नजफखानाशी आणखीच ताठ्याने वागू लागले.

मीरबक्षी नजफला सामना द्यायचा होता, तो या नव्या संकटाशी. यश हाताशी असताना अशावेळी बादशहाकडून अशा प्रकारचे हुकूम काढवून आपल्या धन्याच्या कार्यात आपणच बिब्बा घालणे बरे नव्हे अशा अर्थाचे पत्र, नजफने अबदुल अहदला पाठविले; पण अहदला त्याचा अर्थच समजला नाही. नजफ अगदी असाहाय्य झाला असून आपल्यावाचून त्याला सत ना गत, अशी अहदची समजूत झाली. या निमित्ताने नजफकडून बराचसा पैसा व प्रदेश उकळता येईल असे मनातल्या मनात तो मांडे खात होता. या दोन श्रेष्ठींतील तणाव सौम्य करता आला तर पहावे म्हणून दिल्लीस गेलेल्या अफ्रासियाबखानाला दहा-बारा दिवस रिकामा घोळ घालून हात हलवीत परत यायला लागले होते (२१ एप्रिल). त्यानंतर काय करायचे हे निश्चित ठरवून मिर्झा नजफने त्यानुसार कृतीही केली. नजफ कूलीखान व अफ्रासियाबखान या आपल्या लष्करातील दोघा सेनानींना त्याने ताबडतोब दिल्लीला जायला सांगितले. या दोघांनी बादशहाला भेटून 'त्याने अबदुल अहदसारख्या तोंडपुज्याला ताबडतोब हाकलून द्यावे' असे सांगायचे असे ठरले. ही बातमी समजताच भित्रा अहद भलताच घाबरला. जयपूर व माचेडी येथून

आलेल्या वकिलांची, त्याने रिक्त हस्ताने संभावना केली व अनेक सबबी सांगून बादशहाला राजवाड्यात परतायला लावले (२९ मे). जनतेत हसे होऊ नये म्हणून, आपल्यामुळेच दि. २४ रोजी बादशहाला किल्ल्याबाहेर पडायला इतका उशीर झाला, की मुहूर्ताची वेळ टळून गेली असे त्याने उठवले. दरम्यान आकाशात एक अशुभ नक्षत्र उगवले होते; बादशहाच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने ते वाईट होते म्हणून हा प्रवासाचा बेत रद्द करावा लागला होता.

अबदुल अहदसारख्या बिनबुडाच्या दुतोंडी वझिराची माचेडीच्या वकिलांनी भरपूर उद्धरगत केली व निराश मनस्थितीत ते आपल्या राजाकडे गेले. माचेडी व जयपूरच्या राजांना मिर्झा नजफच्या अटी झकत मान्य कराव्या लागल्या. त्यानुसार त्यांनी तीन वर्षांत तेहतीस लाख खंडणी द्यायची होती. पैकी तीन लाख लगेच देण्यात आले व बाकी रकमेच्या पहिल्या हप्त्याची हमी देण्यात आली (अंदाजे ६ जुलै, १७७८). माचेडी राजाने मीरबक्षी मिर्झा नजफला दिलेले तीन लाख रुपये त्याने जयपूर तिजोरीतून उसने घेतले होते व ते परत करण्याची टाळाटाळ चालविली होती;[३] त्यासाठी जयपूरचा दिवाण खुशालीराम बोहरा याने नजफची मदत मागितली होती.

झैत-उल-अबीदिन खान (मीरबक्षी नजफच्या एका पुतण्याचा हा मुलगा) याला त्याच्या हाताखाली शाही सैन्यातील फौज देण्यात येऊन, जयपूर राजाच्या मदतीला पाठविण्यात आले. ८ ऑगस्ट, १७७८ ला जयपूर व माचेडी यांच्यात चकमक उडाली, त्यात गोंधळ, गडबडच जास्त होती. सुरवातीला माचेडी राजाला काही प्राथमिक स्वरूपाचे विजय मिळाले. त्यानंतर त्याला मदत करणाऱ्या मराठा सैन्याने काढता पाय घेतला. माचेडी व मराठा सैन्य आपापल्या छावण्यांत गेले. दुसऱ्या दिवशी नरोखा प्रतापसिंगाने मराठ्यांना भरपूर पैसा दिला; त्यानंतर ते पुन्हा साहाय्य करावयास तयार झाले. मराठ्यांच्या साह्याने तो जयपूरमधील कोटपुतळी व अन्य ठाण्यांवर हल्ला करणार होता. त्या आधी शाही फौजांशी सख्य जोडावे व मग आपले एकत्रित सैन्य नेऊन जयपूरचा प्रदेश जिंकावा आणि आपल्या राज्यास जोडावा असा विचार त्याने चालविला.

त्यानुसार माचेडीचा राजा मराठा सैन्यासह लोहगडला आला. नवलगढच्या नवलसिंगाला त्याने आपल्या बाजूला वळविले; तसेच जयपूर राजाच्या आधिपत्याखाली असलेले शेखवतचे काही असंतुष्ट जमीनदारही त्याच्या बाजूला आले. त्यानंतर आपण शरण येतो आहोत असे सांगण्यासाठी तो नजफखानच्या छावणीकडे निघाला. पण शाही सेनेच्या मीरबक्षीवर विश्वासघाताने अकस्मात हल्ला करायचा असा त्याचा कावा असल्याची कुणकूण लागताच नजफखान दक्षतेने पवित्रा घेऊन उभा ठाकला. दि. २९ नोव्हेंबर, १७७८ रोजी राव प्रतापसिंग नजफखानला भेटला; पण खंडणी देण्याचे त्याने अत्यंत स्पष्ट शब्दांत नाकारले. त्यानंतर गोसावी हिंमतबहादूर याच्यामार्फत नजफखानने मराठ्यांशी संधान बांधले. अंबाजी व त्याच्या सहकाऱ्यांना चार लाख रुपये द्यायचे आमिष दाखविले व काही दिवसांनंतर एका भल्या पहाटे त्यांच्या मदतीने माचेडी छावणीवर हल्ला करून प्रतापसिंगला

चांगलेच चकविले. हल्ला झाला त्यावेळी स्नान उरकून प्रतापसिंग देवपूजेत मग्न होता. त्याने पूजा आवरली व शत्रूच्या वेढयातून आपल्या साथीदारांसह तो कसाबसा निसटला; पण "त्याची सर्व मालमत्ता, छावणीचे अदमासे वीस लाखांचे साहित्य, तोफखाना हे सगळे लुटण्यात आले." मुगल शिपायांनी राजपुतांना वाटेत अडविले. राजपूत त्यांच्याशी शौर्याने लढले; शेवटी राजगड येथे त्यांनी माघार घेतली.

शाही सैन्याने मग माचेडी मुलुखात धुमाकूळ घातला, लूटमार केली, छोटे छोटे किल्ले व गढया बळकावल्या, खेडी व्यापली. डिसेंबर सुरू झाला होता; आणि अबदुल अहद हा बादशहाला घेऊन राजपुतान्यात येत आहे अशी बातमी येऊन थडकली तेव्हा माचेडीचा राजा संपूर्ण शरणागती पत्करणार असे दिसत होते. या मुलुखातील नजफचे अधिकार काढून घेऊन त्याचे वर्चस्व कमी करावयाचे हाच अहदचा उद्देश होता. ही बातमी समजताच मिर्झा नजफने नरोखा प्रतापशी घाईगर्दीने समझोता केला; त्याने दोन लाख खंडणी दिली तरी चालेल हे मान्य केले व स्वतःच्या अस्तित्वावर गदा आणणाऱ्या या नव्या आपत्तीचे निवारण करण्यासाठी तो दिल्लीकडे निघाला.[४]

३. बादशहाचे जयपूरला प्रयाण, राजा सवाई प्रतापसिंग त्याचा सत्कार करून खंडणी देतो. १७७९.

दिल्ली राजप्रासादातील ऐषाराम व मौजमजा सोडून कोठे बाहेर जायचे, मोहिमेतील दगदगी सोसायच्या, फार काय मजल दरमजल करीत प्रवास करायचा व रस्त्यात, तंबूत पाठ लांब करायची, या त्रासदायक गोष्टी बादशहा शहाअलमला मनापासून नको असत. पण त्याच्या लाडक्या अबदुल अहदची त्याच्यावर इतकी छाप असायची की तो म्हणेल त्याला नाही म्हणायचा धीर बादशहाला होत नसे. जाट व माचेडी राजांविरुद्ध मिर्झाजी एक वर्षभर हालचाल करताहेत, त्यात जय मिळतो आहे तरी त्याने खंडणीच्या रकमेपैकी एक दमडाही दाखवला नाही किंवा लुटीतील किमान हिस्साही सरकारात जमा केला नाही ही वस्तुस्थिती अहदने बादशहाच्या नजरेस आणून दिली. शिवाय जयपूरच्या गादीवर नवा राजा आलेला; अधिकारग्रहणाबद्दल त्याला बादशहाला बरीच मोठी रक्कम द्यावी लागणार होती. बादशहा जर स्वतः तिथे गेले नाहीत तर मिर्झाजी ती गडप करणार नाही कशावरून? अहदने बादशहाच्या मनात हेही भरविले. अहदने बादशहासाठी खास उभारलेल्या सेनादलातील शिपायांचे पगार थकल्याने ते त्याची मागणी करून सारखे सतावीत होते. शाही तिजोरीत पैसा नव्हता. जर बादशहा स्वतः राजपुतान्यात जातील तर वाटेवरील राजे व संरजामदार हे स्वतः येऊन बादशहाचे स्वागत करून त्यांना नजराणे देतील, त्यांचा बहुमान करतील व हे सगळे शस्त्र उचलल्याशिवाय होईल, असे अबदुल अहद सांगत होता.

बादशहाने शेवटी राजपुतान्यात जायला संमती दिली व १० नोव्हेंबर १७७८ रोजी तो दिल्लीबाहेर पडला. दि. १७ डिसेंबरला बादशहा नजफगडला पोचला व नंतर

वाडी येथे गेला. (या ठिकाणी येथील राजा मित्रसेन अहीर राजाला समक्ष भेटला. त्याच्या- र सव्वालाख खंडणी बसविली) दि. २३ ला शाही लवाजमा कनोडला आला. हे ठिकाण वाडीपासून २८ मैलांवर आहे. येथील राजा भागवतसिंगाचे बादशहाने दरबारात स्वागत ले व त्याच्यावर चार लाख खंडणी लादली. दुसऱ्या दिवशी बादशहा मुक्कामाला गेले नरनौल (ही जागा कनोडच्या दक्षिणेस पंधरा मैलांवर आहे) पलीकडे या ठिकाणी दशहाने आपल्या वतीने फौजदार म्हणून बादल बेगची नेमणूक केली. खुद्द राजपुतान्यात थील कितीतरी राजे व स्थानिक सरदार, जमीनदार बादशहाला भेटून गेले. नवलगढचा जा नवलसिंग शेखावत ३१ डिसेंबरला भेटला; पाटणचा राजा वसंतसिंग हा ५ जानेवारी ७७९ ला बादशहाला भेटून गेला तर मनोहरपूरचा (पाटणच्या दक्षिणेस ३५ मैलांवर) जा नथूसिंग हा १६ जानेवारीला भेटला. या दौऱ्यात बादशहा जास्तीत जास्त दूर गेला अमीनपूर खेड्यापर्यंत. हे खेडे जयपूरनजीक अमीरनगर परगण्यात आहे. बादशहा येथे ७ जानेवारीला आला. या ठिकाणी कछवा राजाचा दिवाण खुशालीराम बोहरा आपल्या जाला राज्यावर बसविण्याबाबत बोलणी करण्यासाठी बादशहाकडे आला (दि. १९). चवेळी समर्थ व सुसज्ज अशा सैन्यासह मिर्झा नजफही तिथे येऊन दाखल झाला दि. २३). त्याचे व खुशालीरामचे काही बोलणे चालणे झाले आणि जयपूर राजाकडून ती रक्कम घ्यावयाची ते दोघांनी मिळून ठरवावे असा बेत झाला.

दि. १९ फेब्रुवारी रोजी नजफखानने सवाई प्रतापसिंगाला बादशहाचे भेटीस णले. त्याने पेशकारा म्हणून दोन लाखांचा नजराणा दिला व त्याने खंडणीदाखल लाख रुपये द्यावेत असे परस्परसंमतीने ठरविण्यात आले. सवाई प्रतापसिंग अधिकृतपणे ना झाला हे जाहीर करण्यासाठी बादशहाने स्वतःच्या हाताने त्याच्या कपाळावर टिळा वला व मानाची बरीचशी वस्त्रे देऊन त्याची संभावना केली. नरनौलसह त्याच्याकडील मुलूख त्याला परत करण्यात आला. खंडणी वसूल करण्याची जबाबदारी नजफने तःकडे घेतली व त्यासाठी आपला माणूस म्हणून त्याने हिंमतबहादूरची नेमणूक केली खाशा स्वाऱ्यांसमवेत स्वतः दिल्लीस परतला (२६ फेब्रुवारी). दि. २१ एप्रिलला त्याने ल्लीत प्रवेश केला.

माचेडीचा राजा पुन्हा उलटला. या बंडखोराला शासन करायचे काम बादशहाने नफवर सोपवले व त्यासाठी त्याला दि. २६ मार्च रोजी शाही छावणीतूनच निरोप यात आला.[५]

पातशहाजादा फरकुंड बख्त समवेत अहदची सरहिंद प्रांतावर स्वारी

अबदुल अहद हा जरी बादशहाचा मुखत्यार असला तरी आपल्या लष्कराचा नकुवतपणा त्याला माहीत होता. मिर्झा नजफचा पाडाव करून कोणत्या साधनाने त्याचा ता उतरवायचा याचा प्रयत्न अबदुल अहद कितीतरी दिवस करीत होता. त्यासाठी ादी जबरदस्त असामी त्याला हवी होती. झबिताचा या बाबतीत पुरा फजीतवाडा ला होता. नजफचे सुसज्ज सैन्य व त्याची राजकारणकुशलता यामुळे जाटराजा व

माचेडीचे रावप्रताप निष्प्रभ झाले. मराठे इंग्रजांशी सामना देत स्वत:च्या जीवनमरणाचा प्रश्न सोडविण्यात गढलेले, भरीला घरभेद्या राघोबादादाचा त्रास. थोड्याफार ताठ मानेने व शिस्तीत होते ते शीख. त्यांच्याशी अबदुल अहदचे निकराचे प्रयत्न चालले होते.

दिल्लीच्या वायव्येस शालीमार बगीचा आहे. तिथे साहेबसिंग व आणखी काही शीख सरदार, तळ टाकून होते. या शीख सरदारांचे स्वागत करण्यासाठी अहदने आपल्या हाताखालचा अधिकारी बहराम कूलीखान याला त्यांच्याकडे पाठवले तो दिवस २३ सप्टेंबर, १७७८ हा होता. नजीबउद्दौलाचा धाकटा मुलगा मल्लूखान, हा शिखांच्या आश्रयाला होता. झबिताखान नजफखानचाच आश्रित झालेला. त्याला एक चपराक द्यावी या उद्देशाने मल्लूखानला दुसरा नजीबउद्दौला हा किताब द्यावा म्हणून अहदने बादशहाचे मन वळविले (२८ सप्टेंबर). यानंतर एक दिवस गेल्यावर अहद स्वत: याकूब अलिखानाच्या बागेत गेला व त्याने शीख सरदारांची भेट घेतली, आणि बादशहाच्या वतीने त्यांना मानाची वस्त्रे दिली. दिल्लीच्या दुर्बल राजसत्तेचे हितकर्ते म्हणविणाऱ्या या गलेलठ्ठ सोकाजीरावांनी दि. १ ऑक्टोबरला दसरा सण साजरा केला; घोड्यावर स्वार होऊन ते शिलंगणाला गेले. गुरु बंगल्यानजिक रिकबगंजजवळची एक मशीद त्यांनी उध्वस्त केली व तयार पिकांची नासधूस करण्यासही कमी केले नाही. (**डीसी**) "अल्लाच्या नावे होणाऱ्या जिहादवरून ही अशी गुरूच्या नावे जिहाद करण्याची स्फूर्तीही मिळू शकते."

त्यानंतर बादशहा जयपूर प्रवासाला निघाला, त्यामुळे तो स्वत: २१ एप्रिल, १७७९ पर्यंत दिल्लीत नव्हता. या दरम्यान एक नवाच डाव राजकीय पटावर मांडण्यात आला. पूर्व, दक्षिण, पश्चिम अशा कोणत्याच दिशेने अहदच्या कर्तृत्वाचा वारू दौडू शकत नव्हता. शेवटी आपल्या महत्त्वाकांक्षेच्या पूर्तीसाठी तो उत्तरेकडे वळला व पानिपत भागात बादशहाच्या नावे आपला अंमल घट्ट करण्याची योजना त्याने आखली. त्यासाठी त्याने आपला जावई सय्यद अलिखान याला सोनीपत पानिपत जिल्ह्याचा फौजदार नेमले (५ फेब्रुवारी, १७७८). या भागातील ठिकठिकाणची ठाणी शिखांच्या ताब्यात होती व ती सांभाळण्याइतका जोरही त्यांच्या मनगटात होता. काही भागात मात्र नजफचे महसूल अधिकारी होते. तिथे पाय भक्कम रोवायचा तर अहदच्या पाठीशी समर्थ सेना असणे जरूर होते.

म्हणून जयपूर दौरा आटोपून बादशहा दिल्लीस आल्यानंतर अहदने कर्नाळ प्रांतातील शीख सरदारांना तातडीने दिल्लीस बोलावून घेतले. त्यांच्याशी केलेला करार पक्का करायचा त्याचा बेत होता. पण बादशहाने शीख सरदारांना दरबारात प्रवेश करू दिला नाही. तसे करणे म्हणजे नजफच्या आपण मान्यता दिलेल्या धोरणाला उघडउघड विरोध करणे होते. त्याचवेळी पतिआळाचा राजा अमरसिंग याचा वकील अहदला भेटायला आला. त्याने बहुमोल नजराणा आणला होता. अहदच्यामार्फत अमरसिंगला बादशहाचे साहाय्य हवे होते. सतलजअलीकडील राजे-महाराजे, विशेषत: भगेलसिंग याच्याशी अमरसिंगाचे नेहमी तंटे उडत. अमरसिंगाचे वकील इतके मिठ्ठास बोलणारे की आपल्या लंब्याचवड्या भूलथापांनी त्यांनी अहदलासुद्धा भुरळ घातली. अहदला या

किलांनी अशी आशा लावली की बादशहाने अमरसिंगच्या मदतीने दिल्लीच्या उत्तरेकडील लुखावर स्वारी केली तर सतलजअलीकडील भागात बादशहाचा अंमल सुरू होऊन हौर व मुलतान हेही परत मिळवता येतील.

बुढ्या आणि मूर्ख अहदला एवढे आमिष पुरेसे होते. या मोहिमेवर जाणे किती इत्त्वाचे, हे तो बादशहाला जीव तोडून पटवून देत होता. शहा अलम प्रकृतीने खंगलेला, शक्त झालेला असा नुकताच तापातून उठला होता. शाही झेंड्याखालीच काय ती सुसज्ज शी फौज होती. तेवढ्यावर निभावून न्यायला नजफ तयार झाला नसता. शिवाय उन्हाळा न भरात होता. पण आताच जर मोहिमेवर निघालो नाही तर शीख त्यांना द्यावयाच्या कमेबाबत व सैनिक थकलेल्या पगाराबाबत आपल्याला भंडावून सोडतील असा बागुलबुवा ाने बादशहासमोर उभा केला. अहदने परिस्थितीचे असे काही भयानक चित्र बादशहा-मोर उभे केले की तो अगतिक झाला. आपला मुलगा मिर्झा जहान शाह (फरकुंदा बख्त) ने सैन्य घेऊन अहदबरोबर जावे असे त्याला सांगण्यात आले. जहांदर शहा हा बादश-चा सर्वांत मोठा मुलगा. मोठ्या धूर्तपणे प्रकृतीच्या सबबीखाली त्याने ही कामगिरी टाळली.

अबदुल अहदजवळ आता जवानांचा जथाच्या जथा होता. तसेच सुसज्ज तोफखा-ाही होता. या सरंजामासह पातशहाजाद्याला बरोबर घेऊन दि. ३ जून, १७७९ रोजी दिल्लीहून निघाला. आपण कोणीतरी मोठे सरसेनापती आहोत असा त्याचा थाट होता. त्तरेकडे जात असताना शाही मुलुखातील नजफने नेमलेल्या महसूल अधिकाऱ्यांना कामा-रून कमी करून त्या जागी त्याने आपले अधिकारी नेमले. ज्यांनी त्याचे ऐकले नाही ांना मारपीट करण्यात येऊन त्यांच्या ताब्यातील मुलूख उजाड करण्यात आला. ही सर्व ना कर्नाळला पोहोचली तेव्हा तेथील जमीनदार गजपतसिंग याने पातशहाजाद्याचे न:पूर्वक स्वागत केले. या राजनिष्ठेच्या प्रदर्शनानंतर गजपतसिंगावर दडपण आणून त्याला डिलाख खंडणी मान्य करायला लावण्यात आली. अन्य बऱ्याच शीख सरदारांनीही त्या-ळी त्यांना देण्यात यावयाच्या वेतनाच्या रकमेसाठी आपली राजनिष्ठा जाहीर केली. गजपतसिंग अबदुल अहदच्या अगदी विश्वासातला व तो सांगेल ते करायला तयार ोणारा हरकाम्या झाला. त्या भागातील सर्व शाही कामांत त्याचा हात असे. त्याच्याच ांगण्यावरून अहदने बादशहाच्या सैन्यात येऊ इच्छिणाऱ्या प्रत्येक शिखाला नोकरी दिली व ाच्या त्याच्या योग्यतेप्रमाणे हत्ती, रत्नगुच्छ अशा भेटवस्तू दिल्या. अनेक ठिकाणच्या शीख ाण्यांवरील खेडुत शाही फौजांच्या भीतीने वस्ती सोडून पळून गेले होते; त्यांना अभय देऊन हदने परत बोलावले " (मिस्किन, ३४०). तो पावसाळा अहदने कर्नाळमध्येच काढला.

. अबदुल अहदला मोहिमेत अपयश, प्रतिकूल परिस्थितीतील शरणागती, ऑक्टोबर १७७९.

या मोहिमेची जी माहिती मिळते त्यावरून या मोहिमेत अबदुल अहदच्या कर्तृत्व-ाक्तीवर बरेचसे काळेशार सावट पडलेलेच दिसून येते. दि. ९ सप्टेंबर ते ७ ऑक्टोबर हा

चार आठवड्यांचा काळ म्हणजे या मोहिमेतील आणीबाणीचाच काळ. या काळात अहद काय काय म्हणाला, त्याने कशी कशी पावले टाकली, याचे बारिकसारीक तपशील सुदैवाने उपलब्ध आहेत. त्याला रणक्षेत्रावरील डावपेच काय किंवा माणसांना सांभाळून घेणे काय, काहीच जमत नसे. वस्तुस्थितिनिष्ठ राजकारण समजण्याची अपात्रता व वरचेवर पालटणारी अपरिपक्व चंचल वृत्ती हे सारे त्याची अकार्यक्षमताच प्रकर्षाने स्पष्ट करतात. इतरांबरोबर वागताना त्याचा दावेदार नजफ याच्याजवळ स्वच्छ दूरदृष्टी होती, वृत्तीतील खंबीरपणा होता व हमखास यशस्वी ठरणारी चतुरता होती. ह्या पार्श्वभूमीवर आपल्या सल्लागारांच्या सांगण्याने वा स्वतःच्या लहरीपणामुळे आपले बेत वारंवार बदलणारा मूर्ख अहद अगदीच बेतासबात वाटतो व नजफ कितीतरी उठून दिसतो. या मोहिमेत अबदुल अहदची दोन उद्दिष्टे होती. सोनीपत जिल्ह्यातील बादशहाचा मुलूख परत मिळविणे व पानिपत आणि अंबाला भागांत जे असंख्य शीख सरदार सत्ता बळकावून बसले होते त्यांच्याकडून खंडणीची रक्कम वसूल करणे. हे कसे व्हायचे ? त्याबाबत अहदने योजले होते ते असे. त्याने कोणत्याच वर्गात बसविता येणार नाही अशी जी अर्ध्याकच्च्या शिपायांची पलटण उभी केली होती त्याच्या जोडीला काही पगारी शीख सरदारही होते. त्यांच्याच मदतीने त्यांच्या जातभाईंना पिळून काढायचे त्याने ठरविले होते. पतिआळाच्या राजाशी त्याचे जे वितुष्ट आले त्यामुळे त्याच्या उद्दिष्टात आणखी गोंधळ उडाला. जाट सरदारांना दुसऱ्याचा प्रदेश बळकावण्याची मुळातच हाव. अलाजाटच्या मुलांना तसली हाव होतीच. त्याशिवाय त्यांच्या स्वतःबद्दल फार मोठ्या कल्पना होत्या. ती विलक्षण घमेंडीत असत. त्यांचा मुलूख त्यांना मिळाला होता त्याशिवाय विजयी दुराण्याकडून अमरसिंगाला किताबही मिळालेला. मग घमेंड नसती तरच नवल. सतलजअलीकडील मुलखात नाव घेण्यासारख्या प्रत्येक शीख सरदारावर त्याने हात उगारलेला होता; परिणामी ते सरदार त्याच्याविरुद्ध असत. अमरसिंगाच्या मते कैथाळचा राजा भाई देसूसिंग अगदी किरकोळ होता. तो त्याला आपली खंडणी देण्याच्या लायकीचा मांडलिक समजे.

अमरसिंगाच्या निमंत्रणावरून अबदुल अहद उत्तरेकडे गेला असूनही त्याला स्थानिक शीख सरदारांच्या साहाय्याने आपले स्वीकृत कार्य पार पाडायचे होते. त्यामुळे नको ती अडचण उभी राहिली. रोख रक्कम हातात पडली तरच स्थानिक शीख आपुलकी दाखवीत. त्यांचा मासिक तनखा वेळच्यावेळी दिला नाही किंवा त्यांच्या प्रमुखाकडे खंडणीची रक्कम मागितली म्हणजे ते लगेच निघून जात. बादशहाच्या नावाचा दरारा व त्याच्या मुलाचे आगमन यांचा प्रभाव पडून आपल्या शत्रूंचा निकाल लावता येईल या कल्पनेने अमरसिंगाने बादशहाच्या या नायब वजिराला बोलावून घेतले. अहदने देसूसिंग-सारख्या अन्य शीख सरदारांशी समझोता केला, जरूर लागेल तेव्हा त्यांना संरक्षण देण्याचे कबूल केले, त्यामुळे पतियाळाचा राजा अहदवर संतापला. वास्तविक पतियाळाच्या राजाच्या निमंत्रणावरून अहद तिथे आलेला असल्याने त्या कामी आलेला प्रचंड खर्च वसूल करण्याचा एकमेव मार्ग म्हणजे त्या राजाविरुद्धच युद्ध पुकारणे हा होता.

अशा परिस्थितीतही बादशहाच्या या मुखत्याराला यश व म्हणण्यासारखा पैसाही वसूल रता आला असता. त्यासाठी खंडणीची अवाच्या सवा रक्कम मागत बसण्यापेक्षा वसूल रता येईल एवढीच रक्कम त्याने मागावयास हवी होती. दरबारात बादशहाचे कृपाछत्र भलेला लाघवी व मिष्ठास वाणीचा वरदहस्त असलेल्या या माणसाला, सरहिंद प्रांतातील स्परविरोधी व गुंतागुंतीच्या राजकारणात अगदी नाकातोंडात पाणी गेल्यासारखे झाले. ाने नजफखानसारखे एक ठाम धोरण ठेवायला हवे होते. त्याऐवजी राजकीय कामकाजात ाने वैयक्तिक रागलोभ आणले, आपल्या धोरणात वरचेवर बदल केला आणि परिस्थिती ाणखीच बिघडवून टाकली.

कैथाळचा राजा भाई देसूसिंग हा अबदुल अहदची भेट घेण्यासाठी कर्नाळच्या छावणीत बला होता. तो व अन्य शीख सरदार अहदला व राजपुत्राला मानाचा मुजरा करायला आलेले ा शकुनीवृत्तीच्या गजपतसिंगाचा सल्ला मानून त्याने देसूसिंग व अन्य शीख सरदारांना द केले" (१२ सप्टेंबर). या कल्पनातीत घटनेने सर्व शीख सरदारांचा बादशाही सत्ते-चा विश्वास उडाला व त्यानंतर संशयग्रस्ततेने ते अहदपासून चार पावले दूरच रहायला गले. अहदने देसूसिंगाकडे प्रथम तीन लाखांची मागणी केली; देसूसिंगने दोन लाख यचे मान्य केले, त्यावर या नायब वजिरांनी हा आकडा पाच लाखांवर नेला. शेवटी थाळचा प्रमुख दिवाण पुढे झाला, त्याने सव्वासहा लाख द्यायचे मान्य केले. त्या मोबद-ात बादशहाच्या हुकुमाने देसूसिंगला त्याची सर्व मामलत परत मिळावी व त्याच्यावर तियाळाच्या राजाचे आक्रमण होऊ नये अशी मागणी केली.

आपल्या सैन्याचा खरोखरी आवाका किती, याची अहदला जाणीव नव्हती. तो स्वतः हंमन्य व उद्दाम प्रवृत्तीचा. सरहद्द प्रांत जिंकण्याचा पराक्रम केला असता तर या दोषां-ही 'कवतिक' झाले असते. त्याचा भाऊ अबुल कासीम हा १७७६ मार्चमध्ये अंत-ीत चालून गेला होता, त्यावेळी त्याचा पराभव होऊन तो ठार झाला होता. या घटनेत ूसिंगचा हात म्हणून अहदचा त्याच्यावर राग होता. त्यामुळे 'तुझा सर्व मुलूख शाही ुखाला जोडून टाकीन' असा दम तो देसूसिंगला एखाद्या दिवशी द्यायचा, तर अबुल ासीमच्या पराभवानंतर त्याच्या तोफा व छावणीतील मालमत्ता देसूसिंगने लुटली होती ाची दुसऱ्या एखाद्या दिवशी मागणी करायचा; तसेच मागील चार वर्षांत बादशहाने जी डणी बसविली होती ती मागायचा (अखबरात, २५० बी).

अमरसिंग हा शाही फौजांचा प्रमुख आधार; पण तो स्वतःच शाही छावणीपासून दूर ता. अबदुल अहदला देण्यासाठी त्याचा दिवाण, सावकाराची पाच लाखांची हुंडी घेऊन ला (१३ सप्टेंबर). मात्र अमरसिंगाची अट एवढीच की शाही फौजांनी परत फिरताना तियाळा मुलुखात कसलाही उपद्रव न देता निघून जावे. या पाच लाखांशिवाय पात-हाजाद्याची भेट झाली त्या आनंदाप्रीत्यर्थ आणखी पंचवीस हजाराचा नजराणा द्यायचे ाच्या दिवाणाने मान्य केले. पण अहद संतापून उत्तरला, "मी येथे आलो ते तुम्ही लावणे धाडलेत म्हणून. मी जेवढा खर्च केला आहे तेवढा सगळा पैसा, तुमच्याकडून

जमेल व शक्य असेल त्या मार्गाने मी वसूल करून घेईन हे पक्के समजून असा." '(अखबरात् ; २४९ ए). 'अमरसिंगाने स्वतः येऊन आपल्याला भेटले पाहिजे' हा अहदने आपल्या प्रतिष्ठेचा प्रश्न केला होता. राजाच आला पाहिजे या अहंकाराने त्याला इतके ग्रासले होते की, त्याची खंडणी त्याच्या दिवाणाकडून घ्यायला त्याची तयारी नव्हती. उगाच कटकट न करता शाही फौजा निघून जाव्यात म्हणून दिवाणाने खंडणीची रक्कम सात लाखांपर्यंत वाढविली तरीही अहदची समजूत पटेना. देसूसिंगची हालत नजरेसमोर असल्याने शाही छावणीत पाऊल टाकायला अमरसिंगाची तयारी नव्हती. तो आपल्या राजधानीतून चक्क पळून गेला. बचावासाठी मागे राहिले ते त्याची पत्नी व तिचा भाऊ महासिंग. अमरसिंगाने आपला माणूस पाठवून जसासिंग, तारासिंग, घेबा व सतलजपलीकडील शीख सरदारांकडे मदत मागितली. स्वामिनिष्ठ गजपतने अमरसिंगाच्या वतीने हमी दिली. पण बादशहाच्या या लाडक्या सल्लागाराने कोणतीही व्यवहार्य सूचना वा विनंती मानायचीच नाही असे ठरविले होते (अखबरात, २५४ ए). मोठ्या मस्तीतच तो पतिआळावर चालून गेला, तेथील किल्ल्याला त्याने वेढा दिला व सैन्याला सर्व मुलुखाची नासधूस करायला सांगितले. पतिआळाच्या राजाने खंडणी भरपाईसाठी पाठविलेली हुंडीही रागाच्या भरात त्याने टरकावून टाकली व अमरसिंगाने एकदा तरी स्वतः यायलाच पाहिजे, असा दुराग्रह धरला. या बेजबाबदारपणाचा परिणाम व्हायचा तोच झाला.

मुख्य शाही फौजांचे नेतृत्व राजपुत्र फरकुंडा बख्त व नायब वझीर अबदुल अहद यांच्याकडे होते. त्यांच्याच हुकमतीखाली या फौजांनी कर्नाळपासून वायव्येस वळसा घालून दि. २३ सप्टेंबरला पहोवा येथे छोटी सरस्वती नदी ओलांडिली व दि. २८ ला ती गुऱ्हामच्या रोखाने चालू लागली. गुऱ्हाम हे पतिआळाच्या ईशान्येस पंधरा मैलांवर आहे. शाही फौजेचा मुख्य तळ गुऱ्हामलाच ठेवला होता. आघाडीला असलेले शीख सैन्य व काही मुगलिया स्वार यांना पतिआळा व सभोवतालच्या मुलुखात धाड घालण्यासाठी पुढे पाठविण्यात आले. या सैन्याने काही काळ आपली कामगिरी नीट बजावली; कारण अमरसिंगाच्या साहाय्यार्थ आलेल्या सैन्याने या लूटमार करणारांना पळवून लावले. सतलज-पलीकडे तारासिंग, घेबा व जे आणखी काही शीख सरदार होते ते आपल्या १५ हजार समर्थ घोडेस्वारांसह अमरसिंगाच्या मदतीला धावून आले होते. त्याच वेळी अबदुल अहद-कडे जे सैनिक होते ते सतलजअलीकडील मुलुखातून आलेले व भाडोत्री. त्यांचा पगार थकला होता व थकलेला पगार हाती पडेपर्यंत या मोहिमेत भाग घ्यायला त्यांनी स्वच्छ नकार दिला (अखबरात्, २६५ बी). अहद व अमरसिंग या दोघांशीही मैत्रीचे संबंध असलेले काही शीख होते. त्यांनी या दोघांत तडजोड करायचा प्रयत्न केला व पुष्कळ नाकदुऱ्या काढल्यावर पतिआळा येथे जाऊन अमरसिंगाचे मत वळवायला ते तयार झाले (५ ऑक्टोबर). राजा अमरसिंगाने भेटायला यायचे मान्य केले व भेटीचा दिवस ठरवून त्यानुसार तो आपल्या राजधानीतून बाहेर पडला; पण वाटेतूनच माघारा फिरला. शेवटी शिल्लक राहिला तो एकमेव मार्ग म्हणजे सरळ सरळ लढाई करायची.

ानुसार अहदने आपल्या फौजेतील एक सुसज्ज तुकडी पतिआळावर हल्ला करायला रवाना ली. दि. ७ रोजी ही तुकडी व पतिआळा सेना यांच्यात तुंबळ युद्ध झाले. अमरसिंगाने घार घेतली व तो किल्ल्यात जाऊन बसला. विजयी शाही सैन्याने पतिआळाबाहेर पाच ांवर आपले तंबूडेरे टाकले व त्यांनी पतिआळाच्या किल्ल्याला वेढा घातला (अखबरात्, ६७ ए, २७०).

दोन दिवस दोन्हीकडून तोफांच्या फैरी उडत होत्या. त्यांचा उपयोग होत नसल्याने कदम हल्ला चढवावा असे राजपुत्राने सुचवूनही तेवढी धडाडी व शहाणपणा अहदजवळ सल्याने लढाईने पलट खाल्ली. परिस्थिती शाही फौजांविरुद्ध जाऊ लागली व त्यांच्या ावणीत कमालीची अंदाधुंदी माजली. " तुर्क व अफघाण (पैकी अफघाणांची मिजास बिताने वाढविलेली) यांच्यातील आपापसातील हेव्यादाव्याने आमच्या सैन्यात बंडाळ्या रू झाल्या. आपल्या शिपायांच्या पगाराला पैसे नाहीत म्हणून मुगलिया घोडदळातील गाझी-ान व अन्य सेनाधिकाऱ्यांनी लढायचे नाकारले. अहदचा सर्वांत आवडता हरमतखान निही गोंधळ घातला. तारासिंग पतियाळाच्या राजाच्या मदतीसाठी आल्यावर, राजपुत्राने ामच्या फौजांकडून लढायला आणलेले बहुतेक शीख सरदार एकाएकी अमरसिंगकडे ले. त्याच्या प्रचंड संपत्तीचाच हा प्रभाव" (गुलामअली खंड ३, १३४).

अबदुल अहदची अवस्था या वेळी 'दे माय धरणी ठाय' अशी होती. दि. १४ ऑक्टोबरला अगदी पहाटेसच त्याने पतिआळा परिसरातून माघार घ्यायला सुरुवात केली. शिखांनी त्यांचा पानिपतपर्यंत पाठलाग केला; पण भागासिंग व अन्य काही बादशहानिष्ठ शिखांनी पिछाडीस राहून आपल्याच शीख बांधवांशी निकराचा सामना दिला.[८] अहद सात-याने सैन्याबरोबर होता. हत्तीवर बैठक मारून माघार घेणाऱ्या आपल्या सैन्याची तो शांत-णे पहाणी करीत होता. माघार घेणाऱ्या या सैन्याला आपले संरक्षण करण्यास तोफ-ान्याचा चांगला उपयोग झाला व आपल्याभोवती घिरट्या घालणाऱ्या चपल स्वारांना यांनी चांगले तोंड दिले. माघार घेत घेत शाही फौजा पानिपतपर्यंत आल्यावर शिखांनी यांचा पाठलाग थांबविला. अखेरीस वैतागलेल्या व त्रासलेल्या शाही फौजांना त्या दिवशी री विश्रांती मिळाली. मग ते सगळे ५ नोव्हेंबरला दिल्लीस परतले.

६. दिल्ली दरबारातील भयग्रस्त वातावरण, रक्षणासाठी मिर्झा नजफला आमंत्रण.

अबदुल अहदची शिखांवरील ही अर्धवट मोहीम पूर्णपणे अयशस्वी झाली. त्यामुळे दिल्ली दरबारात भलतेच अनिश्चिततेचे वातावरण पसरले. अपयश पदरी घेऊन अबदुल अहदने स्वतःची कबर स्वतःच खणली होती. बादशहाचे खास दूत तातडीची बातमी घेऊन दिल्लीत धावत आले. वार्ता विलक्षण अस्वस्थता निर्माण करणारी; 'दोनच दिवस झाले, राजपुत्राने युद्धातून माघार घेतली असून तो पतिआळाहून परतत असून लाखो शीख स्वारांचा त्याच्याभोवती गराडा आहे.' या दुर्वार्तेने दरबारात निराशा, काळजी व चिंतेचे वातावरण पसरले. खास बादशहाचे म्हणून असलेले एकुलते एक सेनादल जवळजवळ संपुष्टात आल्या-

सारखे व्हावे व इतक्या दूर अंतरावर आपल्या मुलावर लाजिरवाणा प्रसंग यावा ही नाही म्हटले तरी शरमेची गोष्ट होती. त्यानंतर कोणीच अडवायला नसलेले बंदुकधारी शीख स्वार दक्षिणेकडे येऊन, दिल्लीच्या रक्षणासाठी समर्थ सेना नसल्याने दिल्ली काबीज करतील ही भीती होती. या काळोखात आशेचा एकमेव लकलकता किरण म्हणजे मिर्झा नजफ. मिर्झाजवळ प्रचंड सामर्थ्यवान सेना व अतिशय हुशार सेनाधिकारी होते; त्यावेळी तो दक्षिणेकडे मोहिमेत गुंतला होता. त्याने बादशहाच्या साहाय्याला तातडीने यावे म्हणून त्याच्याकडे तितक्याच तातडीचे निरोप पाठविण्यात आले. निरोप मिळताच आपले सैन्याच्या बाहेर असलेल्या तुकड्यांना त्यांनी तातडीने बोलावून घेतले, तसेच आपापल्या जहागिरीच्या गावी असणाऱ्या अधिकाऱ्यांनाही निरोप धाडले. सर्व सैन्य जमा झाल्यावर तो दिल्लीला यायला निघाला. ही बातमी अबदुल अहदला समजताच छावणीतील सगळे काम बाजूस सारून राजपुत्रासमवेत तो दिल्लीत दाखल झाला. मिर्झा नजफ दिल्लीत येऊन बादशहाला भेटायच्या आत आपण स्वतः बादशहाला भेटायचे व त्याच्याविरुद्ध काहीतरी सांगायचे एवढेच त्याला करता येण्यासारखे होते.

नोव्हेंबर, १७७९ च्या सुरवातीस अबदुल अहदखान दिल्लीत परतला. आर्थिकदृष्ट्या दिवाळखोर, लष्करी कारवाईत पूर्णतया अयशस्वी व मानमरातब हरवून बसलेला अहद या अपयशाने बादशहाच्या मर्जीतून उतरला नसता तरच नवल. त्याने नजफला बाजूला सारून ही मोहीम अहदकडे हेतुतः सोपविलेली, अहदच्या अपयशाने त्याला चीड येणे स्वाभाविक होते. पण अबदुल अहद खरा हिकमती. आपल्या मिष्टास वाणीने त्याने बादशहाच्या अंतःकरणात स्वतःबद्दल पुन्हा आपुलकी निर्माण केली. 'आपल्या लाडक्या चिरंजीवांना वाचवता वाचवता कोण कष्ट पडले व सैन्य माघारी आणताना काय काय व व कशा कशा कसरती कराव्या लागल्या' याचे रसभरित वर्णन करून त्याने आपल्या कर्तृत्वाचा खूपच डिंडिम वाजविला. इतकेच करून हा मधाळ कश्मिरी उगीच बसला नाही. नजफबद्दल त्याच्या मनात किंतू उत्पन्न करून त्याने बाजी मारली. त्याने बादशहाच्या मनात असे भरवून दिले की दिल्ली शहर व स्वतः खाविंद हे नजफवरच विसंबून राहिले तर नजफ काय करणार नाही? हाताशी असलेल्या प्रचंड सेनाबलावर सय्यदबंधूंप्रमाणे एका बादशहाला काढून दुसऱ्याला तिथे आणणे ही आपली महत्त्वाकांक्षा तो सहजी पूर्ण करू शकेल; तेव्हा पूर्वीच विदित केलेला हा धोका विसरून चालण्यासारखे नव्हते. अहदच्या सुदैवाने बादशहाच्या मनावर त्याचा परिणाम झाला. त्याने नजफला असा हुकूम धाडला की पहिला हुकूम रद्द समजून त्याने दिल्लीत येऊ नये. हा दुसरा हुकूम नजफच्या हातात पडला तेव्हा दिल्लीत पोहोचायला त्याला दोनच दिवस राहिले होते. या हुकुमाकडे दुर्लक्ष करून तो दिल्लीची वाट चालतच राहिला. दि. १२ नोव्हेंबर रोजी दक्षिण बाजूकडील उपनगरात कृष्णदास तलावानजिक त्याने आपला तंबू टाकला.

अबदुल अहद अगतिक झाला. आपल्या वरचढ प्रतिस्पर्ध्याशी मैत्रीचे नाटक करणे एवढा एकच पर्याय त्याच्यासमोर उरला. नजफने तळ टाकला होता त्याठिकाणी बाद-

शहाचा प्रतिनिधी म्हणून १४ नोव्हेंबरला राजपुत्र अकबरशहासमवेत अहद स्वत: गेला. नजफचे आगतस्वागत करून त्याला मानाने दरबारात आणणे हे काम अहदलाच करायचे होते.[१] किल्ल्याच्या आत व वेशींवर अहदचे शिपाई, अहदचा जावई कुतुबुद्दिन खान याच्या हाताखाली देखरेख करीत होते. नजफच्या माणसांना त्यांची अवहेलना होईल अशी कोणतीही वागणूक द्यायची नाही, असे या सैनिकांना बजावण्यात आले होते. नजफ स्वत: आधी आलाच नाही. त्याने आपला शूर सेनानी अफ्रासियाब खान याला बरोबर हजार स्वार व दोन पलटणी देऊन पुढे पाठवले. ही सगळी सेना किल्ल्याच्या प्रवेशद्वारी आली व तेथील संरक्षकांशी धक्काबुक्की करीत जमेल तसे गटागटाने आत घुसली. हातघाईवर यायचे नाही अशी ताकीद, तसेच वरिष्ठांची अनुपस्थिती यामुळे काय करावे हे न समजून संरक्षक शिबंदीत थोडाफार गोंधळ झाला. किल्ल्याच्या विस्तीर्ण प्राकारात आपले सर्व सैनिक जमा झाले, असे दिसताच अफ्रासियाबखानाने अबदुल अहदच्या माणसांना किल्ल्याबाहेर मेंढरासारखे हाकलून दिले. 'लाल पलटण' म्हणून ओळखले जाणारे बादशहाचे खास संरक्षक पथक सरळपणे बाहेर निघत ना. त्यांच्या थकलेल्या पगाराची रक्कम त्यांना हवी होती. थोडाफार पैसा देऊन अफ्रासियाबने त्यांच्या प्रमुखांची समजूत घातली व बाकी आश्वासनांचीच खैरात केली. अशाप्रकारे दिल्ली किल्ल्याचा आतील भाग संपूर्णपणे नजफच्या कबजात आला.

मग बक्षी मिर्झा नजफ आपल्या छावणीतून बाहेर पडला व राजपुत्रासमवेत त्याच्याच हत्तीवर बसून किल्ल्यात आला. मात्र राजपुत्र गादीचा वारस, आपण नोकर, ही जाण ठेवून अंबारीत तो राजपुत्राच्या मागील बाजूस बसला. किल्ल्यात दरबार भरल्यावर त्याने बादशहाला शंभर मोहोरा नझर केल्या व त्याची चरणधूली आपल्या मस्तकी लावली. बादशहाने खूष होऊन त्याला मिठी मारली, शिरपेच व मानाची वस्त्रे दिली व त्याचा स्नेही झबिताखान याचाही उचित असा सन्मान केला.

७. अबदुल अहदची बडतर्फी व कैद

दरबार बरखास्त झाला. मिर्झा नजफने बादशहाचा निरोप घेतला. दरबारच्या दालनातून अबदुल अहद बाहेर आला व मोठ्या माणसाला दारापर्यंत सोबत करावी तसा त्याच्याबरोबर प्रवेशदारापर्यंत आला. नजफचा साहाय्यक अफ्रासियाबखान व त्याचा वकील मणीराम हे दिवाण-ई-आमबाहेर नजफची वाट पाहत होते. अहदला ताबडतोब पकडावे म्हणजे यापुढे तरी तो कसलीही हलकट कारवाई करू शकणार नाही, असे ते दोघे त्याला सांगत होते तरी नजफने त्याला नकार दिला. बादशहासमोर असे काही घडावे हे त्याला योग्य वाटत नव्हते. सय्यद बंधूंप्रमाणे वागून तसा बदलौकिक करवून घ्यावा असे त्याला वाटत नव्हते. "आपल्या प्रतिस्पर्ध्याच्या हातात हात घालून अबदुल अहद दरबाराच्या प्रवेशद्वारातून बाहेर आला, तेव्हा नजफच्या माणसांचे चेहरे व एकंदर परिस्थिती काही वेगळीच दिसत होती, आपण शत्रूच्या कचाट्यात सापडलो हे तो समजून चुकला.

तो घाबरला व भयचकित होऊन इकडे तिकडे बघू लागला. त्याचा स्नेही लताफत अलीखान याला या बनावाचा वास आला असावा. बादशहाचा निरोप घेऊन तो झटदिशी उठला व दरबारदालनाबाहेर येऊन नजफ व अहद यांच्यामध्ये उभा राहिला; अहदचा हात नजफच्या हातातून सोडवीत त्याने तो स्वतःच्या हातात घेतला. ही मोलाची संधी हातची दवडू नका असे अफ्रासियाब पुनःपुन्हा सांगत होता; पण याही वेळी नजफने ते ऐकले नाही. आपल्या शिपायांना त्याने अफ्रासियाबच्या नेतृत्वाखाली किल्ल्यातच ठेवले व स्वतः मात्र एकटाच बाहेर आला आणि विश्रांती हवी म्हणून रोशनउद्दौलाच्या मशिदीत जाऊन बसला."

ती सर्व दुपार व रात्र अहद दिवाण-ई-आमच्या प्रवेशद्वाराशी बसून होता. अफ्रासियाबचे शिपाई त्याच्यावर पाळत ठेवीत होते तर त्याचे स्नेही व बादशहाचे नोकर त्याच्या रक्षणासाठी सिद्ध होते. अहदचे भवितव्याबाबत बादशहासमोर 'भवति, न भवति' चालली होती. आपल्या पहिल्या मानाच्या सेवकाविरुद्ध असा गदारोळ उठवला जावा, हे बादशहाला पसंत नव्हते. तो अत्यंत नाराज होता व यात नोकरापेक्षा आपलाच अपमान असे त्याला वाटत होते. मौलवी अताउल्ला व राजा मणीराम हे नजफची बादशहावर केवढी भक्ती आहे, तो किती एकनिष्ठ आहे आणि खाविंदांना किती मानतो हे पुनःपुन्हा पटवून देत होते. पण बादशहाने अहदची सिंहासनावर केवढी निष्ठा आहे हे सांगून त्याला नजफच्या हवाली करायचे साफ साफ नाकारले. त्यानंतर मिर्झा नजफने मिर्झा शफीखानला बादशहाकडे पाठविले. अबदुल अहदचे सर्व कर्तृत्व राजद्रोह व विश्वासघात याने कसे बरबटलेले आहे याचा शफीखानने बादशहासमोर पाढाच म्हणून दाखवला. ती सर्व कर्मकटकट ऐकण्याऐवजी बादशहाने आपला मुखडाच दुसरीकडे वळवला व 'बादशहाचे मित्राला हात लावण्याचा अगोचरपणा करू नकोस असे आपल्या मालकाला सांग' असा खरमरीत निरोप शफीबरोबर पाठवला.

शफीखान निघून गेला. नदीकडील बाजूला किल्ल्याचा जो दरवाजा होता तिथे नजफचे शिपाई नव्हते. या दरवाजातून आपले सैन्य आत आणण्यास परवानगी द्यावी असे लताफत अलिखान त्याला पुनःपुन्हा विनवीत होता. लताफतचे सैन्य आत आले असते म्हणजे बंदुका चालवून नजफच्या उपटसुंभ सैनिकांना बाहेर हाकलून काढणे जड नव्हते. त्यासाठी त्याला बादशहाची परवानगी हवी होती. नेहमीप्रमाणे घाबरट स्वभावामुळे काय करावे याचा निर्णय करणे बादशहाला जमेना. दरम्यान अहदचे पाठीराखे, किल्ल्याबाहेर व किल्ल्याखाली नदीकाठावर गटागटाने जमत होते. जेथे जेथे नजर पोहोचू शकत होती तेथे तेथे सैनिकांची गर्दी झालेली दिसत होती. बादशहांची स्वारी चवताळून उठली. अंगात चिलखत चढवून त्याने धनुष्य उचलले. हा धनुष्यबाणांचा सरंजाम सहज उचलता येण्याजोगा असून खास अंतःपुरातून पाठविण्यात आला होता. शाही स्वारीला प्रोत्साहन द्यायला त्यांच्या आवतीभोवती जनानखान्यातल्या राजकन्यांनी व खोजांनी गर्दी केली होती. नजफच्या माणसांना हाकलून देतो असे बादशहा तारस्वराने सांगत

होता. धनुष्यबाण हातात घेऊन खुद्दांची स्वारी पराक्रम करायला निघाली खरी, पण दिवाण-ई-आमपर्यंत पोहोचले न पोहोचले तोच त्यांना कापरे भरले. त्यांच्या भोवतालचा मेळावा हाही भेकडांचाच. त्यांनी सल्ला दिला, 'महाराजांनी आत जावे. नजफच्या लोकांना हे समजले तर त्यांचा आपल्याबद्दलचा आदर नाहीसा होईल.' महाराजांना सल्ला मानवला. ते परत आपल्या शयनमंदिरात येऊन विसावले. बाहेरची गडबड थंडावली व मध्यस्थांची गडबड पुन्हा सुरू झाली. नजफखान बाहेर रोशनउद्दौलाच्या मशिदीत ठाण देऊन होता. तिथूनच माणसे पाठवून बादशहाला तो पुनःपुन्हा नम्रपणे सांगत होता की, 'अहदला किल्ल्याबाहेर खेचण्याची आम्हाला फक्त परवानगी द्या.' सूर्य अस्ताला जाईपर्यंत असेच चालले होते. नजफ पुनःपुन्हा परवानगी मागत होता व बादशहा तितक्या वेळा नकार देत होता.

नजफने हुकूम केला. त्याप्रमाणे त्याच्या शिपायांनी आपले घोडे किल्ल्याबाहेर काढून छावणीकडे लावून दिले. ते स्वतः मात्र किल्ल्यात राहून डोळ्यात तेल घालून रात्रभर खडा पहारा देत होते. काय घडतंय यावर त्यांचे बारीक लक्ष होते. दिल्ली शहरात रात्रभर भीती व गोंधळ होता. "प्रलयकाळ यावा तसा प्रत्येक घरातून व गल्लीतून भीतीचा चीत्कार उठत होता. नजफची माणसे किल्लाभर पसरली होती. अहदचे लोक, रक्तपात होणार या ठाम समजुतीने किल्ल्याबाहेर तटापलीकडे नदीकाठावर प्रचंड घोळका करून उभे होते. किल्ल्यात प्रत्यक्षात काय घडतंय याची कुणालाच माहिती नव्हती"

(इब्रत : भाग २, ९–१२)

आपल्या आवडत्या अहदच्या जीविताला धोका तर पोहोचणार नाही, या भयाने त्या रात्री बादशहाप्रमाणेच अंतःपुरातील कोणाच्याही डोळ्याला डोळा लागला नव्हता. बादशहाच्या हुकुमाप्रमाणे राजघराण्यातील सर्व मुली, दिवाण-ई-आमच्या अलीकडील दालनात जमल्या, अहदला मधे बसवून त्याच्या सभोवताली सर्वांनी कोंडाळे केले. हेतू हा की अहदला एकदम उचलून नेऊन गिरफदार करणे अशक्य व्हावे. पण असे किती काळ चालणार ? नजफच्या कारवाया व त्याचा पैसा काम करू लागला. अहदचे पाठीराखे त्याला सोडून नजफकडे यायला लागले व त्याच्या गोटात त्यांचे भरघोस स्वागत होऊ लागले. अबदुल अहदचे काम फसणार, त्याचा अगदी पचका होणार हे उघडउघड दिसू लागले. लताफत अली व मीरसयद अली हे दोन त्याचे सेनाधिकारी; तेही त्याला सोडून नजफकडे आले. तेव्हा तणावातली एकूण हवाच निघून गेली. अहदने प्रतिकार थांबवला व 'आपण पूर्णपणे शरण येण्यास तयार आहोत' असे नजफला कळवून टाकले. 'अहदसारख्या उत्पाती आगलाव्याला शाही परिवारातून हाकलून काढायचा' एवढाच आपला माफक उद्देश असल्याने आपण त्याचा प्राण वा मालमत्ता याला धक्का लावणार नाही, असे मीर-बक्षी नजफने शपथेवर सांगितले. त्यानंतर अहद बादशहाला भेटला, त्याने गहिवरून त्याचा निरोप घेतला व अफ्रासियाबखानाच्या सैनिकांच्या संरक्षणात नजफच्या छावणीत जाऊन त्याच्यासमोर उभा राहिला. नजफने त्याच्यासाठी स्वतंत्र तंबू ठोकला. तिथे सर्व सुखसोयी व स्वास्थ्य उपलब्ध होते (१५ नोव्हेंबर).

८. मिर्झा नजफ सर्वोच्च मुखत्यार होतो

विरोधाचा शेवटचा काटाही संपूर्ण निपटला गेला. मिर्झाच्या कर्तृत्वाला सर्व क्षेत्र 'निर्वीरमुर्वीतलम्' झाले. बादशहांच्या खास बोलावण्यावरून तो त्यांच्यासमोर हजर झाला (१६ नोव्हेंबर). बादशहाचे उतराई होण्यासाठी त्याने बादशहाला बहुमोल नजराणा दिला. रोकड दोन लाख रुपये, व जवाहिरांनी भरलेली काही तबके दिली. त्या शिवाय त्याच्या बहिणीच्या वतीने उंची कापडांचे वीस पोशाख व पाच अबलख वारूही त्यात होते. आपल्या आवडत्या अहदबद्दल बादशहाच्या अंतःकरणात जो थोडाफार ओलावा उरला होता तोही या सुवर्णभाराखाली दडपून गेला. बादशहाने नजफखानची 'वकील-ई-मुतालिक' या उच्चपदावर नेमणूक केली. अबदुल अहदने आणखी काही खात्यांचे उच्चाधिकार स्वतःकडे ठेवले होते, त्यातही फेरफार करण्यात आले. नायबबक्षीपदावर पातशहाजादा जहांदरशहाची नेमणूक करण्यात आली. तोफखान्यावरील सर्वाधिकारी म्हणून राजपुत्र फरखुंडाबख्तला नेमले. दरबारात कोणाकोणाला बोलवायचे हे ठरविणारा अधीक्षक व खालसा मुलुखातील दिवाणी अधिकार कुणाला द्यायचे हे ठरविणारा अधिकारी म्हणून अकबरशहाची नियुक्ती झाली. वास्तविक नजफखान हा वरील तिन्ही राजपुत्रांच्या हाताखालचा; पण प्रत्यक्षात मात्र तोच सर्वेसर्वा झाला. कोणालाही कसलाही परवाना द्यायचा असो, त्यावर नजफचा सहीशिक्का असे. सर्व सनदांवर वझिराच्या सहीशिक्क्याची गरज असे; पण वझिरासाठी व त्याचा साहाय्यक म्हणून प्रत्यक्षात तेही काम तोच पाही.

बादशहाच्या दिल्ली शासनात आता एकतंत्री सुसूत्रता आली. एकाच सत्ताकेंद्रातून वेगवेगळी धोरणे जाहीर होत, तो गोंधळ आता संपला. सर्वांत लक्षात येण्यासारखी चांगली बाजू म्हणजे साम्राज्याच्या कारभारात सर्वोच्चपदी असलेला माणूस, हा निदान ज्याच्या हाताखाली दणकट सैन्य व कर्तबगार सेनाधिकारी आहेत असा अनुभवी व जाणकार लढवय्या होता.

या बदलाचा सुपरिणाम लगोलग दिसून आला. एक वरिष्ठ अधिकारी म्हणून मिर्झा नजफ स्वतः दिल्लीत राहू लागला. भूतपूर्व वझीर कमरुद्दीनखान याची हवेली अजमेरी दरवाज्यानजीक होती. त्याच ठिकाणी नजफ राहू लागला व अबदुल अहदसारखाच दररोज दरबारात जाऊ लागला. आपल्या हाताखालील सेनाधिकाऱ्यांना त्याने निरनिराळ्या मोहिमांवर धाडले. अंतर्वेदीत वरील अंगास व सोनिपत–पानिपत भागात जे शीख बंडाळी माजवीत होते त्यांच्या बंदोबस्तासाठी मिर्झा शफी, अंतर्वेदीत मध्यभागात बादशहाचे जे शत्रू होते त्यांच्या विरुद्ध अफ्रासियाब, आग्रा व जाट मुलुखातील जाटांविरुद्ध मुहमद बेग हमदानी व मेवात आणि शेखावती येथील बंडखोरांविरुद्ध नजफ कूलीखान या प्रमाणे त्याचे सेनाधिकारी रवाना झाले. अखेरीस दिल्लीत अंतर्गत शांतता व सुव्यवस्था आली. बादशहाच्या सैन्यातील सैनिक उमद्या चारित्र्याचे, लष्करी डावपेचात तज्ज्ञ व नजीब उद्दौलाच्या काळाची आठवण करून देणारे असल्याने राज्याबाहेर शांतता राखणे अवघड नव्हते. तमाहस्प खान (मिस्किन) हा मुगलिया घोडदळात अधिकारी होता. आयुष्याच्या सुरु-

वातीला त्याने खूप हाल सोसले, भ्रमंती केली व त्यानंतर आपल्या बायकामुलांसमवेत आपले पुढील आयुष्य दिल्लीत वैभवात व सुखात घालवले. आपल्या वेळचा काळ, त्याने आठवणी लिहून स्मृतिरूप केला आहे. पुढील शब्द ग्रथित करताना त्याला केवढा आनंद झाला असेल ते आपण समजू शकतो. तो लिहितो, "दिल्लीतील सर्व थरांत सर्वसाधारणपणे सुखासमाधानाचे वातावरण दिसत असे. प्रत्येक कुटुंबात लग्नसमारंभ व मंगल सोहाळे उत्साहाने साजरे होत. शहरातील सर्व भागात खरेदीविक्रीचे व्यवहार कटकटी-शिवाय चालत. नव्या इमारती उठत. त्यांची खरेदीविक्री होई. ही सर्व सुखे व संतोष यांचे सर्व श्रेय मिर्झा नजफच्या उदार आणि कार्यक्षम कारभाराला होते. तुराणी, इराणी आणि हिंदुस्थानी अशा सर्व थरांतील प्रमुख सरदार समृद्ध व सुखी जीवन जगून आपली भरभराट करून घेत होते" (पृष्ठ, ३४४).

पण विधिलिखित असे की, हा सुखाचा काळ टिकायचा होता तो अवघा दोन वर्षे आणि चार महिने !

टीपा : प्रकरण ३०

ष्ठ	टिपेचा क्रमांक	
०७	१	**मिर्झा नजफची जाटांविरुद्ध तिसरी मोहीम : डीसी, इब्रत :** भाग १, ३१७, ३४५–३४७, **गुलामअली :** खंड ३ : ११८–१२०, **मिस्किन :** ३२५.
०७	२	दि. २० मे, १७७८ : मसिए व्हिझाज लिहितो, 'नजफखान अजूनही लछमनगडला वेढा घालून आहे.' (बार्बे, २४७).
०९	३	**इब्रत :** भाग १, ३४७ मधील माहितीप्रमाणे खुशालीराम (बरोबर नांव दौलतराम) हलदिया हा जयपूर दरबारातून पळून जाऊन माचेडी राजाचा मुख्य दिवाण झाला होता. त्यानेच आपल्या नव्या धन्याला कर्ज परत न करण्याचा दुष्ट सल्ला दिला होता.
१०	४	**माचेडीचा रावराजा प्रतापसिंग याचा उदय व त्याच्या नजफशी लढाया : डीसी, इब्रत :** भाग १, ३१३–३२१ ; ३४७–३५३ ; **गुलामअली :** खंड ३ ; ११८, १२०–१२५ ; **मिस्किन :** ३३५ (थोडक्यांत माहिती) **वंशभास्कर,** खंड ५.
११	५	**अबदुल अहदची नजफविरोधी कारस्थाने : बादशहाचा जयपूरला प्रवास : इब्रत :** भाग १, ३१६–३१९ ; ३५३–३५७

गुलामअली : खंड ३, १२१–१३० ; **मुन्नालाल :** २०७–२१५, मिस्किन : ३३९ ; **डीसी :** (तपशील)
नजफखानने माचेडीविरुद्ध केलेल्या हल्ल्यांबाबत एप्रिल १७७९ पासून, कोणत्याही फार्शी कागदपत्रात काहीही माहिती आढळत नाही. **सीपीसी :** खंड ५, १५६८ यात मात्र त्या बाबतीतील दिल्लीहून २६ व २९ जुलै रोजी लिहिलेल्या बातमीत थोडीफार माहिती मिळते.

११३ ६ **अबदुल अहदची पतिआळा मोहीम :** ब्रिटिश म्यूझिअम. ओरिजिनल २५,०२१ व त्या नंतरची, २४६ बी–२७० बी (९ सप्टेंबर–७ ऑक्टोबर, १७७९ या अवधीतील प्रत्यही घडणाऱ्या घटना); **मिस्किन :** ३४०–३४२ (स्वतः हजर होता); **डीसी; इब्रत :** भाग २, १–५, **गुलामअली :** खंड ३; १३२–१३६, **मुन्नालाल :** २१६–२२०; **सीपीसी :** खंड ५, क्रमांक : १५६८, १५०९ (मे महिन्यापावेतो अहदने ३०,००० शिपाई उभे केले होते) **डीवाय :** भाग १, लेखांक २४ (झबिता घाबरून तटस्थ राहिला.)

११५ ७ रात्रीच्या वेळी गजपतासिंगाने अहदला खाजगीत सांगितले, " देसूसिंगकडून पैसे काढणे अवघड आहे. एक राजकीय डाव म्हणून आपण माझ्यासह सर्व सरदारांना अटक करावी; त्यानंतर आम्हाला सोडून द्यावे व खंडणीची रक्कम येईपर्यंत देसूसिंगाला डांबून ठेवावे ". मजदुद्दौलाने (पाचही सरदारांना) आपल्या शामियान्यात बोलावून घेतले व नंतर, त्या सर्वांना अटक केली. त्यानंतर ताजमुहमद खान सांगतो त्यानुसार गजपत व आणखी (तीन) सरदारांनी खंडणी द्यायचे मान्य केले; मग फक्त देसूसिंगशिवाय बाकी सगळ्यांना सोडून देण्यात आले (अखबारात; २४९ बी).

११७ ८ मुगल सैन्य बचावले याचे कारण पातशहाजादा स्वतः तिथे होता हेच. बादशहाच्या नावाचा दबदबा तोपर्यंत सर्वस्वी संपलेला नव्हता. त्यामुळेच पातशहाजाद्यावर हल्ला करण्याची धिटाई शिखांनी दाखविली नव्हती. त्यांनी फक्त लूट करण्यात समाधान मानले. मुळातच चुकलेल्या व चुकीच्या पद्धतीने लढल्या गेलेल्या या मोहिमेत अबदुल अहद एकटा असता तर तो या मोहिमेतून जिवंत परत जाता ना.

११९ ९ **अबदुल अहदचा पाडाव : डीसी; इब्रत :** भाग २, ७–१६; **गुलामअली** खंड ३, १३६–१३९; **मुन्नालाल :** २२२–२२५; **मिस्किन :** (स्वतः हजर होता) ३४२–३४४

प्रकरण ३१ वे

मिर्झा नजफची कारकीर्द, त्याचे अपयश

१. अधिकारप्राप्तीनंतर नजफखानचा नैतिक अधःपात

दिल्लीदरबारातील मुखत्यार म्हणून मिर्झा नजफने दोन वर्षांहून थोडा अधिककाळ कारभार पाहिला. हा काळ म्हणजे १९ नोव्हेंबर, १७७९ ते ६ एप्रिल, १७८२ म्हणजे त्याचा मृत्यू होईपर्यंत. या काळात तो सतत दिल्लीतच मुक्काम ठेवून होता. प्रवासदौरा किंवा लष्करी मोहिमा यासाठी दिल्ली सोडून तो एकदाही बाहेर जाऊ शकला नाही. राजपुताना येथे बादशहा वा निदान त्याच्या एखाद्या मुलासमवेत जाऊन खंडणी वसूल करावी असे दोन वेळा ठरलेही. एकदा मार्च, १७८० व दुसऱ्यांदा त्याच सालच्या ऑक्टोबर मध्ये. पण कधी बादशहाची तबियत बरी नाही तर कधी शाही इतमामाला शोभेल अशा थाटात जाण्याइतकी रक्कम तिजोरीत नाही म्हणून हा दौरा त्या त्या वेळी रद्द झाला. त्यानंतरचे वर्षात बादशहाचा लाडका मुलगा अकबरशहा याची शादी व्हायची होती; शाही इतमामाला शोभेल असा थाटमाट व अवाढव्य खर्च होणार ! या बाबतीत काय करायचे याची तयारी करण्यात पहिले सहा महिने गेले. १७८१ च्या ऑगस्ट महिन्यात नजफच्या प्रकृतीने पलटी खाल्ली. तो आजारी झाला व दिवसे दिवस बळावत जाणारा आजार वर्षाअखेर तोंडचे पाणी पळवणारा राजयक्ष्मा ठरला. १७८२ सालातील पहिले तीन महिने तो अंथरुणातच दिवस मोजीत होता, प्रत्यक्षात असून नसल्यासारखाच. म्हणजे मुखत्यार म्हणून त्याने प्रत्यक्ष काम केले, ते जेमतेम वीस महिने, म्हणजे ११ डिसेंबर, १७७९ या दिवशी तो कमरुद्दीनच्या हवेलीत रहायला गेला त्या दिवसापासून ऑगस्ट, १७८१ च्या सुरवातीपर्यंत. या काळात त्याने दोनच मोहिमा हाती घेतल्या. पहिली मूर्तझाखान बारक व महबूब अलिखान या उभयतांनी मिळून केलेली जयपूरकडील चढाई (एप्रिल १७८० ते फेब्रु. १७८१) व दुसरी मिर्झा मुहमद शफीची शिखांविरुद्ध चाललेली मोहीम (फेब्रु. १७८० ते १७८२). या दोन्हींची माहिती पुढे येईलच.

नजफखानचा अंतर्गत कारभार व अजूनही बादशहाच्या लहरीनुसार चालणारा दरबार, दिल्ली राजधानी व अन्य मुलूख यातला व्यवहार या बाबतचा दैनंदिन तपशील उपलब्ध आहे. अशी साडेआठ महिन्यांची वृत्तांतपत्रे मिळाली असून यातील तपशीलवार माहिती विश्वसनीय आहे. मुसलमानांच्या इतिहासात अन्य कोठेही इतकी खात्रीची व विश्वासार्ह माहिती मिळत नाही. या माहितीची एक हजाराहून अधिक पृष्ठे भरतील एवढी फारशी भाषेतील हस्तलिखिते आहेत. याचे पुनर्लेखन क्लॉड मार्टिन याने केले असून लखनौ येथील ब्रिटिश संग्रहालयात ते जपून ठेवण्यात आले आहे. (ओरिजिनल, २५०२० व

२५०२१) या कागदातील वरील काळासंबंधीचा तपशील इतका वैशिष्टयपूर्ण व बोलका आहे की त्यापुढील काळातील असे तपशील उपलब्ध नसले तरी त्याबाबत आपण केलेल्या अंदाजात जराही चूक होणार नाही. ही कागदपत्रे नीट नजरेखालून घातल्यानंतर नजफ-खानाचा स्वभाव, दुर्बल बादशहा व त्याचे कुटुंबीय यांची द्रव्याअभावी होणारी कुचंबणा, प्रजेला भोगावी लागलेली दुःखे, यांच्यावरील आपत्ती व सैन्यातील बेदिली यावर झगझगीत प्रकाश पडतो आणि एक नागरी अधिकारी म्हणून मुखत्यारपदावर काम करण्यास नजफ कसा कुचकामी होता हे समजून येते.

नशीब काढण्यासाठी म्हणून इराणातून आलेला एक एकाकी, गरीब पण धाडशी जवान; दिल्लीतील उच्चपदस्थ मानकऱ्यांत त्याचे ना कुणी नात्याचे ना गोताचे. या शिया-पंथीयाला ममतेने जवळ करणाराही कुणी नव्हता; हिंदुस्थानातील त्याचा एकमेव नातेवाईक म्हणजे अयोध्येचा नबाब. त्याने तर नजफचा हयातभर द्वेषच केला. असा हा नजफ वयाच्या अवघ्या बेचाळिसाव्या वर्षी हिंदुस्थानातील मुसलमानी साम्राज्याचा सर्वेसर्वा झाला. या श्रेष्ठ पदावर तो आरूढ झाला तो केवळ अंगभूत गुणांच्या पाठिंब्यावर. मुसलमानी साम्राज्याच्या अखेरच्या काळात जे निःसत्त्व व नामर्द अधिकारी निपजले त्यांच्या सर्व-सामान्य कर्तृत्वाच्या पार्श्वभूमीवर नजफचे कर्तृत्व चांगलेच उठून दिसते. मिर्झा नजफचा हा उदय नेत्रदीपक व ' या सम हा ' असा असला तरी त्याची अखेरी मात्र दगड होऊन पडलेल्या उल्केसारखी झाली.

शाही शासनाचा सर्वोच्च अधिकारी म्हणून नजफला दिल्लीतच रहावे लागे. दिल्ली त्याला लाभली नाही हेच खरे. या शहराने दोन वर्षांच्या अवधीत त्याचे शरीर व त्याची उज्ज्वल कीर्ती खाऊन टाकली. खाण्यापिण्यात अतिशय संयमी अशा या शिपाईगड्याला अपेयपान वा निषिद्ध वासनाशमन कधी माहीत नव्हते. दिल्ली दरबारात सर्वाधिकार मिळाला आणि हा माणूस खासगी जीवनात नबाबाचे सुखविलासी भोग भोगू लागला. परिस्थितीचा अंदाज घेण्याची अचूक ताकद, अविरत श्रम या आपल्या अंगभूत गुणांनी पाश्चिमात्य राजकारणपटूंच्या कौतुकाचा विषय झालेला मिर्झा नजफ आता सुस्त झाला. आजचे काम उद्यावर टाकण्यासाठी नव्यानव्या सबबी शोधण्यातच त्याचे कौशल्य खर्ची पडू लागले. एखादी गोष्ट हातून होणार नाही असे दिसताच भरघोस आश्वास-नांची खैरात करण्यात तो चांगलाच निर्ढावला. त्याच्या अधःपतनाला लताफत अलिखान हा कारण झाला. हा लताफत खोजा व शियापंथी असून एकेकाळी अयोध्येच्या नबाबाकडे सेनाधिकारी होता. या लताफतने नजफची एका मोहक व मादक बाईशी गाठ घालून दिली. वास्तविक ही बाई, लताफतची लग्नाची बायको, पण बदनाम. नजफशी परिचय होताच तिने त्याला पूर्णपणे आपल्या कवटाळात ओढले. सुरवातीला ती, खानपानादी विलासी मैफलीत हरकामी मदतनीस म्हणून काम करीत असे. लवकरच ती नजफची प्रियपात्र बनली व त्याच्या तशा प्रकारच्या इतर भोगदासींत तिला पट्टराणीचा मान मिळू लागला. नजफसारख्या मुखत्याराचे दिवस आणि रात्री, धंदेवाईक गायिका आणि नर्तिका यांच्या

सहवासात खर्ची पडू लागल्या. मेजवानीच्या निमित्ताने बहुतेक वेळ तो बाहेरच असे. त्यावेळी लताफत वा तसलेच मतलबी त्याच्या भोवती असत. मेजवानीनंतर रात्री खूप उशीरापर्यंत मद्यपान व नृत्यगायन यांचा जल्लोष उडे. या बाबतच्या त्याच्या कर्तृत्वाच्या बातम्या रोजच्या रोज लखनौला पाठविण्यात येत.[१] त्यात त्याच्या असल्या नादांचे उल्लेख, कंटाळा येईपर्यंत वाचायला मिळतात.

मदिरा आणि मदिराक्षी यांच्या अतिरेकाने नजफखानाचे ओज आणि ताकद भराभरा खालावू लागली. १७८०, १७८१ व १७८२ या तीन वर्षांच्या कालावधीत दिल्लीत कमालीची अस्वच्छता व रोगराई होती. या सर्व कालखंडात राजघराण्यातील आजार व बालमृत्यू यांचा उल्लेख वरचेवर आढळून येतो. नजफखानचे यापूर्वीचे आयुष्य मोकळ्या मैदानावर लढाईच्या धामधुमीत व छावणीतील खडतर जीवनास तोंड देण्यात गेलेले. त्यावेळी दणकट असलेली त्याची प्रकृती दिल्लीतल्या बैठ्या कामाला व रोगट हवामानाला तोंड देताना ढासळली. हा बदल त्याला मानवला नाही अशी तक्रार त्याचे स्नेही-सोबतीही करू लागले. ऑक्टोबर १७८० पासून त्याला प्रकृतीचा त्रास वरचेवर होऊ लागला. तो सारखा आजारी पडे. निष्णात हकीम व वैद्यांनी त्याला जिवावरच्या आजारातून वाचवले. मित मद्यपान करण्याचा वैद्यकीय सल्ला त्याने कधीच मानला नाही. त्याचा परिणाम असा झाला की अनेक बलाढ्य शत्रूंना तोंड देणारा हा शूरजवान ऑगस्ट, १७८१ त बारीक तापाच्या पकडीत सापडला. त्याची परिणती म्हणजे त्याला क्षय होऊन पुढील एप्रिलमध्ये त्याचा झालेला अकाली मृत्यू होय.

नजफखानने जाट व रोहिले यांच्यावर हल्ला करून त्यांना जेरीस कसे आणले हे ज्यांनी वाचले आहे त्यांना त्याच्या जीविताची ही विदारक हकीगत अविश्वसनीय वाटेल पण तत्कालीन अस्सल कागदपत्राच्या आधारे या सेनानीचा हा अधःपात विश्वसनीय मानावा लागतो. गोवळ कोंड्याचा अबदुल्ला कुतुब शहा व लखनौचा वजीद अलि शहा यांच्या सारख्या विषय खातेऱ्यात लोळणाऱ्या क्षुद्र कीटकाप्रमाणे नजफनेही तसल्याच क्षुद्र व क्षणिक सुखोपभोगात गर्क होऊन रहावे हा दैवदुर्विलास होय. याबाबत पुढील उदाहरण पुरेसे बोलके आहे. "दि. ४ व ५ जून १७८१ अमीर–उल–उमराव मिर्झा नजफखान सहज गंमत म्हणून सहलीसाठी वझिराबादला (म्हणजे दिल्ली किल्ल्याच्या उत्तरेस असलेले वझीरपूर) गेला होता. बरोबर सर्व जनाना व लताफतअलीची स्वारी होती. त्याचे खास शामियाने नदीतीरी होते. जवळच टरबुजे, काकड्या व कलिंगडाचे वेल होते. चार घटका रात्र झाली अन मिर्झाजींना काय लहर आली कुणास ठाऊक ? त्यांनी जनानखान्यातल्या सर्व बायांना हुकूम केला, 'जा, आत्ता जा आणि इच्छा होईल तेवढी खरबुजे, कलिंगडे, काकड्या घेऊन या. खुशाल नासधूस करा.' त्यानंतर मध्यरात्र उलटून जाईपर्यंत नाचगाणे चालले होते, ते दुसऱ्या दिवशी सकाळी दहा वाजेपर्यंत. नंतर ती टरबुजे वगैरे आपल्या दिल्लीतल्या घरी पाठवून द्यावीत म्हणून हुकूमही झाला (ओरिजिनल : २५,०२० पृष्ठ ३१२).

२. अव्यवस्था व कारभारातील शैथिल्य, तिजोरीत खणखणाट : सर्वगामी झळ

नजफखानच्या सुखोपभोगाची व्यवस्था करणे हे लताफतअलीचे काम. एकप्रकारे त्याच्या सुखोपभोगाच्या खात्याचा हा कारभारी प्रत्यक्षात राज्याचा मुखत्यार म्हणून शासनाचा सर्व कारभार जवळजवळ स्वतःच पाहू लागला. लताफतचे लोक त्यांच्या मनास येईल तसे वागू लागले, त्यांनी केलेल्या जुलुमजबरदस्तीविरुद्ध खुद्द नजफखान वा असहाय बादशहाकडे तक्रार केली तरी दाद लागत नसे. नजफखानच्या मुगलिया घोडदळातील सैनिक दिल्लीच्या वायव्येस रहात. त्यांच्यासाठी एका उपनगराची खास सोय असून त्या भागाला मोगलपुरा म्हणत. तिथे रहाणारे हे सैनिक जकात अधिकाऱ्यांना कवडीचीही किंमत देत नसत. शिपायांना तर ते ओळखीतच नसत. या जकात अधिकाऱ्यांना व शिपायांना ते बेदम पिटीत व तक्रार झाली तर गुन्हा माफ करवून घेत. त्यांच्या मोहोल्यात राहणारे बादशहाचे आश्रित व नोकरही त्यांच्या कृपाप्रसादातून सुटत नसत. हे सैनिक या आश्रितांची व नोकरांची चीजवस्त लुटून त्यांची मानहानी करीत. त्याबद्दल खुद्द शहाअलम तक्रार करी, त्याचा परिणामही शेवटी पालथ्या घड्यावर पाणी, असाच होत असे. साम्राज्याचा मुखत्यार सुखविलासात गर्क असताना साम्राज्याची शासनयंत्रणा कोलमडली होती. शहाअलमने तक्रार केली की, 'मिर्झा नजफच्या निष्काळजीपणामुळे कारभारात शैथिल्य येऊन राज्ययंत्रणा खिळखिळी झाली आहे. पगार न मिळाल्याने सैनिक वैतागून निघून जात आहेत' तसेच 'नजफखानच्या अखत्यारीतील सर्व मुलुखात अव्यवस्था आहे; तरी तो खानपानादी व्यसनात दंग असून लताफतअलीवर पूर्ण विसंबून आहे. राज्यात जो सावळागोंधळ माजला आहे त्यावर काही उपाय केला पाहिजे असे त्याला अजूनही वाटत नाही. लताफतने त्याच्यावर इतकी मोहिनी घातली की, तो म्हणेल त्या गोष्टीला हो म्हणायची त्याची तयारी असते' (कित्ता : पृष्ठ २६० व ३०२).

कामोपभोगात आकंठ बुडून अविरतपणे नवे नवे विलास शोधणारा मिर्झा, राज्य-कारभाराकडे दुर्लक्ष करू लागला. कारभाराची सर्व सूत्रे त्याने हाताखालचे कश्मिरी दिवाण व शिया खोजांवर सोपवून दिली. हे दिवाण व खोजे मन मानेल तसे वागू लागले. साम्रा-ज्यातील दिल्लीच्या कारभारात ही जी बेबंदशाही माजली त्याचा दुष्परिणाम आम जन-तेला भोगावा लागला. खुद्द दिल्लीतील प्रजा त्याला अपवाद नव्हती. शेतकरी तर फारच गांजून गेले. दाद मागायची तर दाद घेणारा कोणी वरिष्ठ अधिकारी नव्हता. शेवटी हे शेतकरी एकत्र झाले व वैतागून स्थानिक महसूल अधिकाऱ्यांशी तंडू लागले. त्यांना दडपून टाकून त्यांची खेडी लुटण्यासाठी शाही फौजांची रवानगी करण्यात आली. त्यामुळे पुढील कितीतरी वर्षे शेती महसूल खंडित झाला. या बाबतीत प्रत्येक प्रकरणातील बारिकसारिक तपशील तपासून अतिशय धोरणीपणाने व मुत्सद्देगिरीने त्या त्या तक्रारीचे न्याय्य निवारण करायला हवे होते. पण ... त्या काळी दिल्लीत या गुणांची अपेक्षाच नव्हती. त्यात भर म्हणून १७८० पासून हिंदुस्थानातील वरील भागात दुष्काळाने आपले हातपाय पसरण्यास सुरवात केली. पाऊसच पडला नाही तर पिके उगवणार कोठून ? दुष्काळी परिस्थितीशी

इमान राखून धान्य व वैरण यांचे भाव भडकत होते. साम्राज्याचे नोकर, सैनिक व स्वार यांना पगार द्यायला सरकारी तिजोरीत छदाम नव्हता. खुद्द बादशहा, त्याचा अवाढव्य जनानखाना, या आधीच्या बादशहांचे नातू, पणतू, खापरपणतू यांनी गजबजून गेलेल्या किल्ल्यातल्या असंख्य सलातनी, राजवाड्यातील हरकामी नोकर व संरक्षक शिबंदी, सगळ्यांचीच उपासमार होऊ लागली. या सर्व अपेशाचे खापर फोडण्यात आले ते मिर्झा नजफच्या मस्तकावर. त्यात बादशहाचे काही चुकतही नव्हते. अबदुल अहदच्या जागी सत्तेवर येताना कुराणावर हात ठेवून मिर्झा नजफने अशी शपथ घेतली होती की बादशहाच्या चरितार्थासाठी लागणारा पैसा आपण आपल्या कश्मिरी प्रतिस्पर्ध्यापेक्षा अधिक नियमितपणे देत जाऊ. बादशहाने नजफखानच्या या आश्वासनावर पूर्ण विश्वास टाकला होता. त्यानुसार पैसे पुरविण्यात नजफखान, पूर्वी कधी कशात नव्हे, इतका अयशस्वी ठरला होता. त्यातूनच असाहाय्य अशी परिस्थिती उद्भवली.

अशा प्रकारे आर्थिक अडचणीत असताना मिर्झा नजफला असे वाटले की भरपूर पैसे घ्यावेत व त्या बदल्यात अबदुल अहदला तुरुंगातून सोडवून त्याची स्थावर व जंगम मालमत्ता त्याला परत द्यावी. तसे ठरून नजफ कूलिखानला मध्यस्थ करण्यात येऊन त्याच्यावर ही कामगिरी सोपविण्यात आली, आणि स्वाभाविकच, अहद, सुटका होत असेल तर चार लाख रुपये द्यायला तयार झाला. परंतु आपल्या दुष्मनाला आपल्याच हाताने मोकळा करून आपणच आपल्यावर संकट ओढवून घेणे बरे नव्हे, असा नजफच्या कश्मिरी दिवाणांनी त्याला सल्ला दिला. नजफचा बेत बदलला. नजफ कूलीखानाला मात्र मधल्यामध्ये तोंडघशी पडल्यासारखे झाले. जयपूर राजाकडून याबयाच्या खंडणीबाबतही त्याने अशीच धरसोड वृत्ती दाखवली. खंडणीबाबत बादशहा व जयपूर राजा यांच्यांत जे मध्यस्थी करीत होते त्यांच्यांत आपापसात हेवेदावे होते. या मध्यस्थांच्या नादी लागून नजफने अनेक वेळा आपले बेत बदलले. शेवटी जयपूर राजाकडून खंडणीची रक्कम हाती पडली ती अपेक्षेपेक्षा खूपच कमी. नजफने सुरवातीसच व्यवहार्य असे एक धोरण कायम ठेवले असते तर जयपूर राजाशी कितीतरी आधी सलोखा झाला असता व खंडणीची योग्य पण मिळाली त्यापेक्षा कितीतरी अधिक रक्कम हाती आली असती. भाई देसूसिंगचा वारस लालसिंग याच्याकडून खंडणी वसूल करताना धरसोड व घोडचुकांनी भरलेल्या याच खेळाची पुनरावृत्ती झाली. अर्थ इतकाच की, मिर्झा नजफचा इतरांवर राहूच द्या, स्वतःवरही ताबा राहिला नव्हता.

अशा प्रकारे सगळीकडून कोंडी झाली. यातून पळवाट म्हणून नजफखानने आपला सावकार लालजीमल याच्या नावावर हुंड्या द्यायला सुरवात केली. पण नजफची सावकाराकडील पतही संपुष्टात आल्याने या हुंड्या परत येऊ लागल्या. पुढील हंगामात येणारे पीक तारण लावूनसुद्धा कोणी कर्ज देईल असा संभव नव्हता. मग दिवाळखोरी लपविण्याचा एकच मार्ग, म्हणजे टाळाटाळ, चुकवाचुकव वा थापाथापी. तोही उपाय झाला. शेवटी त्याच्या असंख्य धनकोंचा त्याच्यावरील विश्वास पार निकालात निघाला. त्यासाठी धनकोंशी

गोडगोड बोलून त्यांच्यांत स्वतःबद्दल विश्वास निर्माण करायला हवा म्हणून जे धनको व सैन्यातील अधिकारी त्याच्याबरोबरच्या तंट्याला कंटाळून पळून गेले होते त्यांना भेटून त्यांची समजूत घालण्यासाठी त्याने आपली खास माणसे पाठविली. अशा प्रकारच्या आश्वासनांची खैरातही वारेमाप झाल्याने त्यातील जादू संपून गेली होती. नुसत्या साखरपेरी आश्वासनांवर त्याच्या धनकोंचा विश्वास नव्हता. काहीतरी पुरेसे हातात पडू द्या, अशी त्यांची रास्त मागणी होती. पैसा नाही म्हणून वैतागलेले सेनाधिकारी व बादशहाची माणसे त्याच्याकडे यायची व पैशाची मागणी करायची, त्यावरून तणातणी व्हायची हा प्रकार मिर्झाजींच्या दिवाणखान्यात नित्याचाच होता. मिर्झा पैसे द्यायची टाळाटाळ करतो असे ते उघडपणे बोलत व संतापून म्हणत, "उद्या पैसे मिळतील या आपल्या बतावणीवर आमचा आता विश्वास नाही. पैसे मिळणार नाहीत असे स्पष्ट सांगून आम्हाला नोकरीतून हाकलून द्या, पण आम्ही कुणीतरी बावळट पोरं सोरं आहोत, असे समजून आम्हाला मूर्ख बनवू नका."

बादशहा त्याला पक्का खोटारडा व दगलबाज म्हणे. कधी कधी वैतागाच्या भरात त्याच्या तोंडून उघड उद्गार निघत, "अबदुल अहद हा तुझ्यापेक्षा लाखोपट चांगला. माझा तुझ्यावर विश्वास नाही आणि कधी नव्हताही !" अंतःपुरातील बायकाही अशाच निराश झाल्या होत्या. त्यांना मिळणारा त्यांचा तनखा थांबला होता. सतत डोळ्यांत पाणी आणून अजीजीने तनख्याची मागणी करायची आणि महिनेनमहिने झाले, तरी पदरात काहीही पडायचे नाही असले अपमानित जिणे जगण्यापेक्षा सगळ्याजणींनी गळ्यात गळे घालून यमुनामाईच्या डोहात जलसमाधी घेतलेली काय वाईट ? असे म्हणण्याइतकी परिस्थिती आली. दुकानदारांकडील पत संपल्याने त्यांना उधार मिळेना. शेवटी या अंतःपुरवासिनी बायांनी चक्क अन्नसत्याग्रह सुरू केला. नजफखानला पैसे देणे का जमत नाही, त्याच्या अडचणी काय, याची तरफदारी करायला त्याची माणसे येत तेव्हा त्यांच्यासमोर बादशहा, काढू नये असे अपशब्द काढी. बादशहा आपल्या आर्थिक स्थितीने इतका गांजून गेला होता की एक दिवस बोलता बोलता तो गुलाम कंबरला म्हणाला, "आज तू जेवू नकोस. काही पोटात ढकललेस तर ते डुकराचे रक्त प्यायलास असे समज. नजफच्या घरी जा. त्याच्या समोर धरणे धरून बस; आणि जनानखान्याच्या खर्चाची सर्व रक्कम हातात पडेपर्यंत उठू नकोस. तू स्वतः उपाशी रहाच, पण नजफलाही काही खाऊ देऊ नकोस." त्यानंतर एक दिवस बादशहा मौलवी अताउल्लाला म्हणाला, "माझी अवस्था इतकी कींव करण्यासारखी आहे, की मला अंगात घालायला दुसरा कपडा नाही." आपले मुलगे व पुतणे यांच्यांत बसला असताना एकदा त्याने पुढील दोन ओळींचे कवन रचले–

या विश्वाचा तारणहार
संहार करतो आहे
अखिल ब्रह्मांडाचा
नजफखान आणि अफ्रासियाबखान
यांना हाताशी धरून[२]

एक दिवस अशाच मनःस्थितीत तो ओरडून म्हणाला, "वैतागून गेलोय मी या जिण्याला ! उदरनिर्वाहापुरतेही पैसे नाहीत. डोक्यावर दिल्लीतल्या सावकारांचे व बनियांचे अफाट कर्ज. ही लाजिरवाणी अवस्था सहन होत नाही ! अल्लामिया ! घेऊन जा मला एकदा कबरस्तानात !"

शेवटी मिर्झा नजफला कळून चुकले की एवढ्या प्रचंड साम्राज्याच्या सर्वोच्च अधिकार-पदाला कवटाळण्याच्या हव्यासापायी आपल्या हातात फुटक्या करवंटीखेरीज काहीही आलेले नाही. प्रकृती खालावलेल्या अवस्थेतच तो एक दिवस दरबारात आला आणि लाजेने अर्धमेला होत बादशहाच्या पायावर डोके ठेवून मनसोक्त रडला. आपल्या दोन वर्षांच्या कारकीर्दीत राजकारणकौशल्य किंवा शासनसुधारणा याबाबत उल्लेखनीय असे त्याने काहीही केले नाही. लायक व प्रामाणिक माणसे हाताशी धरायची, आपल्याबद्दल त्यांना धाक व आदर वाटेल असे वागायचे व त्यांच्यावर योग्य तो विश्वास ठेवून त्यांच्या-कडून कामे करून घ्यावयाची एवढेही त्याला सुचले नाही. एक शिपाई म्हणून त्याच्या काळात नाव घेण्यासारखा तोच होता यात शंका नाही. पण तो फक्त शिपाईगडी म्हणूनच जगला आणि मेला.

नजफ मुखत्यार असताना त्याची नाव घेण्यासारखी एकमेव कामगिरी म्हणजे सैन्य सुसज्ज ठेवण्याबाबतची त्याची धडपड. त्याबाबत रोजची बातमीपत्रे उपलब्ध आहेत त्यावरून दिसते ते असे—नव्या व उपयुक्त तोफा ओतवून घेण्याकडे त्याचे खास लक्ष असे. याबाबत तो फार दक्ष असे [हे काम तो पाश्चिमात्य तज्ज्ञांकडून विशेषतः मसिए ल वाझोसारख्यांकडून करवून घेई]—नव्या व जुन्या तोफा व्यवस्थित काम देतात की नाही याची चाचणी तो स्वतः जातीने घेई. तोफखाना कार्यक्षम आहे ना, शिपाई रोजच्या रोज कवाईत करतात की नाही यावर त्याचे लक्ष असे. नेहमीच्या शिपायांनी बंडखोरीची भाषा काढलीच तर त्यांच्या जागी दुसऱ्या शिस्तबद्ध फौजा उभ्या करता याव्यात अशा तयारीत तो नेहमी असे. पैशाची तीव्र चणचण असतानाही नामवंत आणि अनुभवी अशा शेख कबीरची नेमणूक करण्याचा मोह त्याला आवरला नाही. पाश्चात्य पद्धतीचे खास लष्करी शिक्षण देऊन सैनिक तयार करणे हे महत्त्वाचे काम शेख कबीरकडे सोपविण्यात आले होते. त्याला उचलून द्यायला रोकड पैसा नव्हता. त्याऐवजी जहागिरीदाखल काही मुलूख देण्याचे आश्वासन देण्यात आले होते.

नजफच्या कारकीर्दीचा प्रत्येक दिवसाचा वृत्तांत लिहिताना त्या इतिहासकाराला काय दगदग झाली असेल, याची ते हजारांहून अधिक कागद वाचताना चांगली कल्पना येते. 'नजफ वाट चालतो आहे, रस्ता खाचखळग्यांचा, कंटाळवाणा, भिवविणाऱ्या साव-ल्यांनी कोंदटून गेलेला. निराश झालेल्या जीवांच्या आर्त किंकाळ्या आणि मृत्यूची प्रतीक्षा करणारे त्यांचे भग्न जीवित', ही सगळी हलाखीची परिस्थिती, या इतिहासकाराच्या मनात सदैव दळ उठवीत असावी. इतिहासाच्या या अभ्यासकाला नवल वाटले असेल ते दिल्लीची मोगलमानी सत्ता संपुष्टात आली म्हणून नव्हे, तर नजफनंतरही ती टिकली कशी,

याचेच. महादजी शिंदे याने नंतर हे ओझे आपल्या दणकट खांद्यावर घेतले याचे महत्त्वही या अभ्यासकाला समजेल. हे ओझेच महादजीला दडपून टाकण्यास पुरेसे ठरले.

३. राजशासक म्हणून मिर्झा नजफला आलेल्या आर्थिक अडचणी; कनोद किल्ल्याचा ताबा.

मिर्झा नजफची सर्वांत मोठी निकड पैशाची. अबदुल अहदचे पाठीराखे ,आपल्याला वचकून असावेत म्हणून त्याने तीस हजार शिपायांची एक पलटण उभारली. या पलटणीचे वैशिष्ट्य असे की तीमधील तोफखाना व शिपाई शिकलेले असत. हिंदुस्थानातील शिपाई व बंडखोरीनंतर शाही सैन्यात येणारे शिपाई यांना रोकड वेतनाऐवजी मुलूख लुटायला परवानगी दिली म्हणजे भागे; परंतु या खास पलटणीतील शिपायांना त्यांचा पगार, नियमित व रोख द्यावा लागे. दुर्दैव असे की त्याच्या जीवनातील देदीप्यमान क्षणी त्याच्या हातात सत्तेबरोबर शाही तिजोरी आली ती मात्र ठणठणीत रिकामी. बादशहाला फाके पडत होते. त्याच्या मर्जीतल्या काश्मिरी माणसाने अलीकडच्या पतिआळा मोहिमेत उरलीसुरली रक्कमही उडविली होती. नजफ अधिकारावर आला त्यावेळी बादशहाला व राजघराण्यातील माणसांना लागणारा पैसा आपण अबदुल अहदपेक्षा व्यवस्थित व नियमित देत जाऊ अशी शपथ घेऊन शपथप्रतीवर स्वतःची मोहोर उठवून ती कुराणावर ठेवीत त्याने बादशहाला आश्वासन दिले होते. झाले ते ठीक झाले असले तरी प्रश्न होता पैसा कोठून आणायचा ? बादशहाचा दर महिन्याचा खर्च अंदाजे दीड लाख व त्याच्या स्वतःच्या हाताखाली असलेल्या शाही सैन्याच्या पगाराला तीन लाख लागायचे. मिर्झा नजफने अखेरी जयपूर, माचेडी, अंतर्वेदी व जाट मुलुखातील मोहिमांवर जय मिळविले होते. या सर्वांनी खंडणीची रक्कम रोख न देता खंडणी द्यायची फक्त आश्वासनेच दिली होती. या आश्वासित रकमांसाठीही शस्त्रांचाच धाक हवा होता.

संपूर्ण शासनयंत्रणेचा मुखत्यार म्हणून त्याला दररोज दरबारात हजर रहावे लागत असल्याने खंडणी वसुलीच्या मोहिमेवर तो स्वतः जाऊ शकत नसे. तसेच शाही फौजांना पाठविणेही कठिणच होते. कारण शिखांच्या स्वारीचे भय हे उत्तरेवर लोंबत्या ढगासारखे होते. शीख हे अबदुल अहदचे स्नेही असल्यानेही शाही फौजा दिल्लीतच असणे जरूरीचे होते. त्याच्या हाताखालील चार सेनाधिकाऱ्यांपैकी अफ्रासियाब मध्य अंतर्वेदीत म्हणजे अलिगढला होता; मुहमद शफी अंतर्वेदीतील वरील भागात म्हणजे मीरतला होता; नजफकूली मेवात व रेवाडी येथे तर मुहमद बेग हमदानी हा आणखी एका महत्त्वाच्या कामात होता. राव प्रतापसिंग नरौका व जाट राजा, यांच्याशी त्याच्या वाटाघाटी चालल्या होत्या आणि भरतपूर-अलवार-जयपूर-सरहद्दीचा तंटा मिटला नसल्याने धोलपूर-बारी हस्तगत करणे हे कामही त्यालाच करायचे होते. या चौघांपैकी कोणाला एकालाही माघारी बोलवून घ्यायचे म्हणजे त्या त्या ठिकाणी उद्भवणारा धोका पत्करायचा. तो टाळून पैशासाठी काहीतरी नवीन मार्ग शोधून काढणे नजफला भागच होते.

लवकरच असे एक महत्त्वाचे प्रकरण उद्भवले की त्यात नजफला संपूर्ण लक्ष घालावे लागले. जयपूर हे सर्वांत मोठे व धनाढ्य राज्य. खंडणीरूपाने बादशहाला त्याच्याकडून खूप मोठी रक्कम येणे होती. जयपूरच्या गादीवर आलेल्या नव्या राजाच्या राजेपणाला खुद्द दिल्लीपतीने दि. १९ फेब्रुवारी, १७७९ रोजी स्वहस्ते टिळा लावून अधिकृत मान्यता दिली होती. त्यासाठी वारसाकर म्हणून जयपूरच्या राजाने बादशहाला वीस लाख रुपये द्यावयाचे मान्य केले होते. ही रक्कम वसूल करण्यासाठी नजफने हिंमतबहादूर गोसावी याला जयपूर येथेच रहायला सांगितले होते. त्यानंतर लगेच पावसाळा सुरू झाला. पतिआळा मोहिमेनंतर अहदला काढून त्याची सत्ता घेण्यासाठी नजफला सैन्यासह दिल्लीस परतावे लागले. त्यामुळे जयपूरकडे कोणीच विरोध करणारा नसल्याने जाट व रजपुतांनी त्याचा फायदा घेतला. जयपूरवर आणखी एकदा चालून जाणे भाग होते. कछवा राजधानीकडे नव्याने जायला हवे होते. हे काम १७८० च्या मध्यावर घेण्यात आले. त्याचवर्षीच्या सुरवातीला नजफकूलीखान नरनौल-कनोद जिल्ह्यात मोहिमेवर गेलेला होता; त्यामुळे वरील काम बरेच सोपे झाले.

नजफकूलीने नोव्हेंबर १७७९ च्या अखेरीस दिल्ली सोडली व कनोदचा राजा बलवंतसिंग याच्यावर तो चालून गेला.[३] शहा आलम येण्यापूर्वी दिल्लीत खूप बजबजपुरी होती. त्या काळात या बलवंतसिंगाने हंसीहिस्सारमधील खूपच खेडी बळकावली होती व ती सर्व खेडी नजफकूलीच्या जहागिरीच्या मुलुखातील होती. कनोद येथील किल्ल्याला वेढा घालणे हे आपल्या ताकदीबाहेरचे आहे असे त्याला वाटले. कारण कनोदच्या आसपास खूप रेताड मुलूख असून कित्येक मैलांच्या परिसरात पाणी मिळणे महाकठिण; म्हणून त्याने भेदनीतीचा अवलंब करायचे ठरविले. आपल्या कनोदच्या राजाशी सख्य करायचे आहे असे भासवून त्याला पोषक असे वातावरण व हालचाली करावयास त्याने प्रारंभ केला. त्याच्या सैन्याने त्या राजाची व्यापलेली खेडी त्याला परत देण्यात आली, व नजराणे पाठवून त्याला भेटायला बोलावण्यात आले. या निमंत्रणाला मान देऊन स्वतः राजाचा मुलगाच त्याला भेटायला गेला. त्याच्या समवेत तीस रजपूत सरदार होते. नजफकूलीने या राजपुत्राला व तीसही मानकरी सरदारांना विश्वासघाताने ठार मारले (सुमारे ४ डिसेंबर, १७७९, **डीसी**). मग नजफकूली तातडीने किल्ल्यावर चालून गेला व त्याने किल्ल्याला वेढा घातला. पाण्याचा पुरवठा असावा म्हणून त्याने उंटांचा तांडाच लावला. पाश्चात्य सेनाधिकाऱ्याच्या हाताखाली शिकून तयार झालेली फौज व बेगम समरूच्या सैन्यातील सुसज्ज तोफखाना यांची मदत नजफकूलीला अगदी ऐन मोक्याच्या वेळी मिळाली. कनोदमधील नाव घेण्यासारख्या बहुतेक सरदारांची राजपुत्रासमवेत हत्या झाल्याने नजफकूलीला जय मिळविणे अवघड नव्हते. नेहमीप्रमाणे राजपुतांनी शेवटपर्यंत निकराची झुंज दिली. त्यांना नरनौलहून मदत येण्याची आशा होती, पण मुगल सेनेतील एका तुकडीने दि. ५ फेब्रुवारीला हल्ला करून नरनौल लुटल्याने तीही मावळली. फेब्रुवारी महिना संपेपर्यंत कूलीच्या सैन्याने खंदक खणीत खणीत कनोदच्या भोवताली असलेल्या खंदकापर्यंत मजल मारली. दि. १४ फेब्रुवारीला कूलीच्या

सैन्याने कोंडाळे केले व राजा मित्रसेन अहीर याचे सैनिक असलेल्या खंदकावर हल्ला चढवला; त्यांत शंभरजण ठार झाले. त्याआधी एक आठवडा, कनोदच्या किल्ल्यातून सतरा रजपूत वीर नजफकुलीखानला ठार करून स्वतः मरून जाण्याची प्रतिज्ञा करून तळहातावर शिर घेऊन बाहेर पडले होते. त्यातला पहिलाच जवान पकडला गेला. नवलसिंग शेखावत किल्ल्यात असून फार आजारी होता. उभयपक्षांत बोलणी होऊन नवलसिंगला किल्ल्यातून बाहेर यायला परवानगी मिळाली. पालखीत बसून किल्ल्याबाहेर येऊन तो सिंघाणा येथे गेला आणि तिथेच त्याला मृत्यूने गाठले (सुमारे २४ फेब्रुवारी). राणी एकटीच किल्ला लढवीत होती. नाइलाज होऊन दि. १७ रोजी ती शरण आली. तिच्या चरितार्थासाठी म्हणून तिच्याकडे काही खेडी राहू देण्यात आली.

४. मुर्तुझाखान बरेख याचा शेखवतीवर व महबूब अलिखान याचा जयपूरवर हल्ला : १७८०

कनोदचा किल्ला हातात पडल्यावर जयपूरवरील मोहिमेसाठी मिर्झा नजफचा आत्मविश्वास आणखी दुणावला. महबूब अलिखान हा अयोध्येच्या नबाबाच्या सैन्यात मोठा अधिकारी होता. १७७३ मध्ये रामघाटात मराठ्यांनी केलेला हल्ला इंग्रजांनी परतविला होता, त्यावेळी महबूब अलिखान हा इंग्रजांकडून मराठ्यांविरुद्ध लढला होता. पुढे असफउद्दौलाची कारकीर्द अगदीच मिळमिळीत ठरली त्यावेळी वैतागून व निराश होऊन महबूबने लखनौ सोडले व दि. ४ मार्च, १७८० ला तो आग्रा येथे आला. त्याच्याबरोबर त्याचे कुटुंबीय व सहाशे शिपाई होते. त्या सर्वांचा विचार होता मक्केला जाण्याचा. असा निष्णात सेनाधुरीण धार्मिक यात्रेपायी फुकट घालवणे बरोबर नव्हते. महबूब वैतागून मक्केला जातो आहे हे नजफला कळताच खूप मोठी रक्कम देण्याचे प्रलोभन दाखवून त्याने महबूबला ठेवून घेतले. आपल्या बोलण्यावर त्याचा विश्वास बसावा म्हणून आपला सहीशिक्का असलेली कुराणाची प्रत त्याला भेट दिली. महबूब तयार झाला. त्याला आपले सैन्य स्वतःच उभारावयाचे होते; त्यानंतर वसूल होणारी खंडणीची रक्कम व युद्धात मिळणारी लूट यातून शिपायांचे पगार भागवायचे होते. त्याच्या नाममाहात्म्यामुळे बरेच धाडसी तरुण सैन्यात भरती झाल्याने त्याची सैन्यभरती पुरी झाली.

हिमतबहादूर जयपूर येथे असल्याला वर्ष होऊन गेल्यानंतरही तेथील राजाकडून खंडणीची आश्वासित रक्कम त्याला वसूल करता आली नव्हती. तेथील गादीवर एक पंधरा वर्षांचा अजाण पोर होता. त्याला मार्गदर्शन करून त्याच्यावर वचक ठेवायला कोणी जुना, शहाणा दिवाणही नव्हता. आपल्या लहरीनुसार तो काय हवे ते करी.[४] जुना दिवाण खुशालीराम बोहरा हा तसा धूर्त. त्याने गोडगोड बोलून व राजकारणी डावपेच लढवून रावराजा आणि मीरबक्षी या दोघांनाही जयपूरवर हल्ला करण्यापासून परावृत्त केले होते. याच दिवाणाने १७७९ च्या फेब्रुवारीत बादशहाबरोबरही समझोता केला. राज्याच्या भल्यासाठी त्याला बरेच वेळा जयपूरबाहेर जावे लागे. अशा वेळी आपला मदतनीस

म्हणून जयपूर दरबारात त्याने दौलतराम हलदिया याची नेमणूक केली होती. हा दौलतराम माचेडीच्या राजाचा दिवाण असून तिथून तो पळून आला होता. हलदिया कृतघ्न असल्याने त्याने जयपूरच्या दुर्बल व पोरसवदा राजावर आपली छाप बसवून उपकारकर्त्या खुशालीरामवर फंदफितुरी व लबाडीचा आरोप ठेवला व त्याचे दिवाणपद स्वतः बळकावले. खुशालीराम जयपूरला परत आल्यावर राजाने त्याच्यावर अफरातफरीचा आरोप ठेवला. त्याचे हिशेब चोख नसल्याचे सांगितले व त्याला अंबरच्या किल्ल्यात कैदेत ठेवून त्याच्याकडून एक लाख रुपये मागितले. दौलतरामची कारकीर्द औट घटकेचीच ठरली. १७८० त जीव वाचविण्यासाठी तो जयपूरहून पळाला व दिल्लीस जाऊन नजफच्या आश्रयास राहिला. त्याच्या जागी जयपूरच्या राजाने रोडाराम नावाच्या कुणा सर्वसाधारण शिप्याला आपला तारक देवदूत मानून दिवाण नेमले. जयपूरच्या राजाकडून कबूल केलेली खंडणीची रक्कम हातात पडण्याची मुळीच आशा नाही अशा अर्थाचे हिंमतबहादुरचे पत्रही नजफला त्याचवेळी मिळाले.

जयपूरवर दुहेरी हल्ला चढवायचे ठरले. त्यासाठी प्रचंड सैन्य जमविण्यात आले. आपल्या अफघाण व बलुची सैन्यासह मूर्तझाखान बरेख याने उत्तरेकडील मार्गाने शेखवती-मधून जाऊन जयपूरवर उत्तरेकडून हल्ला चढवायचा; त्याच वेळी मुहमद अलिखान याने दक्षिणेकडून यायचे असेही ठरले होते. हिंदौन व लालसोटमार्गे आग्र्याहून पश्चिमेकडे जाऊन तो जयपूर रोखाने येणार होता व कछवा राजधानीवर दक्षिणबाजूने हल्ला चढविणार होता. महबूब दिल्लीहून मे महिन्याच्या सुरवातीस निघाला; निमकहराम दौलतरामला सर्व स्थानिक परिस्थिती ज्ञात असल्याने तो महबूबला मार्गदर्शन करीत होता. लष्करी प्रशिक्षण घेतलेल्या शिपायांच्या पाच तुकड्या (काही पाश्चात्य अधिकाऱ्यांकडून शिक्षण घेतलेल्या), तोफखाना व हजार स्वार एवढी सेना महबूबजवळ होती. त्याशिवाय त्याचे स्वतःचे शिपाई व अधिकारीही होतेच. त्याची व हिंमतबहादुरची बयाणा येथे गाठ पडली. तेव्हा अधिक श्रेष्ठ कोण यावरून दोघांत तंटा झाला. सर्व सैन्याने महबूबच्या नावाचा एकमुखाने जयघोष केला. रागावलेल्या हिंमतबहादुरला तिथेच सोडून आपल्या सैन्यासह महबूब, जयपूरच्या रोखाने चालू लागला. त्याचा कूच करण्याचा झपाटा मोठा. ठिकठिकाणी यश घेत तो चालला होता. त्यावेळी जयपूरची परिस्थिती फाटाफुटीची असल्याने वाटेत त्याला कोणीही, कुठेही अडथळा केला नाही, कोणी केलाच तर तो फार काळ टिकला नाही. मार्गक्रमण करीत असताना भराभर मुलूख घेणे, जयपूरच्या पूर्व व पश्चिम भागातील गावांची लूटमार करणे, गढ्या हस्तगत करणे हे तो करीतच होता. झळई, भंडारज, वासीतोडा, लालबाडी, चात्सू आणि वाटका यासारखी काही ठाणी त्याने जिंकली. दि. २० ऑक्टोबरला तो कछवा किल्ल्याच्या प्रवेशद्वाराशी येऊन थबकला. जयपूरच्या राजाने स्वतःला त्या किल्ल्यात बंदिस्त करवून घेतले होते. बरोबर त्याच वेळी त्याचा सहकारी मूर्तझाखान हा शेखवतीमधून श्रीमाधवपूरला आला. श्रीमाधवपूर हे जयपूरपासून उत्तरेकडे चाळीस मैलांवर आहे

दरम्यानच्या काळात राजा सवाई प्रतापसिंग अगदीच हवालदील झाला होता. कैदेत टाकलेल्या खुशालीरामला त्याने बंदिवासातून मुक्त केले व त्याच्याकडे पूर्वीप्रमाणे दिवाणकीचे सर्व अधिकार दिले (१८ ऑक्टोबर) आणि त्याला असे सांगितले की महबूब अलीला भेटून काय वाटेल ते करून त्याने तडजोड घडवून आणावी. नजफखानने बजावले असूनही महबूबखानने दौलतराम हलदियाशी तंटा केलाच. दि. २ नोव्हेंबर रोजी खुशालीरामने महबूबअलीची भेट जयपूरबाहेर त्याच्याच तंबूत घेतली, पण त्याने देऊ केलेली खंडणीची रक्कम अगदी तोकडी व धूळफेक करणारी म्हणून महबूबअलीने समझोता फिसकटवून टाकला. महबूबअलीच्या ६५०० सैनिकांना राजमुरा देऊन माचेडी राजाच्या ताब्यातील काही महाल परत घेण्याचे काम आपण त्यांना देऊ असेही जयपूरच्या या दिवाणाने सुचविले होते. त्याच्या बोलण्यातील खरेपणावर महबूबचा विश्वास बसेना. त्याला बातमी लागली होती की खुशालीराम हा रावराजाशी संगनमत करीत असून जयपूरच्या या अडचणीचे प्रसंगी त्याचे साहाय्य मागत होता. या वेळपर्यंत महबूबअली हा आपल्या सेनेचा उदरनिर्वाह लुटीत जे काय हाती येईल त्यावर करीत होता. त्यासाठी त्याला रोज नवीनवी ठिकाणे धुंडाळावी लागत. त्यानुसार तो पूर्वेस टोंक (जयपूरच्या दक्षिणेस पन्नास मैलांवर) येथे चालून गेला; तेथून मलारना (रणथंबोर किल्ल्याचे उत्तरेस अठरा मैल) येथे जाऊन त्याने ७ नोव्हेंबरला गढी (बहुश: किरणी) काबीज केली. ही गढी ठाकूर शंभुसिंगाच्या मालकीची होती. त्यानंतर त्याने मलारनाला वेढा घातला. त्याच्या फौजांनी बारवाडा (रणथंबोर किल्ल्याचे पूर्वेस वीस मैल) घेतले (९ नोव्हेंबर). मानसिंग व मिर्झा राजा जयसिंग यांच्या पुण्याईवर एके काळी दिमाखाने मिरविणाऱ्या या भागांची स्थिती कशी केविलवाणी झाली होती, याचे हृदयद्रावक वर्णन त्या काळच्या दि. १० ऑक्टोबर १७८० च्या एका मराठी बातमीपत्रात सापडते, “जयपूरवाल्यांचे बत्तीस परगणे तुरकांनी घेतले. जयपूरपासून बारा कोसांवर तुरकांची ठाणी बसली आहेत, व जागीरदारांखाली चवदा परगणे व गनिमांचे दोन एकूण अठेचाळीस गेले. बाकी खालसा चार राहिले आहेत” [महे. दर. भाग १ ला, लेखांक १९].

महबूबअलीने जयपूर राजाकडून जबरदस्तीने खंडणी वसूल करण्याचे प्रयत्न मात्र सपशेल फसले. राजा आपल्या अभेद्य किल्ल्यात सुरक्षित होता. महबूबच्या शिपायांनी उघड्या मुलुखात जमले तेवढी लुटालूट केली. शेवटी काहीच न मिळाल्याने त्यांना फाके पडू लागले. त्यांचा पगार द्यायलासुद्धा महबूबजवळ पैसा नव्हता. तेव्हा त्या रखरखीत उजाड वाळवंटात उपास पडल्याने मरून जाण्यापेक्षा तिथून निघून जाणे बरे, म्हणून त्याचे सैनिक त्याला सोडून जाऊ लागले. यातच आणखी अवमान म्हणजे जयपूर खंडणीबाबत करावयाच्या वाटाघाटीची बोलणी करण्याचे काम त्याच्याकडून काढून घेऊन पुन्हा हिंमतबहादूरकडे सोपविण्यात आले. महबूब युद्धात यश मिळवीत असला तरी खंडणी वसूल करण्याचे काम त्याला जमत नसल्याने नजफखान निराश झाला होता. नाराज झालेला हिंमतबहादूर वृंदावन येथे आपल्या जहागिरीच्या गावी जाऊन बसला होता. जयपूरच्या बाजूने

बोलणी करणारे मध्यस्थांनी वृंदावनास जाऊन त्याची भेट घेतली व आपल्या राजावरील आपत्ती टाळण्याच्या कामी त्याचा उपयोग व्हावा म्हणून त्यांनी त्याला बरीच मोठी रक्कम दिली, व त्याला दिल्लीस पाठवून दिले. त्यानुसार हिंमतबहादूर गोसावी दिल्लीत गेला; नजफखानचा सल्लागार शिवराम कश्मिरी याला पंचवीस हजार रुपये दिले व त्याच्या मध्यस्थीने त्याने नजफकडून महबूबअलीला देण्यासाठी असा हुकूम मिळवला की त्यानुसार जयपूर राजाने एकवीस लाख रुपये देण्याचे वचन दिल्यानंतर महबूबने जयपूर राजाशी तह करायचा होता. जयपूरच्या मध्यस्थांनी दोन लाख रुपये रोख दिले व बाकी राहिलेले दरमहा पंचाहत्तर हजार याप्रमाणे देण्याचे मान्य केले; त्या मोबदल्यात महबूब व मूर्तझाखान यांनी आपल्या सैन्यासह परत फिरायचे व त्यांनी घेतलेला मुलूख जयपूरला परत करायचा होता. नरनौल व हिंदोन हे दोन प्रांत वगळून बाकीचा मुलूख परत द्यायला नजफ तयार होता; कारण हे दोन प्रांत त्याला शाही साम्राज्याला जोडायचे होते.

जयपूरच्या दणकट किल्ल्यावर एकदम हल्ला करायचा व तेथील उर्मट राजाला चीची करायला लावून शरण आणायचे हा महबूबचा उद्देश; त्यासाठी त्याने दिल्लीहून आणखी सैन्य व तोफा मागविल्या. अशा प्रकारच्या प्रयत्नाने ईप्सित हाती येणार नाही हे नजफ समजून असल्याने त्याने या मागणीला नकार दिला. जयपूर किल्ल्याबाहेर आपल्या सैन्यासह तग धरून रहाणे कठिण आहे व पगार थकलेले शिपाई रोज बंडाळीची धमकी देत आहेत असे पाहून फेब्रुवारी, १७८१ मध्ये महबूब दिगला परत फिरला. बहुसंख्य शिपायांना त्याने दिग येथेच छावणीत ठेवले व तो एकटाच दिल्लीस गेला. नजफची गाठ घेऊन त्याच्याकडून त्याला पैसे मागायचे होते. मुख्त्यार नजफ भरघोस आश्वासने द्यायच्या कामात प्रवीण. पैसे नसले तरी आश्वासने तयार होती. महबूबने स्पष्टपणे सांगितले, "पगार न मिळालेले माझे सैनिक छावणी सोडून निघून जात आहेत. त्यांनी तसेच जावे, अशीच जर आपली इच्छा असेल, तर तसे स्पष्ट सांगा, म्हणजे त्या माणसांचे फुकट मरण नको!" (३ मे). दुसऱ्या दिवशी नजफने महबूबला दहा हजार रुपये दिले, पण सैनिकांच्या पगाराची थकबाकी इतकी मोठी होती की, त्या हिशेबात दहा हजार रुपये म्हणजे 'दर्या मे खसखस' असा प्रकार होता. सैनिकांच्या पगारासाठी महबूबने स्वतःचे पाच-सहा लाख रुपये खर्च केले होते. सैनिकांची नोकरीही चांगली चौदा महिने झालेली. अशा स्थितीत नजफसाठी आणखी काही करता येणे जमण्यासारखे नसल्याने महबूब आपण मक्केला जाणार अशी धमकावणीची भाषा बोलत होता. त्याचे शिपाई दिल्लीतील त्याच्या रहात्या घराभोवती घेरा घालीत व पैसे मिळावेत म्हणून आरडाओरडा करीत. काही खऱ्या, काही खोट्या सबबी, पोकळ आश्वासने व उसनी ऐट आणून नजफखानने काही काळ निभावून नेले, तरी शेवटी नको तो दिवस उजाडलाच. शेवटी २२ जूनला महबूबने नजफला सलाम ठोकला व तो अरबस्थानातील धार्मिक स्थळांना भेट द्यायला निघाला. तशा वेळीही नजफने त्याला सांगितले, 'माझ्या बहिणीसमवेत आग्रा येथे माझी वाट पहा. मी सुद्धा येत आहे.' महबूबच्या शिपायांना मूर्तझाखानच्या सैन्यात घेण्यात आले. तिथे मिळणारे वेतन

हे पूर्वीपेक्षा फारसे चांगले नसल्याने ते तिथूनही निघून गेले. परिणामी, एक उत्तम सैन्य निकालात निघाले व एक मोठा सेनाधिकारी कायमचा फुकट गेला. आपल्या थकलेल्या पगारासाठी दंगल करणाऱ्या त्याच्या शिपायांनी त्याची सर्व चीजवस्त लुटली. मक्केला जाण्यासाठी महबूब बाहेर पडला तो खरोखरीच फकीर बनून." (इब्रत भाग २, २३).

जयपूर मोहिमेत मूर्तझाखान बरोबरही होता. त्याने काय काय केले ते आता पाहू. १७८० च्या मार्च महिन्यात त्याचा पुतण्या नरनौलहून त्याच्याकडे यायला निघाला असताना, वाटेत राजपुतांनी त्याला ठार मारले व त्याची चीजवस्त लुटली. महबूबअलीच्या सैन्यउभारणीबाबत ज्या शर्ती व आश्वासने होती त्यानुसार मूर्तझाखानला सैन्य उभारायला नजफने परवानगी दिली होती. महबूबने नैऋत्येकडून कूच करायला सुरवात केली, की त्याच वेळी मूर्तझाखानानेही आपल्या सैन्यासह पुढे जायला सुरवात करायची व उत्तरेकडून जयपूरवर हल्ला चढवायचा. त्यानुसार मूर्तझा सैन्यासह येत असताना वाटेत त्यांना शेखावत येथील राजपुतांशी तोंड द्यावे लागले. शेखावत राजपूत हे जयपूर परंपरेतले सर्वांत शूर. त्यांनी मूर्तझाचे सैन्य नरनौलपलीकडे अडकवून ठेवले. सहा तास घनघोर चकमक उडाली, खूप जण बळी पडले; शेवटी मूर्तझाने राजपुतांचा पराभव केला (२० जुलैच्या सुमारास). व तेथून पुढे पश्चिम व दक्षिण भागात सरकत उदेपूरच्या आसमंतात तो घिरट्या घालीत राहिला (उदेपूर, श्रीमाधवपूरच्या उत्तरेस २० मैलांवर आहे). हा भाग म्हणजे शेखावत मुलुखाचा गाभाच. या भागात सिकार, नवलगढ, खेत्री, सिंघाणा व अन्य जहागिऱ्यांमधून शस्त्राचा धाक दाखवून त्याने खंडणी वसूल करायचा प्रयत्न केला. दक्षिणबाजूने २० ऑक्टोबरला महबूब जयपूरच्या वेशीपाशी आला त्याच वेळी मूर्तझा, आपल्या सैन्यासह श्रीमाधवपूरच्या रोखाने चालला होता. श्रीमाधवपूर हे रिंगस या जोडस्थानकाच्या उत्तरेस आठ मैलांवर व जयपूरच्या उत्तरेस चाळीस मैलांवर आहे. पण हे चाळीस मैल अंतर तोडणे त्याच्या ललाटी नव्हते. अपयश घेऊन व कर्जाचा धनी होऊन मार्च १७८१ मध्ये तो दिल्लीत परत आला. मिर्झा नजफने या मोहिमेसाठी योजलेल्या लष्करी हालचाली व डावपेच अचूक व ठरल्यावेळी कार्यवाहीत आणण्यात या दोघा सेनापतींनी अजिबात कसूर केली नव्हती. तरी या योजनांचा व डावपेचांचा शेवटी कर्जाच्या कातळावर कपाळमोक्ष झाला. जयपूरचा भित्रा राजा किल्ल्यातच दडून बसल्याने, त्याचे सर्व राज्य मुसलमानांना लूटमार करायला मोकळे राहिले. त्याच्या मध्यस्थांना मात्र आपल्या वाटाघाटी लांबवत ठेवण्याचा डाव साधता आला. जयपूर किल्ला सर होऊन त्यावर मुसलमानांचा बावटा फडकता, तरच शाही फौजांचा विजय झाला असे म्हणता आले असते; पण हे घडणे कठिण होते; १७५१ च्या जानेवारीत मल्हारराव होळकरांना हाच अनुभव आला होता.

या मोहिमेसाठी मूर्तझाखानाने स्वतःच्या खिशातून बराच खर्च केला; शिवाय शिपायांच्या पगारापोटी त्याला १ लाख ८० हजारांचे देणे झालेले. नजफखान त्याला फक्त रोख वीस हजार रुपये देऊ शकत होता, तेही दहा दिवसांनंतर. उरलेले प्रत्येक महिन्याला

तीस हजार याप्रमाणे द्यायचे होते. मात्र ते जयपूर राजाकडून खंडणी आलीच तर ती जशी येईल त्यानुसार मिळायचे होते. मूर्तझाखानला त्यानंतर एप्रिलमध्ये शिखांविरुद्ध लढण्यासाठी अंतर्वेदीत वरील भागाकडे धाडण्यात आले व त्यानंतर दोन महिन्यांनी पानिपत जिल्ह्यात ; पण यावेळीही त्याला पुरेसा पैसा पाठविण्यात न आल्याने त्याच्या सैनिकांची जयपूरप्रमाणेच येथेही उपासमार होऊ लागली. "या सैनिकांनी त्याच्याकडून जबरदस्ती करून जे घेता येईल ते घेतले व ते निघून गेले" [इब्रतनामा भाग २ ; २३]. जयपूर खंडणीबाबतची संपूर्ण हकीगत पुढील एका प्रकरणात सांगण्यात येईल.

५. मुहमदशफीच्या शिखांविरुद्ध मोहिमा १७८०–८१

ऑक्टोबर, १७७९ मधील पतिआळा मोहिमेत शाही फौजांचा फजितवाडा उडाला होता. त्यामुळे विजयोन्मादाने चालणारे शीख अंतर्वेदीत वरच्या भागात धुमाकूळ घालीत होते. त्यांना तिथे कोणी विरोध करायलाच नव्हते. मध्यंतरी दिल्लीत उडालेल्या गोंधळाने थोडाफार बाका प्रसंग उद्भवला होता तरी नजफकडे सर्व सत्ता आल्यावर त्याला दिल्लीतच रहावे लागल्याने त्याच्या सैन्यालाही दिल्ली सोडता येईना (नोव्हेंबर). त्या वर्षाअखेर परिस्थिती खूपच निवळली. जानेवारी महिन्यात त्याचा पुतण्या मुहमदशफी याच्या हाताखाली दहा-हजार सैनिक व सुसज्ज तोफखाना देऊन त्याला अंतर्वेदीत धाडण्यात आले; तेथील मुलूख व पिके यांवर लक्ष ठेवून त्यांचे रक्षण करणे हे त्याचे काम होते. शीख तिथे घुसलेले होतेच; आपल्या गढ्यांच्या आधारे राहून तेथील स्थानिक जमीनदारांना ते अभय देत. त्यामुळे शिरजोर झालेले हे जमीनदार बादशाही सत्तेला झुगारून द्यायच्या प्रयत्नात होते. अशांचा बंदोबस्त करणे हे शफीचे पहिले काम होते. मीरत येथील आपल्या तळावरून पुढे येऊन शफी बडनावामार्गे निघाला व १० फेब्रुवारी, १७८० रोजी चांगलीच लढत देऊन सप (बडनावाच्या ईशान्येस बारा मैल) येथील जमीनदारांची लूटमार करून त्याने आपली दहशत बसवली. त्यानंतर मीरत जिल्ह्याचा बंदोबस्त करण्याकडे त्याने लक्ष दिले.

शिखांविरुद्ध लढणाऱ्या शफीच्या साहाय्यासाठी झबिताखानाने तातडीने जावे असा त्याला, पावसाळा संपता संपता दिल्लीहून घाईगर्दीचा निरोप गेला (१२ ऑक्टोबर). झबिताखान व मुहमद शफी या दोघा सेनापतींनी २८ ऑक्टोबर रोजी तांडा येथे आपापले सैन्य एकत्रित केले. तांडा हे ठिकाण यमुनेच्या पूर्वेकडील तीरावर पानिपतच्या आग्नेयेस चौदा मैलांवर आहे सतलजच्या अलीकडील शीख सरदार मुलूख व सत्ता यासाठी आपापसात तंडत असत. पतिआळाचा अमरसिंग, कैथाळच्या भाई देसूसिंगशी भांडत असे. देसूसिंगला साहेबसिंग खोंडाचा पाठिंबा होता. तसेच दुलजासिंग व भांगासिंग यांची मदत घेऊन स्वतः साहेबसिंगही ठाणेश्वरच्या भांगासिंगावर हल्ला करून तेथील किल्ला बळकावण्याच्या प्रयत्नात असे (नोव्हेंबर, १७८०). दोन्ही बाजूंकडून मदतीसाठी शाही सरसेनानीकडे अर्जी गेली होती. दोघांपैकी कोणाला मदत द्यायची हे ठरविण्याचे स्वातंत्र्य नजफने शफीला दिले असले तरी त्याने ही निवड करताना दिल्ली शासनाचा फायदा

कशात, हे विचारात घ्यायचे होते. दि. ९ नोव्हेंबर रोजी शफी व झबिता बिदोलीला आले. बिदोली कर्नाळच्या आग्नेयेस दहा मैलांवर आहे. या ठिकाणी साहेबसिंग व त्याचे सहकारी या दोघा सेनाप्रमुखांना भेटले व आपणास मदत करण्याचे बाबतीत काय करता येईल याबाबतच्या अटींवर त्यांनी चर्चा केली.[५]

एकत्र आलेले हे मित्र यमुना ओलांडून तिच्या पश्चिम तीरावर आले व कर्नाळनजीक कुंजपुरा येथे त्यांनी मुक्काम टाकला. या ठिकाणी भडक माथ्याचा शफी एखाद्या लहान पोरासारखा वागला (असे नजफखानने मराठ्यांच्या वकिलाला सांगितले). पैसे उकळण्यासाठी त्याने गजपतसिंग व अन्य तीन शीख सरदारांना पकडून ठेवले (सुमारे ८ डिसेंबर). शीख हे झबिताचे परंपरागत पाठीराखे, झबिताने या रासवट प्रकाराचा निषेध केला व शफीच्या मुजोरपणावर रागावून आपले सैन्य घेऊन तो दिल्लीस परत आला (१० डिसेंबर). शफी अशा प्रकारे एकटा पडला. त्याचा फायदा घेऊन शिखांनी सहरणपूर जिल्ह्यावर धाड घातली. दोघेही समर्थ मुगल सेनानी तिथून नुकतेच निघून गेलेले असल्याने शिखांना प्रतिकार करायला कुणीच नव्हता. शफीने कुंजपुराहून अंतर्वेदीत एकदम धडक मोर्चा नेला. धाड घालणाऱ्या शीख टोळ्या सहरणपूरजवळ एकत्रित झाल्या व त्यांनी शफीशी लढायला सुरुवात केली. पण शीख लढत होते ते शाही फौजा अगदीच नगण्य समजून. जय आपलाच याबद्दल त्यांना थोडीसुद्धा शंका नव्हती. शिखांचा अंदाज चुकला. शफी म्हणजे अबदुल अहद नव्हे, हे ते विसरले. त्याचा सुसज्ज तोफखाना, उत्तम शिक्षण घेतलेले बंदुकधारी शिपाई यांनी शिखांचा धुव्वा उडविला. शेवटी शीख सैन्य पांगले व यमुनापार होऊन आपल्या मुलुखाकडे धावू लागले. शीख इतके भेदरले होते की त्यांना पळता भुई थोडी झाली. शफीने इतक्या जवळ जाऊन त्यांचा पाठलाग केला की कातडी बचावण्याच्या घाईगर्दीत अनेक शीख नदीत बुडून मेले. जे बरेच शूर शीख मारले गेले त्यांत साहेबसिंग खोंडा हाही एक होता.[६]

पराभूत शिखांचा पाठलाग करीत शफी कर्नाळ जिल्ह्यात परत आला. त्याच्या हाताखालील सैन्यातील एक अधिकारी मीर मन्सूर याने इन्द्री-(कर्नाळच्या उत्तरेस १५ मैल) नजीक शिखांच्या एका जमावावर हल्ला करून झालेल्या भीषण झटापटीत त्यांचा पराभव केला. दीडशे शीख ठार झाले, त्यांत त्यांचा सेनाधिकारी रतनसिंग हाही होता. उर्वरित शिखांनी रदौरपर्यंत माघार घेतली (रदौर हे इंद्रीच्या उत्तरेस बारा मैलांवर आहे). शाही फौजांनी इंद्री व हुसेनपूर येथे तळ टाकले. किरकोळ-किरकोळ चकमकी उडत होत्या. शेवटी शफी सधौरा येथे चालून गेला. टेकडीच्या पायथ्याशी चुतांग व मार्कंडा या नद्यांच्या बेळक्यात अंबालाच्या पूर्वेस तेवीस मैलांवर सधौरा हे ठिकाण आहे. या ठिकाणी शफी काही दिवस तळ टाकून होता. लवकरच त्याची परिस्थिती बिकट झाली. सैनिक व युद्धसाहित्याची जमवाजमव करून शीख आपली ताकद वाढवीत असताना शफी दिल्लीकडे, सैन्य, पैसा व दारूगोळा यांची सारखी मागणी करीत होता. पण त्याची कुणीही दाद घेत नव्हते. नजफखानची आर्थिक तंगी विलक्षण होती. सरकारी पैशातून प्रथम खर्च भागवावा

लागे तो बादशहाचा; तोही नजफ महिन्याच्या महिन्याला पाठवू शकत नसे. शफीच्या मदतीला जाण्याबाबत कोणाही सेनाधिकाऱ्याकडे विचारणा केली की त्याची पहिली मागणी असे पैशाची. सैन्य घेऊन जायचे म्हणजे सर्व जरूर ती साधनसामग्री व सैनिकांच्या पगाराचा प्रश्न आलाच. पैशाशिवाय कोण पुढे पाऊल टाकणार ? नाही म्हणायला अंतर्वेदीच्या संरक्षणासाठी काही फौजा मे मध्येच रवाना झाल्या होत्या. नुकत्याच झालेल्या लढाईत शफीजवळचा सर्व दारूगोळा संपून गेला होता. त्याचा पुरवठा दिल्लीकडून होणे जरूरीचे होते, पण तिथून मिळत होती फक्त आश्वासने. आपल्या अर्धपोटी असणाऱ्या शिपायांना पगार देण्यासाठी त्याने दिल्लीस केलेल्या पैशाच्या मागणीबाबतही अशीच शाब्दिक आश्वासने मिळत होती. शेवटी शिपायांनी छावणीतच गडबड-गोंधळ सुरू केला व ते शेकड्यांनी निघून जाऊ लागले. आपल्या सैन्याची घडीच विसकटल्याने त्याला विलक्षण मनस्ताप सहन करावा लागला. शफीने नजफला अत्यंत कडक शब्दांत लिहिले, "खंडणी वसूल करण्याच्या कामात तुम्ही बिघाड केलात; अशा परिस्थितीत माझे सैन्य बरखास्त करावे हेच योग्य".

शाही सैन्यातील अनेक लष्करी अधिकाऱ्यांना त्यांच्या पगारापोटी अंतर्वेदीतील वरच्या भागातील महसुलाची रक्कम तारण देण्यात आली. शिखांचे हल्ले होत असल्याने महसूल मिळत नसे. वेळच्यावेळी सैन्याला दाणागोटा पुरविणे अवघड पडे. हल्लेखोरांपासून या भागातील प्रजेचे रक्षण होणे जरूर असल्याने त्यासाठी झबिताच्या मदतीची गरज होती. या भागात झबिताखानाच्या मालकीचा खूप मोठा प्रदेश होता. झबिताच्या साहाय्याने त्या भागातील कोणत्याही शाही सेनाधिकाऱ्याची लष्करी ताकद वाढली असती व त्याला शिखांवर हमखास मात करता आली असती. म्हणून झबिताखान खूष रहावा यासाठी नजफखानने आटोकाट प्रयत्न केला. त्याने अंतर्वेदीत वरच्या बाजूस जाऊन शफीला मदत करावी व एकजुटीने काम करून बादशहाच्या कामाला यश आणावे म्हणून नजफने त्याची परोपरीने विनवणी केली. शिखांविरुद्धच्या मोहिमेत यश हवे तर शफी व झबिता या दोघांत एकमत हवे, तेच नेमके कठिण होते. इराणी शफी व रोहिला झबिता हे दोघेही तरुण भडक माथ्याचे; दोघांचे जमणे अवघड. हा भावनिक प्रश्न सोडला तरी आणखी एक व्यावहारिक अडचण होती. आपल्या शिपायांच्या पगारासाठी त्याने पैशाची मागणी केली होती, दिल्ली शासनाला तो पाठविता येणे शक्यच नव्हते. शिवाय पूर्वीची झबिताखानची शिखांशी मैत्री, शिखांनी त्याला वाचवलेले, व भावी काळातही त्यांचाच उपयोग होण्याची शक्यता असल्याने शिखांचा उच्छेद व्हावा असे त्याला मनापासून वाटत नव्हते. या अंतर्गत कारणांनी शीख मोहिमेत नजफला यश मिळणार नाही हे निश्चित झाले व शेवटी शिखांशी समझोता करण्याचा मार्गच त्याला अनुसरावा लागला.

शिखांशी समजुतीने घेण्याच्या बाबतीत शफी अगदीच कुचकामाचा होता. तेव्हा झबिताच्या मध्यस्थीचा उपयोग करून शिखांशी समझोत्याची भाषा करावी हा शहाणपणा नजफखानला सुचला तो मे, १७८१ चे अखेरीस. शफीच्या हाताखाली असलेले शाही

सैन्य खूप मोठे असल्याने त्यातील शिपायांना दुसऱ्या ठिकाणी पाठविता यावे आणि दिल्लीच्या उत्तरेकडील मुलूख व अंतर्वेदीतील शीख हल्ल्याचा धोका टळावा यासाठी शिखांना काही सवलती द्याव्यात व त्यांना पगार देऊन बादशहाच्या वतीने लढाईवर पाठवावे असा त्याचा बेत होता. गजपतसिंगाची सुटका करून त्याच्यावर फक्त सहा लाखांची खंडणी बसविली. दिल्ली दरबारात गजपतसिंगला मानाची वस्त्रे व महाराजा हा किताब दिला (१२ जुलै १७८१). झिंद घराणे यावेळेपासून सुरू झाले. गजपतला निरोप देताना नजफ म्हणाला, "शिखांचा मुलूख आहे, तो शिखांकडे असावा. आणि त्यांनी व तुम्ही आपले फौजेनिशी आमचे शामील असावे " (**डी वाय :** भाग १ ला, लेखांक **३५ डीसी**).

या प्रसंगी झालेल्या सलोख्याच्या अटी अशा : शिखांनी यापुढे शाही मुलुखांवर हल्ले करू नयेत. बोलावणे आले म्हणजे शाहीसैन्यात सामील व्हावे व सवेतन काम करावे. त्याबदल्यात शिखांना मिळावयाचे ते हे : पानिपतच्या उत्तरेस असलेला शिखांचा मुलूख त्यांच्याकडेच राहून द्यावयाचा. पानिपत ते दिल्लीच्या तटबंदीपर्यंतचा व अंतर्वेदीतील वरचा भाग येथील मुलुखात राखीचे उत्पन्न वसूल करावयाचे अधिकारही त्यांना मिळावयाचे (बादशहाला द्यावयाचा जो ठरीव महसूल होता त्या प्रत्येक रुपयामागे दोन आणे राखी म्हणून वसूल करायचे होते). मुसलमानांच्या दक्षिणेकडील प्रदेशात मराठ्यांनी अशाच तऱ्हेच्या रकमेची मागणी केली होती. तेव्हा म्हणजे बासष्ट वर्षांपूर्वी सय्यद बंधूंनी जे केले होते त्याचीच नजफखानने पुनरावृत्ती केली.

पावसाळ्यात शफीने रदौर येथेच तळ टाकून बसावे असे त्याला जूनमध्ये सांगण्यात आले होते. यमुनेच्या पाण्याला नाकुम व तावर या ठिकाणी जिथे उतार आहे, तिथून आग्नेयेस आठ मैलांवर नदीच्या रेताड मैदानात त्याने मुक्काम ठोकला व तिथून दक्षिणेकडे आणखी २१ मैल सरकत कुंजपुरा येथील आपल्या तळावर गेला. या ठिकाणी 'पुढे काय करायचे' हा प्रश्न सोडवीत तो तळ देऊन होता, तो नजफच्या मृत्यूपर्यंत. या काळात त्याला कोणताच निर्णय घेता आला नाही.

६. दिल्ली सरकारच्या राजकीय डावपेचांत क्रांतिकारक बदल, पेशव्यांच्या साहाय्याने इंग्रजांविरुद्ध एकत्र येण्याचा मनसुबा.

दिल्लीची मुसलमानी सत्ता व पेशवे यांच्यांत पुन्हा आपलेपणाचे संबंध कसे आले याचा थोडासा ऊहापोह करणे जरूर आहे. दिल्ली सोडावी लागल्यानंतर शहाअलमला अलहाबादेत जवळजवळ अधिकारहीन अवस्थेत रहावे लागले होते. तेव्हापासून इंग्रजांबद्दल वाईट असलेले त्याचे मत आणखी आणखीच वाईट होत गेले. १७६५ मध्ये इंग्रजांनी बादशहाशी सलोखा केला व त्याला दिल्लीस नेऊन पोहोचविण्याचे आश्वासन दिले. हे आश्वासन पूर्ण करण्याची मागणी शहाअलमने केली की इंग्रज सेनाधिकारी पुन:पुन्हा एकच सांगत, 'पावसाळा संपू दे, मग बघू.' अशी वर्षामागून वर्षे गेली तरी इंग्रजांचा पावसाळा संपण्याची चिन्हे दिसेनात. शेवटी अलहाबाद येथे हद्दपारीचे जीवन जगणाऱ्या

या बादशहाने स्वतःचा मार्ग स्वतःच शोधला व मराठ्यांची मदत घेऊन तो आपल्या परंपरागत राजधानीला आला. या कामी एकाही ब्रिटिश अधिकाऱ्याने त्याला मदत केली नाही. अलहाबाद व कुरा, हे प्रांत तर फार प्राचीन काळापासून मुसलमानांचे. १७६५ मध्ये इंग्रजांनी ते बादशहाच्या स्वाधीन केले, पण पुढे अगदीच न शोभणाऱ्या पद्धतीने ते परत आपल्याकडे घेतले व अयोध्येच्या सुभेदारास विकून टाकले. अयोध्येचा हा सुभेदार बादशहाचा वझीर; तो मोठा अधिकारी असला तरी बादशहाचा नोकरच आणि मांडलिकही. या वझीराला इंग्रजांचा वरदहस्त असल्याने वडिलांच्यानंतर त्यांच्या सत्तास्थानावर आल्यावर बादशहाला द्यावयाची वारसाकराची व आपल्या सुपीक प्रदेशातील जादा महसुलाची रक्कमही त्याने दिली नव्हती. तसेच ब्रिटिशांच्या मदतीने त्याने रोहिलखंडातील ज्या जहागिऱ्या बळकाविल्या होत्या त्यांतील रीतसर वाटा बादशहाला द्यायला त्याची तयारी नव्हती. तो बादशहाचा वझीर होता, तरी त्याच्या दरबारात हजर राहून त्याचे काम पहाण्याचे आपले कर्तव्य त्याने कधी नीटपणे केले नव्हते.

ईस्ट इंडिया कंपनीने बादशहाकडून बंगाल, बिहार व ओरिसा या प्रांतांचे दिवाणी अधिकार मागून घेतले होते. हिंदुस्थानातील अत्यंत सुपीक अशा या तीन प्रांतांचे अधिकार कायदेशीररीत्या हाती येण्यासाठी इंग्रजांनी त्याला प्रतिवर्षी २६ लाख रुपये खंडणी द्यावी अशी अट होती. ही खंडणी देण्याचे इंग्रजांनी थांबविले होते. प्रथम त्यांनी खंडणी देण्यास नकार दिला ते बंगालमधील भीषण दुष्काळाचे निमित्त पुढे करून. नंतर दख्खनमध्ये ज्या लढाया कराव्या लागल्या त्यांचा आपल्या कारभारावर ताण पडतो म्हणून खंडणी देता येत नाही असे त्यांनी कळविले होते. इंग्रजांचा गव्हर्नर आपल्या टाळाटाळीच्या प्रत्येक पत्रात बादशहाबद्दलची निष्ठा व त्याच्यासाठी वाटेल ते करायची तयारी याची मायावी भुलावण करीत असे. पण खंडणी म्हणून एक पैसाही दिला नाही. 'बादशहांना खंडणी म्हणून जी रक्कम द्यावयाची आहे, त्याबाबत आपण आपल्या लंडन येथील वरिष्ठांना पूर्ण खुलासेवार लिहिले असून त्यांच्या उत्तराची वाट पहात आहोत' असे मखमली आश्वासन वॉरन हेस्टिंग्जने दिले; 'हुकूम आला की पैसे दिलेच' असे मधाचे बोट लावण्यासही तो विसरला नव्हता. गरीब बिचाऱ्या शहा अलमला ब्रिटिश कावा कुठून कळणार, की वरिष्ठांकडे विचारणा झाली होती ती खंडणी अजिबात थांबवावी का, म्हणून! बादशहा अंतर्यामी कळून चुकला होता की इंग्रजांकडून यावयाची खंडणीची रक्कम दृष्टीस पडणे कठिण.

या सगळ्या भयंकर अन्यायाचे निराकरण करण्याचा एकच उपाय म्हणजे जबरदस्त ताकद दाखविणे, पण ही ताकद आणायची कोठून? बादशहाच्या विश्वासाचा एकमेव आधार म्हणजे स्वामिनिष्ठ व धाडशी पेशवा. ब्रिटिशांसमोर उभे राहण्याची ताकद होती, ती फक्त मराठ्यांची. म्हणून मनातून धास्तावत पण मोठ्या आशेने त्याने मराठ्यांना विचारावयाचे ठरविले. या राजकीय पटावरील मोहरी प्रत्येक दिवशी कशी कशी हलवावी लागत होती, याची माहिती आपल्याला मिळते ती दिल्ली येथील पेशव्यांचे वकील (हिंगणे) यांनी पेशव्यांना लिहिलेल्या पत्रांतून. तसेच महादजी शिंदे यांनी पुण्यास पेशव्यांकडे जी

पत्रे पाठविली त्यांतही हीच माहिती मिळते. ही सर्व पत्रे १७८०-८१ मध्ये लिहिलेली आहेत. १७७९ अखेर अब्दुल अहदची सद्दी संपल्यावर नजफखानच्या हातात सर्व कारभार आला. दिल्ली शासनाच्या कारभारात एकसूत्रता आली; व जो कालखंड सुरू झाला त्यात भारतीय राजकारणाचे क्षितिजावर ब्रिटिशांचा तारा नव्या तेजाने तळपू लागला. तळेगाव येथे (जानेवारी, १७७९) कॉकबर्नला जी मानहानी पत्करावी लागली होती, त्याचा वचपा निघाला. १५ फेब्रुवारी, १७८० रोजी गोडार्डने अहमदाबाद जिंकून घेतले. दि. ३ ऑगस्टला पोफॅमने ग्वाल्हेरचा किल्ला सर करून तो अजिंक्य आहे हा भ्रम घालविला. ११ डिसेंबरला गोडार्डने वसई सर केली. १६ फेब्रुवारी १७८१ ला कॅमॅकने शिप्री येथे महादजीचा पराभव करून मराठ्यांचा एकमेव आशांकुरही खुडून टाकला.

या दूर परिणामी विजयाने हिंदुस्थानात इंग्रजविरोधी वातावरण तयार होईल हा संभवच संपला. येथील प्रत्येक सत्ताधाऱ्याच्या मनात इंग्रजांबद्दल एक प्रकारची भीती बसली व त्यांच्या संबंधात वागताना ती सहजपणे प्रकट होऊ लागली. सातासमुद्रांपलीकडून आलेल्या या जमातीची लष्करी ताकद किरकोळ समजण्याची चूक, नजफखानने केली नाही. १७६३ मध्ये उंधवानाला येथे ब्रिटिशांच्या संगिनी कशा काम करतात, हे त्याने प्रत्यक्ष पाहिलेले व १७६४ मध्ये तर आपल्या घोड्यावर स्वार होऊन त्याने त्यांच्या बाजूने युद्धात भाग घेतलेला; त्यामुळे साहाय्य करण्यासाठी येणारी सेना नुसती दणकट नव्हे, तर हमखास विजय मिळवील अशी असल्याशिवाय इंग्रजांसारख्या बलाढ्य शत्रूविरुद्ध बादशहाला उभे करण्याचा आततायीपणा नजफखानने केला नसता.

७. मराठ्यांच्या उत्तरेकडील धोरणातील वैयर्थ्य

१७८० व १७८१ या वर्षांतील घडामोडी व महादजीने इंग्रजांशी (ऑक्टोबर, १७८१) केलेली शांतताकरारावरील स्वाक्षरी येथपर्यंतच्या घडामोडी आपण पाहिल्या तर मराठ्यांनी दिल्लीत जी धोरणे आखली त्याचे वैयर्थ्यच आपणास पहावयास मिळते.[७] या धोरणातील फोलपणा एका दृष्टीने प्रत्येक विचारवंत भारतीयाचे मनःस्वास्थ्य बिघडविणारा आहे. तसे नसते तर हा पोकळपणा निवळ हास्यास्पद म्हणून सोडून देता आला असता. पेशव्यांच्या दक्षिणेकडील शत्रूने त्यांना जेरीस आणले होते. इंग्रजांबरोबर सुरू असलेल्या धामधुमीत आपला निभाव लागावा म्हणून बादशहाने आपल्या बाजूस येऊन इंग्रजांविरुद्ध लढण्यास साहाय्य करावे अशी पेशवे दरबार बादशहाची विनवणी करीत होता. इंग्रज शिरजोर झालेले, त्यांनी बंगाल आणि अयोध्या घशात टाकले; बुंदेलखंड, ग्वाल्हेर व कर्नाटक हस्तगत केले; राजपुतांशी संगनमत करून त्यांच्या साहाय्याने त्यांना जाटांचा प्रांत व माळवा काबीज करावयाचा होता; व दिल्लीस येणेही त्यांना अधिक सोपे होते (राज. खंड १२; लेखांक ५). पेशव्यांच्या विनंतीनुसार 'नजफखानासहित पातशहा यांनी इंग्रजांचे पारपत्याची तहबीर करावयाची शफत घेतली' व तशी नजफखानमार्फत मराठ्यांच्या वकिलाला त्याने वारंवार आश्वासने दिली. पावसाळा संपल्यानंतर आपल्या सैन्यासह इंग्रजां-

विरुद्ध लढायला तो स्वतः येणार होता. पण तत्पूर्वी खुद्द पेशवा, किंवा त्यांचा एक सरदार, मातबर फौजेचा, निष्कपट पातशहापाशी असणे आवश्यक होते, अन्यथा इंग्रज अयोध्येतून दिल्लीवर चालून येतील व संरक्षणाची कसलीच व्यवस्था नसल्याने ते दिल्ली सहज जिंकतील [राजवाडे; खंड १२; लेखांक ७, ५५, ५६; **डीवाय** : खंड १; लेखांक १४, ३४, ३७].

बुडणाऱ्या माणसाने पोहता येणाऱ्या पण हातपाय थकलेल्या माणसाची मानगूट, आपण दोघेही वाचू या आशेने पकडावी तशासारखी ही परिस्थिती होती. बादशहा व पेशवा, दोघांनाही परस्परांबद्दल विश्वास नव्हता. जे समजून उमजून घ्यायला राजकारण-पटुतेची गरज नाही हे हिंगणे याला चटकन समजले, ते म्हणजे नजफखानला असे काही नकोच आहे. तो फक्त गोडगोड बोलून चाळवत ठेवतो आहे. "कोणता पक्ष बळकट होणार याची प्रतीक्षा करीत तो फक्त कालहरणाचा डाव खेळतो आहे" (**डीवाय** : भाग १ ; लेखांक ३५). आपला सर्वनाश होईल या भीतीपोटी दिल्लीचे सत्ताधीश इंग्रजांना कसे वचकून आहेत, हे त्याला दिसत होते. इंग्रजांनी ग्वाल्हेरचा किल्ला घेतल्यानंतर तर ही भीती आणखीच वाढली. हा अवघड किल्ला इंग्रजांनी घेतला व तोही मराठ्यांकडून, तेव्हा नजफखानने मराठा सेनानींना मर्मी घाव घालणारा प्रश्न टाकला, "हा किल्ला तुम्ही कसा गमावलात ? आमचे स्वाधीन करिता तरी किल्ला तुमचा कायम राखिला जाता." दिल्लीला मराठ्यांची वकिली करायला गेलेला माणूस शहाणा होता. इंग्रजांनी केलेल्या मराठ्यांच्या पराभवाची बातमी बाहेर फुटू नये म्हणून त्याने खूप गुप्तता राखली. पण पुणे येथे असलेल्या कुणा शहाण्या पत्रलेखकाने आपण होऊन दिल्लीस पाठविलेल्या एका पत्रात हा गौप्यस्फोट केला; त्याच्या मार्फत दिल्ली दरबारात सर्व बातम्या इत्थंभूत कळत (**डीवाय** : भाग १, लेखांक ३१ व ४३). इंग्रजांशी सलोखा करण्यासाठी पेशवे दरबाराने आपली माणसे त्यांच्याकडे पाठविली आहेत, अशीही एक गप उठली. त्याने शाही दरबारात खूपच खळबळ माजली. एकीकडे इंग्रजांशी तह करावयाचा व एकीकडे दिल्लीच्या बादशहाला इंग्रजांविरुद्ध उठवून त्याला आयत्यावेळी तोंडावर आपटायचा या मराठ्यांच्या धोरणाबद्दल त्यांचा वकील हिंगणे याला खूपच ऐकावे लागले (राजवाडे, खंड १२, लेखांक ८ : **डीवाय** : भाग १; लेखांक ३४).

बादशहा व मराठे यांच्या एकत्रित प्रयत्नाने हमखास यश येईल असा महादजीस काही काळ विश्वास वाटत होता; पण हा विश्वास अजाणतेपणातून निर्माण झालेला होता. पश्चिम हिंदुस्थानात गोडार्डचा व माळव्यात कॅमॅकचा विशेष जोर होता. हा जोर कमी करण्यासाठी होळकर व शिंदे यांनी मध्य हिंदुस्थानातून चालून जायचे. आपल्या प्रचंड स्वारांसह भोसल्यांनी बंगालमध्ये घुसायचे; 'कझाकी' पद्धतीचा वापर करून आपल्या चपळ स्वारांकरवी लूटमार करवायची व इंग्रजांना कोंडीत पकडायचे. पातशहाच्या पक्षाचीही तयारी होती. "त्यांची यांची लढाई बरोबरीची आहे. त्यांत अंतर हेच की, इंग्रजांची तोफ जलद चालते. यांचे तोफेस बार व्हावयास विलंब लागतो ! या अर्थी कझाकी फौज यांचे

कुमकेस असल्यास हे त्यांस मारून चालवितील म्हणून बोलत होते " (**डीवाय :** भाग १; लेखांक ६ व ९).

लढाईतील डावपेचाच्या जुन्यापुराण्या शास्त्रांना कवटाळून बसणाऱ्या मराठा सेनानींना प्रिय असलेल्या या लुटालूट छापा पद्धतीने काय साधणार, हे मल्हारराव होळकरला माहीत होते. तो या डावपेचाचा पुरस्कर्ता असल्याने त्याने एकदा अबदालीविरुद्ध व एकदा इंग्रजांच्या शिस्तबद्ध सेनेविरुद्ध असे दोन वेळा हे डावपेच उपयोगात आणले होते. त्यावेळपर्यंत द बॉन्यचे रणतंत्र महादजीने पाहिलेले नव्हते. त्यामुळे या पद्धतीच्या भासमय यशस्वितेवर त्याचाही विश्वास होता. उत्तरहिंदमधील या मोहिमेस प्रत्यक्षात आकार देणार होते पुण्याचे पेशवे. पेशवे कायमचेच कर्जबाजारी, दिल्लीतील आपल्या वकिलाचा तनखाही त्यांना देता येत नसे. पेशवे दरबारसारख्या श्रेष्ठ सत्तेला लाज वाटावी अशा हीनदीन अवस्थेत त्यांचा दिल्लीदरबारी असलेला वकील हिंगणे हा दिवस काढीत होता. अनेकदा त्याला उपास पडत. त्याच्यासमवेत असणाऱ्या एकाने त्रासून उद्गार काढले होते, "कर्जदारीपणामुळे एकादशी शिवरात्र मोडावयास्तव बाळाजी (व) गंगाधर गोविंदास सरकारची सनदापत्रे पाठविली, त्यांचे उत्तरही न देत " (**डीवाय :** भाग १ ; लेखांक १०, ८१).

दिल्लीतील ही सगळी बडबड व विचार प्रत्यक्षात आलेच नाहीत. ते प्रत्यक्षात आणण्याचा प्रयत्न चालू असताना मिर्झा नजफने फार धूर्त असा राजकारणी पवित्रा घेतला (जून, १७८१). या प्रचंड साहसासाठी त्याने आपल्या विरोधकांना आपल्याकडे वळवायचे ठरविले. सतलज नदीच्या अलीकडील मुलुखावरील शिखांचा हक्क त्याने मान्य केला व त्यांचा स्नेह संपादन केला. शिखांच्या मुलुखातील युद्धाला विराम म्हणजे कर्नाळजवळ असलेले शफीच्या हाताखालील प्रचंड सैन्य मोकळे होणे. या शिपायांना अंतर्वेदीतील वरील भागास सहरणपूर येथे पाठविता आले असते व त्यांच्या मदतीला शीख व झबिताखान यांचे सैन्य देऊन तेथील स्थानिक बंडखोरांवर वचक ठेवणे व बादशहाचा अंमल प्रस्थापित करणे शक्य झाले असते (**डीवाय :** भाग १ ; लेखांक ३५).

इंग्रज व मराठे यांच्यांत जे पहिले युद्ध झाले ते शिंद्याने इंग्रजांशी तह केला (१३ ऑक्टोबर, १७८१) तेव्हाच जवळजवळ संपुष्टात आले व वरील प्रचंड योजनाही आपोआप थंडावली. या योजनेसाठी जी आखणी केली होती त्याचा परिणाम असा झाला की त्या आधीचा दोन वर्षांचा अवधी दिल्ली शासनाला काहीच न करता अनिश्चित अवस्थेत घालवावा लागला. अपवाद करायचाच तर तो फक्त दोन मोहिमांचा, त्या म्हणजे जयपूर व सरहिंद. त्यांची माहिती पूर्वी आली आहे.

हा जो अवसर मिळाला त्याचा उपयोग बादशहाचा लाडका मुलगा राजपुत्र अकबरशहा याच्या विवाहासाठी उपयोगी पडला. त्याची शादी २ मे, १७८१ रोजी झाली. प्रचंड खर्च व अपूर्व थाटमाट करण्यात आला. विवाहसमारंभाचा थाट कसा उडवायचा याची योजना लग्नतिथीपूर्वी कित्येक दिवस चालली होती. शादीनंतर चारच दिवसांनी राजघराण्यावर प्रचंड आपत्ती कोसळली राजपुत्र फरकुंद बख्त (मिर्झा जहाँशहा) हा

अल्प आजाराचे निमित्त होऊन अल्लाघरी गेला; त्याला वाचनाचा खूप छंद होता. त्याच रात्री त्याची छोटी कन्याही वारली. निसर्गाने अशी काही अशुभ चिन्हे दाखविली की माणसे हादरून गेली. ११ जून १७८१ रोजी कधी नव्हे अशी प्रचंड वावटळ उठली, या वादळाचा राजधानीला जबरदस्त तडाखा बसला. त्यानंतर त्याच वर्षी काही दिवसांनी भू-कंपाचा फार मोठा धक्का बसला. त्याचा परिणाम जाणवणारा होता. झाझर-नजीक उल्कापात झाला (**मुन्नालाल २३३, डीसी**). हे वर्ष संपण्यापूर्वीच दिल्ली दरबारातील कामकाजाची शिस्त अगदी बारगळली. कोणाही हकीम-वैद्याच्या औषधाने उतार पडू नये अशा असाध्य रोगाने नजफखान आजारी पडला. कित्येक महिने तो अंथरुणावर पडून होता व अखेरीस दि. ६ एप्रिल रोजी दिल्लीचा हा कर्तबगार मुखत्यार कालवश झाला.[८] त्याच्याचबरोबर मुसलमानी सत्तेचा हिंदुस्थानातील अखेरचा आधार तुटला व ही सत्ता झपाट्याने उतरणीला लागली.

८. मिर्झा नजफची कारकीर्द व कर्तृत्व

मिर्झा नजफखानच्या स्वभावविशेषांचे वर्णन त्याच्या लढाईतील व शासनातील प्रत्यक्ष कर्तृत्वाचे सिंहावलोकन करताना यापूर्वी केलेले आहे. त्यामुळे दिल्लीच्या राजकारणात त्याची रास्त जागा कोणती, विविध क्षेत्रांत त्याला मिळालेले यश व अपयश व त्याच्या निधनाने साम्राज्यावर झालेला परिणाम याचे ओझरते अवलोकन केले तरी पुरेसे होईल.

मिर्झा नजफखान झुल्फिकार-उद्-दौला हा मुसलमानी साम्राज्याचा सर्वांत शेवटचा बुद्धिमान वझीर म्हणून दिल्लीकर इतिहासकारांच्या स्मृतीत मानाचे स्थान मिळवून आहे. मृत्युपंथाला लागलेल्या मुसलमानी सत्तेचा सूर्य मावळतीकडे झुकत होता त्या वेळच्या मावळत्या प्रकाशात तो फारच उठून दिसतो. त्याचे सहकारी कर्तृत्वाने अगदीच थिटे होते व त्याच्यानंतर दिल्लीच्या शासनात त्यांनी दोन वर्षे गोंधळ घातला; व ती सत्ता अन्य जातीच्या व पंथाच्या हातात दिली. त्याच्या कर्तृत्वावरून त्याचे मूल्यमापन करायचे ठरविले तर काही थोडे अपवाद वगळता त्याच्या कर्तृत्वाला तोड नव्हती. सेनेचे धुरीणत्व करणाऱ्या नजीबउद्दौलाजवळ जी बुद्धिमत्ता व अंगभूत श्रेष्ठता होती तिचा त्याच्यापाशी अभाव होता. काही सेनापतींजवळ विशेष गुण असतात. पराभवाच्या क्षणी ते आवेशाने गर्दीत घुसतात व आपल्या रणनीतिकौशल्याने युद्धाचे पारडे एकदम फिरवून टाकतात; काही सेनापती शिपायांत मिळूनमिसळून आपुलकीने बातचीत करतात व त्यांना धीर देऊन त्यांच्यात ईर्षा निर्माण करतात. जुन्या जमान्यातील अशा सेनापतींजवळ दुसऱ्यावर छाप पाडणारे आडदांड व्यक्तिमत्त्व असते. नजफखानजवळ यांपैकी काहीही नव्हते. पाश्चात्यांनी हिंदुस्थानात आणलेले युद्धतंत्र येथील शिपायांना अगदी नवखे होते. पाश्चात्यांच्या शिस्तबद्ध अशा या नव्या तंत्रात आपल्याकडील काय काय चपखलपणे बसवता येईल, त्यासाठी अचूकपणे कशी पावले टाकावीत व जय कसा मिळवावा याबाबतचे निर्णय घेताना चूक करून चालत नसे. त्यासाठी हवी असणारी धीमी नेतृत्वशक्ती, सामंजस्य व समन्वय

निर्माण करण्याची हातोटी, लायक व्यक्तींची निवड करण्यातले कौशल्य हे अलौकिक गुण या माणसाजवळ होते. युद्धभूमीवर सहजपणे हलविता येतील अशा तोफा व तुफकदारांचे शिस्तबद्ध पायदळ हे नव्या युद्धतंत्रात जय मिळविण्यास उपयुक्त ठरतात, याची जाण त्याला केव्हाच आली होती. त्यामुळे वरील दोन्ही गोष्टींचा भरपूर पुरवठा असावा यावर त्याचे फार लक्ष असे; व या गोष्टींचा यशस्वी वापर परंपरागत ' मुगलिया स्वारां 'त किती प्रमाणात करायचा याबाबतचा त्याचा अभ्यासही चांगला होता. लष्करी मोहिमेतील त्याची ही हुषारी अंगभूत असल्याचाच हा पुरावा. महादजी शिंदे याच्यापूर्वी हिंदुस्थानातील एकाही सत्ताधाऱ्याने इतके पाश्चात्य लष्करी तज्ज्ञ नेमून आपल्या शिपायांना आधुनिक युद्धतंत्रातले शिक्षण दिलेले नव्हते.

त्याची सर्वांत मोठी उणीव म्हणजे तो निष्णात शासनतज्ज्ञ नव्हता. मुलकी कारभारासाठी लायक व्यक्तींची निवड करणे, आपल्या धोरणांची त्यांना कल्पना देऊन त्यानुसार ते काम करतात की नाही यावर लक्ष ठेवणे, हे अकबराचे लक्षणीय गुण. नजफ नेमका यांतच उणा पडला. त्याच्या हातात दोन वर्षेपर्यंत संपूर्ण अधिकार होते; बादशहाच्या दरबारात त्याचा शब्द अखेरचा होता. पण या काळात किंवा त्याआधी आपल्या जहागिरीच्या मुलुखात कारभार पहात असतानाही महसुलाबाबत काहीच धड व्यवस्था नव्हती. सरकारात जमा होणाऱ्या महसुलाच्या रकमेत लक्षणीय भर पडली नाही वा त्यासाठी लागणाऱ्या खर्चांत काटकसरही झाली नाही. १७८० सालात हिंदुस्थानच्या वरच्या भागात जो फार मोठा दुष्काळ पडला तेच नजफच्या या बाबतीतल्या अपयशाचे कारण असे मात्र म्हणता येणार नाही. खंडणीची रक्कम व युद्धातील लूट यामुळे त्याला अमाप प्राप्ती होऊनही कर्जबाजारीपणाने त्याची सारी हयात आर्थिक विवंचनेत गेली. पैशाअभावी त्याची प्रत्येक योजना अडून पडे. खरे कारण एकच. मुलकी यंत्रणा राबविण्याचे कौशल्य त्याच्यापाशी नव्हते. महसूल जमा करणे व तत्सदृश कामे त्याने सर्वस्वी आपल्या कश्मिरी ब्राह्मण दिवाणांवर सोपविली होती. त्यांच्याबाबत असे बोलले जाई की महसुलाचे हिशेब ठिशेब ठेवणारे हे दिवाण, क्षुद्रवृत्ती व पैसा खाणे या बाबतीत आपल्या प्रांतातील मुसलमान अधिकाऱ्यांची छोटी आवृत्ती होते.

आळस आणि भीरुता या अवगुणांमुळे त्याच्या कर्तृत्वात जे दोष शिरले, तेच विघातक ठरले. जेथील प्रजा, बादशहाशी एकनिष्ठ होती ते प्रांत त्याने आपल्या हाताखालील अधिकाऱ्यांवर सोपविले. प्रत्येकजण आपापल्या प्रांतात सुभेदार झाला; त्यांच्या या अधिकाराला शाही सत्तेची मंजुरी नव्हती. नाममात्र राजसत्ता; व्यवहारात जवळ जवळ स्वतंत्रता. अशा या सत्ताधारी सुभेदारांखालोखाल प्रस्थ होते ते मुगल, अफघाण व बलुची या जमातीतील गटांचे म्होरके यांचे. नजफने त्यांनाही थोडाफार जमीनजुमला दिला. त्याचा परिणाम असा झाला की छोटी किंवा मोठी जहागिरी असणारे असंख्य सरंजामदार तयार झाले. त्यांच्यावर जरब ठेवणे हे येरागबाळाचे काम नव्हते. हे नवीन सरंजामदार जमीन महसुलातील मोठा वाटा घशात टाकीत, त्यामुळे त्यातून खुद्द बादशहा व सत्तासंरक्षक शाही-

सेना यांच्या वाट्याला फारच थोडे उरू लागले. सरंजामशाहीचा हा नवा वारसा नजफखानकृपेने अवतरला खरा, पण त्याचा पुढे महादजीला अतोनात त्रास झाला. दिल्ली शासनातील ढिलेपणा सुयंत्रित करण्यास त्याला आणखी चार वर्षे लागली. या कालहरणाने हिंदुस्थानच्या भवितव्यात लक्षणीय बदल घडवून आणला.

विजयाच्या अंतिम क्षणी तो धुंद होत नसे. प्रतिपक्षाबाबत त्याचे धोरण नेमस्तपणाचे असे. सर्वसाधारण जनतेबाबत त्याला माणुसकीचा गहिवर होता व येथील राजकारणातील वस्तुस्थितीची त्याला अचूक जाण होती. या सर्व गुणांमुळे तो एक राजकारणनिपुण मुत्सद्दी होता हे इतिहासकारांना मान्य करावेच लागेल. केवळ लहरीपणा, तिटकारा वा चिरड म्हणून तो कधी उतावळेपणे वागला नाही, आणि त्याने आपले मनोधैर्य कधी खचू दिले नाही. आवाक्यापेक्षा मोठा घास घेण्याचाही कधी प्रयत्न केला नाही. शेवटी जनसामान्यांचा जन्मजात नेता ही त्याची महती. शांतता प्रस्थापित करण्याच्या बाबतीत त्याची कामगिरी म्हणावी तशी प्रभावी नसली, तरी युद्धकाळात अतिशय कर्तबगार व नावाजलेल्या सेनाधिकाऱ्यांना विश्वासात घेऊन आपल्या नियोजित मोहिमेत त्यांना काम करायला लावण्याची श्रेष्ठ कला त्याला अवगत होती. कारकीर्दीतील त्याची शेवटची वर्षे त्याच्या कर्तृत्वाला उजळा देणारी ठरली; त्या काळात राजधानीतील प्रजेला शांतता व समृद्धी लाभली. त्याच्या अकाली मृत्यूने तत्कालीन प्रजेला खरेखुरे दुःख झाले, जबरदस्त वैफल्य आले, निराशा पसरली, याचे कारण तरी दुसरे काय ?

टीपा : प्रकरण ३१

पृष्ठ	टिपेचा क्रमांक	
१२७	१	**ब्रिटिश म्यूझिअम :** ओरिजिनल २५,०२० आणि २५,०२१ (प्रमुख मूळ कागदपत्रे) **इब्रत :** भाग २; २५ **झिक्र–ई–मीर** (छापलेले) पृ. १३८
१३०	२	जहाँरा जहाँन्दर दर्द खराब झे दस्त–ई–नजफखान वा आफ्रासिआब, (ओरिजिनल, २५,०२०, पृ. ९२ ए)
१३३	३	**नजफकूलीची मोहीम : इब्रत :** भाग २; २३–२४, **डीसी, ब्रिटिश म्यूझिअम :** ओरिजिनल, २५,०२० व त्यानंतरच्या ७ ए–४४ बी; कनोद किल्ल्याच्या पाडावाचा दिनांक. **सीपीसी :** खंड ५, क्रमांक : १८४३

१३४	४	**मुगलांचे जयपूरवरील आक्रमण,** १७८०–८१ ब्रिटिश म्यूझिअम : **ओरिजिनल** : २५,०२० व त्यानंतरच्या ३५–५०, ५४–३४५. **ओरिजिनल** : २५,०२१ व त्यापुढील १–२५, २७१–२८४ (उत्कृष्ट) राजवाडे, खंड १२, लेखांक ८; **डीवाय** : भाग १, लेखांक २०,३१; **जीडब्ल्यू** भाग १, क्रमांक ९४; महेश दरबार, भाग १, लेखांक ७, ९, १२, १९, ५१ (महत्त्वाचे) **इब्रत** : भाग २, १७–२३; **डीसी** (फक्त मूर्तझाने मिळविलेल्या विजयाचा दिनांक).

सीपीसी : खंड ५, क्रमांक १८४३ : बादशहाला बरोबर घेऊन नजफने स्वतःच या मोहिमेत पुढाकार घ्यावा असे सुरवातीस ठरले होते. त्यानंतर या सैन्याबरोबर, बादशहाऐवजी पातशहाजादा अकबरशहा याने जावे असे ठरले. त्यानुसार जयपूरला जाणाऱ्या मार्गावर तालकटोरा येथे २२ मार्च, १७८० रोजी पातशहाजादा व मुख्त्यार यांच्यासाठी खास स्वारीचे तंबू ठोकण्यात आले; त्यानंतर ही योजना ऐनजिनशीच रद्द करावी लागली ती बहुशः अकबर आजारी पडल्यामुळे असावी.

१४०	५	शफीने शिखांवर केलेल्या हल्ल्याचा हा संपूर्ण वृत्तांत, ब्रिटिश म्यूझिअम, ओरिजिनल २५,०२० आणि २५,०२१ (अखबार) यातील माहितीचे तुकडे एकत्र करून तयार केलेला आहे. त्यात पुढील कागदपत्रांच्या माहितीतील थोडाफार भाग घेतलेला आहे. **डीसी,** : **इब्रत** : भाग २; १६–१७; **मुन्नालाल,** २२७; **डीवाय** : भाग १, लेखांक : २०, २३, २८, ३५ आणि **एमडी** : भाग १, लेखांक, ४५, ५३; विल्यम्सने 'कलकत्ता रिव्ह्यू' (१८९०) मध्ये दिलेल्या माहितीत दुरुस्ती आवश्यक आहे. **अख. २० बी** "देसूसिंग व अमरसिंग यांच्यांत घनघोर लढाई; अमरसिंगाची पतिआळा किल्ल्यात हकालपट्टी (सुमारे १४ फेब्रुवारी १८७०)" ३८९ ए– शीख सरदारांत आपापसांत चकमकी; काहींनी कैथाळ राज्याचा बराचसा भाग बळकाविलेला, तर काही पतिआळा मुलुखात खंडणी वसूल करायला लागलेले (सुमारे १० नोव्हेंबर, १७८०). ३ ए, परस्परांशी भांडणाऱ्या सरदारांचे ठाणेश्वरसाठी झगडे (सुमारे, १५ सप्टेंबर, १८७०).

१४०	६	या लढाईबद्दल अधिकृत माहिती देतो फक्त मुन्नालाल, २७७; 'कलकत्ता रिव्ह्यू' अंक ६०, पृ. ३५ यातील विल्यम्सच्या लेखातही हीच हकिगत आहे. पण इतर तफावती व उगाच फुगवून दिलेले आकडेही (उदा ; शिखांकडील ५,००० हून अधिक माणसे ठार झाली) आहेत. त्यांचा विचार केला नाही, तर विल्यम्स हा सदर लढाईचा दिनांक १५ व

ठिकाण मीरत असे देतो; पण १५ ऑगस्टनंतर लगोलग बादशहाने शफीला मानाची वस्त्रे पाठविली अशी लेखी माहिती उपलब्ध आहे. शफीचा हा बहुमान कशाकरिता होता ? प्रचंड सैन्यासमवेत स्वारी करून शत्रूवर चालून जाण्याच्या दृष्टीने ऑगस्ट महिन्याचा मध्यकाळ निश्चितच योग्य नव्हे.

१४४ ७ **दिल्ली येथील मराठ्यांची राजकारणे** : भाग १ (यातील माहिती अंशतः पुनरावृत्ती असून राजवाडे खंड १२, यातील माहितीला पोषक आहे) तसेच ग्वाल्हेर पेपर्स, भाग ५ यातील माहितीतही असाच सूर आहे.

१४७ ८ **नजफचा अखेरचा आजार व मृत्यू : डीसी, इब्रत** : भाग २, २५–३१; **मुन्नालाल** : २३४–२३७; **गुलामअली** : खंड ३, १५०–१५१.

प्रकरण ३२ वे

शफी आणि अफ्रासिआब यांची कारकीर्द १७८२-८४

१. नजफखानच्या मृत्यूनंतर बादशहाची असहाय स्थिती

नजफखानच्या मृत्यूने दरबारात, सैन्यात, व दिल्लीच्या प्रजेतही विलक्षण गोंधळ निर्माण झाला. कुठूनही आशेचा बारीकसाही किरण लुकलुकत नव्हता. भविष्यकाळाबद्दल सर्वांच्याच मनात भीतीचे चमत्कारिक सावट पसरले होते. नजफखानच्या आधी नजीबउद्दौलाने आपल्या कर्तृत्वाच्या जोरावर शासनाची व राज्याची धुरा समर्थपणे पेलली, तशीच महान् कामगिरी नजफच्या नावावर जमा होती. नजफखाननंतर त्या तोलामोलाचा माणूस नजरेच्या टप्प्यात नव्हता. साम्राज्याचा परंपरागत वझीर हा चैनी, ऐषारामात रहाणारा पोकळ माणूस; वरवर मिठास बोलण्याची कला त्याला अंगभूत असली तरी त्यात काही दम नाही, हे ऐकणारा समजून असे. शाहीसत्तेच्या कृपाछत्रात वावरणारा जयपूरचा मांडलिक हिंदू राजा हा मानसिंग व मिर्झाराजा जयसिंग यांचा वंशज; हा बेतासबात ताकदीचा पोरसवदा तरुण. विविध भोगविलासांत दंग होऊन रात्रंदिवस जनानखान्यात रहाणे एवढेच त्याचे कर्तृत्व. रोहिल्यांची पिछेहाट होऊन त्यांची हड्डी अशी काही नरम झालेली, की त्यांच्यांतून नवा नेता उदयास येणे सर्वथैव अशक्य होते. जाट राजघराण्याची अवस्था तर आणखीच दयनीय होती.

अशा परिस्थितीत जनतेला आशा होती ती नजफखाननंतर त्याच्या हाताखाली तयार झालेल्या सेनाधिकाऱ्यांची. अनेक प्रकारच्या मोहिमांत त्याच्या ममत्वाची पाखर लाभलेले, व विविध प्रांतांत त्याच्याच शिफारशीवरून प्रमुख अधिकारी म्हणून काम केलेले, असे चार नाव घेण्यासारखे अधिकारी होते. अफ्रासिआबखान आणि नजफ कूलीखान (हे त्याचे दोन गुलाम होते), मिर्झा शफीखान (त्याच्या पुतण्याचा मुलगा) व मुहमद बेग हमदानी (मुगलियांचा प्रमुख) या चौघांत सत्तेसाठी अडीच वर्षे रण माजून राहिले. ही अडीच वर्षे म्हणजे रक्तपाताचाच इतिहास. मिर्झा नजफच्या मृत्यूनंतर या रणकंदनामुळेच वैतागून जाऊन बादशहाने महादजी शिंदे याला नायब वझीर व मीरबक्षी केले (एप्रिल १७८२–नोव्हेंबर, १७८४).

अन्य तिघांचे कर्तृत्व फिके पाडून, त्यांच्यावर आपली हुकमत बसवून, आपले श्रेष्ठत्व निरपवाद सिद्ध करण्याची ताकद, चौघांपैकी एकातही नव्हती. हे सरंजामशाही कलह टळावेत म्हणून गोसावी हिंमतबहादूर याने बादशहास फार मोलाचा सल्ला दिला. बादशहाने स्वतःच मीरबक्षीपदाची सूत्रे हातात घेऊन आपल्या सैन्याचे नेतृत्व करावे, व सैन्याच्या साहाय्याने गेलेला मुलूख परत मिळवावा. स्वतः बादशहाच जातीने पुढे होता, तर हाता-

खालील अधिकाऱ्यांच्या सत्तापिपासेला आळा बसला असता, बंडखोर नमले असते, महसूल न देणारे चपापले असते, व हे सर्व शस्त्र न उपसता घडून आले असते. पण...दुसऱ्या शहाअलमला आपल्या पूर्वजांची धाडशी छाती नव्हती, आपल्या गोतावळ्यातल्या स्तुति-पाठकांचा सल्ला त्याला फार मोलाचा वाटला. राजप्रासादातले बिनधोक जीवन, विलासी ऐषाराम सोडून लढायांची धकाधकी याला कशी मानवावी? (इब्रत, भाग २, ३२–३३). यामुळे नजफखानानंतर त्याच्या जागी नायब वझीर व मीरबक्षी म्हणून कोणास नेमावे हा प्रश्न अनुत्तरितच राहिला.

२. नजफखानाचे चार साहाय्यक अधिकारी : त्यांचे स्वभावविशेष[१]

अफ्रासियाबखान हा मूळचा हिंदू. एका वाण्याचा मुलगा. अनाथ अवस्थेत मिर्झाच्या दृष्टिपथात आला. मिर्झा नजफने त्याला मुसलमान धर्माची दीक्षा दिली. त्याचा तो आवडता गुलाम. तो फक्त नजफखानचे नाव लावत नसे, एरवी त्याचा दत्तकपुत्र म्हणूनच ओळखला जाई. नजफची लष्करी ताकद, हाताखालच्या माणसांवर जरब ठेवण्याचे कौशल्य, व स्वतः कष्ट सोसून काम करण्याची जिद्द, यांपैकी एकही गुण अफ्रासियाबजवळ नव्हता. लढवय्यामध्ये एक जन्मजात धाडस असते तेही त्याच्यापाशी अभावानेच होते, त्यामुळे सैन्याचा विश्वास संपादणे त्याला जमले नाही. मुघलिया सैन्यातले अधिकारी एका गुलामाचे हुकूम मानायला राजी नव्हते. तो भारतीय मुसलमान आणि काफराच्या रक्ताचा, म्हणून हिंदुस्थानाबाहेरचे मुसलमान त्याला हीन लेखीत. अफ्रासियाबचे वजन पडावे, अशी त्याच्याकडील एक जमेची बाजू म्हणजे त्याच्यापाशी असलेली मिर्झा नजफखानची संपत्ती. मिर्झा नजफ ऐषारामीचे जीवन जगू लागल्यानंतर त्याचा कारभार पहात असताना अफ्रासियाबने त्याची बरीच संपत्ती गिळंकृत केलेली होती. त्याशिवाय आणखी एक महत्त्वाची बाब म्हणजे मृत्युशय्येवर असणाऱ्या मिर्झा नजफने आपल्यानंतर आपल्या जागी अफ्रासियाबचीच निवड व्हावी अशी बादशहाजवळ त्याची शिफारस केली होती. त्याशिवाय नजफनंतर त्याच्या सैन्याचा व जहागिरीचाही तोच मुख्य होणार होता. खदिजा सुलतान बेगम ही नजफखानची बहीण; त्यामुळे तिलाही सगळे मान देत. नजफखानच्या मृत्युनंतर अफ्रासियाबला त्याच्या या बहिणीचे कृपाछत्र काही दिवस लाभले. नंतर काही दिवसांनी तो तिच्याशी फटकून वागू लागला. त्याचा परिणाम असा झाला की, बाहेरचे कोणीच त्याला विचारीना. त्याला जो नवा हुद्दा मिळाला, व सत्ता हाती आली त्यामुळे तो विलक्षण उन्मत्त झाला; तो कोणालाही कठोरपणे व टाकून बोले, बेफामपणे वागे, त्याच्या बाजूची सगळी माणसे त्याच्याविरुद्ध गेली, व या आपल्या गुणांनी त्याने आपला अधःपात अपेक्षेपेक्षा लवकर घडवून आणला.

मिर्झा नजफच्या हाताखालचा क्रमांक दोनचा त्याचा आवडता म्हणजे नजफ कूलीखान. हा स्वतः इराणी, नजफखानचा गुलाम, व नंतर त्याच्या सैन्यात अधिकारी. आपल्या धन्याविषयीची कृतज्ञता म्हणून त्याने आपले नाव नजफ कूलीखान असे ठेवविले.

पण हा माणूस नेहमी अफूसारखे मादक पदार्थ, मदिरा व मदिराक्षी यांतच दंग असे. अधूनमधून तडफ व बेगुमानपणाने हल्ला करण्याची सणक त्याला येई, तेवढाच काय तो त्याच्या आळशीपणाला तडा. परंतु सेनाधिकाऱ्याला लागणारे गुण व दूरगामी योजना आखण्याचे शहाणपण त्याच्याजवळ नव्हते. राजकारणातले डावपेच व कारस्थाने यात तो अगदीच बालबुद्धी होता, त्यामुळे तो कावेबाज व धूर्त माणसाच्या हातातील बाहुले बनून राहिला.

मिर्झा नजफच्या पुतण्याचा मुलगा मिर्झा महमदशफी हाच त्याचा स्वाभाविक वारस होऊ शकला असता. मूळचाच तो इराणच्या शाही रक्ताचा. इराणीपक्षाचे सगळे त्यालाच मान देत. नशीब असे की नजफखानच्या अमदानीत त्याच्या वाट्याला आल्या होत्या त्या दुय्यम प्रतीच्या जागा (अपवाद फक्त अगदी अलीकडील शीख मोहीम), त्याचे कारण तो अगदीच पोरसवदा तरुण होता. त्यामुळे काकाचा मृत्यू झाला तेव्हा त्याच्याजवळ साहजिकपणे त्याचे स्वतःचे सैन्य किंवा मीरबक्षीपदाला लागणारी पात्रता नव्हती. त्याचे चारित्र्य शुद्ध व संशयातीत होते. कपटकारस्थाने आणि हाणामाऱ्यांच्या त्या राजकारणी दुनियेत सरळ, सुस्वभावी माणसाला जागा नव्हती. सत्तास्थानावर तो फार थोडा होता. त्या काळातील त्याच्या सर्व योजना बारगळल्या, आपल्या विरोधकांशी वागताना त्याच्या हातून घोडचुका झाल्या. ढोंगी, मतलबी, कपटी व कावेबाजांची दुनिया त्याला समजणारी व मानवणारी नव्हती. तेथील लांड्यालबाड्यांची कधीकधी त्याला इतकी घृणा येई की तो विलक्षण संतापे व माथे भडकल्यावर काहीही बोले. त्यामुळे त्याला आपले बरेच मित्र व पाठीराखे गमवावे लागले. झैन-उल-अबीदिन हा विशेष माहीत नसलेला त्याचा थोरला भाऊ. याने मात्र ह्या लाचलुचपतीच्या व गुन्हेगारीच्या रंगमंचावर उत्तम भूमिका वठवून दाखविली.

मिर्झा नजफच्या मर्जीतला, त्याच्या सैन्यातील सर्वांत नतद्रष्ट, हलकट, विश्वासघातकी असा कोणी अधिकारी असेल तर तो मुहमद बेग हमदानी. अफघाणांचे विश्वासघात व क्रौर्य हे पिढीजाद अवगुण, तुर्की शिपायाची भाडोत्री शिपाईगिरी, हे सर्व गुणावगुण हमदानीजवळ भरपूर प्रमाणावर होते. मुगलिया सरदार हे हिंदुस्थानात अनेक वर्षे स्थायिक झालेले होते व त्यांच्या प्रत्येकाजवळ शिपायांच्या छोट्या छोट्या टोळ्या असत. सर्वांत जास्त पैसा जो मोजील त्याच्या बाजूने हे भाडोत्री शिपाई लढत असत. हमदानी हा हिंदुस्थानाबाहेरचा तर होताच, त्याशिवाय सेनाधिकारी म्हणून त्याचे नाव होते; तो निश्चयी स्वभावाचा, राजकारणातील डावपेच व हिकमती भाषा यांत सरावलेला. त्यामुळे वरील सारखे सर्व पोटार्थी सैनिक त्याच्याकडे येत. त्याचा पुतण्या इस्माइल बेग हा सुद्धा त्याच्या वेळचा नाणावलेला सेनाधिकारी. पण नजफखानच्या मर्जीतली माणसे किंवा खुद्द त्याची शियापंथी बहीण यापैकी कोणीही हमदानी वा त्याचा पुतण्या यांचा पाठपुरावा केला नाही. केवळ भाडोत्री आणि एखाद्या गटाचे म्होरकेपण करण्यास सर्वथैव अपात्र अशाच दृष्टीने ह्या दोघांना कायमचे दूर ठेवण्यात आले.

३. बादशहाचे धोरण : १७८२ ते १७८४ या दरम्यानच्या घडामोडींचा धावता परामर्श

या नंतरच्या दोन अडीच वर्षांचा इतिहास, म्हणजे वरील चार सेनाधिकाऱ्यांच्या गरजेनुसार मिळतेजुळते घेण्याच्या, तसे प्रयत्न हाणून पाडण्याच्या व पुन्हा नव्याने तसेच करण्याच्या कारवायांचा इतिहास होय. यातच अयोध्येचा सेनाधिकारी लताफत अलिखान या कावेबाज व स्वार्थी माणसाची लुडबूड, बादशहाचे भेकड व धूर्त असे राजकारणातले अंतर्गत डावपेच, अटकेतून सुटल्याबरोबर दरबारात पुन्हा अधिकार मिळविण्याच्या लालचीने अबदुल अहदने सुरू केलेली कारस्थाने, या सगळ्याचाच परिणाम वरील चौघांच्या परस्परविरुद्ध कारवायात होता. शेवटी याच घातक उद्योगातून या चौघांची ताकद निकालात निघाली. लताफत अली खान, मिर्झा मुहमद शफी व अफ्रासियाबखान खान ह्या तिघांचे खून पडले. अबदुल अहदला हयातभर कैदखान्यात पिचावे लागले; मुहमदबेग सत्ताहीन झाला, आणि १७८४ च्या अखेरी या राजकीय रंगमंचावर एकही पात्र शिल्लक राहिले नाही. रंगमंच आसुसला होता तो महादजीला सर्वोच्च अधिकार मिळालेले पहाण्यासाठी.

गेली कित्येक वर्षे बादशहाच्या नाकर्तेपणाने केवळ नावापुरतीच सत्ता त्याच्याजवळ होती. त्याला आस्था काय तर ती फक्त पैशाची- नियमित व पुरेशा पैशाच्या पुरवठ्याची. पण साम्राज्याचा बराचसा मुलूख पडिक अवस्थेत व परस्वाधीन असलेला. मांडलिक व जमीनदार खंडणी देण्याची हेतुपुरस्सर टाळाटाळ करीत. या परिस्थितीत दरमहा लागणारी रक्कम त्याला मिळणे दुरापास्त होती. त्याचवेळी नजफखानने बादशहाची म्हणून खूप मोठी सेना उभी केली. खुद्द नजफच्या हयातीत शिपायांना वेळेवर पगार मिळत नसत. त्याच्या मृत्यूनंतर तर त्यांचे पगार खूपच थकले. तीन वर्षे अवर्षण होते. या यातनात भर म्हणून उपासमार सोसणारे शिपाई बंड करून उठत व आपल्या वरिष्ठ अधिकाऱ्यांना अपमानास्पद भाषा वापरून दमदाटी करीत.

तेव्हा नजफखानचे जागी त्याच्या जागेवर येऊ इच्छिणाऱ्या व्यक्तीने आपण सांगू तितका पैसा देण्यास तयार असले पाहिजे असे बादशहाने ठरविले. अफ्रासियाबने आपण पाच लाख देण्यास तयार आहोत म्हणून वचन दिल्यावर नजफखानच्या जागी त्याची नेमणूक पक्की झाली. पण नंतर बोलल्याप्रमाणे पाच लाखांचे वचन पुरे करण्याची वेळ आली तेव्हा खरा प्रसंग उद्भवला. नजफखानने जी स्थावर जंगम मालमत्ता व रोकड जमा केली होती, त्याबाबत अफ्रासियाबखान, खदिजा सुलतान (जिने पुढे शफीला पाठिंबा दिला) व बादशहा यांच्यात तंटा उद्भवला. मृत मीरबक्षीच्या धनदौलतीला बेवारशी मालमत्तेचा कायदा लावण्याचे धाडस बादशहाला झाले नाही. म्हणून मीरबक्षीच्या जागेवर नव्याने येईल त्याने त्याच्याकडील सर्व सरकारी जमिनी व खूप मोठी रक्कम द्यायला हवी असे बादशहाने सांगितले. अफ्रासियाब हा मिर्झाच्या कृपेच्या उबेत वाढलेला व त्याच्या दत्तक मुलासारखा. नजफखानच्या पैशाच्या व अन्य स्थावर मालमत्तेचा हिशेबठिशेब तोच ठेवीत असे; पण तो हिशेब ठेवतो म्हणजे काय करतो हे मात्र त्याला कोणीही विचारले नव्हते. मोहिमा

व दरबारातले कामकाज यातच वेळ जात असल्याने आपल्या मिळकतीच्या हिशेबात लक्ष घालायला नजफला वेळच होत नसे. पैसा लागला की तो अफ्रासियाबकडून घेत असे. शिल्लक किती, याचा हिशेब कधीच मागत नसे. त्याच्या मृत्यूनंतर अफ्रासियाबने त्याची तीस लाख रुपये किमतीची सर्व धनदौलत लाटली; शिवाय हत्ती घोडे वगैरे होतेच.

मृत मीरबक्षीच्या मागे त्याच्या दोन अल्पवयीन कन्या होत्या, पण वडिलार्जित संपत्तीपैकी त्यांना काहीही देण्याचे अफ्रासियाबने साफसाफ नाकारले. या मुली नजफखानच्या दिल्लीतील हवेलीत राहात. नजफची बहीण खदिजा सुलतान ही घरचा सर्व कारभार पाही. त्याची वैयक्तिक मालमत्ता, रोकड पैसा, हिरे माणके, जुना सेवक वर्ग व हवेलीच्या रक्षणासाठी असलेला तोफखाना या सर्वांवर तिची देखरेख असे. पण तिचा जो दरारा व वचक असे, याचे प्रमुख कारण म्हणजे नजफखानसारख्या श्रेष्ठ सेनानीची ती जवळच्या नात्यातील रक्ताची बहीण. म्हणूनच बादशहापासून सर्वसाधारण नागरिकापर्यंत प्रत्येक जण तिला मानीत असे. नजफच्या मृत्यूनंतर तिने ठरवले होते ते असे : नजफखानची मोठी मुलगी (त्या वेळी अकरा वर्षांची) शफीला द्यावयाची म्हणजे नजफचे सर्व पाठीराखे व अनुयायी शफीला पाठिंबा देतील, शफी मीरबक्षीपदावर बसेल व दिल्ली दरबारातील सर्व सूत्रे आपल्याला पडद्याआडून हलविता येतील.

नजफखानच्या हाताखाली जहागिऱ्यांचा खूप मोठा प्रदेश व अन्य प्रांत होते. शाही अधिकारी म्हणून नजफ त्यांची व्यवस्था पाही. त्याच्या मरणसमयी त्याने ठिकठिकाणी नेमलेले अधिकारी त्याच्यावतीने काम पहात होते ते असे : अंतर्वेदीतील मध्यभाग (अलिगढ व जलेश्वर जिल्हे) अफ्रासियाबखानाकडे; सहरणपूर वरील नाममात्र अधिकारासह, यमुनानदीवरील कर्नाळ जिल्हा, मिर्झा मुहमद शफीकडे; केनाद हा मध्य धरून शेखवती ते मेवात हा भाग नजफ कुलीखानकडे व जाटांकडून घेतलेला मुलूख धरून आग्रा–धोलपूर भाग मुहमदबेग हमदानीकडे. या चार ठिकाणी चार स्वतंत्र जहागिऱ्या निर्माण होण्याचा धोका दिसत होता. मिर्झानजफचे अखेरचे चिकट दुखणे, त्यापाठोपाठ त्याची सत्ता बळकावण्यासाठी चाललेली भांडणे व गोंधळ यामुळे दिल्लीदरबार जवळजवळ वर्षभर (१७८२) गतप्राण झाल्यासारखा होता. प्रत्येक स्थानिक जमीनदार व सैन्यातील छोटासा अधिकार असलेला वतनदारही शेजाऱ्याचा प्रदेश बळकावी व कायदा आणि अधिकार धाब्यावर बसवून आपल्या मुलुखात भर घालीत असे. भरतपूरच्या राजासारखे पराभूत झालेले बंडखोर, किल्ल्याचा आसरा सोडून बाहेर पडले व अगदी आग्रा तटबंदीपर्यंत मजल मारून आपला गेलेला मुलूख परत मिळविण्याच्या मागे लागले. शीख व नजीबउद्दौलाच्या घराण्यातील जे थोडेफार होते ते सुद्धा पूर्वीपेक्षा धिटाई करू लागले होते.

स्थानिक जमीनदार व लष्करातील अधिकारी यांनी जो मुलूख बळकावून घशाखाली घातला होता तो त्यांच्याकडून काढून घेऊन परत बादशहाचे ताब्यात येणे, त्या त्या ठिकाणी महसूल वसुलीसाठी त्याचे अधिकारी नेमले जाणे व त्यांच्यामार्फत महसूल जमा

करवणे, हे महत्त्वाचे होते. तसे झाले नसते तर बादशहा, त्याच्या शासनातील सेवकवर्ग व सैनिक या सगळ्यांचीच उपासमार अटळ होती. हे सर्व शहाअलमच्या ताकदीबाहेरचे होते. नजफच्या मृत्यूनंतर त्याच्या जागी एकामागोमाग एक आलेल्या नायब वजिरांनी हे प्रांत परत मिळवायचा प्रयत्न केला नव्हता असे नव्हे, पण त्यातून फक्त भांडणतंटे उद्भवले व शाहीसत्तेचा दिमाख उतरला. शेवटी या असंख्य बंडखोरांविरुद्ध शस्त्र उपसून त्यांना बादशहाचे अधिकार व सत्ता मान्य करावयास लावली ती महादजी शिंदे या अतिशय समर्थ शासकानेच. आणि तेही अशा अवस्थेत, की त्याच्या वर्चस्वाला व इभ्रतीला अत्यंत धोकादायक व घणाघाती ठरावे असे आव्हान देण्यात आले होते तेव्हा म्हणजे १७८७–१७८८ मध्ये.

४. अफ्रासियाबची मीरबक्षीपदावर नेमणूक, त्याच्या अडचणी व अवहेलना

मिर्झानजफच्या मृत्यूनंतरचा तीन दिवसांचा दुखवटा संपला (९ एप्रिल १७८२) त्यानंतर बादशहाने नजफच्या हाताखालील सर्व सेनाधिकाऱ्यांना बोलावून घेतले. त्यांना दिवाण–ई–आमच्या अलीकडील दालनात बैठक घ्यायला सांगून आपापसातील विचार-विनिमयानंतर नवा नेता निवडायला सांगितले. या सेनाधिकाऱ्यात एकमत होईना. अफ्रासियाब हा हिंदुस्थानात जन्माला आलेला व त्यातून गुलाम. त्याचे हुकूम मानायला मुघलिया सेनाधिकारी तयार नव्हते. त्यानंतर बादशहा, मिर्झा नजफच्या बहिणीला शोकसमाचारासाठी म्हणून भेटला. त्यावेळी मिर्झानजफच्या जागी कोणाला नेमावे, याबाबत त्याने तिलाच निर्णय घेण्यास सांगितले. तिने अफ्रासियाबचे नाव सुचवले. त्याला मुखत्यार करण्यात आले. अश्रफ–उद्–दौला हा किताब देण्यात येऊन सैन्याच्या सर्वोच्च प्रमुखपदावर (म्हणजे मीरबक्षी, अमीर–उल्–उमराव) त्याचीच नेमणूक झाली. राज्ययंत्रणेतील सर्वांत महत्त्वाची व श्रेष्ठ अशी जागा तीच असल्याने त्यासाठी पाच लाख रुपये व बादशहाच्या खाजगी खर्चासाठी दरमहा एक लाख वीस हजार रुपये देण्याचे आश्वासन त्याने दिले होते. अनेक प्रकारे धडपड करून त्याने कसेतरी १ लाख ८७ हजार उभे केले व दि. ११ एप्रिलला ते बादशहाकडे पोहोचते केले. त्यानंतरच त्याला वरील अधिकारपदावर नेमण्यात आले.[२]

पण ही केवळ त्याच्या भावी संकटपरंपरेची कुठे सुरवात होती. उद्यासाठी हमखास पैशाचा पुरवठा करायचा तर बंडखोरांकडून बादशहाचा मुलूख परत घेणे व त्यांना जरब बसवणे भाग होते. मिर्झा नजफच्या आजाराचा फायदा रणजितसिंग जाटाने घेतला होता. त्याच्या वडिलांच्या वेळचा त्याच्या हातातून गेलेला मुलूख परत मिळविण्यासाठी तो धडपडत होता. त्यासाठी सबंध आग्राप्रांतात धुमाकूळ घालता यावा म्हणून त्याने आपल्या सैन्याला ठिकठिकाणी पाठविले होते. त्या ठिकाणी बादशहाच्यावतीने महमद बेग हमदानी हा सुभेदार होता. जाटांच्या अति चपळ घोडदळापुढे त्याने हात टेकले व दिल्लीहून लष्करी कुमक मागविली. आपल्या मदतीसाठी नव्या मीरबक्षीने बादशहा समवेत स्वतः यावे असे त्याने विनविले. तसे करायचे म्हणजे प्रचंड खर्च ताबडतोब करावा लागणार होता. पण शाही फौजांमधील

शिपायांना पगार मिळाला नव्हता. ते दिल्लीत पोट भरत होते ते उधार उसनवारीवर. लांब मोहिमेवर निघायचे म्हणजे जीविताची हमी कशी देणार ? ' नाही देहाचा भरवसा ' अशा अवस्थेत उधार कोण देणार ? म्हणजे मागे रहाणाऱ्या कुंटुबीयांची काही महिन्यांची तरी सोय करणे भाग होते. बराच काळ काही काम नसल्याने दुर्लक्षित घोडदळ व तोफखाना यांना पुन्हा सुसज्ज करणे हीदेखील थोड्याथोडक्या खर्चाची बाब नव्हती. याशिवाय बादशहा स्वत: निघणार, तेव्हा त्याचा खासा नोकरवर्ग, लवाजमा, तंबू डेरे, शाही शामियाने हा खर्च काही थोडाथोडका नव्हता.

ही एवढी प्रचंड रक्कम उभी करणे हे अफ्रासियाबला कठिण होते. ऐनवेळी असहाय तलखी व बादशहाला नुकताच येऊन गेलेला बुखार ही त्याला चांगली निमित्ते मिळाली. अशा अवस्थेत स्वत: बादशहाने येणे बरे नव्हे म्हणून राजपुत्र जवानबख्त याने या मोहिमेत पुढाकार घ्यावा, असा बादशहाकडून त्याने हुकूम मिळवला. मोहिमेवर निघण्यापूर्वी राजपुत्राला दरबारात शुभेच्छापूर्वक निरोप देण्यात आला (अंदाजे १५ मे) राजपुत्र दिल्लीबाहेर निघाला व सैन्याची वाट पहात दिल्लीबाहेर तंबू टाकून बसला. जवळजवळ महिना गेला, सैन्य आले नाही वा येईल अशी चिन्हेही दिसत नव्हती. त्यासाठी लागणारा पैसा अफ्रासियाबजवळ नव्हताच. त्याच्या जवळचा रोखपैसा केव्हाच संपला होता. शेवटी निर्वाणीचा उपाय म्हणून त्याने मिर्झा नजफच्या बहिणीकडे शब्द टाकला. पण... भरवशाच्या ठिकाणीच त्याला सणसणीत चपराक बसली. काहीही देता येणार नाही म्हणून हात झटकून ती मोकळी झाली. शेवटी मोहिमेसाठी पैशाअभावी सैन्य निघू शकणार नाही हे बादशहाही समजून चुकला. त्याने शहराबाहेर तळ ठोकून बसलेल्या जवान्‌बख्तला बोलावून घेतले. (१२ जून)

मुखत्यार म्हणून नजफखानच्या जागेवर आल्यानंतर पहिल्याच महिन्यात त्याच्या इभ्रतीला न शोभणारा असा हा तडाखा बसल्याने त्याची जनमानसातील प्रतिमा थोडी फार डागळलीच; बादशहाही त्याच्यावर नाराज झाला. त्याशिवाय अफ्रासियाबने नेमकी एक नको ती चूक केली. नजफखानाच्या आधिपत्याखाली असलेल्या सर्व सेनाधिकाऱ्यांना त्याने दिल्लीस बोलावून घेतले. त्यांच्याकडे त्यांच्या अधिकारानुसार जेवढे सैनिक हवेत तेवढ्यांचीच नावे हजेरी पत्रकात ठेवण्याची परवानगी मिळेल असे त्यांना सांगण्यात आले. तसेच त्यांच्याजवळ असणाऱ्या अधिकृत सैन्याच्या गरजेइतकाच मुलूख ठेवून बाकीचा जादा सरकारात परत करावा असेही त्यांना फर्मावण्यात आले. असे केल्याशिवाय बादशहाच्या खर्चासाठी लागणारा पैसा उभा करणे शक्य नव्हते. पण सर्व सेनाधिकारी त्याच्यावर उलटले. या सर्व विरोधकांनी बेगम खलीदा सुलतान इला आपल्या बाजूला वळवून घेतले व या नव्या मीरबक्षीविरुद्ध दंड थोपटले. या परिस्थितीमुळे अफ्रासियाबला जी धावपळ करावी लागली तिचाच त्याला जबाबदारीच्या कामापेक्षा अधिक त्रास झाला. त्याचे विरोधक मिर्झा मुहमद शफी-(नजफखानच्या पुतण्याचा मुलगा) कडे आपला भावी मीरबक्षी म्हणून डोळे

लावून होते. त्यावेळी शफीची नेमणूक कर्नाळ जिल्ह्यात झालेली होती. ही वार्ता समजताच शिखांशी झटपट समझोता करून तो दिल्लीकडे यायला निघाला.

५. प्रतिस्पर्धी शफीविरुद्ध अफ्रासियाबचे डाव

आपला दावेदार दिल्लीस येतो आहे हे ऐकून अफ्रासियाब भांबावून गेला. मिर्झा-नजफची बहीण ही त्याची खरी पाठीराखीण; तीच त्याच्यावर उलटली; त्याला आता दुसऱ्या कुठे आधार शोधायला हवा होता. नजफच्या घराण्याशी असलेले सर्व हितसंबंध व लागेबांधे आपण तोडून टाकलेले आहेत असे त्याने जाहीर केले. यापुढे आपण फक्त सरकारचे मुखत्यार आहोत हे बादशहाने मान्य करावे म्हणून त्याने त्याच्या नाकदुऱ्या काढल्या; बादशहाला आणखी खूष करण्यासाठी त्याने राजधानीच्या किल्ल्यावरील आपला ताबा सोडला. किल्ल्याच्या संरक्षणासाठी असलेली नजफची शिबंदी काढून घेतली (२९ जून) व तेथील प्रवेशद्वारांचा ताबा बादशहाच्या संरक्षणासाठी असलेल्या खास 'लाल पलटणी'कडे दिला. अहमद अलिखानला त्यावर प्रमुख नेमले. शफी राजधानीवर चालून येतो यात खुद्द शहाअलम व बेगम खदिजा यांचा हात असावा असा रास्त संशय आल्याने त्याने स्वसंरक्षणासाठी जरूर अशी पावले ताबडतोब उचलली. मीरबक्षीसाठी असलेले सरकारी निवासस्थान १६ जूनला सोडले. त्या दिवसापर्यंत तो त्या हवेलीत मिर्झा-नजफची बहीण व त्याचे अन्य कुटुंबीय यांच्यासमवेत रहात होता. तिथून निघाल्यावर तो, पूर्वी अबदुल अहद रहात असे त्या हवेलीत रहायला गेला. अबदुल अहद, नजफखानच्या घरातच कैदेत होता. अफ्रासियाबने त्याच्या जुन्या घरात रहायला जाताना त्यालाही बरोबर नेले. बादशहाला पुन्हा प्रसन्न करून घेण्याची ही प्राथमिक तयारी होती. अबदुल अहदवर बादशहाचे अविभाज्य प्रेम हे सर्वांनाच माहीत होते. त्यानंतरची पायरी म्हणजे अबदुल अहदला पुन्हा बादशहाच्या उजव्या हातापाशी मुखत्यारपदावर बसविणे.[३] अहदसारखा एक परममित्र राजदरबारी असणे अफ्रासियाबच्या हिताचे ठरणार होते; तरी अशा प्रकारच्या राजकीय पुनरुत्थानालाही काही वेळ लागणारच. काही करायला जावे तर त्या वाऱ्यावादळात आपण सामर्थ्यहीन आहोत हे अहदला माहीत होते; त्याने पुन्हा त्या जागेवर काम करण्यास नकार दिला. दिल्ली दरबारात प्रत्येक बाबतीत प्रचंड घोळ होता. तिजोरीत खणखणाट असून बादशहा व त्याचे कुटुंबीय उपासमार सोशीत होते. याबाबत दिल्ली दरबारातील मराठ्यांचा वकील लिहितो, " लोकांस खायास खर्चास नाही. नजबखानची खाजगत हुजूर रिसाल्याचे लोक फांकेकशी करितात, घोडे, हत्ती उपाशी मरतात ! नित्यचे भक्षावयाचे बेगमचे देखील बंद झाले ! तीन दिवस बेगमेस देखील फांका जाला " [ओरिजिनल २५०२१, पृष्ठ ११२–११५; **डीवाय,** भाग १ लेखांक ८४].

अशा प्रकारे अफ्रासियाबखान आपली कारस्थाने रचण्यात दंग असताना शफी दिल्लीनजीक आला ; शफीची स्वतःची अवस्थाही चमत्कारिक होती. तो सैन्याचा एक अधिकारी पण वरून कोणताही हुकूम न येताच तो आपली जागा सोडून आलेला ;

अनधिकृतपणे राजधानीत घुसण्याचा त्याचा प्रयत्न होता. नजफखानच्या सैन्यातील अधिकाऱ्यांत आपापसात लाथाळी चालू रहाणे बादशहाला हवेच होते. आपापसांत माथेफोड करून शक्ती क्षीण झाली म्हणजे वरचष्मा रहाणार होता तो ओघानेच बादशहाचा. पण बादशहा हा मूलतः भित्रा व कसलीच विशिष्ट तत्त्वनिष्ठा नसलेला. त्याच्या या स्वभाव-दोषाचा फायदा शफीला मिळाला. अशा बादशहाकडून मर्जीचा संदेश आल्यावर जोर येऊन शफीने दिल्लीत प्रवेश केला. तो खदिजाबेगमला भेटला. तिने त्याला मुलासारखे हृदयाशी धरले. नजफच्या मुलीशी त्याची शादी करून द्यायची, घरातले कर्तेपद त्याला द्यायचे, मृत नजफच्या सैन्याचे प्रमुखत्वही त्याच्याकडेच सोपवायचे व त्याची नेमणूक मीरबक्षीपदावर करायची अशी आश्वासनेही तिने त्याला दिली.

६. प्रतिस्पर्धी सेनाधिकाऱ्यांच्या सेनांचे दिल्लीत जमाव : दंग्याचा धोका

दि. १४ जुलै रोजी शफीचे शाही दरबारात औपचारिक स्वागत करण्यात आले.[४] मुख्त्यार पदावर नेमणूक करवून घ्यायची तर त्यासाठी बादशहा मागेल ती रक्कम त्याला द्यायला हवी. ती देण्यास शफी तयार नसल्याने एक महिनाभर त्याला कोणत्याच जागेवर नेमण्यात आले नाही. मिर्झानजफच्या सैन्यातील आणखी दोन अधिकाऱ्यांनाही दिल्लीस पाचारण करण्यात आले होते. त्यांतील एक मुहमद बेग हमदानी, हा शफीच्या पक्षाचा. त्याने शफीच्या इशाऱ्यानुसार जाट राजाशी समझोता केला व तो अंतर्वेदीत मध्यभागी आला, तो गोसावी हिंमतबहादूरच्या तेथील जहागिरीत लुटालूट करण्यासाठी. गोसावी हा अफ्रासियाबचा उजवा हात. आता धोका उत्पन्न झाला तो अफ्रासियाबच्या अलिगढमधील जहागिऱ्यांनाच. तिथेच हल्ला होण्याची भीती उद्भवली. नजफकूलीखान व आणखी एक सेनाधिकारी. जयपूर सरहद्दीवरून तो दिल्लीकडे यायला निघाला; वर वर त्याचा हेतू शफीशी हातमिळवणी करायचा असला तरी अफ्रासियाब त्याला मधेच गुरगाव येथे आडवा आला. (१७ जुलै) गोडगोड बोलून, विनवण्या करून व समजूत घालून त्याने नजफकूलीखानला आपल्या बाजूला वळवून घेतले व त्याच्यासह तो दुसऱ्या दिवशी दिल्लीत आला. परस्परां-विरुद्ध समरास ठाकलेल्या गटांची लष्करी तयारी होती, ती अशी : अफ्रासियाब नजफकूली व लताफत अली हे असहाय अबदुल अहद समेवत एका बाजूला; तर शफी, खदिजाबेगम, मिर्झा नजफच्या नोकरीतील सर्वजण व शफीच्या बाजूचा पण त्यावेळी दिल्लीत नसलेल्या मुहमद बेग हमदानीच्या फौजा हे दुसऱ्या बाजूला. यादवी युद्धाचा प्रसंग दिल्लीत पुन्हा एकदा रस्त्यावर पहावा लागणार असे दिसू लागले. यावेळची शिपायांची स्थिती फारच केविलवाणी होती. त्यांना ना पगार, ना पुरेसे खायला. "फौजेचे लोकास एकास ठिकाण नाही, म्हणून सरकारची खातरजमा व जागिरा चालवयाचा करार करून तेच येऊन चाकरीस हजर होऊन दिल्लीसुद्धा स्वाधीन करतात, ऐसा प्रसंग पुढे दिवसगतीवर येईल. जो तो आपण जबरदस्त व्हावे म्हणतात. फितुर भारी जाला आहे." [हिंगणे दप्तर, **डीवाय;** भाग. १; लेखांक ८४]

पण हे भयानक वादळ एकदम व ताबडतोब घोंघावू लागले नाही. प्रत्यक्षात तलवारीला तलवार भिडायला दोन महिने जावे लागले. या काळात डाव-प्रतिडाव, वाद-प्रतिवाद यांनी दरबारातले वातावरण स्फोटक बनत होते. अशा प्रकारच्या वाटाघाटीतून अंतःपुराचा पर्यवेक्षक नझीर मंझूरअली याने शफीला पाठिंबा दिला. दुसऱ्याच दिवशी रमझान सुरू व्हायचा होता. या पवित्र महिन्याच्या पहिल्याच दिवशी बादशहापुढे पाच लाख रुपये नक्त मोजल्यास बादशहाने शफीला मीरबक्षीपद द्यावयाचे निश्चित केले होते. (१० ऑगस्ट) अफ्रासियाबला हा दणका घणाघाती होता. शहाला काटशह या न्यायाने अबदुल अहदला पुन्हा मुखत्यारपदावर बसवावे म्हणून त्याने बादशहाची विनवणी केली. अबदुल अहद हा बादशहाच्या खास मर्जीतला. तीन वर्षे दोघेही एकमेकांपासून दूर; लाडका अहद परत येणार या कल्पनेने बादशहाने आनंदातिशयाने उडी मारली नसती तरच नवल. नव्या मीरबक्षीची नेमणूक तूर्तास बाजूला ठेवण्यात आली. अहदचे दरबारात पुन्हा मोठ्या जिव्हाळयाने स्वागत झाले व पूर्वीची सर्व महत्त्वाची अधिकारपदे त्याला पुन्हा देण्यात आली. (११ ऑगस्ट)

हातातोंडाशी आलेला आशा-आकांक्षाचा हा अनपेक्षित कपाळमोक्ष शफीला सहन होणारा नव्हता. “कोणत्याच संघर्षाला सामोरे जावे न लागता अफ्रासियाबला सुखासुखी मिळालेले यश योग्य नव्हे असे त्याला वाटले; तरी सिंहासनाबद्दल वाटणाऱ्या आदरापोटी राजधानीत चकमकी उडाव्यात हेही त्याला बरे वाटेना.” (मुन्नालाल पृ. २५२) तरी दिल्ली शहरात दोन्ही बाजूंचे प्रचंड सैन्य गोळा झाले. एकमेकावर गुरकावू व धमकावू लागले. शहरात कोणी संरक्षण अधिकारी नव्हता. खणाखणी चुकू शकत नव्हती. २१ ऑगस्टला हा धुमसणारा वन्ही चेतला. अफ्रासियाबच्या सैन्यातला कोणी जमालखान व शफीच्या बाजूचा पौली नामक कोणी भाडोत्री जर्मन सेनाधिकारी यांच्यात काही कारणावरून झटापट उडाली; व ती बातमी वणव्यासारखी सगळीकडे पसरली. त्या दोघांनी एकमेकांविरुद्ध शस्त्रे उपसली व तोफखाना रस्त्यावर आणून त्यांनी वाटेत अडथळे तयार केले. काश्मिरी गेटपासून जामी मशिदीपर्यंत व त्रिपोली आणि काबुली गेटच्या जवळपासचा भाग व्यापून टाकला. बादशहाने आपल्या मुख्य खोजाला त्याठिकाणी पाठवून दोघांनाही एकमेकांविरुद्ध शस्त्र उपसायला मनाई केली. त्याप्रमाणे दोघांनी माघार घेतली. दिल्लीत पुन्हा शांतता झाली, पण ती त्या दिवसापुरतीच. ही परस्परविरोधी दळे दि. २४ ला पुन्हा बाहेर आली. मोर्चे बांधण्याच्या दृष्टीने त्यांनी शहरातून खंदक खणले. पण बादशहाने शस्त्र न उपसण्याबाबत पुन्हा विनंतीवजा हुकूम केला व प्रत्येक दल आपापल्या जागी परतले.

७. दि. १० सप्टेंबर, १७८२ : शफीचा जबरदस्त तडाखा : अबदुल अहद व नजफकूली यांना कैद : मुखत्यार व मीरबक्षीपदावर शफीची नियुक्ती

बंडाळीची ही सततची टांगती तलवार एकदा दूर करायलाच हवी होती. बादशहाने अफ्रासियाबला आपल्या जहागिरीच्या गावी जायला सांगितले, (३ सप्टेंबर) शफीच्या

कारवायांना अनुकूल पार्श्वभूमी निर्माण व्हावी म्हणून अफ्रासियाबच्या जहागिरीत मुहमद बेग हमदानीने खूपच धुमाकूळ घातला होता. नजफ कुलीखान हा अफ्रासियाबचा माणूस; तो दिल्लीतच मुक्काम टाकून होता. हा खुशालचेंडू मद्यपी शफीच्या तुलनेत अगदीच किरकोळ; शफीचा जोर होऊ नये म्हणून त्याने आवश्यक ती काळजी घेतली नाही, इतकेच नव्हे तर आपल्या स्वतःच्या संरक्षणाविषयीही तो बेफिकीर होता. त्याचा उद्देश केवळ शफीच्या नाकात काड्या घालणे. त्यानुसार शफी संतापला. नजफकूली अबदुल अहदच्या हवेलीत रहात होता. ती जागा सोडून तो सफदरजंगच्या घरात रहावयास आला. नवे ठिकाण किल्ल्यानजीक असल्याने त्याला आपल्या सैन्याला सहज मार्गदर्शन करता येत असे. तो स्वतः रात्रंदिवस मद्याच्या कैफात व बाईच्या मिठीत असे. लष्करी हालचालींच्या दृष्टीने जी जागरूकता व तयारी हवी होती ती त्याने केली नाही. या निष्काळजीपणाचा फायदा शफीने का न घ्यावा? रोजाचा महिना संपला, उपवासाचे पारणे (इद-उल्-फित्र) मोठ्या जल्लोषात साजरे होत होते. (१० सप्टेंबर) खाणे, पिणे या बेहोषीत सगळे मश्गुल होते. पारण्याच्या त्या रात्री शफीने आपली एक दणकट फौज व तोफखाना पौलीच्या हाताखाली दिला व त्याला अहद आणि नजफकूलीखान यांच्या निवासस्थानाला वेढा घालायला सांगितले. नजफ कूली मद्याच्या बेहोषीत शुद्ध हरपून बसलेला. त्याच्या घरात संरक्षणापुरते थोडेसे शिपाई व पाच तोफगोळे याशिवाय काही नव्हते. सकाळी नजफकूली शुद्धीवर आला. परिस्थितीचा अंदाज आल्यावर प्रतिपक्षाची जोरदार तयारी असतानाही त्याने एक दिवस व एक रात्र त्यांना तोंड दिले. शफी स्वतः जामी मशिदीच्या पायरीवर बसून होता (दि. ११) व तिथूनच हल्ले कुठून व कसे करायचे याच्या सूचना देत होता आणि शिपायांना चेव यावा म्हणून मधून मधून मूठ मूठ रुपये उधळीत होता.

अबदुल अहदला या हल्ल्याला तोंड देता आले नाही. दुपारच्या वेळी शफीचे कांही सैनिक अहदच्या घरात घुसले. हे बेताल सैनिक अंतःपुरात शिरून जनान्याची अप्रतिष्ठा करणार असे दिसताच हा वृद्ध मुखत्यार घराबाहेर आला व शफीला त्याने एकदम पांढरे निशाण दाखविले. शफीने त्याला कैद केले व इतमामाने वागवून कैदी म्हणून पुन्हा एकदा कमरुद्दीनच्या हवेलीत पाठवून दिले. त्याचा हिंदू साहाय्यक राजा शिवराम दिवाण याची अप्रतिष्ठा करून त्यालाही कैदेत टाकण्यात आले. जलालखान अफघाण हा नजफकूलीचा सर्वांत शूर सेनाधिकारी, गोळीबार करीत शत्रूची फळी फोडीत असताना ठार झाला. त्याच्यासारखा शूर जवान गेल्याने अफ्रासियाबची बाजू चांगलीच लंगडी झाली. या धुमश्चक्रीत शफीकडील एका तुकडीचा प्रमुख, सय्यद अलीखान हाही मारला गेला पण तेवढ्याने अफ्रासियाबची नुकसानी भरून येणारी नव्हती. म्हणून दुसऱ्या दिवशी (दि. १२ सप्टेंबर) सकाळी नजफकूली स्वतः होऊन बेगम खदिजाला शरण गेला. त्याला नजरकैदेत ठेवण्यात आले.

तेव्हा आता मिर्झामुहमदशफीला दिल्लीत प्रतिस्पर्धी उरला नाही. सगळ्या परिस्थितीचा आढावा घेऊन बादशहाने त्याच महिन्यात दि. १५ (सप्टेंबर, १७८२) ला

शफीची मुख्त्यार व मीरबक्षीपदावर नेमणूक केली. त्याला नासीर-उद्-दौला झुल्फिखारजंग ही भली मोठी किताबत व आग्र्याची सर्वोच्च मुख्त्यारी आणि सुभेदारी दिली. ही घटना घडून महिना होतो न होतो तोच राजकीय क्षितिजावर आणखी चित्रविचित्र रंगांचे ढग गोळा झाले. काही अगदी नव्याच शक्तींची हातमिळवणी झाली व शफीला दिल्लीबाहेर हाकलून देण्यात आले. मुखत्यार झाल्यावर नव्याने केलेल्या शत्रूंशी स्नेह जोडण्याबाबत प्रयत्न करण्याचा शहाणपणा त्याने दाखविला. अफ्रासियाबखानाला मैत्रीदर्शक पत्र पाठविले. व बेगम खदिजाकडूनही तसे पत्र लिहविले. मैत्रीचे प्रत्यक्ष प्रमाण म्हणून हमदानीने अफ्रासियाबचा जहागिरीचा प्रदेश सोडून द्यावा व पुन्हा स्वतःच्या जुन्या जागेवर यावे असा हुकूमही त्याने काढला. पण नजफकूलीला मात्र त्याने बाजूला टाकले. त्याच्या जहागिरी, त्याने आपल्या मर्जीतल्या अबदुल मतलबखानला दिल्या. नवा मीरबक्षी शफी हा सरळ, साधा व नाकासमोर चालणारा. राजकारणातील छक्के पंजे वा धुवट हास्याचा गोडवा त्याला कधीही जमला नाही. त्याच्या हडेलहप्पीपणाने दरबारातील अनेक वर्तुळात तो अप्रिय झाला.[६] त्यात वाईट म्हणजे त्याच्याजवळ पैसा नव्हता. खुद्द बादशहाच मनातून त्याचा शत्रू होता. बंडखोरांनी बळकावलेला शाही मुलूख बादशहाकडे परत आणण्याच्या कामात त्याला अपयश आले. लताफत अली हा खोजा, पूरबी पायदळाच्या चार तुकड्यांवरील प्रमुख. आपण शफीशी एकनिष्ठ राहू अशी कुराणावर हात ठेवून त्याने शपथ घेतलेली. पण बादशहाचा कल शफीविरुद्ध आहे असा वास लागताच त्याने शफीविरुद्ध कारस्थाने करावयास सुरवात केली. शफीचा जर्मन सेनाधिकारी पौली व शफीचे अन्य अधिकारी यांना लाच देऊन त्याने आपल्या बाजूला वळवून घेतले.

दरम्यान, हाताशी पैसा नसलेला शफी इतका वैतागला होता की त्याला वेड लागायची वेळ आली होती. पगार न मिळाल्याने त्याच्या सैन्यातल्या दोन तुकड्यांनी सरळसरळ बंड पुकारले व त्याच्या घराच्या प्रवेशद्वाराजवळ जमून त्यांनी आपल्या बंदुका रोखल्या. तेव्हा थोडे फार पैसे तोंडावर फेकून त्यांची समजूत काढण्यात आली. बादशहाकडून जबरदस्तीने पैसे काढायचे असे शफीने ठरवले होते. त्यामुळे बादशहा व तो, या दोघांत सरळसरळ तंटा उद्भवला व गरमागरम शब्दांची चांगलीच फैर झडली. (९ ऑक्टोबर)

८. बादशहाचा तडाखा, १६ ऑक्टोबर : शफीची दिल्लीतून हकालपट्टी

हातघाईचा प्रसंग उद्भवला तो १६ ऑक्टोबरला. पंचपंच उषःकालचा समय. शफी हा कमरुद्दीनच्या हवेलीत रहात असल्याने त्याच्या घराच्या दिशेनेच लताफत व पौली आपल्या सैन्यासह त्या बाजूलाच चालून जात असलेले दिसत होते.[७] त्याच वेळी खुद्द बादशहाची स्वारी, जामी मशिदीकडे चालली होती. या हल्ल्याला यश यावे असे आशीर्वाद देण्याचाही त्याचा मनोदय असावा. शफीने मोठ्या धोरणीपणाने बादशहाला विरोध करायचा नाही असे ठरवले व प्रसंग ओळखून आग्र्याकडे पलायन केले. बरोबर अबदुल अहदला नेण्यास तो विसरला नाही. मात्र त्या घाईत तो नजफकूलीला विसरला. त्याचा फायदा घेऊन लताफतअलीने त्याला लगेच बंधमुक्त केले. शफीच्या मागे त्याची सर्व चीज-

वस्त व तोफखाना लुटण्यात आला. बादशहाची खदिजा बेगमवर इतराजी आहे हे माहीत असूनही जय मिळविलेल्यापैकी कोणीच तिच्या वाटेला जायला धजला नाही. शहाअलमने शफीला त्याच्या सर्व अधिकारपदावरून काढून टाकले व अफ्रासियाबला पुन्हा बोलावून घेतले. वाटाघाटीचे एरंडाचे गुऱ्हाळ बरेच दिवस चालले होते. त्यातून निष्पन्न मात्र काहीच झाले नाही. खदिजा बेगम नजफखानच्याच हवेलीत ठिय्या देऊन होती. नजफचे तोफखानाप्रमुख अशुर अलीखान, याच्या हाताखालील सैनिकांचा तिला फार मोठा आधार होता.

दिल्लीहून पळालेला शफी आपल्या सैन्यासह धावतपळत प्रथम वल्लभनगरला आला व तेथून कोसी येथे गेला. तेथे त्याची मुहमदबेग हमदानीशी भेट झाली. दोघेही नजफखान या एकाच आश्रयदात्याच्या आशीर्वादाने महत्त्वास आलेले. जुन्या आठवणींना पुन्हा उजाळा मिळाला. त्या सगळ्यांची भावपूर्ण जाण ठेवून शफीने त्याला आपल्याकडे येण्याची गळ घातली, व जयपूरकडून येणे असलेली सर्व खंडणी, त्याच्याकडे असलेल्या नजफच्या मालमत्तेपैकी अर्धातोफखाना व अर्धीमालमत्ता; सहा लाख रोख किंवा त्या किमतीच्या नव्या जहागिरी देण्याचे आश्वासन दिले. हमदानीने कोसी येथे शफीशी हातमिळवणी केली व एके काळी नजफखानच्या हाताखाली असलेल्या सर्व सेनाधिकाऱ्यांनी शफी हाच आपला वरिष्ठ हे एकमुखाने मान्य केले. नंतर शफी व मुहमद बेग दोघे मिळून दिल्लीला जायला निघाले. (६ नोव्हेंबर) जाताजाता होडाळ जिल्ह्यातील शाही महसूल अधिकाऱ्यांना त्यांनी कामावरून दूर केले व फरिदाबादेस येऊन तळ टाकला.

हे दोन बंडखोर सेनाधिकारी आपल्या सैन्यासह दिल्लीनजीक आल्याचे ऐकून बादशहा घाबरला. लताफत व पौली यांनी बादशहाला अशी भर घातली की, त्याने आपल्या शत्रूवर तडकाफडकी चालून जावे व त्यासाठी बडापुला येथे तावडतोब तळ टाकावा. (१२ नोव्हेंबर) फरिदाबाद येथून शफी व हमदानीने आपले प्रतिनिधी बादशहाकडे पाठविले. (दि. १४) व आपण बादशहाशी जी प्रतारणा केली त्याबद्दल क्षमा करून बादशहाने आपले सर्व अधिकार व मानमरातब यांसह आपली पूर्वपदावर पुनश्च प्रतिष्ठापना करावी अशी प्रार्थना केली. ह्या प्रकरणाचा निर्णय करण्याचे काम बादशहाने आपला खाजगी नोकर कल्लू खवास याच्याकडे सोपविले. खवासला मुहमद याकूब खान हा किताब होता. त्याने हमदानीला वश करून घ्यावे व त्याच्या मार्फत शफीचा काटा काढावा असा धूर्त सल्ला दिला. हमदानीने शफीचा पक्ष सोडला तर त्याला मीरबक्षी करण्यात येईल असे खवासने त्याला बादशहाच्या वतीने आश्वासन दिले. या योजनेवर शिक्कामोर्तब व्हावे म्हणून लताफतने स्वतः जाऊन त्याला भेटावे व हमी देऊन आणि विश्वासात घेऊन त्याची खात्री पटवावी असे ठरले.

९. मुहमद बेग हमदानी, लताफतअली व पौलीला पकडतो (१७ नोव्हेंबर १७८२) : शफीची सर्वाधिकारी म्हणून दिल्ली दरबारात पुनश्च नियुक्ती

शफीला गोत्यात आणण्यासाठी रचलेल्या मायावी पाशात खुद्द त्या योजनेचे जनकच अडकले.[८] हा सर्व कट मुहमद बेग हमदानीने शफीला सांगून टाकला. दि. १७ ला

लताफतला भेटून पुढे त्याच्या मार्फत बादशहाकडे जायचे म्हणून हमदानी आपल्या छावणीतून बाहेर पडला; शिकारीचे निमित्त करून दुसरीकडे निघून गेला पण या कटाच्या हालचालीवर मात्र त्याचे बारीक लक्ष होते. बादरपूर नाल्याच्या दक्षिणेस ख्वाजा सराई आहे. त्या ठिकाणी लताफत, पौली व याकूब हे हमदानीला भेटले. बोलणी झाली व निरोप घ्यायची वेळ आली तेव्हा संधी साधून हमदानीने विश्वासघातकी हल्ला करून त्या तिघांना गिरफदार केले. फक्त पौली या पाश्चात्याने थोडाफार विरोध केला, त्यात त्याला जखमी व्हावे लागले. या तिघांबरोबर जे छोटेसे सैन्य होते ते हमदानीच्या सैन्याची तयारी पाहून पळून गेले; कारण बादशहाची मुख्य फौज मागे शाही तळावर होती; या छोट्या सैन्याला काहीही करता येण्यासारखे नव्हते. मुहमदबेगची त्यानंतरची पावले विजयाकडे वळणारी होती. त्याने आपल्या सैन्याची एक तुकडी दिल्लीकडे रवाना केली. (दिल्लीला कसलीही संरक्षणव्यवस्था नव्हती) लताफत व याकूब यांची सर्व जिंदगी ताब्यात घेण्याचे हुकूम त्याने या तुकडीला दिले होते; पण दिल्लीतच बेगमेकडे राहणाऱ्या शफीच्या भावाने त्या पूर्वीच ती आपल्या ताब्यात घेतली होती. " प्रलयकालाचा भास व्हावा असे प्रकार त्या रात्री दिल्लीत घडले. "

अफ्रासियाब हा काही शिपाईगडी नव्हता. पौलीसारखा धुरंधर सेनाधिकारी व राजकारणात खारावलेला मतलबी लताफत यांच्या पाठिंब्यावरच त्याच्या उड्या, तो पार कोसळला. राजकीय रागरंग पुन्हा पालटले; पुन्हा जुनेच चित्र दिसू लागले, काय थोडीफार मोडतोड झाली तेवढीच. आपल्या हाताने दुसऱ्यासाठी तयार केलेल्या कोठडीतील गजांवर आपलेच मस्तक आपटल्याने कमनशिबी शहाअलम चांगलाच हबकला. मुहमदबेग हमदानी व शफी यांनी त्याला पुन्हा लिहिले, " आमची आपल्यावरील निष्ठा अभंग आहे. कारस्थानी हितशत्रूंच्या कारवायांना बळी न पडण्यासाठी आम्हाला हे नाइलाजाने करावे लागले. कसुरीची माफी असावी." बादशहाला दुसरा पर्याय नव्हता. ' आपली कसूर माफ केली आहे ' हे या दोघांना कळविण्यासाठी आपल्या आशीर्वादासह त्याने आपल्या सर्वांत मोठ्या मुलाला त्यांच्याकडे पाठविले व शफी आणि हमदानी दिल्लीत परत आले. (२४ नोव्हेंबर) लाल किल्ल्यातील दिवाण-इ-आमच्या भव्य प्राकारात त्यांनी प्रवेश केला. त्या समयी शफी, मुहमद बेग हमदानी, अबदुल अहद व अफ्रासियाब, या चौघांनी भोयांचे जागी आम्हीच भोई व सरकारचे गुलाम आहोत, म्हणून पातशहाचे तख्त उचलून आपले खांद्यावर घेऊन अंतःपुराचे प्रवेशद्वारापाशी आणून हत्तीवर बसविले. राजनिष्ठेच्या या दर्शनानंतर आपला आदर व्यक्त करण्यासाठी ते बेगम खदिजा सुलतानला भेटले. शफीला पुन्हा मीरबक्षीपद देण्यात आले व इतरांना मानाची वस्त्रे व नजराणे मिळाले.

दुसऱ्या दिवशी हमदानीने लताफत अलीचे डोळे काढले; हेतू हा की त्याने आणखी गडबड करू नये. पौलीने अशी विटंबना करून घेण्याचे नाकारले. त्याचे तुकडे तुकडे करण्यात आले. खोजा कल्लू खवास याने मात्र हातापाया पडून व खूप पैसा देऊन आपली सुटका करून घेतली व स्वतःचा प्राण वाचवला.[१]

१०. शफी व पातशहाजादा शुको, आग्रा प्रांताच्या बंदोबस्तासाठी जातात : त्यांची तेथील कामगिरी (१७८३)

आग्रा येथे बरीच बंडाळी माजली होती. तिकडे जाऊन तिचा उपशम करावा असे मिर्झा मुहमद शफीला सांगण्यात येऊन त्याप्रमाणे त्याला तिकडे जाण्यासाठी निरोप देण्यात आला. (२२ डिसेंबर) या मोहिमेवर जाताना त्याने पातशहाजादा सुलेमान शुको व मिर्झा नजफच्या बहिणीलाही बरोबर घेतले. राजपुत्र शुको याने २३ जानेवारी, १७८३ ला आग्रा शहरात प्रवेश केला. त्याच्या नावाचा दबदबा व मिर्झाचे सशस्त्र सैन्य यामुळे बहुतेक सर्व बंडखोर नमले. राजपुत्र तिथे दोन महिने राहिला. या काळात त्याने प्रजेची गाऱ्हाणी ऐकली. आग्रा शहरात पुन्हा एकदा शांतता व सुव्यवस्था नांदू लागली.[१०] इंग्रजांकडील मेजर ब्राऊन हा मीरबक्षीला भेटायला म्हणून त्या ठिकाणी आला होता. (२७ फेब्रुवारी) वॉरन् हेस्टिंग्जला बादशहाची भेट घ्यायची होती, त्याची ही पूर्वतयारी होती.

त्या नंतरच्या पुढील महिन्याचे सुरवातीस शिखांचा एक भला मोठा जथा मध्य अंतर्वेदीतून परत येत होता. वाटेत त्यांनी दिल्लीची हवा तंग करण्याचा प्रयत्न केला. दिल्लीच्या उत्तरेकडून आल्यानंतर ते दिल्लीच्या इतके नजीक होते की बराडी या खेड्यावर हल्ला करणे, मलिकगंज व सब्जीमंडी या भागांना आगी लावणे व मुगलपुऱ्यात घुसून जमेल तेवढ्यांना ठार करणे हे त्यांना सहजी शक्य होते. (८ मार्च) बादशहाने तातडीचा निरोप पाठविल्यावर दिल्लीकडे येण्यासाठी म्हणून शफी, शिकंदराहून सैन्यासह परत फिरला. (१५ मार्च) त्या आधी झैन-उल-अबीदीन व त्याचे सैन्य बागपतहून दिल्लीस येऊन पोचल्याने शीख पळून गेले होते. (१२ मार्च) हा धोका संपल्याने आपला उत्तर मोर्चा रद्द करून शफी जाट-राजांवर चालून गेला. रणजितसिंगाने मुहमद बेग हमदानी बरोबर या आधीच सख्य केलेले असले, तरी शफीने त्याला कवडीचीही किंमत दिली नाही. खंडणीची रक्कम द्यायला रणजितची तयारी होती, पण त्याचा मुलगा रणधीरसिंग याच्या जहागिरी परत कराव्यात अशी शफीची नवीच मागणी होती. तिला मात्र त्याने नकार दिला. शफी त्यानंतर आग्राहून निघाला व फत्तेपूरसिक्रीमार्गे सय्यदपूरला जाऊन तेथील सर्व जाट मुलूख त्याने उजाड करून टाकला. सय्यदपूर येथे त्याने आपले ठाणे ठेवले व तिथून तीन मैलांवर असलेल्या बयानाच्या किल्ल्याला त्याने वेढा घातला व हल्ला चढवून, शत्रूचे अनेक जण ठार करून अवघ्या तेहतीस दिवसांत तो सर केला. (९ मे) अखेगड व त्या भागातील जाटांच्या ताब्यातील अन्य किल्ल्यांवर ज्या शिबंदी होत्या त्यांनी घाबरून किल्ले खाली केले व संपूर्ण बयाना जिल्हा शाही शासनाखाली आला. दरम्यानच्या काळात शफीच्या सैन्याची एक तुकडी फिरोजपूर झरका येथे माचेडीराजाच्या सैन्याशी लढत होती. शफी आपल्या सैन्यासह त्याच्या मदतीला गेला व त्याने कन्वारी पहाडी (का पहाडी कांडला ?) या गढीला वेढा घातला व त्यावर तोफांचा भडिमार सुरू केला. त्यानंतर त्याला लवकरच दक्षिणेकडे परतावे लागले. महादजी शिंदे चंबळेच्या काठी तळ टाकून होता,

त्याला भेटून तहाची काही बोलणी पक्की करायची होती. वाटेत त्याची हमदानीशी भेट झाली. (१० जून) त्यावेळी या दोन प्रतिस्पर्धी सेनाधिकाऱ्यांत जो तंटा उद्भवला त्यामुळेच पुढे, शफीच्या यावेळपर्यंतच्या यशस्वी कामगिरीचा सत्यानाश झाला.

११. शफी व हमदानी यांच्यातील तंटा

हा तंटा कसा वाढत गेला हे मुळापासून पहाणे जरूर आहे. शफी पुन्हा विजयी होऊन दिल्लीदरबारात अधिकारावर आला. लताफतअली व पौली हे दोन ताकदवान प्रतिस्पर्धी. या दोघांचा काटा पुरा उपटून शफीला निर्भय करण्यात हमदानीचा सिंहाचा वाटा. शफीशी प्रामाणिक राहून त्याच्या प्रतिस्पर्ध्यांना त्याने नेस्तनाबूद केले नसते तर शफीला हे दिवस दिसणे कठिण होते. शफी पुन्हा अधिकारावर आला तो १७ नोव्हेंबर १७८२ या दिवशी. हा विजयाचा क्षणच या दोघांच्या मैत्रीत बिब्बा घालणारा ठरला. मुहमदबेगने दिलेल्या साहाय्यापोटी त्याला भरमसाट पैसा, जहागिरी व युद्धसाहित्य द्यावयाचे शफीने आश्वासन दिले होते खरे, पण ते प्रत्यक्षात आणणे सोपे नव्हते. त्याखेरीज मुहमदबेगची घमेंड व महत्त्वाकांक्षा त्याच्या हिंसक व विश्वासघातकी वृत्ती इतक्याच अमर्याद होत्या. लताफत अली व पौली यांच्यावर डाव उलटवून त्याने त्यांना शब्दशः जगातून उठविले; व आपल्या बेलगाम फौजांना दिल्लीच्या वाटेवरील अनेक गरीब प्रजाजनांना लुटू दिले व दिल्लीतील प्रजाजनांनाही हैराण करू दिले. शफीने त्याच्या या कृत्याबद्दल योग्य अशीच नापसंती दर्शविली; त्यालाही हमदानी जुमानीसा झाल्यावर त्याने त्याच्याशी बोलणेच टाकले. हमदानीही कमी नव्हता. त्याने आपल्या मागण्यात वाढ केली व पुढील मागण्यावर नव्याने हक्क सांगितला : (१) बारा लाखांच्या नव्या जहागिऱ्या (२) मृत मिर्झानजफचा तोफखाना व जिंदगी यांचा अर्धा हिस्सा, व (३) जयपूरकडून यावयाच्या खंडणीचे बादशहाचे संपूर्ण हक्क त्याला देणे. शफीने नवाच पवित्रा घेतला. माचेडीराजाच्या वतीने दरबारात बोलण्याचे नाटक करून मुहमदबेग हा खंडणीची रक्कम मधल्यामधेच बळकावयाला पहातो आहे, असे त्याने भासविले. लताफत अली व पौली यांच्या छावणीत व घरांवर छापे घातल्यानंतर मुहमदबेग हमदानीने जी लूट मिळविली तिचा अर्धा वाटा आपल्याला मिळाला पाहिजे अशी शफीने मागणी केल्यावर तर हा तंटा आणखीच भडकला, तो शमविण्याचे सर्व प्रयत्न फुकट गेले. मुहमद बेग हमदानीची नेमणूक जयपूर सरहद्दीवर करण्यात आली. त्यानुसार १० डिसेंबर, १७८२ ला तो तिकडे जाण्यास निघाला. बादशहाचा नोकर म्हणून तो तिथे गेला असला तरी प्रत्यक्षात त्याने तिथे त्याच्याविरुद्धच आघाडी उघडली.

हमदानी आग्रा येथे आला. तेथील व्यापारी व सावकार यांच्याकडून त्याने सक्तीने पैसे उकळले. गरीब रयतेलाही भरपूर लुबाडले. शफीशी दोन हात करावे लागणार तेव्हा सावधगिरी असावी म्हणून त्याने स्वतःला रणजितसिंगाचा पाठिंबा मिळवला. त्याची खंडणीची रक्कम कमी केली व जाटांच्या मुलुखातील हल्ले थांबवले. माचेडी राजा हा आधीपासूनच त्याचा आश्रित. आग्रा-मेवत भागात आपली सत्ता प्रस्थापित करण्याची धमकी

हमदानीने दिली; बादशहाच्या तेथील अधिकाऱ्यांना त्याने केव्हाच गुंडाळून ठेवले. हाती असलेला अधिकार आणि आर्थिक क्षमता यापेक्षा कितीतरी मोठ्या प्रमाणावर त्याने आपले सैन्य उभारले. त्या काळच्या सेनानायकांत त्याचे नाव प्रामुख्याने घेतले जाई; त्यामुळे आपल्याला ह्याच निश्चितपणे नोकरीवर ठेवील या खात्रीने भाडोत्री मुगल शिपायी आपण होऊन त्याच्या सैन्यात भरती होऊ लागले. यातूनच बादशहाच्या सनदशीर सत्तेला फार मोठा धोका निर्माण झाला होता.

पातशहाजादा सुलेमान शुको समवेत शफी, आग्रा येथे आला तेव्हा (जानेवारी; १७८३) हमदानी राजपुत्राची गाठ घेण्यासाठी थांबला होता. मागील सर्व आश्वासने पूर्ण करणार असल्याचे सांगून शफीने त्याच्याशी सलोखा करण्याचा प्रयत्न केला. त्यानुसार हमदानी, जयपूरला परत गेला; वाटेत करौली येथील राजाकडून खंडणी वसूल करायला तो विसरला नाही.

१२. हमदानीचा काटा काढण्यासाठी शफीचे महादजी शिंद्याशी गुफ्त गूं: शिंदे राजपुत्राला व शफीला भेटतो. (जून १७८३)

शफीने आपल्या बलाढ्य प्रतिस्पर्ध्याचा जोर कमी करण्यासाठी आता चंग बांधला होता. मुहमदबेगच्या सैन्यातील अधिकाऱ्यांना– विशेषतः मुगल सेनाधिकाऱ्यांना– आपल्या बाजूला वळविण्याचा त्याचा प्रयत्न आधीपासूनच सुरू होता, तोच त्याने नेटाने चालू ठेवला. शासनातील एक प्रमुख अधिकारी म्हणून हमदानी जोपर्यंत त्याच महत्त्वाच्या जागेवर आहे तोपर्यंत आपली सर्वोच्च अधिकाराची जागाही डळमळीत आहे असे शफीला स्वतःलाच वाटत होते. अफ्रासियाबखान व हिंमतबहादुर गोसावी यांनी त्याच्या या मताला दुजोरा दिला. हमदानीला दडपायचा म्हणजे महादजीचीच मदत हवी.[११] महादजी हा इंग्रजांचा मित्र व इंग्रज आणि पेशवे यांच्या तहातील मध्यस्थ. या त्याच्या कीर्तीने उत्तर हिंदमधील स्थानिक सत्ताधाऱ्यांत त्याला फार मोठे महत्त्व प्राप्त झाले होते. शफीने हिंमत बहादुरला माळव्यात शिंदे याच्या छावणीवर पाठविले व त्यांची भेट घेऊन त्यांचे साहाय्य मिळविण्यासाठी बोलणी करावयास सांगितले. बोलणी होऊन त्याला मूर्तस्वरूप येण्यासाठी बराच काळ जावा लागला.

हमदानीचे दरबारातील महत्त्व कमी व्हावे म्हणून शफीने बरोबर डाव टाकला. बादशहाच्यावतीने त्याने जयपूरच्या राजाला पत्र लिहून ताकीद दिली की, जयपूरराजाने खंडणीची रक्कम मुहमदबेग हमदानीच्या स्वाधीन करू नये. हमदानीने रणजितसिंगाशी समझोता केला होता. त्याचा मान राखण्यासाठी रणजितसिंगावर शस्त्र उचलू नये, अशी त्याने शफीला विनंती केली होती; तीही शफीने मानली नाही. उलट जाटराजाविरुद्ध त्याने असा काही जोरदार पवित्रा घेतला की, त्यामुळे हमदानी अडचणीत आला. म्हणून समक्ष भेटून बोलणी करावी व तंटा मिटवावा यासाठी १० जून, १७८३ रोजी मुहमद बेग स्वतः होऊन शफीला भेटायला आला. खूप शब्दाशब्दी व तणातणी झाली. शेवटी

हमदानीने जाट व माचेडी राजा यांच्याशी जी तडजोड केली होती तिला त्याने मान्यता दिली, कारण ठरलेल्या दिवशी शिंदे यांना भेटणे हे जास्त महत्त्वाचे होते.

या आधीच्या कित्येक महिन्यांपासून शफीने हिंमतबहादुरमार्फत शिंदे याच्याशी सूत जुळविण्याचा प्रयत्न चालू ठेवला होताच. त्याने गोसाव्याच्या हातून बोलणे लाविले की " आमची आपली भेट होऊन स्वच्छता व्हावी. नजफखानाचा आपला भाऊपणा होता. त्याचा काल जाला. त्याचे पाठीमागे आम्हास आपण वडील आहात. आमचा परामर्श करावा. यात परस्परे लौकिक आहे." शिंद्याच्या मागे अनेक व्याप असल्याने शफीच्या पत्राला उत्तर द्यायचे तसेच राहून गेले. मग जूनमध्ये शफीला भेटायचे त्यांनी मान्य केले. पण पाटीलबावांनी सांगून पाठवले की, " आमदानी जयपूरहून माघारा आला आहे. त्याची भेट आम्ही घेणार नाही. तुम्ही त्यास समागमे घेऊन येऊ नये. पातशहाजादा व नजफखानाची बहीण बेगम यांस घेऊन यावे." मीरबक्षी शफीने नगर (दिगच्या पश्चिमेस १५ मैल) येथे हमदानीची भेट घेतली व तो तातडीने आग्र्यास आला. राजपुत्र व नजफच्या बहिणीस त्याने आपल्या बरोबर घेतले व फत्तेपूरसिक्री व कागरोळ मार्गे २२ जूनला तो धोलपूरच्या वायव्येस पंधरा मैलांवर असलेल्या बासई या ठिकाणी आला. मुहमदबेग त्याच्याच मागे सहा मैलांवर तळ टाकून होता. महादजीचे सैन्य ग्वाल्हेर किल्ल्याच्या वेढ्यात गुंतलेले; त्याला तिथेच ठेवून जरूरीपुरते सैन्य घेऊन महादजी चंबळानदीच्या पैलतीरी येऊन दाखल झाला.

२७ जून, १७८३ या दिवशी शिंदे व शफी यांची पहिली गाठभेट झाली. तीन दिवसांनंतर मराठ्यांचा प्रमुख सरदार महादजी, शाही छावणीत दाखल झाला. मीरबक्षी शफीने त्याची पातशहाजाद्याशी मुलाजमात घडवून आणली. इंग्रजांचा तेथील स्थानिक वकील डेव्हिड अँडरसन व त्याचे साहाय्यक यांची महादजीने पातशहाजाद्याशी भेट घडवून आणली. मीरबक्षी मिर्झा शफीसमवेत इंग्रजांचा मेजर ब्राउन होता. शफीने महादजी-समवेत त्याची भेट घडवून आणली. परस्परांशी अधिक परिचय होऊन स्नेहसंबंध दृढ व्हावेत म्हणून हिंमत बहादुरच्या पुढाकाराने चार दिवस सल्लामसलती व बोलणी चालली होती. शिंदे बेगम खदिजाला भेटले व तिच्या कर्तबगार भावाच्या मृत्यूबद्दल चार सांत्वनपर शब्द बोलले. जसा नजबखान यांचा भाऊपणा होता, त्याप्रमाणेच मिर्झा शफीने पगडीबदल भाऊपणा बावांसी करून, ' सर्वप्रकारे आम्ही आपले आहो. दिल्लीकडील बंदोबस्त यथास्थित नाही, या करिता आपण तिकडे चलावे. आमचा बंदोबस्त पातशाहीचा करून द्यावा ' याप्रमाणे बोलणे लाविले. बावांनी उत्तर केले जे, ' उत्तम आहे. ग्वालेर गोहदची मसलत उरकली म्हणजे बादबरसात तिकडे येऊन तुमचा बंदोबस्त यथास्थित करून देतो ' दि. १ जुलैला बोलणी संपली. शिंदे ग्वाल्हेर येथील किल्ल्यासमोर असणाऱ्या आपल्या फौजेच्या तळाकडे निघाले व शाही लवाजमा दिगकडे गेला. (राजपुत्र या ठिकाणी १८ जुलै रोजी आला.)

१३. हमदानी मुहमद शफीला ठार मारतो : २३ सप्टेंबर, १७८३

मिर्झा शफीने शिंद्याला भेटून त्याच्याशी संधान बांधले ही घटना हमदानीला आवडली नाही. शफी हा अगदी बेभरवशाचा व त्याच्याशी मैत्री म्हणजे सुळावरील पोळी, हे तो समजून चुकला. त्यानंतर त्याने उघडउघड बंडखोरी पुकारली. शफीच्या हुकुमांना केराची टोपली दाखवीत त्याच्या आग्रा प्रांतातच त्याने धुडावा मांडला. मिर्झा शफीने अफ्रासियाबला आपल्याकडे बोलावून घेतले व या अस्तनीतल्या निखाऱ्याची कशी वाट लावायची याबाबत त्याचा सल्ला मागितला. पण हा सल्लागारच उलट्या काळजाचा ठरला. त्याने शफीला साफ तोंडघशी पाडायचे ठरविले. मुहमदबेगचे मन वळवता आले तर पहातो. असे सांगून त्याने मुहमदबेगची भेट घेतली व 'शफीला विश्वासघाताने ठार मारावे' असा सल्ला त्याला दिला. अफ्रासियाबला मीरबक्षीपद मिळण्यात शफीचाच अडथळा होता. आतबाहेर काही नसलेला सरळ मनाचा शफी या जाळ्यात सहजी अडकला. बंडखोर सेनाधिकारी मुहमदबेग हमदानी हा पातशहाजाद्यासमोर संपूर्ण क्षमायाचना करून शरणागती देणार आहे, पण असे करण्यापूर्वी आपल्या जीविताला काही दगा होणार नाही, अशी हमी त्याला हवी असल्याचे अफ्रासियाबकडून सांगण्यात आले. त्यासाठी त्याला शफीशी मित्रत्वाची भेट हवी होती. अशी भेट घेऊ नये असे त्याचे हितचिंतक सांगत असताही शफीने भेट घ्यायचे कबूल केले. मुहमदबेग आपल्या सैन्यासह शाही छावणीपासून आठ मैल मागे दिग येथे तळ टाकून राहिला.[१२]

दि. २३ सप्टेंबर हा उभयतांचे भेटीचा दिवस ठरला. भेटीची जागा दिगपासून साधारण पाच मैलांवर होती. त्या ठिकाणी येण्यासाठी मुहमदबेगने प्रथम छावणीबाहेर पडायचे होते. शफी आपल्यासमवेत लहानसा फौजफाटा घेऊन किल्ल्याबाहेर पडला तेव्हा सूर्यास्ताला चार तास बाकी होते. घोड्यावर स्वार होत असताना त्याचे पागोटे खाली पडले. हा अपशकुन समजून त्याच्या हितचिंतकांच्या मनात शंकेची पाल चुकचुकली. ते नको म्हणत असता अपशकुनाला महत्त्व न देता घोड्याऐवजी तो हत्तीवर बसला व रस्ता चालू लागला. वाटेत त्याच्या हेरांनी त्याला बातमी दिली ती अशी की नेहमीचा शिरस्ता सोडून हमदानी हा खूप मोठे सैन्य घेऊन आला आहे. पण सरळ मनाचा हा शिपाईगडी वाट चालतच राहिला व उजळ माथ्याने मुहमदबेगला भेटायला गेला. मुहमदबेग हत्तीवर स्वार झालेला असून त्याचे साहाय्यक त्याच्या सभोवतालच्या पाच सहा हत्तींवर बसले होते.

परस्परांना भेटण्याच्या पवित्र्यात शफी उभा राहिला तशी मुहमदबेगने त्याचे दोन्ही हात आपल्या हातात घेतले. शफी नाजूक व पोरसवदा. हात सोडवून घेण्याच्या प्रयत्नात असता इस्माइलबेगने शफीच्या हत्तीवरील बैठकीत उडी घेतली व पेशकबज पोटात चालवून मिर्झा शफीखानास जबर जखमी केले. इस्माइलबेग हा हमदानीचा पुतण्या. तो जवळच एका हत्तीवर बसलेला असल्याने उडी मारणे त्याला सोपे गेले. शफीच्या नात्यातला मुहमद अमीनखान हा त्याच्याच मागे बसलेला होता. त्याने मारेकऱ्यावर झडप घातली, दोघेही खाली कोसळले; व मुहमदबेगच्या एका नोकराने उरलेली कामगिरी

संपवली, त्यानेही शफीला खंजीर मारला व त्याची उरलेली धुगधुगी संपवली. मुहमद अमीन ठार झाला. तसेच शफीचा स्वामिनिष्ठ सेवक दाउद बेग कुर्ची हा लढायला पुढे सरसावला पण त्यालाही मारण्यात आले. त्यानंतर हमदानीची मुख्य फौज त्याठिकाणी आली. दोन्ही बाजूंनी थोडा वेळ तोफा दणाणल्या व संख्येने अगदीच थोड्या आणि कुणी नेता नाही अशा अवस्थेत असलेल्या शाही फौजा पळून गेल्या. त्या ठिकाणी सर्वात शेवटी आलेला अफ्रासियाब पळून जाण्याच्या बाबतीत आघाडीवर होता. मुगल साम्राज्याचा शेवटचा लढवय्या मीरबक्षी मिर्झा मुहमदशफी अगदी तरण्याताठ्या वयात या काळ्याशार कारस्थानाचा बळी झाला. या कृष्णकृत्याने जी परिस्थिती उद्भवली त्याबाबत मराठ्यांचा वकील अगदी अचूक वर्णन करतो, "मिर्झासफीखान मारला गेला. हिंदुस्थान सारे रिकामे पडले आहे. हिंदुस्थानात लढाईला तरवार राहिली नाही" (**डीवाय** : भाग १ लेखांक ९१).

१४. अफ्रासियाबखानाची मीरबक्षीपदावर पुन्हा नेमणूक : ऑक्टोबर, १७८३

मिर्झा मुहमदशफीच्या खुनाची धक्कादायक वार्ता, खून झाल्यापासून चाळीस तासांत दिल्लीत येऊन थडकली. ती २५ सप्टेंबरची सकाळ होती. या कटात अफ्रासियाबखानाचा हात असल्याचा संशय असला तरी तो सिद्ध करता येण्यासारखा नव्हता. शिवाय शफीच्या जागी नेमणूक करण्यास अफ्रासियाबइतका दुसरा कुणी मातब्बर नजेरसमोर नव्हता. शहाअलम व अबदुल अहद यांना वेगळीच शंका भेडसावीत होती. 'मेजर ब्राउन फिरंगी त्याजपाशी आहे. त्यास फिरंगी व अफराशाबखान एक विचारे होऊन सिलेमा सीको पातशहाजाद्यावर तेथे छत्र फिरऊन बखेडा केला, तर काय करावे?' अफ्रासियाबचा सततचा स्नेही अबदुल अहद याच्यामार्फत अफ्रासियाबला घेऊन येण्यात एक क्षणही व्यर्थ घालवणे महागात पडणारे होते. मिर्झा नजफचा पुराणा स्नेही 'राजे मतीराम व मेहदी कूलीखान यांनी पातशहापासी पैगाम केला, की तीन लक्ष रुपये नजराणा घ्यावा आणि मिर्झासफीचा भाऊ जैतुल आबदीखान दौलतीचा वारस आहे, यास मीरबक्षीगिरीची वस्त्रे द्यावी म्हणून पैगाम केला' पण अफ्रासियाबखान हेच मोठे संकट असल्याने ते टाळण्यासाठी त्याची मीरबक्षीपदावर तातडीने नेमणूक केली गेली व सवड होताच राजपुत्रासह ताबडतोब दिल्लीस यावे असा हुकूम गेला. 'बादशहा सरकारचे फौजेची मार्गप्रतीक्षा पर्जन्यन्याये करितात. जर सरकारचे फौजेचे आगमन सत्वर होय, तर उत्तम आहे. नाहीतर हे संस्थान हातचे जाते' (**डीवाय**: भाग १ लेखांक ९२,९४).

अफ्रासियाबखानला दुसऱ्यांदा मिळालेली ही मुखत्यारी जेमतेम तेरा महिने टिकली. त्याच्या पापकृत्याचा झाडा त्याला नाही म्हटले तरी द्यावा लागलाच. अशी काही परिस्थिती उद्भवली की २ नोव्हेंबर १७८४ ला त्याचा अधिकार संपुष्टात आला. या कालखंडात महत्त्वाचे असे काहीही घडले नाही. त्याच्या मिळमिळीत राजकारणाने दरबारातल्या गोंधळात आणखी भर पडली, राजसत्तेचा दबदबा व सामर्थ्य कमी झाले. त्याचवेळी महादजीच्या कुंडलीतील सर्व ग्रह उच्चीचे होते. उत्तर हिंदच्या राजकीय क्षितिजावर

त्याच्या कर्तृत्वाचा शुक्रतारा ऐन तेजाने झगमगत होता. १७८४ अखेर उत्तर हिंदमधील राजकीय वर्तुळात सर्वांना दरारा वाटावा अशीच त्याची प्रतिमा होती.

मिर्झा शफी ठार झाला त्यानंतर त्याच्या सर्व शोकाकुल सैनिकांसह अफ्रासियाबखान आपल्याला केवढा शोक झाला आहे हे दाखविण्यासाठी दिल्लीस आला. त्याने खूप अश्रू गाळले व शफीच्या मारेकऱ्याचा आपण पुरेपूर सूड घेऊ अशी बेगम खदिजा सुलतानसमोर जाहीर प्रतिज्ञा केली. अशाप्रकारे आपल्या दुःखाचे जाहीर प्रदर्शन करीत असतानाच त्याने हमदानीला आतून असा सल्ला दिला की हमदानीने धोलपूरबारी येथील आपल्या जहागिरीच्या मुलुखात निघून जावे. त्यासाठी त्याने त्याला पैसे दिले. 'तुम्हाकडे मुलूख ढवळपूर वगैरे आहे तो, व रावराजा प्रतापसिंग याजकडील मामला व जयपूरकर राजे प्रतापसिंग याजकडील मामला बदस्तुर तुम्हाकडे बहाल आहे. याप्रमाणे बोलणी पक्की करून त्यास आज्ञा दिधली'; व योग्य वेळ साधून तुझ्या कसुरीची बादशहाकडून माफी आणवतो असे आश्वासनही दिले[१३] [**डीवाय** : भाग १ : लेखांक, ९३].

शफीने नेमलेल्या अधिकाऱ्यांकडून आग्रा येथील कारभार आपल्या हाती घेणे व तेथील बंडखोरांचे पारिपत्य करणे हे मुखत्यारपद स्वीकारल्यानंतरचे अफ्रासियाबपुढील पहिले काम होते. त्यासाठी सैन्य बरोबर घेऊन तो दिगहून निघाला. शफीची बेगम, त्याची सर्व धनदौलत व सेना त्याच्याबरोबर होती. तो सिकंदरा येथे असतानाच दिल्लीहून त्याच्यासाठी पाठविण्यात आलेला मीरबक्षीपदाचा खलिता, मानाची वस्त्रे इ. त्यास मिळाले. त्याचा त्याने दि. १८ ऑक्टोबरला औपचारिक स्वीकार केला. दिग, आग्रा येथे शफीने नेमलेल्या अधिकाऱ्यांना काढून त्या जागी त्याने आपले अधिकारी नेमले. या कामात थोडाफार वेळ गेला. नंतर राजपुत्रासह १४ डिसेंबरला तो दिल्लीत आला. ज्या दिवशी अफ्रासियाबखानाला बादशहाच्या दरबारात मानाची जागा मिळाली तोच दिवस अब्दुल अहदच्या आयुष्यातही भाग्यशाली ठरला. बादशहाच्या या लाडक्या वृद्ध अहदला दि. १० नोव्हेंबरला, शर्फ-उद्दौला, उमदत-उल्-मुल्क, मदार-उल्-मुल्क, अब्दुल मजीद खान बहादूर, फत्तेजंग (त्या शिवाय पहिल्या, मज्ज-उद्-दौला, बहराम जंग या पदव्या होत्याच) असे बडेबडे किताब बहाल करण्यात आले. ९,००० जात, ९,००० पायदळ दुहस्पा-सहेस्पा आणि याच्यात दोन बारावर्दींचा समावेश केला तर २४,००० जात, मनसब बाळगण्याइतका तो मोठा झाला. नजफखानच्या माणसांवर त्याने सूड उगवला. नजफखानचा प्रमुख सेवक स्वामिनिष्ठ राजा मनीराम व महदी कूलीखान यांना त्याने कैदेत टाकले (१४ नोव्हेंबर) आणि त्यांची मालमत्ता जप्त केली.

१५. शिखांचा अंतर्वेदीवर हल्ला : अफ्रासियाब तेथपर्यंत चालून जातो (डिसेंबर, १७८३) व मिर्झा झैन-उल-अबीदीन आणि झबिता यांच्याबरोबर संगनमत करतो.

दरम्यानच्या काळात शिखांचा नेहमीपेक्षा फार मोठा जथा अंतर्वेदीतील वरच्या भागात घुसला होता.[१४] "पटलाईच्या आसपासील सीख किरकोळी सरदार मिळून, चौदा-

पंधरा हजार स्वार व पंधरावीस हजार प्यादे, बमय बायका लेकरेसुद्धा, तिकडे काळ पडला म्हणून पोट भरावयास, या प्रांती बुढ्या सारंगपूरचा घाट यमुना उतरून आले आहेत. अंतर्वेदीत सारंगपूर वगैरे आसपासचे गाव लुटून ताराज केले. पुढे कूच करून देवानेस आले."

"इकडून जे सीख भागसिंग व भंगेलसिंग वगैरे अंतर्वेदीत रखीवाले होते ते, व जाबेतखान यांची फौज व दोन पलटणे व नाहारसिंग गुजर, वगैरे जमाव करून गोसगडाकडे गेले. त्यांसी यांसीं झुंज जालें, शेवटी जाबेतखानाकडील फौजेने शिकस्त खाऊन, माघारा पळून गोसगडास आले" (**डीवाय :** भाग १ : लेखांक, ९६) मीरतपर्यंत माघार घ्यावी लागलेल्या शिखांना हातमिळवणी करण्यास या ठिकाणी झैन–उल–अबीदीन हा नेमका मिळाला. हा शफीचा भाऊ. आपल्या भावाच्या खुनात अफ्रासियाबचा हात या कल्पनेने तो आधीच भडकलेला; त्यात भर म्हणून त्याची मीरत प्रांतातील जहागिरी त्याच्याकडून काढून घेण्यात येऊन अबदुल अहदचा जावई कुतुबुद्दीन याला देण्यात आली होती.

शिखांसारख्यांचे आक्रमण परतवून लावणे, व मधल्या अनागोंदीत जोर करू लागलेल्या स्थानिक बंडखोरांना जरब बसविणे, ही दोन कामे करण्यासाठी अफ्रासियाबखानला अंतर्वेदीत पाठवण्यात आले होते. तो दिल्लीत आल्यापासून एका आठवड्यात हे घडले. राजपुत्र सुलेमान शुको व नजफ कुलीखान (याला दि. ५ नोव्हेंबरला नायब मीरबक्षी करण्यात आले होते) त्याच्या समवेत होते. नव्या अमीर-उल्-उमरावाच्या सैन्यात शिपायांच्या चार पलटणी, एक हजार मुगलीया स्वार व एक हजार शीख सैनिक अशी वाढ केलेली होती. ही सेना मीरतपासून आठ मैलांवर असलेल्या मुदबराल खेड्यापर्यंत आली. येताना वाटेतील सर्व बंडखोरांचा त्यांनी बीमोड केला वा त्यांना पळवून लावले. झैन हा बागपतपासून सैन्य घेऊन आला होता. दोन हात करायची त्याची तयारी होती. अफ्रासियाबने मोठ्या धूर्तपणे त्याला शांत केले. 'मला व बेगम खलिदाला भेट' असे सांगून 'दगा होण्याची भीती वाटत असल्यास त्रयस्थ अशा बेगम समरूच्या सैनिकांसमवेत ये' असे सांगितले. (२३ डिसेंबर) त्यानंतर अफ्रासियाबने झैनची राजपुत्राशी भेट घडवून आणली व या तिघा सेनाधिकाऱ्यांनी बादशहाची चाकरी एकनिष्ठपणे करण्याच्या शपथा घेतल्या. मीरत प्रांतात झैनचे अकरा सुभे होते, त्याची मालकी त्याच्याकडे परत द्यायची की नाही याचा निर्णय बादशहाने घ्यायचा होता. यानंतर काही आठवडे गेले. नव्याने एक झालेले हे तीन सेनाधिकारी मीरत गावातील सूरजकुंडाजवळ थांबले. या ठिकाणी अफ्रासियाबने झबिताखानला बोलावून घेतले (१५ जानेवारी, १७८४), त्याची राजपुत्राशी भेट घडवून आणली व त्याने अंतर्वेदीतील वरच्या भागात शिखांना शिरकाव करू देऊ नये असे ठरविले गेले. त्यानंतर दि. २८ जानेवारीस ते दिल्लीत आले [**डीवाय :** भाग १ : लेखांक : ९८, १२४].

१६. दिल्लीत मेजर जेम्स ब्राउन : त्याच्या योजनांचा बोजवारा

बादशहा व मीरबक्षी अफ्रासियाब यांच्यांत एक जबरदस्त तंटा उद्भवला. याबाबत अहदनेच बादशहाला भडकावले होते. मुहमद शफीच्या जागी मुखत्यारपदावर नेमणूक झाल्यास अफ्रासियाबने बादशहाला खूप मोठी रक्कम देण्याचे आश्वासन दिले होते. ते पुरे करणे त्याला अगदी अशक्य होते. तसेच बादशहाच्या घरी व खाजगीसाठी दरमहा एक लाखाहून जो अधिक खर्च लागे त्याची तरतूदही अफ्रासियाब करू शकत नव्हता. बादशहाच्या ताब्यातील सर्व मुलुखातला महसूल गोळा करण्याचा अधिकार जसा नजफखानला होता तसा आपल्याला देण्यात आला नाही अशी त्याची तक्रार होती. हे अधिकार आपण आपल्याच हातात ठेवणार असे बादशहाने ठणकावून सांगितले; तेही बरोबर होते, नाहीतर त्याची उपासमार झाली असती. जयपूर राजाकडून खंडणी वसूल करण्यासाठी खुद्द खाविंदांनी बाहेर पडावे असे अफ्रासियाबने ठरवले, पण बादशाही इतमामाला साजेसा खर्च करण्याइतका पैसा तिजोरीत नव्हता. थोडक्यात खंडणी वसूल करायची तर त्यासाठी आधी खर्च करायला हवा, व खर्च करायचा तर हाताशी पैसा हवा, अशा दुष्ट वर्तुळात सर्व फिरत राहिले. अफ्रासियाबला आणखी एक संभाव्य संकट दिसत होते. बादशहा किंवा राजपुत्र यांना बरोबर न घेता फक्त शाही सैन्य घेऊन मोहिमेवर जावे तर बादशहाच्या संरक्षणाचे सबबीखाली अबदुल अहद, अयोध्येहून इंग्रजांच्या पलटणी आणील व आपल्याला हाकलून देईल. म्हणजे बादशहाला बरोबर घेऊन जावे तर त्याच्या इतमामाला साजेल असा खर्च करण्यासाठी पैसा नाही, बादशहाला ठेवून जावे, तर आपलीच गठडी वळण्याचा संभव, या शृंगापत्तीत तो सापडला. अबदुल अहदचा वॉरन् हेस्टिंग्जशी बराच काळ मित्रत्वाचा पत्रव्यवहार चालू होता; नेमक्या याच वेळी वॉरन् हेस्टिंग्जचा खास वकील मेजर ब्राउन हा दिल्लीत होता.[१५] मराठ्यांचा कैवार घेणारी अशी काही मित्रमंडळी दरबारात होती. मेजर ब्राउन त्यांच्या विरुद्ध होता; व इंग्रजांशी मैत्री करावी असे सांगणाऱ्या सरदारांचा एक गट तयार करण्यात गर्क होता. अबदुल अहदची अफ्रासियाब-समोर उघड उघड दंड थोपटून उभे रहाण्याची छाती नव्हती; त्यामुळे इंग्रज नकोत हे धोरण विजयी झाले.

शफी व रणजितसिंग यांच्यात खुद्द मेजर ब्राउनने समझोता घडवून आणला होता. त्यानुसार जाट राजाने खंडणीदाखल नव्वद हजार रुपये द्यावयाचे व राजकुमार रणधीरसिंग याच्या मालकीच्या जहागिरी असलेला बयाना प्रांत मुगल सेनाधिकाऱ्यांनी सोडून द्यावयाचा असे ठरले होते. ही रक्कम ब्राउनकडे अनामत ठेवलेली होती व ती देण्यासाठी तो दिल्लीत आला होता. पण ही तडजोड अफ्रासियाबने झिडकारून टाकली व आणखी रकमेची मागणी केली. सर्वसाधारण जनमानसात ब्राउनच्या प्रतिष्ठेला कमीपणा आला. त्याचा स्नेही अबदुल अहद अगदीच फुसका निघाला. शेवटी ब्राउनने भरतपूरचा बक्षी लालसिंग याच्याकडे ती रक्कम परत देऊन टाकली.

१७. पातशहाजादा जवानबख्त दिल्लीहून निसटतो : एप्रिल, १७८४

राज्यारोहणाचा वर्धापन दिन २३ मार्च, १७८४ ला साजरा झाला. नंतर, आपण माझ्यासमवेत आग्रा येथे यावे व खंडणी वसूल करण्याच्या कामी मला मदत करावी अशी अफ्रासियाबने बादशहाला विनंती केली. बादशहाची स्वारी हलायची म्हणजे प्रचंड खर्च; पैसा हाताशी नव्हता व नजफखानच्या मृत्यूनंतर राजभांडारातही भर पडत नव्हती. बादशहा आपल्यासमवेत यायला दिरंगाई करतो आहे, याचे कारण अबदुल अहद असून तसे करण्याबद्दल तो बादशहाला आतून फूस देतो आहे, असा आरोप करून अफ्रासियाबने दरबारांत तंग परिस्थिती निर्माण केली. बादशहा, राजपुत्र व राजघराण्यातील इतरांबद्दल त्याने अत्यंत अवाच्य भाषा वापरली व त्यांनी आपल्या खर्चात काटकसर करावी असा सल्ला दिला. या सर्व बंधनांचा उबग येऊन पातशहाजादा जहाँधरशहा (जवाँबख्त[१६]) हा एका रात्री वारा वादळ विलक्षण थैमान घालीत असताना काळोखाचा फायदा घेऊन दिल्लीतून पळाला. (१४ एप्रिल) व लखनौ येथे गेला. (६ मे) या ठिकाणी वझीर व वॉरन् हेस्टिंग्ज यांनी त्याचे स्वागत केले. या राजकीय हालचालीचे संभाव्य दुष्परिणाम अफ्रासियाब व बादशहा समजून होते. ते अतोनात घाबरले. राजपुत्राने ताबडतोब माघारी यावे म्हणून तातडीचा खलिता देऊन त्यांनी खुद्द मेजर ब्राउनला त्या कामगिरीवर पाठविले. (३ मे) राजपुत्राप्रमाणेच वझीर व वॉरन हेस्टिंग्ज या दोघांनाही अशाच अर्थाची पत्रे बादशहाने मेजर ब्राउनजवळ दिली.

या निष्फळ उपद्व्यापाचा राजपुत्राला काहीही फायदा झाला नाही असे म्हणूनच हे प्रकरण संपवायला हवे. या राजपुत्राला भरघोस वर्षासन मिळावे म्हणून इंग्रजांनी शिंद्या-मार्फत बादशहाकडे खटपट करून पाहिली. त्याचा उपयोग झाला नाही. शेवटी या राजपुत्राला अखेरपर्यंत वाराणसी येथे इंग्रजांकडून मिळणाऱ्या वर्षासनावर दिवस घालवावे लागले. त्याचा आवाज घोगरा व भसाडा होता. या दोषामुळेही त्याला आपले स्नेही गमवावे लागले. खरे म्हणजे राजपुत्राच्या पलायनाला मुळातच खूप उशीर झालेला होता. दिल्ली शासनावर ब्रिटिश सत्तेचा चाप बसवायचा ही कल्पना वॉरन हेस्टिंग्जने या वेळेपर्यंत काढून टाकली होती. अशी कल्पना प्रत्यक्षात फायद्याची ठरावी असे दोन वर्षापूर्वी त्याला वाटत होते. त्यावेळी जवानबख्तसारखे प्यादे त्याच्या हाताशी येते तर १७६५ मध्ये क्लाइव्हने केले तसे काही त्यानेही करून दाखविले असते.

अबदुल अहद हा निमकहरामीच. अफ्रासियाबच्या हाताखालील सेनाधिकाऱ्यांना त्याच्याविरुद्ध भडकावण्याचे त्याचे कारस्थान चालूच होते. झैन-उल-अबीदीन याला भावाच्या खुनाचा बदला घ्यायची घाई झाली होती. अफ्रासियाबचा निकाल लावण्यासाठी त्याने पाच माणसे पाठविली. ही पाच माणसे मीरबक्षी अफ्रासियाबच्या कचेरीत जाऊन लपून बसली (अंदाजे १० एप्रिल) पण त्यांना हुडकून अटक करण्यात आली. या कपट-नाटकाचा जनक अबदुल अहद हाच असावा अशी अफ्रासियाबची समजूत होती.

त्यामुळे त्या दोघांत उघड उघड फूट पडली व दि. ३० मे रोजी अफ्रासियाबने अबदुल अहदला गिरफदार केले.[१७] त्याची सर्व मालमत्ता जप्त केली व त्याला अलिगढ किल्ल्यात कैदेत ठेवले. आपल्या मित्राचा बचाव करण्याची ताकद बादशहाजवळ नव्हती. त्यानंतर तो अफ्रासियाबच्या हातातले केवळ बाहुले बनला. त्याला जवळचा मित्र वा स्वतंत्र असा सल्लागार कोणी राहिलाच नाही. या घटनेचा आणखी एक परिणाम म्हणजे दिल्ली-दरबारात इंग्रजांचे वर्चस्व असावे ही कल्पना वॉरन हेस्टिंग्जने मनातून अजिबात काढून टाकली. त्याच्या मते इंग्रजांच्या हितास जपणारा असा वरच्या दर्जाचा कोणी सरदार दरबारात उरला नव्हता.

अशा प्रकारे शेवटचा विरोधक निकालात काढून दिल्लीच्या सुभेदारीवर त्याने नजफ कूलीची नियुक्ती केली. बादशहाची प्रकृती बरी नसताही अफ्रासियाबने त्याला दिल्लीबाहेर निघायला भाग पाडले. (२६ जून) उन्हाळा ऐन भरात होता. अशा वेळी दिल्लीतून बाहेर पडलेला बादशहा दि. ६ ऑगस्टला आग्रा येथे पोहचला.

१८. हमदानीचा काटा काढण्यासाठी अफ्रासियाब बादशहासमवेत आग्र्यास जातो.

मुहमद बेग हमदानी हा भलताच शिरजोर झाला होता. धोलपूर प्रांतात तो बादशहा असल्यासारखाच वागत होता. आग्रा प्रांतातील महसूल गोळा करण्याच्या कामी त्याने अनंत अडचणी आणल्या.[१८] त्याला वठणीवर आणणे हे नवा मीरबक्षी अफ्रासियाबपुढील महत्त्वाचे काम होते. शफीच्या वतीने महादजीकडे बोलणी करायला गेलेला गोसावी हिंमतबहादूर हा त्यानंतर अफ्रासियाबचा मुख्य सल्लागार झाला होता. शिंद्याला दिल्लीत बोलवावे व त्याच्याकडून बादशहाचे सर्व बंडखोर मांडलिक आणि इंग्रज यांच्यासारख्यांना जरब बसवावी असे तो अफ्रासियाबला नेहमी सांगत असे. मुहमद बेग हा किती झाले तरी शिपाईगडी, त्याच्यासमोर उभे रहाण्याची आपली ताकद नाही हे अफ्रासियाब समजून होता. गेली कित्येक महिने बादशहाकडून महादजीकडे विनंतीवजा खलिते जात होते. त्यांत मीरबक्षीच्या वतीने महादजीला खास विनंती केलेली असायची की महादजीने दिल्लीला यावे, बादशहाला विवंचनामुक्त करावे व मुखत्यारपद स्वतःकडे घेऊन बादशाही साम्राज्याला पूर्ववैभव प्राप्त करून द्यावे. महादजी आता मोकळा झालेला होता. उत्तर माळव्यातला गोहदचा राणा छत्रसिंग हा शिंद्याचा जुना शत्रू. ग्वाल्हेर किल्ल्यावर तोफांचा भडिमार करून (३१ जुलै, १७८३) गोहद जिंकून व खुद्द राण्याला कैद करून महादजीने हा मातबर शत्रू निकालात काढला होता. (२५ फेब्रुवारी, १७८४) बादशहा आग्र्याला जात आहे हे समजल्यावर तो त्या ठिकाणी येताच त्याला भेटायचे महादजीने मान्य केले. उभयतांच्या विचारात काय करायचे ते ठरवायचे होते. ही भेट काही कारणाने तीन महिने लांबली. ती कारणे अशी :

शफीचा काटा काढण्यासाठी अफ्रासियाबने मुहमद बेग हमदानीशी करार केला त्यावेळी त्याला त्याच्या अधिकाराच्या जागेवर कायम ठेवण्यात येईल व त्याच्याकडे असलेल्या

जहागिऱ्यांवर त्याचाच अधिकार राहील असे अफ्रासियाबने त्याला लेखी अभिवचन दिले होते. आता तोच अफ्रासियाब सर्व सैन्यानिशी बादशहासमवेत आपल्यावर चालून येत आहे हे समजल्यावर मुहमद बेग हमदानी या विश्वासघातक्यावर चांगलाच भडकला. त्याने आपल्या सैन्यात नव्याने वाढ केली व आपल्या भोवतालच्या शाही मुलुखात मनःपूत लुटालूट केली. पगारी काम करणाऱ्या मुगलीया शिपायांना अशी कामे म्हणजे महापर्वणी. त्यांनी खेडे नि खेडे असे काही उद्ध्वस्त केले की 'गावात दिवा लावायला कोणी उरला नाही.' गजबजलेल्या श्रीमंत कामा शहरावर त्याने धाड घातली (१० जून). त्या ठिकाणच्या स्थानिक राजाचे अधिकारी त्याच्याच महसूल अधिकाऱ्यांच्या जुलुमांना कंटाळून त्यांच्या विरुद्ध उठले होते. "अनेक माणसे ठार झाली. अनेकांचे नाक कान कापले गेले. अत्याचाराचा एकही प्रकार प्रत्यक्षात आणण्याचे हमदानीने बाकी ठेवले नव्हते" (इब्रत भाग २, ८२). बादशहा आग्रा येथे येऊन हजर झाला तरीही हमदानीने त्याला भेटायचे सरळ सरळ नाकारले. अलिनगरचा स्वामिनिष्ठ सरदार झुल्फिखारखान याच्यावरही त्याने हल्ला केला. एकटा अफ्रासियाब बंडखोर हमदानीला आवरू शकत नव्हता. दमदार अशा महादजीची मदत घेऊन हमदानीची धोलपूरबारी येथील जहागीर जिंकून घ्यायची असे त्याने ठरवले.

ग्वाल्हेरहून २ ऑगस्टला निघावे व आग्रा येथे बादशहाच्या छावणीस जावे असे महादजीने प्रथम ठरविले होते.[१९] पण दि. ५ ते १९ या दरम्यान धुवांधार पर्जन्यवृष्टी झाली, म्हणून महादजी निघू शकला नाही. प्रत्यक्षात बाहेर पडायला २६ दिनांक उजाडला. ग्वाल्हेरपासून तो जेमतेम सात कोसांची पहिली मजल मारून गेला असेल नसेल, तोच पावसाने त्याला जाम करून टाकले. त्याच्या छावणीत सगळीकडे पाणीचपाणी झाले. दोन हत्ती, बरेचसे घोडे व वाहतुकीसाठी उपयोगी अशी बरीचशी जनावरे मरून गेली. शिपाई आजारी पडले. अशुभ नक्षत्रावर आपण बाहेर पडलो त्यामुळे असे झाले, तेव्हा परत फिरणे उचित असे त्याच्या ज्योतिषांनी त्याला सांगितले. त्याशिवाय ग्वाल्हेर येथे असलेली त्याची बायको गंगाबाई ही आसन्नप्रसवा होती; घराण्याला वारस म्हणून पुत्र हवा होता. सर्व कुटुंबीय व आप्तसंबंधी पुत्रजन्माचीच वाट पहात होते. त्यासाठी कुलोपाध्यायांनी सर्व दैवी उपाय केले होते. स्वर्गातला एकही देव पुत्रप्राप्तीच्या नवसातून सुटला नव्हता; मंत्रतंत्र, ताईत, गंडेदोरे, अंगारेधुपारे सगळे उपाय सुरूच होते. त्यामुळे सुमारे ५ सप्टेंबरला महादजी ग्वाल्हेरला परत आला. दरम्यान अंबाजी इंगळे याच्याबरोबर थोडासा फौजफाटा देऊन आपल्यावतीने त्याने त्यालाच बादशहाला भेटायला पाठवून दिले होते. बादशहाने अंबाजीचे १ सप्टेंबरला दरबारात स्वागत केले. अफ्रासियाबचा भडक व चंचल स्वभाव, हाताखालच्या लोकांशी त्याचे वारंवार होणारे तंटे इत्यादी माहिती इंगळे याने महादजीला दिली. त्यामुळे महादजीचा बादशहाला भेटायचा उत्साह मावळला.

१९. अफ्रासियाब महादजीला रूपवास येथे भेटतो

दशहरा संपल्यावर महादजी मुलुखगिरीसाठी बाहेर पडला. (२४ सप्टेंबर) फोफावून धावणारी चंबळा नदी पार करताना त्याला थोडाफार त्रास झाला व वेळही लागला.

धोलपूरचा किल्ला मुहमद बेगच्या ताब्यात होता. किल्ल्यावरील त्याच्या माणसाने महादजीचे प्रचंड व समर्थ सैन्य पाहूनच शरणागती दिली. नंतर महादजीने धोलपूर व बारी हे प्रांत घेतले. मुहमद बेगने तिथे अधिकारी म्हणून जी आपली माणसे नेमली होती त्यांना महादजीने हाकलून दिले व त्या जागी आपली माणसे नेमली. हे दोन्ही प्रांत अतिशय सुपीक असल्याने त्यातून पाच ते सहा लाखांचा महसूल सहजी हाती येई. शिंद्याचा उपयोग, पाहुण्यांच्या जोड्यासारखा करून घेता येईल. शिंदे हा मुलूख जिंकतील व आपल्याला परत देतील. पण एवढे कष्ट करून, हमदानीसारख्या बलाढ्य सेनाधिकाऱ्यापासून जिंकून घेतलेला हा मुलूख महादजी झाला तरी कसा सोडणार ? त्याने नकार देताच दोघांत वितुष्ट येणार असे दिसले. 'आपण येथे आलो ते बादशहाने बोलावले म्हणून; तेव्हा आपल्या प्रचंड सैन्याचा खर्च, बादशहाच्या मुखत्यारानेच द्यायला हवा' असे शिंदे याने ठणकावले. तथापि महादजीच्या दरबारी दिल्लीचा वकील म्हणून असणाऱ्या हिंमतबहादुर गोसाव्याने, 'अफ्रासियाबजवळ पैसा नाही, त्याच्या हलाखीमुळे त्याच्याच सैन्याचे हाल चालले आहेत' असे महादजीला स्वच्छ सांगून टाकले. महादजी ज्यावर हक्क सांगायला पुढे सरसावेल असे मिळकतीच्या दृष्टीने किफायतशीर असे हे दोनच जिल्हे. गोसाव्याने काहीतरी थातुरमातुर करून तात्पुरती मिटवामिटव केली व महादजी दोन्ही जिल्ह्यांवरील हक्क सोडायला तयार झाला व रूपवासकडे जायला निघाला. रूपवास हे फत्तेपूरसिक्रीच्या नैर्ऋत्येला नऊ मैलांवर असून तेथे महादजीचा तळ पडायचा होता. तो रूपवासला आला (२२ ऑक्टोबर) व बादशहाचा माणूस येऊन वाटाघाटी करील म्हणून वाट पहात राहिला.

अफ्रासियाब यापूर्वीच आपले सर्व सैन्य, तोफा व अंबाजी इंगळेसमवेत आधीच आलेल्या ६,००० स्वारांसह मुहमद बेगशी दोन हात करण्यास रवाना झाला होता. (२३ सप्टेंबर) बादशहा व मेजर ब्राउन आग्र्यास होता, त्या दोघांना तिथेच ठेवून मुहमद बेगशी लढायचे व शिंद्याशी बोलणी करायची या हेतूने तो पश्चिमेकडे निघाला होता. शत्रूच्या छावणीवर एकदम धडक हल्ला करून त्याला बुचकळ्यात पाडावे असा त्याचा प्रथम विचार होता. (१७ ऑक्टोबर) शिंद्याशी बोलणी होऊन आपला जय होईल असे शिंदे सांगेपर्यंत हा अविचार न करणे चांगले असा अंबाजीने त्याला शहाणपणाचा सल्ला दिला. अफ्रासियाबच्या शिपायांना शिस्तीचे वावडे तर मुगलियास्वार दगलबाज. अशा परिस्थितीत हमदानीच्या जुन्या, कसलेल्या व अनुभवी सैनिकांसमोर आपण किती टिकाव धरणार ? अंबाजीचा सल्ला पटून अफ्रासियाब खनुवा (फत्तेपूरसिक्रीच्या नैर्ऋत्येस आठ मैल) येथे थांबला व शिंद्याची वाट पहात राहिला.

दरम्यान मुहमद बेग हमदानी हा, जयपूर व माचेडीच्या पूर्वेकडील सरहद्दीवर जे जे छोटे छोटे सरंजामदार होते, त्यांच्याशी लढण्यात गुंतला होता. हिंदौन, भासवार, बलहरी, कामा यासारखी कित्येक ठिकाणे होती. विजयापाठोपाठ विजय मिळवीत महादजी दक्षिणेकडून व अफ्रासियाब पूर्वेकडून असे दोघेही पुढे सरसावत असून एकमेकांस फत्तेपूर येथे भेटणार असे दिसताच, हमदानीने सर्वत्र पांगलेल्या आपल्या तुकड्यांना फत्तेपूरजवळ

जमायला सांगितले. सय्यदपुरानजीक संरक्षक खंदक म्हणून तोफखाना ठेवला. हा तळ जिथे टाकला होता ती जागा पिचुनाच्या पूर्वेस तीन मैल, भरतपूरच्या दक्षिणेकडे नऊ मैलांवर असलेल्या टोकाशी व फत्तेपूरसिक्रीच्या पश्चिमेस अकरा मैलांवर आहे. ही जागा मोक्याची. येथे बसून दोन्ही अंगाला दरारा उत्पन्न करता येत असे. उत्तरेकडे भरतपूरपर्यंत व पश्चिमेकडे वेरचा किल्ला आणि जयपूर सरहद्द येथपर्यंत लक्ष ठेवता येई. अफ्रासियाबवरील त्याचा राग एका अर्थी समर्थनीय होता म्हणून 'आम्हा दोघांच्या या लढयात आपण तटस्थ रहावे.' अशी त्याने महादजीला विनंती केली. मराठ्यांची मदत नसेल, तर पंचमहाभूते आडवी आली तरी या गुलामाच्या बच्चाला आपण आकाशातले तारे मोजायला लावू याबद्दल हमदानीला कधीच शंका नव्हती. शिंद्याने तटस्थ राहून हमदानीला अफ्रासियाबचा काटा काढायची संधी दिली तर त्याबद्दल त्यांना आग्र्याचा किल्ला व त्याच्या दक्षिणेकडील सर्व प्रदेश द्यायचे त्याने मान्य केले होते. महादजीला फार मोठी शिकार साधायची असल्याने त्याने ही छोटी लालूच नाकारली व आश्वासन दिल्याप्रमाणे तो रूपवासकडे जायला निघाला.

दि. २३ ऑक्टोबरला रूपवास येथील महादजीच्या छावणीवर अफ्रासियाबने त्याची भेट घेतली. दुसऱ्या दिवशी शिंद्याने परतभेट दिली. दि. २६ ऑक्टोबरला अफ्रासियाब पुन्हा शिंद्याना भेटला. त्यावेळी शिंदे याने आपल्या समवेत असलेल्या लेफ्टनंट जेम्स, ॲण्डरसन, क्लार्क व स्टुअर्ट यांची त्याच्याशी भेट घडवून आणली. अफ्रासियाब व महादजी हे दोघेही धुरंधर पुढील योजनांवर कित्येक तास चर्चा करीत होते. कोसळणारी बादशाही पुन्हा नीटपणे सावरून धरा असे अफ्रासियाब त्याला कळकळीने विनवीत होता. 'आम्हांस आपणच वडील आहात' असे बोलला व हमदानीचा काटा काढून मला वाचवा असेही त्याने सांगितले. हिंमतबहादुरने अफ्रासियाबच्या कानात काही गुजगोष्ट केली. त्यानुसार अफ्रासियाबने धोलपूर व बारी या दोन जिल्ह्यांवर उदक सोडले व आपल्या नवीन आईला भेट म्हणून ते शिंद्याच्या हवाली केले. अशा प्रकारे प्रत्येकाचे समाधान झाले, वाटाघाटी पक्क्या झाल्या. 'मराठ्यांनी मुहंमद बेग हमदानीच्या छावणीला वेढा घालावा व त्याची रसद तोडून तो शरण येईपर्यंत त्याची कोंडी करून उपासमार करावी' असे ठरले.[२०]

महादजीच्या राजकीय डावपेचांनी हमदानी आधीच जाळ्यात सापडलेला; बेछूट लूटमार करून त्याने प्रत्येक शेजाऱ्याला आपला शत्रू बनविले होते; त्यामुळे हमदानीला आपटायला प्रत्येक जण उत्सुक होता. त्यात महादजीसारख्या समर्थ सेनानीची मदत. शिंद्याने दिगचा किल्ला आपल्याला परत मिळवून द्यावा व त्याबद्दल भरपूर पैसा घ्यावा अशी भरतपूरचा रणजितसिंग त्यांना गळ घालीत होता. शिंद्याला खूष करण्यासाठी त्याला जे जे करणे शक्य होते ते ते तो करीत होता. सूरजमलच्या घराण्याची प्रतिष्ठा व थोरवी सांगण्यासाठी राणी किशोरी महादजीला भेटून गेली. १७७६ मधील दिगच्या पाडावाच्या वेळी ती नजफखानलाही अशीच भेटली होती. जाट व रजपूत सैन्याने उत्तर आणि पश्चिमेकडून हमदानीला घेरले आणि पूर्व व दक्षिणेकडून ही साखळी आपण पूर्ण करायची असे महादजी व अफ्रासियाब यांनी ठरविले. शिंद्याची छावणी व सामानसुमान रूपवास येथे असल्याने त्याने

रायाजी पाटील व जिवाजी बक्षी यांच्या हाताखाली आपल्या आघाडीतील स्वारांची एक तुकडी दिली, त्यांना उटंगण येथे जाऊन खनुवाच्या थोडेसे पश्चिमेकडे उभे रहायला सांगितले. ही जागा हमदानीच्या छावणीनजीक होती. अफ्रासियाबची छावणी खनुवा येथे होती. तिथून त्याचे स्वार व तोफखाना यांनी २ नोव्हेंबरला पुढे सरकायला प्रारंभ करावा, रायाजीच्या तुकडीशी हातमिळवणी करावी व हल्ला चढवावा असे ठरले होते. हमदानीच्या छावणीत खडतर दुष्काळ पडला. त्याच्या अनेक साहाय्यकांनी त्याला सोडले, अनेकजण अन्नाभावी मेले. शेवटी उपासमारीने मरण्यापेक्षा जिवावर उदार होऊन मरणे बरे म्हणून त्याने, वेढा दिलेल्या शत्रूच्या फौजेवर तुटून पडायचे ठरवले.

२०. झैन–उल्–अबीदीन अफ्रासियाबचा खून करतो : २ नोव्हेंबर, १७८४

पण अफ्रासियाबचे भवितव्य युद्धातील जयविजयावर ठरायचे नव्हते.[२१] हातात संपूर्ण व निरंकुश सत्ता, त्यात कुणी वाटेकरी नाही या उन्मादात त्याच्याकडून एक अक्षम्य आगळिक घडली. त्यामुळे मिर्झा नजफच्या कुटुंबातील सगळेजण, तसेच नजफचे वृद्ध सेवकही त्याच्याविरुद्ध चवताळून उठले. अफ्रासियाबची ही आत्मघातकी आगळिक म्हणजे त्याने नजफखानच्या कुंवार मुलीची स्वतःसाठी मागणी केली. शफीचा खून होण्यापूर्वी ती शफीला द्यायची असे ठरले होते. पण या मुलीच्या जन्मदात्याच्या गुलामाने आपल्या पायरीला न शोभणारी असली उद्धट मागणी करावी हे शफीचा भाऊ, झैन-उल्-अबीदीन याला सहन झाले नाही. या आधी एप्रिलमध्ये अफ्रासियाबचा काटा काढायचा प्रयत्न त्याने केला होताच; आता समर्थ मराठा सैन्य समीप असल्याने त्याला आणखी धीर आला होता. या उपटसुंभाचा सूड कसा घ्यायचा या बाबत जास्त काळजीपूर्वक विचार करून त्याने कट रचला.

दि. १ नोव्हेंबरला खनुवा येथील आपल्या छावणीतून आपले सैन्य व अधिकारी यांसह अफ्रासियाब अगदी सकाळीच बाहेर पडला. मुहमद बेगची छावणी होती त्या जागेची त्याने नीट टेहळणी केली व सय्यदपुरानजीकची (खनुवाच्या पश्चिमेस अडीच मैल) एक मोकळे मैदान त्याने पसंत केले. निर्णायक लढा या ठिकाणी लढला जावा असा त्याचा विचार होता. दुसऱ्या दिवशी तो त्या ठिकाणी गेला परंतु लढाईचा विचार त्यापुढील दिवसावर टाकून परत आला. येता येता तो हिंमत बहादुरच्या तंबूत डोकावला. तिथे त्याने बुद्धिबळाचा डाव टाकला आणि डाव चालू असताना उद्याच्या लढाईत आपलाच जय कसा होणार यावरच त्याची बरीच बडबड चालली होती. अशा प्रकारे तिथे एक तास घालविल्यावर तो आपल्या तंबूत परत आला. तंबूत आल्यावर त्याने आपल्या सर्व अधिकाऱ्यांना बाहेर जायला सांगितले. झैन व इतर चौघेजण तिथेच गालीच्यावर बसून होते. अकरा वाजून गेलेले, अफ्रासियाब अगदी स्वस्थचित्त होता. अंगातले कपडे काढून त्याने पागोटे दूर ठेवले व विसावता विसावता नोकरांना जेवण घेऊन येण्यास फर्माविले. झैनचा एक मुगल मदतनीस अफ्रासियाबच्या नोकरांतच मिसळला होता. तो पुढे आला व अर्ज लिहिलेला एक कागद त्याने अफ्रासियाबच्या हातात दिला. अफ्रासियाब तो अर्ज

वाचण्यात गर्क असताना या माणसाने त्याच्यावर एकदम पेशकबाज चालवून त्याला खांद्यापासून छातीपर्यंत चिरले. अर्धवट तोडलेले कोंबडे वा बदक तडफडत उठायला बघते तसा उठून उभे रहायचा प्रयत्न करीत काही पावले त्याने टाकली; पण लगेच शुद्ध हरपून तो खाली कोसळला. अफ्रासियाबच्या नोकरांनी मारेकऱ्याची खांडोळी केली. अफ्रासियाबच्या अंगावर मारेकऱ्याचा पहिला घाव पडताच जो गोंधळ उडाला त्याचा फायदा घेऊन झैन-उल्-अबीदीन तंबूबाहेर आला व घोड्यावर टांग टाकून तसाच महादजीच्या तंबूत गेला. ‘कुणी तरी अफ्रासियाबला ठार मारले आहे; या प्रकरणात माझा संशय घेतला जाऊन मी बळी जाईन या भीतीने मी येथे आलो आहे’ असे त्याने महादजीला सांगितले.

२१. अफ्रासियाबच्या मृत्यूनंतर महादजींची चढाई

मारेकऱ्याच्या हातून अफ्रासियाबवर घाव घातला गेला तेव्हा सकाळचे अकरा वाजायला आलेले होते. मध्यान्ह उलटल्यावर लगेच तो मेला. पण त्याच्या मृत्यूची बातमी त्याच्या लोकांनी लपवून ठेवली होती. तो जिवंत आहे व त्याची प्रकृती सुधारते आहे अशा अफवाही ते उठवत राहिले. शेवटी सायंकाळी सत्य उजेडात आलेच. खनुवा येथील त्याच्या छावणीत एकच गोंधळ उडला. राजा नारायणदास हा त्याचा दिवाण. आपला धनी मरून गेला, आपला थकलेला पगार कोण देणार, या भीतीने सर्व शिपाई त्याच्याभोवती काव कात्र करू लागले. राजा नारायणदास हा काश्मिरी दिवाण तसा धूर्त, तो तिथून हलकेच निसटला व आसऱ्यासाठी गोसावी हिंमतबहादुरच्या तंबूत गेला. कुणीच शास्ता नसल्याने मृत मीर-बक्षी अफ्रासियाबच्या शिपायांत एकच गोंधळ व जबरदस्त दहशत निर्माण झाली होती. या गोंधळात भर टाकण्यासाठी निष्ठुर हमदानी अकस्मात हल्ला करील, ही भीती सर्वांच्या मनात घर करून होती. पण त्या वेळी एका दणकट व धुरंधर माणसाने परिस्थितीची धुरा अत्यंत समर्थपणे आपल्या खांद्यावर घेतली, म्हणून त्यांचे प्राण वाचले.

जिवाच्या भीतीने जवळ जवळ पाच मैलांचा टापू तुडवीत झैन-उल्-अबीदीन हा महादजीच्या रूपवास येथील छावणीत येऊन पोहोचला. तो धापा टाकीत होता व आपण अगदी ‘त्या गावचेच नाही’ असा आव आणीत आश्रय मागत होता; त्यावेळी पाटील-बावा झोपेतून उठलेही नव्हते. बातमी ऐकताच शिंद्याने त्याला आसरा द्यायचे नाकारले व त्याला लगेच मिर्झा ग्यासुद्दीनच्या छावणीत पाठवून सर्व प्रकारची शहानिशा होईपर्यंत त्याला सक्त पहाऱ्यात ठेवण्याचा हुकूम केला.

अफ्रासियाबची अवस्था निश्चित काय आहे हे शिंद्याला माहीत नव्हते; शिवाय बादशहाच्या अधिकारीवर्गातही त्याचा समावेश नव्हता. अफ्रासियाब मेला, अफ्रासियाब शुद्धीवर येतो आहे अशा परस्परविरोधी बातम्या, त्याचे हेर त्याला देत होते. खरी परिस्थिती आहे तरी काय, हे पहाण्यासाठी दुपारी तीन वाजता महादजी आपल्या तंबूतून बाहेर पडला. त्याच्याबरोबर त्याचे निवडक सल्लागार व लष्करातील अधिकारी होते; त्यांच्या

समवेत तो अफ्रासियाबच्या छावणीकडे जायला निघाला. वाटेतच हिंमतबहादूरचा तंबू होता. नारायणदास या तंबूतून बाहेर आला व महादजीच्या कानाशी जाऊन त्याने सांगितले, ' आनंदाची बातमी, अफ्रासियाब खरोखरच मेला.' महादजी घोड्यावरून खाली उतरला, त्याने हिंमतबहादूरशी काही गुप्त कानगोष्टी केल्या व आपल्या रूपवास येथील तळाकडे तो परत फिरला.[२२]

कडुसं पडून अंधार होताच महादजीने प्राप्त परिस्थितीबाबत आपल्या माणसांशी या विषयावर खूप बारकाईने विचारविनिमय केला. बादशहाच्या मुखत्याराचा ज्या पद्धतीने निकाल लावण्यात आला होता ती पद्धत व परिस्थिती अफ्रासियाबकडील माणसांप्रमाणे त्यालाही धोक्याचीच होती. दिल्लीतील मुखत्यार व मीरबक्षीपद रिकामे झाले होते. त्यासाठी हमदानी अफ्रासियाबच्या माणसाशी हातमिळवणी करण्याचा धोका होता. हे दोन मुसलमान गट एकत्र येऊन शिंद्यासारख्या बलाढ्य हिंदूवर हल्ला करणे असंभवनीय नव्हते. बाहेरून आलेले मुगल, हिंदुस्थानातील मुसलमान, त्यांचे कश्मिरी भाऊबंद हे सगळे एकजात कसे उफराट्या काळजाचे व स्वार्थी आहेत याबद्दल शिंद्याच्या गोटातील सर्वांनाच पूर्ण कल्पना होती. या माणसांना आपल्या फौजा एकत्र आणून आपली ताकद वाढवायला वेळ मिळाला तर आपल्याला येथून हुसकावून लावायला व ज्यांच्या भल्यासाठी एवढे प्रचंड सैन्य आणले त्या सैन्याच्या खर्चासाठी कबूल केलेला मुलूख व रक्कम हिसकावून घेण्यास हे लोक मागेपुढे पहाणार नाहीत याची शिंद्याला खात्री होती. आपली सत्ता प्रस्थापित करून परिस्थिती हाताबाहेर न जाऊ देता, आपली जरब बसेल अशी पावले टाकण्याबाबत महादजीने थोडाही कालापव्यय करू नये असेच त्याच्या सल्लागारांनी त्याला सांगितले. या सर्व प्रकाराने गर्भगळित झालेला बादशहा, हमदानीपासून माझे रक्षण करा अशी महादजीची विनवणी करीत होता. म्हणून त्या रात्री त्याच्या संरक्षणासाठी त्याच्या छावणीत अंबाजी इंगळे याच्या हाताखाली महादजीने २,००० स्वार रवाना केले.

नंतर त्याने, त्याच्या ज्या दोन तुकड्या (रायाजी पाटील व जिवाजी बक्षी यांच्या हाताखाली) पुढे धाडल्या होत्या, त्यांनी हमदानीच्या छावणीपासून मैल दोन मैल आघाडीवर असावे व हमदानी आणि खनुवा येथील शाही तळ यांच्या मधोमध, हमदानीची फौज खनुवाकडे जाऊ शकणार नाही अशा प्रकारे उभे रहावे असे कळविले. त्यानुसार ते दोघेही आपल्या सैन्यासह पुढे निघून गेल्यावर त्या ठिकाणी स्वतः महादजी येऊन दाखल झाला. (३ नोव्हेंबर) येताना त्याने दणकट सैन्य बरोबर नेले होते, पण त्याचा तळ व सामानसुमान रूपवासलाच होते. अशा प्रकारे ही संरक्षक आघाडी हमदानीच्या छावणीच्या अगदी नजीक उघडण्यात आली होती; त्यामुळे अफ्रासियाबच्या तंबूची व मालमत्तेची लुटालूट कदाचित त्याच्या शिपायांनीच केली असती, तिला चाप बसला; व अफ्रासियाबचे लोक आणि हमदानी यांच्यांत परस्परसंपर्क साधणे कठिण झाल्याने फंदफितुरीचा प्रश्नही निकालात निघाला.

२२. शिंदे मुहमदबेग हमदानीला निकाली काढतो (अंदाजे १० नोव्हें. १७८४)

दरम्यान हमदानीही स्वस्थ नव्हता. शिंद्याशी समझोता करण्याच्या उद्देशाने त्याने लछमीराम हा आपला वकील त्याच्या छावणीत ठेवला होता. अफरासियाबचा खून झाला त्या रात्री महादजीने हमदानीच्या वकिलाला त्याच्याकडे परत पाठवले व त्याच्याबरोबर 'हमदानीने आपले सर्व हत्ती, घोडे, उंट व तोफखाना शिंद्यांच्या स्वाधीन करावा म्हणजे त्यास पृथ्वीच्या पाठीवर कोठेही जावयास हरकत नाही' असा निरोप पाठविला. हमदानीने ही मागणी मान्य न केल्यास युद्ध करावेच लागेल, असेही शिंद्याने त्याला बजावले होते. शिंद्याचा निरोप होता, 'मी स्वतः स्वारीवर निघेन व एका घटकेत त्याचा निकाल लावीन.' दि. ३ रोजी शिंदे खनुवाच्या पश्चिमेस आल्यावर हमदानीचा वकील त्यांच्याकडे हमदानीचे उत्तर घेऊन आला, "बादशहाच्या मालकीच्या पंधरा तोफा मजपाशी आहेत, त्या द्यावयास मी तयार आहे. त्याशिवाय दुसरे काहीही द्यायला मी तयार नाही. माझ्या मृत्यू-नंतर कुणीही काहीही घेऊन जावे." या उत्तरामुळे लढाईला उभे रहाण्याशिवाय शिंद्याजवळ अन्य मार्ग नव्हता.

आपल्या पगाराची येणे बाकी बुडणार या भीतीने अफ्रासियाबचे शिपाई सरळसरळ बंड करून उठले. मीरबक्षी अफ्रासियाबची शवपेटिका दफनासाठी फत्तेपूरसिक्रीकडे चालली होती; तीही या शिपायांनी अडवून धरली. पण 'तुमचे देणे माझ्याकडे लागले' असे सांगून शिंद्याने ती वेळ निभावून नेली. त्यानंतर आपली नोकरी अशीच पुढे चालू ठेवण्यात यावी व सांप्रतच्या आपल्या जहागिऱ्या आपल्याकडेच असाव्यात अशी त्यांची मागणी होती. या बाबतीत आपण बादशहाशी शिफारसवजा बोलू असे शिंद्याने आश्वासन दिले. त्यानंतर हिंमतबहादूर व नारायणदास यांची आर्थिक निकड भागावी म्हणून शिंद्याने त्यांना थोडीफार रक्कमही दिली; व अशा प्रकारे हे सैन्य व तोफखाना आपल्या बाजूला वळविण्यात त्याने यश मिळविले. यत्किंचितही दिरंगाई न करता हमदानीचा निकाल लावणे जरूरच होते. अफ्रासियाबच्या फौजेतील सेनाधिकाऱ्यांना आपल्या बाजूला वळवून घेण्याचा हमदानीचा उपद्व्याप चालूच होता, तो सांगत होता. 'अफ्रासियाब मेला, आता मुसलमानी साम्राज्य व बादशहा यांची काळजी पाटीलबावा घेणार, म्हणजे सत्ता जाणार ती हिंदूंच्या हाती. तुमचा धनी गेल्यावर तुम्ही तिथे कोणासाठी रहाणार ? माझ्याकडे या, मी पगार देतो.' तसेच झैन-उल-अबीदीन याला शिंद्यांच्या छावणीतून काढून न्यायचा कटही रचला जात होता. झैन-उल-अबीदीनला नावापुरता मीरबक्षी करायचा व बादशहाच्या शासनाची प्रत्यक्ष सूत्रे हमदानी व अफरासियाबचे कश्मिरी दिवाण यांनी आपल्या हातात घ्यायची, शिंद्याला हाकलून द्यायचा, असेही बेत चालले होते.

महादजीने थोडाही वेळ न दवडता पावले उचलली. मात्र ती जितकी जलद तितकीच सावध होती. निष्फळ वाटाघाटीत तीन दिवस फुकट घालविल्यावर आपले रूपवास येथील सैन्य व सामानसुमान त्याने तात्पुरत्या मुक्कामावर मागवून घेतले. (६ व ७ नोव्हेंबर)

माचेडी व जयपूरराजाचे सैन्यही त्याच्या मदतीला आले. त्यांच्या साहाय्याने महादजीने हमदानीभोवतालचे कडे पूर्ण केले. स्वतः पगार द्यायचे कबूल करून नव्याने घेतलेली शाही सेनाही त्याच्याच बाजूला होती. अशा प्रकारे अत्यंत कार्यक्षम असा तोफखाना त्याच्या बाजूला होता. शिंद्याचा तळ भरतपूरच्या दक्षिणेस पाच मैलांवर उधापूर येथे तर हमदानी पूर्वीप्रमाणेच आणखी दक्षिणेकडे अंदाजे सहा मैलांवर सय्यदपुरानजीक होता. महादजी सय्यदपुराच्या दक्षिणेस एक मैलावर बर्गा या ठिकाणी होता. तिथून त्याच्या वैयक्तिक देखरेखीखाली दि. ७ नोव्हेंबरला तोफा धडाडल्या. दुसऱ्या दिवशीही (८ नोव्हेंबर) त्याच तडफेने व उत्साहाने तोफा धडाडत राहिल्या. दोन्ही बाजूंची प्रचंड हानी झाली. मुहमदबेग हमदानी कंबर कसून जिवाची बाजी लावून लढला. त्याची अवस्था दयनीय होती. मराठ्यांनी चौफेर नाकेबंदी केल्याने हमदानीच्या छावणीत दुष्काळाने उपासमार होऊ लागली. त्याच्या सैन्यातील रोहिल्यांनी सर्व शेळ्यामेंढ्या खाऊन फस्त केल्या, खटाऱ्याचे बैल मटकावले व तिथून निसटायचे कसे हे समजल्यावर ते महादजीला येऊन मिळाले. त्याचे तेलंगी शिपाई उपाशी मरणे वा फुकटाफाकट कापले जाणे, यापेक्षा पळून जाणे बरे असा विचार करून हातातील शस्त्रे टाकून निघून गेले.

त्यानंतर मुहमदबेगने बिनशर्त शरणागती दिली. शिंदे त्याचीच आतुरतेने वाट पहात होते. दि. १० नोव्हेंबरला स्वारांच्या लहानशा टोळक्यासह तो अंबाजी इंगळेच्या तंबूपाशी आला व त्याने संपूर्ण शरणागती पत्करली. त्याच्या छावणीतील सर्व तोफा (एकूण ४६) व छावणीतील इतर चीजवस्त ताब्यात घेऊन मराठ्यांकडे आणण्यात आली. त्याच्या पराभूत शिपायांच्याजवळील हत्यारे व अन्य सर्व काही हिसकावून घेण्यात आले. भाडोत्री रोहिले शिपायांना दोन दिवस स्थानबद्ध करून ठेवण्यात आल्यानंतर त्यांनी काही गडबड करू नये म्हणून भक्कम पहाऱ्यात त्यांना दिगपलीकडे नेण्यात येऊन तेथे सोडून देण्यात आले. त्यांनी आग्र्याला जाता कामा नये अशी तंबीही त्यांना दिली गेली. मुहमदबेग व त्याच्या सैन्यातील अधिकारी यांना मराठा छावणीत प्रथम युद्धकैदी म्हणून वागवण्यात आले; परंतु अखेरीस मुहमदबेगला मोकळे सोडण्यात आले. मात्र त्याच्यावर ज्या अटी लादण्यात आल्या होत्या त्या अशा होत्या की त्यामुळे त्याला कसलीच गडबड करता येण्यासारखी नव्हती. त्या अटी अशा होत्या : (१) त्याने आपली सर्व शस्त्रे व युद्धसाहित्य मराठ्यांच्या हवाली करावे. (२) आपल्या विश्वासाचे प्रतीक म्हणून त्याने आपला कुटुंब-कबिला महादजीच्या राजधानीस उज्जैन येथे पाठवावा; व (३) यापुढे शिंद्यांचा चाकर म्हणून त्यांच्या पदरी नोकरीस राहून त्यांची सेवा करावी.

त्याच्या सर्व जहागिऱ्या त्याच्याकडून काढून घेण्यात आल्या.

टीपा : प्रकरण ३२

पृष्ठ	टिपेचा क्रमांक	
१५३	१	**स्वभावविशेष : अफ्रासियाब :** वाण्याचा मुलगा, शिपाईगडी नव्हे (**जी डब्ल्यू** : भाग ५, क्रमांक २५) गुलाम होता (**इब्रत :** भाग २, ८७, ३४) भडक स्वभाव : (**इब्रत** : ३६, ७८, ६९, ३४); नजफच्या मुलीला मागणी घालतो (**गुलामअली** २११) **इब्रत** : ४१, ८८. **शफी : मुन्नालाल** : २५६, २७३, २७६; **बीएम** २५०२१ पृ. ११३; **गुलामअली :** १६१ (स्वभाव). **नजफकूली : मुन्नालाल**, २५५, **गुलाम अली :** १५७, २०९, **इब्रत** : ४३. **मुहमदबेग : मुन्नालाल** : २७१, ७३, ७४; **इब्रत** : **एएसबी** हस्तलिखित भाग २, १४५; **झैन-उल-अबीदीन : मुन्नालाल** २४२, **गुलामअली :** १७५
१५७	२	**डीसी. गुलामअली** खंड ३, १५२–१५४; **मुन्नालाल** २३७–२४३; **इब्रत** : भाग २, ३२–३६; अफ्रासियाबच्या अडचणी–**डीवाय** : भाग १, लेखांक : ८४, ७१; पातशहाजादा जहाँदर शहा : हेस्टिंगचे 'स्टेट ऑफ इंडिया' परिशिष्ट.
१५९	३	अफ्रासियाब अडचणीत आहे त्याचा फायदा घेऊन बादशहाने किल्ल्यातील राजवाड्यावरून मीरबक्षीची शिबंदी व तोपची यांना हाकलून दिले (२९ जून) व त्या ठिकाणी त्याने आपल्या 'लाल पलटणी'तील शिपायांची अहमद अलिखान याच्या हाताखाली नियुक्ती केली. **डीवाय** : भाग १, लेखांक ८४; **डीसी**.
१६०	४	**डीसी. गुलाम अली,** खंड ३, १५४–१५६; **मुन्नालाल :** २४४–२५३; **इब्रत** : भाग २, ३६–४३; **डीवाय :** भाग १, लेखांक ७१.
१६२	५	**डीसी, गुलामअली,** खंड ३; १५६–१६०; **मुन्नालाल :** २५४–२५६, **इब्रत :** भाग २, ४३–४६, **डीवाय :** भाग १, लेखांक, ७१; जहाँदरशहासाठी हेस्टिंगचे 'स्टेट ऑफ इण्डिया' परिशिष्ट पहा.
१६३	६	दि. १६ जून, १७७२ रोजी बादशहा म्हणाला, 'मिर्झा शफी तापट स्वभावाचा आहे. पाहू या तो इतरांशी कसे काय जमवून घेतो ते!' ब्रिटिश म्यूझियम : ओरिजिनल, २५०२१, पृ. ११३
१६३	७	**डीसी. गुलामअली** खंड ३, १६१–१६५; **मुन्नालाल :** २५६–२६२, **इब्रत :** भाग २, ४७–४९, **डीवाय :** भाग १, लेखांक ७४, ७५

१६४ ८ **डीसी, गुलामअली** : खंड ३, १६६–१७४, **मुन्नालाल** : २६३–२६७; **इब्रत** : भाग २, ५०–५४ आणि **एएसबी** हस्तलिखित; **डीवाय** : भाग १, लेखांक ७७, जहाँदरशहाबाबत हेस्टिंगचे ‘ स्टेट ऑफ इण्डिया’ परिशिष्ट.

१६५ ९ वैतागून व घाबरून नजफकूलीने बादशहाचा पक्ष सोडला व दि. १५ नोव्हेंबरच्या सुमारास तो आपल्या नरनौळ येथील जहागिरीच्या गावी निघून गेला. १० डिसेंबर, १७८२ रोजी हमदानीची दिल्लीतून बोळवण करण्यात आली.

१६६ १० **डीसी. गुलामअली,** खंड ३, १७५–१७७, **मुन्नालाल** : २६८, **इब्रत** : भाग २, ५५–५८; ६१–६२ या संदर्भात पुढील विभागाचाही समावेश होतो. राज. खंड १२, ३५

१६८ ११ **बीएम** : ओरिजिनल २५,०२१ पृ. ९१–९६, ११६–१८७ (अखबारात् २ जून, १० जुलै) उत्कृष्ट माहिती. **डीसी. मुन्नालाल** २७२, **इब्रत** : भाग २, ६२–६४; **डीवाय** : भाग १, लेखांक : ६५, ६८, **चंद्र** भाग २, ३५, ५०; सातारा, भाग १, ६९

१७० १२ **डीसी. इब्रत,** भाग २, ६४–६६, **मुन्नालाल** : २७४–२७७, **गुलाम अली** : खंड ३, १७७–१८०; **डीवाय** : भाग १, लेखांक ९१, पारसनीस, ऐतिहासिक स्फूट लेख, भाग २, क्रमांक १८; शफीला ठार मारण्याचा कट, दस्तखत केलेला कागद, पहा, **बीएम** २५,०२१, पृ. ३०

१७२ १३ **डीसी. गुलामअली** : खंड ३, २०८–२११; **इब्रत** : भाग २, ६७–७९; दि. २८ ऑक्टोबर ते २० नोव्हेंबर या दरम्यानची अफ्रासियाबची कृत्ये व दरबारातील हकिगत यासाठी पहा. **बीएम.** ओरिजनल, २५,०२१ पृ. ३९–८८ (अखबारात).

१७२ १४ **डीसी. गुलाम अली** : खंड ३, १८२–१८५; **इब्रत** : भाग २, ६८–६९; **डीवाय** : भाग १, लेखांक ९६, ९८, १२४

१७४ १५ **डीसी. इब्रत** : भाग २, ६७–६८, ७७, ८० (उत्कृष्ट व संपूर्ण); **गुलाम अली** : खंड ३, १८६; ब्राउनला आपल्या उद्दिष्टांबाबत हेस्टिंगच्या सूचना (फॉरेस्ट, कलकत्ता आवृत्ती, भाग ३, १०२५–२८), दिल्लीसंबंधात त्याच्या धोरणांचे समालोचन (भाग ३, १०८७–९०); **डीवाय** : भाग १, लेखांक १०४

१७५ १६ **डीसी. इब्रत** : भाग २, ७०–७६; **मुन्नालाल** : २८१–२८५; **गुलाम अली** : खंड ३, २०५–२०७, **फॉरेस्ट** सिलेक्शन्स फ्रॉम दि स्टेट पेपर्स ऑफ वॉरन् हेस्टिंग (लंडन) भाग २, ९८–११८ (पातशहाजाद्याचे

स्वतःचे निवेदन, वॉरन् हेस्टिंगच्या 'मेमॉयर्स रिलेटिव्ह टु दि स्टेट ऑफ इंडिया' यात परिशिष्ट म्हणून छापले आहे.) **फॉरेस्ट**. सिलेक्शन्स फॉरिन डिपार्टमेन्ट (कलकत्ता : भाग ३; १,३२०–४)

१७६ १७ **अहदची अटक** : **बीएम्** : ओरिजिनल २५,०२१ पृ. १३३, **डीसी. इब्रत** : भाग २, ७९; शाही प्रवास : **बीएम्** पृ. ९९ – १९२ (अखबारात २३ मे, २७ जून) **डीसी.**
अफ्रासियाबच्या जिवावर उठण्याचा हा प्रसंग १३ एप्रिलला घडला असे मेजर ब्राउन सांगतो. त्यावरून इब्रत, भाग २, ७८ यात दिलेला १२ मे हा दिनांक चुकलेला आहे.

१७६ १८ **डीसी. मुन्नालाल** : २८६ – २८८; **गुलामअली** : खंड ३, २०९–२११; **इब्रत** : भाग २, ८१–८३; **बीएम्** २५,०२१ पृ. ३४ ए (आपण आपल्या सैन्यासह तुमच्या मदतीला येत आहोत अशा अर्थाचे महादजीचे अंदाजे ९ जुलै, १७८४ चे पत्र) जयपूरकडील खंडणी व तीन लाखांच्या नव्या जहागिरी हमदानीस द्यावयाचे अफ्रासियाबने आश्वासन दिले होते. (**बीएम्** २५,०२१, पृ. ३०)

१७७ १९ **डीसी. इब्रत** : भाग २, ८३–८५, **मुन्नालाल** २८९, **गुलाम अली** : खंड ३, २०८–२०९, २११; **महेश दरबार**, भाग २, लेखांक ७४ – ७९; **जीडब्ल्यू** : भाग ५, क्रमांक २७, **चंद्र**, भाग २, ५५; **फॉरेस्ट.** कलकत्ता भाग ३, ११२७, कामा येथील पाशवी कृत्ये, **बीएम्** २५,०२१ पृ. १७४ बी; ऐतिहासिक टिपणे भाग ५, पृ. ११.

१७९ २० **ब्रिटिश म्यूझिअम** : ओरिजिनल २५,०२१ पृ. २६ – २८ (अखबारात) **इब्रत** : भाग २, **ऐति. टिपणे**, भाग ५, पृ. १०; **डीसी. ऐति. स्फुट लेख** भाग २, क्रमांक १८, यातील १७ नोव्हेंबरच्या सुमारास लिहिलेले सदाशिव दिनकरचे पत्र.

१८० २१ **अफ्रासियाबचा खून** : ऐति. स्फुट लेख, भाग २, क्रमांक १८; **बीएम्** : २५,०२१, पृ. ३०; **इब्रत** : भाग २, ८८–८९; **गुलामअली** : खंड ३, २११–२१२, **मुन्नालाल** : २९०, **चंद्र डी.** भाग २, ५४; **फॉरेस्ट** (कलकत्ता आवृत्ती) भाग ३; दि. २ व ३ नोव्हेंबरचे ब्राउनचे ग. ज. ला पत्र (आय. आर. ओ.)

१८२ २२ **शिंद्याची कृत्ये** : २–१० नोव्हेंबर– **बीएम्** ओरिजिनल, २५,०२१ व पुढील ३१–३६ आणि ऐति. स्फुट लेख, भाग २, क्रमांक १८ (उत्कृष्ट माहिती); **इब्रत** : भाग २, ८८–८९, **डीवाय** : भाग १, लेखांक ११७. गुलामअली वा मुन्नालाल काहीच माहिती देत नाहीत.

प्रकरण ३३ वे

दिल्लीशासनाचा मुखत्यार महादजी शिंदे

१. बादशहा महादजीचा आसरा घेतो

सय्यदपुरानजीकचे रणमैदान उजाड झाले. शाही पक्ष अगदीच असाहाय्य अवस्थेत होता. त्याला महादजीमुळेच शांतता व सुरक्षितता मिळू शकली. पुढे काय? हा यक्षप्रश्न महादजीपुढे होता. प्रत्येक पाऊल टाकताना पायाखालची जमीन नीट चाचपून पहावी लागत होती. यानंतरची खेळी बादशहाची, त्याचे आदेश येतील तशीच पावले टाकायला महादजी बांधलेला होता.

हल्ला होऊन अफ्रासियाबखानाला प्राणघातक जखम झाली ही बातमी बादशहाला त्याच दिवशी संध्याकाळी साडेचार वाजता समजली व त्याचा मृत्यू झाल्याचे दुसऱ्या दिवशी सकाळी सांगण्यात आले. मृत अफ्रासियाबची जागा भरून काढील असा माणूस बादशहाच्या नजरेसमोर नव्हता. नजफखानच्या मागे राहिलेल्या त्याच्या चार मानकऱ्यांपैकी दोघांचा निकाल लागलेला, एक बादशहासमोर सरळसरळ दंड थोपटून उभा राहिलेला. उरला नजफकूली, तो दिल्लीत सर्व दुर्व्यसनांत आकंठ बुडालेला. हयात असलेला असा नाव घेण्यासारखा मोठा सरदार म्हणजे अबदुल अहद खान; तो बादशहाच्या खास मर्जीतला पण अलिगढ किल्ल्यात बंदिवान होऊन पडलेला. मेजर जनरल ब्राउन हा बादशहाकडे असलेला इंग्रजांचा वकील महादजीचा अतोनात द्वेष करीत असे. त्याच्यानंतर तीन वर्षांनी आलेला विल्यम कर्कपॅट्रिक हाही महादजीचा द्वेष्टाच होता. या इंग्लिश वकिलाने मराठाविद्वेषाचे गरळ बादशहाच्या कानात ओतले.

शहा अलम या वेळी अस्वस्थ मनःस्थितीत असून असहाय होता. इंग्रज वकिलाने आपला मराठ्यांबद्दलचा द्वेष आपला इराणी मध्यस्थ सलिउद्दीन (नामवंत इतिहासकार फकीर खैरुद्दीनचा भाऊ) याच्या मार्फत कळवला. या वकिलाने आपल्या मध्यस्थामार्फत बादशहाला असेही कळवले की, अबदुल अहद (हा इंग्रजांचा दोस्त होता.) हाच मुखत्यार होणे योग्य. त्याला कैदेतून मुक्त करावा, मराठ्यांना हाकलून द्यावे व अयोध्येच्या नबाबाप्रमाणे बादशहाने इंग्रजांचे साहाय्य घेऊन दिल्लीचा कारभार चालवावा. 'अहदला मला भेटायला पाठवून द्यावे' असा बादशहाने अलिगढच्या किल्लेदाराला हुकूम पाठविला. त्यानुसार सर्व घडले. बादशहाच्या मर्जीतला हा वृद्ध सरदार ५ नोव्हेंबरला आग्रा येथे आला व तिथे आपला जुना स्नेही राजा दयाराम याला तो भेटला. अहद आल्याची बातमी दयारामने आग्र्याच्या किल्लेदारास दिली होती. या किल्लेदाराने बादशहाच्या हुकुमाची वाट न पहाताच अहदला कैद करून आग्र्याच्या किल्ल्यात ठेवले.

शहा अलमला हा आपला फार मोठा अपमान वाटला. अहद्‌ला अटक झाली आणि तीही परस्पर आपल्या हुकुमाशिवाय, तेव्हा आपली प्रजाजनांत काय किंमत राहिली या विचाराने तो हताश झाला. महादजी हाच एकमेव स्वामिनिष्ठ असल्याने आपण त्याचे साहाय्य घेणार असे त्याने जाहीर केले व आपल्या विश्वासातील दोघांना बरोबर जरूर ते पत्र व मानाची वस्त्रे देऊन शिंद्याकडे पाठवून दिले. त्या माणसांबरोबरच महादजीने उत्तर पाठविले (दि. ७) व बादशहाने फत्तेपूरसिक्री येथे यावे असे कळवले.

बादशहाला आग्रा येथून येता यावे म्हणून महादजीने दुसऱ्या दिवशी ५० उंट, चार हत्ती व प्रवासाची अन्य साधने पाठविली. तसेच अप्पा खंडेरावच्या हाताखाली ५००० घोडे व शिपायांच्या चार तुकड्या येतील असे आश्वासन दिले. बादशहा आग्ऱ्याहून दि. १० ला निघाला व दुसऱ्या दिवशी फत्तेपूरसिक्रीस आला. खनुवानजीक ज्या जागेवर अफ्रासियाबचा तळ होता त्याच जागी बादशहा दि. १२ ला आला. महादजी त्याच ठिकाणी त्याच्या स्वागतासाठी हजर होता. त्याने बादशहाला भेट म्हणून किमती वस्तू व बहुमोल नजराणे दिले. पवित्र मुहरमचा पहिला दिवस १४ नोव्हेंबरला येत असल्याने या शुभ दिवशी शिंद्यांनी बादशहाला भेटावे असे ठरले.

बादशहाचा तळ होता तिथून पश्चिमेस साधारणपणे तीन मैलांवर शिंदे विसावला होता. तिथून तो बादशहाचे स्वागतासाठी निघाला. बादशहाचा लाडका मुलगा व गादीचा भावी वारस युवराज अकबर शहा याने शिंद्याचे प्रथम स्वागत केले. 'त्यांजसमागमे पातशहापाशी येऊन, पातशहाशी मुलाजमत जाली. पायांवर डोई ठेवून एकशे एक मोहरा नजर केल्या. राजश्री पाटीलबावा यांचे पाठीवर पातशहांनी बहुत ममतापुरस्कर हात ठेवून आज्ञा केली की, "तुम्ही उरुबरु बसा". त्यावरून राजश्री पाटीलबावा बसले". पानिपतची याद देणारा शिंद्याचा लंगडेपणा लक्षात घेऊन बादशहाने त्याला आपल्या समोरच आपल्याकडे तोंड करून गालिच्यावर बसावयास सांगितले. दरबारातील ही पहिली भेट पौर्वात्य परंपरेनुसार रीतरिवाज म्हणूनच होती.

बादशहाच्या संरक्षणाची जबाबदारी शिंद्याने उचलली. म्हणून दि. १५ रोजी बादशहा खनुवाहून मराठ्यांच्या छावणीकडे जायला निघाला. सर्व दख्खनी व हिंदुस्थानी शिपायांनी महादजीच्या हुकुमानुसार बादशहाच्या मार्गावर दुतर्फा चार मैल उभे राहून त्याला मानवंदना दिली. सैन्याची पहाणी करून व संचलन पाहून बादशहा त्याच्यासाठी तयार केलेल्या खास शामियान्यात आला. हा शामियाना महादजी व अंबाजी इंगळे यांच्या छावण्यांच्या मधोमध होता.

दि. १७ रोजी बादशहा व शिंदे यांची खास बैठक झाली. बादशहा ज्यासाठी विशेष उत्सुक होता अशा खास गोष्टींवरच या गुप्त बैठकीत विचारविनिमय झाला. यानंतरच्या वीस वर्षांचे भविष्य या बैठकीत ठरणार होते. बादशहा महादजीला आग्रहाने सांगत होता, 'माझ्या साम्राज्याची मुखत्यारी घेऊन आपणच माझ्या राज्यकारभाराला शिस्त लावायला हवी.' शिंदे म्हणाला, 'मला थोडीफार सत्ता व अधिकार असल्याशिवाय मी कसे काय

राज्य सांभाळणार ? ' त्यानंतर बादशहाने त्याला मीरबक्षीपद व मुखत्यारच्याही वरची जागा देऊ केली. ' मी माझा निर्णय आणखी काही दिवसानी सांगतो ' असे शिंदे म्हणाला. मुहरमचा महिना नुकताच सुरू झाला होता. (१४ नोव्हेंबर) मुहमद पैगंबराच्या नातवाच्या हत्येबद्दलचा दहा दिवसाचा शोक पाळायचा होता ; ते ' अशुरा 'चे दहा दिवस म्हणजे महिन्यातले पहिले दहा दिवस होते.

पण परिस्थितीचा तणावच असा होता की महादजीला थांबताच येत नव्हते. बादशहा प्रवासात होता. त्याच्या त्या फिरत्या राजधानीच्या कारभारात वझीर नव्हता, मीरबक्षी नव्हता, की मुखत्यार नव्हता. बादशहा स्वत: जातीने हजर होता एवढेच. कारण दिल्लीत पुन्हा सत्तेवर आल्याला त्याला तेरा वर्षे होऊनही त्याने कधी सैन्याचे पुढारीपण केले नव्हते की कधी एकदाही राजकारणातील मामला हाताळला नव्हता. बादशहाच्या राज्यात बेबंदशाही माजणार अशी लक्षणे दिसत होती. अकबर आणि शहाजहान यांच्या परंपरेला हा काळिमा होता. शिपायांचे कित्येक महिन्यांचे पगार थकल्याने त्यांची कुरबूर सुरू होती, दैनंदिन खर्चासाठी त्यांना कुणीही कर्ज देत नसे. त्यांचे भवितव्य फार फार निराशाजनक होते. शस्त्रधारी शिपाई ३० हजार, त्यांना शिस्त लावायला कुणी अधिकारी नव्हता. त्याखेरीज शिंद्याच्या स्वतःच्या पलटणी होत्याच. अशांतता कुठेही व केव्हाही भडकून उठण्याचा धोका होता, आणि दि. १५ रोजी तसे घडलेही. त्या छावणीत सलोख्याची बोलणी करण्यासाठी आलेला जयपूरचा बक्षी खुशालीराम हलदिया याचा त्याच्याच तंबूतील एका राजपूत शिपायाने खून केला. या खुनाचे बालंट माचेडी राजावर शेकले, कारण हलदिया हा प्रथम त्याचा दिवाण होता; पण नंतर त्याची नोकरी सोडून तो नजफखानकडे गेला होता व त्यानंतर त्याने माचेडी राज्यात लुटालूट केली होती. वरील प्रकारानंतर हलदियाच्या सैन्यात गोंधळ उडाला व धनगर नसला म्हणजे मेंढया सैरभैर पळतात तसे ते छावणी सोडून पळून गेले. (**डीवाय :** भाग १, लेखांक ११६–१२०; **एचपी** क्रमांक ६०६; **इब्रत :** भाग २, ९२)

२. महादजी विरुद्ध कपटकारस्थाने

अफ्रासियाबच्या वारसाला मुखत्यारपदावर बसवून दुर्बल बादशहाला आपल्या कह्यात ठेवता यावे म्हणून अतिशय गुंतागुंतीची व पाताळयंत्री कपटकारस्थाने चालू होती. मृत मीरबक्षी अफ्रासियाबचा दिवाण नारायणदास व त्याचा उलट्या काळजाचा सोबती गोसावी हिंमतबहादूर यांनी बादशहाला बारा लाख रुपये देऊन अफ्रासियाबच्या तीन वर्षे वयाच्या मुलाला मीरबक्षीपदावर बसविण्याचा डाव टाकला. या अज्ञ मुलाच्या नाममात्र अधिकाराचा फायदा घेऊन साम्राज्याचा कारभार आपण पहायचा, म्हणजे मीर-बक्षीच्या पारंपरिक अधिकारानुसार अफ्रासियाबच्या जहागिरी व साम्राज्यातील मुलूख यांतील महसूल जमा करून आपल्या घशात टाकायचा, हा त्यांचा डाव होता. अफ्रा-सियाबची आणखी एक विधवा पत्नी होती ती या मुलाची सख्खी आई नव्हे, पण महा जहांबाज अफघाण बाई होती. तिचा बाप आग्र्याचा किल्लेदार व चुलता बादशहाच्या तोफ-

खान्याचा प्रमुख. या स्त्रीने दत्तक पुत्र घेण्याची परवानगी मिळवून त्याचे नावे अफ्रासियाबची सारी दौलत ती संभाळणार होती. बादशहाला हातातले बाहुले बनवावे ही कल्पना वॉरन हेस्टिंग्जने मनातून काढून टाकली असली तरी मेजर ब्राउन हा त्याबाबत आशावादी होता. त्याची धडपड ही होती की बादशहाच्या मुखत्यारपदावर अशा ब्रिटिशधार्जिण्या मुसलमानाला बसवायचे की जो दिल्लीतील ब्रिटिश अधिकाऱ्याच्या सल्ल्यानुसार चालेल. अयोध्येच्या नबाबासारखा त्यांचे ऐकणारा माणूस त्यांना वरील जागेवर यायला हवा होता. नारायणदास आणि हिंमतबहादूर हे दोघे महा कारस्थानी. त्यांचा बेत महादजीच्या तोंडावर थोडाफार मुलूख फेकायचा, अफरासियाबच्या अवाढव्य संपत्तीतील काही हजार किमतीचे थोडेफार जडजवाहिर त्याला द्यायचे व त्याची बोळवण करायची; म्हणजे नजीब उद्दौला वा मिर्झा नजफखान यांच्यासारखी सर्वंकष सत्ता हातात घ्यायला दोघेही मोकळे. मात्र, त्यांचे हे दुष्ट बेत प्रत्यक्षात विफल झाले. ते सिद्धीस जावेत म्हणून शिंद्यांच्या मसलतगारांना प्रलोभने दाखवून फोडण्याचा प्रयत्नही त्यांनी करून पाहिला.

महादजीला हे सर्व समजले. त्यानंतर त्याने जी पावले उचलली ती अत्यंत स्तिमित करणारी, धीमेपणा, गुप्तता व योग्य वेळी योग्य आघात करण्याचे कौशल्य दाखविणारी होती. त्याने प्रथम काटा काढला तो हमदानीचा. त्यामुळे अगदी जवळचे असे एक भयानक संकट दूर झाले. (अंदाजे १० नोव्हेंबर) त्यानंतर बादशहा जेव्हा मराठ्यांच्या छावणीच्या परिसरात आला (१५ नोव्हेंबर) त्यावेळी "दोन घटका पातशहासी खिलबत करून, रुकसत होऊन, आपले डेरियास जाऊन, पातशहाचे लष्करचा व अफ्रासियाबखानाचे लष्कराचा बंदोबस्त आपली पलटणे बसवून केला, शिवाय पाटीलबावांचे परवानगी, इकडून तिकडे कोणी जाऊं पावत नाही. अफरासियाबखान याचे लष्करातून शिवाय परवानगी कोणी पातशहापाशी जाऊं शकत नाही. पातशहांचे लष्करचे अफरासियाबखान यांचे लष्करांत कोणी जाऊं पावत नाही." [**डीवाय** भाग : १; लेखांक १२०, ११७] अगदी अलीकडे हमदानीच्या हाताखाली आलेल्या मुगलिया सरदारांनाही मराठ्यांच्या संरक्षक पथकापासून अगदी दूर ठेवण्यात आले होते.

शिंदे यांनी बऱ्याच वेळा बादशहाबरोबर साम्राज्याला भेडसावणाऱ्या काही समस्यांवर चर्चा केली. पळून गेलेल्या जवान बख्तला दिल्लीस परत बोलावून घ्यावे, पाच प्रशिक्षित पलटणी त्याच्या हाताखाली द्याव्यात व खूप मोठ्या उत्पन्नाची जहागिरी द्यावी अशी विनंती इंग्रज वरचेवर करीत असत, त्याचाही विचार झाला. बादशहाला दर महिन्याला घरखर्चाला लागणारी प्रचंड रक्कम व त्याच्या अवाढव्य सैन्याचा पगार ही फार मोठी डोकेदुखी होती. त्यावर त्वरित इलाज हवा होता. (**एचपी** : क्रमांक ३६९ ; इब्रत : भाग २, ९९ ; **पीआरसी** खंड १, क्रमांक ७)

३. महादजीची मीरबक्षी व वकील-ई-मुत्लक पदावर नियुक्ती : त्याच्या अडचणी

पैसा फार मोठ्या प्रमाणावर व ताबडतोब हवा होता. त्याची तरतूद करायची तर तसाच धनाढ्य मांडलिक वेठीस धरावयास हवा. जयपूर राजासारख्या कुबेराकडे खंडणीची

खूप रक्कम येणे होती. म्हणून शिंदे याने दि. ३० नोव्हेंबर रोजी बादशहाला बरोबर घेऊन सय्यदपुराहून पश्चिमेकडे पिंगोरापर्यंत दहा मैलांची मजल मारली. त्याच्यासमवेत एकत्रित गोळा झालेल्या शिपायांच्या सर्व तुकड्या, अण्डरसन व ब्राउन हे इंग्रजांचे वकील व त्यांचे बरोबरचा सर्व सेवकवर्ग होता. या ठिकाणी दि. १ डिसेंबरला बादशहाने जाहीर दरबार भरविला आणि श्रीमंत राजश्री पंतप्रधान पेशवे यांची 'नायब-ई-मुनाईब' 'बक्षी-उल-मामालिक' या पदावर नियुक्ती केली. मात्र लेखी शर्त अशी की या मानाच्या किताबती श्रीमंत पेशव्यांच्या नावे असल्या तरी त्यांच्यावतीने त्यांचे प्रतिनिधी म्हणून फक्त महादजीनेच काम पहायचे. या सर्वोच्च पदावरून करावयाची दैनंदिन कामेही कायम महादजीच्या सल्ल्याने व त्यानेच करावयाची होती. आपल्या साम्राज्याचे नवे अधिकारी या भावनेने बादशहाने पेशव्यांना खिलात व अन्य मूल्यवान नजराणे दिले. पेशव्यांचा मुखत्यार म्हणून नाना फडणविसांनाही मानाची वस्त्रे दिली. मात्र हे सगळे पुण्यास पोहोचते करण्यासाठी महादजीच्या हवाली करण्यात आले.

त्यानंतर दि. ३ ला बादशहाचा लवाजमा आणखी दहा मैल मजल मारून हेळणा येथे गेला. हे ठिकाण वेर किल्ल्याच्या उत्तरेस पाच मैलांवर आहे. या ठिकाणीही बादशहाने जाहीर दरबार भरविला. व शिंदे याला 'वकील-ई-मुतालिक' ही साम्राज्यातील सेवकांना देण्यात येणारी सर्वश्रेष्ठ पदवी बहाल केली. ही पदवी बादशहाने स्वखुषीने शिंदे याला दिली होती. तिच्याशी पेशव्यांचा संबंध नव्हता. ही पदवी इतकी मोठी की "पातशहा-जाद्यांनीदेखील आपले कामासाठी यांचे घरांस जावे, चिंता नाही. वजिरास व मीरबक्षीस वगैरे ज्यास ज्या समयी च्याहतील त्यास दूर करतील अगर ज्यास च्याहतील त्यास बहाल करतील, ऐसा प्रकार आहे." दिल्लीत बादशाही भोगणाऱ्या तैमूर घराण्यातील राज्यकर्त्यांच्या राजवटीत हा मान यापूर्वी फक्त तिघांनीच आपल्या कारकीर्दीत आपल्या हाताखालील लायक व्यक्तींना दिला होता. अकबर, शहाजहान व पहिला बहादुरशहा या तिघांनी ही पदवी दिलेली होती. एवढा मोठा बहुमान मिळाल्यावर "खिलत घेऊन आणि रूकसत होऊन आपले डेरियास आले. त्या समयी मार्गांत हिंमतबहादर गोसावी व नारायणदास वगैरे कुल फौज मोंगलिये, परा धरून डावे बाजूस, व दरोबस्त राजश्री पाटीलबावांची फौज परा धरून उजवे बाजूस, सर्वांनी मुजरा केला. आपले डेरियास दाखल जालियावर माफक मरातब सर्वांनी नजरा दिधल्या." एकाच दणक्यासरशी शिंद्यासारख्या लायक व कर्तबगार मराठा सरदाराचा द्वेष करणाऱ्या क्षुद्र कीटकांची वळवळ एकदम भुईसपाट झाली. [**डीवाय :** भाग १, लेखांक १३३, १०६; **एचपी :** क्रमांक ३४२, ३४३; **पीआरसी :** खंड १, क्रमांक ९; **इब्रत :** भाग २, ९५]

हेळण्यावर तावा होता लखिदरसिंग या जयपूरचा मांडलिक असलेल्या सरदाराचा. त्याच्या गढीवर सतत तीन दिवस तोफांचा भडिमार करण्यात आला. रणजितसिंग जाट व प्रतापसिंग नरुका यांनी यापूर्वीच आपली खंडणी नव्या वकील-ई-मुतलककडे भरली होती व ते आपापल्या प्रांतात परतही गेले होते. दि. ११ डिसेंबरला महादजी महेवापर्यंत पुढे

सरकला (लोहमार्गावरील बांदीकुई जोड स्थानकाच्या पूर्वेस २२ मैलांवर). तिथून पश्चिमेकडे दोन मैलांवर रामगडचा किल्ला होता तिथेही महादजीचे सैन्य गेले. किल्ल्यातील शिबंदीनी एक आठवडा लढा दिला, शेवटी ते शरण आले. (१८ डिसेंबर) याच वेळी जयपूर दरबारतर्फे खंडणीबाबत बोलणी करायला त्यांचे वकील आले. (२८ डिसेंबर) त्यांनी सुचविलेली खंडणीची रक्कम मान्य करण्यात आली. मग शिंद्याच्या मार्गदर्शनाखाली बादशहा दिगकडे जायला निघाला (अंदाजे २८ डिसेंबर). तिथे पोहोचल्यावर दिगच्या किल्ल्याबाहेर ३ जानेवारी १७८५ रोजी त्याचा तळ टाकण्यात आला. साम्राज्यापुढील काही गुंतागुंतीचे पण तातडीने सोडवायला हवेत असे प्रश्न होते; त्याचा विचार करण्यात दोन महिने गेले. ही सर्व चर्चा या ठिकाणच्या छावणीतच झाली.

महादजी शिंदे हा भारतातील मुसलमानी साम्राज्याचा 'वकील-ई-मुत्लक' व 'बक्षी-उल्-मुल्क' होता. एवढ्या सर्वोच्च मानाच्या जागेवर जाऊनही ह्याच्या हातात प्रत्यक्षात काय होते ? तर 'अशा अशा अधिकारपदावर आपली नियुक्ती करण्यात आली आहे' असे फर्मान असलेले दोन कागद व त्यावर नामधारी बादशहाचा सहीशिक्का. त्याच्या छावणीचा तळ पडला होता तेवढी जागा सोडली तर साम्राज्याच्या अखत्यारीतील मुलुखापैकी एक इंचही भू-भाग अजून त्याच्या मालकीचा झालेला नव्हता. दिल्ली व आग्रा येथील, बादशहातर्फे नेमणूक करण्यात यावयाच्या दोन महत्त्वाच्या जागांवर त्याच्या मरहूम नोकरांचे वारस होते. बादशहाच्या नावावर तेथील तिजोरीत जमा होणारा पैसा व महसुलासंबंधीचे उतारेसुद्धा त्या अधिकाऱ्यांच्याच ताब्यात होते. फक्त 'नाम-के-वास्ते' न राहता, 'वकील-ई-मुत्लक' व 'बक्षी-उल्-मुल्क' म्हणून खराखुरा अधिकार गाजवायचा असेल तर बादशहाच्या मालकीचे किल्ले, खजिना व मुलूख यांवर त्याची हुकमत असणे जरूर होते. त्याला सुरवातीला असे वाटले की बादशहाने हुकूम काढला मात्र, मीरबक्षीच्या अधिकारात असणारे हे सर्व आपल्या अधिकारात येईल. कारण यापूर्वी या सगळ्याचा ताबा मुहमद शफी, अफ्रासियाब खान वा त्या आधी मिर्झा नजफकडेही बिनासायास आला होता. त्याने त्यासाठी काही काळ वाट पाहिली, शेवटी त्याला कटु सत्य उमगले. दिल्लीच्या या कटकटीच्या राजकारणात कायद्यानुसार जे आपल्या हातात यायचे, त्यासाठीही शस्त्र परजायला हवे.

१७८४ अखेर त्याला ८० लाख रुपये कर्ज झाले होते. सुरवातीस इंग्रजांविरुद्ध व नंतर माळवा व हिंदुस्थानात त्याने ज्या मोहिमा काढल्या त्यापायी झालेल्या खर्चातून त्याला हे कर्ज झाले होते. त्याचे स्वतःचे ३० हजार शिपायांचे सैन्य व सुसज्ज तोफखाना यापायी दरमहा त्याला सात लाख रुपये लागत. त्याशिवाय अफ्रासियाब व हिंमत बहादुर यांचे सैन्यही त्याने स्वतःकडेच घेतलेले असल्याने त्यासाठी त्याला महिना आणखी तीन लाख रुपये लागत. शिवाय बादशहाचा महिन्याचा एक लाख तीस हजार खर्च त्यालाच द्यावा लागे. ही सर्व रक्कम उभी करण्याची जबाबदारी महादजीला पेलली नसती तर त्याचा दरारा व दिमाख, धुरासारखा वरचेवर हवेत विलीन झाला असता

'वकील – ई-मुतलक' व 'मीरबक्षी' म्हणून बादशहाच्या साम्राज्यातील सर्व किल्ल्यांवर ताबा ठेवणे, मांडलिक, सरदार, दरकदार यांच्याकडून खंडणी वसूल करणे व शाही मुलुखात जमा झालेली महसूलरक्कम ताब्यात घेणे हे अधिकार त्याचेच. त्याचप्रमाणे बादशहाच्या वतीने सरकारी पैसा वसूल करणारे अधिकारी व सरकारी भांडाराचे प्रमुख यांनी आपल्याजवळ काय आहे, काय नाही याचा हिशेब महादजीलाच द्यायला हवा होता.

४. महादजी शिंदे दिग व आग्ऱ्याचा किल्ला घेतो : जानेवारी–मार्च, १७८५

अबदुल अहद, मिर्झा नजफ, लताफत अली व मुहमद शफी यांनी आपल्या हातात सत्ता व अधिकार असताना अमाप पैसा व धनदौलत मिळवली होती. हे सगळेच स्वतः बळकावण्याचे काम अफ्रासियाब सातत्याने करीत होता. तो शेवटचा मीरबक्षी व ही सर्व संपत्ती त्याने अलिगढच्या किल्ल्यात ठेवली होती. अलिगढचा किल्ला हा त्याच्या जहागिरीतील एक दणकट असा किल्ला. किंवदंती अशी की अफ्रासियाबजवळ असलेली ही दौलत दीडकोटीची असावी. पुढे प्रत्यक्षात शिंद्याच्या हाती ही संपत्ती आली तेव्हा ती फक्त चाळीस हजार रुपये इतकीच भरली. (**एचपी :** क्रमांक ४४६) अफ्रासियाबखानाला तीन बायका, त्यापैकी पहिलीला एक मुलगा होता. त्याचे नाव खादिम हुसेन खान. फक्त तीन वर्षे वय असलेल्या या मुलाला बादशहाने मीरबक्षीपदावर बसवावे असे नारायणदासचे प्रयत्न चालले होते. या छोट्या मीरबक्षीच्या मातेला केवळ नाममात्र पालकत्व देऊन तिच्यावतीने साम्राज्याचा सर्व कारभार आपल्या हातात घ्यावयाचा, हा नारायणदासचा अंतस्थ हेतू होता. या विधवा बाईजवळ नव्हता पैसा, नव्हती अधिकार गाजविण्याची महत्त्वाकांक्षा. अफ्रासियाबची दुसरी स्त्री जबरदस्त अफघाण बाई. नवऱ्याच्या मालकीचे सर्व किल्ले, धनदौलत व अन्य मालमत्ता यांवर तिची सत्ता होती. तिचा बाप शुजादिलखान आग्ऱ्याचा प्रमुख किल्लेदार. त्याचे दोन चुलत भाऊ बयाझीद (हा बादशहाच्या सैन्यातील तोफखाना विभागाचा प्रमुख होता) व महेबातखान हाही सत्तेवर महत्त्वाच्या जागी होता. या गतधवा बाईची महत्त्वाकांक्षा जबर होती. "ही स्त्री म्हणते, मजला दत्तकपुत्र देऊन माझी सारी दौलत माझे पुत्राचे नावे बहाल करून द्यावी. गोसावी नारायणराव ऐकत नाही." खादिम हुसेनला मागे सारून तिला नवाच मुलगा दत्तक घ्यायचा होता व त्याच्या नावावर नवऱ्याची सर्व स्थावरजंगम मालमत्ता बळकवायची होती. अफ्रासियाबची सर्व धनदौलत अलिगढ किल्ल्यात; आपला दीर जहांगीरखान याला विश्वासात घेऊन ही बाई त्यावर ताबा ठेवून होती. (**एचपी :** क्रमांक ३६३, ३७३)

दिगचा किल्ला व त्याशी संलग्न असा सर्व मुलूख अफ्रासियाबखानाने मलिक मुहमदखान याच्याकडे दिलेला होता. शिंदे बादशहासमवेत किल्ल्यापाशी आला व त्याने नारायणदासमार्फत मलिक मुहमदखानला बोलावून घेतले व त्याला, किल्ला व मुलूख बादशहाच्या हवाली करण्यास सांगितले. त्याबदल्यात त्याला दुसरीकडे जहागीर देण्यात येणार होती. "डिगेचे किल्ल्यांत हशम होते, त्यांची तलब पंधरा हजार रुपये चढले होते. ते त्यास देऊन,

किल्ला खाली करून देवजी पाटील नामे किल्लेदार करून एक पलटण किल्ल्यात व शहरांत आपला अंमल केला" (ॲण्डरसनचे पत्र. **डीवाय :** भाग १, लेखांक १२७; **इब्रत :** भाग २, ९६) पण आग्र्याचा किल्लेदार शुजादिलखान याने 'जुंझा'ची तयारी केली असल्याने महादजीला दोन महिने दिग येथेच मुक्काम करावा लागला. कारण आग्र्यास किल्लेदार म्हणून रायाजी पाटलाची नेमणूक करण्यात आली असल्याने बादशहाचे तसे फर्मान घेऊन तो किल्ला ताब्यात घेण्यासाठी आला होता. पण "किल्लेदाराची सनद घेऊन आलेल्या रायाजी पाटलाला किल्ला द्यावयास शुजादिलखानाने अनमान केला. लढाईची तयारी करून होता. रायाजी पाटलाने तमाम शहरात व गंजात व मंडीत वगैरे दरोबस्त आपला बंदोबस्त करून आग्र्याचे किल्ल्याचे आसपास मोर्चे लावले आहेत" किल्ल्यासमोर खंदक खणून तेथून केलेल्या तोफगोळ्यांच्या भडिमाराने किल्ल्याची तटबंदी जमीनदोस्त केली. आपल्या उर्वरित सैन्यासह बादशहासमवेत महादजी यमुनेवरील राजघाटापर्यंत आला. (२ मार्च) हे ठिकाण आग्र्याच्या उत्तरेस चार मैलांवर आहे. त्यानंतर किल्ल्याच्या वेढ्याचे काम जलदगतीने संपवण्यात आले.

किल्ल्याच्या संरक्षणासाठी असलेल्या शिबंदीपैकी एक पलटण भवानीसिंगच्या हाताखाली होती. या पलटणीतील शिपायांचे पगार बरेच थकलेले असल्याने या पलटणीचा प्रमुख रायाजीला भेटला. रायाजीने ही रक्कम दिल्यास व सर्व शिपायांना शाही सेनेत घेण्याची तयारी दाखविल्यास पलटणीतील सर्व शिपायांसह रायाजीकडे येण्यास तो तयार होता. किल्ल्यातील इतर पलटणींनीही त्याचाच कित्ता गिरविला. हाताखालील सगळेच सोडून गेल्याने जास्तीत जास्त ठेवता येईल तेवढे ठेवण्याचा प्रयत्न करणे याशिवाय शुजादिलला मार्ग नव्हता. वार्षिक बावन्नहजार रुपये उत्पन्नाची जहागीर देण्याचे आश्वासन देण्यात आल्यानंतर त्याने दि. २७ मार्चला किल्ला खाली केला. मुसलमानी साम्राज्याच्या तख्ताच्या दुसऱ्या शहरावर महादजीचा विजयी ध्वज फडफडू लागला. आग्रा प्रांताचा नाममात्र प्रमुख सुभेदार युवराज अकबरशहा याचा सुभेदार म्हणून महादजीची नेमणूक करण्यात आली.[१]

५. अफ्रासियाबच्या कुटुंबीयांबाबत महादजीचा दृष्टिकोन : त्या कुटुंबीयांची दुटप्पी व दुष्ट वागणूक :

त्यानंतरचे पाऊल म्हणजे अलिगढ किल्ल्याचा ताबा घेणे. या किल्ल्याच्या जास्तीत जास्त जवळ असावे म्हणून नदीच्या वरच्या अंगाने ते मथुरेकडे निघाले. (दि. ११ एप्रिलला मथुरेस आले.) पुण्यमय मथुराक्षेत्री व नंतर चिरघाट (मथुरेच्या उत्तरेस २० मैलांवर) येथे महादजीला आठ महिने घालवावे लागले. अलिगढ प्रकरणाने त्याचा एवढा वेळ खाल्ला. अलिगढच्या किल्लेदाराचे मन वळवून किल्ला ताब्यात घ्यावा ही त्याची पहिली कल्पना; त्याबाबत आग्र्याला आली नसेल एवढी मनोव्यथा त्याच्या वाट्याला आली. अफ्रासियाबची विधवा पत्नी व त्याचा मुलगा याबाबत महादजीच्या पहिल्यापासून आपलेपणाच्या भावना होत्या. अफ्रासियाबचा खून झाल्यावर शिंदे, नारायणदासजवळ जाहीरपणे

म्हणाला होता, "येथे कारभारास आफराशाबखानाचा पुत्र आहे, त्याची स्थापना करून द्यावी; बंदोबस्त करून देऊन माघारे जावे." (ओरिजिनल २५,०२१ पृष्ठ ३३ ए; एचपी क्रमांक ६०६)

नोव्हेंबरच्या मध्यापर्यंत त्याच्यासमोर ही योजना होती. अफ्रासियाबच्या मुलाबाबत बादशहाशी रदबदली करून अभिवचन मिळालेली खंडणी घेऊन तो दक्षिणेत जाणार होता. दिवाळखोरीत निघालेल्या बादशहाच्या साम्राज्यात सर्वोच्च अधिकारपदाचा पोकळ डिंडिम मिरवीत बसण्यापेक्षा त्याचे लक्ष माळव्यातील नव्याने हाती आलेल्या मुलुखात सुव्यवस्था लावण्याकडे अधिक होते, हे त्याच्या कामाच्या रूपरेषेवरून दिसून येते. बादशहा महादजीच्या गळी पडला व साम्राज्याच्या सर्वश्रेष्ठ अधिकाराची सूत्रे हातात घेऊन तूच हे सर्व मार्गी लाव, म्हणून त्याला विनवू लागला; तेव्हाही काय करावे हा निर्णय घेण्यासाठी महादजीने तब्बल पंधरवडा घेतला. पुढे परिस्थितीच्या रेट्याने त्याला ही धुरा उचलावी लागली. ही अवाढव्य जबाबदारी अफ्रासियाबच्या तीन वर्षे वयाच्या अज्ञ बालकावर व पर्यायाने त्याच्या कावेबाज कश्मिरी नोकराच्या हातात द्यायला त्याचे मन तयार होईना. असे करणे म्हणजे मुसलमानी साम्राज्याचे अधःपतन पूर्णत्वास नेणे; त्याचा परिणाम म्हणजे इंग्रजांचा तिथे प्रवेश होणे आणि तिथून बादशहाच्या नावावर हिंदुस्थानात त्यांचा अंमल सुरू होणे. अशी योजना प्रत्यक्षात आणण्याचे काम मेजर ब्राउन हा दिल्ली दरबारातील ब्रिटिशांचा वकील त्याच्या नजरेसमोर उघडपणे करीत होता. हाच मोठा धोका आहे, हे गेली तीन वर्षे, पेशवे आपल्या पत्रांतून शिंद्याला वरचेवर कळवीत होते. व तो टाळण्यासाठी शक्य ते सर्व करावे असे सातत्याने सांगत होते.

दिल्लीचे 'वकील-ई-मुत्‌लक' पद शिंद्यावर जवळ जवळ लादले गेले पण शिंद्याने ते प्रचंड ओझे आपल्या खांद्यावर समर्थपणे पेलून धरले. बादशहा व शासनाचा योग्य तो मान ठेवून अफ्रासियाबचे कुटुंबीय प्रामाणिकपणे साहाय्य करणार असतील तर त्यांचा अवमान करावा अशी शिंद्यांची इच्छा नव्हती. तसे साम्राज्याची म्हणून जी मालमत्ता अफ्रासियाबच्या ताब्यात होती ती त्यांनी काहीही दडवून न ठेवता किंवा न बळकावता बादशहाकडे प्रामाणिकपणे परत करावी असेही शिंद्यांना वाटत होते. शिंदे व बादशहा यांच्यांत जी पहिली बैठक झाली (१७ नोव्हेंबर, १७८४) त्यानंतर लागलीच, त्याने बादशहाकडून अफ्रासियाबच्या छोट्या मुलाला 'हुसेन-उद्-दौला खादीम हुसेन खान' ही किताबत देवविली. नंतर हेळणा येथून एक सैन्य तुकडी पाठवून या बालकाला अतिशय काळजीपूर्वक शाही दरबारात आणण्याची व्यवस्था केली. त्याप्रमाणे हा मुलगा आल्यावर, महादजीने त्याच्या तंबूत जाऊन त्याच्या वडिलांच्या निधनाबद्दल चार सांत्वनाच्या गोष्टी केल्या. (१८ जानेवारी १७८५) नंतर राज्याभिषेकाच्या वार्षिक समारोहाचे वेळी (३ एप्रिल) महादजीच्या विनंतीवरून या बालकाला आणखी वरच्या मानाचा असा 'दुसरा अश्रफ-उद्-दौला' हा किताब देण्यात आला. (त्याच्या वडिलांचा हाच किताब होता) व वार्षिक चार लाख उत्पन्नाच्या जहागिरीही देवविल्या. या मुलाचे पालक आपल्याशी

असेच खरेपणा व मित्रत्वाच्या नात्याने वागतील अशी महादजीची समजूत होती. पण ते वेगळेच योजीत होते. मिळेल तेवढे घ्यायचे, उचलायचे व दक्षिणेतून आलेल्या या काफराला फसवायचे, असा जणू त्यांनी विडाच उचलला होता. [**डीसी इब्रत** : भाग २, ९६]

६. अलिगडचा वेढा : शरणागती : २० नोव्हेंबर, १७८५

आग्र्यानजीक आल्यावर, अलिगढचा किल्ला व त्यातील सरकारची सर्व मामलत आपल्या ताब्यात द्यावी, असे अफ्रासियाबच्या कुटुंबीयांना महादजीने सांगितले. आपण त्यानुसार वागायला तयार आहोत असे त्यांनी वर वर भासवले व आपल्या चरितार्थासाठी आपल्याला असाच एखादा दणकट किल्ला व जहागिरी मिळावी अशी मागणी केली आणि आतून मात्र गुप्तपणे प्रतिकाराची तयारी केली.[१] आफराशाहाबखान याचा भाऊ जहांगीरखान रामगडात होता. त्याला शिंद्याचा प्रतिकार करावा म्हणून चेव आणणारी व आश्वासने देणारी गुप्त पत्रे येत होती. ही पत्रे शिंद्याच्या हाताखालील मुगल सेनाधिकारी व खुद्द हिंमतबहादूर यांच्याकडूनच जात होती. त्यामुळे जहांगीरला जोर चढला. त्या भरात त्याने अयोध्येचा नबाब व अनूपशहर येथे असलल्या इंग्रज सैन्याचा प्रमुख जनरल सर जॉन कमिंग्ज, यांच्याकडेही मदतीसाठी तातडीचे निरोप पाठविले. नबाब वझीर याला त्याने लिहिले, "अयोध्येच्या सरहद्दीवर असलेला हा अभेद्य किल्ला जर या दाक्षिणात्यांनी जिंकून घेतला तर तुमच्या मुलुखाला ही कायमची डोकेदुखी होणार. या ठिकाणाहून अयोध्या उद्ध्वस्त करणे त्यांच्या हातचा मळ आहे. हा किल्ला व माझ्याकडे सांप्रत असलेला मुलूख माझ्याच ताब्यात रहावा म्हणून जर तुम्ही मला साहाय्य कराल तर नजफ, शफी, अफ्रासियाब व आणखी काहीजणांनी आपापल्या हयातीत जी अगणित संपत्ती साठवून या किल्ल्यात ठेवली आहे, त्यातील निम्मी मी तुम्हाला देईन. त्याचप्रमाणे या मोहिमेसाठी झालेला तुमचा लष्करी खर्चही देईन. तुमची तशी इच्छा असेल तर हा किल्लाही मी इंग्रजांच्या हवाली करीन; या प्रांताचा एक साधा जमीनदार म्हणून राहीन व तुम्हाला खंडणी देत जाईन." (**इब्रत : डीवाय** : भाग १ लेखांक १७१, १४०)

सर जॉन कामिंग्ज याने स्वतःच निर्णय घेतला व त्यानुसार तो आपल्या छावणीतून निघाला. (१ एप्रिल) अलिगढच्या ईशान्येस पंधरा मैलांवर असलेल्या अत्रौली येथे त्याने तळ दिला. तिथून त्याला मराठासैन्याच्या हालचालीवर देखरेख ठेवता येत होती. त्याने जहांगीरखानाची भेट घेतली व धन्याची सत्ता टिकविण्याच्या त्याच्या प्रयत्नात त्याला पाठिंबा द्यायचे मान्य केले. ब्रिटिश हस्तक्षेपाच्या या अनपेक्षित व असमर्थनीय धमकावणीने महादजी मनातून भयंकर चरकला. त्याबरोबर त्याच्या शत्रूंनाही सर्व बाजूंनी जोर चढला. महादजीने याबाबत ब्रिटिश रेसिडेन्ट जेम्स ॲण्डरसन याजकडे निषेधवजा तक्रार केली. ॲण्डरसनने गव्हर्नर जनरलकडून खास हुकूम आणवून कामिंग्जला आपल्या ठिकाणी परत जायला भाग पाडले. कमिंग्ज करणवासला परत गेला (२१ एप्रिल) व भेडसावणारा एक ढग निवळला.

अलिगढचा किल्ला सहजपणे विनात्रास हातात येतो का, याबाबत प्रयत्न करावा म्हणून महादजीने मिर्झा अन्वर बेगला (हा महादजीच्या विश्वासातल्या मिर्झा रहीम बेगचा भाऊ) अंतर्वेदीत धाडले. अन्वर बेगबरोबर फक्त एकहजार स्वार होते. ते त्याच्या संरक्षणालाही पुरेसे नव्हते. जहांगीरखानाला ब्रिटिशांची कुमक येते आहे हे ऐकून त्याचे धाबे दणाणले. म्हणून किल्ल्याच्या परिसरात वीस मैलांपर्यंत जायलाही तो धजावला नाही. (१७८५ च्या सुरवातीस) दरम्यान आग्र्याचा पाडाव झाला. शिंदे याने शुजादिलखान व त्याचा चुलतभाऊ बयाझिद यांना भारी नझराणे देऊन त्यांच्याशी सलोखा केला व 'आपल्या नात्यातल्या जहांगीरखानाचे मन आपल्याला तरी वळवता येते का' हे अजमावण्यासाठी त्यांना अलिगढला जायला सांगितले. ते परत आले ते हात हालवीतच. ब्रिटिशांशी लढायला लागेल हा धोका संपल्याने, शिंदे यांनी आपल्या फौजेतील पाच हजार स्वारांची एक तुकडी वेगळी काढली व रायाजी पाटलाला त्या तुकडीसमवेत अलिगढवर रवाना केले. पण यावेळी उन्हाळा ऐन भरात होता. अलिगढच्या आसमंतात दहा मैलांत पाण्याचे दुर्भिक्ष्य होते. मे महिन्यात महामारीचा जबर तडाखा बसला. सर्व प्रदेश उजाड झाला. "रस्त्यातून चालता चालता माणसे खाली पडून मरू लागली." मोठी अडचण म्हणजे शिंद्याच्या जवळचा सर्व पैसा संपला. सैन्याचा पगार खूपच थकला होता. तो देता येणे त्यांना शक्य नव्हते. "ज्याला पगाराची थकबाकी देण्यात आली नव्हती असा कोणताही शिपाई या मोहिमेसाठी यमुना ओलांडून पलीकडे जायला राजी नव्हता."

शेवटी रायाजी कसातरी अलिगढजवळ येऊन पोहोचला व त्याने किल्ल्याला वेढा घातला. जहांगीरखानाने धीटपणे प्रतिहल्ला करायचे ठरवले ते संरक्षणाचा उत्तम मार्ग म्हणून. वेढा घालून बसलेल्या मराठ्यांवर वारंवार तुफानी हल्ले करून त्यांना भंडावून टाकण्याचा त्याचा प्रयत्न होता. अलिगढ किल्ल्यापासून तीन मैलांवर कोईलचा तटबंदी असलेला किल्ला आहे. तेथून दि. २० रोजी जहांगीरखानाने मराठ्यांवर धडक हल्ला चढविण्याचा प्रयत्न केला. घनघोर चकमक उडाली. चारशे जवान प्राणास मुकले वा जायबंदी झाले; निकराची हातघाईची लढाई करून शूर रायाजीने हल्ला परतवून लावला व पुढे जाऊन कोईलवर तोफांचा भडिमार केला. जहांगीरची संरक्षक शिबंदी हतबल होऊन पळून गेली. चाळीस तोफगोळे व अन्य युद्धसाहित्य त्यांनी तिथेच टाकून दिले. कोईल हा आता वेढा घालणाऱ्या मराठ्यांचा तळ झाला. किल्ल्याच्या तटबंदीच्या दिशेने खंदक खणीत ते अलिगढच्या रोखाने चालू लागले. ऑगस्टच्या सुरवातीस प्रत्यक्ष परिस्थिती काय होती याचे वर्णन एका मराठी पत्रात वाचायला मिळते : "किल्ला पुरा वेढला आहे; आपले शिपाई किल्ल्याभोवताली एक कोसावर उभे आहेत. किल्ला मजबूत, खूप दिवस तगू शकेल". त्यावर्षी कधी नव्हे असा मुसळधार पाऊस झाला. त्याने वेढा घालणाऱ्यांचे जेवढे हाल झाले तेवढे उन्हाळ्यातील प्रखर तापानेही झाले नसतील. यमुनेला प्रचंड पूर आला. महादजी व रायाजी यांच्या छावणीच्या दरम्यान होडीतून जी ये जा चालू होती, तीतही अडथळे येऊ लागले. जहांगीरखान तुफानी धडका मारून मराठ्यांच्या खंदकावर हल्ला करीतच होता. शिंद्याने त्याची सर्व मालमत्ता जप्त केली.

त्याचे नातेवाईक जिथे, जसे, जेव्हा सापडले तसे कैद केले. जहांगीरखानाच्या कारवायांना जशासतसे प्रत्युत्तर दिले गेले. (**इब्रत** : भाग २, १४८)

हिवाळा आला तरी अलिगढ किल्ल्याच्या वेढ्याचे काम रेंगाळतच होते. शिंद्याच्या प्रतिष्ठेला तडा जाण्याची वेळ येऊन ठेपली तेव्हा बादशहाला दिल्लीतून बाहेर काढायचे व त्याला किल्ल्यासमोर उभा करून त्याच्या प्रत्यक्ष उपस्थितीचा काय परिणाम होतो ते पहायचे असे महादजीने ठरविले होते. त्यासाठी १२ ऑक्टोबरला तो मथुरेहून निघाला. त्याच्या सांगण्यानुसार दिल्लीहून निघालेल्या बादशहाची व त्याची वनचरी (होडाळच्या उत्तरेस पाच मैलांवर) येथे गाठ पडली. त्या महिन्याच्या १७ दिनांकाला ते चिरघाट येथे छावणीत आले. हे ठिकाण मथुरेच्या उत्तरेस वीस मैलांवर आहे. या ठिकाणी दोघांचाही दोन महिने मुक्काम होता.

आता विरोध करण्यात अर्थ नाही हे जहांगीरखानाने ओळखले. लछमनरावामार्फत बोलणी सुरू करून त्याने किल्ला खाली केला. शिंद्याच्या सैनिकांनी वीस नोव्हेंबरला तो ताब्यात घेतला. त्या ठिकाणी मिळालेल्या लुटीत ६५ मोठ्या तोफा, तोफगोळे उडविण्यास उपयुक्त अशी आणखी एक मोठी तोफ, १०० मण दारूची भुकटी, १००० मण शिसे, धान्याची काही पोती एवढे हाती लागले. रोकड मात्र फक्त चाळीस हजारच मिळाली. काही जडजवाहिरही मिळाले (बादशहा व त्याचा मुखत्यार महादजी यांनी ही मिळकत सारखी वाटून घेतली).

७. अफ्रासियाबखानाच्या विश्वासघातकी सहकाऱ्यांना शिक्षा

दि. २८ नोव्हेंबर रोजी जहांगीरखान, महादजीच्या छावणीत आला. महादजीने त्याची बादशहाशी भेट घडवून आणली. मुंडसानचा किल्ला अफ्रासियाबचे विधवा स्त्रियांना देण्यात आला. मुलाला एक लाख दहा हजारांची जहागीर देण्यात आली. खुद्द जहांगीरखानाला अर्धालाखाची जहागीर दिली पण किल्ला मात्र दिला नाही. अफ्रासियाबच्या कुटुंबीयांना देण्यात आलेल्या जहागिरीचा वार्षिक महसूल अडीच लाख होता. जहांगीरखानाला घातलेल्या अटींत एक अट स्वच्छ होती की त्याने आपली खासगी मालमत्ता खुशाल आपल्या ताब्यात ठेवावी पण मरहूम अमीर–उल–उमरा अफ्रासियाब याच्या मालमत्तेचा हिशेब त्याने द्यायलाच हवा. (ॲण्डरसन **पी आर सी**, खंड १, पृ. ३१) या आधीच्या सलग अशा चार मुखत्यारांनी आपल्या कारकीर्दीत जी मिळकत जमा केली होती ती सर्व अफ्रासियाबच्याच ताब्यात होती हे सर्वांना मान्य होते. तो प्रचंड पैसा त्याने अलिगढ किल्ल्यात ठेवला होता हेही सगळ्यांनाच माहीत होते. पण विजयी महादजीला तिथे फक्त ४० हजारच मिळाले. बादशहाने पैसा उभा करण्यासाठी ज्यांची जडणघडण ठाऊक आहे असे काही जडजवाहीर नजफ व अफ्रासियाब यांच्याकडे दिले होते.[३] ते सापडते, तर सहजी ओळखता येते. पण ते सापडले नाही. जहांगीरखान व बेगम यांच्याजवळ "एकूण ज़वाहीर व पैक्याचा तग़ादा लाविला आहे ते म्हणतात की, आम्हास काही ठाऊक

नाही. अनुपगीर गोसावी व नारायणदास दिवाण तुम्हापाशी आहेत, त्यास पुसून घ्यावे ” तसेच त्यांनी ही जबाबदारी शुजादिलखानावरही टाकली. (**इब्रत :** खंड २, पृ १५१; **डीवाय** : , भाग १, लेखांक १४१) नंतर हे सिद्ध करण्यात आले की अलिगडला नुकताच जो वेढा पडला त्या वेळी तेथून जे जे हलविता येण्यासारखे होते ते ते सर्व जहांगीरखान, घरातील विश्वासू वृद्ध नोकर-चाकर, मोलकरीण, अनाजी, सैफखान व भवानीप्रसाद नावाचा एक हिंदू लेखनिक यांच्या साहाय्याने सातत्याने बाहेर काढून अयोध्येत पाठवीत असे.

जहांगीरखानाच्या या विश्वासघातकी वर्तनाची महादजीला किळस आली. शिवाय बादशहाचे किमती जडजवाहीर त्याला न मिळणे हे नव्यानेच अत्युच्च अधिकारावर आलेल्या महादजीला कमीपणा आणणारे होते. त्याशिवाय असा मूल्यवान ठेवा बादशहाला देऊन त्याचे वाटप मागत बसण्यापेक्षा सर्वच हडप करणे उत्तम, असे ठरवून पत्ता लागत नाही असे त्यानेच सांगितले नसेल कशावरून, असाही संशय घेण्यास जागा निर्माण झाली. तेरा वर्षांपूर्वी पथ्थरगड जिंकल्यानंतर मराठ्यांवर हाच आरोप ठेवण्यात आला होता. याबाबतची खरी माहिती मिळावी म्हणून जहांगीरखानाची मनधरणी, विनवण्या करून ते सर्व फुकट गेल्यावर शिंद्याने त्याला कैदेत ठेवले. (दि. २५) मुंडसानवर असलेल्या अफरासियाबच्या विधवांना कैद करून त्याच्या छावणीत आणण्यात आले. दासींकडून त्यांची अंगझडती घेण्यात येऊन त्यांच्या तंबूचीही कसून तपासणी करण्यात आली. काही मूल्यवान जडजवाहीर मिळाले. (शिंदे व बादशहा या दोघांनी त्याची आपसात वाटणी केली) या स्त्रियांनी महादजीला काही गुप्त पत्रे दिली. त्या पत्रांत नारायणदास व हिंमतबहादूर यांनी जहांगीरखानाला ‘ किल्ला लढवीत रहा व महादजीशी शर्थीने झुंज दे ’ असे लिहिले होते. त्यामुळे मरहूम अफ्रासियाबच्या दिवाणजीलाही कोठडी पहावी लागली. आग्रा शहरात रहाणाऱ्या त्याच्या कुटुंबीयांना कैद करून त्यांची सर्व मालमत्ता सरकारजमा करण्यात आली. [अंदाजे १ जानेवारी, १७८६; **इब्रत :** भाग २, पृ. १५१–१५४]

८. शिंदे यांच्या शिखांशी प्रथमच वाटाघाटी

१७८५ चा प्रारंभ. आग्र्याचा ताबा सहज व शांततापूर्ण मार्गाने मिळविता आला तर मिळवावा यासाठी शिंद्याचे प्रयत्न चालले होते. त्याच वेळी दिल्ली व तिचे संरक्षण या गोष्टीही त्यांना नजरेआड करून चालणार नव्हते. दि. १९ जानेवारीला त्यांनी अंबाजी इंगळेची दिल्लीच्या उत्तरेकडील प्रांतात फौजदार व महसूल अधिकारी म्हणून, नेमणूक केली. नंतर त्याच्यासमवेत लढाऊ फौज देऊन त्याला व माचेडी राजाला दिल्लीच्या बंदोबस्तास रवाना केले. दिल्लीत नव्या मुखत्याराचा दरारा बसवणे हाच त्यातला हेतू होता. शिवाय बादशहा दिल्लीत नसल्याने शिखांची धाडही दिल्लीवर येणे असंभवनीय नव्हते. ‘ दरोबस्त शहरचा व दरवाजीयाचा बंदोबस्त नबाब नजबकुलीखान यांचा होता तो उठवून, मशारनिल्हेनी आपला बंदोबस्त केला; ’ अफ्रासियाबच्या वतीने दिल्लीचे अधिकार नजफ् कूलीखानकडे होते, ते त्याने मुकाट्याने सोडले (११ फेब्रुवारी). दिल्लीच्या वेशीवर

अंबाजीने आपले सैनिक उभे केले. [**डीसी. डीवाय** : भाग १, लेखांक १२८] नजफखान मेल्यानंतर दिल्लीत जी बेबंदशाही माजली होती, त्याचा फायदा घेऊन गुजर मंडळी दिल्लीच्या आसपासचे मुलुखात लूटमार करीत होती. अफ्रासियाबचा खून झाल्यानंतर तर त्यांचा हा पुंडावा दुप्पट जोमाने सुरू झाला होता. "त्यांपैकी दोन अडीचशे गुजर पाळत लावून, एका गुजराच्या घरी लग्न सुरजपुरासमीप होते तेथे फौज पाठवून, दोन अडीचशे गुजर मारून टाकले व काही धरले. जिवंत आले त्यांस कोतवालाच्या स्वाधीन करून त्यांसही मारून टाकले. दुसऱ्या दिवशी कूच करून कालिकेचे आसपास वीसकोस लांब पहाड आहे, त्या तमाम पहाडास वेढा घालून गुजरास कोंडिले आहे." यातूनही बरेचसे गुजर रात्रीच्या वेळी पळून गेले. गुजरांच्या चारपाच खेड्यांचा पुरा काटा काढल्यावर व त्यांतील पुरुषमंडळींची कत्तल केल्यावर ती लुटारू जमात खूपच नीटपणे वागू लागली.

त्यानंतर शिखांशी सलोखा करण्याच्या मुख्य उद्देशाने अंबाजी उत्तरेकडे सरकू लागला. दिल्लीच्या उत्तरेस तेरा मैलांवर असलेल्या भक्तावरपूर या ठिकाणी त्याने मुक्काम टाकला. पानिपत मुलुखातील नऊ शीख सरदारांनी या दृष्टीने त्याच्याशी यापूर्वीच बोलणी सुरू केली होती. ते त्याला या ठिकाणी भेटले. (२७ मार्च)

त्याप्रमाणे त्यांच्यातील दुलजासिंग व मोहनसिंग या दोघा प्रमुख नेत्यांनी महादजीस भेटावे व सलोख्याच्या अटींवर शिक्कामोर्तब करावे असे ठरले. त्याचा नजफखानाशी समझोता झाला होता त्याप्रमाणे त्यांना त्यांच्या पूर्वप्रथेनुसार ज्या खेड्यातून ते राखी जमा करीत, तिला परवानगी होती. मात्र बादशहाच्या कोणत्याही मुलुखावर त्यांनी हल्ला करायचा नाही, अशीही अट होती. (प्रकरण ३१, पोटप्रकरण ५) बादशहाच्या कोणत्याही मुलुखातून त्यांनी राखी वसूल करू नये, जयपूरराजाच्या मुलुखातून आपण देऊ तेवढ्याच जहागिऱ्या घ्याव्यात व पांचा हजार स्वारांनिसी चाकरी करावी व धुमधाम आणि लुटालूट करू नये असे महादजीने फर्माविले. [**एचपी** : पत्र ३७३, ३८१; **डीवाय** : भाग १, लेखांक : १११, १३४, १३५; **राजवाडे**, खंड १२, लेखांक ४१] या योजनेत अंतर्वेदीला हात लावण्यात आला नव्हता; दिल्लीच्या उत्तरेकडून पानपतपर्यंतचा मुलूख सुरक्षित रहावा हा त्यातील उद्देश होता. हे दोन शीख सरदार व संरक्षणासाठी अल्पसा फौजफाटा घेऊन अंबाजी घाईगर्दीने मथुरेला आला व त्याने आपल्या धन्याची भेट घेतली. (१० एप्रिल) हे शीख सरदार तेथील छावणीत काही दिवस होते; दि. १० जूनला त्यांची बोळवण करण्यात आली. [**पीआरसी** : खंड १; क्रमांक १४, १५]

९. राघोगडच्या खिचींविरुद्ध मोहीम

१७८५ साल महादजीच्या दृष्टीने चिंता व विवंचना यांनीच भरलेले होते. दि. १५ ऑक्टोबरच्या पत्रात हिंगणे लिहितात, "चहूकडे चार मसलती येऊन लागल्या आहेत. एक राघोगड व एक रामगड (=अलीगढ) व एक जयपूर व एक पाणिपत. एकूण चौ ठिकाणी फौजा शहास अटकल्या आहेत व चौ ठिकाणीही झुंज लागले आहे." दळणवळण ठेवण्याच्या दृष्टीने राघोगड बाबतची कारवाई प्रथम व तातडीने करायला हवी होती.

आग्र्यापासून दक्षिणेकडे जाणारा राजमार्ग, ग्वाल्हेरच्या दक्षिणेकडून, अहिर प्रदेशाची राजधानी सिरोंजमधून जात असून जवळ जवळ दीडशे मैलांचा आहे. या सिरोंजच्या वायव्येस राघोगड आहे. या ठिकाणी अकबर बादशहाने खिची चौहान राजपुत्रासाठी एका छोट्याशा राज्याची उभारणी केली होती. यानंतरच्या शतकात अनेक छोट्या छोट्या सरंजामदारांना आपल्या हुकमतीत घेऊन या घराण्याच्या पूर्वजांनी आपल्या राज्याच्या सीमा पूर्वेस सिरोंजपलीकडील बटवा नदीपासून पश्चिमेस अन्धेरीपर्यंत (पार्वती नदीची एक उपशाखा) वाढविल्या होत्या. अठराव्या शतकाच्या दुसऱ्या चरणात, मराठ्यांनी माळव्यात पाऊल रोवले; तेव्हा त्यांच्यात व खिचीत तेढ उत्पन्न झाली. शेवटी माघार घ्यावी लागल्याने खिचींनी मराठ्यांचे वर्चस्व मान्य केले व ते त्यांस खंडणी देऊ लागले. नेहमीच्या रिवाजानुसार खंडणी खूप साचली. १७६० मध्ये सदाशिवराव भाऊ पानिपतावर जे मराठा सैन्य घेऊन गेले होते त्यात पिछाडीस हे खिची होते. माळव्यात मराठ्यांची सत्ता वाढली, मुलूखही वाढला, त्यावेळी दख्खनकडे जायला एक नवा जवळचा मार्ग तयार करण्यात आला. या नव्या मार्गामुळे मुख्य हमरस्ता ग्वाल्हेरच्या नैर्ऋत्येस ६५ मैलांवर शिवपुरीपर्यंतच येई व पुढे नैर्ऋत्येस वळून उज्जैन, इंदूरकडे जात असे. मराठ्यांनी तयार केलेला नवा मार्ग खिची मुलुखातून जात होता. या मुलुखात या मार्गाची सुरुवात लोहमार्गावरील गुणा स्थानकाशी होते. याच्याच दक्षिणेला काही मैलांवर बजरंगगड आहे. ही खिचीवाड्याची नंतरची राजधानी. मराठ्यांना या ठिकाणी बंदोबस्त ठेवणे भागच होते.

खिचीच्या राजाने स्वतःला राणा हा किताब घेतला होता. होळकरांना खंडणी देण्याऐवजी, त्याने छाब्रा (गुणाच्या पश्चिमेस तीस मैल) व गुगर हे दोन जिल्हे त्यांना दिले. १७८४ मध्ये त्याने या दोन्ही जिल्ह्यांची परत मागणी केली व खंडणीची रक्कम रोख देण्याचे आश्वासन दिले. हे दोन्ही जिल्हे परत देण्यापूर्वी, होळकरांच्या दौलतीची मुखत्यार अहल्याबाई हिने खंडणीची राहिलेली सर्व बाकी चुकती करण्यास सांगितले. त्याकडे लक्ष न देता राणाने ते दोन जिल्हे व मराठ्यांची आणखी काही ठाणीही जबरदस्तीने घेतली. (मार्च, १७८५) ही हकीगत समजताच आग्रा येथे असलेला खंडोजी इंगळे (अंबाजीचा भाऊ) व मुहमद बेग हमदानी यांना बोलावून घेतले; आणि त्यांच्या बरोबर सामर्थ्यशाली सैन्य देऊन त्यांना राण्यावर चालून जाण्यास सांगितले (एप्रिल). या सैन्याने गुगर, छाबडा व आणखी काही छोटी छोटी ठाणी परत घेतली व ते राघोगडला पोहोचले. त्याठिकाणी त्यांनी पेठ हे खेडे घेतले व राघोगडच्या किल्ल्याला वेढा घातला (जूनच्या सुरवातीस). राजा बळवंतसिंग (बलभद्रचा मुलगा) याने आपला भाऊ बावांकडे रदबदलीस पाठविला. पण तो मथुरेनजीक आल्यावर महादजींच्या हुकुमानुसार त्याजवर फौज पाठवून लुटून आणून बेड्या घालून कैद करण्यात आले. (जून, **एचपी** : ४०७) बळवंतसिंगाने लढाई सुरूच ठेवली. लुटालूट करण्यासाठी गेलेल्या मराठ्यांच्या काही टोळ्यांचा पराभव केला व त्यांना मागे पिटाळले (जुलैचे प्रारंभी). आपल्या लोकांनी माघार घेतली हे समजताच महादजीला राग आला. आपल्या सैन्यात चौफेर भरती करून त्याने शिपायांची संख्या

चाळीस हजारपर्यंत वाढविली. बलवंतसिंगाने उघड्या मैदानातून पळ काढला व स्वतःला राघोगडमध्ये कोंडून घेतले. (ऑगस्ट १७८५) मराठ्यांनी हयगय केल्यामुळे वेढ्याचे घोंगडे कितीतरी दिवस भिजत पडले होते. नंतरच्या हिवाळ्याच्या अखेरी अखेरी मराठ्यांना या वेढयापायी होणाऱ्या त्रासाचा उबग आला. वेढयाचे काम संपवून त्यांना दुसरीकडे जायची उतावळी होती. आपापसातील तंट्यांनीही त्यांना भंडावले होते. राण्याबरोबरच्या दीर्घसूत्री वाटाघाटी संपवल्या व सन्मानाने आणि सुरक्षितपणे त्याला किल्ल्याबाहेर जायला परवानगी दिली. (फेब्रुवारी १७८६) 'त्यावरून राजश्री पाटिलबावा रागास बहुत आले कीं, लाखो रुपये खर्च होऊन, त्यास बहादरीने काढून, त्यासी पगडीबदल भाऊपणा करावयाचे प्रयोजन काय ? त्याजवरून येथून राजश्री अंबाजी इंगळे यांची रवानगी केली आहे कीं, त्यास मारून टाकावे, नाहीतर धरून आणून ग्वाल्हेरचे किल्ल्यावर टाकावे व त्याची सर्व मामलत जप्त करावी." अंबाजीने हे काम तडफेने केले. मराठ्यांचा अंमल खिचीत पुन्हा सुरू झाला. बलवंतासिंगला बेड्या घालून ग्वाल्हेरीस ठेवण्यात आले. त्याची पत्नी व दोन मुलगे यांना युद्धकैदी म्हणून भिलसा येथे पाठविण्यात आले. त्याची सर्व मालमत्ता जप्त करण्यात आली. सर्व मार्गी लावून मोहिमेवरील सैनिक महादजीकडे परत आले.

दोनशे वर्षांचा इतिहास असलेले हे राजपूत घराणे नष्ट करण्याच्या प्रयत्नाचे फलित शेवटी फार कटू ठरले. बलवंतासिंगाला कोठडीत डांबून ठेवण्यात आले असले तरी त्याचा एक मुलगा जयसिंग हा मुक्तच होता. भोपाळच्या मुसलमान नबाबाने त्याला गुप्तपणे साहाय्य केले. आपल्या मुलुखातील सोद्यांना हाताशी धरून तो खिची वाड्यात व माळवेप्रांती उपद्रव देऊ लागला व त्याने दक्षिणेकडे जाण्याचा मार्ग पूर्वीपेक्षाही अधिक धोक्याचा करून ठेवला. तसेच त्याने दौलतरावाचा एक सेनाप्रमुख जीन बॅप्टिस्ट फिलोज ह्यांच्या कुटुंबियांना कैद करून दौलतरावास खाली मान घालावयास लावले.[४]

१०. उमरावगीर व हिंमतबहादुर गोसावी : त्यांचा पूर्वेतिहास

मुखत्यारपदावर आल्यावर पहिल्याच वर्षी अनेक अडचणी व गुंतागुंतीच्या प्रश्नांनी महादजीला भंडावून सोडले होते. त्यापैकी बऱ्याचशा जंजाळातून तो मार्च, १७८६ अखेर मोकळा झाला. यावेळी अशी एक घटना घडली की त्यापायी महादजीला बरीच यातायात सहन करावी लागून म्हणावे तसे यश न येता खूप त्रास झाला. त्याच्या सैन्याच्या पूर्वेकडील तुकडीत एका कलिपुरुषाने प्रवेश केला व आपल्या अशा काही हालचाली सुरू केल्या, की त्यामुळे त्याच्या शत्रूंना चांगलेच फावले व ते अधिक धिटाईने मान वर काढू लागले. या कलिपुरुषाच्या कारवाईस महादजीने प्रतिबंध करायचा प्रयत्न केला नाही असे नव्हे, पण त्यात त्याला अपेक्षेइतके यश आले नाही. सफदरजंगने बंगषविरुद्ध लढाई केली (१७५०), तसेच इमाद–उल्–मुल्क बरोबर त्याला सामना द्यावा लागला. (१७५३) त्यावेळी नागा गोसावी (एक लढवय्या हिंदू मठाधिपती) राजेन्द्रगीर हा सफदरजंगाकडून होता. आपला वारसा चालू रहावा म्हणून या महंताने दोन ब्राह्मण मुलांना दत्तक घेतले

होते. ही मुले त्यांच्या बिधवा आईने दुष्काळी परिस्थितीत जगणे अशक्य झाल्याने या महंताला विकली होती. ही दोन मुले म्हणजेच उमरावगीर व अनूपगीर (अनूपगीरलाच पुढे हिंमत-बहादूर ही पदवी मिळाली) नागा गोसावी राजेंद्र गीर याच्या मृत्यूनंतर या दोन मुलांनी अयोध्येच्या नबाबाच्या सैन्यातील नागा पलटणीचे म्होरकेपण संभाळले होते. शुजाउद्दौ-लाच्या बाजूने लढताना या हिंमतबहादूरने बुंदेलखंडाचा राजा हिंदूपत याच्याविरुद्ध शस्त्र उपसले पण त्यात त्याचा दारुण पराभव झाला. (१७६२) बक्सार येथे जी अनर्थकारक लढाई झाली त्यावेळीही हा माणूस आपल्या धन्याच्या बाजूने लढला होता. (१७६४) या लढाईत शुजाला पळ काढावा लागून त्याचा असा प्रांत उरला नाही. त्यानंतर चरितार्थाला काही साधन हवे म्हणून हे गोसावीद्वय जवाहिरसिंग जाटाकडे गेले (प्रकरण २३, पोट-प्रकरण १६). पुढे त्या राजाचा विश्वासघात करून ते रघुनाथदादाकडे आले. (१७६६ डिसेंबर अखेर) त्यानंतरच्या सालात आपल्या उत्तरहिंदकडील मोहिमा संपवून मराठे दक्षिणेत परत गेले तेव्हा हे गोसावी, शुजाकडे पुन्हा परत आले. शुजा त्यावेळी परत सत्तेवर येऊन इंग्रजांच्या पाठिंब्याच्या जोरावर आपल्या राज्याचा विस्तार करण्यात गर्क होता. पण शुजाच्या मृत्यूनंतर (१७७५) इंग्रजांचे बरेच देणे झाल्याने शुजाचा मुलगा असफउद्दौला याने सैन्यकपात करायला सुरुवात केली. गोसावी बंधू पुन्हा बेकार झाले. नजफखानने दिगला वेढा घातला (१७७६) त्यावेळी ते त्याच्याकडे गेले व त्याच्या सैन्यात राहून त्याच्या हाताखाली काम करू लागले. महादजीचा उदय होऊन तो दिल्लीचा मुखत्यार होईपर्यंत ते नजफकडे व त्याच्यानंतर त्याच्या जागी येणारांच्या हाताखाली होते. [**इमाद** : ६४, ८७, १०२, १४३]

हिंमतबहादुराजवळ धैर्य नव्हते; विश्वासघातकी वृत्ती व पाताळयंत्रीपणा यामुळे त्याची दानतही चांगली नव्हती. नजफखानच्या कृपेने त्याच्या अमदानीत तो फार उच्च पदावर चढला. हिंदू राजांशी कसे वागायचे या बाबतीत बादशहाच्या मुखत्याराचा तो मुख्य सल्लागार होता. नजफखानच्या मृत्यूनंतर मुखत्यार पदासाठी जी खणाखणी झाली त्यात तो अफ्रासियाबच्या बाजूचा होता. अफ्रासियाबच्या अमदानीत, अफ्रासियाबचे धोरण व त्याने परक्या सत्तेशी कसे वागावे हे ठरविण्याचे अधिकार हिंमतबहादुराकडेच होते. (आक्टो. १७८३ – आक्टो. १७८४) नारायणदास हा अफ्रासियाबच्या खाजगी मिळकतीचा व गृहव्यवस्थेचा दिवाण. हिंमतबहादुराचे या नारायणदासाशी लागेबांधे होते. प्रत्यक्षात कोणत्याही अधिकाराच्या जागेवर नसताना सर्व राज्यकारभारावर वचक ठेवणारी खरी सत्ता त्याच्याच हातात होती. मिर्झा मुहमद शफी व मुहमद बेग हमदानी या दोघांनाही तो पाण्यात पहात असे. कारण अफ्रासियाब मुखत्यार होण्यास या दोघांचाच अडथळा होता; म्हणून शफीच्या खुनाच्या कटाची आखणी यानेच केली होती. (१७८३) शेवटी अफ्रासियाबचा एकमेव उर्वरित प्रतिस्पर्धी मुहमद बेग हमदानी यालाही कटवावा म्हणून हिंमतबहादूरने विचारपूर्वक जाळे टाकले व अफ्रासियाबच्या मदतीस म्हणून रूपवास येथे यायला शिंद्याला गळ घातली.

अफ्रासियाबचा अनपेक्षितरीत्या खून झाल्याने गोसाव्याला आपल्या स्वहिताच्या धंद्याला थोडी वेगळी दिशा द्यावी लागली. आपल्या धन्याचा अज्ञात बच्चा मीरबक्षी व्हावा यासाठी त्यांनी आकाशपाताळ एक करायचेच बाकी ठेवले. मनीचा हेतू हा, की या बच्चाचा पालक बनून सर्व सत्तासूत्रे प्रत्यक्षात आपल्या हाती घेता येतील व थोडाफार मलिदा तोंडावर टाकून महादजीला दख्खनच्या वाटेला लावता येईल. दिल्लीतील सगळ्याच अधिकाऱ्यांविरुद्ध महादजीला एक विलक्षण तिटकारा होता, गोसाव्याबद्दल तर त्याचे मत अगदीच वाईट होते. म्हणून शिंद्याने एक फार उत्तम राजकीय पवित्रा टाकला. दिल्लीदरबारातील व्यक्तिविशेष, त्यांचे स्वभाव, दरबारचा कारभार, याबाबत शिंद्याला स्वतःला काहीच माहिती नसल्याने कुणी जुना, जाणता, विश्वास दाखवून जवळ करणे भाग होते. त्यांनी या हिंमतबहादुराला विश्वासात घेतले. शिंदे मुखत्यार झाले तरी, दक्षिणेकडील या उपऱ्याचे बादशहाशी रहाणारे संबंध लक्षात घेता प्रत्यक्ष राज्यव्यवहारात आपलाच वरचष्मा रहाणार अशी सुखस्वप्ने तो पहात होता.

महादजी व बादशहा यांची पहिली बैठक झाली ती १७ नोव्हेंबर, १७८४ रोजी. यावेळी या गोसाव्याला बादशहाची भेट प्रथम घ्यायची होती. तशी भेट घ्यायला त्याला निश्चितपणे परवानगी न देण्यात आल्यावर त्याचे डोळे उघडले; हे काही वेगळे आहे, असा त्याला अंदाज येऊ लागला. शिंद्यामार्फत बादशहाचे मन वळवून आपल्या इच्छेनुसार सर्व घडवून आणायचे अशी या गोसावीबुवांची कल्पना असली तरी त्याची खरी लायकी बादशहाही समजून होता. 'हिंमतबहादूर व नारायणदास या दोन बदमाषांना तुम्ही हाकलून द्या' असा बादशहाने महादजीला खाजगीत सल्ला दिला होता. 'आग्र्याचा किल्लेदार आपल्या शब्दाबाहेर नसल्याने आपण त्याला गुपचूप माघार घ्यायला लावू अशा हिंमतबहादुरने बढाया मारल्या होत्या. त्यात त्याला अपयश आल्यावर शिंद्याशी त्याचे जे थोडेफार वजन होते तेही संपले. दिल्लीच्या राजकीय वर्तुळातील त्याच्या प्रतिष्ठेला धक्का बसला. नवा मुखत्यार महादजी आपल्याला टाळतो, किंमत देत नाही हे गोसावी समजून चुकला. मुलुखामागून मुलुख महादजीच्या सत्तेखाली येऊ लागले आणि महादजीचा दबदबा वाढू लागला व तोही आपल्या मदतीशिवाय; तेव्हा त्याला वाटले की नजफखानाच्या पक्षातील उर्वरित माणसाची मदत न घेताच शिंदे स्वतंत्रपणे वागू लागले. त्याच्या बोलण्यात चीड, अवहेलना व विखार दिसू लागला. सत्ता परत आपल्या हाती यावी यासाठी त्याने शिंद्याविरुद्ध विश्वासघात व कारस्थाने ही शस्त्रे उपसली. त्याचा उल्लेख तो तुच्छतापूर्वक करू लागला. शिंद्याला त्रास देण्यासाठी त्याने अलिगढच्या किल्लेदाराला पत्र लिहून त्याला शिंद्याविरुद्ध जास्त प्रखरतेने लढायला सांगितले. सर्वतोमुखी झालेली अफ्रासियाबची तथाकथित प्रचंड धनदौलत ही नारायणदास व हिंमतबहादूर यांच्यापाशी आहे व दोघांकडून त्यातला छदामही मिळत नाही असे सांगितले त्याच क्षणी त्या दोघांचा विनाश अटळ ठरला. जहांगीरखानाची बेहिशेबी मालमत्ता तपासीत असताना हिंमतबहादुरने त्याला महादजी विरुद्ध लिहिलेली पत्रे

सापडली; व हिंमतबद्दल महादजीला जो संशय होता तो पक्का झाला. [इब्रत : भाग २, १५३; **डीवाय :** भाग १, लेखांक, १४७; **एचपी :** क्रमांक ३६५, ४०८]

एका ब्राह्मणावर घाव घालायला शिंदे सुरवातीस कचरत होता. हिंमतबहादुरकडे तो व त्याचा बंधू मिळून वार्षिक वीस लाखांची जहागीर होती. या जहागिरीरीवरील अधिकार त्याने सोडून द्यावेत व छावणीतून निमूटपणे निघून जावे असे शिंद्याने त्याला समजुतीने सांगितले, व तसा हुकूमही केला. या हुकुमानंतर एक महिन्याने गोसाव्याने शिंद्यापुढे रड गायला सुरवात केली " मजला कोठे जावयास ठिकाण नाही म्हणून एक मास पडून राहिला. तेव्हा प्रगणे मोट तालुके झांशी पैकी व वृंदावन ह्या दोन्ही जागा त्याचकडे करार करून पाच लाख रुपये फौजेचे खर्चास सालिना द्यावा, फौजेने स्वारी समागमे चाकरी करावी, खाशाने वृंदावनी असावे याप्रमाणे करारमदार होऊन गोसावी मजकुरास वृंदावनास डिगचे मुक्कामीहून बिदा करून, त्याची फौज चाकरीस समागमे घेऊन, इकडे कूच केला. [**एचपीः** क्रमांक ३५१, ४३२; **डीवायः** भाग १, लेखांक १४९]

११. गोसावीद्वयाची अंतर्वेदीत शिंद्याविरुद्ध उचल

नारायणदासाला कैदेत टाकल्यावर (१६ जानेवारी, १७८६) हिंमतबहादुरने वनवास घेऊन दरबारचे येणे सोडले. न जाणो, उगाच नारायणासारखी अवस्था व्हावयाची ही भीती त्याला होती. दोन महिन्यांची तरतूद म्हणून महादजीने त्याला वीस हजार रुपये दिले व दिगची छावणी सोडून वृंदावनास आपल्या जहागिरीच्या गावी जायचा हुकूम केला. जाताना सर्व सैन्य, घोडे वगैरे बरोबर न नेता शिंद्याकडेच ठेवायचे होते. शिपायांची हजेरी पाहून त्याप्रमाणे शिंदे ज्याचे त्याचे पैसे देणार होते. आपल्यावर हल्ला झाला तर प्रतिकार कसा करणार म्हणून हिंमतबहादूर सैन्य ठेवून जायला राजी नव्हता. पुढे महादजी दिगहून जयपूरकडे जायला निघाला (१६ फेब्रुवारी) तेव्हा हिंमतबहादुरने आपले सैन्य घेऊन वृंदावनला जायला हरकत नाही म्हणून महादजीने त्याला तिथून घालवलाच. ' मी वृंदावनला गेल्यावर माझ्या जहागिरी आपल्या माणसाच्या हवाली बिनतक्रार करीन ' असे आश्वासनही त्याने शिंद्याला दिले. [इब्रत : भाग २, १५४ ; **एचपीः** क्रमांकः ४३२]

हिंमतबहादुर गोसाव्याच्या जहागिरी अंतर्वेदीत होत्या. त्या शिंद्याच्या माणसाला द्याव्यात, अशा अर्थाचे मुखत्यारपत्र हिंमतबहादुरकडून घेऊन त्या जहागिरीचा ताबा घेण्यासाठी अबा चिटणीसांच्या केसोपंत या अधिकाऱ्याला तिकडे पाठवले होते. सुरवातीला अनेक खेड्यांचा ताबा त्याला सहजी मिळाला पण जहागिरीतील किल्ले वा मोठाली गावे मिळाली नाहीत. हिंमतबहादुरच्या घराण्याकडे असलेल्या जहागिरींची देखभाल त्याचा थोरला भाऊ उमरावगीर करीत असे. त्याने स्थानिक जमीनदारांशी [विशेषतः हायरस व मुंडसान येथील जाट जमीनदार] हातमिळवणी करून मराठ्यांनी नुकत्याच ताब्यात घेतलेल्या ठाण्यांवर हल्ले करावयास सुरवात केली. शिंद्यांनी नेमलेल्या महसूल अधिकाऱ्यांना कैद करण्यात आले किंवा हाकलून देण्यात आले. खुद्द केसोपंताला ठार करण्यात येऊन

त्याच्या युद्धसाहित्याची लूटमार करण्यात आली. [**इब्रतः** भाग २; **एएसबी:** ४७४; **एचपी:** क्रमांक: ४१५]

अंतर्वेदीत उडालेली मराठ्यांची ही हबेलंडी पाहून ही संधी साधण्याचे हिंमतबहादुरने ठरवले व वृंदावन मागे टाकून तो आपल्या कर्तृत्ववान भावाला मिळाला. (अंदाजे ८ मार्च) त्यांनी फिरोझाबाद या ठाण्याला वेढा घातला व आपल्याला पुन्हा नोकरीत घ्यावे अशी अयोध्येच्या नबाबाकडे अर्जी केली. माकणपूर येथून, उमरावगीर गेला तो अयोध्येतील इटवा येथील सुभेदार खाजा अलमस अलिखान याच्याकडे. त्याचवेळी कानपूरहून एक इंग्लिश पलटण निघाली. जर महादजीने गोसावी बंधूंविरुद्ध शस्त्र उपसले तर त्याच्याविरुद्ध गोसावी बंधूंना मदत करायला म्हणून ही पलटण निघाली होती अशी वदंता होती.

जयपूरच्या उद्दाम राजाशी दोन हात करण्यात महादजी गुंतला होता. ती जागा पश्चिमेस खूप दूर होती. अशा वेळी गोसाव्यांची ही उठावणी व इंग्रज पलटणीची संभाव्य चाल, हा महादजीच्या पाठीत विश्वासघाताने खंजीर खुपसण्याचा बनाव होता. पाठीशी अयोध्येचा नबाब व इंग्रजांच्या सक्रिय आशीर्वादाचे बळ घेऊन जवळजवळ सर्व अंतर्वेदी मराठ्यांविरुद्ध दंड थोपटून उभी होती. अलिगढ किल्ल्यावर नव्यानेच रुजू झालेली मराठा शिबंदीही या वार्तेने हादरली. महादजीने यावर ताबडतोब प्रभावी उपाय योजले. त्याच्या सेना अंतर्वेदीत इकडे तिकडे विखुरल्या होत्या, त्या सर्व त्याने एकत्र आणल्या; अभाजी (यशवंत बाबळेचा मुलगा) ला त्यांच्यावर नेमले व अलिगढची संरक्षणयंत्रणा भक्कम केली. पण हे सैन्य अगदीच तोटके ठरले. उमरावगीरने अत्रौली, छारा, भामौरी व अन्य ठिकाणच्या महालातील मराठ्यांनी नेमलेल्या महसूल अधिकाऱ्यांना हुसकावून लावले व तो अभाजीवर चाल करून गेला, अभाजीच्या दोन पलटणी त्याने गारद केल्या व त्यांच्या तोफाही ताब्यात घेतल्या [**इब्रत** : भाग २, १५१ व **एएसबी** ४७४, **एचपीः** क्रमांक: ३७३]

ही वार्ता धक्का देणारी होती. अंबाजी इंगळे हा त्या वेळी राघोगडची मोहीम फत्ते करून परत येत होता. बहुतेक शिपाई मोकळेच होते. महादजीने अंबाजीला त्यांना एके-ठिकाणी जमवून अभाजीच्या मदतीला जायचा हुकूम केला. ३००० स्वार, शिपायांच्या दोन पलटणी, १२ तोफा एवढे साहित्य देवजी गवळी याच्या हाताखाली देऊन त्याला गोसाव्याविरुद्ध लढायला पाठवले. मात्र अयोध्येची सरहद्द ओलांडून जायचे नाही, हेही पथ्य पाळायला सांगितले, अन्यथा इंग्रजांशी अकारण तंटा व्हायची भीती होती. हे सैन्य येताच उमरावगीर पळाला व गंगेवरील कासगंज येथे गेला. त्यावेळी रोहिलखंड अयोध्येच्या नबाबाकडे असल्याने कासगंजहून रोहिलखंडात आश्रय घेण्याचा त्याचा उद्देश होता. देवजीने त्याचा पाठलाग करण्याचे सोडून दिले (एप्रिल अखेर) व थोडे बाजूला जाऊन बुलंदशहरातील खुर्जानजीक असलेल्या किल्याला वेढा घालण्यासाठी तिकडे वळला. हा किल्ला याकूबखान बळकावून बसला होता.

अयोध्येच्या नबाबाला लॉर्ड कॉर्नवॉलिसने सक्त ताकीद दिली होती की त्याने महादजीविरुद्ध कसलीही आगळिक न करता तटस्थ रहावे, त्यामुळे गोसावीद्वय अयोध्येत आसरा घेऊन गप होते. एवढे म्हणून आपल्याला या प्रकरणाचा तात्पुरता शेवट करता येईल, पण लालसोटच्या लढाईत, ऑगस्ट १७८७ मध्ये महादजीने माघार घेतली. त्यामुळे शिंद्याच्या ताब्यातील प्रदेशावर हल्ले चढवून त्याच्या कटकटी वाढवाव्यात, त्याला आणखी त्रास द्यावा अशी खुमखुमी येऊन गोसावीद्वयाने नव्या उपद्व्यापास सुरवात केली. [**पीआरसी** खंड १, क्रमांक २९, ३९ (लालसोटनंतर) १४०, १४३–१७६, २१८–२३४; **डीवाय** : भाग १; लेखांक १७०, १८४ इत्यादी; **एएसबी** खंड २; ४७४–४७६]

१२. बुंदेलखंड साहस : १७८५–८६

छत्रसाल हा चंपतराय बुंदेला याचा मुलगा. सारी हयात खडतर युद्ध खेळण्यात घालवून पूर्व बुंदेलखंडात त्याने आपल्या राज्याचा लक्षणीय विस्तार केला होता. १७२९ मध्ये मराठ्यांच्या साहाय्याने दिल्ली सत्तेच्या सरसुभेदाराला हाकलून देण्यात त्याने मिळविलेले यश हा त्याचा शिरपेच ठरावा असा विजय होता. या उपकाराचे उतराई होण्यासाठी त्याने आपल्या राज्याचा तीस लाख रुपये महसुलाचा तिसरा हिस्सा पेशव्यांना बहाल केला होता. अनेक युद्धे खेळल्याने थकलेला हा वृद्ध राजा १४ डिसेंबर, १७३१ ला मरण पावला. त्याच्या उर्वरित दोनतृतीयांश राज्याला त्याचे दोन पुत्र वारस होते. पन्नाचा हरदेश हा (महसुली उत्पन्न ३८ लाख) व बांद्याचा जगत्‌राज (महसुलीउत्पन्न ३० लाख). धाकटा जगत्‌राज याला चरितार्थासाठी मिळणारे उत्पन्न त्याच्या कुटुंबाच्या विस्ताराच्या मानाने अपुरे होते. [एका वृत्तानुसार २७ व दुसऱ्या वृत्ताप्रमाणे त्याला ५२ मुलगे होते.] त्यानंतर पेशवा बाजीराव याने पश्चिम बुंदेलखंडातील आणखी मुलूख घेतला. त्याचा वार्षिक महसूल साडेसोळा लाख होता. [यात झाशी जिल्ह्याचा बराचसा भाग, उच्छा व दतिया संस्थानचा काही भाग येतो.] या सर्व मुलुखावर एका मराठा सुभेदाराची नेमणूक केलेली होती. १७७० ते १७९४ या काळात रघुनाथ हरी हाच बऱ्हंशी या महत्त्वाच्या जागेवर होता. सांप्रत आपल्याला या दोन्हीही मुलुखांशी कर्तव्य नाही. महादजी दिल्लीत मुखत्यारपदाव आला त्याच वेळी पन्ना संस्थानात गादीसाठी तंटे सुरू झाले. हरदेशाचा नातू हिंदूपत ह मरण पावला. (१७७८) त्यानंतर त्याचा अल्पवयी मुलगा अनिरुद्ध हा गादीवर आला बेनी चौबे व खेमराज चौबे हे दोन दिवाण फार सामर्थ्यसंपन्न होते. त्यांनी या मुलाला गादी वर बसवले. बेनी हा हुजूरी व दिवाण तर खेमराज हा खजिनदार व कलिंजर किल्ल्याच प्रमुख होता. हा अल्पवयी राजा १७८० त वारला ; त्यानंतर या मंत्रिद्वयांनी हिंदूपतच सर्वांत लहान मुलगा धोकलसिंग याला गादीवर बसवले. त्याचा थोरला भाऊ सरनतसि याचा रास्त हक्क त्यांनी डावलला. भाऊभाऊ असलेले हे दोन चौबे म्हणजे आपल्या मर्जी नुरूप कुणालाही गादीवर बसवणारे ' किंग मेकर्स ' होते. सत्ता व संपत्ती यात अधिक वा कुणाचा यावरून दोघांत लवकरच तंटा सुरू झाला. खेमराजने सरनतसिंगाची बाजू घेऊ

त्याला सुरक्षिततेच्या दृष्टीने कलिंजर किल्ल्यात ठेवले. बेनीने चारखडीच्या विजयबहादुराला आपल्या मदतीला बोलावून दोघांच्या सैन्यासह कलिंजर किल्ल्याला वेढा घातला. सरनत व त्याचे पाठीराखे, यांनी बांद्याचा मुखत्यार नोनी अर्जुनसिंग व महादजी शिंदे याजकडे मदतीची याचना केली. पैसा मिळवायची अशी संधी महादजीला हवीच होती. सेनाधिकारी खंडेराव हरी [हा अप्पा खंडेराव याच नावाने माहीत होता.] याला त्याने कलिंजरवर पाठवले.

बांदा राज्यातही अशीच चमत्कारिक परिस्थिती होती. तिथे गादीवर कुणी यावे व मंत्री कुणी व्हावे याबद्दलचे वाद सुरू होते. जगतराज हा १७५८ मध्ये मरण पावला. त्याच्या नंतर त्याच्या गादीला बरेच वारस असल्याने त्याच्या नातवंडांत त्याच्या राज्याच्या खूप वाटण्या झाल्या. त्याच्या असंख्य नातवंडांपैकी गुमानकडे बांद्याचे व खुमानकडे चारखडीचे स्वामित्व होते. छत्रसालच्या सर्व पुत्रपौत्रात मुलूख लाटण्याची अनिवार हाव असल्याने यांच्यात आपापसात सतत तंटे सुरू असत; तसेच गुमान व खुमान यांच्यात चालू होते. गुमानला अपत्य नव्हते; त्यामुळे त्याने मधुकरशा या छोट्या बालकाला दत्तक घेतले होते. गुमानच्या मृत्यूनंतर त्याचा दिवाण नोने अर्जुनसिंग पवार, शार्दूलसिंग व हकीम बु अली या तिघांनी मधुकरशाला गादीवर बसवले. हे दत्तविधान खोटे आहे असे खुमानसिंग उघडपणे सांगू लागला. आपल्या भावाच्या मृत्यूनंतर आपला औरसपुत्र, हाच गादीचा कायदेशीर वारस असल्याने गादी आपल्याकडेच आली पाहिजे अशी त्याने मागणी केली. दत्तकाला गादीवर आणू इच्छिणाऱ्या दिवाणांनी महादजीला एक लाख वीस हजार रुपये दिले[५] व आपण उभ्या केलेल्या दत्तकाला त्याच्या काकाच्या संकटातून वाचविण्यास साहाय्य करावे म्हणून त्याला गळ घातली. एकाच राजघराण्यातील जवळच्या नात्यातील दोन चुलत भावंडांमधील या भांडणाने बुंदेला राजघराण्यातील सर्व लहानमोठे राजपुत्र या जंजाळात सापडले. आपल्यातील दुसऱ्याचा मुलूख बळकावून आपल्याकडे कसा घेता येईल हाच या राजघराण्यातील या सर्वांचा एकमेव आवडता उद्योग होता.

अप्पा खंडेराव हा महादजीचा ग्वाल्हेर व पंचमहालचा सर सुभेदार. बुंदेलखंडातील बांदा हा भाग अप्पाच्या अधिकाराखालील मुलुखाला लागून असल्याने महादजीने ही कामगिरी त्याच्यावरच सोपवली होती. हे काम किती कठिण आहे याची जाणीव अप्पाला असल्याने त्याने आपल्या सैन्यात आणखी वाढ केली. द बॉन्य, टेलर, लेस्तेनो आणि रामरू यांच्या हाताखाली लष्करी शिक्षण घेतलेल्या शिपायांच्या पाच पलटणी उभ्या केल्या. [इब्रत भाग २, १२२-१२३] पण खुमानसिंगने पंडोरीनजिक अर्जुनवर हल्ला करून या मराठा सैन्याला चकित केले. बांदा सैन्यातील तोफखान्यातून मारलेल्या दुसऱ्याच गोळ्याला अर्जुन बळी पडला. रात्र पडेपर्यंत भीषण युद्ध खेळल्यानंतर दोन्ही सेना पांगल्या. दुसऱ्या दिवशी अप्पा त्या ठिकाणी आला. खुमानचा मुलगा विजयबहादुर याने चारखडी या आपल्या राजधानीपर्यंत माघार घेतली व पन्नाच्या मुखत्याराकडे मदत मागितली.

बट्वानदी ओलांडून अप्पा बांद्यात आला मात्र, बहुतेक बुंदेला सरदारांनी त्याला भेटून त्याच्याशी समझोता केला. अपवाद फक्त बेनी हुजरी हाच. कलिंजरचा वेढा उठवून पन्नाचा हा मुखत्यार आपल्या राजधानीला परत आला व राजधानीच्या संरक्षणव्यवस्थेला लागला. मराठे ज्या बाजूने येण्याची शक्यता, त्या बाजूची त्याने नाकेबंदी केली. या वेळेपर्यंत ऑगस्ट सुरू झाला, पाऊस नेहमीपेक्षा खूप पडला. सगळीकडे पूर येऊन पाणीचपाणी झाले; लढाईला निसर्गाने पायबंद घातला. दरम्यानच्या काळात खंडणीच्या मोबदल्यात तडजोड करण्याचे बेनी हुजूरीचे प्रयत्न चालूच होते. अर्थात हा सारा वरवरचा देखावा होता. तो मनापासून बोलणी करीतच नव्हता, फक्त कालहरणाचा डाव खेळत होता. पावसाळा संपल्यावर अप्पाने पन्नाला वेढा घातला. बेनी एकदम चाल करून आला पण अप्पाने त्याचा पूर्ण फजिता उडविला व किल्ल्याच्या तटबंदी जवळ येऊन पाच दिवस गोळ्यांचा पाऊस पाडला. ८ डिसेंबर, १७८५ ला किल्ल्यावर चालून जायचे ठरविले होते पण त्याच्याच आदल्या रात्री बेनीने किल्ला खाली केला होता. धोकलसिंग व त्याचे साथीदार यासह रात्रीच्या अंधाराचा फायदा घेऊन तो पळून गेला होता. [**एचपी** : पत्र, ४२२]

मराठ्यांचा हा फार मोठा विजय, पण फलिताच्या दृष्टीने तो वांझोटाच ठरला. महादजी या यशाची बढाई मारीत होता, पण त्याचे यश इथेच विसावले; नंतर ही मोहीम जसजशी लांबली तसतशी मराठ्यांची अवस्था बिकट होऊ लागली. अप्पाजवळचा पैसा संपला, पगार थकल्याने त्याचे शिपाई दंगली करू लागले. मराठा हा आपणा सर्वांचाच शत्रू या भावनेने बुंदेलखंडातील सर्व सत्ताधारी एकत्र आल्याने त्यांचे पारडे जड झाले. स्वतःच्या बचावासाठी अप्पाला फार यातायात करावी लागली. या संबंधात शिंद्याच्या छावणीत असलेला एक ब्रिटिश अधिकारी लिहितो, " काय करावे अशा विलक्षण संभ्रमावस्थेत अप्पा होता. अमूकच कर असे शिंद्याने त्याला ठामपणे कळवले ते फार उशिरा. आपल्याला योग्य वाटेल त्या अटीवर त्याने समझोता करावा व ग्वाल्हेरास सैन्यासह माघारी यावे; कारण अप्पाच्या मदतीला आणखी कुमक पाठविणे शिंद्याला शक्य नव्हते. [**पीआरसी** : खंड १, क्रमांक ५३]

शत्रुसैन्याचा जोर चौफेर वाढल्याने अप्पा खंडेराव शेवटी वैतागून गेला. यातून बाहेर कसे यायचे, हे त्याला कळेना. पश्चिमेकडील ग्वाल्हेरकडे जाणारा मार्ग शत्रूंनी रोखून धरला होता; म्हणून यमुना ओलांडून उत्तरेकडून अयोध्येस जाण्याचा त्याचा विचार होता. आपल्या सैन्यातला बराचसा फौजफाटा, इतकी गरज नाही, अशा थोड्याफार फाजील आत्मविश्वासाने त्याने झाशीकडे पाठवून दिला होता व २,००० स्वारांसह तो पन्ना येथे मुक्काम टाकून होता. बुंदेला राजपुत्रांशी वाटाघाटीची अंतिम फेरी केव्हा होते याकडे त्याचे डोळे लागले होते. या परिस्थितीचा मेजका फायदा बुंदेला राजांनी घेतला. त्यांनी आपली वीसहजारांची फौज ताबडतोब एकत्रित केली व आपल्या मदतीसाठी त्यांनी मराठ्यांना जो मुलूख दिला होता तो ताबडतोब परत मागितला (ॲण्डरसन, १८ नोव्हेंबर, १७८६) शेवटी तिथून निघून जाणेही अप्पाला अशक्य झाले. बुंदेलखंडातील आपल्या साहाय्यकर्त्यांच्या

मदतीने तिथून निसटून तो कसाबसा ग्वाल्हेरला आला. शत्रूंनी त्याच्या सैन्यातील बऱ्याच अधिकाऱ्यांना कैद केले. त्यात अप्पाचा भाऊही होता. [**पीआरसी** : खंड १ क्रमांक ६१, ६२] अशाप्रकारे एकोणीस महिने चाललेल्या या प्रदीर्घ मोहिमेवरील अवाढव्य खर्च फुकट गेला; त्या मोबदल्यात काहीही हाती लागले नाही.[५] [**एचपी** : क्रमांक ४८९]

टीपा : प्रकरण ३३

पृष्ठ	टिपेचा क्रमांक	
१९५	१	**आग्रा किल्ल्याचा ताबा** : **डीसी. एचपी.** क्रमांक : ३५४, ३५९, ३६५; **डीवाय.** भाग १, लेखांक १२८, १३०, **इब्रत** : भाग २, १०५; ब्राउनचे पत्र; **पीआरसी** : खंड १, क्रमांक : १०–१२.
१९७	२	**अलिगढचा वेढा** : **पीआरसी** : खंड १, क्रमांक १२–१९; **एचपी** : क्रमांक ३६३, ३७३, ३८१, ४०७, ४११, ४४६; **इब्रत** : भाग २, १०५–१०६, १४८; **डीवाय** : भाग १, लेखांक १४०, १४१, ११२; **डीसी.** गुलामअली, खंड ३, २१५.
१९९	३	ॲण्डरसनच्या दि. १९ च्या पत्रावरून असे वाटते की, शहाअलम या संबंधात वरवर वेड पांघरल्यासारखे करीत असावा; पण नजफखानच्या अखत्यारीतील तत्कालीन कागदपत्रावरून (ब्रिटिश म्यूझिअम ओरिजिनल, २५,०२१, पृ. २०४ बी) ती सत्यस्थिती असावी असे दिसते. **एचपी.** क्रमांक ४४६.
२०३	४	**राघोगड मोहिमा** : **एमडी** : भाग २, लेखांक : ९४, ९८, १०१, १०५, ११४, १३९, १२४; **डीवाय** : भाग १, लेखांक : १३४, १५१, १८२; **एचपी** : क्रमांक ४१२, ४०७; **ऐति. टिपणे** भाग ६, क्रमांक ४१, सातारा, भाग १, १०१; 'सिलेक्शन्स फ्रॉम एशिॲटिक जर्नल', पृ. ५९९, ६००.
२०९	५	**इब्रत** : भाग २, १२१; "नोनी अर्जुन व इतरांनी मुहमद टाकी याला शिंद्याकडे त्याची मदत मागायला पाठवून दिले. मधुकर सहाचा पक्ष उचलून धरायचा या अटीवर टाकीने त्यांना १ लाख २० हजारांची हुंडी दिली. महादजीच्या छावणीतील पुण्याचा वकील ऑगस्ट, १७८५ मध्ये लिहितो, "खंडेराव हरी यांची रवानगी बुंदेलखंडात कोणे

कारणास्तव जाली म्हणोन आज्ञा सादर जाली. त्यास मुख्यत्वे बाळाजी, खुमानसिंगाने वाढविला. इकडे पाटीलबावांकडे वकील पाठवून बावांचे मर्जीचे संपादन केले. चार रु. ॥ कबूल केले की, त्याचा हिस्सा खुमानसिंगास देणे पडते. बांधेकरांनी आपल्या हिशाचा ऐवज दिल्हा. खुमानसिंग देईना. म्हणून खंडेराव हरीची रवानगी तिकडे जाली (**एचपी.** क्रमांक ४११)

त्यानंतरच्या जुलै महिन्यात तोच वकील लिहितो,

"गुमानसिंगाचे कारभारी मजबूत व कर्ते आहेत. त्यांनी बावांकडे अनुसंधाने लावून, पन्नास हजार रुपये टिक्याची नजर व पाच लक्ष रुपये जैतगडवाल्याचा मुलूख खुमान गुमान दोघांनी दाबला त्याची नजर सावकारी निशा दिली, आणि मधुकरास टिका नेला. पाच लक्ष रुपये जैतगडवाला गजसिंग याचे मुलुखाबद्दल नजर कबूल केली. शिवाय दरबारखर्च. याचा हिस्सा खुमानसिंग देईना म्हणून बावांनी कारकून व शंभर स्वार वसुलीकरितां पाठविले. त्यांसही एक वर्ष खुमानसिंगाने बहकाविले. रुपया देईना" (**एचपी** : क्रमांक ४७८)

२११ ६ **बुंदेलखंड.** शिंद्याच्या छावणीतून जाणाऱ्या पत्रातील माहिती, **एचपी.** क्रमांक ३७३, ४०७, ४११, ४२२, ४७८, ४८९; **पीआरसी :** खंड १, क्रमांक : २१, ५३, ६१-६२; **इब्रत :** भाग २, १२१-१२५ यातील माहितीवरून हा वृत्तांत तयार केला आहे; पण **एन. डब्ल्यू. पी.** गॅझेट भाग १, २८, १२९, ५६७ यातील माहिती बरीचशी सुधारून त्याचाही सावधानतेने उपयोग केला आहे. त्यातील बराचसा भाग पोगसनच्या 'बुंदेलखंड' मधून शब्दशः घेतला असून त्यातही नंतरच्या काही चुकीच्या परंपरांचा समावेश आहे.

प्रकरण ३४ वे

जयपूर राज्य व दिल्लीशासन : १७७८–१७८७

१. राजा पृथ्वीसिंगाच्या कारकीर्दीतील जयपूर : १७६८–१७७८

जयपूरचा राजा सवाई माधोसिंग याची कारकीर्द डिसेंबर, १७५० मध्ये सुरू झाली. त्याच्या आधीच्या राजाचा शेवट फार दुःखदरीतीने झाला होता. मराठ्यांनी त्याची इतकी अवहेलना केली होती की जयपूरमधील प्रत्येकाला त्याची हळहळ लागून राहिली होती. सवाई माधोसिंगाने अठरा वर्षे राज्य केले. त्याची कारकीर्द ६ मार्च, १७६८ ला संपुष्टात आली. सर्वांचा थरकाप उडविणारा जाट राजा जवाहरसिंग याचा सवाई माधोसिंगाने जो अभूतपूर्व पराभव केला त्यामुळे त्याचे नाव विशेष गाजले. सवाई माधोसिंगानंतर त्याचा मोठा मुलगा पृथ्वीसिंग, गादीवर आला. हा केवळ पाच वर्षांचा अज्ञ बालक असल्याने राज्याचा सर्व कारभार माधोसिंगांची विधवा राणी पाहात असे. ही राणी मेवाड मधील देवगडचा सरदार जसवंतसिंग चंदावत याची कन्या.

माधोसिंगाने आपल्या कारकीर्दीत, हलक्या कुळात जन्म घेतलेल्या पण आपल्या मर्जीतल्या, अशा तिघांना आपल्या राज्यात फार महत्त्वाच्या जागेवर नेमलेले होते. खुशालीराम बोहरा हा ब्राह्मण सुरवातीस राजासाठी गंगेच्या कावडी भरून आणणारा पाणक्या होता. माधोसिंगाने त्याला आपला पंतप्रधान केले. मात्र आपली निष्ठा व कर्तृत्व या गुणांवर आपली निवड बरोबर असल्याचे खुशालीरामाने दाखवून दिले होते. राजसिंग कछवा हा एक मामुली शिपाई, स्वतःचा घोडा बाळगण्याचीही याची ऐपत नव्हती. तो सैन्यात घोडचारा किंवा बारगीर म्हणून होता. त्याला प्रमुख सेनानी करण्यात आले. फिरोझ या नावाचा एक मुसलमान माहूत होता. त्याची सर्वोच्च महसूल अधिकारी म्हणून नेमणूक करण्यात आली होती. माधोसिंग मरण पावताच त्याचा सासरा जसवंत हा तातडीने जयपुरात आला व नातवाच्यावतीने या तीन मंत्र्यांच्या सल्ल्याने राज्यकारभार पाहू लागला. अज्ञान राजा ही राजपुतांसारख्या अभिमानी व दुर्दम्य जमातीला एक अवघड समस्याच. बाईची सत्ता ही राजपुतांना न मानवणारी गोष्ट. या नव्या राज्यकारभारात कछवा सरदारांचा काही फायदा होत नव्हता किंवा त्यांना राजकारणात भागही घेता येत नव्हता. त्यामुळे ते स्वतःशीच चडफडत असत. या बाईची सत्ता उलथवून टाकून पोरवयाचा राजा व राज्यकारभार यावर आपली पकड बसवायची असा त्यांचा डाव होता. या सरदारांत दोन गट होते. एक नाथावटांचा म्हणजे चोमू व सामोद या दोन ठिकाणच्या सरदारांचा; पैकी चोमूचे सरदार हे प्रारंभीचे सरदार. दुसरा गट राजावतांचा; झळई व अन्य काही ठिकाणचे सरदार या गटात होते. राजावत हे रक्ताच्या नात्याने राजघराण्याला जवळचे म्हणून राज्यावर अधिकार

असण्याचा यांचा हक्क अधिक. हे दोन गट एकत्र येणे अवघडच होते. देवगडहून आलेल्या उपटसुंभाला व त्याच्या ब्राह्मण साथीदाराला हुसकावून लावण्यासाठीही एक होण्याबाबत यांचे एकमत होत नव्हते. त्यात आणखी भर पडली ती शेखवत (विशेषतः मनोहरपूरचा प्रमुख राजा जास्त ताठ) हे फार उद्धट व मुजोर. तसेच माचेडीचा राजा प्रतापसिंग नरूका हा स्वार्थी व विश्वासघातकी होता, त्याच्या महत्त्वाकांक्षेला मर्यादा नव्हत्या. या सगळ्या गोष्टींमुळे जयपुरात अशांततेचे व अविश्वासाचे वातावरण होते. पृथ्वीसिंगाच्या दहा वर्षांच्या अमदानीत (७ मार्च, १७६८ ते १६ एप्रिल, १७७८) कछवा राज्यावर मराठ्यांची स्वारी झाली नव्हती. तसेच मुसलमानांनीही या काळात त्रास दिला नाही. मराठे व मुसलमान यांना घरच्याच कटकटी खूप होत्या. इतके असूनही वरील दहा वर्षे म्हणजे कलह व खेदकारक अव्यवस्था हा प्रकार मागील अंकावरून पुढे चालू, असाच राहिला.

२. प्रतापसिंग नरूकाचा उदय : जयपूर येथील त्याचे कार्य

राव प्रतापसिंग हा कछवांच्या नरुखा शाखेचा. जयपूरच्या कृपाछत्राखालील हा छोटासा जमीनदार प्रारंभी जेमतेम अडीच खेड्यांचा मालक होता. त्यातील एका खेड्याच्या नावावरून तो माचेडीवाला या नावाने ओळखला जाऊ लागला. हा रावराणा दुसऱ्याची झोप उडविण्याइतका जबरदस्त महत्त्वाकांक्षी व पाताळयंत्री कावेबाज होता. संधी कशी मिळते यावर नजर ठेवून तो त्यातून आपला फायदा करून घेत असे. त्यामुळे त्याने आपली सत्ता खूपच वाढविली. तो मरण पावला (नोव्हेंबर १७९०) तेव्हा तो जयपूरचा मांडलिक नव्हता. स्वतंत्र अस्तित्व असलेला राजा म्हणून दिल्लीच्या बादशहाने त्याला मान्यता दिली होती. त्याने आपल्या राज्याचा विस्तार खूपच वाढविला होता. स्वातंत्र्योत्तर काळात संस्थाने खालसा होण्यापूर्वी त्याच्या संस्थानात ३१५८ चौ. मैलाचा प्रदेश होता. सर्वसाधारण राजपूत सरदारांत न आढळणारी बुद्धिमत्ता व तडफ प्रतापसिंगाजवळ होती. त्याच्या याच गुणांनी तो सर्वांच्या नजरेत आला. बहुतेक राजपूत सरदार अफीमबाज असल्याने त्याच कैफात असायचे, कधीकधी रणक्षेत्रावर लढताना यांना पशूसारखे बळ यायचे व त्या बेभान अवस्थेत ते शत्रूवर तुटून पडायचे. प्रतापसिंगाला मात्र त्याच्या गुणांमुळे शत्रू फार होते. प्रतापसिंग हा गादीला छुपा स्पर्धक असण्याची शक्यता आहे असे या शत्रूंनी माधोसिंगाच्या मनात भरवून दिले होते. एकदा मृगया करताना नरूकाच्या जिवावर बेतले असताना तो जयपूर सोडून जाटराजाच्या आश्रयाला गेला. पण पुन्हा माधोसिंगाकडे येऊन जाटांविरुद्ध त्याच्याबाजूने लढून त्याने त्याची मर्जी पुन्हा मिळवली. जवाहिरसिंग जाटाची ही स्वारी १७६७–१७६८ मध्ये झाली. त्यानंतर राजाचा मुखत्यार नेमण्याची वेळ आली तेव्हा त्यावेळी त्या जागेवर याचाच अधिकार होता. अशी सुसंधी मिळताच स्वतःच्या वडिलार्जित छोट्या मिळकतीत त्याने चांगलीच भर घातली. आपली जहागीर हा मध्यबिंदू धरून त्याने सभोवतालचा मुलूख भराभरा ताब्यात घेतला. शेखवती, मेवात व जाट प्रदेश यांच्या सीमा नक्की ठरलेल्या नव्हत्या; त्याचा फायदा घेऊन अशा भागात त्याने बरेच

किल्ले बांधले. नंतर जसे सोयीचे ठरेल व जमेल त्यानुसार तो कधी जाटराजा, तर कधी नजफखान यांपैकी एकाच्या पक्षाला असे. मात्र ज्या बाजूची सरशी असे त्याच बाजूला तो वळत असे. त्यामुळे त्याचा फायदा झाला तो असा : मुगलसैन्याचा सर्वोच्च अधिकारी नजफखान याने बादशहाची संमती मिळवून प्रतापसिंगाने अनधिकाराने बळकावलेल्या मुलुखावरील त्याचे स्वामित्व कायम केले ; शिवाय रावराजा हा किताब, व वरिष्ठ दर्जाची दरबारी मनसब बहाल केली. तसेच जयपूरचे मांडलिकत्व दूर करून त्याला स्वतंत्रराजाचा दर्जा देववला ; व तशी शाही मान्यताही मिळवून दिली. अन्य नरूका सरदारांनीही त्याला आपला प्रमुख मानला. दरम्यानच्या काळात त्याने जयपूरशी असलेले लागेबांधे अजिबात तोडून टाकलेले नव्हते. बोहराचा गट हाताशी धरून त्याने तेथील राज्यकारभारावर आपली हुकमत ठेवली होती. कोणत्याही अधिकारपदाची जबाबदारी न घेता तो, त्याला हवे असेल, ते सर्व पदरात पाडून घेत असे. त्याचे लाघवी बोलणे व दुसऱ्याला भुरळ पाडण्याची हातोटी यामुळे राजधानीतील प्रत्येकजण त्याच्यावर खूष असे. तो मात्र आपल्या राज्याच्या सीमा वाढविण्याच्या कामात गर्क होता.

पृथ्वीसिंगाच्या नाममात्र सत्तेखाली जयपूरमध्ये झालेल्या रक्तलांछित बंडाळ्या, नरुकाचा दर्जा व त्याचे धोरण, या जयपूरच्या सर्व मानहानीपर इतिहासाचा नुसता उल्लेख करून पुढे जायला हरकत नाही. मात्र शेवटी या नरूकाला जयपूर राज्यात हेवा करण्यासारखे महत्त्व मिळाले याची नोंद घेतली पाहिजे.

राज्यातील असहाय जनतेची भावना ही की, आसुरी मुगल सत्ता व सरदारांमधील तंटे यातून राजघराण्याला कुणी वाचवील तर तो हाच महापुरुष. विधवा राणीच्या बापाला त्याने केव्हाच दूर केले. तसेच तिच्या भावालाही बाजूला बसविले. फिरोझला कैदेत टाकले, नंतर त्याला सोडून देताना त्याच्याकडून सात लाख रुपये घेतले. अस्वस्थ व असहाय राणीची नाममात्र संमती घेऊन खुशालीराम बोहरालाही कैद केले. या कृत्यांनी राज्यातील प्रत्येकजण त्याचा शत्रू झाला. त्यामुळे आपला खून होईल या भीतीने हा नरूका एका रात्री जयपूरमधून कुणालाही पत्ता न लागू देता पळून गेला. (१७७७ ची दुसरी सहामाही)

पुढील वर्षी त्याच्या राज्याच्या पूर्वेकडील सीमाप्रदेशावर नजफखानने हल्ला केला. त्यामुळे नरूकाला तिकडे लक्ष द्यावे लागले. नरुकाने मेवतमधील जी ठाणी बळकावली होती, ती नजफखानला सोडवून घ्यायची होती. १७७८ सालात नरूकाने कितीतरी वेळा नजफखानशी सलोखा केला तर कितीतरी वेळा दोन हात केले. याचे समग्र वर्णन प्रकरण ३०, पोटप्रकरण १–२ यात दिलेले आहे. १७७९ त जयपूरच्या सैन्याच्या साहाय्याने मीरबक्षी नजफखानने त्याला असे काही कोंडीत पकडले की नजफकडे जाऊन शरणागती देणे व खंडणी कबूल करणे, त्याला भागच पडले. १७७९ च्या नोव्हेंबरात नजफखान, दिल्लीस गेला. मुहमदबेग हमदानी हा नजफखानचा स्थानिक अधिकारी. नरुखाने त्याच्याशी संधान बांधले व शाहीदरबारात आपल्यावतीने रदबदली करण्याचे काम त्याला सांगितले.

जयपूरचा राजा पृथ्वीसिंग, १६ एप्रिल १७७८ ला मरण पावला. त्याच्या जागी त्याचा भाऊ सवाई प्रतापसिंग आला. हा केवळ तेरा वर्षांचा असल्याने राज्यकारभारात आणखीच गोंधळ माजला. १७७८ च्या अखेरीस बादशहा स्वतः जयपूरमध्ये आला तेव्हा कछवा राजाने फिरोजबरोबर बादशहासाठी म्हणून किमती नझराणे व थोडीफार खंडणी, नजफखानाच्या छावणीत पाठवून दिली; व सलोखा करण्याचा प्रयत्न केला. विश्वासघातकी नरूका, त्या वेळी मीरबक्षी नजफच्या पक्षात होता. जयपूरराजाचे काम आपण जातीने लक्ष घालून बादशहाकडून करवून घेऊ असे त्याने स्वतः होऊन फिरोजला आश्वासन दिले व नजफखानशी त्याचा परिचय करून दिला. नंतर गोडगोड बोलून फिरोझला घेऊन तो आग्र्यास गेला व तिथे त्याने त्याला कपटाने ठार मारविले[१] व त्याच्याजवळचा सर्व पैसा आणि अन्य चीजवस्त स्वतःकडे घेतली.

३. अज्ञान सवाई प्रतापसिंग, बोहरा व हलदिया यांचे हेवेदावे

सवाई प्रतापसिंगाच्या कारकीर्दीतील कछवा राज्याचा इतिहास ही एक दुर्दैवी कहाणी आहे. खरे म्हणजे त्याच्या आधी पृथ्वीसिंगाच्या दहा वर्षांच्या अमदानीतच या राज्याला उतरती कळा लागली होती. एक अग्रगण्य राजस्थानी इतिहासकार लिहितो, "हा राजा बालबुद्धीचा असल्याने अंतःपुरातील स्त्रियांचाच राजकारणात वरचष्मा असे. त्यामुळे राज्य-शासनात गोंधळ माजून राहिला होता." [वीरविनोद, पृष्ठ, १३०६] प्रतापसिंग आल्यावर तर या घोटाळ्यात आणखीच भर पडली. प्रतापचे वडील माधोसिंग याने मृत्युसमयी आपल्या राणीला सांगून ठेवले होते की, खुशालीराम बोहरा हा राजकारण-कुशल व स्वामीनिष्ठ असल्याने त्याला काढू नये. खुशालीराम बोहरा हा नालायक लोकांपुढे लाळघोटेपणा करणारा नसल्याने त्याला सहजपणेच अनेक शत्रू होते. अशा लोकांच्या कारवायांमुळे तो संकटात आला. त्याला कैद करून अंबर किल्ल्यात ठेवण्यात आले. पुढे अशी वेळ आली की, विश्वासघात करून नरूका केव्हा हल्ला करील हे सांगता येण्यासारखे नव्हते; दिल्लीतील शाही सैन्याचे हल्ले होणेही शक्य होते. अशावेळी या संकटातून जयपूरला वाचवील तर खुशालीरामच, या खात्रीने त्याची सुटका करण्यात येऊन त्याला पुन्हा पंतप्रधान करण्यात आले. अशाप्रकारे एप्रिल १७७८ मध्ये प्रतापसिंग गादीवर आल्यावर खुशालीराम पुन्हा पंतप्रधान झाला व नजफखानच्या छावणीत व दिल्ली दरबारात जाऊन त्याने आपला राजा आणि नरूखाप्रमुख राव प्रतापसिंग यांच्या-वतीने वकिली केली. नंतर लौकरच विश्वासघातकी नरूकाविरुद्ध त्याचा बंदोबस्त करण्या-साठी त्याला शाही सैन्याची मदत घ्यावी लागली. याबाबतची माहिती प्रकरण, ३० पोट-प्रकरण २ मध्ये आली आहे.

जयपूर राज्यकारभारावर या मोहिमेचे नंतर फार विलक्षण परिणाम झाले. दौलतराम, दुसरा खुशालीराम व नंदराम हे हलदिया घराण्यातले तीन बनिया आपले वडील लच्छूराम यांच्या समवेत, जयपूरदरबारातून निघून माचेडी येथे गेले. हे, मूळचे कछवा राज्यातल्या खंडेला गावाचे. माचेडीला गेल्यावर हे तिघेही तेथील शासनयंत्रणेचे प्रमुख होऊन तेथील

प्रमुख किल्ल्यांचे अधिकारी झाले. या तिघांनीही आपल्या नव्या राजाला असा गुप्त सल्ला दिला की, जयपूरराजाकडून घेतलेले कर्ज, त्याने परत करू नये. त्यामुळे खुशालीरामला दिल्लीच्या सैन्याची मदत घेऊन नरूकावर हल्ला करावा लागला. मात्र पराभवाचा क्षण येताच नरूकाने या तिघांनाही तुरुंगात डांबण्याची व त्यांची चीजवस्तू लुटण्याची धमकी दिली. त्यामुळे सर्व हलदिया कुटुंबीयांनी स्वसंरक्षणासाठी नजफखानच्या छावणीचा आश्रय घेतला. (सुमारे जानेवारी, १७७९) या ठिकाणी खुशालीरामने त्यांना संरक्षण दिले. राज्याच्या अनेकविध कामांसाठी त्याला वरचेवर परगावी जावे लागे, म्हणून आपल्या गैरहजेरीत आपला साहाय्यक म्हणून त्याने दौलतरामची जयपूर दरबारात नेमणूक केली व नजफखानच्या छावणीतील आपला प्रतिनिधी म्हणून खुशालीराम हलदियाला तिथे नेमले. [अंदाजे, मार्च, १७७९]

काही महिन्यांच्या अवधीतच दौलतरामने जयपूरच्या राजाची मर्जी संपादन केली व त्याला आपल्या उपकारकर्त्या खुशालीराम बोहऱ्याला कैदेत टाकणे भाग पाडले. (जुलै अखेर; **सीपीसी** : खंड ५, १५७३) पण वर्ष पुरे होण्याच्या आतच जयपूरच्या प्रारब्धाला आणखी एक धक्का मिळाला. हलदिया बंधू, हे जयपूर राजाच्या मर्जीतून इतके उतरले की, जीव वाचविण्यासाठी पळून जाऊन त्यांना नजफखानचा आधार घ्यावा लागला. एप्रिल १७८० ते फेब्रुवारी १७८१ या मुदतीत दौलतराम हा महबूब अलिखान समवेत जयपूर विरुद्ध चालू असलेल्या मोहिमेत होता; (प्रकरण ३१, पोटप्रकरण ४) तर त्याचा भाऊ दुसरा खुशालीराम हा दिल्लीदरबारात होता. आता कछवांच्या बाजूने खुशालीराम बोहरा हाच एकमेव विश्वासू व कर्तबगार असा राजकारणी उरला. त्यामुळे त्याला तुरुंगातून सोडावेच लागले. बादशहाला द्यावयाची खंडणी व नरूकाचे जयपूरवरील हल्ले याबाबत बोलणी करून नजफखानकडून नरूकाला समज देववावी यासाठी जयपूरराजाने खुशालीरामला आपला वकील म्हणून नजफखानकडे पाठविले होते. नजफखानचे अधिकार मर्यादित, शिवाय त्याच्याविरुद्ध त्याचे वैरी दरबारात कारस्थाने करीत होतेच, त्यामुळे याबाबतीत नजफखानला काहीही करता आले नाही. मुहमुदअलीचे हल्ले वाढत चालले व जयपूरच्या वेशीवर जाऊन तो घणाघाती उठाव करू लागला; तेव्हा प्रसंग ओळखून जयपूरराजाने नमते घेतले व खुशालीराम बोहराला जयपूरचे मुख्य मुखत्यारपद दिले; त्यामुळे सर्व लहान मोठ्या सरदार सरंजामदारांवर त्याची पूर्ण सत्ता राहणार होती. [ब्रिटिश म्यूझिअम ओरिजिनल, २५,०२० पृ. ५० ए व २५,०२१, पृ. ३१२ बी]

यावेळी जयपूरच्या राजकारणाबाबत खुशालीरामने दिल्लीतील अधिकाऱ्यांशी ज्या राजकीय वाटाघाटी केल्या त्यांचे फलित थोडक्यात असे. जयपूरवर चालून जाण्याचे नजफखानने ठरविले. खंडणीची जबरदस्त रक्कम देण्याइतकी जयपूरराजाची आर्थिक कुवत नव्हती; ती द्यावी अशी त्याला मनापासून इच्छाही नव्हती. हा हल्ला होऊ नये म्हणून तजवीज करण्यात खुशालीरामला यश आले नाही. महबूब अलिखान हा मुलूख जिंकीत जिंकीत जयपूरच्या रोखाने येऊ लागला तशी जयपूरच्या या मुखत्याराने एक लाख सत्तर

हजाराची रक्कम रोख देण्याची तयारी दाखवून उर्वरित रकमेबाबत आश्वासने दिली. (१७ सप्टेंबर) ही रक्कम अगदीच तोकडी म्हणून ती घेण्यास नजफखानने ताबडतोब नकार दिला. मुसलमानांचा हा हल्ला परतवून लावता येत नाही असे दिसताच जयपूर दरबाराने, महबूब अलीला रोखून धरण्यासाठी रोडारामला जायचा हुकूम केला (रोडाराम हा मूळचा शिंपी. राजाने नंतर त्याला आपला ' खवास ' केले होते) रोडारामने काहीही केले नाही. लढाईत माणसे मारणे म्हणजे कापड फाडणे नव्हे. तेव्हा करता येण्यासारखे होते ते एवढेच, की नरूकाला, आपल्या जातभाईंच्या साहाय्यार्थ येण्याबाबत गळ घालणे. (३० ऑक्टोबर) रावराजाने मदतीला यायचे साफ नाकारले. जयपूरमध्ये एकदा त्याच्या प्राणावर बेतले होते व त्या राजाच्या सांगण्यावरून नजफखानने त्याचा मुलुख बळकावला होता. यामुळे जयपूर दरबारावर आपला विश्वास नाही असे त्याने सांगितले. त्यानंतर खुशालीरामने नवा डाव टाकला. महबूब अलीशी सलोख्याची बोलणी सुरू केली. रावराजाने अन्यायाने जो मुलूख बळकाविला होता तो परत मिळवून देण्याच्या कामी मेहबूब जर साहाय्य देणार असेल तर त्याच्या सैन्याचा पगार देण्याचीही तयारी दाखविली. दरम्यानच्या काळात जयपूर राज्यातील शेखवतीच्या सीमाभागावर हल्ले करून लुटालूट करण्याचा नरूकाचा उद्योग सुरूच होता. कणखर सैन्य हाताशी नसल्याने पहिला खुशालीराम त्याला आळा घालू शकत नव्हता. (मार्च, १७८१) शेवटी महबूबअलीचे शिपाई पगार न मिळाल्याने निघून गेले व जयपूरकडील खंडणी वसूल करण्याचे काम नजफखानने पुन्हा गोसावी हिंमतबहादुराकडे दिले. त्याने पहिल्या खुशालीराम मार्फत जयपूरराजाची भेट घेतली. ह्यावेळी खालीलप्रमाणे तडजोड झाली. "हिंमतबहादूरने पवित्र गंगोदक हातात घेऊन, जयपूर राजाच्या हितास बाध येईल असे काहीही मी करणार नाही अशी शपथ घेतली." वार्षिक बारा लाखांचा महसूल येणारे महाल, राजाने हिंमतबहादूरकडे सोपविले. वसुलीच्या रकमेपैकी अर्धा भाग नजफखानला द्यायचा व अर्धा, वसुलीचे कामासाठी जे सैन्य ठेवावयाचे त्याच्या खर्चासाठी घ्यायचा.[२] पुढल्याच महिन्यात हिंमतबहादुरने पंचाहत्तर हजार रुपये वसूल केले व दिल्लीस आपल्या धन्याकडे पाठवून दिले. (पृ. ३३५ बी) त्यानंतर दौलतराम हलदिया जयपूरला परत आला व सेनाप्रमुख म्हणून त्याची बक्षी पदावर नेमणूक करण्यात आली.

मराठ्यांनी यशवंतराव वाबळे याला पैसे देऊन आपल्या बाजूने लढायला घेतले होते. हा वाबळे जयपूरवर चालून आला तेव्हा स्वतःचे सैन्य जयपूरराजाला देऊन हिंमतबहादुरने त्याचा पराभव केला. हा वाबळे पूर्वी जयपूरराजाच्या नोकरीत होता; पगार न मिळाल्याने मालपुरा व तोडा जबरदस्तीने घेऊन, त्यावर आपला हक्क शाबीत करण्याचा त्याचा प्रयत्न चालला होता. त्याचा दावा असा की, मालपुरा व तोडी येथील वस्ती सोळंकीची. (सोळंकी म्हणजे चालुक्य, मराठीत त्यांना सुळके म्हणतात) पण वाबळे हा दख्खनकडील सोळंकी. या रणधुमाळीत वाबळेचा मुलगा शंभूजी ठार झाला व त्याची सर्व युद्धसामग्री आणि मालमत्ता लुटण्यात आली (वंशभास्कर : ३८८९). जयपूर व

रावराजा यांचे हेवेदावे चालू राहिले व रावराजाने काही आर्थिक हितसंबंधांबाबत हमदानीशी संधान बांधले.

हे सगळे घडून येईपर्यंत १७८१ चा मध्य आला. त्यानंतर लवकरच जयपूर राज्यातील व्यवहारात आणखी एकदा क्रांती झाली. खुशालीराम बोहराला कैद करून तुरुंगात टाकण्यात आले व जुलै १७८१ अखेर दौलतराव हलदियाला पुन्हा मुख्यमंत्री करण्यात आले. [**डीवाय** : भाग१, लेखांक ३१] हलदियाने त्यानंतर पाच वर्षे जयपूरवर आपला अधिकार गाजवला. १५ नोव्हेंबर, १७८४ ला दुसऱ्या खुशालीरामचा (म्हणजे हलदियाचा) अफ्रासियाबच्या छावणीत खून झाला. हा खून माचेडीच्या राजाने आपल्या हस्तकाकरवी करविला होता. दौलतराम राजाच्या मर्जीतून पुन्हा उतरला; एप्रिल, १७८६ मध्ये त्याच्या हातातले अधिकार काढून घेण्यात आले व आपल्या कुटुंबीयांसह तो लखनौला निघून गेला. खुशालीराम बोहरा पुन्हा मुख्यमंत्री झाला, पण त्या जागेवर तो थोडा काळच होता. पुढील जानेवारीत दौलतराम पुन्हा जयपुरात आला. परक्या सत्तेशी वागताना त्याने जी धिटाई दाखवली त्यामुळे जयपूर राजा त्याच्यावर पुन्हा खूष झाला. महसूल वसूल करण्याच्या कामावर शिंद्याच्या सांगण्यावरून रायाजी पाटील लखनौ येथे राहिला होता. खुशालीरामचा मुक्काम त्याच्याकडेच होता. बोलणी करण्याच्या मिषाने बोलावलेल्या एका बैठकीच्या प्रसंगी खुशालीरामवर प्राणघातक हल्ला करण्यात आला. या कटाचा सूत्रधार खुद्द जयपूर नरेशच होता. "जयपूरकराकडे खुशालीराम ब्राह्मण कारभारी होता. त्याने सालगुदस्ता रायाजी पाटील-बावांकडे येऊन जयपूरचा मामला केला. रावराजा प्रतापसिंग व खुशालीराम एक विचारे होऊन राजश्री पाटीलबावांचे ममतेत रायाजी पाटलासमागमे आहेत. हे जाणून राणावत म्हणोन राजपूत जयपूरकरांकडील सरदार आहेत. त्यांजकडे राजाने सांगोन पाठविले कीं तुम्हाकडे मामल्यास रायाजी पाटील बमय फौज येतील त्या मामल्याचे बोलण्यात खुशाली-रामास कैद करून मारून टाकणे." [**डीवाय** : भाग १, लेखांक, १७३, २००; **एचपी** क्रमांक ४७६, ४६८]

४. सवाई प्रतापसिंगाचा स्वभाव : बेबंदशाही, विस्कळित कारभार, पारंपरिक दौर्बल्य.

राज्याच्या मुखत्यार पदावर कुणाला नेमायचे याबाबत ही जी रस्सीखेच चालली होती त्याचे भलेबुरे परिणाम सर्वसाधारण प्रजेला भोगावे लागले. या सर्वांचे कारण जयपूर नरेशाची लहरी व चंचल मनोवृत्ती.[३] सवाई प्रतापसिंग शहाणा नव्हता, मात्र इतर दुर्बल राजे जसे निरुपद्रवी व स्वस्थ असत तसा तो नव्हता. त्याचा लहरीपणा एकदम भडकून उठे. अयोध्येच्या नबाबाचे हीन षौक त्याला माहीत असल्याने तो स्त्रीवेष करी, पायात चाळ बांधी व अंतःपुरात नृत्य करी. मद्य, गाणेबजावणे व नृत्य यांच्या मैफलीतच त्याचा बहुतेक वेळ जाई. राजवाड्यातून बाहेर पडून तो रस्त्यातून हिंडत असे ते केवळ वेळ घालवायचा म्हणून. रिकामटेकडा उद्योग म्हणूनच तो देवळात जाई; धार्मिकतेपेक्षा नसते कुतूहल हाच त्यातला मुख्य हेतू असे. आपल्या दिवाण्या दारुड्यांच्या संगतीत केव्हा केव्हा तो मध्यरात्रीच

उठे. श्रीमंत सावकार व सोन्यामोत्यांचे व्यापारी यांच्या निवासस्थानावर धाड घाली, त्यांना मारपीट करी व त्यांचा पैसा घेऊन निघून जाई. राजाला व पुरुषाला शोभू नयेत असे दुर्गुण त्याच्याजवळ होते. त्याच्या उद्धट व उर्मट वागण्याने राजपुतांच्या थोरवीला कमीपणा येई; त्यांच्या सरदारांच्या प्रतिष्ठेला कमीपणा येई. अशी माणसे, लाजिरवाण्या अवस्थेत जयपूर सोडून निघून जात.

सर्वसाधारण जनतेचे हाल कुत्रा खात नसे. प्रजेच्या संबंधीचा शासनाचा कारभार अगदी बेबंद होता. तिच्या सुखदुःखाकडे कुणाचेही लक्ष नसे. राज्याचा कारभार पहाणारे अधिकारी स्वतःच्या लहरीप्रमाणे व मर्जीनुसार काम करीत; वरच्यांची पत्रास न ठेवता क्षुल्लक स्वार्थासाठी आपापसात तंडत. रोडाराम हा राजाच्या मर्जीतला एक शिंपी. याला सर्वजण रोडाजी म्हणत. या रोडाजीला जयपूरच्या राजाने राज्यातील सर्वोच्च अधिकारपदावर बसविले. रोडाराम राजाच्या खानपानादी प्रबंधावर लक्ष ठेवी व राजाला विषप्रयोग केला जाऊ नये याबाबतची काळजी घेई. प्रत्यक्षात पहिल्या क्रमांकाची पण व्यवहारात दुसरा दर्जा देण्यात आलेली अधिकाराची महत्त्वाची जागा वृद्ध ब्राह्मण, दिवाण खुशालीराम बोहरा (राजाची याच्यावर खप्पामर्जी होती) व दौलतराम हलदिया यांना आलटून पालटून दिली जाई. दौलतराम हा जातीने वैश्य होता. मराठ्यांच्या वकिलाने लिहिले आहे ते अगदी सत्य होते: " जयपूरकरांचे वर्तमान ऐकतो की त्यांचे सरकारात पैका नाही व कोणी 'माणूस' ही खानदानाचे नाही. रोडाराम म्हणून मुसाहेब मुखत्यार राज्याचा आहे, तो शिंपी आहे. दुसरे बोहरा खुशालीराम आहेत. हे राजे माधवसिंग यांचे गंगाजळीवाले पाणी पाजणार आहेत. वरकड या दोघांअलीकडे जे आहेत ते वाणी आहेत. याप्रमाणे राज्याचे कारभारी व फौज नाही. " [**डीवाय**. भाग १, लेखांक १६५]

जून १७८१ मध्ये राज्यातील सरदारांनी राजाला स्पष्टपणे बजावून सांगितले. "आपल्या राज्याचा कारभार हाताबाहेर चालला आहे; तो नीट चालावा म्हणून आपण काहीतरी उपाययोजना केली पाहिजे." यावर " आपणच माझ्या राज्याचे आधारस्तंभ, जे योग्य वाटेल, ते करा" असे राजाने उत्तर दिले. दिवाण महाशयांनी उपदेश केला तो असा, "सर्व मानकरी सरदारांनी राजधानीत असावे, आपल्या महसुलाची रक्कम सरकारात भरावी, दरबारचे हुकूम पाळावे व राज्याची सेवा करावी." एका हलक्या कुळातील माणसाने आपल्याला हुकूम करावेत हे या खानदानी सरदारांना सहन झाले नाही. तरीही राजा, शिंप्याला हाकलून द्यायला तयार नव्हता. शेवटी 'राजा आणि त्याचे नशीब' असे उद्गार काढून हे सर्व सरदार, राजधानीतून बाहेर निघून गेले. जवळ जवळ एप्रिल १७८६ पर्यंत ते असे दूर होते. शेकवतचा मांडलिक आणखी धीट झाला; व शेजारचा आणखी मुलूख बळकवायला त्याने सुरवात केली.

राज्यातले सर्व शूर सरदार दूर निघून गेल्यावरही सवाई प्रतापसिंगाने खुशालीरामाशी वैर आरंभिले. या वृद्ध दिवाणाची माधोसिंग व पृथ्वीसिंग या जुन्या राजांवर विलक्षण निष्ठा होती. पृथ्वीसिंग मेला, त्याच्यामागे त्याचा मानसिंग नावाचा मुलगा होता. तो फक्त सहा

महिन्यांचा होता. मृत राजाचा छोटा भाऊ प्रतापसिंग याने या अजाण अर्भकाचे सर्व कायदेशीर अधिकार डावलले. या बालकाचा कदाचित् खूनही होईल या भीतीपोटी खुशालीरामने त्याला मोठ्या युक्तिप्रयुक्तीने किसनगढ येथे त्याच्या आईच्या वडिलांकडे पाठवून दिले. हे समजताच सवाई प्रतापसिंग संतापला. त्याने खुशालीरामाला कैदेत ठेवले व मानसिंग हा अनौरस आहे असे जाहीर केले. सवाई प्रतापसिंगाने जयपूरच्या गादीची अप्रतिष्ठा केली होती. हा कलंक धुवून कछवा सिंहासन पवित्र ठेवावे असे ज्यांना वाटत होते, त्यांना मानसिंग हा हुकमाच्या पानासारखा होता. सतत खलबते चालली होती. सवाई प्रतापाला हुसकावून लावून मानसिंगाला जयपूर गादीवर बसविण्याच्या कामी आपण आम्हाला मदत करावी अशी महादजीकडे विचारणा करण्यात आली होती. या कटाचा प्रमुख सूत्रधार होता रावराजा नरूका. मानसिंगाचा पालक होऊन जयपूरवर वर्चस्व गाजवायची त्याची महत्त्वाकांक्षा होती. खुशालीरामाने या कटाबाबत थोडीफार आस्था दाखविली ती सवाई प्रतापसिंगाने त्याला जगणे अशक्य केल्यावर म्हणजे १७८६ नंतर. अशा काही बदलाचा महादजीने गंभीरपणे कधी विचारच केला नाही. त्याने मानसिंगाला जहागीर दिली व हयातभर वृंदावनास ठेवले.

५. बादशहाला न मिळणारी जयपूरची खंडणी

मीरबक्षी म्हणून महादजीला जयपूर राजाकडून बरीच वर्षे साचलेली खंडणीची खूप मोठी रक्कम वसूल करायची होती. महादजीला खंडणी वसूल करायची होती ती दोघांसाठी. एक दिल्लीचा बादशहा व दुसरे पुण्याचे पेशवे. जयपूर दरबारने पूर्वी अनेक प्रसंगी मराठ्यांना खंडणीदाखल खूप मोठी रक्कम देण्याचे आश्वासन दिले होते. त्याशिवाय गादीवर आल्यावर वारसाकर म्हणून दिल्लीपतीला जी रक्कम द्यावी लागते ती रक्कम व खंडणी मिळून वीस लक्ष देण्याचे त्याने नुकतेच आश्वासन दिले होते. (१७७९) ही रक्कम बादशहाला मीरबक्षीमार्फत मिळायची होती. नवीन अधिकार धारण केल्यावर महादजीला प्रथम जी कामे हाती घ्यावी लागणार होती त्यातील महत्त्वाचे काम हे होते. पण कछवा दरबारची नेहमीची परंपरा म्हणजे तोंडभर आश्वासनापलीकडे काहीही न देणे. तेव्हा प्रत्यक्ष उपाय म्हणजे शस्त्राचा धाक दाखवून जयपूरचा मुलूख घेणे. तसे केल्यानेच थोडाफार पैसा हाती पडण्याची शक्यता होती.

प्रकरण १८, पोटप्रकरण १ यात माहिती दिल्याप्रमाणे १७४८-५१ च्या दरम्यान जयपूरच्या राजाने मराठ्यांना बारा लाख रुपये खंडणी देण्याचे आश्वासन दिले होते. त्यांपैकी सहा लाख, रघुनाथ दादा व होळकर यांनी जुलै, १७५७ मध्ये वसूलही केले होते. सप्टेंबर १७५८ मध्ये परिस्थितीचा रेटाच असा काही होता की माधोसिंगाला ३६ लाख व आणखी ३ लाख अशी खंडणी द्यायचे कबूल करणे भाग पडले. या रकमेपैकी अल्पसा भागसुद्धा १७५९ च्या मोहिमेत मल्हारराव होळकर वा मंगरूळ येथील त्याचा सरसुभेदारही १७६१ मध्ये वसूल करू शकला नव्हता [पोट प्रकरण ७-१०] पण १७६५ मध्ये

जयपूर राजाने होळकरांशी समझोता केला. पाच लाख रुपये रोख दिले व आणखी चार लाखांसाठी सावकाराची हुंडी दिली. [प्रकरण २४, पोटप्रकरण– १२]

१७७९ च्या सुरवातीस बादशहा जयपूरला गेला होता तेव्हा जयपूरराजाने त्याला दोन लाख रुपये दिले होते व हप्त्याहप्त्याने वीस लाख पुरे करावयाचे आश्वासनही दिले होते. [प्रकरण ३०, पोटप्रकरण ३] ही रक्कम न आल्याने ती वसूल करण्यासाठी १७८०-८१ त नजफखानने महबूब अलीच्या हाताखाली सैन्य देऊन त्याला जयपूरवर धाडले होते; पण त्याचाही उपयोग झाला नव्हता. म्हणून जयपूर राजाचे मन वळविण्यासाठी त्याने हिंमत बहादूरला त्याच्याकडे पाठविले. या गोसावी महाशयांनी ७५ हजार रुपयांचा पहिला हप्ता वसूल केला होता; कदाचित आणखी एखादाही वसूल केला असावा. त्यानंतर १७८२–८४ या तीन वर्षांत कछवा राजाने खंडणीपोटी एक छदामही दिला नाही. दिल्लीदरबारातील अंतर्गत भांडणाचा फायदा घेऊन त्याने रक्कम देण्याची हेतुपुरस्सर टाळाटाळी केली.

मुहमदबेग हमदानीला दाती तृण धरायला लावून व भरतपूर आणि माचेडी राजाशी सलोखा करून महादजीने जयपूरच्या सरहद्दीवरील महेवा–रामगडवर हल्ला केला. पण खुशालीराम बोहरा हा सलोखा करण्याच्या हेतूने जयपूरचा प्रतिनिधी म्हणून महादजीला त्याच्या शाही सैन्याच्या छावणीत भेटला. ठार झालेल्या हलदियाऐवजी तो आला होता. खंडणीची रक्कम २१ लाख द्यावी असे ठरले.[४] महादजीचा निरोप घेऊन खुशालीराम पैसे आणण्यासाठी निघाला. अफ्रासियाबच्या नोकरीतील एक मुसलमान अधिकारी त्याच्याबरोबर पाठविण्यात आला. [अंदाजे २५ डिसेंबर, १७८४]

१७८५ या संपूर्ण वर्षात जयपूर राजाने खंडणीपोटी फक्त तीन लाख रुपये दिले. महादजी त्यावेळी अफ्रासियाबच्या बंडखोर अधिकाऱ्यांचा समाचार घेण्यात गुंतलेला व दिल्लीशासनाच्या नायबवझीर ह्या पदावरील पुरी पकड न बसलेला; जयपूरचा राजा त्याचा फायदा घेतल्याशिवाय कसा राहिला असता!

६. महादजी शिंद्याची जयपूरवरील पहिली मोहीम १७८६ : खंडणीबाबत तडजोड

दि. २० नोव्हेंबरला अलिगढ हातात पडला. एका मोठ्या विवंचनेतून मुक्त झालेला शिंदे (३ जानेवारी, १७८६) बादशहासमवेत जयपूरकडे निघाला. दिगजवळ आल्यावर एक महिन्याहून थोडा अधिक काळ महादजी तिथेच राहिला. [१० जानेवारी – १५ फेब्रुवारी] नरूका व बोहरा यांच्या मध्यस्थीने सहजपणे खंडणी वसूल झाली तर त्यांना हवी होती. पण ही आशा फोल ठरली व मुक्काम उठवून बादशहासह तो पुढे चालू लागला. [१५ फेब्रुवारी] पुढील महिन्याच्या पहिल्या दिनांकास तो लालसोट येथे आला. माचेडीच्या रावराजाला जयपूरकडे आधीच पाठवून दिले होते. बाळाजी महन्त [मरहूम राजा माधोसिंगाचा आध्यात्मिक गुरू] व दिवाण बोहरा या जयपूरच्या दोन मध्यस्थांना बरोबर घेऊन दि. ६ मार्चला तो परत आला. महादजी आपण होऊन बाळाजीला भेटायला गेला,

व बाळाजीला त्याने साष्टांग नमस्कार घातला. आपण कोणीतरी श्रेष्ठ धर्ममार्तंड, या कुऱ्यात बाळाजीने महादजीचे औपचारिक स्वागतही न करता आपले पाय पुढे केले आणि या सर्वश्रेष्ठ सेनाधिकाऱ्याने बाळाजीच्या चरणी आपला माथा टेकविला. [८ मार्च]

दि. १० मार्चला बोलणी सुरू झाली. "जयपूरचा मामला सालगुदस्ता तेविसा लक्षांचा जाला होता, त्यापैकी हिंडोल वगैरे परगणे दहा लक्षांचे लावून दिल्हे व लाख रुपये नक्त दिल्हे व दोन लक्षांच्या हुंड्या श्रावणमासी पाठवून दिधल्या होत्या, आणि जाबसाल करीत होते कीं, रावराजा प्रतापसिंग व नजफकूलीखान या दोघांनी नारनोळ वगैरे परगणे दाबून बसले आहेत; त्यांस ताकीद करून परगणे सोडवून देवावे आणि आपले सरकारची फौज मलक महमदखान वगैरे गेले आहेत, त्यांनी पायमाली केली आहे ते मजुरा देऊन बाकी सरकारची निघेल ती घ्यावी. [**डीवाय** : भाग १; लेखांक, १६२] होय नाही, होय नाही, ही कचकच कितीतरी दिवस चालली होती व नरुकाच्या स्वार्थी धोरणामुळे कधी कधी तंटा उद्भवण्याची भीती वाटत असे. जयपूर मध्यस्थाने कबूल केलेली वाजवी रक्कम महादजीने मान्य केली असती तर खुशालीरामसारख्या धोरणी व हुशार दिवाणाच्या प्रयत्नाने ती मिळालीही असती. प्रतापसिंग नरूकाला तडजोड व्हायला नकोच होती. तसे होते तर नारनोळ व अन्य परगण्यावरील ताबा त्याला सोडावा लागला असता. त्याने कावा साधला. महादजीने अवाच्यासवा रक्कम मागावी अशी त्याने महादजीला भर घातली. [६० लाखपर्यंत] व बादशहासमवेत दिगहून जयपूरपर्यंत स्वतः आल्यावर इतकी कमी रक्कम स्वीकारणे हे आपल्या इभ्रतीस कमीपणा आणणारे आहे असे त्याच्या मनात भरवून दिले. त्याने असेही सुचविले की, जयपूरचा सांप्रतचा राजा खंडणीची ही रक्कम देऊ शकला नाही तर त्याला काढून मानसिंगाला तिथे बसवावे व मानसिंगाचा पालक आणि राज्याचा मुखत्यार म्हणून जयपूरचा कारभार त्याच्या हाती द्यावा. ह्या पदासाठी तो महादजीला पन्नास लाख रुपये द्यायला तयार झाला. मराठ्यांचा जयपूरमधील सर्वाधिकारी प्रतिनिधी होऊन, कछवा राज्यावर आपली कुरघोडी कायम रहावी, असाही या स्वार्थी माणसाचा एक डाव होता. दिवस जात होते. तसतसे महादजीला समजून येत होते की, माचेडीचा हा राजा लबाड व कलागती लावणारा आहे. तो आपल्याशी एक बोलतो तर जयपूर राजाला दुसरेच सांगतो. [इब्रत, भाग २, १५६]

देवाणघेवाणीची बोलणी चालू असताना जयपूरच्या मध्यस्थानी दहा लाख रुपये द्यायची तयारी दर्शविली होती. मात्र त्यात मागील सर्व बाकी व चालू वर्षाचा हप्ताही समाविष्ट करण्यात यावा असे त्यांचे सांगणे होते. " त्यास त्यांनी तीन करोड चाळीस लक्ष रुपये त्यांचेकडे बाकी व हालचा मामला येणेप्रमाणे सवाल केला. त्यांनी उत्तर केले की, ' इतके दगड देखील आमचे हवेलीत नाहीत, मग पैका कोठून द्यावा ! ' त्या गोष्टीस दोन चार दिवस दम खाऊन रावराजा प्रतापसिंग याने भानगड करून साठ लक्ष रुपये यांचा मामला केला व तीन लक्ष रुपये अंतस्थ दरबार खर्चाबद्दल एकूण त्रेसष्ट लाखांचा करारमदार झाला. अकरा लक्ष रुपये नक्त द्यावे. (सात लाख रोख, जडजवाहिर तीन लाख,

हत्ती व घोडे एक लाख) दहा लक्ष रुपये सात महिन्याचे मुदतीने द्यावे म्हणून करार. विसा लक्षांचे परगणे खाशा अमलांपैकी लावून द्यावे म्हणून करार. बावीस लक्ष रुपये ठाकूर लोकांकडे मुलुख आहे त्यापैकीं जप्ती केली आहे तो ऐवज मुजरा घेऊन बाकी वसूल करून घ्यावे. [**डीवाय :** भाग १, लेखांक, १६३; **सातारा** खंड २,२५४, इन्नत, भाग २,१५५]

तडजोडीच्या या अटी मान्य झाल्यावर जयपूर राज्याकडून आलेल्या मध्यस्थांनी रोख व वस्तूंच्या स्वरूपात तीन लाख रुपये दिले. त्यानंतर खुशालीरामने महादजीचा निरोप घेतला. (२० एप्रिल १७८६) बाकी राहिलेल्या आठ लाखांची तरतूद त्याला करायची होती. तेवढे दिले म्हणजे पहिला हप्ता पूर्ण होणार होता. जयपूरला गेल्यावर बोहराने रोडारामकडून काही रक्कम सक्तीने वसूल केली. राजकृपेचा वरदहस्त असताना या माणसाने बरीच माया जमा केली होती. 'तुम्ही इतकी रक्कम द्यायलाच हवी' असे बजावून त्याने धनिकांकडून बराच पैसा जमा केला. कारावासाचा धाक दाखवूनही रक्कम उभी केली. अधिकारपदावरून हाकलून दिलेला त्याचा प्रतिस्पर्धी आपल्या कुटुंबीयांसमवेत अयोध्येस गेला. "जैपुरात राजाने खुशालीराम बोहरा यास कुल अख्त्यारी बोलून वस्त्रे मात्र दिली तितक्यावर बेहऱ्याने जुने कारभारी, मुत्सद्दी, दिवाण आदिकरून घरी बसले होते त्यांस त्यांचे कामावर बहाल करून वस्त्रे देवविली. नवे कारभारी, मुत्सद्दी यांस कैद केले. सावकार व वाणी वगैरे शहराची रयत कैद केली होती. त्यांस मोकळे केले. दिलदिलासा देऊन दुकाने बंद होती ती मोकळी करवली, उदीम व्यवहार चालता केला." [**एचपी** क्रमांक ४७६, ऐतिहासिक टिपणे खंड ६, लेखांक ४१]

मे अखेर अकरा लाखांचा पहिला हप्ता आला. त्यानंतरचा दुसरा हप्ता होता दहा लाखांचा. बावीस लाख यायचे होते ठाकूर लोकांच्या मुलुखातून. या खंडणीच्या वसूलीसाठी व बादशहाला तोडून देण्यात आलेल्या मुलखावर देखरेख ठेवण्यासाठी शिंद्याने रायाजी पाटील, नजफकुली व माचेडी राजा यांना त्यांच्या हाताखाली दणकट सैन्य देऊन त्या ठिकाणी ठेवले. नंतर परतीच्या प्रवासाला सुरवात करायची म्हणून महादजी ४ जूनला माघारी फिरला व २० जूनला दिग येथे आला. नंतर दोन दिवसांनी बादशहा दिल्लीस जायला निघाला त्यानंतर चार दिवसांनी महादजी मथुरेस आला. आणि मथुरेस व मथुरेच्या उत्तरेस असलेल्या वृंदावन येथे तो नंतरचे पाच महिने राहिला.

७ : १७८६ मधील शिंद्याच्या विवंचना : आर्थिक अडचणी : जानेवारी व फेब्रुवारी १७८७ मधील त्याच्या हालचाली

१७८५ हे सगळे वर्षच महादजीला मनस्ताप देणारे ठरले. मनःस्वास्थ्य नाहीशा करणाऱ्या विवंचना आणि होणारा विरोध या सर्व अडचणीतून साम्राज्याचा मुखत्यार म्हणून त्याला आपले आसन बळकट करायचे होते. त्यासाठी त्याला आग्रा, दिग व अलिगढचे किल्ले जिंकावे लागले. तसेच राघोगडच्या बंडखोर खिचींना दडपून टाकून दख्खनकडे

जायचा मार्ग सुकर करावा लागला होता. १७८६ च्या प्रारंभी उत्तरेकडील राजकीय क्षितिजावर कसलेही सावट नव्हते. खंडणीची मागणी करण्यासाठी जयपूरवर चालून जात असताना त्याला कसलीही चिंता नव्हती. तरीही मराठासत्तेबाबतची या वर्षीची विवंचना गेल्या वर्षापेक्षा कमी होती असे नव्हे. पुण्यातील पेशवे एका बलाढ्य शत्रूशी झुंजत होते. खुद्द पेशव्यांच्या फौजेचा वकूब यथातथाच होता; हैदराबाद सैन्याची मदत होती तीही हात राखूनच. पेशव्यांचा लढा चालला होता टिपू सुलतानशी. टिपूचे घोडदळ उत्कृष्ट व तोच त्याचा प्रमुख; शिवाय त्याच्या तोफखान्यावरचा अधिकारी एक प्रमुख फ्रेंच सेनाधिकारी होता. गजेंद्रगड येथे तह होऊन २६ फेब्रुवारी १७८७ रोजी हे युद्ध थांबले. बराच काळ चाललेल्या या लढाईमुळे पुण्याहून काही कुमक येईल ही आशा करण्यातही अर्थ नव्हता. त्याशिवाय त्याला स्वतःला अशा काही अडचणीत सापडावे लागले की त्यात तो चांगलाच गुरफटून गेला. फकीर खैरउद्दीन याच्या बाबतीत ब्रिटिश रेसिडेन्ट जेम्स ॲण्डरसन याच्याशी झालेला तंटा (मार्च–मे, १७८६) गोसावी हिंमतबहादूरचे बंड, व त्याच्या सैन्यातील एक अधिकारी खंडेराव हरी याला बुंदेलखंडात शत्रूंनी घातलेला घेराओ (ऑक्टोबर–नोव्हेंबर) ह्या त्यांतल्या प्रमुख होत. सालअखेर परिस्थिती खूपच निवळली; मात्र पैशाची अडचण सुटली नाही; ती अधिकाधिक बिकट होत चालली.

साम्राज्यापैकी जो मुलूख अद्यापि बादशहाकडे होता त्यातून महसुली उत्पन्न मिळत नसे. अंतर्वेदीचा मधला भाग व दिल्ली-आग्रा या प्रांतांत तर हा महसूल निम्म्यानेही नव्हता. यापैकी बराचसा मुलूख मिर्झानजफने लष्करी खर्चाकडे लावून दिला होता. जो थोडाफार मुलूख बादशहाकडे होता, तेथील परिस्थिती तितकीशी चांगली नव्हती. गेल्या पंधरा वर्षांतील अनागोंदी, यादवीयुद्धे, व सतत तीन वर्षे पडलेले अवर्षण यातून बाहेर निघायचे होते. हिंदुस्थानातील बादशहाच्या ताब्यातील मुलुखातून जास्तीत जास्त महसूल जमा व्हावा यासाठी शिंदे याने, 'हा बरा वाटला नाही, तर तो' अशा प्रकारे अनेक सुभेदार नेमले. असलेल्या परिस्थितीत भरपूर महसूल गोळा करण्याची धडपड म्हणजे पाषाणाला पाझर फोडण्यासारखेच होते. या अपयशाचे खापर त्याने आपल्या दिवाणांवर फोडले. त्याचे हे मत बरोबर नव्हते; पण आपण नेमलेल्या दिवाणांत महसूल वसूल करण्याची कार्यक्षमता नाही, अशी त्याची समजूत होती. पैशाअभावी तो भ्रमिष्टासारखे करू लागला. महसूल वसुलीसाठी दिवाणाचे काम आपण स्वतः केले तर याहून अधिक महसूल गोळा होईल असे त्यास खरोखरीच वाटत होते. पण असे करणे म्हणजे अकार्यक्षम, बेजबाबदार अशा सर्वसाधारण अधिकाऱ्यांच्या गोतावळ्यात, वा नुसतेच 'हो, हो,' म्हणून थापा मारणारांच्या हातात जाण्यासारखे होते. साम्राज्याच्या सर्वोच्च अधिकाऱ्याची ही अवनती पाहून जाणकार वृद्ध, महादजीचा सर्वनाश टाळण्याच्या दृष्टीने खेदोद्‌गार काढण्यापलीकडे काहीही करू शकले नाहीत. १७८६ अखेर बादशहाला खासगी खर्चासाठी द्यावयाची पाच महिन्यांची रक्कम थकली होती. प्रत्येक महिन्याला एक लाख तीस हजार द्यावे लागत. सैन्याच्या पगाराची थकलेली रक्कम तर याहून जास्त होती. वृंदावन येथे तो बरेच दिवस

राहिला. या मुदतीत आपल्याला पुत्ररत्न होऊन गादीस वारस मिळावा म्हणून या ठिकाणी त्याने पूजाअर्चा, अभिषेक, देवदेवतार्चन यांवर अफाट खर्च केला.

दि. १७ नोव्हेंबरला तो वृंदावनाहून निघाला व यमुनातीरावरील चिरघाट येथे आला. हे ठिकाण उत्तरेस १५ मैलांवर शेरगढ गढीनजीक आहे. महादजी उतरला होता त्याच्या पश्चिमेकडील भागात मेवाती धुमाकूळ घालीत होते. महादजी त्यांचा बंदोबस्त करण्यासाठी निघाला व दि. १० डिसेंबरच्या सुमारास शेरगढच्या नैऋत्येस पंधरा मैलांवर असलेल्या नांदगावास आला. जेम्स ॲण्डरसन निवृत्त होऊन मायदेशी निघाला होता. त्याने या ठिकाणी १३ डिसेंबर रोजी महादजीचा प्रेमपूर्वक निरोप घेतला. त्यानंतर महादजी लगेच वायव्येकडे मेवतमध्ये गेला. त्या ठिकाणी बंडखोरांनी डोके वर काढले होते. मुराद बेग हा त्यातला विशेष खतरनाक. पूर्वी नजफखानच्या मुगलिया घोडदळात अधिकारी असलेला हा मुराद बेग त्यावेळी किसनगढचा किल्लेदार व मेवतचा सुभेदार होता. (किसनगढ हा किल्ला फिरोजपुर-झिरकाच्या पश्चिमेस तेरा मैलांवर आहे.) महादजीच्या मनातून त्याला या दोन्ही अधिकारपदावरून दूर करायचे होते. या सर्व गोष्टी सुरळीतपणे घडवून आणल्यावर तो उत्तरेकडे पिंजारे येथे गेला (सुमारे ३० डिसेंबर) पिंजारे हे होडाळच्या उत्तरेस आठ मैलांवर आहे. तिथे जाण्याने तो दिल्लीपासून जास्त जवळ आला असता, बादशहाने आपल्या छावणीत यावे म्हणून त्याला बोलणी करता आली असती व उत्तर दिल्लीकडील मुलुखात होणारे शीख हल्ले थोपवून धरता आले असते. झबिताखानचा वारस गुलाम कादर, याने सहराणपूर जिल्ह्यावर ताबा मिळविला होता, तो त्याच्याकडून परत घ्यायचा होता. काय करावे याबाबत त्याचा ठाम निश्चय होत नव्हता. जयपूरचा राजा प्रत्यक्षात कसा वागतो, यावर पुढील पाऊल टाकायचे त्याने ठरविले होते. त्यानंतरचे दोन महिने तो होडाळनजीक तळ देऊन होता. याठिकाणी दिल्लीस असलेल्या त्याच्या दोन प्रतिनिधींनी त्याची भेट घेतली. आपल्या घरखर्चासाठी येणे असलेली रक्कम मागण्यासाठी बादशहाने त्या दोघांना पाठवले होते. (६ फेब्रुवारी, १७८७) ही येणे बाकी ८ लाख ४० हजार झाली होती. एवढी रक्कम एकदम उभी करणे, खेळ नव्हता. बादशहाच्या माणसांना त्याने तीन आठवडे थांबवून धरले व 'हुंडी दाखवताच दोन लाख रुपये रोख मिळतील' अशी व्यवस्था करून व तशी हुंडी देऊन त्याने त्या दोघांना २७ फेब्रुवारीला परत पाठवले. मीरत व अन्य महालांच्या महसूल उत्पन्नाच्या जोखमीवर पाच लाखांची तरतूद केली व उरलेले १ लाख, ४० हजार दोन महिन्यात देण्याचे आश्वासन दिले. दुसऱ्या दिवशी शिंदे, दिगकडे दक्षिणेच्या रोखाने निघाला; वसंतऋतूतील पंचमी महोत्सव त्याने दिग येथेच साजरा केला व त्याच महिन्याच्या दि. १६ ला जयपूर मोहिमेचे काम स्वतःकडे घेतले.

८. १७८७ मधील जयपूर स्वारी व त्यामागील दरबारची उठावणी

या आधीच्या वर्षी जून महिन्यात महादजी जयपूरहून परत फिरला तेव्हा तेथील राजाने आश्वासन दिल्याप्रमाणे, खंडणीची रक्कम वसूल करण्याचे कामावर जरूर ते अधिकार देऊन महादजीने माचेडीचा रावराजा व नजफ कुलीखान यांना तिथे ठेवले होते. हे दोघेही

खंडणी वसूल करण्याकडे घावयास हवे तेवढे लक्ष देत नव्हते. ऐषाराम व सुस्तपणा यामुळे नजफकूलीला सवड होत नसे; तर रावराजा जयपूरच्या खर्चाने स्वतःच्या मुलुखात भर टाकण्यात गर्क असे. महादजीने आपल्या सैन्याची एक तुकडी आपल्या विश्वासातील रायाजी पाटील याच्या हाताखाली दिली होती व जयपूरच्या मांडलिक राजांकडून येणारी खंडणी वसूल करण्याचे काम त्याच्यावर सोपवले होते. रायाजी बरोबर दक्षिणेतील ५००० स्वार होते. प्रत्यक्ष हातघाईची वेळ आल्यावर लढाईचा सोक्षमोक्ष करण्याइतकी या सैन्याची ताकद नव्हती.

वस्तुस्थिती अशी की खंडणी म्हणून काही द्यावे अशी जयपूरराजाची इच्छाच नव्हती. "प्रत्येक वेळी भगीरथ प्रयत्न व प्रचंड सैन्याचा धाक दाखवला म्हणजेच त्याच्याकडून थोडाफार पैसा येई." [**गुलामअली,** खंड, ३, २३१; **इब्रत,** १६२] महादजीला आपल्या मध्यस्थामार्फत जयपूरराजावर योग्य तो दबावही आणता येत नसे. काही भरघोस फलित पदरात पडायचे तर स्वतःच जायला हवे असे त्याच्या अनुभवास येत होते.

खंडणी देण्याची सातत्याने टाळाटाळ होतीच. त्यात भर म्हणून राजा सवाई प्रतापसिंग, मराठ्यांविरुद्ध इंग्रजांची मदत घेण्याचा डाव खेळत होता. त्यासाठी त्याने आपला माजी दिवाण दौलतराम हलदिया याला लखनौला पाठविले होते. (मे, १७८६) पैसे देऊन इंग्रजांची मदत घेण्याचा विचार होता. दौलतराम लखनौला तब्बल आठ महिने मुक्काम टाकून होता. हिंदुस्थानातील राज्यातील कलहात भाग घ्यायचा नाही असे कॉर्नवॉलिसने निक्षून बजावले होते. तरीही शिंद्याच्या अंतर्वेदीतील हालचालीने भयभीत झालेले कर्क पेट्रिकसारखे काही इंग्रज, ब्रिटिश सरकारकडून मदत मिळण्याची शक्यता आहे या आशेवर दौलतरामला झुलवीत होते. जानेवारी १७८७ मध्ये हलदिया जयपुरास परत आला; राजाने पुन्हा एकदा त्याला आपला पंतप्रधान केले. मराठ्यांशी सलोख्याचे संबंध ठेवणाऱ्या खुशालीरामवर त्याची इतराजी झाली. त्याच्या दृष्टीने खुशालीराम बोहराचा सर्वात मोठा गुन्हा म्हणजे त्याची मानसिंगकडे पहाण्याची आपुलकीची भावना. मानसिंग हा गादीचा खरा वारस; महादजीची मदत घेऊन त्याला गादीवर आणण्याचा बोहराचा प्रयत्न चालू आहे असे राजाला वाटत होते; बोहरावरचा राजाचा मुख्य आरोप हाच होता. [**डीवाय :** भाग १, लेखांक : १७३, २२० ; **पीआरसी ;** क्रमांक : ८६]

आपली छोटी कन्या व जयपूरचा राजा यांचा विवाह घडवून आणावा अशी महादजीची मनीषा होती. त्यानुसार मधल्या काळात त्याने तसे सुचवूनही पाहिले. जात वेगळी असल्याने, जयपूर राजाने ही मागणी फेटाळून लावली. आपल्या बरोबरीचे उच्च क्षत्रिय, म्हणून दक्षिणेतील मराठ्यांना मानण्यास राजपूत तयार नव्हते.

दौलतराम परत सत्तेवर आला. त्याने अशी बातमी आणली की, महादजीच्या पूर्वेकडील सरहद्दीविरुद्ध इंग्रज अंतर्वेदीत सैन्याची जमवाजमव करीत आहेत. एवढ्या बातमीच्या आधारावर मराठ्यांना विरोध करायचाच, असे जयपूर दरबारने ठरवले. संरक्षण-

व्यवस्था भक्कम व्हावी म्हणून शेजारच्या जोधपूर राजाशी सलोखा करण्यात आला. आपल्या हाताखालील राजे, उमराव, जमीनदार यांना त्याने असे कळविले की गेल्यावर्षी झालेल्या तडजोडीनुसार तुम्ही महादजीला जी खंडणी द्यावयाची, ती देऊ नका व त्याच्या सैन्याला जोरदार विरोध करा. मात्र तो स्वतः जयपूरच्या किल्ल्यात जाऊन दडून बसला. मराठ्यांशी उघड्यावर समोरासमोर सामना द्यायची कल्पना त्याने सोडून दिली. कासवासारखे मुंडके आत ओढून घेऊन, तो किल्ल्यात राहून आत्मसंरक्षणाच्या तजविजीला लागला. आपल्याला राज्य आहे याचाच त्याला सोयीस्करपणे विसर पडला. बाहेरचा सर्व मुलुख शत्रूला धुमाकूळ घालायला मोकळा होता.

रायाजी पाटील व त्याचे सहकारी यांना प्रारंभी थोडाफार जय मिळवता आला. कच्छवा राज्याच्या आसपासचा मुलूख त्याने घेतला. त्यानंतर मग राजपुतांनी प्रतिकार करायला सुरवात केली. १७८६ डिसेंबर अखेर राजपुतांनी एका गढीवर धडक हल्ला चढविला, त्यात रायाजीच्या सातशे सैनिकांना वीरगती मिळाली. हलदिया अधिकारावर आल्यानंतर ही अवस्था जास्तजास्तच वाईट होत चालली. फेब्रुवारी अखेर बक्षी जिवबा दादाच्या हाताखाली, शिंदे याला रायाजीच्या साहाय्यार्थ दणकट सैन्य पाठविणे भाग पडले. [**डीवाय :** लेखांक १७३, २१६, १९९; **इब्रत,** भाग २. १६३; **पीआरसी** : खंड १ क्रमांक : ८०]

म्हणजे आपण मार्च, १७८७ पर्यंत आलो. या महिन्याच्या मध्यास जयपूरवर चालून जायचेच या निर्धाराने महादजी निघाला. कछवा राजा खंडणीपोटी बादशहा व पेशवे यांना फार मोठी रक्कम देणे होता. ती वसूल करायची तर जयपूर राज्यातील काही मुलूख, शाही मुलुखात समाविष्ट करून घेण्याखेरीज दुसरा पर्याय नाही अशी महादजीची खात्री झाली होती. निजाम आपल्या साहाय्यक सैन्याचा पगार देण्याबाबत सतत टाळाटाळ करीत असे त्यावेळी डलहौसीची जी असह्य परिस्थिती होत असेल त्याचीच ही पुनरावृत्ती म्हणायची.

प्रदीर्घ अशा वाटाघाटीनंतर आता इलाज नाही असे दिसून आल्यावर महादजीने तलवार उपसण्याचे ठरविले. 'आपण सुरक्षित कसे रहातो' ही बादशहाला भीती. त्या भीतीपोटीच त्याने महादजीला वारंवार लेखी सूचना दिल्या की महादजीने आपले प्रचंड सैन्य घेऊन दिग पलीकडे जाऊ नये. तसे झाले तर पुरेशी संरक्षणव्यवस्था नसल्याने इंग्रज फौजा दिल्लीवर चालून येतील व त्यांच्या हातातील कुणातरी पातशहाजाद्याचे बाहुले बादशहा म्हणून दिल्लीच्या तख्तावर बसवतील; बंगाल व अयोध्येत इंग्रजांनी तेच केले होते. अयोध्येच्या अंतर्वेदीतील सरहद्दीवर इंग्रजांचे सैन्य जमू लागल्याने हा संशय दुणावला होता. यापूर्वी इंग्रज फौज फरुकाबादपर्यंत कधीच दिसली नव्हती. [**डीवाय :** भाग १, लेखांक २१३, २२०; **गुलामअली** : खंड ३, २३१; **मुन्नालाल** ३०१; **पीआरसी** : खंड १ क्रमांक ९९].

आपल्या मध्यस्थांच्या प्रयत्नाने जयपूरराजाकडून खंडणीची रक्कम येईल असे शिंद्याला वाटत होते, तोपर्यंत त्यांचे लक्ष दिल्लीचा उत्तरेकडील मुलूख, शिखांपासून क

वाचवायचा याकडे त्याने अंबाजी इंगळे याच्या हाताखाली मोठे सैन्य देऊन त्याला तिकडे पाठवले; तसेच शीख सेनाधिकाऱ्यांना पैसे देऊन त्यांच्या मदतीने गुलाम-कादरकडून सहरणपूरमधील खंडणी वसूल करायची होती. शीखसहकार्य मिळविण्यात अंबाजीचे कर्तृत्व अगदीच थिटे पडले. पथरगड छावणीतून ब्रिटिशसेना उठाव करेल ही भीती अधिक असल्याने महादजीने ज्या कल्पना उराशी बाळगून अंतर्वेदीतील वरच्या भागातील मोहीम हाती घेतली होती; ती त्याला सोडावी लागली. [**पीआरसी :** खंड १; क्रमांक : ७७, ७८]

जयपूरबाबत समझोत्याने घेण्याच्या त्याच्या ज्या कल्पना होत्या, त्याही फोल ठरल्या. त्यामुळे त्याला चाल करून जावेच लागले. डिसेंबर १७८६ मध्ये जयपूर राजा कमालीचा हतबल झाला. त्याच्याजवळ निश्चित धोरण नव्हते, असेलच तर ते प्रत्यक्षात आणण्याइतका कर्तबगार अधिकारी नव्हता. राजधानीतील मानकरी सरदारात तंटे बखेडे चालू होते. फक्त जोधपूर नरेश शांत प्रवृत्तीचा असल्याने शिंद्याचा माणूस त्याच्याशी धडपणे बोलू शकला. पुढे परिस्थितीने वेगळीच कलाटणी घेतली. कछवाराजाच्या सैन्यातील शिपायांना कितीतरी दिवसात पगाराचा पैसा दिसला नव्हता. ते अतिशय अस्वस्थ व असमाधानी होते. जानेवारीच्या मध्यात, शिंदे जर ऐंशी हजार रुपये देत असतील तर किल्ल्याचे दरवाजे उघडून मराठा सैन्याला आत घ्यायला जयपूर सैन्यातील अधिकारी तयार होते. पण हा कट प्रत्यक्षात यशस्वी झाला नाही. नंतर काही दिवसांनी दौलतराम हलदिया लखनौहून परत आला. दरबारातील मराठ्यांचा कैवार घेणाऱ्या सरदारांचे निर्दालन करण्यात आले. मराठ्यांना बदनाम करण्याची मोहीमच, दौलतरामने उघडली होती. (सुमारे २० जानेवारी) तो पुन्हा मुखत्यार झाला. जोधपूर राजाशी सलोखा करण्यात येऊन संरक्षणासाठी सशस्त्र तयारी सुरू झाली. रायाजी पाटील याच्या सैन्यात मुगलिया घोडदळ होते. हे मुगल अत्यंत स्वार्थी व बेभरवशाचे. त्यांचा थकलेला पगार देण्याच्या अमिषावर जयपूरपक्ष त्यांना आपल्याकडे वळवून घेण्याचा प्रयत्न करीत होता. रायाजी फारच कठिण परिस्थितीत सापडला. ‘ आपल्या धन्याने आपल्या मदतीला तातडीने यावे ’ असे महादजीला तो दर दिवशी लिहित होता. [इब्रत : भाग २, १६३; **पीआरसी** : खंड १ क्रमांक : ७१, ८२]

९. शिंद्यांचा जयपूरवर मोर्चा : समझोत्यासाठी प्रयत्न

महादजीने ताबडतोब निर्णायक पाऊल उचलले. त्याने दि. १६ मार्चला दिग सोडले व कुठेही मुक्काम न टाकता रोजच्या रोज अविरत मजला मारीत दि. २४ ला तो दौसा येथे आला. हे ठिकाण जयपूरच्या पूर्वेस ३२ मैलांवर आहे. रायाजीच्या हाताखाली पुढे आलेली मराठा सैन्याची तुकडी कछवा राज्याच्या दक्षिणेला सात मैलांवर असलेल्या संगनेर जवळ उभी होती. वर वर तरी सदिच्छेचा देखावा केला जात होता. जयपूर दरबारचे शांततापूर्ण वाटाघाटी करायला आलेले मध्यस्थ महादजीच्या छावणीत आले व त्यांनी खंड-णीच्या रकमेबाबत तडजोडीची बोलणी सुरू केली. पण महादजीच्या अंतर्गत वर्तुळात या बाबत एकमत होत नव्हते. धीम्या मनोवृत्तीचा राणा खान व व्यवहारचतुर रायाजी पाटील,

दोघेही महादजीला सांगत होते की समझोता करावयाचा तर अगदी माफक खंडणी स्वीकारावी व येथील रणरणत्या उन्हाला तोंड द्यायचे टाळून येथून ताबडतोब परत फिरावे; आणि मथुरेसारख्या मध्यवर्ती ठिकाणी राहून आपल्या अनेक छुप्या शत्रूंवर वचक ठेवावा. रावराजा व खुशालीराम यांना समझोता व्हायला नको होता. त्यांनी शिंद्याला अशी भर घातली की जयपूरच्या वेशीवर यायचे व थोडीशीच खंडणी घेऊन परत फिरायचे हे त्याच्या दर्जाला शोभणारे नव्हते. एवढी कमी रक्कम त्याच्या हाताखालचा कुणी नोकरही आणू शकला असता. जयपूरराजाकडून खंडणीदाखल फुटकळ रक्कम हातात पडली तर आपल्या अवाढव्य मोहिमेचा खर्च भागविण्यासाठी महादजी, आपल्या मुलुखातला मुलूख घ्यायला कमी करणार नाही हे माचेडीराजा समजून होता. तसेच आपला दावेदार, हलदिया हा परत अधिकारावर आलेला असल्याने खुशालीरामचे जयपूरमधील अधिकारपद व त्याची मालमत्ता केव्हाच त्याच्या हातातून गेली होती. त्याच्या स्वतःच्या जीविताचीही खात्री देता आली नसती; म्हणून या दोघा स्वार्थी व कावेबाज माणसांनी महादजीचा अहंकार डिवचला व त्याला असा चढवला की तो एकदम खूष झाला. जयपूरवेशीशी शिंद्याचे पाऊल पडायची खोटी, शहरातील सर्व शिपाई घाबरून शरण येतील, सर्व कछवाराज्य त्याला आपल्या राज्याला जोडता येईल; उज्जैनपासून दिल्लीपर्यंत व गंगेपासून अजमेरपर्यंत असा एकसंध प्रदेश तयार होईल. हे परस्पर विरोधी सल्ले मिळत असताना, महादजी काही काळ तरी आपले राजकीय शहाणपण व वास्तवतेचे भान गमावून बसला होता हे खरे. त्याचा चाहता खैरउद्दीन म्हणतो त्याप्रमाणे 'सर्व पापग्रहांच्या कचाट्यात सापडून त्याची दृष्टी झापडून गेली होती' हेच खरे. जयपूरचा राजा सातत्याने टंगळमंगळ करून शब्द चुकवीत होता. त्याचा संताप येऊन महादजी गरजला, "जैसी गवालेर व गोहद खाली करून घेतली तैसे जयपूरही खाली करून घेतो." [**इब्रत** : भाग ३; ३; **डीवाय** : भाग १, लेखांक २१०]

"रावराजा प्रतापसिंग माचेडीवाला व बोहरा खुशालीराम हे राजश्री पाटीलबावांचे ममतेत शिरून जाबसाल करितात कीं राजे पृथ्वीसिंगाचा पुत्र मानसिंग वृंदावनात आहेत, त्यास तुमचे स्वाधीन करावे;" अशाप्रकारे रावराजा, खुशालीराम व जयपूरमधील अन्य निवासित यांनी महादजीचा विश्वास संपादन केला. मानसिंगाला मराठ्यांचा आश्रित समजून त्याला अर्धे कछवा राज्य द्यावे व सवाई प्रतापसिंगाला प्रतिस्पर्धी उभा करावा असे त्यांनी सुचवले. छोट्या मानसिंगाच्या वतीने ते राज्यकारभार पहाणार होते व शिंदे जे लष्करी साहाय्य देईल त्यासाठी ठरवून दिलेली खंडणी नियमित हप्त्याने देण्याबाबत लेखी करार करणार होते. [**डीवाय** : भाग १; लेखांक २०१]

जयपूर राजाच्या ताठ वागणुकीने शांततापूर्ण सलोखा जरा कठिणच होऊन बसला होता. जयपूरच्या रक्षणासाठी राजाशी संबंधित असे सर्व सरदार जमू लागले होते. मर्जीतल्या रोडाराम [एकेकाळचा शिंपी] मार्फत प्रतापसिंगाने शिंद्याला कळवून टाकले, "रोडाराम व राजे प्रतापसिंग यांचे बोलणे आहे की बारा लक्ष रुपये गुदस्ताचे खंडणीबद्दल बाकी आहे. त्यापैकी चार लक्ष रुपये तूर्त, (द्यावे आणि आपण कूच करून माघारा

जावे) दोन लक्ष रुपये श्रावणमासी (जुलै) देऊं व बाकी सहा लक्षांचे परगाणे लावून घ्यावे " पण हेही आश्वासन पाळायची राजाची तयारी नव्हती. वाटाघाटी तशाच टाकून त्याचे मध्यस्थ मराठ्यांच्या छावणीतून एकदम निघून गेले; साधा निरोप घेण्याचा शिष्टाचारही त्यांनी पाळला नाही. [**डीवाय** : लेखांक : २०१, २११; **पीआरसी** खंड १, क्रमांक : १६९] महादजी संतापला: जयपूरच्या सर्व मध्यस्थांना त्याने आपल्या छावणीतून हाकलून दिले. त्यांच्या समवेत आलेल्या अखबरनिसनविसांनाही त्याने घालवून दिले. दुसऱ्या दिवशी तो पश्चिमेकडे भांक्रीवर चालून गेला. भांक्री जयपूरपासून तेरा मैलावर आहे. तेथपर्यंत जाण्यात जयपूर राजावर दडपण यावे हा हेतू होता. रायाजीच्या हाताखालील तुकड्याही संगनेर येथील आपला तळ सोडून जयपूरच्या दक्षिणेकडील वेशीपासून सात मैलांवर येऊन थांबल्या.

दूर अंतरावरून केलेल्या या लष्करी हालचालीचा काहीही परिणाम झाला नाही. किल्ल्याच्या आश्रयाला तुरमुंडी देऊन बसलेल्या कासवाने आपली मान तसूभरही हलविली नाही. म्हणून महादजीने जयपूर मध्यस्थांना भांक्री येथील आपल्या छावणीत बोलावण्याचा घाट घातला. हे मध्यस्थ त्याला त्याच्या छावणीवर पुन्हा १४ एप्रिलला भेटले. या वेळच्या त्यांच्या अटी आणखीच असमाधानकारक होत्या. साम्राज्याच्या कोणत्याही मुखत्याराने त्या स्वाभिमानाने स्वीकारल्या नसत्या. " तूर्त चार लक्ष रुपये घ्यावे. बाकी तुमचा ऐवज राहील त्यास (खुशालीरामास) आमचे हाती द्यावे म्हणजे आम्ही तुमच्या मामल्याची बेबाकी करून देऊ म्हणून बोलणे झाले त्यास त्यांनी (महादजीने) उत्तर दिल्हे की पायमाली आम्ही मुजरा देत नाही व खुशालीरामासही तुमचे स्वाधीन करीत नाही. सालहाल व सालगुदस्तची खंडणीची बेबाकी करून देणे. याप्रमाणे उत्तर जाले त्यावरून यांचा व जैपूरकरांचा बिघाड ठरला." [हिंगणे दफ्तर, **डीवाय**, भाग १, लेखांक, २२०; **पीआरसी** : खंड १, क्रमांक : १६९]

टीपा : प्रकरण ३४

पृष्ठ	टिपेचा क्रमांक	
२१६	१	फार्शी व मराठी कागदपत्रे अगर याबाबतची राजस्थानातील साधने (शेवटच्या बाबतीत मला माहिती आहे त्यानुसार) पाहिल्यानंतर माहुत फिरोज हा जयपूरची राणीमाता राणी चंद्रावती इचा मझारिन म्हणून

होता या टॉडच्या म्हणण्याला कसलाही आधार सापडत नाही. तसेच नरूकाने तिच्यावर विषप्रयोग केला या ब्रिटिश इतिहासकारांनी केलेल्या आरोपाबाबतही काही पुरावा मिळत नाही. वंशभास्कर (पान ३८८६) यांत उल्लेख आहे तो एवढाच की, ती असाध्य अशा रोगाने आजारी पडली; तिचे दोन्ही मुलगे तिच्या रुग्णशय्येशी येऊन तिला भेटले व त्यानंतर काही दिवसांनी ती मरण पावली. (बहुशः १७७७), यावरून विषप्रयोग झाला असावा असे वाटत नाही.

२१८ २ याबाबतचा वृत्तांत कळताच नजफखान संतापून ओरडला, "नेहमी नुसती आश्वासने, बनवाबनवीचे धंदे; आजपर्यंत प्रत्यक्षात पैसा असा कधी दिलाच नाही."
(ब्रिटिश म्यूझिअम : ओरिजिनल : २५,०२०; पृ. २२१ बी)

२१९ ३ **गुलामअली** : खंड ३, २३१; ब्रि. म्यूझिअम, ओरिजिनल, २५,०२०; पृ. ३०६; २५,०२१ पृ. ८; **डीवाय** : भाग १, लेखांक : १६५; जोधपूर, पत्र, क्रमांक २; **एचपी** : लेखांक : ४११, ४७६.

२२२ ४ "एक मासपर्यंत प्रांत खराब जाल्यावर एकवीस लक्ष रुपये बादशहाची नजर करार जाली. त्यांत दोन लक्ष रुपये नख्त व दोन लक्षांचे जवाहीर. बाकी रुपया राहिला त्याचे भरण्यास मुलूख दहा लक्षांचे महाल दिल्हे व सहा-सात लक्ष रुपये आपले पटाइतावर नेमून दिल्हे. त्याचे वसुलास शिबंदी पडेल ती पटाइतावर साधून घ्यावी असा करार होऊन फडशा जाला." (**एचपी** : क्रमांक ४०६; **डीवाय** : भाग १, लेखांक १३३)

प्रकरण ३५ वे

लालसोट मोहीम : १७८७

१. मोहिमेचा दुसरा टप्पा : महादजी जयपूरहून माघार घेतो : मे, १७८७

शस्त्र परजण्याव्यतिरिक्त महादजीला दुसरे काहीही करता येण्यासारखे नव्हते. पण मध्यंतरी जो कालक्षेप झाला त्यात त्याच्या युद्धकौशल्यालाही शैथिल्य आले. दौलतरामने जी तडफ दाखविली होती त्यामुळे आपल्या अंकित सरदारांकडून जयपूर राजा लष्करी साहाय्य मिळवू शकला होता. हे सैनिक जवळजवळ वीस हजारांच्या घरात होते. त्याचा मित्र असलेल्या जोधपूर राजाने राठोडचे पाचहजार तुफानी घोडे व आपला सेनाधिकारी भीमसिंग याच्या हाताखाली पाचहजार पगारी तुफखदार नागा पाठवले होते. [**डीवाय :** लेखांक : २०१, २००] सर्वांत वाईट गोष्ट म्हणजे शिंद्याच्या सैन्यातील जुने मुगलिया स्वार व हिंदुस्थानातील शिपाई यांना शिंद्याविरुद्ध फूस लावण्यात जयपूर दिवाणाला यश मिळत होते. साहाय्य करण्यासाठी एकत्रित झालेल्या राजपूत योध्यांनी प्रसंगाला धीटपणे सामोरे जायचा निर्धार केला होता. ते जयपूरहून निघाले [१ मे] आणि त्यांनी जयपूरच्या दक्षिणेस काही मैलांवर तळ टाकला. पुढे येणाऱ्या मराठा सैन्याला रोखून धरणे हा त्यातला उद्देश. त्यांचा राजाही दि. २ ला छावणीत दाखल झाला. “आपण बऱ्याच उद्दिष्टांची आवळ्या-भोपळ्यांची मोट एकत्र बांधण्यात चूक केली हे शेवटी शिंद्याला पटले. एकत्र येण्यात राजपूत राजे कमी पडतील हा आपला अंदाज चुकला, हे त्याने खासगीत मान्य केले; तसेच आपले नाव व दरारा यावर फाजील विश्वास ठेवण्यातही आपण चुकलो, हेही त्याला पटले.” [कर्क पॅट्रिक : **पीआरसी** : खंड १, पृ. १८०] जयपूरनजीक असणे धोक्याचे हे त्याने ओळखले व कछवा राजाच्या मांडलिकांच्या किल्ल्यांना वेढा घालून त्यांच्या ताब्यातला मुलूख शाहीमुलुखात सामील करून टाकायचा असा बेत त्याने आखला. [**डीवाय :** लेखांक : २०१, २००, २२०]

रायाजी पाटील थोडा पुढे जाऊन संगनेर येथे थांबला होता, त्याला महादजीने परत बोलावले व आपला मुक्काम भांक्रीहून दक्षिणेकडे वीस मैलांवर सावळी येथे हलविला. (५–७ मे) हे ठिकाण लालसोटच्या पश्चिमेस फक्त वीस मैलांवर आहे. असे करण्यात राजपुतांशी अधिक मोकळेपणे लढता यावे म्हणून त्यांना मोकळ्या मैदानात आणणे हा आपला हेतू आहे, असे त्याने जाहीरपणे सांगितले. राजपूतही कच्च्या गुरूचे चेले नव्हते. त्यांना या डावपेचाचा अर्थ समजला. महादजीने हा जो ‘पीछेफलांग’ पवित्रा घेतला. त्यात त्याची कमजोरी दिसून आली होती. प्रचंड सैन्य व तोफखाना, अंग्रेज अधिकाऱ्यांच्या हाताखालील प्रशिक्षित फलटणी हे सर्व असूनसुद्धा, जयपूरराजाकडून एक पैही खंडणी न

मिळताच महादजीला माघार घ्यावी लागली होती. या वेळेपर्यंत राजपुतांचे सैन्य चाळीस हजारांवर गेले होते. देशात गोंधळाचे व भीतीचे वातावरण होते; मराठा सैन्याला स्वतःच्या छावणीबाहेर पडून सुरक्षित प्रवास करणे कठिण होते. तसे ते कुठे गेले तर वाटेत सर्व तांडाच लुटला जायचा. [**डीवाय** : भाग १, लेखांक २००, **पीआरसी** : खंड १, पान १८०–१८६]

या नव्या हालचालीने जयपूरचे मुख्य सैन्य (त्यावेळी ते संगनेर येथे होते) व जयपूरचा दक्षिणेकडील प्रांत या दरम्यान शिंदे आला होता. यानंतर तो जयपूरच्या दक्षिणेकडील मुलुखातून हल्ले करीत, खंडणी घेत व झळई, नवई असे छोटे छोटे किल्ले सर करीत चालला; ते थेट बुंदी सरहद्दीनजीक सरसोपजवळ बनास नदीपाशी येऊन थांबला. दरम्यान त्याच्या सैन्यातील मुगलिया व हिंदुस्थानी तुकड्या प्रत्येक दिवशी त्याला सोडून जात होत्या. ही संख्या मोठी नसली तरी गळती होती हे नक्की. दि. ६ मे रोजी झुल्फिकार अलि खान व मन्सूर अलि खान हे त्याच्याकडील दोन नामवंत सेनानी आपल्या सैन्यासह गुपचूपपणे शत्रूच्या बाजूला गेले. सर्वांवर कळस म्हणून मुगलिया सैन्यातील महान सेनाधिकारी मुहमद बेग हमदानी हा जयपूर राजाला जाऊन मिळाला. त्यामुळे मराठा सैन्यात विलक्षण भीतीचें व नैराश्याचे वातावरण पसरले. राजपुतांनी हमदानीचे भव्य स्वागत केले. त्याचे कर्तृत्व व नाव याबाबत दुमत नसल्याने सर्व जबाबदारी त्याच्यावर टाकून त्याला संरक्षणाबाबतचे सर्वाधिकार देण्यात आले; त्याच बरोबर दररोज तीनहजार रुपये पगार देण्याचेही आश्वासन दिले गेले. [**डीवाय** : भाग १, लेखांक : २२०, २२१; **डीसी**]

२. मोहिमेचा तिसरा टप्पा : मुहमद बेग हमदानी सोडून जातो : शिंद्याची पूर्वेकडे माघार.

मुहमद बेग निघून गेल्याने महादजीला सर्व योजनात आमूलाग्र बदल करणे भाग पडले. यानंतर एकाही हिंदुस्थानी शिपायावर त्याला विश्वास ठेवता येत नव्हता. आपली स्वतःची व बरोबर आणलेल्या जनान्याची बेइज्जत कशी होणार नाही याकडेच त्याचे लक्ष लागले. सुरक्षिततेच्या दृष्टीने आणखी माघार घेणे अशक्य नव्हते, पण त्याच्या प्रतिष्ठेला त्यामुळे जबरदस्त तडाखा बसला असता; पण कृती करून तशी कबुली देणे म्हणजे हिंदुस्थानात व पुणे दरबारात हसे करून घेण्यासारखे होते. तसेच शाही शासनावर त्याचा जो वचक बसलेला होता तोच नाहीसा करण्यासारखे होते. म्हणून त्याने खंडेराव हरी व अंबाजी इंगळे यांना तातडीचे हुकूम पाठवून आपापल्या तुकड्यांसह आपल्या मदतीला यायला फर्माविले. तसेच बादशहाने दिल्लीहून निघून त्याच्या छावणीत यावे व आपल्या मुख्त्याराच्या कृतीचे समर्थन करावे असाही निरोप त्याने बादशहाला पाठविला. दि. ४ जूनला तो सरसोपहून पिपळाईस आला. हे ठिकाण लालसोटच्या आग्नेयेस आहे.

मराठा सैन्याने माघार घ्यायला सुरवात करताच राजपूत, संगनेरहून पुढे चालून आले व त्या महिन्याच्या दि. १० ला जयपूर राजाने माधोगडचा ताबा घेतला. हा किल्ला

लालसोटच्या वायव्येस १७ मैलांवर आहे. दोन दिवसानंतर त्यांनी दौसावर आणखी एक तुकडी धाडली व शिंद्याने उत्तरेकडील रस्त्याने माघार घेऊ नये म्हणून जरूर तो बंदोबस्त केला. त्यामुळे महादजीला बलहारी व दिगहून आग्रा आणि दिल्ली येथे जाणे कठिण जाणार होते. रावराजा (माचेडी) हा शिंद्यांचा मित्र. त्याच्या राज्यात कसलीही संरक्षणव्यवस्था नसल्याने राजपुतांनी तिथे गोंधळ घातला.

जयपूर नरेश किल्ल्याबाहेर आल्याने, मोकळ्या मैदानावर त्याच्याशी दोन हात करण्याची शिंद्याची खुमखुमी पुरी होणार होती. कछवा राजधानीच्या संरक्षणासाठी पुरेसे सैन्य नसल्याने तिथे दणका मारायचा ठरवला, तर मराठे, त्या किल्ल्याला सहजपणे वेढा घालू शकतील, व तेथील शिबंदीला लाच दिल्यास किल्ला ताब्यात येण्यासही अडचण पडणार नाही, असे रावराजा शपथेवर सांगत होता. मुहमद बेग हमदानी त्यांच्याकडे गेल्यावर राजपुतांनी एक पंधरवडा काहीही हालचाल केली नाही. निवळ रिकामी बोलणी करण्यात वेळ घालविला. त्यांच्याकडे येणारा पैशाचा ओघ मूळात छोटा, तोही थंडावला आणि ते व राठोड यांच्यात मोहिमेच्या खर्चावरून तंटा सुरू झाला. [**पीआरसी** : खंड १; क्रमांक ११५, ११८, ११९].

३. मोहिमेचा चौथा टप्पा : शिंदे पुन्हा पुढे सरकतो; लालसोटला पोहोचतो.

शेवटी या लढयाला निर्धाराने तोंड द्यायचे असे शिंद्याने ठरविले. माघार घ्यायच्या सर्व कल्पना मनातून काढून टाकून तो शत्रूला सामोरा जायला निघाला. १५ जूनला तो लालसोटच्या दक्षिणेस (बहुशः भय्या का बाग येथे) काही मैलांवर आला. त्याच दिवशी दौसा येथे असलेल्या रजपूत सैन्याचे तुकडीने दक्षिणेकडे पुढे सरकून रामगढ घेतले. रामगढ लालसोटच्या वायव्येस सहा मैलांवर आहे. त्यामुळे मराठा सैन्याला तिथून पुढे जाणे अवघड झाले. तसेच आग्र्याशी संपर्क साधायचा तर त्यांना अत्यंत खडबडीत अशा वेड्यावाकड्या वळणावळणाने जायला लागले असते.

महादजी अगदी जिवावर उदार होऊन सामना द्यायला सिद्ध झाला असला तरी प्रत्यक्ष चढाई सुरू करावयाचा धोका पत्करायला तो तयार नव्हता. त्याच्या सैन्यातील उत्तर हिंदमधील शिपाई त्याला सोडून जाण्याचे सत्र सुरूच होते. दुष्काळी परिस्थितीमुळे धान्याचे भाव वाढत होते. [त्याच्या छावणीत गहू रुपयाला सहा शेर होता.] व त्याने बऱ्याच दिवसांत शिपायांना पगारही दिला नव्हता. महादजीच्या विश्वासातील दख्खनी शिपायांना उत्तरहिंदमधील मुसलमान शिपायांबद्दल पहिल्यापासूनच विश्वास नव्हता. सैन्यातील या दगलबाज शिपायांनी दंगल माजवून उलट हल्ला करू नये म्हणून, ते डोळ्यात तेल घालून दक्ष असत. प्रत्यक्ष हल्ल्याच्या वेळी हे हिंदुस्थानी शिपाई राजपुतांना मिळतील व तिकडून आपल्या शिपायांवर गोळ्या झाडतील अशी प्रत्येकाला भीती वाटत होती. म्हणून आपल्या मदतीसाठी त्याने जे विश्वासार्ह सैन्य बोलावले होते ते येऊन दाखल होईपर्यंत प्रत्यक्ष हातघाईचा प्रसंग टाळून वेळ काढीत रहाणे भागच होते. ज्यांच्यावर

विश्वास टाकावा अशा मदतीला येणाऱ्या तुकड्या म्हणजे–दहाहजार खारावलेले निष्णात सैनिक व द बॉन्यच्या दोन शिस्तबद्ध पलटणी आणि तोफखाना यांचा समावेश असलेली खंडेरावची तुकडी व तूर्तास कर्नाळ येथे असलेली अंबाजी इंगळे याची पंधरा हजार बंदुकधारी सैनिकांची सुसज्ज तुकडी. अंबाजी बरोबर शिखांचे दणकट असे पगारी स्वारही येण्याची शक्यता होती. अंबाजी पतियाळाहून दि. ७ जूनला निघाला होता, पण वाटेत प्रचंड पाऊस व स्थानिक शत्रू यांना तोंड देत येता येता त्याला दुसऱ्या महिन्याचा सोळावा दिवस उजाडला; विशेष म्हणजे सुरवातीस तो एकटाच महादजीच्या छावणीवर आला; कित्येक दिवस अडखळत, धडपडत येत असलेली त्याची फौज कोट-पुतळीशी येऊन थांबली होती. [**पीआरसी :** खंड १; क्रमांक: ११७, १२२, १२४, १२९]

लालसोटला पोहोचल्यावर मनाशी योजलेला एक बेत शिंद्याने एक आठवडा ठामपणे अमलात आणला. आपल्या सेनाधिकाऱ्यांनी स्वत: पुढे होऊन शत्रूला डिवचू नये अशी सावधानता त्याने राखली. राजपुतांचे सेनाधिकारी बढाया मारीत होते; शिपाई, प्यादे गडबड गोंधळ माजवीत होते, तथापि प्रत्यक्षात शिंद्याशी दोन हात करून पहायला घाबरतच होते. शिंद्याचा अद्ययावत व कार्यक्षम तोफखाना व फ्रेंच सेनाधिकाऱ्याच्या शिस्तीत तयार झालेल्या पलटणी यांची त्यांना धास्ती वाटे. याचा शत्रूला वाजवी फायदा होऊ नये म्हणून राजपुतांनी ठरवले होते की हल्ला करायचा तो पावसाळी हवा असताना; पावसाळी हवेत दारूची भुकटी सरदते, त्यामुळे तोफखान्याचा प्रभाव पडणार नाही व आपली 'तलवार आणि भाला' प्रभावी ठरेल. ते शक्य झाले नसते तर असे ठरले होते की पाचहजार वायुगती राठोड स्वारांनी मरेपर्यंत लढायचे; शत्रूच्या तोफखान्यावर बेभान अवस्थेत जाऊन धडकायचे, तोफा डागणारांवर तुटून पडायचे व ते पुन्हा दारू ठासून तोफा डागण्याच्या आत त्यांना लोळवायचे. मराठ्यांच्या हेरांनी अशी बातमी आणली की, राजपूत आपले सुसज्ज सैन्य प्रथम बाहेरच काढणार नव्हते. ते अशा ठिकाणी गुप्तपणे ठेवणार होते की मराठ्यांना त्याचा पत्ताच लागू नये. काही सैन्य पुढे पाठवून मराठ्यांना चकमकीत गुंतवून ठेवायचे, माघार घेतल्यासारखे दाखवून शत्रूला नाल्यापर्यंत यायला लावायचे व फसवून त्यांचा निकाल लावायचा. मराठे या वार्तेने हादरले. रात्रीच्या निवांत वेळी हल्ला करून राजपुतांच्या सैन्यात गोंधळ उडवून द्यायचा हा पहिला बेत महादजीने बदलला. राजपूत एकत्र दिसत असले तरी लवकरच त्यांच्यात धुसफूस सुरू होईल, त्यांच्या या एकतेला तडा जाईल अशी अटकळ बांधीत त्या दिवसाची वाट पहात महादजी गप्प होता. तसे झाल्यास राजपुतांचा ज़ोर ओसरेल व खुल्या रणमैदानात आमनेसामने दोन हात करताना तोफखान्यावरील सुसज्ज यंत्रणा व बंदुकधारी शिपायांची शिस्तबद्ध पलटण यांचा आपल्याला पुरेपूर फायदा मिळेल, अशी त्याची कल्पना होती. [अखबरात्]

४. मोहिमेतील पाचवा टप्पा : शिंदे लढायला पुढे सरसावतो

शेवटी, दि. २३ जून रोजी महादजीला वाटले की खंडेरावचे सैन्य आपल्याशी उद्या हातमिळवणी करू शकेल, तेव्हा हल्ला करायचा, असे त्याने ठरविले. या वृद्ध अनुभवी

सेनापतीने अत्यंत जागरूकतेने व काळजीपूर्वक लक्ष देऊन आपल्या हुकुमाची तामिली होतें की नाही याकडे जातीने पाहिले होते. त्याची योजना अशी होती. लालसोटच्या दक्षिणेस काही मैलांवर आपल्या छावणीचे मुख्य ठाणे ठेवायचे, तेथील चीजवस्तू, सामानसुमानावर संरक्षक सैन्य ठेवायचे; स्वतः महादजीने सात हजार सैनिक, दहा अजस्त्र तोफा व सहज हलविता येईल असे साहित्य घेऊन आपल्या ठाण्यापासून चार किंवा पाच मैल पुढे जायचे; राणाखान भाईने आपल्या सैन्याच्या मुख्य तुकडीसह महादजीच्याही पुढे तीन चार मैल जायचे. रायाजी पाटील व शिवाजी विठ्ठल (बापू) यांच्या हाताखालील आघाडीचे सैन्य, राणाखानच्या सैन्यापुढेही आणखी दोन मैलांवर ठेवायचे व या सैन्याने शत्रूच्या हाल-चालीवर टेहळणी करायची. प्रत्येक दिवशी सेना पुढे कूच करत रहायची. अशाप्रकारे पुढे सरकत असताना ज्या ठिकाणी आदल्या दिवशी रायाजी असेल त्या ठिकाणी राणा-खानने मुक्काम टाकायचा व राणाखानच्या जागी महादजीने यायचे. या मोहिमेच्या संपूर्ण काळात हीच पद्धती कायम ठेवण्यात आली होती.

अशारीतीने दारूची भुकटी कोरडी ठणठणीत ठेवून महादजी होमहवनाकडे वळला. आगेकूच करावयाच्या महत्त्वाच्या आदल्या दिवशी सायंकाळी अतिशय एकतानता व सावधतेने रणचंडीच्या पूजनार्चनास प्रारंभ करण्यात आला. उषःकाल होण्यापूर्वी तीन तास आधी महादजीने आपल्या सैन्यातल्या सर्वांत कर्तृत्ववान आणि श्रेष्ठ अशा राणाखानभाई या सर्वोच्च सेनाधिकाऱ्याला बोलावून घेतले. पवित्र उदकाने स्नान करावयास लावून नवीन पोषाख घालायला लावले; देवदेवतांसमोर नतमस्तक होऊन साष्टांग नमस्कार घालायला सांगितले. नुकत्याच केलेल्या होमहवनातील विभूती त्याच्या कपाळावर लावली; शिंद्याची समशेर आणि ढाल यांच्या संरक्षणाच्या छायेखाली त्याला पुढे कूच करायला सांगण्यात आले. [इब्रत, भाग३ : ११] दुसऱ्या दिवशी पुढे सरकण्यास सुरवात केल्यावर राणाखानाने लालसोट खिंडीत आपला तळ ठोकला. या ठिकाणी राजपूत होते, पण काही दिवसांपूर्वीच ते परत रामगढच्या आश्रयाला गेले होते. दि. २६ ला खंडेराव हरी आपल्या सैन्यासह महादजीच्या तळावर येऊन दाखल झाला. त्याच्या सैन्यात तीनहजार दख्खनी स्वार, द बॉन्यच्या दोन तुकड्यातील तेराशे दणकट शिपाई, दोन हजार नागा गोसावी व राजधर गुजरचे [समथरचा राजा] तीनशे पायदळ होते. दुसऱ्या दिवशी सकाळी महादजीसमोर या सैन्याची कवाईत झाली, त्यांची हजेरी घेण्यात आली. त्या सर्वांची मोजदाद करण्यात आली. त्याच्या सेनाधिकाऱ्याला, 'त्याने पुढे होऊन राणाखानला मिळावे' म्हणून सांगण्यात आले. [इब्रत : भाग ३; २०] त्या महिन्याच्या ३० दिनांकाला राणाखान लालसोट खिंडी-पलीकडे साधारणपणे तीन मैल सरकला; खिंडीच्या टोकाला वायव्येस जवाना टेकड्याच्या पायथ्याशी बहुशः हल्लीच्या दिद्वाना खेड्याजवळ त्याने तळ टाकला. त्याच्या उत्तरेकडे तो व रामगढ किल्ला या दरम्यान विस्तीर्ण मैदान होते. ठरलेल्या बेतानुसार शिंदे पुढे चालू लागला व राणाखानाने सोडलेल्या ठिकाणी म्हणजे खिंडीच्या उतारावर असलेल्या लालसोट खेड्यात येऊन थांबला.

५. लालसोट व रणमैदानाचे वर्णन

या मोहिमेच्या हालचाली जिथे झाल्या त्या रणक्षेत्राच्या रचनेची स्पष्ट कल्पना येणे आवश्यक आहे. जयपूर शहराच्या आग्नेयेस ३० मैलावर लालसोट हे खेडे आहे.[१] हे खेडे विस्ताराने जरासे मोठे आहे. छोट्या छोट्या टेकड्यांची लांबलचक रांग व बाणगंगा नदी-पर्यंत आणि थोडेसे त्याही पुढेपर्यंत पसरलेला खडकाळ भूप्रदेश यांच्या टोकाशी हे गाव वसलेले आहे. (बाणगंगा ही नदी सांप्रतच्या बांदीकुई या जोडस्थानकानजीक येते) लालसोट जिल्ह्याची संपूर्ण उत्तर आणि दक्षिण बाजू निसर्गदृष्ट्या सुरक्षित आहे. एखाद्या अजस्र पाणकोळ्याने आपल्या बोटाच्या चिमटीत धरल्यासारख्या वाटाव्यात अशा असंख्य दऱ्या व घळी असून त्या मोरेल नदीच्या दिशेने खाली वळतात. मोरेल नदीमुळे बनास-नदीला भरपूर पाणी असते. जिल्ह्याची पूर्व बाजूही वर निर्देश केलेल्या छोट्या छोट्या जवाना टेकड्यांच्या लांबलचक कर्णाकृती टेकड्यांनी बांध घातल्यासारखी संरक्षित आहे. त्या मानाने दक्षिणेकडील बराचसा भाग मोकळा आहे. येथून करोली (लालसोटच्या पूर्वेस ४२ मैल) धोलपूर, भरतपूर पर्यंत व तिथूनच आणखी पुढे जायला रस्ता आहे. लालसोटच्या दक्षिणेस एका खिंडीचे तोंड असून त्या खिंडीला लालसोटची खिंड असेच नाव आहे. या दरीपासून एक अवघड व वेड्यावाकड्या वळणाचा अडचणीचा मार्ग आहे. या मार्गाने उत्तरेस बावीस मैलांवर असलेल्या दौसा या गावी जाता येते. येथे जयपूर आणि आग्रा या दरम्यानचा एक सतत जा ये चालू असलेला सर्वात जवळचा रस्ता आहे. हा रस्ता थोड्या-फार प्रमाणात बाणगंगानदीशी समांतर आहे. या रस्त्याशी समांतर असा सांप्रतचा लोह-मार्गही आहे.

लालसोट खिंडीतून निघाल्यानंतर लागलीच त्या खिंडीच्या उत्तरेस व लालसोटच्या डाव्या बाजूच्या हद्दीवरून, टेकड्यांचा एक समूह दिसतो त्याला लालसोटचा डोंगर म्हणतात. तीन मैल चालल्यावर आपण दिद्वाना या खेड्याशी येतो. दोन एकाकी असे सुळके या खेड्याकडे पहात असलेले दिसतात. त्यानंतर मग सरळ भू-प्रदेशास सुरवात होते. दिद्वान खेड्याजवळ थोडे डाव्या बाजूस वळले म्हणजे आपल्याला दोन अरुंद घळी, रामगढचे रुंद मैदान, (रामगढ खेड्यावरून हे नाव पडले) लागते. दिद्वानाच्या वायव्येस एक छोटासा किल्ला आहे.

रामगढहून वायव्येकडे आणखी चार मैल पुढे गेले म्हणजे आपण मोरेल नदीपाशी येतो. याठिकाणी उलट सुलट जाण्यायेण्यासाठी नदीला अतिशय उत्तम व सोयिस्कर असा उतार आहे. त्यात ना घळ ना नाला. हा उतार बिदाखा खेडे व किल्ला यांच्यासमोर आहे. बिदाखा जवळून मैलभर लांबीचे दोन जलौघ वहातात. त्यापुढे उत्तरेकडे पसरलेला भूप्रदेश म्हणजे जवळजवळ सलग असे मोकळे मैदान आहे. पुढे सहा मैलांवर तुंगा हे खेडे असून त्या रस्त्यावर वाटेत ठिकठिकाणी छोट्या वस्त्या आहेत. दक्षिणेकडील आक्रमकांशी सामना द्यायला आलेल्या रजपूत सैन्याचा मुख्य तळ तुंगा येथेच पडला होता. त्यांच्या राजांच्या छावण्या मात्र दोन मैल मागे, माधोगडावर होत्या.

दि. २८ जुलैची लढाई ही तुंगा आणि बिदाखा या दरम्यानच्या मोकळ्या मैदानात झाली. हे रणक्षेत्र पूर्वीच्या ठिकाणाच्या आग्नेयेस दोन मैलांवर, म्हणजे लालसोट खेड्यापासून चौदा मैलांवर येते. म्हणून या मैदानाला देण्यात आलेले लालसोटचे मैदान हे नाव बरोबर वाटत नाही. पुढे चालून येत असलेल्या मराठा सैन्याच्या पिछाडीला मोरेल नदी होती, मराठ्यांनी बिदाखा किल्ला नुकताच जिंकून घेतलेला असल्याने ते मोरेल नदीवर नजर ठेवू शकत होते. त्यांच्या फिरत्या पथकांचा तळ, या नदीच्या पिछाडीस आग्नेयेस रामगढ नजीक होता. आग्नेयेकडे तसाच पुढे असेलला लांबलचक रस्ता, महादजी समवेतचे संरक्षक पथक, त्याच्या रणशूर सेनानीचे सहजी हलविता येणारे तळ व लालसोट खेड्याचे दक्षिणेस दोन किंवा तीन मैलांवर असलेल्या त्याच्या राखीव फौजा, यांनी संभाळला होता.

६. लढाईस तोंड लागण्यापूर्वी एक महिना चाललेल्या परस्परांच्या सैन्याच्या हालचाली :

महादजी शिंद्याच्या फौजांनी दि. २३ जून रोजी पुढे चालण्यास सुरवात केली. लगेच निर्णायक युद्ध करावे लागेल असे त्यांना वाटले असले तरी त्यासाठी प्रत्यक्षात एक महिना वाट पहावी लागली. हा उशीर होण्यास दोन्ही बाजूंचा हातभार होता.[२] अंबाजी इंगळे येईपर्यंत शिंदे थांबले होते. अंबाजी हा फार संथगतीने येत होता, सैन्यासह येण्यास त्याला वेळ लागणे अपरिहार्य होते. शिवाय जयपूरराजाच्या साहाय्याला आलेल्या मदतनीसांची आवळयाभोपळयाची मोट लवकरच घरंगळेल अशी आशा उरी बाळगून शिंदे कालहरणाचा डाव खेळत होते. शिंद्याला वाटले, मारे मदत करण्यासाठी आलेले हे खेडवळ राजपूत भाई किती काळ एकत्र नांदणार ? जयपूरला जमलेल्या या विविध प्रकृतींच्या जातभाईंना खूप दिवस उगाचच बसवून ठेवले तर ते आपापसात भांडतील, तंडतील व आपापल्या गावी निघून जातील. पैसा दिसला तरच लढायला उभे रहाणारे हिंदुस्थानी व मुगलिया शिपाई राजपुतांना जाऊन मिळाले असले तरी कछवा राजाजवळचा पैसा तुटपुंजा असल्याने पगार देता आला नाही म्हणजे तेही निघून जातील. त्यासाठी महादजीने राणाखानला आगेकूच करायला सांगितले ते अगदी सावधानतेने. राणाखानाने आपला तोफखाना व शिस्तबद्ध बंदुकधारी सैन्य पुढे पाठवायचे व हल्ला झाल्याशिवाय आपण होऊन कुरापत काढायची नाही असे ठरले होते. त्यामुळे राणाखानाचे सैनिक रात्र पडली म्हणजे आपल्या खंदकात परत यायचे. दिवसा, महादजी राणाखानाने नुकत्याच सोडलेल्या जागेवर जायचा व एखाद्या टेकाडावर बसून हातात दुर्बीण घेऊन आसपासचा प्रदेश न्याहाळायचा.

जयपूरराजाच्या साहाय्यार्थ आलेल्या जातभाईंना दोन हात करायची विलक्षण खुमखुमी यायची; त्यांना गप्प करून जयपूर नरेश त्यांच्या उत्साहावर पाणी टाकीत असे. तोही, बिकानेर, बुंदी, खिचीवाडा व अन्य ठाण्यांहून येणाऱ्या राजपुतांच्या मदतीची वाट पहात होता. तो विशेष प्रतीक्षा करीत होता ती बंदुकधारी सिंदी पलटणीची. फ्रेंच सेनाधिकाऱ्यांकडून प्रशिक्षण घेतलेल्या महादजीच्या बंदुकधारी पलटणीशी तोंड द्यायला; समशेर आणि भाला घेऊन लढणाऱ्या राजपुतांपेक्षा, हे बंदुकधारी सिंदी जास्त लायक, असा समज होता.

मराठा सैन्याची उपासमार व्हावी अशा योजनाही जयपूर राजाने प्रत्यक्षात आणल्या होत्या. त्याच्या राज्यातील 'मीना'—वंशपरंपरागत चोरीचा धंदा करणारे टोळीवाले मराठा छावणीवर लूटमार करीत. ही लूटमार ते अत्यंत पद्धतशीर व अचूक करीत.

शिंद्याच्या उत्कृष्ट अशा तोफखान्यामुळे व प्रशिक्षित बंदुकधारी पलटणींमुळे राजपुतांचा थरकाप उडे. प्रत्यक्षात युद्ध खेळायला त्यांना भीती वाटे. महादजीला दिलासा होता तो एकच, तो म्हणजे जयपूरचा राजा सुमार अकलेचा असून, धाडस किंवा रानटी पशूचा आडदांडपणाही त्याच्याजवळ नव्हता. शिंद्याशी ज्याचे वैर होते असा एक इंग्रज निरीक्षक लिहितो, "जयनगरचा राजा उत्साह आणि धाडशीवृत्ती या दोहोंतही कच्चा असावा असे वाटते.[१] हा तरुण माणूस नेहमी सुखोपभोगात गढलेला, परिस्थितीचे आकलनात कच्चा आणि कसलेच धाडस नसलेला असा आहे. त्याच्या मदतीसाठी त्याच्या जातभाईंना एकत्रित आणणारे स्नेहरज्जूही तितके बळकट नाहीत. याचे कारण या जातभाईत परस्परांबद्दल मत्सर, अविश्वास व काही प्रमाणांत हितसंबंधातील अंतर्विरोध ही दिसून येतात." [**पीआरसी** : खंड १; क्रमांक : ११७, ११८] प्रत्येक गोष्ट उद्यावर ढकलून निर्णय घेण्यात टाळाटाळ करायची हे जयपूर राजाचे एक धोरण होते. अंतिम लढाईस सुरवात होण्यापूर्वी दररोज ज्या लहानसहान चकमकी उडत होत्या त्यांत जोधपूरचे राठोड व हमदानीच्या तुकडीतील शिपाई भाग घेत असत. त्या मुगल सेनापतीने जयपूर राजाला एकदा चिडून सांगितले होते, "प्रत्येक गोष्टीची जबाबदारी आमच्यावर टाकायची हेच जर आपल्या जातभाईंचे शौर्य असेल तर मेहेरबानी करून त्यांनी बाजूला व्हावे व आपण ही सर्व जबाबदारी माझ्यावर टाकावी, म्हणजे मग काय करायचे ते मी पहातो. आज [१३ जुलै] राजपूत जरा नेटाने दोन हात करते तर लढाईचा सोक्षमोक्ष आजच लागला असता." त्यावर राजेसाहेब उद्‌गारले, "चकमकी उडवून लढाईतले निर्णय ठरत नसतात. हातघाईची लढाई होईल त्या दिवशी राजपुतांचा पराक्रम म्हणजे काय हे तुला पहायला मिळेल." [अखबरात्]

दि. १० जुलैला राणाखान आणखी पुढे, म्हणजे मोरेल नदीच्या दिशेने शत्रूच्या छावणीपासून तीन मैलांवर आला व त्याने सोडलेल्या जागेवर महादजीने तळ दिला. मुख्य छावणीपासून दूर असणाऱ्या परस्परांच्या लष्करी ठाण्यात वाढते संबंध येऊ लागल्याने बहुतेक दररोज चकमकी उडू लागल्या; अर्थात या चकमकीतून निश्चित असे काहीच निकाल लागत नसत. कॅप्टन कर्क पॅट्रिक कळवतो, "दोन्ही शत्रुसैन्ये जरी बरीचशी समोरासमोर असली तरी हालचाल करण्याचे त्यांचे धोरण आहे तसेच कायम आहे. शत्रूकडील भटकी गुरेढोरे नजर चुकवून पळवून नेणे, छोट्या छोट्या रसदी तोडणे; उगाच रक्तपात होऊ नये अशी सावधानता राखीत परस्परांसमोर आपल्या सैन्याच्या हालचालींचे प्रदर्शन करणे, असाच एकंदर प्रकार आहे." [**पीआरसी** : खंड १; पान २०४]

दोन्ही बाजूंकडील गस्त घालणाऱ्या पथकांत दि. १३ आणि २७ जुलै रोजी जी चकमक उडाली ती फारच भीषण स्वरूपाची होती. प्रत्येक दिवशीच्या चकमकीत एकेक

मराठा सरदार कामी आला. राजपुतांची तर अतोनात हानी झाली. दि. १५ पासून चार दिवस मराठा छावणीत अगदी सामसूम होते. महादजीची छोटी मुलगी जलोदराने आजारी झाली. दि. १६ ला रात्री ती देवाघरी गेली. लाडक्या कन्येच्या मृत्यूने महादजी खचून गेला; त्याने राणाखानला कसेबसे सांगितले, " या पुढील दोन तीन दिवस तूच काय तो निर्णय घेऊन त्यानुसार वाग, कृपाकरून मला विचारू नकोस; कोणत्याच प्रश्नाला उत्तर देण्यासारखी माझी मनःस्थिती नाही." [अखबरात : **डीवाय** : भाग १; लेखांक २४०]

७. घनघोर लढाईचा निश्चय : मराठे मोरेल नदी पार करतात

कन्येच्या निधनाचा शोकावेग कमी झाल्यावर दि. १९ च्या रात्री महादजीला जयपूर राजाकडून एक आव्हानात्मक खलिता आला : " आपण साम्राज्याचे मुखत्यार, युद्धाचे बाळकडू प्यालेले; आपली हिंमत असेल तर तोफांच्या संरक्षणातून उघड्या मैदानात या; व राजपुतांशी घनघोर युद्ध करा. ईश्वर कुणास जय देतो ते पाहूया ! " [**अकबरात् ; पीआरसी :** खंड १ पान २०७] शिंद्याने आपल्या सर्व प्रमुख सेनाधिकाऱ्यांची एक बैठक घेतली नि त्यांना सांगितले, " या उप्परही अजिबात एखादा सामना न करता मी जयपूरराजाशी जर सलोख्याची भाषा बोलत राहिलो तर हिंदुस्थानात तोंड दाखवायला मला जागा रहाणार नाही. माणूस काही अमरपट्टा बरोबर घेऊन येत नाही. जे व्हायचे असेल ते होईल. " त्यावर सर्व सेनाधिकाऱ्यांनी सांगितले की, "पगाराची थकबाकी हातात पडेपर्यंत आमचे शिपाई लढायला उभे रहाणार नाहीत. आम्ही आमची खासगी जायदाद व मालमत्ता विकून आजपर्यंत आमच्या शिपायांचा चरितार्थ चालविला." महादजीने वीस हजार रुपये पुढे केले, पण अगदीच किरकोळ रक्कम म्हणून ती नाकारण्यात आली.[४]

घनघोर लढाईसाठी दोन्ही बाजूंनी दि. २१ निश्चित करण्यात आला होता. तो दिवस उगवला पण राजपुतांचे कासव अंग हलवायला तयार नव्हते; त्याच्या ज्योतिषांनी तो दिवस शुभ नसल्याचे त्याला सांगितले होते. पण राणाखानाने आपण होऊन बिडाखाच्या रोखाने चालून जायला सुरवात केली. वाटेत मोरेल नदीचा अडथळा होता, त्यामुळे त्याला जयपूरराजाच्या छावणीकडे जाता येईना, पण अंबाजी इंगळे याच्या हाताखालील तुकड्या ती नदी पार करून पलीकडे गेल्या व शत्रूच्या छावणी पलीकडे दोन मैलांवर असणाऱ्या एका खेड्यावर त्यांनी हल्ला केला. त्यानंतर राणाखान आपल्या सर्व सैन्यासह येऊन दाखल झाला (२३ जुलै). तेव्हा बिडाखा किल्ल्याच्या शिबंदीने आपण होऊन माघार घेतली व किल्ला सन्मानाने ताब्यात द्यायचे कबूल केले. परंतु शिबंदी किल्ल्यातून बाहेर येत असताना पागेतील एका शिपायाने एका राजपुताच्या पत्नीवर हात टाकला, राजपुतांनी हात टाकणाराला कंठस्नान घातले आणि तेवढे निमित्त होऊन दोन्ही बाजूंनी लढाईला सुरवात केली; एकूण ३० ते ४० जण ठार झाले, शिबंदी पुन्हा किल्ल्यात गेली आणि तिने पुन्हा लढायला सुरवात केली. शेवटी रामसेवकाने (रावराजाचा माणूस) त्यांच्याशी समजुतीच्या गोष्टी करून आपल्या देखरेखीखाली गढीसारखा तो छोटासा किल्ला रिकामा करून दिला. " जयपूरच्या मुख्य सैन्याने

बिडाखा येथील सैन्याला मदत करीत असल्याचा नुसता देखावा केला व ते आपल्या ठाण्यावर परतले. दुसऱ्या दिवशी दोन्ही बाजूला चिडीचीप होते, कारण पाऊस सुरू झाला होता; तरीही नदीवरून विना अडथळा पलीकडे जाता यावे म्हणून, अडथळ्यासारखी असणारी बिडाखची ती गढी, राणाखानाने जमीनदोस्त केली.

त्यानंतर मराठा छावणीतील शिपायांना जगणे मुष्किल झाले. त्यांच्या छावणीत येणारी रसद, शत्रू तेथपर्यंत जाऊच देत नव्हते. थकलेला पगार महादजी न देऊ शकल्याने सैन्यातील सर्व विभागाच्या शिपायांकडून बंडाळीची भाषा ऐकू येऊ लागली. पोट खपाटीस गेलेले घोडे पाठीवरील स्वारालाही नेऊ शकत नव्हते. महादजीचे सर्व सेनाधिकारी विचार-विनिमयासाठी एकत्र जमले आणि एका सुरात गरजले, " छावणीतील दुष्काळात उपासमार होऊन मरण्यापेक्षा लढून मेलेले काय वाईट ! " एकदम काय तो सोक्षमोक्ष करायचा यासाठी महादजीने आपले सर्वस्व पणाला लावायचे ठरवले व आपल्या शिपायांना पगार-पोटी पाच लाख रुपये वाटण्याचा हुकूम केला. (२५ जुलै) लढताना त्यांना जरा उमेद यावी हा त्यातला हेतू. जयपूर राजाकडून दि. २६ ला आणखी एक आव्हानात्मक खलिता आला, " खंडणीच्या रकमेऐवजी आपण जर माझे राज्यच हिरावून घेणार असाल तर मग लढायला उशीर का करता ? उद्या या मोकळ्या मैदानात. मी दोन हात करायला तयार आहे. " मराठा छावणीतील सर्व शिपायांस, ' आपल्या धन्याने शत्रूचे आव्हान स्वीकारले असून त्याची रग जिरवायची ठरवले आहे ' असे कळविण्यात आले. [इब्रत भाग ३; २१]

मध्यरात्रीला बराचवेळ स्तोत्रपठन, होमहवन व पूजापाठ झाल्यावर महादजीने दोन तासच अंग आडवे केले. पहाटे चार वाजता तो उठला, त्या दिवशी काय काय करायचे याबाबतचे हुकूम त्याने हाताखालील सर्व सेनाधिकाऱ्यांना दिले; पवित्र प्रसाद ग्रहण केला व पंचपंच उषःकाली आपल्या ' देशपूज्य ' नामक अश्वावर स्वार होऊन राणाखानाच्या छावणीकडे जाण्यासाठी तो आपल्या छावणीतून बाहेर पडला. राणाखानाची छावणी महादजीच्या छावणीपासून दोन मैलांवर होती. लवकरच सुरू होणार असलेल्या लढाईतील हालचालीबाबतचे अधिकार राणाखानभाईकडे देण्यात आले होते. त्याच्याशी सतत संपर्क साधता येणे सोपे व्हावे म्हणून महादजीने उंटाच्या पाठीवरून जलद जा ये करणाऱ्या सांडणीस्वारांची योजना केली होती. आपल्या सैन्याच्या सर्व तुकड्यांसह राणाखान महादजीच्या मुक्कामापासून दोन मैल पुढे जात असे व सैन्यातील आपले सुटसुटीत पायदळ आणखी एक मैल पुढे पाठवित असे. जितके अंतर तोडून हे सैन्य पुढे जात असे तितकेच अंतर तोडून शिंदेही त्याच्या मागोमाग जात असे व वाटेत येणाऱ्या टेकड्यांवर चढून आपल्या सैन्याचे निरीक्षण करीत असे आणि नव्यानव्या सूचनांसह आपले सांडणीस्वार तिकडे पाठवीत असे. या पद्धतशीर योजनेमुळे शत्रूला आकस्मिकपणे हल्ले करणे अशक्य झाले आणि खुद्द त्याच्या सैन्यातही अव्यवस्था माजण्याचा संभव उरला नाही. शेवटी दीर्घकाळ लांबलेला निर्णय प्रत्यक्षात आणण्यासाठी मराठ्यांचा हा सेनानी पुढे चालू लागला.

८. तुंगा येथील लढाई[५]

मोरेल नदीला उतार होता. त्या ठिकाणचे नदीचे पात्र कोरडे ठणठणीत असल्याने बिडाखा येथे राणाखानाने सैन्यासह नदी पार केली; दोन्ही बाजूंनी असलेल्या जवळजवळ मैलभर लांबीच्या घळ्या पार करून आणखी एक मैल गेल्यावर तो एका मोकळ्या मैदानात आला. राजपुतांची सैन्यरचना कशी आहे, त्यांच्या हालचाली कशा होणार ही माहिती काढून आणण्यासाठी त्याचे जासूद प्रथम थोड्या फार अंतरा-अंतराने पुढे आले होते. मग तोफखाना आणि पायदळाच्या तुकड्या होत्या. शत्रू चालून येताच त्याला प्रथम अंगावर घ्यायचे काम या तुकड्यांना करायचे होते. त्या पाठीमागे तिसऱ्या क्रमाने आले ते मराठा स्वार. हे स्वार राखीव म्हणून ठेवण्यात येणार होते. आघाडीवर कुठे अडचण भासून कुमक हवीशी वाटली तर ती पुरवायची जबाबदारी या राखीव स्वारांवर होती. या स्वारांसमवेत राणाखान स्वतः होता. या शिवाय आणखी राखीव सैन्याची तरतूद होती. या सैन्यात तोफा व दारूगोळा पुरेसा असून खुद्द महादजी त्यांच्यावर देखरेख करीत होता. हे सैन्य लढाईच्या पिछाडीस दोन मैल मागे, मोरेल नदीच्या दुसऱ्या म्हणजे पूर्वेकडील काठावर होते. मराठ्यांचा तोफखाना रणमैदानात आल्याबरोबर त्याने नदीकाठच्या रेताड वाळवंटात खड्डे खणले; जवळ जवळ मैलभर लांबीच्या या खंदकांनी त्यांच्या आघाडीला सुरक्षितता प्राप्त झाली. शिंद्याचे सैन्य पश्चिमेकडून पूर्वेकडे पसरले होते; त्यांच्या आघाडीला सुरवातीस द बॉन्य व दोन पलटणीसह खंडेराव हरी; मूर्तजाखान बरेख, गाझी खान व अन्य सेनाधिकाऱ्यांच्या हाताखालील भाडोत्री अफघाण शिपाई व मोती गीर गोसावीच्या नागा फलटणी (डावीकडे); त्यानंतर विश्वासघातकी व केवळ वेठबिगार म्हणून लढणारे नजफखानच्या सैन्यातील शिपाई (मधोमध), शेवटी दोन सैन्य तुकड्या; प्रत्येक तुकडीत सहा सुसज्ज पलटणी. या पलटणींवर विश्वासपात्र अशा लेस्तेनो व ला वाझो यांच्या तुकड्या, शिवाय त्याच्याबरोबर माचेडी राजाच्या राजपूत पलटणीही होत्या (उजवीकडे).

मोरेल नदी पार करून मराठा सैन्य आपल्याच रोखाने येत आहे असे दिसताच जयपूर राजाकडील सैन्यानेही त्याच वेळी पुढे सरकायला सुरवात केली. आपल्या तोफखान्यासमोर त्यांनीही खंदक खणले. त्यांच्याबाजूने बक्षी भीमसिंगाच्या हाताखालील जोधपूरचे राठोड घोडदळ शत्रूचा दणका स्वीकारण्यासाठी सिद्ध होते. या शूर स्वारांनी जयपूर राजासमोर अशी प्रतिज्ञा केली होती की विजयश्री मिळाल्याशिवाय आम्ही जिवंत परतणार नाही. या शिवाय महादजीकडून पळून आलेल्या मुघलिया स्वारांसह मुहमदबेग हमदानी व भीमसिंग हे दोघे श्रेष्ठ सेनानी राजपूत सैन्याची अनुक्रमे उजवी व डावी फळी सांभाळीत होते. महादजीच्या सैन्य रचनेत मध्यभागी जसे हिंदुस्थानी शिपाई होते अगदी तसेच राजपुतांच्या सैन्यरचनेत मध्यभागी कछवा सैनिक असून ते असेच कातडी बचावासाठी मागे मागे रहात होते.

प्रथम दोन्ही बाजूच्या संरक्षक पथकामध्ये लहान लहान चकमकी उडाल्या. त्यानंतर सकाळी नऊ वाजता युद्धाला तोंड लागले. दोन्ही बाजूंनी तोफगोळे धडाडू लागले.

मराठ्यांच्या तोफांची नुकसानी जास्त झाली. त्यांच्या तोफा खूप लांबून व नदीच्या खडकाळ पात्रातून ओढून आणलेल्या; वजनात राजपुतांच्या तोफांपेक्षा हलक्या होत्या. राजपुतांचा तळ युद्धभूमीपासून जवळच पाठीमागे होता. “राजपुतांकडील तोफा लांब पल्ल्याच्या असल्याने त्यांतून उडविलेले गोळे शिंद्याच्या बाजूला लांब अंतरावर जाऊन पडत; अनेक शिपाई व घोडे ठार होत. शिंद्याकडील लहान तोफांतून उडवलेले गोळे शत्रूपर्यंत पोहोचेनात... जयपूरकडील तोफगोळे पाच पासून चौदा शेर वजनाचे होते.” हे समजल्यावर, महादजीने राणाखानाकडे पाठविण्यासाठी मोठ्या आकाराच्या चार तोफा मागविल्या.

अकरा वाजण्याच्या थोड्या आधी दूरवरून आग ओकणाऱ्या तोफा, आपापसात संगनमत केल्यासारख्या गप झाल्या. त्यानंतर शत्रुसैन्याच्या उजव्या अंगाकडून एक गगनभेदी गर्जना ऐकू आली व धुराचा जो प्रचंड लोट उठला, त्या पाठोपाठ चार हजार राठोड स्वार झेपावत पुढे आले. प्राणावर उदक सोडलेल्या या वीरांनी आफीममिश्रित चिलमीच्या नळ्या तोंडात धरून सणसणीत दम मारले; आणि सर्व नसा तटातट स्फुरण पावू लागल्याबरोबर त्यांनी आपल्या समशेरी उपसल्या आणि ‘हाणा, हाणा, ठार मारा, ठार मारा’ अशा आरोळ्या ठोकीत ते मराठा सैन्याच्या डाव्या बगलेवर तुटून पडले. शत्रूच्या स्वारांच्या गर्दीतून मराठ्यांचा तोफखाना पुढे घुसण्याचा प्रयत्न करीत होता, प्रत्येक सरबत्ती पाठोपाठ रक्ताचे पाट वहात होते, पण पडलेल्या सहकाऱ्यासाठी आसवे गाळीत न बसता वाचलेले रजपूत स्वार पुढे तोफखान्याच्या रोखाने दौडत होते, तोपचींना समशेरीने कापून काढीत होते व आणखी पुढे घुसून मराठ्यांच्या साहाय्यक सैन्यावर तुटून पडत होते. त्यांच्या घणाघाती हल्ल्याने मराठा सेनेच्या डाव्या बगलेकडील आघाडीची पहिली ओळ फार विस्कळित झाली; नागा व अफघाण तुकड्यातील शेकडोजण ठार झाले. “द बॉन्यच्या शिपायांनाही तोफांमधून थोडाफार वर्षाव केल्यावर गोंधळल्यासारखे झाले व त्यांना आपल्या मराठा सहकाऱ्यांसमवेत माघार घेण्याशिवाय गत्यंतर राहिले नाही. पण धीम्यावृत्तीच्या मराठा सेनानीने आपल्या गोंधळलेल्या तुकड्यांना मागे घेतले. जे ठाकठीक होते त्यांना पुन्हा उभे केले व आपल्या छोट्या बंदुकातून गोळीबार करायला सुरवात केली; पण राठोड स्वारांनी त्याला जराही धूप घातला नाही.”

राणाखानाने शिवाजी विठ्ठल (बापू) च्या हाताखाली आणखी स्वार रवाना करून तातडीने कुमक पोहोचविण्याची खबरदारी घेतली. पळापळ सुरू झालेल्या सैनिकांना रायाजी पाटील व खंडेराव हरी (अप्पा) यांनी एकत्र आणले व धीर देऊन त्यांना पुन्हा लढायला प्रवृत्त केले. अत्यंत हेकट व रक्तलांछित अशा त्या दिवशीच्या त्या संग्रामाचा त्याक्षणी कहर झाला. एकवेळ तर अशी आली की मूर्तझाखान बरेखचे मुलगे खाली उतरले व पाय उतारा होऊन लढू लागले. मती कुंठित झाली म्हणजे अशाप्रकारे लढायचे ही भारतीयांची पद्धतच होती. त्या वेळेपर्यंत राठोडाचे सर्व स्वार युद्धभूमीवर येऊन गेल्याने त्यांच्या मागून त्यांच्या साहाय्यासाठी कुणीही पुढे झाले नाही, त्यामुळे प्राणार्पणाने त्यांनी जे मिळविले त्याचा फायदा घेता आला नाही. नंतर मराठ्यांच्या राखीव सामग्रीतून आणखी तोफा

आणण्यात आल्यावर राठोड स्वार मागे हटले. तरी तशी माघार घेताघेताही त्यांनी मराठ्यांकडील तीनशेजणांना ठार केले; त्यांत गाझीखान (मूर्तझाखानचा भाऊ), शंभूजी पाटील व एक जमादार हे प्रमुख होते. शिवाय मल्हारराव पवार, चिमणाजी खंडेराव (शिवाजी विठ्ठलाचा दिवाण), शिवाजी विठ्ठलाचा पुतण्या व एक जमादार हे जखमी झाले. याकरिताही राजपुतांना फार जबर मोल मोजावे लागले. त्यांचे हजाराहून अधिक सैनिक ठार झाले, त्यांत सोमाराम भंडारी व भीमसिंग बक्षीचा मेहुणा हे प्रमुख होते. त्याशिवाय कनिष्ठ दर्जाचे वीस सेनाधिकारी मरण पावले. [**डीवाय**: भाग १, लेखांक २२४; **एमडी.** भाग २, लेखांक १४७; **पीआरसी** : खंड १, क्रमांक १३५,१३७; **एचपी** : क्रमांक ५०३; अखबरात]

या लढाईत राजपुतांची न भरून येण्यासारखी झालेली हानी म्हणजे मुहमद बेग हमदानीचा मृत्यू. या हानीमुळे त्यांच्या आक्रमक यंत्रणेचा कणाच मोडून पडला. हा सेनानी युद्धशास्त्रातला एक तज्ज्ञ व लढवय्या मुसलमान सेनाधिकारी म्हणून नावाजलेला होता. त्या काळीतरी उत्तर हिंदमध्ये त्याच्या तोडीचे हाताच्या बोटावर मोजण्या इतकेच होते. आपल्या शिपायांना त्याने मराठा सैन्याच्या उजव्या फळीवर हल्ला करावयास पाठवले होते व आपण स्वतः जरा मागे होऊन हत्तीवर स्वार होऊन एका वृक्षाच्या सावली खाली राहून त्यांच्या हालचाली पाहत होता. एक तोफगोळा वृक्षाच्या डोक्यावर आदळला व परत खाली येऊन त्याच्या अंगावर पडला; त्याचा परिणाम एवढा जबरदस्त होता की तो दाणकन खाली आपटला गेला, त्याच्या शरीराची एक बाजू फाटून निघाली, त्यानंतर त्यातच भर म्हणून तोफगोळ्याने मोडलेली वृक्षाची अजस्र खांदी खाली पडून त्या खाली तो चिरडला गेला. आपल्या अधिकाऱ्याचे काय झाले आहे याची गंधवार्ताही त्याच्या शिपायांना नव्हती. मराठ्यांची उजवी फळी फोडून ते तसेच आत घुसू पाहत होते. राणाखानाच्या प्रसंगावधानाने राखीव सेनेतून आलेल्या दख्खनी स्वारांनी त्यांना मागे पिटाळले.

मराठ्यांच्या तोफखान्यावर पुन्हा तुटून पडण्यासाठी त्यादिवशी उरलेल्या वेळात राठोड स्वारांनी पुढे चालून जाण्याचा तीनचार वेळा प्रयत्न केला, पण आपला बेत तडीस नेण्याचा मोका त्यांना मिळाला नाही. मुगलिया सैन्याचा नेताच नाहीसा झाल्याने त्यांनीही काही हालचाल केली नाही. शत्रूचे दोन हल्ले परतवून लावल्यावर शिंद्याचे सैन्यही संरक्षणाचे पवित्र्यात उभे होते; त्यांच्या मनातली पाल एकसारखी चुकचुकत होती. त्यांना सतत धास्ती वाटत होती की राजपुतांकडील राठोडांनी निकराचा हल्ला करताच विश्वासघातकी हिंदुस्थानी शिपाई शत्रूला मिळतील व आपल्याच तोफा आपल्यावर डागतील. पण अशी दगलबाजी करण्याची संधीच त्यांना मिळाली नाही. रायाजी पाटील व इतरांनी जो संरक्षक पवित्रा घेतला होता त्यामुळेच हे घडू शकले [**एचपी** : क्रमांक : ५०३].

खरे म्हणजे सुरवातीस तासभर घनघोर लढाई झाली. त्यानंतर राजपुतांच्या हालचालीत शैथिल्य आले. त्यांच्यातला जोम ओसरत चालला. मराठा सैनिक आपल्या जागी ठामपणे उभे होते, त्यांना धास्ती वाटेनाशी झाली. जखमी सैनिकांना पालखी सारख्या

वाहनात बसवून जवळच असणाऱ्या तंबूत शुश्रूषेसाठी पाठविण्यात थोडासुद्धा वेळ वाया घालविण्यात येत नव्हता. महादजीने सतत जागरूक राहून जखमी जवानांकडे लक्ष पुरविले, त्यांना आणण्यासाठी पालख्या पाठविण्याची व्यवस्था केली, दारुगोळा त्वरित व भरपूर पाठविला जातो की नाही यावरही लक्ष ठेवले. पण मराठ्यांनीही त्यानंतर म्हणावी तशी प्रगती केली नाही. हमदानी ठार झाला, हे त्यांना अंधार पडेपर्यंत समजले नव्हते; दुसरे म्हणजे दुपारपासून पाऊस कोसळायला सुरवात झाल्याने त्या ओल्या रेतीत तोफा हलवणे जड जाऊ लागले, तसेच समोर घळी दिसत होत्या त्याही अडचणीच्या; त्यातच अंधाराची पावले झपाट्याने पडू लागली होती आणि जवळपास विहिरीही नव्हत्या; म्हणून दोन्ही बाजूंकडील सैन्य आपापल्या छावण्यात परतले. सूर्यास्तानंतर जवळ जवळ तासभर दोन्ही छावण्यामधून तोफा धडाडत होत्या; अंधाराचा फायदा घेऊन शत्रूने एकदम हल्ला करू नये हाच त्यातला उद्देश होता. अशा प्रकारे ही तुंगाची लढाई– लालसोटची लढाई असे चुकीने म्हटले जाते– संहाराच्या दृष्टीने महत्त्वाची असली तरी त्यातून निर्णायक असे काहीच घडले नाही. [**द बॉन्य, करिएर** पृ. ६८]

९. लालसोट मोहिमेवरील भाष्य

तुंगाच्या लढाईतील विजय 'हा राजपूतांचा संपूर्ण विजय' असे सर्वसामान्यपणे सगळीकडे समजण्यात येते. लष्करी डावपेचांच्या दृष्टीने पाहिले तर त्यांचा हा दावा खरा नाही. राजपुतांनी मराठा सैन्यावर लागोपाठ हल्ले चढवले खरे, तरी मराठ्यांना ते स्थानभ्रष्ट करू शकले नाहीत. राजपुतांचे सगळे हल्ले परतवून लावण्यात आले, दिवस मावळताना तत्कालीन पद्धतीनुसार दोन्ही बाजूकडील सैन्य आपापल्या शिबिरात परतले. नंतरच्या दुसऱ्या दिवशी मराठा सैन्य पुन्हा त्याच रणक्षेत्रावर आले होते, इतकेच नव्हे तर जयपूर छावणीतून टाकलेला तोफगोळा पडेल इतक्या जवळच्या अंतरापर्यंत चालून गेले होते. पण राजपुतांकडील कुणीही छावणीबाहेर फिरकायचे धाडस केले नव्हते. हे काही विजय मिळाल्याचे लक्षण नव्हते. मराठ्यांची एकसुद्धा तोफ राजपुतांनी हस्तगत केली नाही; तशी शेखीही त्यांना मिरवता येत नव्हती. शिवाय मराठ्यांपेक्षा त्यांची हानी कितीतरी जास्त होती.

पण हा महादजीचा विजय होता असेही नाही. रणांगणावर शत्रूला चेपून टाकणे किंवा छावणीबाहेर काढून त्याचा निकाल लावणे यांपैकी त्याला काहीच जमले नव्हते. शत्रुपक्षाची एकही तोफ त्याने काबीज केली नव्हती; म्हणून त्याने केलेली चढाई अपेशी ठरली होती असेच म्हणावे लागेल. लढाईनंतर त्याला अवघ्या चार दिवसांनी माघार घ्यावी लागली; घाईगर्दीने घेतलेली ही माघार तशी शिस्तबद्ध असली तरी ती शत्रूच्या भीतीपोटी वा दडपणाने नव्हती तर त्याच्या सैन्यातील बेदिली, अविश्वासाचे वातावरण व दाणागोट्याचा अपुरा पुरवठा यांमुळे होती. महादजी माघार घेत होता तेव्हा एकाही राजपूत सेनाधिकाऱ्याने त्याचा मार्ग रोखला नाही किंवा त्याच्या सैन्याच्या पिछाडीशी लढून दोन हात करण्याचे धैर्य दाखविले नाही. मराठ्यांकडील अखबरनवीस व खुद्द पाटीलबावा मात्र आपण रणमैदान

जिंकल्याचा डिंडिम वाजवीत होते. एका अर्थी ते खरे असले तरी बादशहाच्या बाजूच्या इतिहास लेखकांना नाइलाजाने म्हणावेच लागले, 'शेरिफमूरप्रमाणे इथेही कुणीच जय मिळविला नाही.'

लष्करी डावपेचाच्या दृष्टीने विचार केला तरीही महादजीच्या हिशेबी 'लालसोट मोहीम' फसली असेच नमूद करावयास हवे. त्याच्या अपयशाची कारणमीमांसा करायची तर, 'एकच एक लक्ष्य अत्यंत धिमी पाउले टाकून गाठायचे' असे त्याने ठरवले नाही. मिळू शकणारा प्रत्येक शिपाई आपल्या सैन्यात भरती करायचा हे धोरणही चुकीचे ठरले. त्यामुळे करोलीशी सतत संपर्क न ठेवता येणे हे त्याला घातक ठरले. तसेच अत्यावश्यक असा दाणागोट्याचा पुरवठा करणारांच्या संरक्षणासाठी तो पुरेसे सैनिक उपलब्ध करू शकला नाही. राजपुतान्याबाहेर त्याची शब्दशः उपासमार झाली. या अपयशाबद्दल तो एकटाच सर्वथैव दोषी ठरतो. आपल्याला काळ अनुकूल आहे व एकत्रित आलेले राजपूत, थोडाफार वेळ घालवला तर भांडूनतंडून आपोआप दूर जातील या अपेक्षित कल्पनेने त्याने ही मोहीम हाती घेतली खरी पण हा कालहरणाचा डाव यशस्वी व्हायचा तर त्या मुदतीत छावणीत विना अडथळा दाणागोटा येणे व आग्र्यानजीकच्या आपल्या ठाण्याशी पत्रव्यवहार व संपर्क कायम रहाणे आवश्यक होते. आपल्यासमोर दोन हात करायला येणाऱ्या त्या बेतासबात ताकदीच्या सरंजामदारांशी मुकाबला करण्यात आपण यशस्वी होऊ यात त्याला कसलीही शंका नव्हती. पण आपल्या अवाढव्य सैन्याच्या पगाराची प्रचंड रक्कम उभी करणे व त्या मागास भागातील युद्धक्षेत्रात दारूगोळ्याचा पुरेसा पुरवठा सतत ठेवणे या दोन्ही गोष्टी कठिण होत्या. या बाबतीतले त्याचे अंदाज साफ चुकले; त्यामुळे त्याची सत्ता व त्याचा दरारा यावर एक वर्षभर सावट आल्यासारखे झाले. हेच या चुकीचे जबरदस्त प्रायश्चित्त. खरोखरी मे, १७८७ पासून, परिस्थितीचे स्पष्ट आकलन, अचूक वास्तव दृष्टिकोन व व्यवहारचातुर्य हे त्याचे गुण त्याला सोडून गेले असावेत. अन्यथा त्याच्यासारखा मुरब्बी सेनानी व राजकारणपटू 'नव्या युगातील सैन्ये पोटावर चालतात' हे कसे विसरला असता ?

१०. शिंद्याच्या सैन्यातील हिंदुस्थानी शिपायात बंडाळी : शिंद्याची अवघड परिस्थिती

लढाई लढली गेली त्या दिवशी महादजी सतत लक्ष ठेवून होता. थोडीसुद्धा विश्रांती न घेता तो सतत एकवीस तास परिश्रम करीत होता. दुसऱ्या दिवशी त्याच्या सैन्यातील सर्व पथके पूर्ववत् आपापल्या जागेवर आली. सगळीकडे सर्व ठाकठीक आहे असे त्याच्या सैन्यातील वरिष्ठ अधिकाऱ्यांनी त्याला कळविले नि मग विश्रांती घ्यावी म्हणून महादजीने भुईला पाठ लावली; तेव्हा दुपारचा एक वाजायला आला होता. दुपारचा प्रखर प्रकाशही त्याच्या विवंचना दूर करू शकत नव्हता. उलट बेचैनी वाढतच होती. त्या दिवशी लढाई झाली नाही. [२९ जुलै] तरीही राणाखानाच्या हाताखालील त्याच्या फौजा आदल्या दिवशी युद्ध झाले होते त्या ठिकाणापर्यंतच नव्हे, तर शत्रूच्या रोखाने त्याच्याही पुढे दोन

मैल चालून गेल्या. जवळ-जवळ जयपूरच्या छावणी लगत. पण राजपुतांना खंदकाबाहेर येऊन त्याच्या सैन्याशी दोन हात करण्याचा धीर झाला नाही. ते फक्त बचावाच्या पवित्र्यात उभे होते. त्या दिवशी सायंकाळी कछवा राजाकडून एक खलिता आला. त्यात मुहमद बेग हमदानी व अन्य धारातीर्थी पडलेल्या जवानांच्या और्ध्वदेहिकासाठी दोन दिवस हालचाली न करता तात्पुरत्या शस्त्रसंधीची मागणी करण्यात आली होती. 'आपण दि. ३१ ला पुन्हा दोन हात करण्यास तयार आहोत' असे लिहिले होते.

खुद्द महादजीच्या गोटात मात्र परिस्थिती हाताबाहेर गेलेली होती. तिचा ताण असह्य होता. तुंगाच्या लढाईत शिंद्याकडील सैनिक व घोडे यांची अपरिमित हानी झाली होती. हातात कित्येक दिवस पगार नाही, त्यात उपासमार अशा स्थितीत खवळलेल्या शिपायांवर वचक ठेवणे कठिण होते. तीन उंटांच्या पाठीवरील ओझ्याइतके रुपये त्याने पगारापोटी वाटले; काही मानचिन्हे दिली व तोंड गोड व्हावे म्हणून पंचवीस हजार रुपये मिठाईसाठी दिले. त्याचे सैन्यच एवढे प्रचंड होते की त्या मानाने वरील रकमेतून प्रत्येकाच्या वाट्याला येणारी रक्कम त्याला देणे म्हणजे त्याची थट्टा करणे होते. प्रत्येक शिपायाच्या वाट्याला आले काय, तर दोन दिवसांचा शिधा विकत घेण्याएवढे पैसे. वेतनाच्या बाकी पोटी त्यात काहीही नव्हते. सर्व सेनाधिकारी महादजीकडे आले व 'शिपायांना जर पगाराची थकबाकी दिली नाही तर त्यांची उमेद टिकवून धरणे कठिण आहे.' असे त्यांनी शिंद्याला सुनावले. शिंद्याजवळ जरूर तेवढा पैसा नव्हता आणि होता, तो घालवून बसण्याची त्याची तयारी नव्हती.

दि. ३० ला अटळ असा कहर गुदरला. त्या दिवशी मस्तकाची तिडिक उठविणारी एक दुर्वार्ता आली. करोलीहून दाणागोट्याचे भरपेट ओझे पाठीवर घेऊन सहाहजार बैल व सातशे उंट खुशालगढ मार्गे महादजीच्या छावणीकडे यायला निघाले होते. बरोबर, दक्षिणेकडील स्वार व पायदळ मिळून एक हजार शिपायांची संरक्षक तुकडी होती. पण या संरसंरक्षक पथकाने निष्काळजी राहून अंगचोरपणा केल्याने राजपुतांनी ही रसद मधेच मारली. राजपूत राजाचा एक दूधभाऊ होता. त्याने खुशालगडहून पूर्वेकडील रस्ता रोखून धरला तर राथंभोर येथून रोडाराम खवासने दक्षिणरस्त्याला चाप लावला, महादजीच्या छावणीत दाणागोटा येण्याचा रस्ताच पूर्णपणे बंद झाला. "एक रुपयाला दोन शेर पीठ व तीन शेर डाळही मिळेना." सर्वच तुकड्या, विशेषतः शिपायांच्या तुकड्यांनी पगारासाठी गहजब उठविला. मसिए लेस्तेनो महादजीकडे येऊन त्याला म्हणाला, "मुगल शिपायांच्या ज्या तुकड्या या आधीच जयपूरच्या बाजूला गेल्या आहेत त्या तुकड्यांतील शिपाई, 'तुमचा मागील पगार जयपूर खजिन्यातून मिळेल, तुम्ही इकडे या' असे सांगून माझ्या शिपायांना फूस लावीत आहेत. महादजीने प्रथम त्याच्या सांगण्याकडे लक्षच दिले नाही."
[इब्रत : भाग ३; २६]

लवकरच परिस्थिती महादजीच्या हाताबाहेर गेली. सर्व प्रशिक्षित शिपायांच्या पलटणींनी शस्त्रे हातात घेतली, आपल्या वरिष्ठ अधिकाऱ्यांना कैद केले आणि तोफखाना

सज्ज करून महादजीच्या शामियान्यावर चालून जाण्याची व वेतनाची थकबाकी दमदाटी देऊन वसूल करण्याची त्यांनी धमकी दिली. त्यांच्या मागण्या तावडतोब मंजूर कराव्यात असे राणाखानाने सुचविले, त्यावर पाटीलबावा म्हणाले, "जर मी आज तेलंग्यांचा पगार दिला तर हिंदुस्थानी शिपाई उद्या पगार मागतील. त्यांचा पगार केला तर मग त्याच्या दुसऱ्या दिवशी दख्खनी स्वारांनी का पगार मागू नये ? या सर्वांच्या पगाराला महिन्याचे सहा लाख[६] रुपये लागतात." जयपूर छावणीतून याहीपेक्षा धक्कादायक वार्ता आली. शेवटी शिंदे परिस्थितीला शरण गेला. त्याने दोन महिन्यांचा पगार देण्याची तयारी दाखविली. पण त्याला उशीर झाला होता. शिपाई व गोलंदाज यांनी सांगितले, "आमचा आठ महिन्यांचा पगार येणे आहे. छावणीत रुपयाला चार शेर आटा मिळतो; खायला न मिळाल्याने बंदूक पेलण्याची ताकदही आपल्यात राहिली नाही. आमच्या पगाराची सर्व बाकी मिळून पुढे दररोज चार आणे रोख मिळायला हवेत, तरच आम्ही राहू, नाहीतर जयपूरराजाच्या बाजूला जाऊ." दि. ३० चा सारा दिवस व दुसऱ्या दिवशी दोनप्रहरांपर्यंत महादजीच्या छावणीत हा गोंधळ अखंड सुरू होता. तो पूर्णपणे भांबावून गेला. 'शेवटी सौ. बायांवरील बस्ता ठेवून तुम्हास तीन रोजमेर यांचा ऐवज देऊ, वरकड हिशेब लढाईनंतर पुरा करू असे बोलला' पण महादजीने दिलेला धर्मपत्नीचा हवालाही त्यांनी मानला नाही. मग मध्यस्थांकडून तडजोडी केल्या, त्यांना शिपायांनी हाकलून लावले. महादजीने त्यांना बहुमोल जडजवाहिर देऊ केले पण 'ते काय खायच्येत, रोख पैसा टाका' म्हणून त्यांनी तेही नाकारले. तथापि गोलंदाज [रु. २९००] लेस्तेनोच्या पलटणी [रु. १०००] व मूर्तझाखानाचे मुलगे [रु. १०,०००] याप्रमाणे काही जणांनी मिळाला तेवढा पगार घेतला. [अखबरात ४७].

पण सात हजार शिपायांची एक तुकडी हट्टाने नकार देत राहिली. आपल्या १२५ तोफा व दारूगोळा भरलेल्या सर्व गाड्या मधोमध ठेवून सभोवताली चौकोनी रचना करून दि. ३१ रोजी दुपारी तीन वाजता त्यांनी शिंद्यांच्या छावणीबाहेर पाऊल टाकले व जयपूर छावणीच्या रोखाने जायला सुरवात केली. मोरेलनदीच्या तीरावर पोहोचल्यावर ते थांबले तेव्हा जयपूर राजाच्या छावणीतून इस्माइल बेग व मलिक मुहमदखान हे त्यांच्या स्वागतासाठी पुढे आले. त्यांनी तीसहजार रुपये रोख दिले व दोन दिवसांनी आणखी एक लाख देण्याचे आश्वासन दिले; आणि त्या सर्वांना नदीपार करून जयपूरराजाच्या शामियान्यापाशी नेण्यात आले. तुफकदार व गोलंदाज मिळून ७००० शिपाई महादजीला सोडून गेले; तरी त्यापेक्षाही जास्त संख्येने प्रशिक्षित हिंदुस्थानी त्याच्याच बाजूला राहिले, ते केवळ लेस्तेनो, ल वाझो आणि जाँ बाप्तिस्त द ला फॉन्तेन यांच्यासारख्यांच्या व्यक्तिगत दबावामुळेच. त्या दिवशी संध्याकाळी त्याचे सर्व सेनाधिकारी विचारविनिमयासाठी महादजीच्या शामियान्यात जमले असताना त्यांनी सांगितले, "फौजेत पलटणे व मोगली रांगडे हिंदुस्थानी आहेत. त्यांचा विश्वास नाही. तेव्हा अशा स्थितीत वाटेल ते करून लढाई टाळणेच श्रेयस्कर; अन्यथा शत्रूशी घनघोर चकमक चालू असताना आमच्याच सैन्यातील दोन तुकड्यांत

हाणामारी सुरू व्हावयाची व दुसरे पानिपत घडायचे." वाट पहायची आणि थांबायचे एक करणे महादजीला शक्य होते. [**एचपी** : पत्र : ५०३]

रात्र पडली आणि लगेच काही वेळाने छावणी सोडून जाणाऱ्या गटामधून तोफ प्रचंड आवाज निनादत उठला. शत्रूकडे गेलेले हे शिपाई, शत्रुसैनिकांसमवेत रात्री काळोखात आपणावर प्रचंड हल्ला चढवणार या भीतीने मराठा सैनिकांच्या छातीत धस भरली. त्यांना त्याच भाषेत उत्तर देण्यासाठी महादजी आपल्या शामियान्याबाहेर पडल आघाडीकडे चालू लागला. पण महादजीच्या हेरांनी 'जयपूरच्या राजाने या बंडखो भेट घेतली तेव्हा त्या राजाच्या सन्मानार्थ या तोफा उडविण्यात आल्या आहेत' अ खात्रीशीर बातमी आणली व प्रसंग टळला.

अशा अवस्थेत महादजी झाला तरी काय करणार? राजपूत सैन्य, मुगलिया सैन सुसज्ज तोफखाना आणि भरपूर दारूगोळा यांसह त्यांच्याकडे नुकतेच गेलेले आपले शि यांचा आपल्यावर दुसऱ्या दिवशी जबरदस्त हल्ला होणार अशी महादजीची सरळच कळ होती. अशा परिस्थितीत अपुऱ्या व अविश्वासू सैन्याच्या भरवशावर कसे लढाय तेव्हा प्रतिकार करण्यात काही अर्थ नाही, यावर सर्वच सेनाधिकाऱ्यांचे एकमत झ "समय पानिपतासारखा प्राप्त जाला. आज रात्रीस ते चालून येते म्हणजे मरणे प्राप्त! प्रातःकाळी कछवे राठोड तमाम त्यांच्या फौजा चालून येणार. आपली पलटणे त त्यांजकडे गेल्याने ते हालभरी (युद्धोत्सुक) जाहले. आपले फौजेची हुशारी मंदाव फौजेत पलटणे व मोगले रांगडे हिंदुस्थानी आहेत, त्यांचा विश्वास नाही. परिछित लढाईचे समयी घालवितील. अजून परीक्षा पहाण्याचे बाकी राहिले नाही. दक्षिणी किती आहे ती आपली आपले ध्यानात आहे. चार शेराची धारण. बाहेरून रसद नाही. शिलेदार उपासाने मेले. घोडी मेली. राहिली त्यात सामर्थ्य नाही. वैरणीचा व लढाई कशाचे बळावर घेणार?" [इब्रत : भाग ३; १९; **एचपी** : क्रमांक ५०३; अखब **पीआरसी** : खंड १] म्हणून माघार घेण्याचे निश्चित करण्यात आले.

११. लालसोटहून माघार : १–९ ऑगस्ट, १७८७

दि. १ ऑगस्ट, पहाट होण्याला तीन तासाचा अवधी असताना माघार घ्या सुरवात झाली. तुंगा येथे चालून जाताना जी शिस्त व पूर्वनियोजित आखणी होती तश पण उलट्या पद्धतीने याही वेळी होती. राणाखानच्या हाताखालील आघाडी, अ पिछाडीस आली मुख्य सामानसुमान, अन्य साहित्य व जनाना यांचा मोहोरा पूर्ण वळ होता. ते सर्व माघार घेणाऱ्या सैन्याच्या आघाडीला आले. महादजी स्वतः या सर्व ल लचक काफिल्याच्या मध्यभागी होता. सैन्यातील सर्व मार्गावर त्याची सतत नजर हो कोणाला कशाची गरज भासली, कुठे बेशिस्ती दिसली तर लगेच जातीने लक्ष घालून तिथे ठाकठीक करीत असे. त्याने शत्रूच्या छावणीवर आपल्या सैन्याची जी आगेक केली होती ती जर कोणत्याही तऱ्हेची नुकसानी वा अडथळा न येता सातत्याने च

राहिली असती, तर लष्करी डावपेचाचे इतिहासात ती एक उल्लेखनीय मोहीम ठरली असती, यात शंकाच नाही. परंतु बलाढ्य आणि विजयोत्साही शत्रूसमोर हताश झालेल्या आपल्या गलितगात्र सैनिकांना सुविहितपणे माघार घ्यायला लावण्यातले त्याचे यश, थंड डोक्याने अचूक अंदाज करण्यातली त्याची मुत्सद्दिगिरी, तो सतत घेत असलेली दक्षता व भयंकर अडचणीच्या प्रसंगीही अविरत कष्ट करण्याची त्याची जिद्द, या गुणांसाठीही एक अत्यंत धीमा व विवेकी सेनापती म्हणून आपल्याला त्याच्याबद्दल आदर वाटला पाहिजे. दि. १ ऑगस्टला रामगढ मैदान सोडून माघार घ्यायला सुरवात केल्यावर परतताना वाटेत कोणत्याही भानगडीत पडायचा मोह त्याने स्वतःला होऊ दिला नाही; दररोज लांब पल्ल्याच्या मजला मारीत आठव्या दिवशी सुखरूपपणे तो दिगजवळ येऊन पोहोचला. त्याच्या काळातील कोणताही हिंदी नेता हे कर्तृत्व दाखवू शकला नसता.

ही माघार घेताना सर्व सैन्याला वाटणारी भीती, दातखिळी बसवणारी होती; प्रत्यही धसके होते. तुंगाची लढाई संपली तरी पुढील दहा दिवस छावणीतील प्रत्येक दख्खनी मराठ्याला पानिपतचे भूत भेडसावित होते. पण लालसोटला पानिपतची पुनरावृत्ती झाली नाही याचे कारण महादजी शिंदे हा सदाशिवराव भाऊपेक्षा वेगळा होता, महादजीच्या हाताखालील अधिकारी अधिक चांगले होते म्हणूनच. त्या चित्तपावन धुरंधराच्या कपाळी जो डाग लागला तो महादजीने स्वतःला लागू दिला नाही.

दि. १ ऑगस्ट, पहाट व्हायला तीन तास उरले होते. लढाईच्या मैदानामागे लालसोट खेड्याच्या दक्षिणेस आठ मैलांवर महादजीचे सामानसुमान, जनाना वगैरे होता. महादजीने सांडणीस्वार रवाना केले, व त्यांच्यामार्फत तेथील जनाना, वाहतूकव्यवस्था पहाणारा अधिकारी वर्ग व संरक्षक पथक यांना सर्व आवराआवर करून वाट चालू लागण्यास सुरवात करण्याबद्दलच्या सूचना दिल्या. उद्देश हा की पाठीमागून येणाऱ्या मुख्य सैन्याला रस्ता मोकळा रहावा. माघार घेणार असल्याची बातमी त्याच्या रामगढ जवळील छावणीत चटकन पसरली. शिपाई व छावणीतील इतर नोकरांनी आवराआवर करायला सुरवात केली ती थोड्याफार धाकधुकीनेच. राजपुतांनी हल्ला केलाच तर त्याला तोंड देण्यासाठी महादजी व राणाखान मागे राहिले. चटचट हालचाल करणारी सैनिकांची तुकडी मदतीकरिता देऊन लष्करी छावणी व तोफखान्यास त्याने मूळ ठिकाणी परतायला सांगितले. जमिनीत घट्ट रुतून बसलेली वाहने जाळून टाकली व वाहतुकीची साधने नसल्याने बरेचसे सामान जाग्यावरच टाकून दिले.[८]

जलद हालचाल करणाऱ्या सैनिकांची ही तुकडी मूळ ठाण्यावर येऊन दाखल झाली तेव्हा जवळजवळ अरुणोदय झाला होता. सामानाची आवराआवर, बांधाबांध, वाहने आणण्याची धावपळ यांच्या संमिश्र गलक्याने आसमंत गजबजून गेले होते. लोक आपापले लादायचे गडबडीत. त्यावेळी संदूख उडाला ! तो दिसायला एक अपघातच पण मराठ्यांच्या एका अखबरनविसाने लिहिल्यानुसार एका हिंदुस्थानी शिपायाने ती हेतुतः केलेली नासधूस होती. त्यामुळे प्रचंड स्फोट होऊन भडका उडाला. दहाजण ठार वा जखमी झाले, काही

बैलही भाजलें. त्या लांबलचक छावणीतल्या दूरच्या भागात जे शिपाई होते त्यांना हा प्र
समजताच त्यांनी असे उठविले की शिंद्यांच्या सैन्यात जे हिंदुस्थानी शिपाई आहेत त्य
आपल्या शस्त्रांनी दख्खनी शिपायांवर हल्ला केला. मग घाबरून त्यांनी पळायला सुर
केली; सामानसुमान जय्यत बांधलेले होते ते घेऊन काही धावले. ज्यांनी काहीच आ
नव्हते ते ओझी तळावर टाकून जीव घेऊन पळू लागले. या पळपुट्यांनी आवई उठविली
जीवघेणी हाणामारी सुरू असून त्यात महादजी स्वत: ठार झाला. त्या संधीचा फा
घेऊन लष्करचे सोदे व पेंढारी यांनी आफराचा बाजार व त्याच्या विधवा उतरल्या हो
तो भाग यांची लुटालूट केली.

त्यानंतर पाठीमागून दोन घंट्यांनी पाटीलबावा तळावर आले. पहातात तो पळाल
प्रमाणे अवस्था दिसली. तिथे काही तास थांबून त्याने सर्व पूर्ववत् स्थिरस्थावर केले. " ते
तेथे उभे राहून खाशा मुदपाखाची भांडी व फरासखान्याची ओझी, सांडण्या सुरतना
उंटावर घालून लोकास सांगितले, तळावरील तुमचे उपयोगाचे असेल ते घ्या. वरकड
करून फुंकून द्या. "तंबूंनाही आगी लावण्यात आल्या." [**एचपी** : क्रमांक ५०३] न
धिमेपणे वाट चालत व सैन्याच्या मधल्या तुकडीवर सक्त नजर ठेवीत तो त्या दिवशी पिपल
पुढे दोन मैल गेला, तेव्हा दुपारचे तीन वाजले होते. त्याला स्वतःला २४ मैलांची
त्याच्यामागून येणाऱ्या सैन्याला ३२ मैलांची खडतर रपेट करावी लागली. मागून येणा
सैनिकांची ही तुकडी राणाखानाच्या शिस्तबद्ध देखरेखीखाली व्यवस्थित माघार घेत हो
लढाई करण्यासारखी परिस्थिती उद्भवलीच तर त्या तयारीनेच हे सैन्य परतत होते; शत्रू
हल्ला परतवण्यासाठी तोफखानाही जय्यत तयार होता. या माघार घेणाऱ्या सैन्याची खो
काढायचे धाडस शत्रूला झाले नाही. एवढेसे सुद्धा नुकसान न होता हे सैन्य मुक्काम
येऊन पोहोचले तेव्हा संध्याकाळ होऊन दोन तास झाले होते.

दुसऱ्याच दिवशी एक गंभीर प्रश्न उभा राहिला. त्याच्यापासून लांब पण मैत्रि
संबंध असलेला करोलीपासून मध्यावर असलेला खुशालगड किल्ला जयपूरनरेशाच्या
भावाने बळकावला आहे अशी बातमी येऊन धडकली. त्या ठिकाणी मराठ्यांचा
महसूल अधिकारी होता तो, शिंद्याने त्या ठिकाणी ठेवलेल्या दोन तोफा, गालिचे, सतर
व अन्य मालमत्ता तिथेच टाकून पळून गेला होता व त्या दणकट किल्ल्याकडे जाणा
रस्त्यावर शत्रूचा ताबा बसला. त्यामुळे महादजीने आपला मार्ग बदलला म्हणजे ईशान्येक
दिगकडे जायचे ठरविले. राजपूतसेनेने लालसोट व आसपासचा डोंगराळ मुलूख ताब्
घेतला. त्यानंतर मराठे पिपळईहून निघून गेल्यावर एका दिवसाने ते त्या ठिकाणी आले,
त्याच्यापुढे मात्र गेले नाहीत. राजपूत येत आहेत अशा आवया शिंद्याच्या छावणीत
उठत होत्या. बामनिवास, सक्रूदा, भासावार व पथेना या मार्गाने जात जात शिंदे
महिन्याच्या दि. ८ ला दिगच्या नैऋत्येस असलेल्या १४ मैलांवरील ठाण या ठिकाणी आले
तेथून शेवटी दि. ११ रोजी सिसवाडा [दिगनजिक ८ मैलांवर] येथे आले. थोडी
विश्रांती घेऊन आपल्याकडील स्थिरस्थावरता त्यांना करायची होती.[१]

चंबळच्या दक्षिणेस आपल्या स्वतःच्या ग्वाल्हेर या गावी जाण्याऐवजी त्याने आपला मोर्चा दिगकडे वळवला याचे कारण दिग येथे त्याचा कुंटुबकबिला होता. त्यांची हालहवाल विचारणे व आपला प्रतिनिधी म्हणून दिल्ली येथे असलेला आपला जावई लाडोजी देशमुख याला भेटणे हे दोन हेतू त्यात होते. दि. १० ला त्याची पत्नी व मुलेबाळे ठाण येथे येऊन त्याला भेटली; व दुसऱ्या दिवशी ते सर्व ग्वाल्हेरास जाण्यास निघाले. सोबतीला अण्णा खंडेरावच्या हाताखालील एक तुकडी होती. बारा तोफा वगळता बाकी सर्व तोफखाना, छावणीतील सगळे अवजड सामानसुमान, दख्खनमधील सर्व सरदार-दरकदारांचा जनाना व अन्य सैनिकी तुकड्या त्याच्या बरोबर होत्या. अशाप्रकारे स्वतःच्या झगमगीत कर्तृत्वाचा प्रभाव पाहून आपली सत्ता व दरारा यांना जे खग्रास ग्रहण लागले होते ते पुसून काढण्यासाठी तो खंदा सैनिक पुन्हा कामाला लागला.

टीपा : प्रकरण ३५

पृष्ठ	टिपेचा क्रमांक	
२३८	१	'सर्व्हे ऑफ इण्डिया' अर्धा इंची नकाशा, कागद क्रमांक : ५४ बी **एनडब्ल्यू**.
२३९	२	**पीआरसी**: खंड १, क्रमांक १२४ व त्यानंतरचे **अखबारात : डीवाय** : भाग १, लेखांक : २०२.
२४०	३	वाराणसी येथे चेरीचा खून करून वझीर अली हा पळून गेल्याने त्याला पकडण्यासाठी कर्नल जॉन कॉलिन्स हा जयपूर येथे गेला होता. त्यानेही या राजाबाबत गव्हर्नरजनरलला लिहिलेल्या पत्रात याच प्रकारची माहिती कळविलेली आहे.
२४१	४	महादजीच्या सैन्याची मासिक पगाराची रक्कम रु. साडेबारा लाख होती. आणि सहा महिन्यात त्याने पगारच केले नव्हते.
२४३	५	तुंगाची लढाई–**अखबारात** = **पीआरसी**, खंड १, क्रमांक १३५; **एचपी**. ५०३; ऐति. पत्र क्रमांक २६१; **इब्रत** भाग ३, २१–२८; **डीवाय** : भाग १, लेखांक २२४; **पीआरसी** : खंड १, क्रमांक १३६ व १३७; **एमडी** : भाग २, लेखांक १४७, १५०; **चंद्रडी** : भाग २, ७१.
२४९	६	**अख. एसजे. हस्तलिखित** : ४७, यात 'प्रत्येक महिन्याला साठ लाख' असे लिहिलेले आहे; या कागदपत्रांची नक्कल करणाराने नजर–चुकीने 'सहा लाख' ऐवजी 'साठ लाख' असे लिहिले असावे.

२५० ७ **महादजीची लालसोटहून माघार**–अखबारात, **एसजे** हस्तलिखित (उत्कृष्ट व संपूर्ण) ५१–७३; **पीआरसी** : खंड १, क्रमांक : १३७, १४२–१४४, १५१–१५६; **एचपी** : क्रमांक : ५०३; **मुन्नालाल** : (स्वतः हजर होता) ३१०–३११; इब्रत भाग ३, ३१–३३.

२५१ ८ शिंद्याने काही जवानांची तुकडी लालसोट खिंडीत ठेवली होती. पिछाडीच्या संरक्षणासाठी सतरा तोफा, १० ते १२ हजार स्वार व राणाखान आणि अंबाजी यांच्या समवेत द बॉन्य व लैस्तेनो यांच्या तुकड्या होत्या. महादजी स्वतः घोड्यावर स्वार झाला व उजाडण्यापूर्वी तीन तास आपल्या सैन्याच्या पिछाडीस गेला. सकाळी तो लालसोटच्या डोंगरावर उभा राहिला; जयपूर सैन्य लढाईच्या तयारीने बाहेर पडत असल्याची बातमी त्याला त्याच्या हेरांकडून कळली. पण राणाखान लढाईच्या पवित्र्यात उभा असलेल्या आपल्या शिपायांच्या तुकड्यांसमवेत पावलापावलाने मागे सरकत होता. तीन कोस अंतर चालून गेल्यावर त्याने शपथ घेतली, " मी जगलो वाचलो, तर जयनगर व जोधपूरची धूळधाण करीन " [अख. एसजे : हस्तलिखित : ५२–५३.]

२५२ ९ **महादजीचा प्रवास मार्ग** : राजगडच्या मैदानातून निघतो–पिपळाईच्या उत्तरेस ४ मैल, बामनिवास (१ ऑगस्ट)–वझीरपूर–बामनिवासच्या पूर्वेस २० व उदईच्या पूर्वेस ८ मैल (दि. २)–सकरोदा, वझीरपूरच्या ईशान्येस १२ व हिंदौनच्या नैऋत्येस २ मैल (दि. ३)–तालचिरी, हिंदोनच्या उत्तरेस १२ मैल (दि. ४)–भासवार, तालचिरीच्या उत्तरेस १० मैल (दि. ५)–पथेना, भासवारच्या उत्तरेस ७ व दिगच्या नैऋत्येस २६ मैल (दि. ६)–खेडामेढा, पथेनाच्या उत्तरेस १२ मैल (दि. ७)–ठण, दिगच्या नैऋत्येस १४ मैल (दि. ८)– सिसवाडा, ठणच्या ईशान्येस ८ मैल (दि. ११). **अख. एसजे हस्तलिखित** व **पीआरसी**, खंड १.

प्रकरण ३६ वे

महादजी शिंद्याच्या अधिकाराला लागलेले ग्रहण

१. साम्राज्याच्या मुखत्यारपदाच्या गैरहजेरीत घडलेल्या घटनांचा मागोवा

आपल्या सामर्थ्यसंपन्न सैन्यासह मुहमदबेग हमदानी हा महादजीला सोडून गेला व त्याच्या शत्रूला जाऊन मिळाला (दि. २५ मे, १७८७) व स्वतः महादजी जयपूरप्रदेशातून माघार घेऊ लागला तेव्हा त्याने नुकतीच मिळविलेली पण अजून नीट बांधली न गेलेली साम्राज्यसत्ता शतशः विदीर्ण झाली. त्यामुळे असंख्य भगदाडांतून वळवळ सुरू झाली. शत्रूंचे एक मोहोळच त्याच्या विरुद्ध उठले. त्याच्या शत्रूत नव्हते कोण ? दरबारात मुखत्यारपदावर बसू इच्छिणारे महत्त्वाकांक्षी प्रतिस्पर्धी, ज्यांना त्याने अधिकारावरून हुसकावून लावले होते असे जुन्या सरंजामीचे वारस, ज्यांच्याकडून सरकारी मुलूख काढून घेतला होता असे हिंदुस्थानी फौजेतील अधिकारी. (या मुलुखाचा वार्षिक महसूल सत्तर लाख होता) नोकरीतील पगाराव्यतिरिक्त ज्यांच्या अन्य लाचलुचपतीच्या मिळकतीवर त्याने गदा आणली होती असे भ्रष्ट नोकर व हिंदूने मुखत्यारपदावर येणे हे ज्यांना इस्लामवरचे संकट वाटत होते असा उत्तर हिंदमधील मुसलमान समाज, असे सगळेच त्याच्याविरुद्ध डोके काढू लागले होते.

भविष्यकाळात अंधेर दिसत होता. प्रत्येक बाजूने माघार घ्यावी लागल्याने अंतःकरणात विफलता आली होती व कुठेही नजर टाकली तरी स्नेही दिसत नव्हते की साधनसामग्री दिसत नव्हती. परंतु त्याच्यासमोर दोन ठाम उद्दिष्टे होती. एक म्हणजे साम्राज्याचे मुखत्यारपद स्वतःकडे ठेवणे व दुसरे म्हणजे, ज्यांनी त्याच्या प्रतिमेला धक्का लावला त्या जयपूर व जोधपूरराजांना चांगली अद्दल घडविणे. एका निश्चयापासून तो कधीही ढळला नाही. तो म्हणजे उत्तरहिंदमधील आपल्या महत्त्वाकांक्षा तशाच सोडून, चारवर्षांमागे गोहदच्या राजाकडून घेतलेल्या ग्वाल्हेरपरगण्यावर समाधान मानून दक्षिणेत परत जायचे, त्याला त्याची तयारी नव्हती. त्याच्या मनाचा कुणालाच थांग लागत नसे. अगदी विश्वासातले असे त्याचे चार सरदार होते त्यांनासुद्धा त्याच्या मनाचा ठाव घेणे जमत नसे. महादजी या सल्लागारांचे म्हणणे कान देऊन ऐके पण आपला शब्द मात्र त्याने कधीच दिला नाही. म्हणून महादजीच्या छावणीतले खबरनवीस आपल्या खलित्यात 'पाटीलबावा अगदी भांबावलेले असून दर दिवशी त्यांचा नवा बेत' असे लिहून जात, तशी वस्तुस्थिती खरोखर नव्हती. खलित्यातील चरबट लिखाणामुळे हतबल होऊन जाण्याइतका तो दुर्बल अंतःकरणाचा नव्हता.

लालसोटहून माघार घेतल्यादिवसापासून चौदा महिन्यांच्या कालावधीनंतर त्याने आपले बस्तान पुन्हा दिल्लीत बसविले. यादरम्यानच्या काळातील घडामोडींचा बारीकसारीक

तपशील देणारी जी पुरेशी कागदपत्रे उपलब्ध आहेत; त्याशिवाय त्याची स्वतःची, त्याच्या सैन्यातील अधिकाऱ्यांची, व त्याच्या सन्निध असणारांची प्रत्येक दिवशी मराठी, फारशी व इंग्लिश भाषेत लिहिलेली जी कागदपत्रे उपलब्ध आहेत ती सगळी नीट वाचून त्यांचे मनन केल्यावर त्याच्या विचारांची व धोरणांची आखणी स्वच्छ असून तीत सातत्य कसे होते, साधनांचा उपयोग करताना जरूर तो फेरफार व लवचिकपणा तो कसा ठेवीत असे, हे समजून येते. वाचकाच्या दृष्टीने तर तपशिलाचा गोंधळ व चारपाच महत्त्वाच्या घटनांचे उलटसुलट बारकावे यांचा प्रवाह समजण्यासाठी या ठिकाणी या मुदतीतील त्याच्या कर्तृत्वाचा एक आराखडा काढणे सोयीचे ठरेल.

मे १७८७ मध्ये ज्या दिवशी जयपूर राज्यातून घाईगर्दीने माघार घेऊन महादजी दिग येथील आपल्या ठाण्यावर परत यायला निघाला, त्या दिवशी त्याच्या कर्तृत्वाला ग्रहण लागण्यास सुरवात झाली; दि. १ ऑगस्टला त्याने लालसोटहून माघार घेतली तेव्हा ग्रहण पूर्ण झाले. १७ जून १७८८ रोजी इस्माईल बेगच्या सुसज्ज सैन्याला आग्र्याच्या तटबंदीत त्याने धूळ चारली. त्यानंतर दिल्लीतील आपले पूर्वीचे श्रेष्ठ स्थान पटकवायला त्याला जरी साडेतीन महिने लागले तरी १७ जून १७८७ नंतर संबंधितांना कळून चुकले की शिंदे पुन्हा बलिष्ठ झाले आहेत. त्यामुळे सर्व विरोधक त्याच्याशी सलोखा करण्याची पुन्हा संधी शोधू लागले. पण दुर्दैव असे की, या पंधरा आठवड्यांच्या मुदतीत दिल्लीतील राजघराण्याला विलक्षण अवकळा आली होती. या राजघराण्यावर असलेल्या ईश्वरदत्त कृपाप्रसादाचे आवरण, विघ्नसंतोषी अरबांनी आपल्या राकट हातांनी ओरबडून टाकले. त्यानंतर पाच वर्षांनी फ्रान्समधील राज्यसत्तेचा जो अवमानास्पद शेवट झाला, त्याहीपेक्षा या राजघराण्याची अखेरी अधिक हृदयद्रावक आहे.

शिंद्याने लालसोटकडे पाठ फिरवली. त्यानंतरची त्याच्यासमोरील पहिली अडचण म्हणजे सुरक्षित जागी पोहोचणे; आपल्या व आपल्या समवेत असणाऱ्या दख्खनी अधिकाऱ्यांच्या कुटुंबियांना दिगहून त्याठिकाणी न्यायचे व त्यांना त्यांच्या दक्षिणेकडील गावी पाठवून द्यायचे. आपल्या जनान्यासमवेत तोफखाना, छावणी व अवजड सामान त्याने ग्वाल्हेरला नेले. हिंदुस्थानी पलटणी व प्रशिक्षित शिपायांच्या पलटणी (काही अपवाद वगळून) यांना त्याने रजा दिली. मुगलसैन्याच्या सामर्थ्यावर पुढे चाल करून येणारे राजपूत सैन्य व पूर्वेकडील दिल्लीशहर या दरम्यान अडथळा आणावा म्हणून तो पश्चिमेकडे वळला. साम्राज्याच्या राजधानी दिल्लीशी सतत संपर्क ठेवून आपल्यावतीने तिथे राहून नायबमुखत्यार म्हणून काम पहाणाऱ्या आपला जावई लाडोजी देशमुख शितोळे याच्या जीवितास अपाय न होईल यावर लक्ष ठेवणे, हे त्याचे उद्दिष्ट होते. परंतु गुलामकादरचा झपाटा व लाडोजीचा भेकडपणा यामुळे महादजीच्या हातातील सूत्रे ढळली होती. रोहिल्यांचा प्रमुख, गुलाम कादर दिल्लीत येताच शिंद्यांचा हा प्रतिनिधी दिल्लीतून पळून गेला. (२४ ऑगस्ट) गुलामकादर व बादशहा यांची भेट घडवून आणण्यात आली; घाबरून गेलेल्या बादशहाने शिंद्याऐवजी त्याला मीरबक्षी व मुखत्यार पदावर नेमले (५ सप्टेंबर)

अशाप्रकारे आपल्याला वरील अधिकारावरून काढून टाकण्यापूर्वी आपण स्वतः जाऊन माचेडीच्या रावराजाला हाताशी धरून आपली बाजू बळकट करायची व जयपूरचे सैन्य दिल्लीवर चालून येणार नाही अशी खबरदारी घ्यायची असे महादजीने ठरविले होते. रावराजाच्या विश्वासाई साहाय्यामुळे शिंदे, अलवार येथे २४ ऑगस्टपासून २ नोव्हेंबर पर्यंत मुक्काम टाकून होता. त्यानंतर बादशहाकडून तातडीचे बोलावणे आल्याने तो अलवारहून रेवाडीस गेला. गुलाम कादरने बादशहाच्या प्रासादावर तोफा डागायला सुरवात केली होती.

या कालखंडात शिंद्याला अपरिमित हानी सोसावी लागली. १६ सप्टेंबरला इस्माईल बेगने आग्रा घेतले. जोधपूरच्या राजाने २७ ऑगस्टला अजमेरचा कब्जा घेतला. अंतर्वेदीतील सगळा मुलूख हातातून गेला; शिंद्याकडे राहिला फक्त अलिगढचा किल्ला. तोही पुढील साली १७ फेब्रुवारीला शत्रूने घेतला. इस्माइल बेगने आग्रा किल्ल्याला वेढा घातला त्याचवेळी शिंद्याच्या धैर्याची परीक्षा पाहणारे आणखी एक संकट त्याच्यापुढे उभे राहिले. वाराणसी येथे इंग्रजांच्या आसऱ्याला राहिलेला राजपुत्र जवान बख्त (जहांदर शहा) हा तिथून निघून नोव्हेंबरच्या सुरवातीला आग्रा येथे आला. पण त्या राजपुत्राजवळ नव्हते सैन्य, नव्हता पैसा; त्यामुळे इंग्रजांनी शिंद्याविरुद्ध शस्त्र उपसले नसते व अयोध्येच्या नबाबाला तर ते अशक्यच होते. इस्माईल बेग व जवान बख्त या दोघांच्याही महत्त्वाकांक्षा जबऱ्या पण त्यांतही एकवाक्यता नव्हती; तशात राजपुत्र कमालीचा तापट व संतापी. त्यामुळे दोघांत तंटे उडाले. शेवटी सैरभैर झालेला, साम्राज्याचा हा भावी वारस पुन्हा इंग्रजांकडे गेला. (फरुकाबाद येथे, तो २३ फेब्रुवारी, १७७८च्या आसपास आला) त्याच्या या साहसाचा परिणाम इतकाच झाला की शिंद्याने उगाच धसका घेतला व तो चंबळपलीकडे निघून गेला.

रेवाडी जिल्ह्यात गेल्यावर महादजीने केलेले दोन प्रयत्न सर्वथैव निष्प्रभ ठरले. अंबाजी इंगळेला दिल्लीला पाठवून त्याच्यामार्फत बादशहाला आपल्याकडे येण्याबाबत केलेली विनवणी (१४ नोव्हेंबर) व इस्माइलबेगने आग्र्याच्या किल्ल्याला घातलेला वेढा उठविण्याचा प्रयत्न. (१५–१८ डिसेंबर) शेवटी चंबळेच्या पलीकडे चालू असलेली सर्व लष्करी हालचाल त्याने थांबवली व तो चंबळेपलीकडे निघून गेला. (२० डिसेंबर) ग्वाल्हेरचा किल्ला चांगलाच दणकट होता. त्याच्या उत्तरेस २८ मैलांवर कुमाडी ओढ्याच्या दक्षिण काठावरील मैदानात त्याने तळ टाकला. आग्रा आणि अलिगढ येथील किल्ल्यातील शिबंदी सोडली तर त्याच्याजवळ दख्खनमधील मराठा सैन्याची कोणतीही पथके नव्हती.

एकूण तीन महिने तो उत्तरेबाहेर होता (२० डिसें. १७८७ ते १६ मार्च, १७८८) आपल्या जवळच्या युद्धसामग्रीचा या तीन महिन्यांत त्याने नीट उपयोग केला. माळवा-राजपूत राज्याच्या सरहद्दीवर धुमाकूळ घालणाऱ्या बंडखोरांना आणि लुटारूंना चांगली जरब बसविली. मग नव्या जोमाने उत्तरेकडील मोहिमा हातात घेण्याइतका तो मोकळा झाला. याच काळात बादशहानेही मोहीम काढली व तो रेवाडीला गेला; जयपूरच्या राजाला भेटला. (३ फेब्रुवारी) बंडखोर नजफ कूलीशी दोन हात केले (१२ मार्च) व अखेरीस

त्या बलदंड बंडखोराशी नाममात्र सख्य करून २३ मार्चला तो दिल्लीस परत आ
लगेचच्या एप्रिल महिन्यात मराठ्यांनी हिंदुस्थानात एक नवीन मोहीम सुरू केली. दक्षि
तून आलेल्या नवीन सैन्यासह राणाखानला चंबळेपलीकडे पाठविण्यात आले (४ एप्रिल
त्याप्रमाणे राणाखान निघाला व आपला नेहमीचा दोस्त भरतपूरचा जाट राजा रणजित
याच्याशी त्याने हातमिळवणी केली.

कौतुकास्पद आखीव डावपेच व त्यांची अचूक कार्यवाही यामुळे राणाखानाने इस
इल बेगला चांगलीच चपराक लगावली. आग्रा किल्ल्यासमोर वेढा घालून बसलेल्या खंद
तील शत्रुसैन्याला त्याने चांगलाच आ वासायला लावले व किल्ल्यात असलेल्या मराठ्य
तातडीने मदत पोहोचविली (९ एप्रिल). आग्रा किल्ल्याबाहेर मोकळ्या मैदानात शत्रू
कितीतरी वेळा झटापटी होत असत. तरीही सतत घिरट्या घालीत राहून राणाखान
इस्माइलच्या सैन्याची रसद तोडली. देवजी गवळी व रायाजी पाटील यांनी मथुरा
घेतला; आणि अंतर्वेदीत घुसून गुलाम कादरच्या जहागिरीत गोंधळ उडवून दिला, त
आग्रा किल्ल्याला वेढा घालणाऱ्या शत्रुसैन्याकडे जाणारा दाणागोटा बंद पाडला. या
इस्माइल व त्याचा साथीदार गुलाम कादर यांचा परस्परसंपर्क तुटला. कारण आपल्या ज
गिरीच्या रक्षणार्थ गुलाम कादरला आग्रा सोडून तातडीने अंतर्वेदीत जावे लागले. इस्मा
बेग एकटा व त्याची ताकदही बेताचीच; यामुळे राणाखानाने दिलेल्या जबरदस्त त
ख्याने त्याचा पूर्ण पराभव झाला. (१७ जून) यमुनेकडील पश्चिम भागात महादज
एकही शत्रू राहिला नाही, व तो ग्वाल्हेरहून मथुरेस आला. (४ जुलै) तरी नंतरचे त
महिने दिल्लीतील आपले पूर्वीचे मानाचे स्थान परत मिळवणे त्याला जमले नाही. या अ
धीत गुलाम कादरने दिल्लीत अपरंपार लुटालूट केली व बादशहाचे डोळे काढले. शिंद्या
मदतीने त्याच्या अधिकाऱ्यांनी या दुर्दैवी बादशहाला पुन्हा सत्तेवर आणले (शहा अ
मच्या नावे १७ ऑक्टोबर, १७८८ रोजी पुन्हा खुद्बा वाचण्यात आला). १८ डिसेंब
गुलाम कादरला पकडण्यात आले; नंतरच्या मार्च महिन्यात त्याला ठार मारले. त्यान
शिंद्याच्या सर्वाधिकाराला आव्हान देणारा कुणीही उरला नाही.

या चौदा महिन्यांत घडलेल्या महत्त्वाच्या घटना फक्त चार. महादजी व इस्माइल
यांच्यातला आडमुठा तंटा; गुलाम कादर रोहिल्याचा विस्मयजनक उदय व अस्त; श
अलमची बंडखोर नजफकुलीखानविरुद्धची मोहीम व ज्याचा शेवट संपूर्ण फसला अ
जवानबख्तची साहसी धडक. राजपूत राजे, गोसावी बंधुद्वय व अन्य छोटे छोटे विरो
यांच्या कारवाया त्या मानाने अगदीच किरकोळ होत्या.

२. महादजी शिंद्याच्या धोरणातील बदल, सत्तेला लागलेल्या ग्रहणकाळात त्य टाकलेली पावले; त्याचे सैन्य, संपत्ती व स्नेही याबाबतचे अंदाज.

उत्तरेकडील घडामोडींवरील महादजीची पकड ढिली झाल्याने त्याच्या दृष्टीने त्या
दुष्परिणाम काय झाला याचा आपण थोडक्यात आढावा घेतला. या अडचणीच्या काळात
त्याचे धोरण काय होते व त्याला कुणी कशी मदत केली हे आपण आता पाहू या. दि

जवळील आपल्या मुक्कामापासून, त्याने दख्खनकडील आपल्यासमवेत असलेली सर्व सेनाधिकाऱ्यांची बायकामुले, आपल्या कुटुंबीयांसमवेत माळव्यात पाठवून दिली; त्यांच्याच बरोबर आपला प्रचंड तोफखाना, तंबू, राहुट्या व दुसरे जादा सामानही त्याने परत पाठविले. आपल्या छावणीतील लष्करी शिपाई व अन्य बिनलष्करीपेशाची माणसे यांना 'तुम्हाला पोटाला मिळेल तिकडे जाण्यास माझी परवानगी आहे' असे सांगून त्याने निरोप दिला. अशाप्रकारे जवळजवळ दोन तृतीयांश लोक निघून गेल्यावर त्याचा अवाढव्य लवाजमा खूप कमी झाला. [११ ऑगस्ट; **अखबरात एसजे** : हस्तलिखित ७४] सैन्याच्या बाबतीत विश्वासघातकी हिंदुस्थानी शिपायांवर पैसा खर्च करायची त्याची आता तयारी नव्हती; त्यांचा जवळजवळ वर्षाचा पगार द्यायचा होता. तरी त्याबाबतचा त्याचा निर्णय पक्का होता. दख्खनमधून नव्या दमाचे व विश्वासार्ह असे जे नवे सैन्य यायचे होते त्यावर पैसे खर्च करणे अधिक उपयुक्त ठरणारे होते. हिंदुस्थानी शिपायांना दैनंदिन चरितार्थासाठी थोडा भत्ता दिला जात असे. त्यांना त्यांच्या पगाराची थकबाकी द्यायची का नाही, हे जयपूर मोहिमेतील यशावर ठरावयाचे होते. या सैन्यातील सेनाधिकाऱ्यांना पैशाऐवजी जहागिरीदाखल मुलूख देण्यात आला होता. त्यातच येणे रकमेचा सर्व हिशेब संपला असे समजण्यात आले. जहागिरीचा हा सर्व मुलूख अंतर्वेदीतील होता, पण महादजीच्या शत्रूने तो बळकावलेला असल्याने संबंधित अधिकाऱ्यांनी त्या शत्रूपासून तो सोडवून घ्यायचा होता. या विश्वासघातकी व निरुपयोगी शिपायांनी छावणीतून बाहेर चालते व्हावे म्हणून महादजी हेतुतः तसे वागत होता. त्याच्याजवळ पैसा नव्हता. त्याची त्याला खंत वाटत होती. दुष्काळाने धारण महागली होती. हिंदुस्थान्यांचे विश्वासघातकी गुप्त कट व कामचुकारपणा यामुळे आपल्याला लालसोट मोहिमेत अपयश आले असे तो उघड म्हणे; म्हणून दख्खनी शिपायांखेरीज कुणालाही रोख रक्कम द्यायची आपली इच्छा नाही असे तो बोलून दाखवी. [अखबरात]

त्याच्याबरोबर असलेल्या दक्षिणेतून आलेल्या मराठा शिपायांच्या पलटणी त्याच्याशी पूर्णपणे एकनिष्ठ होत्या. १७८० मध्ये कर्नल कॅमॅकशी दोन हात करायला म्हणून तो माळव्यात आला त्यावेळी या दक्षिणी पलटणी त्याच्या समवेत आलेल्या; तेव्हापासून हे शिपाई त्याच्याबरोबर लष्करी मोहिमेत गुंतलेले होते. घरचा संबंध सुटल्याला आठ वर्षे होऊन गेली होती. त्यामुळे या शिपायांचा उत्साह मावळून गेलेला असल्याने त्यांच्याकडून अधिक काम होणार नाही हे तो जाणीत होता. म्हणून महाराष्ट्रातून येणाऱ्या नव्या दमाच्या सैनिकांची तो उत्कंठेने वाट पाहत होता. अशा प्रकारचे विश्वासार्ह असे ताज्या दमाचे तरुण लवकरात लवकर पाठवावे म्हणून पेशव्यांना तो वरचेवर लिहीत होता. पेशवेच नव्हे तर या बाबतीत ज्यांचा उपयोग होईल असे वाटले त्या वेणी हुजुरी, ढोकळसिंग व जे असे हजार तरुण पाठवितील असे वाटले असे अन्य काही, त्यांनाही त्याने लिहिले होते. तृषार्त चातकपक्षी पावसाची जशी वाट पाहतो तसे नव्या जोमाने दख्खनी शिपाई महाराष्ट्रातून येताहेत की काय, यासाठी मोठ्या आशेने दक्षिण क्षितिजाकडे तो दररोज नजर लावून पहात बसे, असे काव्यात्म वर्णन एका तत्कालीन मराठी पत्रात आढळते.

विश्वासाने नजर टाकायची व आशा करायची जिथे खात्री होती तिथूनच त्याच वाट्याला घोर निराशा आली. उत्तर हिंदमध्ये अत्यंत अवघड परिस्थितीत असलेल्या धुरंधर सेनानीला उत्स्फूर्त साहाय्य द्यायला पाहिजे असे अल्पवयीन पण शहाण्या दुस माधवरावाला मनापासून वाटत होते. हरिपंत फडके या दक्षिणेतील श्रेष्ठ सेनापतीच्या हा खाली मोठे सैन्य देऊन त्याला महादजीच्या साहाय्यासाठी हिंदुस्थानात पाठवावा अ श्रीमंतांचा मानस होता. पण त्यांचा कारभारी नाना फडणवीस हा भलताच हिकमत 'शिंद्याच्या हाताखाली हरिपंत कसे काम करतील' ही शंका त्याने श्रीमंतांपा बोलून दाखविली. मराठा जातीतल्या माणसाने केलेले हुकूम पाळायला हरिपंतासार चित्तपावन तयार होणार नाही हे त्यांचे म्हणणे. महादजीला मदतीची अत्यंत ग होती. पण त्याला मदत पाठवावी अशी पुणे दरबारची इच्छाही नव्हती व तित पैसाही त्यांच्यापाशी नव्हता. जे सैन्य नव्याने उभे करावयाचे, त्याची जबाबद अलिजाबहादूरवर टाकण्यात आली होती. अलिजाबहादूर हा पहिल्या बाजीरावा अनौरस नातू. महादजीच्या मदतीला त्याने सैन्य घेऊन जायचे व तुकोजी होळक त्याला वाटेत मिळायचे असे ठरले होते. या कामासाठी अलिजाबहादूर सर्वथैव अपात्र हो शिवाय त्यात त्याला विशेष रसही नव्हता. त्यालाच काय, पुण्यातल्या कोणत्याच तल बहादराला त्या कामी तशी आपुलकी नव्हती. अठ्ठावीस वर्षांपूर्वी शिंद्यावर आलेली अशी एक आपत्ती निवारण करण्यासाठी उत्तरेत, महाराष्ट्रातील लढवय्यांची सेना पाठविण्य आली होती. त्या सेनेचे काय झाले होते ? पानिपतच्या रणभूमीवर फक्त गिधाडे व कोल्ह्य मेजवानी मिळाली होती. हा इतिहास त्यांच्यासमोर ताजा होता. पुन्हा त्याच अवलक्ष अपशकुनी ठिकाणी दुसरे असले तरी अडचणीत आलेले शिंदेच मदत मागत हे पुण्यातील राजकारणधुरंधर अधिकाऱ्यांना, सेनाधिकाऱ्यांना उत्तरेत पाठविण्याबाबत ज मनापासून उत्साह नव्हता, तसे घाईगर्दीने निघण्याबाबत स्वतः ते सेनाधिकारीही उत् नव्हते. ८ सप्टेंबर, १७८७ च्या सुमुहूर्तावर अलिजाबहादूर उत्तरेकडे जायला निघा पण महादजीपर्यंत जाऊन पोहोचण्यास त्याला तब्बल चौदा महिने लागले. (६ नोव्हें १७८८) इतका वेळ मधे गेल्याने शिंद्याला मदतीची गरजच राहिली नव्हती; पेशव्यांच पैशावर पोसल्या जाणाऱ्या एकाही स्वाराच्या मदतीशिवाय त्याने स्वतःच्या हिंमती आपली पूर्वप्रतिष्ठा प्राप्त करून घेतली होती.[1] पुण्यातर्फे आलेला दुसरा मदतनीस तुको होळकर हा महादजीच्या कामात प्रत्येक वेळा आडवा पडला. महादजीविरुद्ध काय व क कारस्थाने रचायची याचा विचार तो वाटभर करीत होता.

याच्या इतकीच पण अगदी सांगून सवरून व तडकाफडकी अशी आणखी निराशा त्याला पदरात घ्यावी लागली. सालबाईच्या तहापासून इंग्रजांशी त्याचे मैत्र घनिष्ठ संबंध होते. शिंद्याने त्यांच्याकडे सशस्त्र मदत मागितली होती. तेव्हा हिंदुस्थानात सत्ताधाऱ्यांच्या भांडणात अगदी निर्धारपूर्वक तटस्थता पाळायची असा, कंपनी सरकार

गव्हर्नर जनरलला सक्त हुकूम आला आहे असे सांगून लॉर्ड कॉर्नवॉलिसने त्याला मदत द्यायचे साफ नाकारले होते.

जांबगाव येथे महादजीवर अविचल निष्ठा ठेवणारे काही साहाय्यक होते. त्यांनी स्वतः पुढाकार घेऊन मराठा शिपायांच्या नवीन पलटणी उभारल्या (अंदाजे ५,०००) या पलटणी मार्च १७८८ मध्ये महादजीकडे आल्या. त्यांच्या साहाय्यानेच महादजी मुगल शत्रूला शह देऊ शकला.[२] द बॉन्यच्या दोन्ही तुकड्यांतील शिपाई त्याच्याशी एकनिष्ठ राहिले व या अडचणीच्या वेळी त्यांनी त्याला सर्वतोपरी साहाय्य दिले. लेस्तेनोच्या दोन्ही तुकड्यांतील शिपायांनीही असेच सहकार्य दिले; अर्थात त्यात द बॉन्यच्या शिपायांचा जिव्हाळा नव्हता. त्यातही सहा महिने (१७८७ सप्टेंबरचा मध्य ते १७८८ मार्च मध्यापर्यंत) आपल्या शिपायांच्या पगाराचे पैसे न मिळाल्यामुळे हा भाडोत्री सेनानी शिंद्याला सोडून दुसरीकडे गेला होता.

लालसोटहून माघार घेतल्यानंतर मागील मोहिमांप्रमाणेच महादजीला सर्वांत मोठी अडचण आली असेल तर ती पैशाची. महादजीजवळ स्वतःचा पैसा नव्हता नि पतही गेलेली होती. हिंदुस्थानातील अवाढव्य मुलुखातून महसूल जमा होईल अशीही आशा नव्हती. लालसोटच्या माघारीनंतर दारिद्र्यामुळे होणारी अवहेलना, त्याला पदोपदी सहन करावी लागत होती. १४ ऑगस्टची हकीगत. “ त्याच्या शिपायांतर्फे पगाराची मागणी करायला आलेले मध्यस्थ ‘ पगार हवाच ’ म्हणून हटून बसले. महादजीजवळचा सर्व पैसा तर संपलेला. आपल्या बायकांचे दागदागिने त्याने त्या मध्यस्थांसमोर ठेवले, नि तो म्हणाला, ‘ माझ्याजवळ असलेली सारी जायदाद एवढीच.’ त्यावर राणाखान उद्गारला, ‘या सगळ्याची किंमत कितीशी येणार ! ” [अखबरात **एसजे** हस्तलिखित, ८३]

पण लक्ष्मीची कृपादृष्टी शिंद्याकडे हळू हळू वळू लागली. “ त्याच्या सरदारांनी वैयक्तिक जामिनकीवर तेरा लाख रुपये कर्ज उभे केले.” राणाखान व इतर सरदारांनी आपल्यापाशी असलेले सगळे सोने व चांदी त्याच्या पायापाशी ठेवली. ही सर्व वितळवून त्याची नाणी पाडण्यासाठी वृंदावनाला पाठविण्यात आली होती. [ऑगस्ट, १७८७, **अखबरात, एसजे** हस्तलिखित ८३,८६] तसेच महादजीच्या उज्जैन येथील राजवाड्यात चांदीचे एक तबक होते. ते वितळवून त्यापासून सात लाख रुपये तयार करण्यात आले. [**एमडी** : भाग २; लेखांक : १५४; त्या आधी ऑक्टोबर महिन्यात उज्जैनहून रक्कम आली होती. **अखबरात** २४३] अलवारच्या राजाने सात लाख रुपये दिले, [ऑगस्ट, १७८७] एक लाख त्याने स्वतः व स्थानिक सावकारांमार्फत सहा लाख जमा झाले. [अखबरात, ११६] गोहदवरील मोहिमा चालू असताना त्याने अहिल्याबाई होळकरकडून बराच पैसा कर्जाऊ घेतला होता. त्यामुळे नवीन मोठी रक्कम कर्जाऊ मागायला त्याचे मन घेईना. आपल्या वैयक्तिक पतीचा उपयोग करून, महादजीला पाच लाख रुपये कर्जाऊ देण्याबाबत नाना फडणविसाने पुण्यातील सावकारांचे मन वळविले. परंतु पेशव्यांच्या खजिन्यातून आणखी पाच लाखांचे साहाय्य मागितले होते. ती मागणी मात्र नानाने

फेटाळून लावली. दैवगती अशी की, कर्ज म्हणून उभारलेले पाचलाख रुपयेही महादजीला ऑक्टोबर अखेरपर्यंत मिळाले नव्हते. [**एचपी.** क्रमांक, ५०९]

माळव्यात खूपच अव्यवस्था व गोंधळ होता. कडक उपाय योजून महादजीने सगळे ठाकठीक केले. त्याचा परिणाम असा झाला की जानेवारी, १७८८ मध्ये प्रत्यक्षात त्याचे महसुली उत्पन्न बारालाख किंवा त्याहूनही अधिक येऊ लागले. [**पीआरसी** खंड १, क्रमांक : १९६,२०१] दख्खनमधून येणार असलेली कर्जाची रक्कम त्याला त्याच्या जांबगाव येथील माणसामार्फत नंतरच्या मार्च महिन्यात मिळाली. [**एचपी** : क्रमांक ५१६]

अशा प्रकारे महादजीला आर्थिक अडचणीतून यथाकाल बराचसा दिलासा मिळाला. त्यामुळे त्याच्या सैन्यातही म्हणण्यासारखी वाढ झाली. सुरवातीला मात्र, दातावर मारायला तनसडी नाही आणि गनीम चौफेर कहर करून राहिलेला, अशा अवस्थेत त्याला वेड लागायचेच बाकी होते. त्याच्या प्रबळ शत्रूंत सर्वांत धोकादायक म्हणजे इस्माइल बेग हमदानी व गुलाम कादरखान [झबिताखानचा मुलगा]. दोघांजवळही मोठ्या व प्रबळ सेना होत्या. इस्माइल बेग हा जुन्या मुगल सेनेचा प्रमुख होता तर गौसगड व रोहिलखंडातून आलेल्या रोहिल्यांच्या सैन्याचे नेतृत्व गुलामकादरकडे होते. त्याचा तिसरा शत्रू नजफकूली-खान. रेवाडी–नारनौळ–कनोड भागांत स्वतःसाठी सवतासुभा निर्माण करण्याची त्याची धडपड चालू होती, तीही माचेडी राजाच्या पैशाच्या पाठबळावर. पण नजफकूली हा ऐषारामी व विलासात दंग असल्याने त्याच्यापासून असणारा धोका नगण्यच होता. जोधपूरचा प्रमुख सेनानी भीमराज याचा भक्कम पाठिंबा असल्याने जयपूरचा राजा ताठ होता. जयपूरचा हा राजा, हीच शिंद्यांची मोठी डोकेदुखी होती. अर्थात तीही पहिल्यासारखी तीव्र राहिलेली नव्हती. त्याचे महत्त्व कमी झाल्याने तो आपोआप गप्प झाला होता. खंडणीबाबत मराठे जर त्रास देणार नसतील तर त्यांना त्रास द्यावा, असे त्यालाही वाटत नव्हते. त्याच्या हालचालीतील उद्देश म्हणजे वडिलोपार्जित राज्याचे नुकसान होऊ द्यावयाचे नाही व आपला मांडलिक माचेडीचा रावराजा याने अन्यायाने जो मुलूख बळकावला आहे तो परत घ्यायचा. मात्र त्यासाठी आपल्या सीमा सोडून बाहेर जाऊन हल्ला करावा, असे त्याला वाटत नव्हते. महादजीने लालसोटहून माघार घेतली त्याबद्दल त्याने गैर उद्गार काढले नव्हते. (कछवा राजाला त्यामुळे उलट हायसेच वाटले होते.) पेशव्यांशी त्याचा दावा नव्हता, उलट छत्रपती शिवाजी आणि पहिला मिर्झा राजा जयसिंग यांच्या वेळेपासून तो मराठ्यांना आपल्यातलेच मानीत असे. शिंद्यांच्या मोहिमा थांबवता येतील असे काही करावे म्हणून त्याने पेशव्यांना विनंती केली होती. (**अखबरात एसजे** हस्तलिखित ५१, इब्रत : भाग ३; २१]

३. शिंदे आणि इस्माइल बेग तंटा : पहिला टप्पा : मराठ्यांना उत्तरेतून हुसकण्यात येते.

महादजीच्या अधिकाराला ग्रहण लागल्यावर त्याचा दरारा कमी झाला. त्या काळात महादजीला जो निर्णायक लढा लढावा लागला त्याची हकीगत अशी : मराठा सैन्याने लालसोटहून माघार घेतली, त्या वेळी त्यांचा पाठलाग करून जयपूर राजाने त्यांना चंबळ-

ीकडे हाकलून द्यायला हवे होते. त्या ऐवजी आपल्या राज्याच्या ईशान्येकडील सीमेवर
ढून जाऊन नरूका राव याच्या ताब्यातील किल्ले परत घेण्यावर त्याने आपले लक्ष केंद्रित
. जयपूरराजाच्या या कृत्याने इस्माइल बेग व अन्य मुगल सरदार त्याच्यावर नाराज झाले.
बक्षी असताना मिर्झा नजफखानने अफाट मुलुख मिळवून ठेवला होता; त्यातला जमेल
का लुबाडून आपल्या जहागिऱ्या वाढवायच्या हा त्यांचा स्वार्थी हेतू होता. शिवाय
नी साहाय्य दिले म्हणून जयपूर राजा त्यांना जी रक्कम देणार होता तीही त्याच्याजवळ
हती. तुंगाच्या लढाईनंतर त्याच्या बाजूला जे तेलंगी आले होते त्यांचा तोफखाना
पूर राजाला हवा होता. त्यासाठी त्याने जी धडपड केली त्यातूनच तंटा उद्भवला.
बत : भाग ३, २१; अखबरात ५८, ६३]

जयपूरराजाकडे राहिल्यास नशीब उचकटण्याचा संभव नाही म्हणून इस्माइल बेग,
क मुहमद खान व अन्य मुगल सरदार त्या राजाच्या लष्करातून बाहेर पडून आग्र्याकडे
ून गेले. त्यांच्या जाण्याने राजपुतांच्या डोक्यावरील बोजा कमी झाला व त्यांनी
केचा निश्वास टाकला. इस्माइल बेग वगैरेंकडे मुगल घोडदळ होते. त्याशिवाय
ायांच्या तीन पलटणी व साठ तोफा होत्या. त्यांपैकी काही तोफा चांगल्याच मोठ्या होत्या.
च्यापुढे उभे रहायला योग्य असा महादजीकडील सेनाधिकारी म्हणजे रायाजी पाटील
ाच. त्याच्या हाताखाली भीमथडी तट्टावर बसणारे चपळ स्वार होते, पण तोफा नव्हत्या
णि प्रशिक्षित बंदुकधारीही नव्हते. दिग् येथे आपल्या सैन्याला चाळणी लावून महादजीने
ना हाकलून दिले होते त्यांत तेलंगी व हिंदुस्थानी शिपाई होते. फक्त द बॉन्य व लेस्तेनो
या हाताखालील चार पलटणी होत्या. तसेच आपल्या सर्व प्रचंड तोफा त्याने माळव्यात
वून दिल्या होत्या; त्यांपैकी फक्त चार व दुसऱ्या काही छोट्याशा तोफा ठेवून घेतल्या
ा. पानिपतचा धडा तो विसरू शकत नव्हता. गनिमी काव्याचा उपयोग करावयाचा
अवजड व हलवायला कठिण असा तोफखाना सांभाळीत बसून चालणार नव्हते.
याशा चपळ तट्टावर बसून हल्ले चढविणारे भालाइत हेच त्याच्या सैन्याचे प्रमुख अंग
. [अखबरात् ८८; **पचपी** : क्रमांक ५०४]

आपला तोफखाना व बंदुकांच्या साहाय्याने इस्माइल बेगने रायाजी पाटलाला
ाच पळवून लावले. (११-१५ सप्टेंबर) व तो स्वतः आग्र्यानजीक आला. लखबादादा
ड हा आग्र्याच्या किल्ल्याचा मुख्य किल्लेदार होता. "किल्ल्याचे रखवालीस एक पलटण
सिसांचे कदीम होते, ते व किल्लेदार आपले जमियतीनिशी इस्माइल याचे मुकाबल्यास
े. पिछाडीस रायाजी पाटील होते. चहूकडून घेरून जखड बसविली. इस्माइल बेग
ढून गेला असता तीन वेळा लढाई करून माघारी फिरवला. किल्ल्याचे रखवालीस इकडील
टण मुसा लुस्तुनो फरासीस याचे होते. तो कदीम देशी होता. ते समयी चाकर
न वाढविला असता फितुरास मिळोन समयास इस्माइल बेगला मिळून आपल्या फौजेवर
ाचे गोळे मारले व इस्माइल बेगला शहरात घेतला. शहरातले मोगलही त्याला सामील
." (**पचपी** पत्र ५०४)

आपल्या सैन्यातल्या शिपायांना पगार न मिळाल्यास ते काय करतील या बाबतचे धोके लेस्तेनोने महादजीला वरचेवर सांगितले होते. महादजीने फक्त फसवी आश्वासने दिली होती. आग्र्याचा किल्ला इस्माइल बेगच्या हातात विनासायास पडला. पराभूत झालेला रायाजी मराठ्यांचा मित्र म्हणविणाऱ्या भरतपूरच्या राजाकडे गेला. लखबादादाचा संबंध किल्ल्याशी तुटला होता तरी दुसऱ्या दिवशी तो पुन्हा किल्ल्यात जाऊ शकला. लेस्तेनो इस्माइल बेगला मिळाला. पगाराच्या पैशाऐवजी त्याला आग्र्याच्या उत्तर बाजूकडील काही मुलूख जहागिरीदाखल देण्यात आला. आग्रा किल्ल्यातील मराठा शिबंदीनी मात्र, कर्तृत्ववान व धाडशी लखबादादासारख्या किल्लेदाराच्या नेतृत्वाखाली नऊ महिनेपर्यंत किल्ला लढवला. जून १७८८ त लखबादादाच्या धन्याने आपला दरारा पुन्हा निर्माण केला.[३]

आग्रा शहराचा पाडाव हा महादजीला अवमानित करणारा जबरदस्त धक्का होता. तर त्याच्या शत्रूंना, त्यांची मान उंचावणारा विजय होता. जाट व मराठा सत्तेखाली आग्र्याला फार महत्त्व आले होते, एक संपन्न व समृद्ध शहर म्हणून मुसलमानी साम्राज्यात त्याचे नाव मोठ्या गौरवाने घेतले जाई. धनाढ्य सरदार दरकदारांना सुरक्षित व बिनधोकपणे राहण्यासारखे ठिकाण अशी दिल्लीपेक्षाही आग्र्याची ख्याती होती. इस्माइल बेगला पैशाची विलक्षण निकड असल्याने त्याने शहरातील माणसांना धारेवर धरले. रु. ३५ हजार देऊन शहरवासीयांनी आपली सुटका करून घेतली तरीही नौबत राय (महादजीचा दिवाणजी) व नारायणदास (अफ्रासियाबचा दिवाणजी) यांच्या घरांवर छापे घालून खणत्या लावून सोनेचांदी व रोकड मिळून तीन लाखांचा ऐवज काढण्यात आला. इस्माइलच्या दरिद्री शिपायांचा या रकमेतून पगार करण्यात आला; त्याशिवाय नवीन शिपायांची भरती झाल्याने ही संख्या वीस हजारांहूनही जास्त झाली. [**डीवाय :** भाग १, लेखांक २८६]

आग्र्याच्या चकमकीनंतर दोन्ही बाजू जवळजवळ दीड महिना थंड होत्या. द बॉन्यच्या पलटणी धरून महादजीचे सैन्य पंधराहजारांहूनही कमी होते. घोडदळसुद्धा फारसे चांगले नव्हते. सगळी छोटी छोटी भीमथडी तट्टे. द बॉन्यचे संगीनधारी हजारापेक्षाही कमी; कोणत्याही ठिकाणाहून मदत येण्याची शक्यता दिसत नव्हती; शत्रूंनी चौफेर उठाव केल्याने महादजी गोंधळून गेला होता.

ऑक्टोबर अखेर महादजीला उठाव करावाच लागला. दुसरी आघाडी उघडून शत्रूचा एके ठिकाणचा जोर कमी करावा म्हणून त्याने आपल्या सैन्यातील अधिकारी अंबाजी इंगळे (घोडदळ व पायदळ मिळून ८,०००) याला जयपूर राज्यात छापे घालायला पाठवून दिले. पूर्वी मराठ्यांकडे असलेले अजमेर, जोधपूर राजाने २७ ऑगस्टला घेतले होते. ते परत घेण्याचा प्रयत्नही अंबाजीने केला. दोन्ही मोहिमांत त्याला अपयश आले. शेवटी एका अनपेक्षित हल्ल्यात अत्यंत दारुण असा पराभव पत्करून आपल्या जवळचे सर्व सामानसुमान टाकून, अंबाजीला महादजीकडे अल्वार येथे पळून जावे लागले. [इब्रत : भाग ३, ५३; **अखबरात :** २०४–२३७]

दरम्यान गुलाम कादर मोठ्या मस्तवाल मग्रुरीने दिल्लीवर चालून गेला होता. (१६ ऑक्टोबर,) बादशहा काकुळतीला आला व त्याने शिंद्याकडे मदत मागितली.

म्हणून दि. २८ ला अल्वार सोडून महादजी रेवाडी आणि पतौडी या दरम्यान येऊन थांबला. (४ नोव्हेंबर) या ठिकाणी त्याला महिनाभर मुक्काम करावा लागला. त्याच्या शत्रूने दिल्लीवर आपला पूर्ण वचक बसवला व त्याने म्हणजे महादजीने दिल्ली दरबारात पाऊल टाकू नये असा बादशहाला हुकूम काढायला लावला. (१५ नोव्हेंबर) शिंद्याला काहीच करता येत नव्हते. कुमक येण्याची वाट पाहणे एवढेच त्याच्या हातात होते. राजपुत्र जवान बख्त (जहांदर शहा) हा शहा अलमचा थोरला मुलगा. वाराणसी येथील इंग्रजांचा आश्रय सोडून तो निघाला तो आपली वडिलार्जित जायदाद परत मिळवावी व आपला गताधिकार पुन्हा प्राप्त करून घ्यावा याच उद्देशाने. वाराणसीहून तो निघाला तो १ नोव्हेंबरला (फरुकाबाद, जेलसर मार्गे) मथुरेला आला. इस्माइल बेगच्या मदतीने प्रचंड घणाघाती हल्ला करता आला तर पहावा म्हणून तो आग्र्यास आला होता. इस्माइलने त्याबाबत बिलकूल उत्साह दाखविला नाही; तेव्हा निराश मनःस्थितीत ८ डिसेंबरला तो दिल्लीत आला. जवान बख्त इस्माइल बेगशी बोलणी करण्यात गुंतला असताना आग्र्याच्या किल्ल्यावर हल्ला करून तो घेता आला तर पहावा असे महादजीला वाटले होते. तसे न करावे, तर गनीम तिन्ही बाजूंनी चेपील व आपल्याला चंबळेपलीकडे हाकलून देईल, ही भीती होती. म्हणून त्याने डिसेंबरच्या सुरवातीसच रेवाडी सोडली[४] व तो शिकंदरा (आग्रा) येथे झाला. इस्माइल बेग त्याठिकाणी तळ टाकून होता. शत्रुसैन्याच्या तुलनेत मराठा सैन्य फारच थोडे होते. नुकत्याच स्वीकाराव्या लागलेल्या पराभवाने त्यांना एक प्रकारचे नैराश्य आले होते. त्यांच्याजवळ प्रचंड तोफखानाही नव्हता. पण शिंद्याने शेवटचा निकराचा प्रयत्न करावयाचे ठरवले. आपल्या सैन्याला मान ताठ ठेवण्याचे आवाहन करून त्याने त्यांच्या स्वाभिमानाला फुंकर घातली. दहा हजार स्वारांनिशी त्याने राणाखानला पुढे पाठवून दिले. भरपूर स्वार व पायदळ बरोबर घेऊन इस्माइल बेग तावडतोब बाहेर पडला. त्याच्याकडे तेहतीस तोफा होत्या. (१६ डिसेंबर) जिवाची बाजी लावून लढायचे अशा आणाभाका घेऊन मराठा स्वार हमदानीच्या सेनेवर पुनःपुन्हा तुटून पडले; हमदानीचे थोडेफार नुकसान झाले. इस्माइल बेगने आपले सैन्य जवळ जवळ आणून एक भली भक्कम फळी तयार केली व शत्रुसैन्याच्या केंद्रस्थानी हल्ला चढवून तोफगोळ्यांचा वर्षाव करीत त्याने जे समोर सापडेल ते हस्तगत करायचा सपाटा लावला. अतोनात हानी सहन करून मराठ्यांना शेवटी माघार घ्यावी लागली. द बॉन्य कडील तज्ज्ञ शिपायांनी महादजीभोवताली एक संरक्षणात्मक कडे तयार केले व या कड्याभोवती तोफा ठेवून त्यांचा भडिमार करीत त्यांनी महादजीला रणमैदानातून सुखरूपपणे बाजूला नेले. किल्ल्याला वेढा घालून बसलेले इस्माइलचे शिपाई महादजीविरुद्ध लढायला गेले, ही घटना लखबा दादाच्या पथ्यावर पडली; या परिस्थितीचा फायदा घेऊन त्याने बराचसा दाणागोटा बाहेरून आणवून किल्ल्यात साठवून ठेवला.

सिकंदरच्या लढाईतून पळालेले शिपाई माघार घेत घेत धोलपूरपर्यंत आले. शिंद्याने त्यांना एकत्र आणले. त्यांच्या मागोमाग इस्माइल बेग अगदी नजीक येऊन ठाकला; त्यामुळे त्याच महिन्याच्या दि. २० रोजी लढाईची दुसरी फेरी करावी लागली. मराठ्यांनी कौतुकास्पद पराक्रम केला; पण स्वत: पुढे होऊन इस्माइल बेग वारंवार हल्ले चढवीत राहिल्याने हा प्रतिकार विफल ठरला. त्यातच एक संदूक, दारूचे कोठार उडाले. त्यामुळे नंतर प्रतिकार थांबवून या शिलेदारांनी माघार घेतली व आपली तट्टे चंबळेच्या पाण्यात घुसवून नदीपार होऊन ते शिंद्याच्या राज्यात आले. मराठ्यांची छावणी व सर्व चीजवस्त लुटण्यात आली. धोलपूर किल्ल्यानजीक असलेल्या त्यांच्या एका ठाण्याला इस्माइलच्या सैन्यातील एका तुकडीने वेढा घातला; व स्वत: इस्माइल आग्रा किल्ल्यासमोर टाकलेल्या आपल्या छावणीत निघून गेला. ग्वाल्हेरच्या उत्तरेस २८ मैलांवर चंबळा आणि कुमाडी नदीच्या पलीकडे शिंद्याने माघार घेतली.

या माघारीनंतर मराठा सत्तेचा हिंदुस्थानातील उरलासुरला ठसाही साफ पुसला गेला. चंबळेच्या उत्तरेस महादजीला रणजितसिंग जाटाशिवाय नाव घेण्यासारखा मित्र उरला नाही; दोन किंवा तीनच ठाणी राहिली, तीही शत्रूने वेढलेली.

एका संकटामागोमाग दुसरे संकट दत्त म्हणून उभे राहिले. दि. २४ डिसेंबरला अजमेरचा किल्ला विजयसिंगाच्या हवाली करण्यात आला.[५] मराठ्यांनी थोडासुद्धा प्रतिकार केला नव्हता. नजफकूलीने गोकुळगड हस्तगत केला, गुलामकादरने खुजीचा किल्ला घेऊन मुंडसान व अलिगढ किल्ल्यांना वेढा घातला; तर अनूपगीर गोसाव्याने फिरोदाबाद जिंकले.

४. मोहिमेचा दुसरा टप्पा : मराठ्यांचा गनिमीकावा तरीही इस्माइल बेगची सरशी

माघार घेतल्यापासून सात दिवसांच्या आत महादजीने आपल्या सर्व माणसांना एकत्र आणले व अगदी नवी पण परिणामकारक अशी योजना तयार केली. ग्वाल्हेरच्या मुलुखातील शक्य तेवढे सगळे सैन्य त्याने एकत्र केले व आपल्या मुलुखातील करोली, नरवाड व अन्य ठिकाणचे जे सरंजामदार बंड करून उठले होते त्यांचा समाचार घेण्याचे काम त्या सैन्यावर सोपवले. या उपाययोजनेचे फलित फेब्रुवारी महिन्यात दिसू लागले. करोलीच्या राण्याला समझोता करावाच लागला; ग्वाल्हेर मुलुखातले बंडखोर सरंजामदार चेपून टाकण्यात आले. उदयपुरातील सोंद्यांनी माळव्याच्या सरहद्दीवर पुंडाई चालवली होती; पण बऱ्हाण-पूरहून आलेल्या मराठ्यांनी त्यांचा बीमोड केला. भिलसाच्या तुरुंगातून राघोगडच्या राजाचा मुलगा निसटून गेला होता, त्यानेही सगळीकडे धुमाकूळ घालावयास सुरवात केली होती. राणाखानाने खिची राज्य पुन्हा जिंकले होते. पण व्यवहारचातुर्य व धूर्तपणा दाखवून महादजीने राणाशी मैत्री केली. त्याचे स्वातंत्र्य व मुलूख त्याला परत दिला; मात्र त्या बद-ल्यात राणाने महादजीला खंडणी द्यायची होती.[६] मार्चच्या मध्यापर्यंत महादजीची परि-स्थिती इतकी सुधारली की चंबळेच्या उत्तरेस हल्ला करायचा म्हटले, तर ते अशक्य नव्हते.

सतत मित्रत्व ठेवून एकनिष्ठ रहाणारा शिंद्याचा खास मित्र म्हणजे जाट राजा रणजितसिंग. त्याचे वाडवडिलार्जित असे सर्व किल्ले महादजीने त्याला परत दिले होते व 'तुला सूरजमलच्या अमदानीतले वैभव पुन्हा मिळवून देईन' असे आश्वासनही दिले होते. स्वत्व राखण्याच्या मानवी स्वभावाला धरून रावराजा माचेडीकराप्रमाणे शिंद्याला धरून होता.॰ मिर्झा नजफखानाने एकवार जाटांचा सर्व प्रदेश जिंकला होता. तसा तो सर्व पुन्हा जिंकून घ्यावयाचा व बदनसिंगच्या अमदानीत होती, तशी छोट्या जमीनदारी अवस्थेप्रत जाट सत्ता आणायची, अशी इस्माइल बेगने अगदी शपथच घेतली होती. शिंद्याने माघार घेतल्यानंतरच्या दोन महिन्यांच्या कालावधीत रणजितसिंगाने आपल्या जमातीतील शूर वीरांची भरती करून आपल्या सैन्यात चांगली वाढ केली. इस्माइल बेगच्या सैन्यातील पगारी शिपायांची पैशाअभावी कुतरओढ होत होती. ते वैतागले होते. शहा निजाम-उद्दीनच्या मदतीने त्याने या शिपायांना आपल्याकडे बोलावून घेतले. मलिक मुहमद खान हा पूर्वी शिंद्याकडे होता. शिंद्याचा विश्वासघात करून तो बेगच्या बाजूला आला होता. अशा या मलिकच्या जहागिरीतील कोइल व जेलसर हे गुलाम कादरने बळकावले व त्यानंतर हा रोहिला सेनानी इस्माइल बेगला मिळाला. हे पहाताच चीड येऊन मलिक मुहमद खान बेगकडून निघाला व रणजितसिंगाकडे आला. आपल्या समवेत त्याने मसिए लेस्तेनो (त्याच्या दोन्ही पलटणीसह) व जहांगीरखान (एका पलटणीसमवेत) यांनाही आणले. मात्र त्यांना जास्त पगार द्यायचा ही अट होतीच. "इस्माइल बेग व गुलाम कादर यांना सोडून किती तरी स्वार व प्यादे प्रत्येक दिवशी जाटांच्या लष्करात भरती होऊ लागले. जाटांचा सगळा मुलूख व उत्तरेत मराठ्यांनी बळकावलेला प्रदेश हा सर्व परत जिंकून घ्यायचा व त्यानंतर त्याची वाटणी कशी करायची याबाबत एक करार करून वाटून घ्यावयाच्या प्रदेशाच्या सरहद्दी कशा असाव्यात याची आखणीही आधीच करून ठेवली होती." [इब्रत : भाग ३; १०६]

राजपूत बंडखोर व माळव्यातील स्थानिक आक्रमक यांचा बंदोबस्त झाल्याने त्यांची गडबड थांबली. शिंद्याच्या जांबगाव येथील माणसाने नव्याने उभारलेल्या ताज्या दमाच्या सैनिकांच्या तुकड्या त्याच्याकडे यायला निघाल्या होत्या व लवकरच तिथे येऊन दाखल होणार होत्या. [पेशव्यांनी आश्वासन दिल्यानुसार एकही नवी तुकडी आली नव्हती.] शिंदे, सर्व कचकचीतून नुकताच सुटकेचा श्वास टाकीत होता. अशा वेळी जाटराजाने त्याच्याकडे लष्करी साहाय्य मागितले. त्यानुसार त्याला जाऊन मिळण्यासाठी महादजीने १६ मार्च १७८८ रोजी स्वारांची एक सुसज्ज तुकडी व शिपायांची एक पलटण आणि काही थोड्या तोफा एवढा सरंजाम चंबळेपलीकडे पाठवून दिला. [**पीआरसी :** खंड १, पत्र २०८] गुलाम कादर हा आपल्या सैन्यासह आग्र्यानजीक जाऊन इस्माइल बेगला मिळाला. त्यामुळे महादजीचा शत्रू बळावला, त्याची ताकद वाढली. इस्माइल बेग व गुलाम कादर या दोघांची ध्येये व विचार परस्परांना छेद देणारे असल्याने त्या दोघांचे पटेनासे झाले. थोड्याच दिवसांच्या अवधीत गुलाम कादर अंतर्वेदीत परत गेला (अंदाजे

३१ मार्च). फिरोजाबादच्या किल्ल्याला घातलेला वेढा बळकट करायचा होता, आग्रा येथे गुलाम कादरचा मुक्काम फार नव्हता; त्याचवेळी मराठा सैन्याची एक तुकडी चंबळा ओलांडून उत्तरेकडे आली. या तुकडीची व गुलाम कादरची तीन दिवस चकमक उडाली. (२५–२७ मार्च) इस्माइल बेग दक्षिणेकडून चालून आला. खूप नुकसान सोसून मराठा तुकडीला माघार घ्यावी लागली. [**डीसी : पीआरसी** : खंड १ क्रमांक २०८, २१०; **इब्रत** : भाग ३; १०७–१०८] ही आव्हानात्मक चाल, महादजीच्या दृष्टीने एक चाचणी होती. त्यात अपयश आले ते ती तुकडी लहान असल्याने. शिवाय त्या तुकडीला येऊन मिळण्याइतकी तत्परता जाट राजाने दाखविली नाही, व या एकाकी तुकडीला गाठून तिचा समाचार घेण्यात इस्माइलने जराही वेळ घालविला नाही.

दि. ४ एप्रिलला महादजीने राणाखानच्या हाताखाली पहिल्यापेक्षा मोठी पण अधिक चपळ अशी तुकडी पाठविली. या तुकडीत दहाहजार स्वार व द बॉन्यच्या दोन बंदुकधारी पलटणी होत्या. मराठा सैन्य चाल करून येत आहे हे समजताच आग्रा किल्ल्यासमोरील खंदकातून थोडे शिपाई ठेवून, इस्माइल बेग दक्षिणेकडे चालून गेला. इस्माइलबेग येतो आहे हे समजताच लढाई न करताच मराठा तुकडी रूपवासहून धोलपूरला आली. बेगने प्रथम रूपवास येथे तळ टाकला व मग धोलपूरला जाऊन चंबळेच्या पाण्याला केव्हा उतार मिळतो याची वाट पाहत बसला. राणाखान, रायाजी पाटील, जिवादादा व इतर मराठा सेनाधिकाऱ्यांनी एक आड मार्ग शोधून काढला व शत्रूला पत्ता न लागू देता चंबळा पार होऊन ते धोलपूरच्या पश्चिमेस काही मैलांवर येऊन दाखल झाले. वाटेत त्यांना जाट सैन्य मिळाले. मग या संघटित सैन्याने इस्माइल बेगच्या सैन्याचे पिछाडीवर हल्ला चढवून आग्रा किल्ल्याला वेढा देऊन बसलेल्या शिपायांना तोंडात बोट घालायला लावले. ‘ इस्माइल बेगचा वृद्ध बाप व उमराव गीर गोसावी आगरियाचे बंदोबस्तास होते ’ त्यांचा धीर खचून त्यांचा पराभव झाला. ‘ उमरावगिराचे पथक लुटून उमरावगिरास धरून नेऊन त्याची सलतनत, हत्ती, घोडे सर्व लुटून फस्त केले. ’ [७ एप्रिल] विजयी मराठे इछनेरास परत आले. [**डीवाय**–भाग १, लेखांक : २८३, २८५, २९८ : **सात**. खंड १. १३२; **एचपी** : क्रमांक ५१२, ५२० : इब्रतनाम्यात बराच गोंधळ केला आहे.]

सगळेच उलटेपालटे झाल्याचे ऐकल्यावर इस्माइल बेग ताबडतोब आग्र्यास आला. गुलाम कादरशी बोलणी पक्की केली; अंतर्वेदीत असलेल्या सैन्यासह त्याला आपल्याकडे यायला सांगितले ‘ परस्परे शपथ प्रमाण कुराण होऊन पगडीबदल भाऊपणा केला ’ व एकत्र बसून भोजन केले. ठरल्याप्रमाणे आग्रा किल्ल्यास आपण वेढा घालीत आहोत अशी आवई उठवून ते दोघेही भरतपूर जिंकायला निघाले. त्या दोघांच्या एकत्रित सैन्यात १२,००० स्वार, २५,००० पायदळ व शंभर तोफा होत्या. जाट व मराठा सैन्यही दोन्ही मिळून कमी नव्हते, पण सारखा मार खावा लागल्याने मराठा शिपायांचा धीर थोडाफार खचला होता तर जाटांकडे अचूक मार्गदर्शन करणारा नेता नव्हता. शिवाय चांगले लढाऊ स्वार व योग्य अशा तोफांचाही त्यांच्याकडे अभाव होता. तेव्हा मुसलमान सैन्यापासून सुरक्षित

अंतरावर राहून त्यांच्या भोवताली गोलाकार राहायचे व त्यांच्याकडे जाणारी रसद त्यांच्यापर्यंत पोहोचू द्यायची नाही ही कामगिरी काही दिवस त्यांनी फार चांगल्याप्रकारे पार पाडली. तरी दोन्ही बाजूंचे सैन्य दि. १९ ला आमनेसामने आलेच. दुसऱ्या दिवशी अछनेराच्या दक्षिणेस चार मैलांवर किरोली येथे तुंबळ युद्ध झाले. फार मोठ्या प्रमाणावर संहार झाला. अंदाजे एक हजार शिपाई कामी आले. जाटांच्या बारा तोफा गमावल्या. जाट व मराठे भरतपूरला माघारी आले व त्या किल्ल्याला वेढा घालण्यासाठी विजयी मुसलमान सेना विजयाच्या आरोळ्या देत पुढे सरसावली. जाट राजाने मराठा सैनिकांना धीर दिला व पुन्हा लढायला उद्युक्त केले. शेवटी भरतपूरच्या ईशान्येस दोन मैलांवर जागीना येथे पुन्हा अखेरची झुंज झाली. त्यातून निर्णायक असे काहीही हाती लागले नाही. मात्र राणाखानाला गोळी लागून तो जखमी झाला.[८] इतिहासकार खैरउद्दीन मराठयांच्या अपयशाचे अगदी वेगळे कारण देतो. ते असे : ' जहांगीरखान आपल्या दोन तुकड्या व दहा तोफांसह रणजितसिंगच्या सैन्यात सामील झाला. जाट सैन्यासमवेत मराठ्यांच्या बाजूने बेगविरुद्ध लढताना या इसमाने जातीवर जाऊन ऐनवेळी मराठ्यांना दगा दिला. दारुगोळा न ठासताच इस्माइल बेगच्या सैन्यावर तो तोफा डागण्याचे नाटक करीत होता. अशाप्रकारे इस्माइलच्या सर्व सेना इजा न होता राहिल्यावर जहांगिरखान हा मराठा सैन्याच्या पिछाडीस गेला व त्याने मराठा आणि जाट सैन्यावर तोफा डागल्या. " शेवटी सायंकाळी राणाखानने माघार घेतली. विजयी मुसलमानांनी शत्रूच्या बऱ्याचशा मालमत्तेवर हात मारला; पण, त्या दिवशी हजारोंनी शिपाई कापले गेल्याने कुणातच लढण्याचे त्राण उरले नव्हते."

५. मोहिमेचा तिसरा टप्पा : इस्माइल बेग जाटांचा धुव्वा उडवतो : मराठ्यांचे महत्त्व पुन्हा वाढते

भरतपूरच्या किल्ल्यावर हल्ला करणे हे शहाणपणाचे ठरणार नाही असे[९] वाटून इस्माइल बेग, गुलाम कादरबरोबर कुंभेरच्या किल्ल्यावर हल्ला करायला निघाला. तिथे पुरेशी शिबंदी नव्हती, अन्य संरक्षणव्यवस्थाही दुर्लक्षित होती. शिवाय शिबंदीला धीर देईल किंवा मार्गदर्शन करील असा किल्लेदार नव्हता. त्यामुळे शत्रूने दुपारभर केलेल्या तोफांच्या भडिमाराने खचून जाऊन किल्लेदाराने त्याच रात्री किल्ला खाली करून दिला. दुसऱ्या दिवशी (३ मे) इस्माइल बेग व गुलाम कादर या दोघा खानांनी किल्ल्यात प्रवेश केला. तिथे असलेली सर्व संपत्ती व चीजवस्त घेतली. राजा सूरजमल जाटापासून संग्रहित करून ठेवलेल्या त्या साहित्यात हजारो बंदुका, समशेरी, दारूगोळा आणि धान्याचा प्रचंड साठा होता.

कुंभेर पडल्याने जाटांना चांगलाच हबका बसलेला असणार, त्यातून ते डोके वर काढायच्या आत आपण दिगच्या किल्ल्यावर हल्ला करावा असा इस्माइल बेगचा आग्रह असल्याने या दोघा सेनानींनी आपला मोर्चा दिगकडे वळविला. मात्र जिंकलेली सर्व लूट त्यांनी कुंभेरच्या किल्ल्यातच ठेवली होती. रात्री इस्माइल बेगने एक हुकूम काढला व

त्यानुसार, सैनिक निशाणासाठी ज्या काठ्या वापरीत, त्या एकत्र जमविण्यात आल्या. सर्व काठ्यांची निशाणे बाजूला काढण्यात येऊन त्या काठ्यांच्या शिड्या तयार करण्यात आल्या. त्यानंतर ते दिगच्या पूर्वेस, दोन मैलांवर असलेल्या भाज या गावी आले. हमदानीचे, किल्ल्यातील परिस्थिती कशी असेल याबाबत बांधलेले अंदाज जराशा घाईगर्दीचेच होते; त्याने त्याच दिवशी दुपारीच किल्ल्यावर चालून जायचा हुकूम केला. सर्व शिपायांना त्याने घोड्यांवरून खाली उतरायला सांगितले व समशेर आणि ढाल हातात घेऊन तो स्वतः त्यांच्यासमवेत निघाला. किल्ल्याच्या तटबंदीशी येऊन तो खाली जमिनीवर बसला. सावलीसाठी वर ना छत ना तंबू. तशाच अवस्थेत बसून राहून त्याने आपल्या शिपायांना शिड्या लावून तटावर चढून जायचा हुकूम केला. "त्यानंतर जे घडले ते प्रलयकाळाची आठवण करून देणारे होते. तटावरील शिपायांना शिड्यांवरून चढून येणारे हमदानीचे शिपाई इतक्या जवळ होते की त्यांनी जो तोफगोळ्यांचा भडिमार केला त्याने शेकडो मुसलमान शिपाई ठार झाले. तोफगोळे पुन्हा परत फिरू लागले. इस्माइल बेगच्या अगदी डाव्या, उजव्या अंगास असणारांपैकी चाळीसजण ठार झाले. त्याच्या खांद्यानजीक बसलेल्या एका शिपायाचे मुंडके, धडावरून अलगद उडून लांबवर जाऊन पडले. हल्ला करायला आलेले मुसलमान शिपाई तटबंदीच्या वरपर्यंत एकदाच येऊ शकले, त्यांनी तेथून आतील खंदकात उतरण्याचा प्रयत्न केला. पण तटबंदीवर गर्दी करून असलेल्या शिबंदीने त्यांच्यावर तोफगोळे टाकले, गोळ्या झाडल्या, बाण उडवले, स्फोटक गोळे (होका) फेकले, प्रचंड शिळा भिरकाविल्या, तेलात भिजवलेले पेटते पलिते टाकले, लाकडाचे प्रचंड ओंडके, विटा, दगड जे हाती आले ते बेधडक टाकले. शेकडोजण ठार झाले, हजारोंना जखमा झाल्या, उरलेले पळून गेले." (अंदाजे १८ मे)

शेवटी हा आततायी प्रयोग फुकट गेला असे निश्चित ठरल्यावर इस्माइल बेग अत्यंत निराश मनःस्थितीत परत फिरला. वेळ अनुकूल होती मराठे व जाट यांना. ते दोघे मिळून मुसलमानांच्या छावणीवर तुटून पडले व तेथील सर्व मालमत्तेची त्यांनी मनसोक्त लूट केली. राणाखान व जाट यांनी पळपुट्या मुसलमानांचा फत्तेपूरसिक्रीपर्यंत पाठलाग केला व त्यांची रसद तोडण्यात त्यांनी यश मिळविले. परिणामी मुसलमानांच्या छावणीत, 'पाचावर धारण बसली.' आपल्या विस्कळित व हताश सैन्याला देता येईल तेवढा धीर देऊन, एका आठवड्यानंतर इस्माइल बेगने तिथला तळ उठवला व तिथून २५ मेला निघून आपल्या साथीदारांसह आग्र्याबाहेर बागडेरा बागेत त्याने आपला तळ टाकला.

अशाप्रकारे दिगवर केलेल्या हल्ल्यातून या दोन खानांवर जो अनर्थ ओढवला त्यातून त्यांनी माघार घेतली. त्यानंतर महादजीने आपल्या ताकदवान स्वारांची (दक्षिणेतून आलेल्या ताज्या दमाच्या शिलेदारांमुळे हे घोडदळ चांगलेच ताकदवान झाले होते) एक तुकडी अंतर्वेदीत पाठवून दिली व गुलाम कादरने तिथे नुकताच जो मुलूख बळकावला होता तिथे लुटालूट करायला सांगितली.[१०] आपले सैन्य संख्येने कमी आहे, तोफखाना असावा तितका कार्यक्षम नाही, शिपायांचा आत्मविश्वास खचला आहे हे माहीत असूनही

महादजीने ही जी क्लृप्ती लढविली त्यामुळे त्याला अपेक्षित असे परिणाम चटकन घडून आले. शत्रूच्या छावणीपासून सुरक्षित अंतरावर घिरट्या घालीत राहून त्याच्या दक्षिणी स्वारांनी शत्रूची छावणी वेढली व छावणीत बाहेरून जाणारा बराचसा पुरवठा बंद पाडला; तर महाराष्ट्रातून नुकत्याच आलेल्या ताज्या दमाच्या पलटणींना त्याने अंतर्वेदीवर हल्ला करायला पाठवले; त्यामुळे अंतर्वेदीतील आपल्या जहागिऱ्यांच्या रक्षणासाठी गुलाम कादरला तिथे यावेच लागले. इस्माइल बेग एकटा पडेल व त्याला दडपून टाकणे आपल्याला अवघड जाणार नाही, हा महादजीचा अंदाज. मराठ्यांचा एक वकील लिहितो, " जाट राजा व शिंदे या दोघांकडील फौजा मात्र गुलाम कादरखान व इस्माइल बेग यांचे फौजेचे आसपास आठदहा कोसांचे अंतराने आहेत. जिकडे हे दोघेजण रुख करितात, तिकडे फौज ठरत नाही. राजश्री पाटीलबावाकडील व रंजितसिंगाकडील फौज पळून जाते. याप्रमाणे अवस्था आहे."

जांबगाव येथे महादजीच्या साहाय्यकर्त्याने नव्या दमाचे जे सैन्य उभारले होते त्यापैकी देवजी गवळी याच्या हाताखाली असलेले ५००० स्वार मणीहून (धोलपूरच्या उत्तरेस नऊ मैल) निघाले होते, व उटंगणपलीकडे उत्तरेकडे जाऊन ते राणाखानाच्या तुकडीला मिळणार होते. आग्रा किल्ल्याचा वेढा अजून चालूच होता. त्याकडे न वळता हे स्वार मथुरा प्रदेशात शिरले. तेथील इस्माइल बेगची ठाणी हुसकावून लावली व वृंदावनचा ताबा घेतला. वृंदावन येथे शत्रूचे सातशे तगडे जवान व दोन तोफा होत्या. ही तुकडी अंतर्वेदीत पळून जाण्याच्या प्रयत्नात असताना मराठ्यांनी त्यांना यमुनातीरी गाठले. त्यातले चारशे ठार झाले; नदीतून पलीकडे जाण्याच्या प्रयत्नात काहींनी प्राण गमावले, दोन फेरी बोटी बुडाल्याने त्यातील काहींना जलसमाधी मिळाली. या तुकडीचे सर्व साहित्य (७०० बंदुका व २ तोफा) तसेच २५ घोडे हस्तगत करण्यात आले.

अशाप्रकारे विजय मिळवून देवजी वेगाने निघाला व उत्तरेस सोळा मैलांवर असलेल्या चिरघाट येथे आला व तेथून अंतर्वेदीत गेला. तिथे त्याला शत्रूच्या मुलुखात गोंधळ घालायचा होता. कारण त्या मुलुखातूनच आग्र्यासमोर तळ देऊन बसलेल्या इस्माइल बेग व गुलाम कादर या दोघांच्या छावण्यांना दाणागोटा पुरविला जात होता. तो, त्यांच्या छावणीपर्यंत पोहोचू न देणे हाही त्यातला एक उद्देश होता. मोठ आणि महावन ही दोन ठाणी रोहिल्यांकडे होती. या ठाण्यांवरील रोहिला अधिकाऱ्यांना ठार मारण्यात आले व ती ठाणी आणि सात तोफा मराठ्यांनी आपल्या ताब्यात घेतल्या. (४–१० जून) कोइलवर हल्ला करण्यात येऊन तिथे सहा तास लूटमार करण्यात आली. शिंद्याचे हे नवीन लष्करी डावपेच अगदी अचूक ठरले. इस्माइल बेग विनवण्या करीत होता तरी त्या झिडकारून गुलाम कादरने आपले बरेचसे सैन्य आग्र्याहून हलवले व अंतर्वेदीतील आपल्या जहागिरीच्या रक्षणासाठी तिकडे पाठवून दिले. यमुनेच्या पाण्याला जोर होता; नदीला आलेल्या प्रचंड पुरामुळे पलीकडील भागाशी संपर्क ठेवताना त्याला अडचणी येऊ लागल्या. पोटात भीतीचा गोळा घेऊनच आपल्या उर्वरित सैन्यासह त्याने यमुना ओलांडली (१५ जून).

इस्माइल बेगचे सामानसुमान व चीजवस्त छावणीत ज्या ठिकाणी ठेवलेली होती त्या ठिकाणावर रात्रीच्या वेळी छापे घालून लुटालूट करण्याचा क्रम मराठ्यांनी काही दिवस चालू ठेवला होता. त्यात त्यांना यशही येत होते. ते लूट उचलत व शत्रूशी दोन हात करायचा प्रसंग येण्यापूर्वीच पोबारा करीत. गुलाम कादर निघून गेल्याने इस्माइल बेगला छावणीत मस्तीने रहाता येईना. त्याच्याकडे येणारा दाणागोटा जवळजवळ पूर्णपणे थंडावला होता. त्याच्या शिपायांची उपासमार होत होती, त्यांच्या अंगावर धड कपडाही नव्हता. शेवटी आपल्या अधिकाऱ्यांसमवेत ते जाटांच्या सैन्यात जाऊ लागले. रोजच्यारोज ही संख्या वाढू लागली. लेस्तेनो व बरेचसे मुगल आणि तेलंगी शिपाई कित्येक आठवड्यां-पूर्वीच शत्रूच्या गोटात जाऊन दाखल झाले होते. गुलाम कादर निघून गेल्यावर दोनच दिवसांनी मराठ्यांनी हमदानीला याद राहील असा तडाखा दिला. (१७ जून)

६. मोहिमेचा चौथा टप्पा : आग्रा येथे इस्माइल बेगचा संपूर्ण निःपात, १७ जून, १७८८

या संपूर्ण मोहिमेतील या निर्णायक[११] टप्प्याच्या वेळी सैन्याची जलद व अचूक हालचाल आणि युद्धनेतृत्वातील सरसेनानीचे कौशल्य या दृष्टीने महादजीच्या कर्तृत्वाचा कळस गाठला गेला असे म्हटले पाहिजे. यावेळेपर्यंत जाट व मराठा यांचे स्नेहसंबंध पक्के झाले होते. जाट सैनिक हा मूलतः शेतकरी, त्याच्याजवळ धैर्य व सहनशीलता हे दोन मोठे गुण. पण लायक असा नेता न मिळाल्याने त्यांचे हे सुप्तावस्थेत असलेले दोन गुण, मराठ्यांच्या चोख मार्गदर्शनामुळे त्यांना समजू शकले. तसेच, फ्रेंचांच्या नेतृत्वाखालील बंदुकधारी पलटणीच्या धिम्या हालचालीमुळे मराठ्यांच्या चपळ घोडदळालाही आवश्यक तो संथपणा आला. या दोन गोष्टींमुळेच महादजीला संपूर्ण विजय मिळू शकला.

गुलाम कादरच्या सैन्यातील तुकड्या आग्रा येथून अंतर्वेदीत जाऊ लागल्याबरोबर राणाखानाने तातडीने जासूद पाठवून अंतर्वेदीत असलेल्या देवजी गवळीला आपल्या मदतीला बोलावून घेतले. देवजी गवळी ताबडतोब त्याच्याकडे आला. मग आपल्या सुसज्ज सैन्यासह राणाखान, इस्माइल बेगवर स्वारी करायला बाहेर पडला. महादजीनेही या निर्णायक लढ्यासाठी सैन्यात आत्मविश्वास आला पाहिजे हे समजून घेऊन त्याकरिता त्याने एक लाख तेरा हजार रुपये व शंभर घोडे पाठवून दिले. लेस्तेनो व द बॉन्य यांच्या तुकड्यांत दहा तोफांची भर घातली. रामरु हा तेलंग्यांच्या सैन्याचा मुख्य. त्याच्या हाताखाली चार पलटणी व दहा तोफा होत्या; पण इस्माइल बेगच्या समवेत त्याच्या कर्तृत्वाचे चीज होत नव्हते; त्याच्याकडून पैसाही मिळत नसे; म्हणून इस्माइलचा पक्ष सोडून त्याने राणाखानाकडे यायचे ठरविले. सावकाराच्या नावाची साठ हजाराची हुंडी व लढाई सुरू होईल त्या दिवशी जहागिरीदाखल काही मुलूख द्यावयाचा असा करार होऊन तो राणाखानाकडे आला होता.

१७ जूनची भाग्यशाली सकाळ. फ्रेंच सेनानीच्या नेतृत्वाखालील सैन्य त्याने मधोमध उभे केले, तोफखाना त्यांच्यासमोर उभा केला. त्याच्या दोन्ही अंगांना घोडदळाच्या दोन

लिष्ठ तुकड्या होत्या. घोडदळाची तिसरी तुकडी मधोमध असणाऱ्या पायदळाच्या छाडीस होती. योग्य वेळ येताच वर्तुळाकृती रचना करून शत्रूच्या पिछाडीवर तुटून डायचे असे त्यांना हुकूम होते.

आग्र्याच्या बागडेरा या उपनगरासारख्या ठिकाणी इस्माइलच्या सैन्याचा तळ होता. ठिकाणी असणाऱ्या इस्माइलच्या शिपायांनी मराठा व जाट यांचे एकत्र येणारे सैन्य हिले होते. पण आपला शत्रू भेकड असल्याने त्याच्या या किरकोळ हालचाली चालल्या सतील या घमेंडीत त्यांनी या सैन्याकडे दुर्लक्ष केले व जरूर ती तयारी केली नाही. ण राणाखान आपल्या सैन्यासह धिमेपणे पुढे येऊ लागला, त्याच्या तोफा धडाडू लागल्या. ा मात्र इस्माइलच्या शिपायांना लढाईच्या तयारीत पुढे व्हावेच लागले. इस्माइल बेगच्या फा योग्य अशा ठिकाणीच असल्याने त्यातून झालेल्या अचूक माऱ्याने मराठ्यांना बरेच कसान सोसावे लागले. त्या मानाने मराठ्यांकडील तोफा थोड्या व वजनात हलक्या सल्याने गोळे उडविताना त्या फार हलत; व गोळा लांबवर जात नसे. मुहमद बेगच्या रसास शोभेल अशा धैर्याने व आत्मविश्वासाने इस्माइल बेग हमदानी हा स्वतः जातीने ढ झाला. लढाई करण्याच्या दृष्टीने उपयोगी अशी सैन्यरचना झालेली नव्हती, तरी त्याची ट पाहत न बसता तो मराठा घोडदळावर चालून गेला. मराठ्यांच्या दख्खनी स्वारांनीही च खाल्ली नाही. त्यांनी तितक्याच धीटपणे इस्माइलच्या हल्ल्याला तोंड दिले; त्यांनी न्ही बाजूंनी इस्माइलभोवती गर्दी केली. हेतू हा की, सणसणीत रट्टा हाणून त्याचे बरडेच मोडावे. लवकरच दोन्ही बाजूंनी गोळीबार थांबवण्यात आला व जवळजवळ सभर प्रत्यक्ष हातघाईची लढाई झाली. द बॉन्य व लेस्तेनो यांच्या पलटणींतील शिपाई शिक्षित व शिस्तबद्ध. गोंधळून न जाता ते सतत भडिमार करीत राहिले. रामरू हा आपल्या र पलटणींसह इस्माइलकडे होता. मराठ्यांवर एकही गोळी न झाडता इस्माइलचा पक्ष डून तो मराठ्यांकडे आला. या वेळेपर्यंत मराठ्यांच्या राखीव स्वारांनी जरा वेगळ्या वाटेने ाऊन शत्रूच्या पिछाडीवर हल्ला चढविला व त्यांच्या तंबूंना आगी लावून दिल्या. अशा कारे सगळ्या बाजूने घेरले गेल्यावर मुसलमान सैन्यातले नोकरचाकर प्रथम पळून गेले. ांच्या मागोमाग शिपाई पळू लागले. सर्वांनी यमुनेत उड्या टाकून अंतर्वेदीचा रस्ता ला. लढण्यात गढून गेलेल्या इस्माइलने आपल्या डाव्या उजव्या बाजूला नजर टाकली, काय ? थोड्याफार स्नेह्यांव्यतिरिक्त आसपास कुणीही नव्हते. शेवटी वैतागून जाऊन रमरण तरी पत्करावे म्हणून त्याने शत्रुसंमर्दात आपला घोडा फेकण्याचा विचार केला. ाधीच त्याला तीन ठिकाणी जखमा झालेल्या, त्यात तो या विचारात असल्याचे दिसताच जफ अलिखान (मुहमद बेगचा मुलगा) याने त्याच्या घोड्याचा लगाम खेचला व ल्लेल्या संग्रामातून त्याला बाहेर काढले. उद्विग्न मनःस्थितीत या शूर सेनानीने आग्रा हरात प्रवेश केला तो फक्त पंधरा सैनिकांसह. तिथे आपल्या लाडक्या प्रियपात्राला ोड्यावर घेऊन तो यमुनातीरावर गेला. नदीच्या प्रवाहात घोडा फेकून त्याने नदी

ओलांडली व तो अंतर्वेदीचा रस्ता चालू लागला. त्याची बायको नदीतून पलीकडे जाण्यासाठी हत्तीवर अंबारीत बसून येत होती, ती मात्र मधेच यमुनेच्या पाण्यात बुडून मेली.

इस्माइल बेगचा दारुण पराभव झाला. यातून पुन्हा डोके वर निघण्याची शक्यता नव्हती. युद्धप्रसंगी उपयोगी पडेल असे सैन्य त्याच्याजवळ उरले नाही. लढाई सुरू असताना आपल्या चार पलटणींसह रामरू मराठ्यांना मिळाला तेवढे वगळले तर, इस्माइलकडे शिपायांच्या जवळजवळ सोळा पलटणी (लालसोट लढाईच्या वेळी महादजीकडून त्याच्याकडे आलेले बरेचसे धरून) व पाच हजार मुगल स्वार एवढे सैन्य उरले होते; त्याचीसुद्धा या लढाईत फार हानी झाली. ठार झालेल्यांची संख्या खूप मोठी होती. जे लढाईतून जिवानिशी बचावले ते यमुना ओलांडण्याच्या धडपडीत बुडून मेले "एक कोसभरपर्यंत घोडे माणूस एके जागा पडले आहे." मराठ्यांच्या एका पत्रातील अतिरंजित वृत्ताप्रमाणे सैनिकांच्या तुकड्यांतील आठ हजार शिपाई मारले गेले व मुगलांकडील दोन हजार स्वार व बंदुकधारी पायदळ नदीत बुडून मेले. [एचपी क्रमांक ५२५] मराठ्यांकडील जवळजवळ अडीचशेच्या आसपास मारले गेले, सहाशे जखमी झाले, दोन हजार घोडे मेले. मात्र मराठा सैन्यातील जखमी झालेल्या सेनाधिकाऱ्यांची संख्या बरीच मोठी होती. पाचजण ठार झाले होते.

पण मराठ्यांना जो निर्णायक विजय मिळाला त्या मानाने ही हानी फार मोठी नव्हती, असे म्हटले पाहिजे. लढाईत शत्रूकडील जी लूट हाती आली त्यात शंभर तोफा [आग्रा किल्ल्यासमोरील खंदकात मिळालेल्या धरून], पाच हजार उंट, दोन हजार घोडे, बारा हत्ती, रणवाद्ये, बंदुका, तंबू व हमदानीच्या सैन्यातील अन्य मालमत्ता यांचा समावेश होता.

७. बादशहाची नजफ कुलीखानविरुद्ध मोहीम : फेब्रुवारी–मार्च, १७८८

आपणास आता आणखी एका हकीगतीकडे वळायचे आहे. या हकीगतीचा आपल्या मुख्य सूत्राशी राजपुत्र जवानबख्तच्या हालचालीइतका महत्त्वाचा संबंध नाही. गुलाम कादर व इस्माइल बेग हे सत्ताधारी होण्याच्या ईर्षेने एकमेकांशी मिळते घेऊन सत्ता वाढविण्याच्या उद्योगात असताना जयपूर राजाला त्याच्या मंत्र्यांनी असा सल्ला दिला की त्याने बादशहाला दिल्लीहून बोलावून घ्यावे. जयपूरराजा व त्याच्यावर निष्ठा असणारे मांडलिक यांनी एकत्र जमून, बंडखोर सरदार–जमीनदारांनी बादशहाचा गिळंकृत केलेला मुलूख परत सोडवून घेण्यात पुढाकार घ्यावा व त्या प्रयत्नात बादशहाची मदत घ्यावी. प्रतापसिंगाच्या मंत्र्यांची समजूत अशी की, बंडखोरांच्या ताब्यातील बादशहाचा मुलूख सोडवून घेऊन तो बादशहाला देता आला तर तो दयाळू दिल्लीपती, आपल्याशी कृतज्ञ राहील व मराठ्यांनी यापुढे दिल्ली दरबारात आपले वर्चस्व मिळविण्याचा प्रयत्न केला किंवा राजपूत राजाच्या मुलुखावर हल्ले केले तर त्यावेळी त्याच्या कृपाछत्राखाली आपल्याला सुखरूप राहता येईल.

जयपूरच्या दृष्टीने सर्वांत जवळचा व सर्वांत मोठा धोका म्हणजे नजफ कुलीखान[११] या बंडखोराचा. कछवा राज्यातील शेखवती मुलुखातून जो महसूल मिळे त्या रकमेतून मेवात

व नारतोल प्रांतात आपले स्वतःचे स्वतंत्र राज्य उभारावे, या खटपटीत तो होता. 'आपल्याशी मुजोरपणाची व उद्धट वागणूक आणि आपल्या मुलुखाचा अपहार ' यामुळे खुद्द बादशहाही त्याच्यावर नाराज होता.

या बाबतीत बादशहाशी बोलणी करण्यासाठी जयपूरहून सवाई प्रतापसिंगाच्या वतीने हिंमतबहादूर गोसावी येणार होता. मिर्झा नजफच्या वेळी व त्यानंतरही जयपूरराजाच्या वतीने दिल्ली दरबारातील कामकाज तोच पाहत असे. जर आपण स्वतः तिथे गेलो तर आपला प्रभाव पडून राजपूत राजांकडून खंडणीदाखल आपल्याला खूप मोठी रक्कम मिळेल हा मोह बादशहाला आवरता येईना. म्हणून ४ जानेवारी, १७८८ ला बादशहा शहाअलम दिल्लीहून निघाला व रेवाडीच्या दक्षिणेस सहा मैलांवर भारावास येथे आला. या ठिकाणी जयपूर-राजाचा मध्यस्थ हिंमतबहादूर, दौलतराम हलदिया व मारवाडचा बक्षी भीमसिंग या सर्वांनी त्याच महिन्यात दि. २८ ला बादशहाची भेट घेतली. बादशहा आल्यानंतरचा पहिला दरबार जयपूरराजाने दि. ३ फेब्रुवारीस भरविला. जयपूरराजा व दिल्लीपती या दोघांचेही तळ या ठिकाणी महिनाभर होते. " शेवटी पातशहांचे येथे खर्चाची वोढ. तेव्हा खर्चास मागू लागले. सक्त तगादा केला. तेव्हा राजांनी साफ जाब दिला की, आम्हास राजश्री पाटीलबावांनी खराब केले आहे. त्यांनी आमचे घरी काही बाकी ठेविली नाही. " ज्यातून काहीच निष्पन्न झाले नाही अशा या वायफळ चर्चेनंतर प्रतापसिंगाने बादशहाचा निरोप घेतला. मात्र बादशहाला त्याने पंचवीस हजारांची सावकाराची हुंडी दिली. [**डीवाय** : भाग १; लेखांक २६२, २७९, २७४]

त्यानंतर शहाअलमने नजफकूलीखानाशी पैशाच्या बाबतीत तडजोड करण्यास सुरवात केली. त्याची स्वतःची अवस्था फार कठिण होती. मराठ्यांचा वकील लिहितो: " पैका कोठेही दिसत नाही. पातशहासमागमे पाच-सात हजार स्वार प्यादा आहे. त्यातून उपासाकरिता नित्यानी शेपन्नास माणूस उठोन जाते. " प्रत्यक्षात बेगम समरूची खाजगी सेना हीच बादशहाची संरक्षक सेना होती. नजफकूली गोकुळगडला वेढा घालून बसला होता. (रेवाडीच्या उत्तरेस दोन मैल) बादशहाजवळ होते तेवढेच सैन्य त्याच्यापाशी होते. पण वरील प्रदेश व त्यातील किल्ले बादशहाला द्यायची त्याची तयारी नव्हती. त्याने बादशहाची भेट घेण्याचीही तयारी दाखविली नाही. उलट मिर्झा नजफचा ह्यात असलेला दत्तक-पुत्र म्हणून मुखत्यारपदी नेमणूक होण्याचा अधिकार आपलाच व सदर जागेला शोभेशी वार्षिक सात लाखांची जहागिरी मिळविण्याचा मानही आपलाच, असा त्याचा दावा होता.[१३]

पगार देता आला नाही तर आपले सर्व शिपाई निघून जाऊन सैन्य विसर्जित करावे लागेल हे बादशहा जाणून असल्याने, तसा प्रसंग येण्यापूर्वीच त्याला काही हालचाल करायला हवी होती. जयपूर दरबारचे मध्यस्थ निघून गेल्यावर त्याने आपल्या सैन्यास बंड-खोर नजफ कूलीवर हल्ला करावा असा हुकूम केला. जरूर तिथे खंदक खणून त्याने आपल्या डाव्या अंगाला समरूचे व उजव्या अंगाला हिंदुस्थानी सेनाधिकारी उभे केले.

सैन्याची एक तुकडी व अन्य मुगल सरदार यांना त्याने बादल बेगच्या हाताखाली दिले व नजफ कूली होता त्या ठिकाणावर चालून जायचा हुकूम केला. हे मुगल सैन्य सारी रात्र स्वैराचार, ऐषाराम व मद्यपानात घालवीत असे आणि उजाडण्यापूर्वी झोपी जाई. नजफ कूलीला हे समजले. वास्तविक स्वैराचार, मद्यपान यात तो त्यांना गुरुस्थानी शोभला असता; पण यावेळी सावध राहून त्याने या ढिसूळ व बेसावध सैनिकांवर रात्रीच्या वेळी छापा घातला (१२ मार्च) व त्यांचे अतोनात नुकसान केले. शहा मीर खान, इतिकत-उद्-दौला व अन्य छोटे छोटे सेनाधिकारी ठार झाले. नजफ कूलीखानच्या शीख साहाय्य-कांनी बादशहाच्या शामियान्यावर हल्ला केला. हिंमतबहादुराने हल्लेखोरांना खंदकाबाहेर पिटाळले. शहाअलम घोड्यावर बसून शामियान्यातून बाहेर पडला. बेगम समरूच्या सैन्यातील पाश्चात्त्य सेनाधिकाऱ्यांनी त्याच्या संरक्षणासाठी चौकोनी रचना तयार केली होती. त्यात जाऊन त्याने आसरा घेतला. बेगम समरूच्या या शूर जवानांनी आपल्या तोफांचा ताबडतोब व अचूक उपयोग करून नजफ कूलीला पळवून लावले.

पण बंडखोराला चिरडून टाकण्याची हिंमत बादशहापाशी नव्हती. आपल्या अफाट सैन्याचा पगार द्यायला पैसा नव्हता. उन्हाळा झपाट्याने येणार अशी चिन्हे दिसत होती. बेगम समरूच्या मध्यस्थीचा फायदा घेऊन त्याने समझोता करायला मान्यता दिली. मग दि. १९ मार्चला याच बाईने नजफ कूलीला रुमालाने हात बांधलेल्या अवस्थेत बादशहासमोर उभे केले. शाही इतमामाने बादशहाची शान राखली जावी म्हणून हात बांधलेल्या पश्चात्तापदग्ध बंडखोराप्रमाणे तो बादशहासमोर उभा राहिला. अर्थात हे सर्व नाटक बादशहाचा मान राखण्यापुरते होते. "त्याच्या कसुरीची त्याला माफी करण्यात आली. खिलातही दिली गेली; त्याच्या पूर्वीच्या अधिकाराच्या जागेवरच त्याची नेमणूक करण्यात आली व त्याच्या मालकीचे सुभे पूर्वीप्रमाणे त्याच्याकडेच ठेवण्यात आले."

मुहमदशहाच्या बाणगड मोहिमेसारखेच लंगडे आणि हास्यास्पद असे हे प्रकरण संपल्यावर शहा अलम ताबडतोब दिल्लीस गेला. (२३ मार्च) "नजबकूलीचे पारिपत्य न करण्याइतकी पातशाहात हलकी जाली आहे. काही ताळ राहिला नाही." [**डीवाय** : भाग १, लेखांक २७४]

टीपा : प्रकरण ३६

पृष्ठ	टिपेचा क्रमांक	
२६०	१	**एचपी** : क्रमांक ५०९; **सात**. भाग १, १२६ पुण्यात उशीर होण्याची कारणे, सात. भाग १, १२६ तसेच **पीआरसी** : खंड १, क्रमांक २०३, २०४ व खंड २

२६१ २ दि. ८ फेब्रुवारी १७८८ रोजी पामर शिंद्याच्या छावणीतून लिहितो, " माळव्याच्या संरक्षणासाठी त्याने बऱ्हाणपूरहून ज्या तुकड्या मागवल्या होत्या त्यांनी उदयपूरवाल्यांचा संपूर्ण फज्जा उडविला." [**पीआरसी :** खंड १, क्रमांक २०२]

२६४ ३ **इस्माइल बेग आग्राशहर घेतो : एचपी,** क्रमांक ५०४; **पीआरसी :** खंड १, क्रमांक १७७, १७८; **डीवाय :** भाग १, लेखांक २८६; **इब्रत :** भाग ३, २२; त्याने बळजबरीने केलेली वसुली, गुलामअली, खंड २, २५८.

२६५ ४ **डीवाय :** भाग १, लेखांक २३५ यातील माहितीनुसार दिल्लीच्या वाटेवर आग्र्यापासून १२ कोसांवर असलेल्या कौलझिल या गावी महादजी दि. १५ डिसेंबरला होता. अशासारखे साधारण नामसादृश्य असलेले असे कोनरायज हे एकच ठिकाण हिंदुस्थानच्या नकाशात आढळून आले. हे कोनरायज दिग व कुंभेरच्या मधे असून त्याच्या शेजारी दलदल आहे. मोहिमेबाबतची माहिती **इब्रत :** भाग ३, ७०–७२.

२६६ ५ **अजमेर गमावले :** अजमेर किल्ल्याचा ताबा मिर्झा रहीम बेग याच्या भावाकडे होता. शेरखान जमादार किल्ला लढवीत होता, पण त्याचे कुटुंबातील सगळे किल्ल्याखाली शहरात राहत होते. जवळजवळ शस्त्र न उचलताच जोधपूरराजाने २७ ऑगस्टला शहरावर ताबा मिळविला, " महादजीच्या सुभेदाराने एक तासमुद्धा गोळीबार केला नाही.' शेरखानची बायकामुले राहत होती त्या घरावर जेत्यांनी टेहळणी सुरू केली, तेव्हा शेरखानच्या बायकांनी अब्रूच्या भयाने विषप्राशन केले. [**सात :** भाग १, १२०; अख. एसजे हस्तलिखित, १८८, १९४; **एमडी :** भाग २, क्रमांक, १५४] अंबाजी इंगळे व जिवाजी बक्षी यांनी अजमेर शहराबाहेर रोडाखवासशी काही काळ दोन हात केले; पण ऑक्टोबरमध्ये राजपुतांनी त्यांना शहराबाहेर हाकलून दिले [**इब्रत :** भाग ३, ५३; **अख.** २२५, २३१–२४१]. दि. २४ ला किल्ल्याचा पाडाव झाला; " किल्लेदार व त्याची पत्नी मरून गेली. किल्ला महिनाभरच काय, पंधरा दिवससुद्धा लढवला गेला नाही " [**एमडी :** भाग २, क्रमांक १५४; **पीआरसी :** खंड १, १९२]

२६६ ६ **महादजी.** जाने.–मार्च १७८८; **एमडी :** भाग २, लेखांक १६१; **पीआरसी :** खंड १, क्रमांक : १९४–२०६; **इब्रत :** भाग ३, लिहितो, "ग्वाल्हेरला जाण्यासाठी महादजीने चंबळ ओलांडली त्यावेळी त्या मुलुखातले सगळे वातावरणच त्याला विस्कळित झालेले आढळून आले. नरवाड, दतिया, करोली, कोटा आणि उदेपूर येथील राजे मुलुख बळकावून बसले

होते. राणा छत्रसिंगाचे (गोहदचा प्रमुख बंदिवान) नातलग प्रत्येक गल्ली-बोळातून उपटले आणि त्यांनी मराठ्यांना त्रास द्यायला सुरवात केली. शिंद्याने झटकन परिस्थितीचा अंदाज घेतला व ५ हजार शिपायांसह राणाखानला नरवाड राजावर चाल करून जायला सांगितले; थोड्याफार धुमश्चक्रीनंतर नरवाडचा राजा आपल्या किल्ल्यात जाऊन लपून बसला. पण आतील दाणागोटा कमी पडल्याने शरण आला. दंडादाखल जरूर ती रक्कम देऊन व घेतलेले महाल परत करून त्याने राणाखानला परतवून लावले. अप्पा खंडेरावने ग्वाल्हेर प्रांतातील बंडखोरांना वठणीवर आणले. त्याच्याच हुकुमाने राणा छत्रसिंगाला विषप्रयोग करून मारण्यात आले व त्याचा जड देह ग्वाल्हेर किल्ल्याबाहेर आणून जाळण्यात आला. महादजीने राघोगडच्या राजाला बंदिवासातून मुक्त केले व त्याला राघोगडवर पाठवून दिले. त्याबदल्यात महादजीशी एकनिष्ठ राहण्यास व पुढे नियमित खंडणी देण्यास त्याची तयारी होती. बऱ्याच मोठ्या फौजेच्या साहाय्याने अंबाजीने उज्जैन प्रांतातील व मेवाड सरहद्दीपर्यंतचे बंडखोरांना नेस्तनाबूद करण्यात यश मिळविले. (२३ फेब्रुवारी) करोलीच्या राजाला अद्दल घडविण्याच्या हेतूने महादजी स्वतः बाहेर पडला. त्याने करोली राजधानीस वेढा घातला; शेवटी बापू विठ्ठलच्या मध्यस्थीने, करोली राजाने सलोखा करायचे कबूल करून, खंडणी व घेतलेला मुलूख महादजीला परत दिल्यावर महादजीने वेढा उठविला.

२६७ ७ माचेडी (अलवार)च्या रावराजाने शिंद्याला अशी विनवणी केली : " तुम्ही जर मला मदत कराल, तर जयपूरचा नाश मुळीच अवघड नाही. पण याउलट जर काही करणार असाल, तर मला तसे स्पष्टपणे सांगून टाका, म्हणजे मी फक्त जमीनदारच असल्याने जयपूर राजाशी समझोता करून मोकळा होईन " तसेच, " महाराजा (शिंदे) शी हातमिळवणी करून इतर सर्वांस मी शत्रू केलेच आहे. तो जर दुसऱ्या पक्षास गेला तर माझे राज्य संपलेच." (अख. एसजे. हस्तलिखित, ९२, १९६)

२६९ ८ **पीआरसी** : खंड १, क्रमांक २१७; **इब्रत** : भाग ३, १०८–१०९; भाग १, लेखांक: २८७.

२६९ ९ **इब्रत** : भाग ३, १०९–११४; **डीवाय** : भाग १, लेखांक २८८,२९७; **पीआरसी** : खंड १, क्रमांक २१९; **गुलामअली** : खंड ३, २६०; **एमएल** : ३३०–३३१.

२७० १० **डीवाय** : भाग १, **लेखांक** २७८, २९५, २८५, ३००; **एचपी** : क्रमांक ५१८, ५२०–५२२; **पीआरसी** : खंड १, क्रमांक २२०, २२२; **इब्रत** : खंड ३, ११४–११७ (आधार नाही).

२७२ ११ **डीवाय :** भाग १, लेखांक ३००, ३०३; **एचपी :** क्रमांक ५२४–५२७; **सात :** भाग १, १३७; **इब्रत :** खंड ३, ११६–११९; **पीआरसी** खंड १, क्रमांक २२३, **गुलाम अली :** खंड ३, २६४–२६७; **एमएल :** ३३१.

२७४ १२ **शहाअलमची नजफकुलीविरुद्ध आघाडी : डीसी : डीवाय** भाग १, लेखांक २८१, २७२, २७४; **एचपी :** क्रमांक ५१८; **इब्रत :** भाग ३, १२२–१२७; **एमएल :** ३१८–३२५; **गुलामअली :** खंड ३, २५२–२५६.

२७५ १३ "नजफकुलीखान चौकोसांवर एक हजार स्वार व पाच पलटणे प्यादे व पस्तीस तोफा या सरंजामानिशी उतरला आहे तो पातशहापाशी मुलाजमतीस येत नाही. यांच्याने त्याचे पारपत्य होत नाही. पातशहांपाशी दोन हजार स्वार व तीन पलटणे व तीसपस्तीस तोफाही आहेत, परंतु भक्षावयास नाही." [**डीवाय :** भाग १, लेखांक २८१]

प्रकरण ३७ वे

गुलाम कादरचा उत्कर्ष आणि पतन

१. नझीर मंझूर अली हा गुलाम कादरला दिल्लीत प्रवेश देतो : त्याची मीरब व मुखत्यारपदावर नेमणूक करतो. सप्टेंबर : १७८७

महादजी शिंदे व इस्माइल बेग हमदानी यांच्यातील संघर्षाच्या कथेने आ १७८८ च्या मध्यापर्यंत आलो आहोत. आपल्याला आता एक वर्ष मागे जायला हवे. का अगदी तुटपुंजे कर्तृत्व पण अत्यंत दुष्ट व कृतघ्न अशा एका माणसाला बादशहाच्या द बारात एकदम महत्त्व आले होते. हा क्रूर माणूस म्हणजे गुलाम कादरखान. हा झबिताख रोहिल्याचा मुलगा व त्याच्या जायदादीचा वारस. आपल्या वडिलांच्या मृत्यूनंतर हा मुल त्यांच्या अधिकाराच्या जागेवर आला. (२१ जानेवारी, १७८५) पण अशी नेमणू करवून घेतल्यावर त्याबद्दल बादशहा किंवा त्याचा मुखत्यार यांना जी खंडणी द्यावी ला ती त्याने मुळीच दिली नव्हती. सर्वसाधारण अफघाण परंपरेप्रमाणे त्याच्या घरातही भ भांडणे होती. एकदा तर जिवाच्या भीतीने तो आपल्या वडिलांपासून पळाला होता शिंद्याच्या आश्रयाला जाऊन राहिला होता. अशा या माणसाने अधिकार हाती येत प्रथम आपल्या काकांना व आईला कैदेत टाकून त्यांची सर्व मालमत्ता जप्त केली हो सतलजअलीकडील व अंतर्वेदीतील वरील भागात शीख आक्रमक धुमाकूळ घालीत हो त्यावेळी या शिखांविरुद्ध शिंद्याने गुलाम कादरची मदत मागितली होती. याच शिख साहाय्य घेऊन झबिताखानाने आपल्या घराण्याला वाचविले होते. ह्या गोष्टीचे महादजी बहुशः विस्मरण झाले असावे.[१] १७८७ च्या फेब्रुवारीत अंबाजी इंगळेसमवेत सैन्य दे महादजीने त्याला कर्नाळला पाठवले. तिथे गेल्यावर गुलाम कादरशी सलोखा करून भागातील बंडखोर शिखांचा त्याला बंदोबस्त करायचा होता. पण या तरुण रोहिल्याने विनंतीला म्हणावा तसा प्रतिसाद दिला नाही. शेवटी अंबाजीशी बोलणी करायला म्हण तो आला (एप्रिलच्या मध्यास) पण बोलणी अर्धवट टाकून मधूनच एकदम निघून गेल

मुहमद बेग हमदानी हा शिंद्याला सोडून गेला (२५ मे) ही घटना गुलाम का रला पर्वणीसारखीच होती. अंबाजीला आपल्या सैन्यासह राजपुतान्यात परतायला सांगण्य आले. त्यानंतर या रोहिल्याने आपले खायचे दात दाखवायला सुरवात केली. अंतर्वेदीत वरील भागात महसूल वसूल करण्यासाठी जे मराठा अधिकारी नेमलेले होते त्यांना माणसाने हाकलून लावले व तो मुलूख आपल्या ताब्यात घ्यायला सुरवात केली. मराठ्यां लालसोट येथून पळ काढावा लागला हे समजल्यावर तर या 'गुलामा'ची राक्षशी महत्त्व कांक्षा तरारून उठली. त्याला वाटू लागले, आपला बाप व आजोबा यांच्यासारखे

मीरबक्षी होऊन सगळ्या साम्राज्याचा गाडा रेटायला आपल्याला कसली अडचण ! म्हणून आपले सैन्य घेऊन तो बागपतपर्यंत चालून गेला. (२१ ऑगस्ट) व बादशहाकडे माणूस पाठवून आपण केव्हा भेटायला यावे अशी विचारणा केली. बादशहाच्या दरबारातील सल्लागारांत धोरणविषयक मतभेद होते. शिंद्याची बाजू उचलून धरणारे दोघेजण होते. एक शहा निझामुद्दीन (धार्मिक परंपरेतील पूर्वीचा एक सज्जन फकीर) व दुसरा, लाडोजी शितोळे देशमुख (महादजीचा जावई). या दोघांनी महादजीची बाजू उचलून धरण्याचा खूप प्रयत्न केला खरा, पण त्यासाठी, वेळ आलीच तर पुरेसे शस्त्रसामर्थ्य उभे करण्याची ताकद मात्र कुणांतच नव्हती. त्यांच्याविरुद्ध होता मंझूर अलिखान. अंत:पुरावरील हा सर्वोच्च अधिकारी (नझीर). मिर्झा नजफविरुद्ध कारस्थाने करणारी दरबारात जी चांडाळचौकडी होती, त्यातला हा एक. या नझीरला शिंद्याबद्दल विलक्षण असूया होती. मुसलमान साम्राज्यावर एका काफराचा वरचष्मा असावा ही त्याचा मस्तकशूळ उठविणारी घटना होती. 'पातशाही कारभारी व दिल्लीवाले मोंगलिये या सर्वांचे मते, राजश्री पाटीलबावांची मुख्त्यारी नसावी.' म्हणून "गुलाम कादरखान यास बगलेत घेऊन, व दिल्लीवाली फौज पातशाही दहा पंधरा हजार आहे हे सर्व एकत्र करून, पाटीलबावांवर घालून, त्यांस रेवाडीहून हुसकून द्यावे की, पुन्हा दिल्लीचे नाव न घेत. याप्रमाणे यांची मर्जी आहे." गौसगडला मराठ्यांच्या साहाय्याने बादशहाच्या फौजेने लुटालूट करून जेव्हा जगबुडीचा प्रसंग आणला होता, त्यावेळी गुलाम कादर हा अगदीच छोटा बच्चा होता. आपल्या अंगावरील झग्याने झाकून टाकून मंझूरअलीने त्याचा जीव वाचविला होता. त्यामुळे गुलाम कादर हा अजून बच्चाच, म्हणून त्याच्यावतीने बोलण्याचा मंझूरला अधिकार होता. (**डीवाय** : भाग १, लेखांक २३२)

दिल्लीच्या किल्ल्यात सुरक्षित बसून शत्रूशी महिनेन महिने झुंजता आले असते; पण उणीव होती ती संरक्षणाच्या दृष्टीने योग्य मार्गदर्शन करणाऱ्या सेनानीची. कारण नदीला प्रचंड पूर आलेला होता व तिच्या पूर्वकिनाऱ्यावर असलेले आक्रमक रोहिला शिपाई पोटाला पुरेसे मिळत नसल्याने रोज दुसरीकडे जात होते. पण शिंद्याचे दिल्ली दरबारातील महत्त्व कमी होऊन त्याच्या धोरणाचा पाडाव झाला याचे खरे कारण, दरबारातील त्याच्या दोन्ही माणसांची अकार्यक्षमता व भेकड वृत्ती; त्यातच त्याची आर्थिक दिवाळखोरी. त्यामुळे दिल्ली किल्ल्यातील शिबंदीना पगार मिळत नसे. लालसोट आपत्तीच्या काळापासूनच शिबंदीतले शिपाई वरचेवर दंगा माजवून या सल्लागार दिवाणांना हैराण करीत होते. गुलाम कादर शहादरा येथे आल्याचे कळताच त्याच्याशी दोन हात करायचा निर्णय, शहा निझामउद्दीनने तडकाफडकी घेतला. नदीकाठावर भक्कम बंदोबस्त ठेवून दिल्लीचे संरक्षण करावे अशी सूचना लष्करी तज्ज्ञ देत असताही, तो विचारात न घेता, फोफावणारी यमुना ओलांडून 'गुलाम'शी मुकाबला करायला त्याने सैन्य धाडले. त्याने पाठविलेली सैन्याची तुकडी अगदी छोटी होती व 'त्या तुकडीतील शिपाई तर अगदी कच्चे, बंदूक धरतात कशी तेही त्यांना माहीत नव्हते. या शिपायांनी यमुनेच्या तीरावर पाय ठेवला मात्र,

रोहिला सैन्याने त्यांच्यावर हल्ला केला. रोहिल्यांचा सैन्यप्रमुख बेसी (?) नावाचा एक फ्रेंच माणूस होता. त्याच्या शिपायांनी निमिषार्धात निझाम-उद्दीनच्या शिपायांचा पराभव केला. "दोन कंपन्या स्वार प्यादे व माधवराव फाळके यमुनापार उतरले होते. त्यांसी झुंज जाले. कंपन्यांच्या प्याद्यांपैकी दहावीस माणूस मारले गेले, कांही पळून गेले. माधवराव फाळके शहादरियांत घुसून दरवाजे बंद करून बसले." पळून गेलेल्या या सैन्याने आपल्या सर्व बंदुका व एक तोफ जागेवरच टाकून दिली. माधवराव फाळके शेवटी गुलामकादरला शरण गेला. [**डीसी पीआरसी** : खंड १, क्रमांक १६४; इब्रत भाग ३ २४–२५ (पूर्ण वर्णन) **डीवाय** : भाग १, लेखांक : २२९]

ही झटापट उडाली २३ ऑगस्टला सकाळी व तीही सर्व दिल्लीकरांच्या नजरेच्या टप्प्यात. गुलामकादरशी समझोता करावा म्हणून बादशहाचे मन वळविण्यात आले. त्यानुसार तमकीन नावाच्या गुलामाला बादशहाने त्याच्याकडे पाठविले "हे वर्तमान राजश्री लाडोजी नरसिंगराव देशमुख शितोळे व शाहा निजामुद्दी पातशहाचे कारभारी यांनी पाहून दिल्लीहून पातशहास न पुसता निघोन रात्रीस पळून गेले. त्या समयी देशमुखांची वस्तभाव वीस उंटे दिल्लीचे सोद्यांनी लुटून घेतली, व शहानिजामुद्दी न पुसता गेला म्हणोन त्याचे घरी जप्ती जाली आहे व त्याचा भाऊ कैदेत आहे." [**डीसी डीवाय** : भाग १, लेखांक २२७]

राजधानीतील सगळे शत्रू निपटून टाकण्यात आल्यावर दि. २६ ला रोहिल्यांचा पुढारी गुलाम कादर हा दिल्लीस आला; व नझीर मंझूर अलिखान त्याला बादशहासमोर घेऊन गेला. त्यानंतर आपल्या सैन्यासह तो दिल्लीत आला व शहा निजामउद्दीनच्या उद्यान-निवासात त्याने आपला मुक्काम टाकला. शहा निझामउद्दीनचे हे घर, शहराच्या दक्षिणेकडील उपनगरासारख्या भागात दिल्ली गेट व तुर्कमन गेट यांच्या मधोमध होते. आपल्या आजोबां-प्रमाणेच आपल्यालाही मीरबक्षी हा हुद्दा व शाही शासन सांभाळण्याचे अधिकार मिळावेत अशी त्याने हक्क दाखवून मागणी केली. आपल्या सैन्याच्या खर्चासाठी जरूर त्या जहागिऱ्या त्याला हव्या होत्या. त्या मिळाल्यावर जाटांचा मुलूख व आग्रा प्रांत परत घेण्यासाठी मोहिमेवर निघायला तो तयार होता; कारण या दोन्ही मुलुखातील अधिकार कायद्यानेच मीरबक्षीकडे होते. नझीर मंझूरअली हा त्याचा हितकर्ता व बादशहातर्फे मध्यस्थ. 'दि. ५ सप्टेंबरला दोन प्रहर दिवस चढता रोशनदौला गुलाम कादर खान, दो हजार रोहिले समागमे घेऊन किल्ल्यात पातशहाचे दरबारास आले'; त्याने दिल्ली शहरावर आपला अंमल बसविला. बादशहासमोर दुसरा पर्यायच नव्हता. त्याने त्याची बक्षी–उल्–मामलिक या जागेवर नेमणूक केली. अमीर–उल्–उमरा रौशन-उद-दौला बहादर या मानाच्या पदव्या व नेहमीची मानाची वस्त्रे आणि नजराणे दिले. अपरिमित मद्यपानामुळे त्याचे डोळे तारवटून लालभडक झाले होते; त्याचा त्याच्या शरीरावरही ताबा नव्हता. बादशहा घाबरून गेला होता. त्याच मनःस्थितीत त्याने गुलाम कादरला मुख्त्यारपदाची मानाची वस्त्रे दिली व मीरबक्षीचे महाल वेगळे काढून, सनद करून दिली, खालसाचे महालाचीही मुखत्यारी दिली व त्यासाठी

शाही फर्मान काढण्यास सांगितले. " ज्या समयी खिलतवस्त्रे दिधलीं, त्या समयीं पातशाहा व नाजर व जितके पातशाही खवास, खोजे व मुत्सद्दी, दिल्लीचे लोक मुजराही होते, तितके बहुत दिक् व नाखुशा जाले. कोणी कोणी बोलिले की ' या खिजमतीस हे योग्य नाहीत ! त्याजवरून पातशहा बोलिले की ' दिल्लीहून बलाय काढून कशीतरी द्यावी, इतकाच मात्र विचार आहे. नाहीतर रोहिल्याने शहरावर हात घातला, तर येथे सांभाळणार कोण आहे ? याजकरितां यास येथून काढून द्यावे. याचा संतोष राखावा. हेच सलाह आहे.'[२]

२. गुलाम कादर बादशहावर उलटतो : ऑक्टोबर, १७८७ : त्याचे अंतर्वेदीतील विजय : राजपुत्र जवानबख्तचे निष्फळ साहस.

पण मद्याच्या धुंदीत असलेल्या या अफघाण जवानाला अजून दिल्लीत आपल्या मनासारखा जम बसवता आला नव्हता. बादशहाच्या सिंहासनाच्या रक्षणासाठी बेगम समरू, आपल्या सैन्यासह दिल्लीतच होती. ती वॉल्तेर रेनहार्दची विधवा पत्नी. सर्वजण तिला बेगम समरू या नावानेच ओळखीत असत. तिच्याजवळ शिस्तबद्ध अशा चार पलटणी असून त्याचे नेतृत्व करणारे अधिकारी फ्रेंच होते. याशिवाय तिच्याजवळ ८५ तोफाही होत्या. नवा मुखत्यार गुलाम कादरचे हुकूम मानायला तिने नकार दिला. त्या दोघांत तंटा उद्भवला. गौसगडच्या या रोहिल्या प्रमुखाला दिल्लीच्या दिशेने आपल्या मुलुखात भर टाकायची होती. त्यास अडचण होती ती सरढाण्याची. कारण सरढाण्यावर बेगम समरूची सत्ता होती व सरढाणा मिळाला तरच पुढे सरकता येणे शक्य होते. तेच जमत नव्हते. उरलेला सर्व सप्टेंबर महिना या उभयतांनी भांडण्यात वा तडजोडीची बोलणी करण्यात घालविला. बेगम समरूचा संरक्षक ढालीसारखा उपयोग करून या रोहिल्या दादापासून आपली कातडी बचावावी अशासाठी बादशहाची धडपड चालली होती. त्याने तिचा व तिचा सावत्र मुलगा झाफऱ्याबखान यांचा गौरव केला व तिच्या आणि शीख सरदार भंगासिंग यांच्या सैन्याच्या मदतीने दिल्लीची तटबंदी व खंदकांचे, गुलाम कादरच्या सैन्यापासून रक्षण केले. गुलाम कादर अंतर्वेदीत गेला होता. (१२ सप्टेंबर) त्याला बेगम समरूबरोबर दोन हात करायचे टाळायचे होते.

नझीर मंझूरअलीचे राजकीय शहाणपण महिन्याभरात प्रत्ययास येऊ लागले. त्याचा आश्रित गुलाम कादर याने बादशहाच्या लाल किल्ल्यावरच तोफा डागण्यात सुरवात केली. ७ ऑक्टोबरला त्याने यमुनेच्या पूर्व तीरावरून किल्ल्यावर तोफा डागल्या. प्रथम सलीमगढची थोडीफार हानी झाली, शेवटी ३० ऑक्टोबरला बारा तोफगोळे किल्ल्याच्या आवारात येऊन पडले. दिवाण-ई-आमच्या मोकळ्या आवारात एक बालक ठार झाले. (**डीसी**) 'आपल्या साहाय्यास या ' म्हणून बादशहा सगळ्यांना अजीजीने लिहीत होता. महादजीलाही मदतीला येण्यासाठी त्याने पत्र लिहिले. पण नसती भीती घालून नझीर मंझूरअलीने ते रद्द करायला लावले; त्यामुळे शिंद्यांचा प्रतिनिधी अंबाजी इंगळे याला द्विधा मनःस्थितीत दरबारातून परत फिरावे लागले. (१४ नोव्हेंबर) गुलाम कादरने किल्ल्यावर तोफा डागून

जो गुन्हा केला होता, तो खाविंदानी कृपावंत होऊन माफ केला आहे, असे नजीर मंझूरअलीने दरम्यानच्या काळात त्याला कळविले होते. या अनपेक्षित धक्क्यानंतर इस्माइल बेगने शिंद्याला चंबळेपलीकडे हाकलून दिले. (२० डिसेंबर) शिंद्याचा उत्तरेकडील वचक अजिबात संपला. आपल्याला महत्त्वाकांक्षा पुऱ्या करण्यासाठी वाट्टेल तो गोंधळ घालण्यास स्थानिक मुसलमान सरदारांना दिल्लीचे रान मोकळे झाले.

राजपुत्र जवानबख्त (जहांदरशहा[३]) हा बापाच्या बोलावण्यावरून ८ डिसेंबर, १७८७ ला दिल्लीत आला. या गुणी वारसाने एक कट केला. किल्ल्यात एकदम घुसायचे, आपल्या बापाला कैद करायचे व प्रत्यक्षात सत्ता आपल्या हातात घ्यायची. तथापि त्यासाठी लागणारे धारिष्ट्य व वकूब त्याच्याजवळ नव्हता; व आवश्यक ती साधनसामग्री, सैन्य, पैसा, माणसे वगैरे नव्हती. परिणामी दिल्लीचा तारणहार व्हायची त्याची सगळी मनोराज्ये धुळीस मिळाली. शेवटी तेरा दिवस घालविल्यावर या बाळाला दूर करायचा सनदशीर मार्ग बादशहाला सापडला. त्याची आग्र्याचा सुभेदार म्हणून नेमणूक करून बादशहाने त्याला तिकडे पाठवून दिले. आग्राप्रांत अद्याप जिंकून घ्यायचा होता. राजपुत्र २४ डिसेंबरला आग्र्यास गेला. इस्माइल बेग तिथेच होता. राजपुत्राला मदत करावयास त्याने विशेष उत्साह दाखविला नाही. राजपुत्राजवळ स्वतःचे सैन्य नव्हते. धार्मिकवृत्तीने रहाणारा फकीर खैरउद्दीन याने त्याला इस्माइल बेगला ठार मारण्याचा सल्ला दिला होता. राजपुत्राने तो सल्ला मानला नाही व गुलाम कादर तरी काही उपयोगी पडतो का, हे अजमाविण्यासाठी त्यालाच भेटावे म्हणून अंतर्वेदीत गेला. हे अफघाण हितकर्ते काय ? त्यांनी जवानबख्तला पळवून न्यायचा घाट घातला. पण राजपुत्र त्या बाबतीत ठाम राहिल्याने गुलाम कादरचा हा बेत फसला. शेवटी सगळीकडेच दारुण निराशा वाट्याला आल्याने तो गुपचूपपणे ब्रिटिशांच्या प्रदेशात त्यांच्या आश्रयास आला. (१७८८ फेब्रुवारी अखेर) एप्रिल १७८४ मध्ये तो दिल्लीतून पळून गेला होता, तेव्हा त्याची बायको व मुले दिल्लीतच होती. या वेळच्या त्याच्या या उलाढालीचा फायदा त्याला एवढाच झाला की, बायको व मुलांना त्याला बरोबर नेता आले.

मध्यंतरीच्या या निरर्थक प्रकाराची हकिगत येथेच सोडून आपण आता गुलामकादरच्या उद्योगांकडे वळू. मीरबक्षी झाल्यावर या रोहिला प्रमुखाने बादशहाच्या खासगी खर्चासाठी तोडून दिलेले मुलूख (सर्फ-ई-खास महाल) व मराठ्यांच्या ताब्यातील जहागिऱ्या स्वतः बळकावयाचा जुनाच उद्योग पुन्हा सुरू केला. त्याच्या वाढत्या सैन्याचा खर्च भागवायला दुसरा मार्ग नव्हता. झिंझणा, बडनावा, बारुत, बुढाणा वगैरे अंतर्वेदीतले परगणे त्याने केव्हाच बळकावले होते. मीरत येथे बाहेरच्या बाजूस मराठ्यांचे ठाणे होते, ते त्याने काही वेळ लढवले. पण वर्षाअखेर महादजी आग्रा सोडून निघून गेला तेव्हा हा प्रतिकार संपुष्टात आला. गुलाम कादर अंतर्वेदीतून दक्षिणेकडे पुढे सरकला. त्याने तो प्रांत घेतला व तेथील जहागिरदारांनी आपले म्हणून जे अधिकारी नेमले होते त्यांना त्याने हाकलून दिले. [**डीवाय :** भाग १; लेखांक २२६, २३०] त्यानंतर हिंमतबहादूरने मराठ्यांच्या

पेरोजाबादचे किल्ल्यावर मोर्चे लावले. फुफसिंग जाट व याकुबखान पठाण या दोघांनी अनुक्रमे मुंडसान व खुर्जाचा किल्ला घेतला व आपले तेथील अधिकार परत मिळविले. व "मलक महंमदखान व अनुपगीर गोसावी यांनी दरोबस्त मुलूख शिकंदऱ्यापासून तो पेरोजाबादेपावेतो कोलचे शहर व किल्ल्यासुद्धा राजश्री पाटीलबावांची ठाणी उठोन दिघली व आपला बंदोबस्त केला आहे." (कित्ता : लेखांक २४६, २४८) जबरदस्त महत्त्वाकांक्षेपायी या अधिकाऱ्यांत परस्परविरुद्ध हालचाली व डावपेच चालू होते. त्यामुळे सर्वांनी मिळून महादजीला चेपायचे हे कधी घडलेच नाही. १७८८ च्या याआधीच्या महिन्यात मलिक मुहमद हा आपल्या कोइल-जेलसर या जहागिरीच्या आसपासचा मुलूख काबीज करण्यात गर्क होता. गुलाम कादर हा अलिगढच्या वेढ्यात अडकलेला (हा गड १७ फेब्रुवारीला त्याच्या ताब्यात आला) तर इस्माइल बेग आग्रा किल्ल्याला वेढा घालून बसलेला. मार्चअखेर शिंद्याने चंबळेच्या उत्तरेस धडका मारायला सुरवात केली, तेव्हा इस्माइलबेगने गुलामकादरशी समझोता केला. व त्याला घेऊन तो आग्र्यास आला. (९ एप्रिल) दोघांनीही आपापले सैन्य एकत्रित केले. या दोघांनी केलेल्या मोहिमा कशा फसल्या व त्या भागात शेवटी जाट व मराठे हे निर्विवाद सत्ताधारी कसे झाले, याची हकिगत गेल्या प्रकरणात आलीच आहे.

३. गुलाम कादरचे इस्माइल बेगसह पुनरागमन : दिल्लीचा ताबा : नझीरने केलेला विश्वासघात : जुलै, १७८८

इस्माइल व गुलामकादर या दोघांचा १७ जूनला आग्र्याच्या परिसरात दणदणीत पराभव झाला होता. त्यानंतरची या दोन दोस्त मंडळींची थोडी माहिती पाहू या. त्या दुर्दैवी अपयशानंतर इस्माइल बेग हमदानी, हा गुलाम कादरच्या छावणीत येऊन त्याच्यासमोर उभा राहिला तो केवळ अंगावरील कपड्यानिशी. या ठिकाणी त्याला म्हणावा तसा आधार मिळाला नाही.. रोहिला गुलाम कादर याचीच परिस्थिती बिकट होती. कारण दुसऱ्या दिवशी सकाळी नदीपलीकडे असलेल्या शिंद्याच्या छावणीतून सुटणारे तोफगोळे त्याच्या छावणीत पडू लागले. मथुरेच्या वरील बाजूकडून यमुनानदी पार करून गुलाम कादरचा अंतर्वेदीशी असलेला संपर्क तोडून टाकायचा, असा शिंद्याचा विचार असल्याच्या बातम्या कानावर येत होत्या. म्हणून या दोन्ही दोस्तांनी अलग अलग व्हायचे ठरविले. इस्माइल बेग प्रथम फिरोजाबादेकडे गेला. त्याला अयोध्येच्या मुलुखात प्रवेश मिळेना म्हणून तो दिल्लीसमोर पातपारगंज येथे आला व बादशहाची भेट मागू लागला. तशी भेट घेण्यास बादशहाने स्पष्टपणे नकार दिला; सावधगिरी म्हणून दिल्लीच्या वेशीही बंद करण्यात आल्या होत्या. म्हणून शेवटी त्याला गुलाम कादरकडे परत यावे लागले.

रोहिला गुलाम कादर हा आग्र्यासमोर नूरअफशान बागेपाशी तळ टाकून होता. तळ उठवून तो अलिगढला गेला. अलिगढ किल्ल्यात असलेल्या अफाट दारूगोळ्यातून आपल्या साहित्यांत त्याने भरपूर भर घातली व तो शहादराकडे निघाला. (१ जुलै, १७८८) शहादरा, पातपरगंज व गाझियाबाद ही अंतर्वेदीतील नावाजलेली व्यापारी शहरे. त्यांच्यापासून

दिल्लीला खूप फायदा होत असे. गुलाम कादरने या तीन धनाढ्य शहरांत प्रचंड लुटालूट, केली. या ठिकाणी इस्माइल बेग त्याला मिळाला. जो मुलूख व लूट हाती पडली होती त्याची, दोनास एक या प्रमाणात वाटणी करायची असा त्यांनी आपापसात करारही करून टाकला.

बादशहा व दिल्लीतील प्रजा पुन्हा घाबरून गेली. बादशहाकडे विश्वासार्ह असा एकमेव अधिकारी म्हणजे हिंमतबहादूर. त्याने बचावाचा थोडासा प्रयत्न केला, पण बादशहाजवळ पुरेसा आत्मविश्वास व इच्छाशक्ती नसल्याने हा प्रयत्न फसला. दिल्लीतील किल्ल्याच्या रक्षणासाठी मुगल शिपायांची शिबंदी पथके होती. या शिबंदीने व नझीर मंझूर अलीने विश्वासघात केला. बादशहाच्या रक्षणासाठी महादजीने रवळोजी व भगीरथराव (त्याचे जातभाई) यांच्या हाताखाली मथुरेहून फक्त दोन हजार स्वार पाठवून दिले होते. (८ जुलै) हे स्वार तीन दिवसांनंतर दिल्लीच्या दक्षिणेस दहा मैलांवर असलेल्या बारापुलाशी येऊन पोहोचले व त्यांनी बादशहाची भेट घेतली. त्यानंतरच्या घटना भराभर घडल्या. राम रतन मोदी या नावाच्या एका बनियाचे बादशहावर बरेच वजन होते. गुलाम कादर या खोज्याने, नझीर मंझूर अली व राम रतन मोदी यांच्याशी आतून संधान बांधले होते. मराठे दिल्लीत जम बसविण्याचा प्रयत्न करणार, हा अंदाज त्याला होताच. नझीर व राम रतन यांनी बादशहाच्या किल्ल्यातून दोनशे बैलांच्या पाठीवर लादता येईल एवढा दारूगोळा व भुकटी गुलाम कादरकडे गुप्तपणे पाठवून दिली व त्याला जय मिळावा म्हणून जरूर ती कारस्थानेही केली.

आग्र्यास मराठ्यांनी इस्माइल बेगचा सणसणीत पराभव केला. हे वृत्त बादशहाला समजले. तेव्हा महादजीला मानाची वस्त्रे व नजराणे देऊन दिल्लीस येण्याचे निमंत्रण द्यावे म्हणून त्याने दरबारातील दोन सरदारांना त्याच्याकडे पाठविले. (२४ जून) या हालचालीने नझीर व जुन्या टोळीतले बदमाश अक्षरशः घाबरले. कारण महादजी आला तर विश्वासघात व वैर यासाठी आपल्याला तो कडक शासन करील अशी त्यांना भीती वाटली. यातून वाचायचे तर राजधानी गुलाम कादरच्या हातात द्यावयाची एवढाच उपाय होता. गुलाम कादरला दणदणीत प्रतिकार करावा असे बादशहाला प्रथम वाटले होते, व त्याप्रमाणे त्याने शहरातील शिपायांना तसे हुकूमही केले होते. पण आता त्याच्या पाठीशी बेगम समरूची दणकट सेना नव्हती. त्याच्या बाजूचे दोन सेनाधिकारी म्हणजे, हिंमतबहादूर गोसावी व मुगल सैन्याचा प्रमुख बादलबेग. गोसाव्याने पैशाच्या वसुलीबाबत दिल्लीकरांवर खूपच जुलूम केले होते, त्यामुळे ते त्याच्यावर खवळून होते, त्याच्या शिपायांची उपासमार चालू असल्याने तेही थकले होते. बादल बेग व दिल्लीतील मुसलमान शिपाई यांच्या बाबतीत काय सांगायचे ? दरबारातील आपल्या हस्तकांकरवी गुलाम कादरने त्यांना केव्हाच खिशात टाकले होते.

रोहिला-सैन्याने दि. १४ जुलै रोजी जवळजवळ पाऊण दिवस उलटल्यावर दिल्ली किल्ल्याच्या उत्तरेस असलेल्या बराडी घाटापाशी नदी ओलांडली. त्यांना प्रतिकार करण्यासाठी बादशहाच्या सैन्याला पाठविण्यात आले; पण विश्वासघातक्यांनी दावा साधला,

बादलबेग व त्याचे मुगल शिपाई गुलाम कादरला मिळाले व बादशहाशी एकनिष्ठ असलेले हिंमतबहादूर व रवळोजी शिंदे हे त्याचे हिंदू सेनाधिकारी, आपण उगाचच सापळयात सापडू नये म्हणून आपापल्या जागेवरून मागे फिरले व त्याच रात्री त्या दोघांनी फरिदाबादकडे माघार घेतली. फरिदाबाद हे दिल्लीच्या दक्षिणेस सतरा मैलांवर आहे. त्यामुळे शत्रूला प्रतिकार करायला दिल्लीत कुणी उरले नव्हते. दि. १८ ला अफघाण-हमदानी सैन्याने शहरावर संपूर्ण ताबा मिळविला; पण लाल किल्ल्यावर बादशहाची एकनिष्ठ अशी लाल पलटण असल्याने किल्ला लढवता आला असता, व दरम्यानच्या वेळात शिंद्यांच्या सैन्यातील एखादी दमदार तुकडी मदतीसाठी येऊ शकली असती. नझीर मंझूरअलीच्या दगलबाजीने बादशहाची बाजू लंगडी पडली.[४]

नझीरने एक खुमासदार युक्ती लढवून लहरी बादशहाला बरोबर बनविले. गुलाम कादरला भेटीसाठी दरबारात बोलवावे अशी त्याने बादशहाकडून दि. १५ रोजी अनुमती घेववली. अशा प्रकारे अफघाणांनी दिल्लीचा ताबा घेण्याचा हा शेवटचाच प्रसंग आणि त्यांची ही सत्ता १८ जुलै ते २ ऑक्टोबर, १७८८ अशी जेमतेम अडीच महिनेच होती. या अल्पावधीत शाही कुटुंबीयांना अतोनात अपमान सोसावा लागला. साम्राज्याच्या प्रतिष्ठेला कधीही भरून न येणारा धक्का बसला. शहाअलमला सत्तेवरून खाली खेचण्यात आले. (३० जुलै) "गुलामकादरने पातशहाशी दगाबाजी करून कैदेत केले; व डोळे सुरीने कापून अनेक प्रकारची विपाय केली." अजाण अर्भके व असहाय्य स्त्रिया यांना उपाशी ठेवण्यात आले; त्यांना कित्येक दिवस अन्नपाण्याशिवाय तडफडावे लागले. "बादशहाजाद्यास व बेगमांस तसदी केली; बारा प्रहर पाणी पिऊ दिले नाही. बायकांचे झाडे, जडजवाहिर तमाम घेतले, उन्हात गच्चीवर उभ्या करोन मारविले." कित्येक नोकरचाकर मारता मारताच मेले. संपूर्ण किल्ल्यातल्या जागा खणून पाहिल्या, तसेच किल्ल्याबाहेरील श्रीमंतांच्या हवेल्या उलट्यापालट्या करण्यात आल्या; 'साहुकार धरून पैका घेतला.' पुरलेले जडजवाहीर व संपत्ती कुठे सापडते का, म्हणून किल्ल्यातल्या सर्व जागा खणून पहाण्यात आल्या. राजघराण्यातल्या देखण्या बेगमांची रोहिल्यांच्या वासनाकांडात आहुती पडली. नऊ आठवडे सैतानाचे पिसाट थैमान सुरू होते.

४. गुलामकादरच्या अन्यायी राजवटीत शिंद्यांची धोरणे व कृती.

बादशहा व त्याचे कुटुंबीय हे जेव्हा अनन्वित हाल सोशीत होते व त्यांची विटंबना चालली होती त्या काळात महादजी काय करीत होता ? ज्या बादशहाने त्याला जनतेत मान व प्रतिष्ठा मिळवून दिली होती त्याची सुटका करण्यास महादजीने जो संथपणा दाखवला तो त्याला दोषी ठरवावा इतका होता का ? या वेळच्या त्याच्या हालचाली व त्याची परिस्थिती यांचा आढावा घेऊनच याचे उत्तर शोधता येईल.

दि. १७ जूनला महादजीने शत्रूवर महान विजय मिळविला खरा, पण त्यानंतर शत्रूचा अविश्रांत पाठलाग करून त्याचा निःपात करणे, राणाखानाला शक्य झाले नाही. कारण दुसऱ्या दिवशी गुलाम कादरने आपला तळ हलविला तेव्हा त्याने त्यावेळी नदी-

पलीकडे जाण्यासाठी असलेल्या सर्व होड्या नदीत बुडवून टाकल्या होत्या व सर्व नावाड्यांना तो आपल्या बरोबर घेऊन गेला होता. त्यामुळे राणाखानाला मथुरेला जाऊन नवा होड्या व नावाडी पैदा करणे भाग होते. तशी व्यवस्था केल्यानंतरच त्याला आपले सैन्य अंतर्वेदीत नेता आले. पण हे सर्व करीपर्यंतच्या काळात यमुनेच्या पाण्याला रोज भरती चढत होती. त्यात पंधरवडा गेला; एवढया वेळात दोन्ही पराभूत खान दिल्लीस जाऊन पोहोचले होते. ४ जुलै रोजी महादजी स्वतः मथुरेस आला, त्यानंतर चार दिवसांनी रणजितसिंग जाट त्याला येऊन मिळाला. या ठिकाणाहून दि. ८ ला सैन्याची एक लहानशी तुकडी दिल्लीकडे पाठविण्यात आली, पण महादजी किंवा राणाखानाच्या हाताखालील त्याचे मुख्य सैन्य मात्र दिल्लीस गेले नव्हते.

यावेळेपर्यंतही शिंद्याच्या अडचणी व धोका संपलेला नव्हता हे विसरून चालणार नाही. त्याला नुकताच मिळालेला जय, केवळ योगायोग होता. त्याचे सैन्य, तोफखाना यांच्या कौशल्यापेक्षा त्यांचे कमनशिबी शत्रू व त्यांनी केलेल्या घोडचुका त्याच्या पथ्यावर पडल्या हे म्हणणे अधिक सयुक्तिक ठरेल. हिंदुस्थानी पलटणी व मुगल स्वार हे पूर्वी शिंद्याचा विश्वासघात करून त्याला सोडून निघून गेले होते. इस्माइलबेगच्या पराभवाच्या प्रसंगी ते महादजीकडे आले असले तरी याही वेळी त्याला ते सोडून गेले नसते अशी खात्री देता येण्यासारखी नव्हती. "तुम्ही तोफखान्याचा व पलटणाचा भरणा फार केला आहे, हे ठीक नाही. पूर्वीये (परभये ?) लोक दंगेखोर असतात. यांस भक्षावयास मिळेल तोपावेतो उगाच राहतील, नाहीतर दंगा करतील, दगा देतील" असा या भाडोत्री शिपायांच्या विश्वासघातकी प्रवृत्तीबद्दल बादशहाने शिंद्याला धोक्याचा इशाराही दिला होता. [**डीवाय :** भाग १, लेखांक २२९] चंबळेच्या उत्तरेस आपल्याला जीवाभावाचा एकही मित्र नाही हे शिंदे समजून होता. अपवाद काय, तो जाट राजाचा. जाट मुलुखातला आपला ठाम आधार सोडायचा, उत्तरेकडे शंभर मैल चालून जायचे; सैन्याची मदत, युद्ध-साहित्याचा पुरवठा व वाटचाल यात अडचणी येणार नाहीत असे कल्पनेत मनोरे रचायचे आणि आपल्या विरोधकांच्या घोळक्यात सामील व्हायचे ही सदाशिवरावभाऊने केलेली अक्षम्य चूक पुन्हा करायला तो तयार नव्हता. दरबारात मंझूरअलीसारखा कडवा दुष्मन, तोही सारखा बादशहाच्या कानाशी लागणारा; आणि बादशहा म्हणजे काय, तर त्याच्यावर जरब बसवू शकणाऱ्या दरबारातील कोणत्याही सरदाराच्या हातातील मेणाचे बाहुले. अशा परिस्थितीत प्रचंड सैन्य बरोबर असल्याशिवाय दिल्लीत जाण्यात महादजीला धोका होता. [**एचपी :** क्रमांक ५३०]

पण त्याच्या दख्खनी पलटणीतील शिपायांनी आपल्या पगाराची बाकी हातात पडेपर्यंत दिल्लीवर चालून जायला स्पष्ट नकार दिला. या जवानांना त्याने जनरल गोर्डाडशी लढण्यासाठी म्हणून नऊवर्षांपूर्वी गुजरातेत आणले होते. "याउपरी आपले लोक कोणी रहाणार नाहीत कारण पैशाची ओढ. नाहीतरी बंदोबस्त आजपर्यंत खस्त खाऊन केला." तेव्हापासून त्यांचा पगार थकला होता; त्यातील जमतील तेवढे पैसे व आणखी देण्या-

बाबतची महादजीने आश्वासने दिली. तेवढे मानून व परिस्थिती ओळखून अधिक ताणून न धरता या शिपायांनी त्याला मदत करायचे मान्य केले. पण त्यांचे मन वळवायला जिवबा दादाला अतोनात कष्ट पडले. (**एचपी** क्रमांक ५३७)[१]

या अडचणीत भर म्हणून पुण्यातील पेशव्यांनी त्याच्या मदतीला सैन्य पाठवायचे आश्वासन दिले होते, ते वृथा ठरले. वास्तविक हे आश्वासन धनी पेशवे यांच्यापेक्षा, या धन्याचा धनी नाना फडणीस याने दिले होते. मानसिक कुचंबणा व अनिश्चित भवितव्य या कात्रीत सापडलेला महादजी कित्येक दिवस अस्वस्थ होता. त्यातच दक्षिणेकडून येणाऱ्या चमत्कारिक बातम्यांची भर पडत होती. उत्तरेस अयशस्वी ठरलेल्या महादजीला निरोप द्यायचा व त्याच्या जागी अलिजा बहादूर किंवा तुकोजी होळकराला पाठवायचे आणि त्याच्याकडून दिल्ली दरबारातील मराठ्यांच्या फायद्याची कामे करवून घेऊन राजपुतान्यातील राजांकडून खंडणी वसूल करवायची, असे ठरले होते. या वार्ता महादजीच्या कर्तृत्वावर बोळा फिरविणाऱ्या होत्या. ब्रिटिश रेसिडेन्टने गव्हर्नर जनरलला जी पत्रे पाठविली आहेत, त्यांत अशा प्रकारच्या बातम्यांचा उल्लेख वरचेवर आढळतो. ही सगळी निर्दय कारवाई करणारा कलिपुरुष म्हणजे पेशव्यांच्या दरबारातील चितपावन जातीचा चाणक्य नाना फडणवीस होय; आणि महादजी त्याला प्रेमाने आपला भाऊ मानीत असे. [**पीआरसी** खंड १, क्रमांक २२६]

तेव्हा शिंद्याला प्रथम आपण कुठे आणि कसे उभे आहोत हे पहाणे अगत्याचे होते आणि विश्वासार्ह पाठीराखे जमविणे हे त्याच्यापुढे महत्त्वाचे काम होते. यासाठी मुखत्यार म्हणून कार्यवाहीत आणावयाच्या आधीच्या धोरणात त्याने बदल केला. बादशहाच्या सैन्यातील ज्या जबरदस्त सेनाधिकाऱ्यांनी खालसा मुलूख बळकावला होता तो त्यांच्याकडून परत घ्यायचा; तसेच ज्याला जितके सैन्य ठेवण्याबद्दल सरकारातून पैसा मिळे तितकेच सैन्य ते ठेवतात की नाही यावर हजेरी ठेवून सक्त नजर ठेवायची, हे आपले प्रारंभीचे धोरण त्याने सैल करायचे ठरविले. लष्करी सेनाधिकाऱ्यांना साम्राज्यातील मुलूख जहागिरीदाखल द्यायचा व स्वार्थाच्या बाजारात स्वतःचे पाल ठोकायचे, या नजफखानाच्या धोरणाचा अवलंब त्याला करावासा वाटला. उमरावगीर गोसावी हा त्याचा कट्टा दुष्मन; पण त्याला जेरबंद करून महादजीसमोर आणण्यात आले तेव्हा महादजीने (७ एप्रिल) नेहमीच्या शिरस्त्याविरुद्ध वागून त्याला अजिबात न दुखविता मोठ्या मानाने वागविले व त्याच्या सर्व सुखसोयींची तरतूद करून त्याला पळून जायची संधी दिली. (१८ मे) राघोगडच्या राणावर अशीच मेहरनजर करून त्याचे स्वातंत्र्य, त्याचा मुलूख व किल्ले त्याला परत दिले. मुसलमान सेनाधिकारी व भाडोत्री शिपायांवरील पगारी अधिकारी या सर्वांना त्यांच्या जागांवर कायम ठेवून त्यांच्या जहागिऱ्याही त्यांच्याकडेच ठेवण्याबाबत करार केले. या मोबदल्यात त्यांच्यापैकी कुणीही महादजीला विरोध न करता मित्रत्वाचे संबंध ठेवायचे होते. गुलाम कादर व इस्माइल बेग यांच्यासारख्या विरोधकांशीही त्याने अशाच प्रकारचा करार केला होता. या बनावाची सर्व सूत्रे हलविली गेली ती वयोवृद्ध पण कोल्ह्या-

सारख्या धूर्त अशा शहानिजामुद्दीन मार्फत. अर्थात हे सर्व प्रत्यक्षात यायला थोडा वेळ लागला. आपण दिल्लीवर चालून जाऊ इतकी आपली ताकद व सामर्थ्य वाढले आहे याचा निश्चित अंदाज येईपर्यंत जो वेळ गेला त्या दरम्यान, गुलाम कादरने बादशहाला हात दाखविला होता. शहा अलमचा भित्रा स्वभाव, विश्वासघातकी नझीरवर त्याने टाकलेला आंधळा विश्वास यामुळे आत्मरक्षणासाठी त्याला कसलाही आधार उरला नव्हता. एखादा-दुसरा महिना गुलाम कादरला थोपवून धरावे, तर तेवढाही आवाका त्याच्याजवळ नव्हता. तसे घडते तर, उपासमार होत होती त्याच काळात रोहिले शिपाई गुलाम कादरला सोडून जाते व किल्ल्याचा वेढा उठविण्यासाठी महादजीचे सैन्य येऊ शकले असते.

५. शहा अलमच्या अधःपाताच्या कारणांची मीमांसा : त्याचा स्वभाव : त्याचे घरातले शत्रू व विश्वासघातकी सल्लागार

पण .... भवितव्यता बलीयसी हेच खरे. तसे व्हायचे नव्हते. जुन्या काळची शहाणी माणसे म्हणत तसा कुणीही आपल्या ललाटीचा लेख फिरवू शकत नाही. माणसांचा स्वभाव, वागणूक म्हणजेच त्याचे दैव. शहा अलम व त्याच्या कुटुंबीयांवर जी भयानक दुर्दैवी आपत्ती ओढवली त्याला कारण त्याचा स्वभाव.

बादशहा शहा अलम हा अतिशय कमकुवत मनाचा व चंचल वृत्तीचा असला तरी विश्वासघातकी नव्हता; किंवा योग्य तो विचार करण्याची त्याची कुवतच नव्हती, असेही नव्हते. विशिष्ट गोष्ट करायची असे ठरवून ती अमलात आणण्यासाठी लागणारा ठामपणा त्याच्याजवळ नव्हता. कठोर अशा आर्थिक व व्यावहारिक अडचणींना तोंड देण्यात गेलेली पहिली पन्नास वर्षे व नंतर सततच्या आफीमबाजी- (यातनांचा विसर पडण्यासाठी नशा आणण्याकरिता) मुळे त्याची इच्छाशक्ती पांगळी झाली. त्याचा मेंदू मात्र जाग्यावर होता. म्हणून त्याची सर्व बुद्धिमत्ता, कुराण व इतिहास वाचण्याचा दैनंदिन परिपाठ, मिताहार व वागण्यातील शुचिता (या साधनेत जनानखान्यात होणारी भरती अपवाद करून) हे सर्व सद्‌गुण विचारात घेता, 'प्रत्यक्ष मरणापूर्वीचे भेकड कितीतरी वेळा मरणाचा अनुभव घेत असतात' या उक्तीची सत्यता पटविणारे त्याच्यासारखे दुसरे उदाहरण शोधून सापडणार नाही.

दिल्ली दरबारातील सर्वोच्च मानाची व सत्तेची जागा मिळावी म्हणून ज्या महत्त्वाकांक्षी स्पर्धकांची रस्सीखेच चालू होती त्यांत साम्राज्याच्या मुखत्यारीपणाची शान सांभाळणारा व त्याच्या मनीमानसी असलेली इच्छा कृतीत आणण्याइतकी पात्रता व ताकद असणारा महादजीशिवाय अन्य कुणी नाही याची त्याला मनोमन खात्री होती. त्याच्या मनची इच्छा मराठ्यांच्या या प्रतिनिधीला तो खाजगी बोलताना सांगत असे. ती म्हणजे, 'काही दिवस तरी शांतपणे भाकरी खाणे !' ब्रिटिश रेसिडेंटसह सर्वांनाच त्याची ही साधीसिधी सात्त्विक इच्छा माहीत होती. १७७१ मध्ये दिल्लीस येण्यासाठी म्हणून तो अलाहाबादहून निघाला तेव्हापासून महादजीचे सामर्थ्य व स्वामीनिष्ठा याबाबत त्याच्या मनात विश्वास होता.

महादजीच्या मुखत्यारपदाची हाव धरणारे सर्व विरोधक मूर्ख अगर कपटी होते याची त्याला जाण होती. ज्या काळात त्याच्या जीविताला व सिंहासनाला फार मोठा धोका होता त्या काळात ‘ आपल्याला लष्करी साहाय्य द्यावे व आपल्या हद्दीत आसरा द्यावा ’ अशी त्याने गव्हर्नर जनरलकडे वारंवार मागणी व विनंती केली असली तरी अयोध्येच्या नबाबाप्रमाणे ब्रिटिशांच्या हातातले बाहुले व्हायचे नाही ‘ हा त्याचा ठाम निश्चय होता.’ अलाहाबाद येथील अल्पकालीन वास्तव्यात आपल्याला ब्रिटिश अधिकाऱ्यांकडून जी अवहेलना सहन करावी लागली तशीच नेहमी सहन करावी लागावी हे त्याला मान्य नव्हते. त्याचे एकूण धोरण ठाम व कणखर नसले तरी महादजीच्या पडत्या काळात, त्याला आपल्या साहाय्यक म्हणून खोजा मंझूर अलीहून अधिक प्रामाणिक नोकर मिळता व बनिया रामरतनपेक्षा अधिक लायक सल्लागार प्राप्त होता तर त्याच्यावरची आपत्ती टळतीही.

यावेळी दिल्लीच्या राजघराण्यालाही शहा अलमच्या भेकड स्वभावाचा शाप सहन करावा लागला. विजनवासात दरोडेखोरांची गाठ पडावी तसे त्याचे सर्वांत कट्टे वैरी त्याच्याच घरात त्याच्याच कृपाछत्राखाली नांदत होते. राजघराण्यातील पारंपरिक कलहांनी त्याचा विनाशकाल ओढवून आणला असला तरी नाशाच्या त्याच धगीतून राजसिंहासन बळकाविण्याच्या महत्त्वाकांक्षेपायी त्याचे पुत्र व प्रपौत्र वेड्यासारखे पुढे सरसावले होते. पूर्वी दिल्लीवर राज्य करणाऱ्या मुहमदशहाच्या घराण्याला बाजूला सारून दुसऱ्या अलमगीरच्या वंशजांनी दिल्लीचे सिंहासन बळकावले होते; या वंशाच्या अखेरच्या कायदेशीर वारसाचे डोळे काढून त्याचा शेवट केला होता व त्या दुर्दैवी राजाच्या मुलाबाळांना दिल्ली किल्ल्यातील तळघरातील तुरुंगात भयंकर हालअपेष्टात कोंडून ठेवले होते (या भागाला सलातीन म्हणतात). ही परंपरा चौतीस वर्षे अव्याहत चालू होती.[६]

वाढत्या वयाबरोबर शहा अलमचा पैशाचा हव्यास व कंजूषपणा वाढत चालला. १७६५ मध्ये लॉर्ड क्लाइव्हशी समझोता केल्यावर बंगाल खंडणीपैकी बरीच मोठी रक्कम त्याला मिळाली होती. पथ्थरगड व गौसगड येथील लूटही थोडीथोडकी नव्हती. तरीसुद्धा नजरकैदेत असणाऱ्या आपल्या नातलगांना ओल्या-कोरड्या भाकरीशिवाय तो अधिक काही देत नसे. तीही त्यांना केव्हा केव्हा मिळत नसे. पूर्वीच्या शहाजाद्यांची नातवंडे व पुतणे उपासमार सोसावी लागल्याने प्रचंड आरडा-ओरडा करीत, इतका की त्यांच्या कोठडीच्या भिंती भेदून तो पलीकडील जगाला कळे. बादशहाच्या दरबारात आलेल्या परक्या देशांतील प्रतिनिधींनाही तो ऐकू जात असे. दुर्लक्षित अशा प्राणिसंग्रहालयातील बुभुक्षित श्वापदांनी हलकल्लोळ उडवावा, तसा हा हलकल्लोळ कॉन्त द मॉदेव (१७७५) व कॅप्टन जॉन पेस्टर (१८०४) यांच्याही कानावर गेला असल्याची नोंद आहे. उद्वेकजनक यातना आणि जीवनातील एक अर्थशून्य पोकळी यामुळे राजघराण्यातील हे जीव वेडेपिसे झाले होते. दरबारातील मुखत्यारपद बळकवायला कुणीही उपटसुंभ आला तरी त्याच्याशी संगनमत करायला हे दुर्दैवी जीव केव्हाही तयार असत. त्यांना आशा एकच; या बंडखोराचा हात धरून आपल्याला सिंहासनावर बसता येईल, बादशहा होण्याचे वैभव व सुख काही

काळ तरी उपभोगता येईल आणि ही सत्ता संधिप्रकाशाप्रमाणे क्षणजीवी ठरेल, सत्तेवरून खाली खेचण्यात येऊन आपल्याला ठार मारण्यात येईल याची खात्री असूनही आपल्या करंट्या जीवनक्रमात हा बदल घडावा असे त्यांना मनापासून वाटत असे.

आणि राजघराण्यातील बेगमा– त्यांच्यातील द्वेषभावना तर अतिशय कडवट असे. बादशहा मुहमद शहा याची विधवा पट्टराणी मलका-ई-जमानी ही लालकिल्ल्याबाहेर स्वतःच्या घरात राहत असे. बादशहा अहमदशहा हा तिचा सावत्र मुलगा. या मुलाचे लालनपालन करीत असताना 'हा मुलगा रीतसर वारस असूनही त्याचा वारसा नाकारून शहा अलमच्या बापाने त्याचे डोळे काढले होते', हे भीषण सत्य ती विसरली नव्हती. म्हणून शहाअलमला गादीवरून खाली ओढून अहमदशहाचा कोठडीत असणारा मुलगा बिदरबख्त याला गुलामकादरने सिंहासनावर बसवावे म्हणून तिने त्याला बारा लाख रुपये देऊ केले होते. तिने पैशाचा खूप मोठा साठा केला होता अशी बोलवा होती. मुहमदशहाची दुसरी विधवा स्त्री साहेब मेहेल, ही हजरत महाल या नामवंत दुराणी सेनानीच्या बायकोची आई; तीही या कटात सामील होती. [**डीवाय** : भाग १, लेखांक ३०९; **इब्रत** : भाग ३, १३७, दहा लाख दिले असे लिहितो.]

६. दिल्लीच्या राजघराण्याबाबत गुलाम कादरची सूडबुद्धी

दुसऱ्या शहाअलमचा संपूर्ण नायनाट करायचा; तसे करताना यातना व मानखंडना यावर भर द्यायचा आणि तैमूरच्या वंशजाच्या रक्ताचा घोट घ्यायचा, या सूडबुद्धीने विशेष उचल खाल्ली. वैर साकार झाले. नजीबउद्दौला हा मुसलमान साम्राज्याच्या मुखत्यारपदावर दहा वर्षे होता. त्याच्या मुलावर शहा अलमची इतराजी झाली. बादशहाने त्याचा पराभव केला. पथ्थरगड व गौसगड येथील अधिकारपदावरून त्याला निर्दयपणे हुसकावून लावण्यात आले होते व त्याची सर्व संपत्तीही लुटण्यात आली होती. झबिताने हे सगळे सहन केले होते. आता सरशी होती त्याच्या मुलाची. गुलाम कादर हा त्याच्या पित्याने व आजोबाने रंगविलेली स्वप्नसृष्टी प्रत्यक्षात आणण्याच्या प्रयत्नात होता. आपल्या घराण्यावर झालेल्या अन्यायाच्या परिमार्जनासाठी दिल्लीतख्तावर असलेल्या तैमूरच्या बावळट वंशजावर आपण का सूड उगवीत नाही म्हणून आपले जन्मदाते व पितामह आपल्याला सारखे टोचीत असतील हे त्याला विसरता येत नव्हते. हिंदुस्थानातील साम्राज्यावर अधिकार गाजविणाऱ्या राजघराण्याला योग्य तो धडा शिकविण्यासाठी महंमदाने आपला प्रेषित म्हणून आपल्याला जन्माला घातले आहे, अशी त्याची दृढ श्रद्धा होती. शूर अफघाण जातभाईचा त्याला फार मोठा आधार असल्याने आपण स्वतःच 'अल्लाच्या क्षोभाचे स्फुलिंग' (कहार-ई-खुदा) आहोत असे त्याला वाटे. भेकड आणि विलासी असणाऱ्यांनी हिंदुस्थानातील मुसलमानी साम्राज्याच्या सिंहासनाची जी विटबंना केली होती, त्यासाठी त्यांची धूळधाण करून त्यांना मातीत गाडले पाहिजे अशी त्याची धारणा होती. आपल्या बापाकडून बादशहाने व त्याच्या अधिकाऱ्यांनी पाशवी बळाचा वापर करून जे जे हिसकावून घेतले होते. त्यातली प्रत्येक वस्तू चक्रवाढव्याजाने वसूल करून घेतल्याशिवाय अफघाण रक्तातील त्याची सूड घेण्याची

ईर्षा थंडावली नसती." इस्लामच्या रक्तलांछित इतिहासात दिल्लीतील अनेक क्रूर कृत्यांची नोंद आहे. पण त्यांतील कोणत्याही क्रूर कृत्यापेक्षा गुलाम कादरच्या पशुतुल्य सूडात, दीर्घकाल यातना देणारे प्रकार व राजघराण्यातील बायकांची बेअब्रू अधिक का, हे ह्यावरून समजून येते.

गुलाम कादरने दिल्लीच्या राजघराण्यातील व्यक्तींना अनंत यातना दिल्या, क्लेश भोगावयास लावले, मानखंडना केली. राजघराण्यातील अश्राप कोवळी बालके, म्हाताऱ्या बायका, अंतःपुरातील दासी-बटकी, खोजे, लहानलहान दुकानांचे मालक, गरीब नोकर-चाकर तसेच ज्येष्ठ मान असलेले पातशहाजादे यांना ज्या यमयातना भोगावयास लावल्या त्याचे वर्णन करायचे, तर एक मोठे प्रकरणच होईल. खैरउद्दीनच्या फारशी इतिहासातील मजकूर लिहिताना मला फूल्स्कॅप फोलिओ आकाराची तेहतीस पाने खर्ची टाकावी लागली. प्रत्येक पानावर वीस ओळी मजकूर असून त्यात दोन महिन्यांतील प्रत्येक दिवशी घडलेल्या अत्याचाराची नोंद आहे. भूतलावरील या यमपुरीतील दारुण यातना वाचायला लावून आपल्या वाचकाला अस्वस्थ करावे हे आजच्या इतिहासकाराला मानवणारे नाही. या भयानक छळातील भीषण तपशील देत बसायचे त्याने टाळायला हवे; आणि मगच तैमूरच्या घराण्यातील या राजघराण्याने काय यातना सोसल्या याची थोडक्यात सर्वसाधारण माहिती द्यायला हवी. शहाअलम व त्याच्या नातलगांनी या वेळी ज्या यातना सोसल्या त्याचा शतांशही कापे घराण्याला सोसावे लागला नाही. या घराण्यालाही आपल्या दारिद्र्य व हालअपेष्टांपायीच बधस्तंभाची वाट लवकर पहावी लागली होती.

७. गुलाम कादर शहा अलमला सत्तेवरून खाली खेचतो : बिदर बख्तला तख्तावर बसवतो : ३१ जुलै, १७८८.

किल्ल्याच्या वेशीवर पहारा करणाऱ्या लाल पलटणीतील कुणीही प्रतिकार करता कामा नये म्हणून हुकूम सोडून (१५ जुलै १७८८) नझीर मंझूर अलीने गुलाम कादर व इस्माइल बेग यांना किल्यात प्रवेश करू दिला. त्यानंतर त्यांनी दिल्ली शहरावर ताबा मिळवला. (दि. १८) इस्लामशी दावेदारी करायला महाराष्ट्रातून जे काफर आले होते त्यांच्याविरुद्ध जिहाद पुकारण्यासाठी जे सैन्य उभारावयाचे त्याच्या खर्चासाठी बादशहाने भरपूर पैसा द्यावा म्हणून ते त्याच्यावर दबाव आणून त्याचा छळ करू लागले. त्यांची प्रत्येक मागणी बादशहाला मान्य करावीच लागे. त्यांच्या जिहादमध्ये आपला सक्रिय भाग म्हणून त्याने आपला मुलगा सुलेमान शुको याला त्यांच्या छावणीत पाठवून दिले. (दि.२४) मलिका-ई-जमानी या विधवा राणीने आपला नातू बिदर बख्त यास दिल्लीच्या तक्तावर बसवावे म्हणून गुलाम कादरला बारा लाख रुपये देण्याचा करार केला होता; हा करार आता प्रत्यक्षात यायचा होता.

गुलाम कादर व इस्माइल बेग हे दोन्ही खान ३० जुलैला किल्ल्यावर आले व शहा अलमशी आपण एकनिष्ठ राहू अशी त्यांनी कुराणावर हात ठेवून शपथ घेतली. लाल पलटणीचा

विश्वासू सेनाधिकारी त्यांना किल्ल्यात येऊ द्यायला तयार नव्हता. पण विश्वासू बादशहा
तसे करायला मना केले. त्यामुळे दोनहजार अफघाण शिपायांनी किल्ल्याचा ताबा घेतला
एकही धक्का न मारता बादशहाच्या संरक्षक लाल पलटणींना किल्ल्याबाहेर हाकलून लाव
नंतर गुलाम कादर महालात गेला. त्याने पातशहास शिविगाळ केली. 'पातशहा धरल
त्याचे पुत्र अठरा साहेबजादे धरले. पातशहाचे कुटुंबसुद्धा धरून एक महजदेत कैद केले.
इस्माइल बेगसह तो रात्रभर दिवाण-ई-खास व हयात बक्ष बगीच्यात मुक्काम टाकून होत
अंत:पुरातील स्त्रिया मोठमोठ्याने गळा काढून रडत होत्या; त्याने आसमंतातील काळो
आणखीच भयाण वाटत होता.

दुसऱ्या दिवशी सकाळी अगदी लवकर, या बंडखोरांनी बिदर बख्तला सिंहासना
बसवून त्याला बादशहा केले. बिदर बख्त हा पूर्वीचा बादशहा अहमदशहा याचा मुलग
त्याला नासिरुद्दीन मुहमदजहान शहा असा किताब देण्यात येऊन दिवाण-ई-खास म
राज्यारोहणाचा समारंभ करण्यात आला. शहाअलम व त्याचे एकोणीस मुलगे यां
सलातनीत बंदिवासात टाकण्यात आले. राजप्रासादातील चीजवस्तूंची लुटालूट कराय
रोहिल्यांनी आदल्या दिवशीच सुरवात केली होती; ती गुलाम कादरचे दिल्लीतील वास
त्याच्या अखेरच्या दिवसापर्यंत चालली होती.

८. शहा अलमचे डोळे काढतात : राजघराणे व राजवाड्यातील सेवकांच यातना : ऑक्टोबर–नोव्हेंबर १७८८

गादीवरून खाली खेचलेल्या शहा अलममागे एक नवाच ताप सुरू झाला. आपल
संपत्ती कुठे दडवून ठेवली आहे हे त्याने सांगावे अशी त्याच्यावर जबरदस्ती सुरू झाल
आपल्याला कोषागारात व भांडारात जे मिळाले त्याहून माझ्यापाशी अधिक काही नाह
असे त्याने उत्तर दिल्यावर त्याची मानखंडना करण्यात येऊन त्याला दमदाटीही करण्या
आली. गुलाम कादर शहा अलमच्या जवळ बसला, त्याने आपला हात त्याच्या गळ्या
टाकला व आपल्या तोंडातील तमाखूचा धूर त्याच्या तोंडावर सोडला. मग त्या अवमानि
हतभागी बादशहाला ना अन्न ना पाणी, अशा अवस्थेत तळपत्या उन्हात उभे करण्या
आले.

'पैसा, जडजवाहिर कुठे दडवून ठेवलेली आहेत ती दाखवावी' म्हणून बा
शहाला सारखे सारखे डिवचल्यावर त्याने चिडून उत्तर दिले, "माझ्यापाशी जे काही हो
ते तुम्ही भांडारातून उचललेच आहे, आता आणखी कुठे मी माझ्या पोटात तर लपवु
ठेवणार नाही ना ?" यावर रोहिला गुलाम कादर बोलला, "काय नेम सांगावा ? तु
पोट चिरून पहायला हवं एकदा !" दि. १० ऑक्टोबरला कहर झाला. सूडाची धग
फाजील हाव याने पेटून उठून गुलाम कादरने बादशहाच्या दोन्ही डोळ्यात दाभण भोस
कले. दुसऱ्या दिवशीचे त्याचे वर्तन हिंस्र पशूलाही लाज आणणारे होते. 'मरणोन्मुख बा
शहाच्या छाताडावर ओणवे होऊन आपल्या हातातल्या खंजिराने आपण त्याचे एक बुबु

काढीत आहोत ' अशा तऱ्हेचे आपले चित्र काढण्यासाठी त्याने दरबारातील चित्रकाराला बोलावून आणले. बादशहाचा दुसरा डोळा काढण्याचे वीर कृत्य, कंधारी खानाने पार पाडले. दृष्टी गेल्यावर गेल्यावर जखमी अवस्थेत असलेल्या शहा अलमला कित्येक दिवस पाण्याचा थेंबही मिळू देण्यात आला नव्हता. तीन चाकरांना ठार मारण्यात आले तर दोन पाण-क्यांना गुलाम कादरने आपल्या समशेरीने घायाळ केले. बादशहाच्या यातना या चाकर माणसांनी कुणाच्या कानी लागून सांगू नयेत म्हणून दहशतीदाखल ही शिक्षा होती.[१]

राजवाड्यातील दासी-बटकींना अमानुष व गलिच्छ यातनांना सामोरे जावे लागले. किल्ल्यात कुठे कुठे संपत्ती पुरून ठेवलेली आहे हे सांगण्यासाठी खोजांना मरेमरेतो मारण्यात आले. मग हा चाप बादशहाजादे व बेगमांना लावण्यात आला. राजाच्या कुटुंबा-तील सर्वांनाच तीन-चार दिवस अन्नपाणी मिळू देण्यात आले नाही. अनेक बालके व म्हाताऱ्या बायका मेल्या तर नव्या बादशहाची एक बिबी नुसत्या भीतीने हाय खाऊन मेली. खायला आणि आंथरा-पांघरायला न मिळाल्याने दोन बेगमांनी प्राण सोडला. त्या दोघींपैकी एकीचे प्रेत पुरण्यासही कादरने मनाई केली होती. मृत शरीर तीन दिवस कुजत होते. शेवटी त्याची दुर्गंधी असह्य झाल्यावर त्या दुर्दैवी जड देहाला मूठमाती मिळाली. मणियारसिंग कळवितो, की या दोन दिवसांत एकवीस पातशहाजादे व बेगमा मरण पावल्या व बाकीच्या त्याच वाटेला लागल्या.

सूड घेताना अहंकार फुलून येऊन तेवढ्यापुरते बरे वाटते, पण परिणामी त्याचे मोल मोजावे लागते ते कडू जहरासारखे. मलिका-ई-झमानीला ते द्यावेच लागले. रोहिला गुलाम कादरबरोबर संगनमत करून तिने आपल्या नातवाला दिल्लीच्या तख्तावर बसवले. तिच्या हातात तशी फार दिवस सत्ता नव्हती, पण जी काही थोडे दिवस होती त्या अवधीत तिने शहा अलमच्या स्त्रिया रहात होत्या त्या हवेल्यांची मनसोक्त लुटालूट केली, नेसत्या वस्त्रांनिशी त्यांना सलीमगढवरील कैदखान्यात डांबले व दडविलेली संपत्ती कोठे आहे ते काढून घेण्यासाठी त्यांच्या दासीबटकींना बेदम चोपले. कबूल केल्याप्रमाणे तिने गुलाम कादरकडे बारा लाखांहून अधिक रक्कम पोहोचती केली असल्याने किल्ल्याचा ताबा त्याने आपल्याकडे द्यावा अशी तिची मागणी होती. त्यावर गुलाम कादरने मोठे मासलेवाइक उत्तर दिले. तो म्हणाला, " राजवाड्याच्या खजिन्यात जो पैसा होता, तो त्याच्या वडिलांच्या राजधानीच्या किल्ल्यातून लुटून आणलेला म्हणजे पर्यायाने त्याचाच". म्हणजे बारा लाखांची रक्कम अजून यायची होती व ती तिने आपल्या खाजगी मिळकतीतून द्यावी असा त्याचा युक्तिवाद होता. आपल्याजवळची सर्व संपत्ती द्यावी म्हणून त्याने सगळ्या पातशहाजाद्यांस व बादशहाच्या एका बहिणीलाही मारहाण केली होती. दि. २२ ऑगस्टला त्याने मलिका-ई-झमानी व साहेबमहल या दोघींना त्यांच्या महालातून बाहेर काढले; नेसत्या वस्त्रानिशी त्यांना किल्ल्या-वर आणवले आणि अष्टकोनी बुरुजाच्या गच्चीवर त्यांना अशाप्रकारे उभे केले की, नदी-तीरावर वावरणाऱ्या माणसांना त्यांचे मुखडे पहाता यावेत. या दोघींच्या घशाला कोरड पडत होती तरी कित्येक तास त्यांना पाणी दिले नव्हते. त्यांच्या महालांचा कोपरान्

कोपरा धुंडाळून सगळीकडे खणून पहाण्यात आले. जे मिळाले ते घेण्यात येऊन घरदार उजाड करून टाकण्यात आले होते. राजघराण्यातील माणसांचा हा जो अमानुष छळ झाला त्याच्या मुळाशी मंझूरअलीसारख्या विश्वासघातक्याची कारवाईच प्रमुख होती. त्यामुळे या कलिपुरुषालाही कठोर शासन मिळाले. ते पाहिल्यावर 'ईश्वर के घर में देर है, लेकिन अंधेर नही' या उक्तीची प्रतीती येते. त्याचीही पाळी आली. राजप्रासादात ठिकठिकाणी दडवून ठेवलेली बरीचशी दौलत त्याने गुलाम कादरपुढे आणून ठेवली. त्यानंतर आणखी काही आणणे कठिण झाले, तेव्हा या नझीरचा हात धरून किल्ल्यात आलेले व लहानपणी त्याच्यामुळेच जीवदान मिळालेले हे बाळ, त्याच्यावर डाफरले, "हिरे, मोती, जडजवाहिर आणि चांदी-सोन्याचे साठे कुठे कुठे दडवून ठेवलेले आहेत हे यःकश्चित दासीबटकी सांगताहेत तिथे बादशहाच्या कुटुंबातील सर्वांची व्यवस्था पहाणाऱ्या तुझ्यासारख्याला याहून अधिक माहिती नाही हे कसे खरे मानायचे?" तो खोटे बोलतो म्हणून त्याला सात लाख रुपये दंड ठोठावण्यात आला. मग खूप खरपूस चोप दिल्यानंतर त्याला एका शौच-कूपात ढकलण्यात आले व सात लाख रुपये न दिल्यास तोंडात तो नरक भरण्यात येईल अशी धमकी देण्यात आली. त्याच्या घराची संपूर्ण तपासणी करण्यात येऊन चाळीस हजार रुपये सापडले, ते घेण्यात आले. शिवाय पाच हजार सोन्याची नाणी, चांदीची उपकरणे, भांडी व जडजवाहिर आणि उंची कापडचोपड हाती लागले. (२३ सप्टेंबर)

९. गुलामकादरची पशुतुल्य दानवी भाषा : पातशहाजादे व बेगमांची मानखंडना :

हा तरुण रोहिला केवळ अभिलाषा व सूडबुद्धी यांनीच वखवखलेला नव्हता तर त्याचे वागणे, बोलणे व पशुतुल्य आसुरी भाषा ही अंगावर काटा उभा करणारी होती. त्याच्यासारख्या मद्यप्यांतही अनेकदा काहीएक सभ्यता, उदारपणा असतो. गुलामकादर-जवळ जशी शरम वा सच्चेपणा नव्हता, तशी कणवही नव्हती. 'तू लहान बच्चा होतास तेव्हा गौसगडला माझ्या मायेच्या पंखाखाली घेऊन मी तुला वाचवलाय याचे तरी उपकार स्मर आणि मला या यातनांतून सोडव' अशी याचना दरबारातील त्याचा हस्तक नझीर मंझूर अलीने त्याच्याकडे केली; तेव्हा तो म्हणाला होता, "बापजादे म्हणत आले ती जुनी म्हण तुला माहीत नाही मंझीर? सापाला ठेचायचे नि त्याची पिले मात्र सोडून द्यायची हा काय शहाणपणा झाला?" शहाआलमनंतर गादीचा वारस होता पातशहाजादा अकबरखान. या अकबरशहाला त्याने बळे बळे मद्य प्यायला लावले व त्याला आपल्यासमोर नाचायला लावले. घाबरून गेलेल्या पोरसवदा अकबरशहाचे पाय लटपटत होते, पावले नीट पडत नव्हती; तेव्हा हा उर्मट रोहिला कुत्सित हसत त्याला म्हणाला, "तू आणि तुझ्या घरातली माणसे जर नाचेपोरे आणि कवाल्या म्हणणारे नसता तर मला इतकी मोठी मानाची जागा कशी मिळाली असती?" एक दिवस तर अत्यंत मग्रुरीने तो म्हणाला होता, "मी माझ्या सर्व रोहिला शिपायांना फर्मान काढतो, त्यांनी मुसलमानांच्या बेगमा खुशाल धराव्यात, फरफरटत घरी घेऊन जाव्यात व निका न लावताच त्यांना जवळ ठेवून घ्यावे. म्हणजे या रोहिल्यांपासून त्यांना जी मुले होतील ती तरी पौरुषयुक्त होतील!" अशा प्रकारची

त्याच्या मुक्ताफळांची अंगाला घरे पाडणारी कितीतरी गलिच्छ उदाहरणे खैर उद्दीनाने दिलेली आहेत.

सिंहासनासाठी खून आणि द्रव्यलोभापायी एखाद्याचा छळ या गोष्टी पूर्वेकडील देशांतील राजप्रासादांना तरी अनोख्या नाहीत, मध्ययुगीन पाश्चात्त्य देशांनाही त्या अज्ञात होत्या असे नव्हे. पण हिंदुस्थानातील सर्वसाधारण रयतेच्या दृष्टीने गुलाम कादरचा सर्वांत नीच अपराध म्हणजे राजघराण्यातील बेगमांची त्याने केलेली क्रूर विटंबना. बादशहाच्या राजवाड्यातील काही जणींना बेदम मारझोड झाली, अनेकजणी उपासमार होऊन मेल्या. बादशहा मुहमद शहा याच्या आदरणीय अशा दोन विधवा स्त्रिया व शहा अलमच्या राण्या यांच्या वाट्याला आलेली अवहेलना करुणा उत्पन्न करणारी होती. या बायांना पडदा वा बुरखा न घालू देता अशा ठिकाणी उभे करण्यात आले होते, की रस्त्याने जाणाऱ्या अलबत्या गलबत्याने त्यांच्याकडे खुशाल टक लावून पाहावे. त्यांच्या विटंबनेचा हा कळस होता. याहूनही हलकट व निंद्य कर्म करण्यास त्यास शरम वाटली नाही. दोन शहाजाद्यांच्या यौवनाने बहरलेल्या राजकन्यांच्या सौंदर्याचे मिष्ठास वर्णन ऐकून त्याने त्यांना आपल्या मोतीमहालात बोलावून घेतले. वेळ रात्रीची. या तरुणींच्या चेहऱ्यावरील जाळी व बुरखा ओरबाडून काढून दूर फेकून देण्यात आला; त्यांचे सौंदर्य, देखणेपण यांचे त्याच्या खास दोस्त मंडळीत बीभत्स प्रदर्शन करण्यात आले. शेवटी या हलकट नराधमाने त्यांना फाजील, अश्लील प्रश्न विचारले व छातीशी घट्ट कवटाळून धरीत आपली भोगवासना तृप्त केली.[10]

शेवटी सेनाधिकारी मणियारसिंग याने या कमनशीबी राजकन्यांना या संकटातून सोडवले व त्यांना त्यांच्या माणसांत पाठवून दिले. दारिद्र्य, दैन्य आणि अवहेलना यांत आकंठ बुडालेल्या दिल्लीच्या शाही घराण्याबद्दल सर्व थरांत अजूनही आदर होता. रानटी, क्रूर, दरोडेखोर लुटारूंनीही नजरेने वा कृतीने मुगल राजकन्येची बेअदबी केली नसती. दिल्लीच्या प्रासादात हा घृणास्पद प्रकार घडल्यानंतर अवघ्या सहाच वर्षांनी एका इंग्रज सनदी अधिकाऱ्याला आलेला हा अनुभव पहाण्यासारखा आहे. टॉमस ट्वायनिंग हा सनदी अधिकारी विलक्षण प्रसंगावधानी होता. तो स्वतःच्या खाजगी कामासाठी म्हणून दिल्लीस जायला निघाला होता तेव्हा त्याच्याबरोबर फक्त वीस शिपाई होते. दिल्लीहून परत फिरताना बुलंद शहरानजीक १५० ते २०० गुजर दरोडेखोरांच्या टोळीने त्याला गाठले. गुजर हे अत्यंत क्रूर असे धंदेवाईक दरोडेखोर. टॉमस ट्वायनिंगचे प्रसंगावधान वाखाणण्यासारखे होते. गुजर डाकूंना पहाताच त्याने आपल्या पालखीचा मोहरा चटकन फिरविला व आपल्या भोयांना मोठ्याने ओरडायला सांगितले, 'बादशहा का हरेम की बिबीसाब' (बादशहाच्या जनानखान्यातील बिबी) ती आरोळी ऐकताच दरोडेखोरांची ती टोळी एकदम मागे झाली व पालखीला आदराने कुर्निसात करून निघून गेली. (ट्रॅव्हल्स इन् इंडिया पृ. २६९) क्रूर दरोडेखोर व पाषाणहृदयी डाकू यांनाही जी गलिच्छ गोष्ट करण्याचा धीर झाला नाही ते हलकट कृत्य करताना, साम्राज्याच्या एका मुखत्याऱ्याच्या मुलाला, दुसऱ्या एका मुखत्याऱ्याच्या नातवाला व स्वतः मुखत्यार असलेल्याला जराही शरम वाटली नाही.[11]

पण या रोहिल्याने छळ करण्याचे जे तंत्र उपयोगात आणले ते विलक्षण परिणामकारक ठरले हे मात्र नाकारता येणार नाही. ते तंत्र कितीही अमानुष असो, त्याचा उपयोग ताबडतोब झाला. स्वतःचा छळ होईल ही भीती, राजघराण्यावरचा राग किंवा एखादे बक्षीस वा कृपादृष्टी मिळविण्याची आशा या पायी, ज्या ज्या ठिकाणी पैसा, जडजवाहीर, रत्ने, सोने, चांदीची भांडी व मूल्यवान कापडचोपड दडवून ठेवलेले होते, त्या त्या जागा दासींनी स्वतः होऊन दाखवून दिल्या. वरीलपैकी कितीतरी किमती चिजा तळघरात अगर जमिनीत, पिढ्यान्‌पिढ्या पुरून ठेवण्यात आलेल्या असल्याने त्यांची कळा गेल्यासारखी झाली होती. खणून काढण्यात आलेल्या काही मूल्यवान वस्तूंत काही भरजरी कपडे, हिरे, व मोती ही इतकी पुराणी व दुर्मिळ होती, की त्यांची किंमत काय असावी असे जेव्हा गुलाम कादरने दिल्लीतल्या रत्नपारख्यांना विचारले होते तेव्हा, 'यापूर्वी असले किमती जडजवाहीर आपण पाहिलेलेच नसल्याने त्याची किंमत सांगणे आपल्या ताकदीबाहेरचे आहे' अशी त्यांनी नम्र कबुलीही दिली होती, व अस्सल माल घेणारे आता कोणी उरले नाहीत असेही सांगितले होते. दिल्लीत रोकड व अन्य वस्तू या स्वरूपात जी लूट हाती लागली त्याची किंमत पंचवीस कोटी[१२] रुपये असावी असा अंदाज खुद्द त्याच्या बायकोनेच केला होता. (इब्रत भाग ३; १८५) किल्ल्यात सर्वत्र उकरा–उकरी करून ठेवलेली असल्याने त्या ढिगाऱ्यात मागाहून राणाखान व राजवाड्यातील नोकराचाकरांना आणखी काही नाणी व जडजवाहीर सापडले. दक्षिणेतील काफरांविरुद्ध जिहादची आरोळी देणाऱ्या व ईदच्या चांदाचे पाईक म्हणविणाऱ्या या पाक रोहिल्यांनी जुम्मा मशिदीच्या एका घुमटावरील सोन्याचा पत्रा काढून तो सराफकट्ट्यावर फुंकून टाकून त्याचे पैसे केले होते. पुढे मणियारसिंगाने याच मशिदीवरील तसाच पत्रा काढायचा प्रयत्न केला तेव्हा राणाखानाने त्याला तसे करू दिले नाही; व 'पवित्र वास्तूवरील या अपकर्माची वार्ता दिल्लीतील मुसलमानांना समजली तर शस्त्र हाती घेऊन ते दंगा माजवतील' असा इशाराही दिला. (इब्रत. पृ. १५८)

१०. इस्माइल बेगचे धोरण व कृती, दिल्ली शहरातील परिस्थिती : ऑगस्ट– सप्टेंबर १७८८

मधपी रोहिला दिल्ली किल्ल्यातील राजप्रासादात धुमाकूळ घालीत होता तेव्हा इस्माइल बेग हमदानी काय करीत होता? जी लूट मिळेल त्यातली एकतृतीयांश मुगल सेनेच्या प्रमुखाने म्हणजे त्याने व दोनतृतीयांश रोहिला प्रमुखाने म्हणजे गुलाम कादरने घ्यायची असा त्यांच्यांत करार झालेला होता. दि. ३१ जुलै रोजी शहा अलमला दिल्लीच्या तख्तावरून खाली ओढण्यात आले, त्याची अवहेलना करण्यात आली त्यावेळी या आपल्या मित्राकडे इस्माइल बेगने तक्रार करून असे न करण्याबद्दल त्याला सांगितले होते. पण त्याचा काहीही उपयोग झाला नाही. दिल्लीतील राजवाड्याच्या लुटीतील एक तनसडीही त्याच्या वाट्याला आली नाही. त्यामुळे हमदानी संतापला व गुलाम कादरपासून दूर जाऊन शहरातच पण खूप लांबवर त्याने आपला तळ टाकला. गुलाम कादरने त्याला

समजावण्याचा प्रयत्न केला, पण त्याला त्याचा पूर्ण वाटा द्यायला तो तयार नव्हता. मेहेरबानी म्हणून दिलेल्या थोड्याफार रकमेवर त्याने खूष रहावे ही त्याची अपेक्षा होती. तसे दोघेही दिल्लीचे मालकच. आपापसांत विशिष्ट भाग वाटून घेऊन एकाने दुसऱ्याच्या हद्दीत शस्त्रांचा वापर करायचा नाही असे ठरले होते. शहरातील भाग व वेशी यांच्या स्वामित्वाबाबत दोघांत विभागणी झाली होती. " किल्ल्यात रोहिल्यांचा बंदोबस्त आहे. शहरात निम्मे दरवाजे यावर इस्मालबेगचे लोक आहेत, निम्मे दरवाज्यावर रोहिल्याकडील लोक आहेत."

एकदा गुलाम कादर इस्माइलला भेटायला गेला होता तेव्हा मुगल सेनाधिकाऱ्यांनी त्याला पकडून त्याच्याकडून आपल्या धन्याची येणे असलेली रक्कम जबरदस्तीने वसूल करण्याचा प्रयत्न केला होता. पण गुलाम कादरच्या सैन्यातील अधिकारी मणियारसिंग याच्या प्रसंगावधानाने तो बचावला. मणियारने त्याच्या भोवताली सैनिकांना चौकोनी रचनेत उभे केले होते. (इब्रत पृ. १६३) शेवटी नझीर मंझूरअलीकडील लुटीतून गुलाम कादरला जे चाळीस हजार रुपये मिळाले होते, ते त्याने दि. २५ सप्टेंबर रोजी इस्माइलकडे पाठवून दिले. गुलाम कादरला राजवाड्याच्या लुटीतून जे घबाड हाती लागले होते त्याच्या गणतीत ही रक्कम म्हणजे ' दर्या मे खसखस ' होती.[१३]

दोन महिने तरी दिल्ली शहर अफघाण व मुगल यांच्या कृपाछत्राखाली वावरत होते. लुटालूटप्रसंगी वर्दळीवर येऊन दोघेही भररस्त्यात शस्त्रे परजून उभे रहात. अशा प्रकारच्या खणाखणीत रोहिल्यांचीच विशेष हानी होत असे. कारण दिल्लीतले व्यापारी व रहिवाशी यांच्यात मुगलांचे आप्तसंबंधी व स्नेहीसोबती यांचा भरणा जास्त असे ; व अफघाणांबद्दल दिल्लीकरांना तेवढी आत्मीयताही नव्हती. परंतु पैशाची विलक्षण चणचण व दाणागोटा आदि गरजेच्या वस्तूंचा अपुरा पुरवठा यामुळे इस्माइल बेगची अवस्था अतिशय कठीण झाली होती. उपासमार सोसून अर्धपोटी रहाणारे त्याचे शिपाई, शेवटी नाइलाजाने मराठा सैन्यात जाऊ लागले होते. अखेरीस जवळजवळ सप्टेंबर संपता संपता मराठ्यांनी दिल्लीवर नव्याने हल्ला चढवायचे ठरविले; तेव्हा इस्माइल बेगने शिंद्यांशी समझोता केला व शहर आणि किल्ला यांच्यावर सत्ता गाजविणाऱ्या रोहिल्यांवर हल्ला करताना अगदी उजळ माथ्याने तो राणाखानच्या सैन्यात सामील झाला. नजफकूली रेवाडीस होता. शिंद्याच्या हुकुमानुसार त्याच्यावर हल्ला करण्यासाठी म्हणून इस्माइलला १७ आक्टोबरला तिकडे पाठविण्यात आले.

११. राणाखान दिल्ली शहर व किल्ला परत जिंकून घेतो : २–११ आक्टोबर, १७८८

मराठ्यांनी दिल्ली शहर व किल्ला यांवर आपले स्वामित्व पुन्हा प्रस्थापित केले. महादजीने मराठ्यांचे छोटेसे घोडदळ, मथुरेहून ८ जुलै रोजी दिल्लीकडे रवाना केले होते हे आपण पाहिलेच आहे. गुलाम कादरने दिल्लीत शिरू नये म्हणून योग्यवेळी तिथे पोहोचून त्याला अटकाव करणे हे या घोडदळाला शक्य झाले नव्हते. हे घोडदळ फरीदाबादशीच येऊन पोहोचले होते. त्यांच्या बरोबर बादशहाच्या सैन्यात असलेला हिंमत बहादूरही होता. तो आता बादशहाच्या नोकरीत रुजू झाला होता. (१४ जुलै) आपल्या या घोडदळाला लढाईच्या दृष्टीने परिपूर्ण करण्यात शिंद्याचे दोन महिने गेले. मात्र या अव-

धीत दख्खन स्वारांची पलटण स्वस्थ नव्हती. ते यमुनेच्या उत्तर तीरावर आले व त्यांनी दाणागोटा घेऊन जाणाऱ्या उंटाच्या काफिल्यांची लुटालूट केली व दिल्लीकडे जाणाऱ्या त्यांच्या पुरवठ्यात खंड पाडला. (१९ ऑगस्ट, **डीसी**)

शेवटी दि. १४ सप्टेंबर रोजी आपल्या विश्वासातील शूर सेनापती राणाखान याच्या हाताखाली बराच मोठा फौजफाटा देऊन त्याला दिल्लीकडे पाठवून दिले.[१४] त्यानंतर साधारणपणे बारा दिवसांनी जिवा दादा बक्षी याच्या हाताखाली सैनिकांची आणखी एक तुकडी तिकडे पाठविण्यात आली. महादजीला शिपायांच्या पगाराची बरीचशी थकबाकी द्यायची होती. ती वेळेवर न देता आल्याने सैन्य निघण्यास थोडाफार उशीर झाला. सेनाधिकाऱ्यांनी शिपायांना चार समजुतीच्या गोष्टी सांगितल्या व त्यांचे मन वळविले. अखेरीस ते फरीदाबादेस जाऊन पोहोचले. " दाहा बारा करोडचे वित्त रोहिल्यांचे हाती लागले. इस्माइलबेगास तिसरा वाटा देऊ केले होते. ते बदमामली करून काही न दिल्हे ! यास्तव इस्माइल बेग राजश्री माहादजी शिंदे यांसी मिळाला." त्याच्याशी पुरतेपणी एकोपा झाल्यावर त्या दोघांनी रोहिल्यांवर हल्ला करावयास सुरवात केली. दि. २८ सप्टेंबरला ते शहाजननगरीच्या दक्षिणेस असलेल्या जुन्या दिल्लीत आले. त्यानंतर शहराचा बंदोबस्त करून त्यांनी किल्ल्यास मोर्चे लावले. थोड्याफार चकमकीनंतर सर्व रोहिला शिपायांना किल्ल्यात हाकलण्यात आले. मराठे, इस्माइल बेग व बेगम समरू या तिघांनी हातमिळवणी केली व किल्ल्यासमोर खंदक खणून तिथून किल्ल्यावर तोफा डागण्यास प्रारंभ केला. [**डीवाय** : भाग १, लेखांक, ३४४]

गुलाम कादर फार घाबरला; मराठ्यांनी अंतर्वेदीत छापे घालून किल्ल्याकडे येणारी रसद बंद पाडली होती. त्यामुळे किल्ल्यातील शिबंदी उपाशी मरू लागली : " किल्ल्यात अन्नाची मोठी विपत्य आहे ! किल्ल्यातील जिन्नस जप्तीची होती, त्यास उतरवायास रात्री नावा तयार करून प्रारंभ केले. " किल्ला लढविणे अवघड जाऊ लागल्याने त्याने किल्ल्यातील लूट, अन्य चीजवस्तु, सामानसुमान व सैन्य गौसगडच्या रस्त्यावर असलेल्या सलीमगढमार्गे नदीवरून पलीकडे नेण्यास सुरवात केली. किल्ल्यात फक्त शिबंदीच राहिली. मराठ्यांचे बरेच सैन्य अंतर्वेदीत वरच्या भागात शिरले. मराठ्यांशी संगनमत करून त्यांच्याच आशीर्वादाने गुजर व शीख यांनी गुलाम-कादरच्या खजिन्याची व सामानसुमानाची मन-सोक्त लूट केली व " गौसगडपासून उत्तरेकडील टेकड्यांपर्यंत दिवा लावायला सुद्धा कुणाला घरात राहू द्यावयाचे नाही ' असे ठरवून ते प्रत्यक्षात आणले. गुलाम कादर आपल्या जहा-गिऱ्यांच्या बचावासाठी घाईगर्दीने यमुनेच्या पूर्व तीरावर आला. मराठा स्वारांजवळ तोफ-खाना नव्हता, प्रशिक्षित शिस्तबद्ध बंदुकधारी नव्हते; त्यामुळे गुलामकादरची व त्यांची उघड्या मैदानात गाठ पडली म्हणजे त्यांना पळून जावे लागे. काही दिवस गुलाम कादर दिल्लीतील किल्ल्यावर वारंवार जात असे. परत फिरताना तो बिदर बख्त, राजपुत्र अकबर व मरणोन्मुख शहा अलमला मारझोड करी व त्याच्या आणि बिदरबख्तच्या काही मुलांना कैद करून बरोबर घेऊन जात असे.

उपासमार सोशीत गलितगात्र रोहिला शिबंदी कसेबसे किल्ल्याचे रक्षण करीत होती. बाहेर खंदकात मराठा सैन्य होते. दोन्ही बाजूने गोळीबार चालूच होता. करबला येथे होणाऱ्या शहीद इमाम हुसेनच्या पुण्यतिथीच्या आदल्या दिवशी म्हणजे दि. १० आक्टोबरला सायंकाळी गुलाम कादर किल्ल्यात होता. दारूगोळा हलविण्याचे काम चालू असताना एका रोहिला शिपायाच्या हलगर्जीपणामुळे दारूगोळ्याचा एक कोठा उडाला. ज्वालामुखीचा उद्रेक होऊन प्रचंड भडका उडावा तसा प्रकार झाला. नासधूस झालेल्या वस्तूंचे भग्न अवशेष शहरात दूरवर मध्यभागी जाऊन पडले. गुलाम कादर या अपशकुनाने मनात चरकला आणि म्हणाला, "मी किल्ल्यात रहावे अशी या वास्तूची इच्छा दिसत नाही." उरलेली सर्व चीजवस्तू व लूट घेऊन आपल्या शिपायांसह तो किल्ल्याबाहेर आला व होड्यात बसून पलीकडे गेला. "रोहिले बहुत उठून गेले. मग घाबरून किल्ल्यातून रोहिले पळून यमुनापार गेले." त्या दिवशी किल्ल्यात रुपयाला दोन शेर या प्रमाणे धान्य विकले गेले होते. त्या नंतरच्या दुसऱ्या दिवशी पैसाच काय, शीलाच्या मोबदल्यातही धान्य मिळाले नसते.

दुसऱ्या दिवशी सकाळी (११ ऑक्टोबर) लष्करी हालचाली कशा व काय पद्धतीने करायच्या याबाबत राणाखान आपल्या शिपायांना सूचना देत होता. किल्ल्याच्या तटबंदीवर सर्वत्र सामसूम असून सुने सुने भासत होते. किल्ल्यावरील कोठडीतून काही पातशहाजादे कोंडलेले होते, त्यांच्या कोठड्यांना गुलामकादरने बाहेरून कुलुपे ठोकलेली होती. या किल्ल्यातील बंदिवान पातशहाजादे मराठा शिपायांना ऐकू जावे म्हणून मोठमोठ्याने ओरडून सांगत होते की गुलामकादर आपल्या माणसांसह किल्ला सोडून निघून गेला आहे. हिंमतबहादूरने, किल्ल्याच्या बुरुजावरून जेथून गोळ्या झाडल्या जातात तेथपर्यंत आपला माणूस दोरावरून पाठविला व मग तो स्वतः किल्ल्यात गेला; जवळ जवळ मरायला टेकलेल्या शहा अलमला तातडीने जरूर होती ती अन्न आणि पाणी यांची. त्याची सोय मराठ्यांनी तातडीने केली. कितीतरी शहाजादे, बेगमा व त्यांच्या दासी बटकी अशाच अन्नपाण्याविना तडफडत होत्या. राणाखानने खूप प्रकारची खाद्य-पेये तयार करवून घेऊन ती भरपूर प्रमाणांत त्यांच्याकडे पाठवून दिली. जवळ जवळ दोन अडीच महिने कुणीही लक्ष न दिल्याने कैदेतल्या अनेकांची नखे व दाढ्या वाढल्या होत्या. त्यासाठी नापितांना ते काम करण्यास सांगण्यात आले.

राणाखान बादशहाची भेट घ्यायला थांबला होता. त्याला आणखी काही दिवस वाट पहावी लागली. त्याला बादशहाशी बोलायचे होते ते शिंद्याचा प्रतिनिधी या नात्याने; व हातचे काहीही न राखता. राजधानी दिल्लीचा पसारा अवाढव्य; कायद्याचे अस्तित्व नसलेल्या त्या शहरातले सर्व जीवनच ढवळून निघाले होते, लुळेपांगळे झाले होते. शिंद्यांचे वर्चस्व तिथे परत आणायचे होते ते तेथील जीवनाला सुरक्षितता यावी या हेतूने. त्यासाठी विश्वासघातकी नझीरचे हस्तक व छुपे सहकारी यांना हुडकून काढून त्यांचा बंदोबस्त करायचा होता. राजघराण्यातील माणसांकडूनच जबरदस्तीने घेतलेला व अद्याप किल्ल्यातच

असलेला असा लुटीचा प्रत्येक जिन्नस धुंडाळून हस्तगत करायचा होता. अशा या संजीवक उपायांनी बादशहाला नवचैतन्य येत असे.

आपल्यातील काही प्रमुख सरदारांसमवेत राणाखानाने १६ ऑक्टोबरला बादशहाची भेट घेतली. दृष्टी गमावलेल्या त्या सार्वभौम बादशहाच्या अपरिमित हानीबद्दल बोलून त्याने बादशहाला जास्तीत जास्त धीर दिला. त्यानंतरच्या दुसऱ्याच दिवशी शुक्रवार होता. त्याच शुक्रवारी राणाखानने जामा मशिदीत शहाअलच्या नावे पुन्हा पुन्हा खुदबा पढवला. दिल्ली शहरावर शिंद्याचा ध्वज पुन्हा एकदा दिमाखाने फडफडू लागला : नंतरची तेरा वर्षे त्यात जराही खंड न पडता तो तसाच डौलाने फडफडत राहिला; त्याच्या जागी नंतर आले, ते सेन्ट जॉर्जचे निशाण.

१२ : गुलाम कादरचा शोध नोव्हेंबर–डिसेंबर : १७८८

दोन विरोधी शक्तींत व प्रवृत्तींत गेले सोळा महिने जे लष्करी डावपेच व हालचाली झाल्या त्याच्या रटाळ हकीगतीनंतर गुलाम कादरचा पाठलाग करून त्याला कसे हुडकून काढण्यात आले याचे तपशीलवार निवेदन कंटाळवाणेच होईल. या पाठलागात विशेष महत्त्वाचे वा चित्तवेधक असेही काही नाही. ऑक्टोबरच्या सुरवातीपासून आग्रा येथे जेवढ्या होड्या व नावा मिळतील, तेवढ्या सगळ्या दिल्लीस पाठवायचा सपाटा महादजीने सुरू ठेवला होता. त्याचा उद्देश हाच की या होड्यांचा उपयोग करून आपल्या सैन्याने यमुनापार होऊन अंतर्वेदीत जावे व 'गुलामाचे पारपत्य करावे.' रायाजी पाटील हा या आधीच दक्षिणेकडून अंतर्वेदीत आला होता. हिंदोन ओलांडून त्याने गुलाम कादरच्या सैन्याची रसद बंद केली होती. त्याच्या समवेत देवजी गवळीही होता. पण लढाईच्या ऐन धामधुमीत मराठ्यांच्या तट्टांचा, गुलाम कादरचा तोफखाना व फ्रेंच सेनाधिकाऱ्याच्या हाताखालील शिस्तबद्ध बंदूकधारी शिपाई यांच्यासमोर निभाव लागत नसे. मराठ्यांजवळ विशेष शस्त्रेही नव्हती. त्यामुळे त्यांना जबर मार खावा लागला. देवजी स्वतः जखमी झाला. [१२ ऑक्टोबर; इब्रत : भाग ३, पृष्ठ १७३] या मराठ्यांनी शिंद्याकडे मदतीसाठी तातडीची मागणी केली. तेव्हा शिंद्याने जिवा दादा व तोता फिरंगी यांना बऱ्याच मोठ्या सैन्यासह दिल्लीतून त्यांच्या मदतीला जायला सांगितले.[१५]

दि. ३ नोव्हेंबरला राणाखानही सैन्यापाठोपाठ निघाला. बेगम समरूने आपल्या संपूर्ण फौजेसह त्याच्याशी हातमिळवणी केली; पण ठरविलेल्या वेळेपेक्षा राणाखानाला पुन्हा उशिरा निघावे लागले. त्याचेही कारण पुन्हा पगार न देता आलेल्या शिपायांनी आरडा-ओरडा करून त्याला अडवून धरले होते. रायाजी पाटील व दख्खनच्या सैन्यातील अनेक मराठा सरदार यांच्या हाताखाली जवळजवळ आठहजार शिपाई होते. त्याशिवाय जाट-राजाने आपले आठहजार शिपाई व बावीस तोफा बरोबर घेऊन तो शेरगढनजीक यमुना उतरून गेला आणि रायाजीशी अंतर्वेदीत हातमिळवणी करता यावी म्हणून वरच्या बाजूस जाऊ लागला. राणाखानही बरोबर वीसहजारांचे सैन्य घेऊन आला व त्याने या पाठलागात विशेष पुढाकार घेतला. गुलाम कादरची शिकार करायला निघालेल्या या सैन्यात

णखी काही आठवड्यांनी आणखी भर पडली. पेशव्यांचे सैन्य हाताखाली घेऊन
ालेला अली बहादूर हा अखेरीस मथुरेस येऊन महादजीच्या बाजूला दाखल झाला.
नोव्हेंबर) त्या महिन्याच्या १७ तारखेला त्याच्या तुकडीसह त्याला गुलामकादरच्या
ासाठी पाठविण्यात आले.

गुलामकादरने दिल्लीचा लाल किल्ला सोडला. (१० ऑक्टोबर) व नदी ओलांडून
दुसऱ्या तीरावर आला. आल्याबरोबर त्याने प्रथम काही केले असेल, तर उतारूंची
तूक करणाऱ्या होड्यांना वीस मैल आत येण्यास मनाई केली. पण मराठा सैन्य
येने प्रचंड. त्यांनी नदीवर जिथे गुलामकादरचा पहारा होता तिथून वरील व खालच्या
ास खूप अंतरावरून आपल्या सैन्याला नावेतून पलीकडे न्यावयास लावले. अशाप्रकारे
ठा सैन्य पलीकडे गेल्यावर ते गुलाम कादरच्या छावणीभोवती घिरट्या घालीत
ले. त्यांनी गुलाम कादरची रसद तोडली. दिल्लीत किल्ल्यावर जशी परिस्थिती होती,
ीच या छावणीतही झाली. धान्याची जीवघेणी टंचाई भासू लागली. त्याच महिन्याच्या
दिनांकास त्याला आणखी एक असह्य तडाखा बसला. अलिगढ येथील त्याचा प्रचंड
ला व भांडार ही मराठ्यांसाठी खुली करण्यात आली. रोहिला गुलाम कादर दक्षिणे-
वळला व कोणतीही निश्चित योजना समोर न ठेवता, या ठिकाणाहून त्या ठिकाणी
ा भ्रमिष्टासारखा फिरत मराठ्यांशी लढत राहिला. त्यातून निष्पन्न मात्र काहीही
नाही; प्रत्येक चकमकीत त्याची घोडी व माणसे मरू लागली. हे नुकसान सतत
न करणे शक्य नव्हते. शेवटी दि. ४ नोव्हेंबरला त्याने मीरत किल्ल्याचा आश्रय
ा. मराठ्यांनी सदर किल्ल्याला वेढा घातला. अलि बहादूरच्या सैन्याची त्यात
ाखी भर पडली. (११ डिसेंबर) वेढा आणखी बळकट करण्यात आला. अन्नाची
ण चणचण व माणसांची बेसुमार गर्दी त्यामुळे किल्ल्यात 'न भूतो' गोंधळ माजला.
से व पशू शेकड्यांनी मरू लागले. त्यांच्या प्रेतांच्या दुर्गंधीने किल्ल्यातली हवाही
डू लागली. शेवटी गुलाम कादरने आपली वाडवडिलार्जित मिळकत व स्वातंत्र्य परत
ळणार असेल आणि आपणास कसुरीची माफी मिळणार असेल तर पातशाहाजाधास
न देण्यास आपण तयार आहोत अशा अर्थाचे बोलणे लावले. पण या वाटाघाटी
ाकटल्या. त्यानंतर दिल्लीच्या राजघराण्यातील जे कोणी राजपुत्र त्याच्या ताब्यात होते
ची कत्तल करण्याचा त्याचा प्रयत्न होता. या शेवटच्या अपकृत्यातून त्याला मणियार-
ाने मागे खेचले. कदाचित पिसाट बनलेल्या त्याला त्याच्या धन्याने कंठस्नानही
ले असते. तो धोका पत्करूनही मणियारने हे सत्कृत्य केले.

शेवटी परिस्थिती अशी निकरावर आली की वेढा पडलेल्या किल्ल्यातील माणसांना
णे अशक्य झाले. तेव्हा मराठ्यांच्या मागे काहीतरी शुक्लकाष्ठ असावे यासाठी सूरजकुंड
मणियारच्या हाताखाली सैन्य देऊन व त्याला मराठ्यांशी लढण्यात गुंतवून दि. १७
ंबरला रात्री गुलाम कादर किल्ल्यातून निसटला. सोबत ५०० स्वार होते. त्यांच्यासह
न गोसगडाकडे जावयास निघाला. थोडे फार अंतर चालून गेल्यावर त्याची व जिवा

दादाच्या तुकडीची गाठ पडली; त्यांच्यांत झटापट झाली. मध्यरात्र पडेपर्यंत मराठ्यांनी त्याचा पाठलाग केला व त्याचे निम्मे सैनिक गारद केले. पाठलाग करणारे थोडेफार विसावले तेव्हा गुलाम कादर एका खड्ड्यात दडून बसला, व काही वेळाने त्याने पुन्हा पुढे पळण्यास सुरवात केली. रात्रीच्या मिट्ट काळोखात त्याची व त्याच्या माणसांची चुकामूक झाली. गुलाम कादर रस्ता आणि स्नेही दोन्ही चुकला व एकटाच वाट फुटेल तिकडे चालू लागला. शेवटी त्याचा घोडा एका खड्ड्यात पडून त्याचा खूर जायबंदी झाला. गुलाम कादर लंगडत लंगडतच वाट फुटेल तसा चालत राहिला. पहाट होत होती त्या समयास तो एका खेड्यात आला. शामलीच्या नैऋत्येस तीन मैलांवर असलेले ते बामणोली[१६] या नावाचे एक खेडे होते. त्याने जवळ जवळ चाळीस मैलांची रपेट मारली होती, पण आपल्या गावी जाण्यासाठी पूर्वेकडे वळण्याऐवजी तो वायव्येकडे वळला होता. बामणोलीत त्याने एका ब्राह्मणाकडे आसरा घेतला. खैरउद्दीन म्हणतो त्याप्रमाणे गुलामकादरने केलेल्या लूटमारीत या ब्राह्मणाला त्रासही झाला असावा. गुलाम कादर त्या ब्राह्मणाला म्हणाला, "मजला दोन तट्टू देऊन गोसगडास पोचवून देणे; मागशील ते देईन...ब्राह्मणाने खातरजमा करून गुलामाला घरात खोलीत कोंडून ठेवले. त्याला म्हणाला, तू येथे स्वस्थ रहा; एक दोन दिवस गेले की तुला गोसगडला पोहोचवितो. मग तो ब्राह्मण लष्करात राणेखानभाई यांस सांगण्यास आला. अलिजाबहादूरचे फौजेने या ब्राह्मणास दरडावून विचारले तेव्हा त्याने गुलाम कादरला दाखवून दिले." मराठ्यांचे काही लोक तिथे आले व त्यांनी या रोहिला प्रमुख गुलाम कादरला कैद केले. (१९ डिसेंबर)

दरम्यानच्या काळात म्हणजे गुलाम कादर किल्ल्यातून पळून गेल्याचे समजताच त्याचे बहुतेक सरदार सर्व चीजवस्त तिथेच टाकून किल्ल्यातून पळून गेले. दुसऱ्या दिवशी राणाखान किल्ल्यावर गेला. कैदेत असलेल्या सर्व पातशहाजाद्यांची त्याने सुटका केली. तिथे सापडलेल्या सर्व मालमत्तेचा बादशहाच्यावतीने ताबा घेतला. नझीर मंझूरअली व त्याचे हिंदू साहाय्यक यांना कैद केले. एका घरात ठाण मांडून लढत रहाणाऱ्या मणियारसिंगलाही पकडले. किल्ल्यात तीन हजार रोहिले होते. त्यांची शस्त्रे व त्यांचे कपडे काढून घेऊन त्यांना धक्के मारून घालवून देण्यात आले. गुलाम कादर व अन्य कैदी यांना महादजीकडे मथुरेस पाठवून दिले; ते १७८८ सालातील शेवटच्या दिवशी (म्हणजे ३१ डिसेंबर, १७८८) मथुरेस पोहोचले. सुरवातीला महादजी त्यांच्याशी जेवढ्या माणुसकीने तेवढ्याच चातुर्याने वागला. दिल्लीकिल्ल्यातल्या लूटमारीत घेतलेले सोनेनाणे, जडजवाहीर, पैका अडका कुठे दडवून ठेवलेले आहे हे रोहिल्यांनी आपण होऊन सांगावे म्हणून सुरवातीस त्यांच्या खाण्यापिण्याची सोय शाही थाटाची ठेवण्यात आली होती. पण त्यांनी सगळी उडवाउडवीचीच उत्तरे दिली. दि. २८ फेब्रुवारीला महादजीला शहाअलमकडून एक खलिता आला. "पैशाच्या लोभाने आपल्या छळ करणाराची जर गय केली जाणार असेल तर आपण हे सर्व सोडून मक्केस निघून जातो" अशी बादशहाने त्या खलित्यात धमकीवजा भाषा वापरली होती. अखेरीस हा

हिला दैत्य गुलाम कादर व त्याचा सर्वांत वाईट, कारस्थानी मित्र विश्वासघातकी नझीर-
रअली या दोघांनाही ठार मारण्यात आले. (२-४ मार्च १७८९) त्यांना ठार मारताना
शाच शारीरिक यातना सहन कराव्या लागल्या होत्या की ज्या, त्यांनी दिल्ली राजवाड्यात
केल्या दुष्टपणाची अस्पष्टशी आठवण करून देणाऱ्या ठराव्यात. दिल्लीच्या बादशहाचे
ळे काढून गुलाम कादरने त्याचा महान अपराध केला होता. त्याची परतफेड म्हणून
दशहाच्याच हुकुमाने गुलाम कादरची बुबुळे काढण्यात येऊन ती बादशहाकडे पाठवि-
ात आली. तमाम प्रजाजनात त्याची फटफजिती व्हावी म्हणून त्याचा मृत देह दिल्लीस
ऊन त्याची वरात काढायचा बेत होता. पण सर्वत्र फैलावलेल्या वदंतेप्रमाणे खुद्द सैतान
तः आला व त्याचे पापी शरीर जहान्नमम्ध्ये घेऊन गेला. खैरउद्दीन आणखीच एक
षण व अंगावरून काटा सरसरविणारी हकिगत सांगतो.

"मुंडके नसलेले त्याचे नुसते धडच पाय वर व मानेकडील भाग खाली अशा भयानक
वस्थेत झाडावरून खाली लोंबकळत होते. काळ्या अंधारासारखे एक काळेंग्यार श्वान
झाडाखाली ठाण मांडून बसले होते. गुलाम कादरच्या धडाकडे नजर लावून
सलेल्या त्या श्वानाच्या काळ्याशार डोळ्याभोवती पांढरीफेक वर्तुळे होती, आणि ते
न धडाच्या मानेतून टिपकणारे रक्ताचे थेंब चाटीत होते. दगड मारून हाकलून
याचा प्रयत्न करूनही ते काळेकुट्ट श्वान पुन्हा पुन्हा आपल्या त्या भयंकर मेजवानी-
ली येतच राहिले. त्यानंतर दोन दिवसांनी ते मस्तकहीन धड व ते अघोरी श्वान
घेही अदृश्य झाले, आणि मग कुणाही मानवी डोळ्यांना ते कधीही दिसले नाहीत."

या भुताटकीच्या भयानक प्रसंगाबरोबरच तैमूरच्या वंशातील बादशहांच्या
तिहासातील सर्वांत भयानक अशा शोकनाट्याची समाप्ती होते.

टीपा : प्रकरण ३७

ृ	टिपेचा क्रमांक	
८०	१	१७७७ मध्ये झबिताने आपला शीख धर्मावरील विश्वास उघडपणे प्रगट केला होता व स्वतःला धरमसिंग असे नावही घेतले होते; त्यावरूनच म्हणतात—

'एक गुरू का दो चेले
अधा शीख, अधा रोहिले"

—[प्रकरण २९, पोटप्रकरण १२]

२८३ २ **डीवाय** भाग १, लेखांक २२८ : गुलाम कादर बादशहाबद्दल कृतज्ञता व्यक्त करावयास उठला तेव्हा, " खानमजकूर रसद घेऊन पातशहास मुजरा केला. तलवारीची नजर करावयास एक मोहोर पाहिली तर कोठें न मिळाली ! हे अवस्था मीरबक्षीगिरीची आहे. " [मराठ्यांचा दिल्ली दरबारातील वकील]

२८४ ३ पातशहाजाद्याच्या हालचाली व त्याचे धोरण याबत खैरउद्दीनने (त्याचा उपेक्षित मार्गदर्शक व साहाय्यक); **इब्रत** : भाग ३; ४१–१०१ यांत बारिक सारिक तपशिलासह संपूर्ण माहिती दिली आहे. **डीसी** मधील दिनांक; **गुलामअली** : खंड ३, २३८–२४७, २५०; **एचपी** : क्रमांक : १८३, **डीवाय** भाग १, लेखांक : २५३, २३२.

२८७ ४ **इब्रत** : भाग ३, १२८–१३४; **डीसी** : **एमएल्** ३३४, **गुलामअली** : खंड ३, २६७, **डीवाय** : भाग १, लेखांक : ३०१, ३०४, ३०८, ३०९; **एचपी** : क्रमांक ५२८, **पीआरसी** खंड १, क्रमांक : २२५.

२८९ ५ **शिंद्याला उशीर का लागला ?** : **पीआरसी** : खंड १ २२५–२२७, **एचपी** : क्रमांक : ५३७; **सख्य करण्याचे त्याचे नवे धोरण** : **पीआरसी** : खंड १, क्रमांक : २२४; सात भाग १, १६५; **डीवाय** : लेखांक : ३३० (राघोगड).

२९१ ६ **इब्रत** : भाग ३, १४० : आपल्या भुकेल्या व तहानलेल्या मुलाबाळांचे हाल कमी व्हावेत म्हणून जरूर ते करण्याबाबत राजपुत्र अकबराने नव्यानेच तख्तावर आरूढ झालेल्या बेदर बख्तच्या विनवण्या केल्या तेव्हा बेदरने उत्तर दिले, " हिंदुस्थानचे साम्राज्य माझ्या बापजाद्यांच्या मालकीचे आहे. तुझा बाप तीस वर्षे बादशहा असताना त्याच्या अमदानीत आम्ही कोणत्या यातना नि दुःखभोग भोगले नाहीत ! सतत तीस वर्षे ते सारे आम्ही निमूटपणे सोसले. आता बादशहा होण्याची पाळी माझी आहे."

रो ' स्टार्व्हिंग प्रिझनर–प्रिन्सेस : ' मॉदेव, जुर्नी द व्होयाज, ' इस्लामिक कल्चर, १९३५ ' यात मी भाषांतर केलेले. **पेस्टर**, ' वॉर ऑफ स्पोर्ट इन इण्डिया. '

२९३ ७ **गुलामकादरचा सूड** : **इब्रत** : भाग ३, १५४ (काहर-इ-खुदा) १४१, १४३ (नजीबउद्दौलाच्या मालकीच्या तोफा परत नेण्यात आल्या.)

२९४ ८ **दुसऱ्या शहाअलमची पदच्युती**– **डीसी**, **पीआरसी**, खंड १, क्रमांक २२८, **इब्रत** : भाग ३, १३७–१३९ (माझ्या **एमएल** हस्तलिखितातील उणीव. गुलामअली फक्त काही कडवीच देतो) **डीवाय** : भाग १

लेखांक : ३१०–३११, **डीसी** व डब्ल्यू पामरला पाठविण्यात आलेले एक पत्र यातील माहितीनुसार, बादशहाने शिंद्याला मदत पाठविण्याबद्दल लिहिलेले पत्र आढळून आल्यामुळे गुलामकादरने त्याला गादीवरून खाली खेचले. खैरुद्दीन जी बारिक सारिक माहिती देतो त्यात वृद्ध बादशहाने अशा प्रकारचा विश्वासघात केल्याचा उल्लेख कुठेही नाही; आणि खरे म्हणजे १५ जुलैनंतर किल्ल्याच्या आवारात शहाअलम जवळजवळ शून्यवत होता.

५ ९ शहाअलमच्या डोळ्यातून रक्त ठिपकत आहे, अशाच अवस्थेत गुलाम कादर त्याच्याजवळ गेला. त्याने त्याची दाढी हिसकली व तो मोठ्याने ओरडून म्हणाला, " बरोबर अद्दल घडली तुला. गोसगड येथे जे वीर कृत्य केलेत, त्याची ही बक्षिशी ! " (**इब्रत : १४७**) अफघाणाची सूडवृत्ती दशकानुदशके धुमसत राहील पण ती कधीच विझणार नाही. **गुलाम कादरची राक्षसी कृत्ये : इब्रत** : भाग ३, १३६–१७४ (संपूर्ण) **डीसी. पीआरसी** : खंड १, क्रमांक २२७–२३५; **डीवाय** : भाग १, लेखांक ३०९–३१४, ३४४, ३२७; **एचपी** : क्रमांक ५३०, ५३७, ५३८, **सात** : भाग १, १५०.

७ १० आज हर एके इन्साफ-ई-बेमाली ए-आंहा मिखवस्त;
वा ता बहार एके इख्तिलात-ई-नशाइस्ता दर मै दस्त ॥ (इब्रत : १५३)
या ओळींचे मी केलेले अगदी मवाळ भाषांतर.

७ ११ **एचपी** : क्रमांक ५३० वरून आपल्याला समजते ते, शाही अंतःपुरातून अगदी वेचक अशा देखण्या स्त्रियांना त्याच्या गौसगड येथील राजमहालात धाडण्यात आले होते. या बाबतीत इब्रत काहीच सांगत नाही. पण बादशहाच्या राजप्रासादातील अत्यंत लावण्यवती नर्तिकांना गुलाम कादरच्या जनानखान्यात पाठवून देण्याबाबत हुकूम निघाल्याचे सांगतो.

८ १२ यापेक्षा नेमस्त अंदाज म्हणजे पंधरा लाख रोख; त्याशिवाय बाजारात ज्याला ग्राहक उपलब्ध होणे कठिण अशी किमती वस्त्रे-प्रावरणे व लाकडी सामानसुमान.

९ १३ **इस्माइल बेगशी तंटा : डीसी : इब्रत** भाग ३, १४१–१४३, १६३–१६७, **डीवाय** : भाग १, लेखांक : ३१३. सप्टेंबरच्या अखेरीस शिंद्याने इस्माइलबेगला दीडलाख रोख व नजफकूलीपासून सोडवून घ्यावयाची असलेली रेवाडीची जहागिर कबूल केली होती.
डीवाय : भाग १; लेखांक : ३४२, ३३९ (किंवा गोसगड).

० १४ **मराठ्यांचा दिल्लीवर पुन्हा ताबा—इब्रत,** भाग ३, १७०–१७२, **डीसी पीआरसी** : खंड १, २३४–२३६, २४३; **सात** भाग १,१५६;

ऐति. पत्रव्यवहार २६६, **डीवाय :** भाग १, लेखांक : ३२०, ३२४, ३२५, ३३८, ३४२, ३४४, ३१५; **एचपी** : क्रमांक : ५३८.

३०२ १५ **गुलामकादरचा पाठलाग : इब्रत :** भाग ३, १७३, १८३–१९३. **डीसी : पीआरसी :** खंड १, क्रमांक २३८–२४४, **डीवाय :** भाग १, **लेखांक :** ३२४, ३४३, ३४४, ३५४, ३५९, ३६२–३६८; **एचपी :** क्रमांक : ५३९–५४०, ५४९–५५६; **सात** भाग १, १६१–१६६. **ऐति. पत्रव्यवहार** : २६७, २७३–२७५, **मृत्यू : डीवाय :** लेखांक ३७२, ३७८; **एमडी** : भाग २, लेखांक : १७३; **इब्रत :** १९१–१९३.

३०४ १६ **डीवाय** : भाग १ लेखांक ३५९ यांत जादीगाव असे नाव दिले आहे, पण **पीआरसी,** खंड १, क्रमांक २४१ यात बामणौली (रामनौती याबद्दल माझी दुरुस्ती. कदाचित हा नकल करणाराचा हस्तदोष असावा) असे नाव दिले आहे. सर्वच मान्यवर इतिहासज्ञ हे मान्य करतात की सदर ठिकाण, हे शामलीच्या अलीकडे अगदी थोड्या मैलांवर आहे. (**एचपी : ५५५**) म्हणजे यामुळे याहून अधिक माहिती असलेले असे मीरतच्या वायव्येस २४ मैलांवर असलेले बामणौली हे नव्हे, हे सरळच आहे. शामली हे गाव पानिपतच्या अगदी पूर्वेस २२ मैलांवर व नंतर सांगितलेल्या बामणौलीच्या उत्तरेस २२ मैलांवर आहे.

संक्षेपांचा खुलासा

- इंग्रजी

१) **पीआरसी : पूना रेसिडेन्सी कॉरस्पॉन्डन्स** [जदुनाथ सरकार संपादित]

- फार्शी

१) **बयान : बयान–ई–वाकी :** खिलजी अबदुल करीम खान
[ईएल : खंड ८ : पृ. १२४]

२) **गुल-ई-रहमत :** सादत यार खान
[ईएल : खंड ८ : पृ. ३०१]

३) **गुलिस्तान–ई–रहमत :** नवाब मुस्तजब खान :
[ईएल : खंड ८ : पृ. ३०१]

४) **इब्रत : इब्रतनामा :** फकीर खैरुद्दिन मुहमद
[ईएल : खंड ८ : पृ. २३७]

५) **इमाद–उस–सादत :** मीर गुलाम अली
[ईएल : खंड ८ : पृ. ३९४]

६) **सियार : सियार–उल्–मुताखरीन :** गुलाम हुसेन खान
[ईएल : खंड ८ : पृ. १९४]

७) **बिहारीलाल :** बिहारीलाल मुन्शी : **अहवाल–ए–नजीब–उद्दौला :**
[मार्शल : खंड १ : क्रमांक : ३६१ पृ. ११६]

८) **गुलामअली :** गुलाम अली खान **शाह अलमनामा**
[ईएल : खंड ८ : पृ. ३९३]

९) **मिस्किन :** ताहमस्पखान : **ताहमस्पनामा :** मिस्किन या टोपण नावाने लिहिलेले.
[ईएल : खंड ८ : पृ. १००]

०) **मुन्नालाल : किंवा मनुलाल : तारीख--ई--शहा अलम**
[ईएल : खंड ८ : पृ. ३९३]

१) **चाहर गुलझार : चाहर--गुलझार--ई--शुजाई :** हरिचरणदास,
[ईएल : खंड ८, : पृ. ३९३]

ईएल : ईलियट ॲन्ड डौसन : हिस्टरी ऑफ इण्डिया सिरीज.

मार्शल : मुगल्स इन इंडिया : बिब्लिऑग्राफिकल सर्व्हे : डी. एन्. मार्शल.

२) **सीपीसी :** क्रॉनिकल ऑफ पर्शिअन कॉरस्पॉन्डन्स.

३) **डीसी :** दिल्ली क्रॉनिकल.

४) **अखबरात :** बादशहाच्या दरबारात प्रत्येक दिवशी होणाऱ्या कामकाजाची माहिती लिहून ठेवलेली बातमीपत्रे. प्रत्येक दिवसाच्या कामासाठी स्वतंत्र

कागद वापरला जात असे. याचे ३५ खंड असून ते **जदुनाथ सरकार** यांनीच संपादित केलेले आहेत. (एसजे- सरकार, जदुनाथ)

– हिंदी

१) **वीर विनोद** : कविराज शामलाल दास : चार खंड

२) **वंश भास्कर** : सूरजमल मिश्रा : आठ खंड

– मराठी

१) **ऐति. चरित्रे** : **ऐतिहासिक चरित्रे**

२) **ऐति. टिपणे** : **ऐतिहासिक टिपणे**

३) **ऐति. स्फूट लेख** : **ऐतिहासिक स्फूट लेख**

} द. ब. पारसनीस ‘ इतिहास संग्रह ’ मासिक

४) **ऐति. पत्र. व्यव.** : **ऐतिहासिक पत्रव्यवहार** : गो. स. सरदेसाई, कृ. पां. कुलकर्णी व या. मा. काळे संपादित.

५) **खरे** : खरे वासुदेव वामन : ऐतिहासिक लेखसंग्रह : १४ भाग

६) **राजवाडे** : राजवाडे विश्वनाथ काशीनाथ : **मराठ्यांच्या इतिहासाची साधने** : २२ खंड

७) **डीवाय** : **दिल्ली येथील मराठ्यांची राजकारणे**
द. ब. पारसनीस संपादित भाग १ व २

८) **एमडी** : **महेश्वर दरबारची बातमीपत्रे**
द. ब. पारसनीस संपादित भाग १ व २

८अ) **एमएल** : उपर्युक्त मुन्नालाल किंवा मनूलाल

९) **जी डब्ल्यू** : **महादजी शिंदे यांची कागदपत्रें**
द. ब. पारसनीस संपादित भाग १ ते ५

१०) **एचपी** : **वरील पुस्तकाची सुधारित आवृत्ती** : पाचही भाग एकत्रित : गो. स. सरदेसाई संपादित

११) **सात्** : **महादजी शिंदे यांची कागदपत्रें**
सातारा हिस्टॉरिकल रीसर्च सोसायटीने प्रसिद्ध केलेली

१२) **एस पीडी** : **सिलेक्शन्स फ्रॉम पेशवा दफ्तर**
गो. स. सरदेसाई संपादित

१३) **चंद्र, चंद्र डी** : चंद्रचूड दफ्तर

१४) **आय. ओ. एल.** : इण्डिया ऑफिस लायब्ररी

१५) **आय. एच. क्यू.** : इण्डियन हिस्टॉरिकल कार्टर्ली

१६) **ए. एस. बी** : एशिॲटिक सोसायटी ऑफ बेंगॉल

१७) **आय. आर. ओ** : इण्डिया रेकॉर्ड ऑफिस